TEXT PROBLEM
WITHIN THE
BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY

OU_192618

UNIVERSAL
LIBRARY

# दासू

वि. म. भुस्कुटे

# वि. म. भुस्कुटे यांचीं पुस्तकें

**मावळयाची करुण कहाणी** ( १९२२ )

**रशियाचा शेतकरी** ( १९२५ )

**मुळशी सत्याग्रह** ( छापत आहे )

## चरित्रें

**विष्णुशास्त्री चिपळुणकर** ( १९२० )

**कार्ल मार्क्स** ( १९३० )

**लेनिन** ( १९३४ )

**स्तालिन** ( १९४३ )

**सदाशिवराव भाऊ** ( १९४६ )

**डॉ. सन्यत्सेन** ( १९४६ )

## अनुवाद

**दारिद्र्याचा गुन्हा** ( ले. हेन्री जॉर्ज ) ( १९२५ )

**टॉल्स्टॉयचीं नाटकें** ( १९३६ )

१ आत्मनिवेदन

२ पहिली दारु कुणी गाळली ?

**आई** ( ले. मॅक्झिम गॉर्की ) ( १९४४ )

# दासू

लेखक

वि. म. भुस्कुटे

लो क - सा हि त्य

८७, शिवाजीपार्क, मुंबई २८

किंमत साडेतीन रुपये

पहिली आवृत्ति : १९४६

( सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन )

मुद्रक : शराफ अतहर अली, न्यू एज प्रिंटिंग प्रेस, १९० बी खेतवाडी मेन रोड, मुंबई ४
प्रकाशक : शकुन्तला मोडक, लोकसाहित्य, ८७ शिवाजी पार्क, मुंबई २८

# १

दुपारची वेळ होती. जेवणखाण आटोपलें होतें. विसूभाऊ माजघरच्या दारांतून बाहेर येऊन सोप्यांत टांगलेल्या झोपाळयावर येऊन बसणार इतक्यांत पांडोबा दळवीनें त्यांचे पाय घट्ट धरले व तो ओक्साबोक्शीं रडूं लागला.

‘बस्स, कळलं, कळलं कशाकरतां हें ढोंग आहे तें.’ असें म्हणून विसूभाऊंनीं पांडोबाला जवळ जवळ लाथाडलें व ते झोपाळयावर बसले.

‘पांड्या, हें पहा, तुला एक दमडीहि मिळायची नाहीं. चल चालता हो पाहूं!’

‘नका भाऊ, असं नका करूं. एवढी वेळ कशी तरी भागवा.’

‘भडव्यांनो! बापाची पेंड आहे नाहीं का? जो तो उठला, आला विसूभाऊकडे! म्हणे विसूभाऊ, विसूभाऊ!’

‘भाऊ! काय बी म्हणा, लाथा मारा, टाळक्यावर जोडे हाणा! भाऊ! तुम्हीच आमचे मायबाप. आम्ही जावं कुणाकडं?’

‘कुठं मसणांत का जा ना!’

‘नाहीं, भाऊ, तुमच्या पायांपाशींच परान देऊं. आजची वेळ कशी तरी भागवाच.’

‘कां रे पांड्या, भड...जाऊं दे. तोंडांत शिवीच येते.’

‘द्या, शिवी द्या. भाऊ, थांबतां कशाला? तुमच्याशिवाय आम्हांला सत ना गत.’

‘बरं पांड्या, तुझं म्हणणं तरी काय?’

‘कांहीं नाहीं! पन्नास रुपये पाहिजेत. कसं बी करुन एवढी नड......’

‘काय म्हणतोस काय, पन्नास! लुटा लेको भाऊला! लुटा तरी. त्याच्या घरावर दरवडा का घालीत नाहीं?’

‘राम, राम, असं नका बोलूं सावकार.’

‘सावकार, सावकार, त्यालाहि पोट आहेच कीं नाहीं?’ विसूभाऊ आपल्या प्रचंड पोटावर हात फिरवूं लागले.

‘तुमच्या पोटांत आमची किती तरी पोटं भरतील.’

‘बरं, बरं, दांत विचकायला कांहीं वाटत नाहीं? पन्नास, चांगले पन्नास रुपये मागतोस तूं, अगदीं रोख पाहिजे असतील. पण त्याच्या बदला ठेवायला बरोबर कांहीं आणलेलं दिसत नाहीं.’

विसूभाऊंची सावकारी अगदीं शुद्ध पायावर चालली होती. विसूभाऊंनीं आपल्या वडिलांच्या मागें सावकारी हातीं घेतल्यापासून हात उसनवार असे कधींच कोणाला पैसे दिले नाहींत. अगदीं चार दोन रुपये का असेनात, कांहीं तरी जिन्नस गहाण ठेवून घेतल्याशिवाय ते कोणालाच पैसे देत नव्हते. अगदीं जवळचा, कितीहि जवळचा नातेवाईक, ऋणानुबंधी का असेना, कांहीं तरी गहाण ठेवल्याशिवाय विसूभाऊंकडून एक दमडीहि मिळायची नाहीं असा त्यांचा लौकिक होता. एकदां विसूभाऊंच्या घरचा एक पिढीजाद भिक्षुक त्यांच्याकडे पंधरा रुपये मागण्याकरतां आला. रक्कम फारशी मोठी नव्हती. बिचाऱ्यावर तसाच बांका प्रसंग आला होता. घरीं बायको मरून पडली होती. तिच्या अंत्यविधीला जरूर असलेले पैसे त्याजपाशीं नव्हते. आयत्या वेळीं पैसे कोणापाशीं मागायचे ? जवळच्या नातेवाईकाकडे अशा वेळीं पैसे मागावे तर अपमानास्पद गोष्ट. तेव्हां कोणालाहि आपली अडचण भासूं न देतां त्यानें विसूभाऊकडे एकांतांत जाऊन पैशाची मागणी केली. पण विसूभाऊ कसले वस्ताद ! त्यांनीं हातावर तसेच पैसे देण्याचें साफ नाकारलें. केवळ हातावर पैसे न देण्याची आपली भीष्मप्रतिज्ञा पाळण्याची हीच कसोटीची वेळ आहे असें त्यांना वाटलें. भिक्षुकानें पुष्कळ गयावया करून पाहिलें, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं या भिक्षुकानें आपल्या लग्नाच्या वेळीं बायकोकरतां घेतलेली रेशमी पैठणी विसूभाऊंकडे गुपचुप आणून दिली त्या वेळीं भाऊंनीं भिक्षुकाच्या हातावर पंधरा रुपये टिकविले. विसूभाऊंच्या सावकारीचा असा हा चोख व्यवहार होता. या ठिकाणीं दया, माया, प्रेम, ऋणानुबंध वगैरे भावनांना मुळींच जागा नव्हती. " आज रोख उद्यां उधार " अशी पाटी दुकानांत चांगल्या ठळक जागीं लावायची व भिडेला बळी पडून उधार माल द्यायचा व उधारी वसूल करतां न आल्यामुळें दुकानाचें दिवाळें निघायचें अशीं उदाहरणें विसूभाऊंच्या डोळ्यापुढें होतीं. प्रतिज्ञा ती प्रतिज्ञा; मग कसलाहि प्रसंग असो. या कांटेकोर वृत्तीमुळेंच विसूभाऊंची सावकारी त्यांच्या वडिलांच्या वेळेपेक्षांहि ऊर्जितावस्थेला आली होती. विसूभाऊंच्या बैठकीच्या जागेंतील कपाटें, त्यांची तिजोरी व तेथेंच देवघराजवळ असलेली त्यांची कोठी गहाणांच्या जिन्नसांनीं गच्च भरून गेली होती. त्याचप्रमाणें विसूभाऊंची दप्तरेंहि गहाणाच्या कागदांनीं फुगलीं होतीं.

पांडोबाला विसूभाऊंचा हा स्वभाव पूर्णपणें माहीत होता. पण आपण आणलेला जिन्नस भाऊंना पटेल कीं नाहीं याची त्याला खात्री वाटत नव्हती. गहाण ठेवायला जिन्नस असल्यावर अगदीं भर बारा वाजतां रात्रीं कोणी आला तरी त्याच्या हातावर रोख पैसे पडायचेच असा भाऊंचा दंडक होता. विसूभाऊ हवें तें व्याज आकारील पण गहाण ठेवल्यावर हवी ती रोख रक्कम हातावर ठेवील अशी विसूभाऊंची ख्याति होती. सासून हॉस्पिटलमधील हाऊस सर्जन अपेंडिसाईटिसची किंवा सर्वांग भाजून

निघाल्याची मरणोन्मुख असलेली केस दाखल झाल्याचें कळूनहि आपल्या सुखनिद्रेंतून उठायला एकाद्या वेळीं आळस करील, पण विसूभाऊंचें तसें नव्हतें. ऋणको दाराशीं आल्यावर व त्यानें आपली अट पुरी केल्यावर केव्हांहि कितीहि रोख रक्कम विसूभाऊ मोजावयास तयार असत. यामुळें अगदीं गरीब शेतकऱ्यापासून ते अगदीं मोठमोठ्या व्यापाऱ्यापर्यंत व सरदार वतनदारापर्यंत विसूभाऊंच्या घरीं गिऱ्हाइकें धांवून येत व आपली गरज पुरी करून घेत.

पांडोबाला काय, या वेळी अगदीं केवळ पन्नास रुपयेच पाहिजे होते. "गहाण ठेवायला कांहीं आणलंस का ?" असें पांडोबाला विचारल्याबरोबर तो मागेंपुढें पाहूं लागला.

'हें पहा, तें कांहीं चालायचं नाहीं. कांहीं तरी ठेवशील तरच पैसे मिळतील.'

पांडोबाच्या तोंडून शब्द बाहेर पडेना.

'कां रे, पांड्या, तुझी बायको परवा बाळंत झाली, नाहीं का ?' विसूभाऊंनीं विचारलें.

'भाऊ, म्हणूनच तर तुमच्यापाशीं आलों. काय सांगूं भाऊ ! पांडोबा ओक्साबोक्शी रडूं लागला.

'अरे, असं रडायला झालं तरी काय ?'

'भाऊ, काय सांगू !' पांडोबा बोलूं लागला. 'डॉक्टरकडे वीस मैल तंगडत गेलों. त्याला सर्व हकीकत सांगितली. पण फी शिवाय तो थोडाच जागचा हालतो. त्याची फी कशी तरी भागविली, त्याची जाण्यायेण्याची खर्ची दिली. तो पाहून गेला. पण आतां इंजक्षण, फी, मोटार भाडं, दगड न् धोंडे ! आणखी पन्नास रुपये तो मागतुया ! बायको तर कालपासून बेशुद्ध आहे. आजची वेळ कशी तरी ......'

'जाऊं दे मरं ना ती ! कांहीं ठेवायकरतां आणलयस् का ?'

'काय हें असं अभद्र बोलावं ! त्याला पैसे द्या, नाहीं तर नका देऊं, पण माणसाच्या काळजावर घाव पडतील असं काय म्हणून बोलावं ?'

विड्याचें तबक हातांत घेऊन माजघराच्या दारांत आलेल्या सुभद्राबाई बोलल्या. सुभद्राबाईनीं आपलें बोलणें संपविलें नव्हतें इतक्यांत पांडोबा दारापाशीं धांवत गेला. अन् तिथें त्यांच्यापुढें त्यानें लोटांगण घातलें.

'आली मोठी सांगायला. या सगळ्यांचे संसार पाहूं लागलों तर दिवाळंच वाजवावं लागेल.' विसूभाऊ हेटाळणीच्या स्वरांत म्हणाले.

'सांगा आई, रखमाईसारख्या तुम्ही !'

विसूभाऊंचें वय पंचावन्न उलटून साठीच्या घरांत गेलें होतें, पण जेवण झाल्यावर पत्नीनें स्वतः तयार करून दिलेला विडा मिळाल्याशिवाय त्यांची वामकुक्षीची तयारी होत नव्हती. सुभद्राबाई त्यांच्या तृतीय पत्नी.

‘ बरं, बरं, पांड्या, कांहीं आणलं आहेस का ? ’

सुभद्राबाईंना भाऊंचा स्वभाव पक्का माहीत होता. कांहीं न बोलतांच त्या आंत निघून गेल्या.

पांडोबानें आतां मन घट्ट केलेंच व भाऊंच्या प्रश्नाला उत्तरादाखल म्हणून आपल्याबरोबर आणलेल्या पोराकडे पाहून त्यानें त्यांचें लक्ष तिकडे वेधलें.

‘ म्हणजे ! ’ भाऊंचे नेत्र आश्चर्यानें विस्फारित झाले.

‘ काय म्हणतोस काय ! ’ ते उद्गारले.

‘ चला गादीवर बसा, सगळं सांगतों. ’ पांडोबानें खुणावलें.

विसूभाऊंच्या आयुष्यांत ही अगदीं नवी गोष्ट होती. गहाण किंवा खरेदी म्हणून अनेक सचेतन, अचेतन जिनसांना भाऊंनीं आपल्या वाड्यांत स्थान दिलें होतें. पण प्रत्यक्ष माणूस !

पांडोबाबरोबर आलेला मुलगा पडवींतील खांबाला बांधलेल्या कुत्र्याबरोबर खेळूं लागला होता. कुत्र्याचें पोर जातिवंत होतें. आपले व्याही चिन्नरकर इनामदार यांच्याकडून भाऊंनीं तें आणलें होतें. चिन्नरकर इनामदारांना कुत्र्याचा भारी षोक. इनामदार म्हटला कीं त्याला कांहीं तरी षोक पाहिजेच. चिन्नरकरांना हा षोक होता. निरनिराळ्या जातिवंत कुत्र्यांचा तांडाचा तांडा त्यांनीं बाळगला होता व त्यांची बरदास्त ठेवण्याच्या पायीं सालिना आठदहा हजार रुपये ते खर्चीत होते. विसूभाऊसारख्या सावकार मेव्हण्यानें कुत्रें मागितल्यावर इनामदार कसे नकार देणार ? चिन्नरकरांनीं एकाद्या त्यांच्यासारख्याच शोकी माणसाकडून या कुत्र्याचे दोन तीनशें रुपये सहज घेतले असते.

कुत्रें तसेंच सुंदर, मोहक व उमदें होतें. पांडोबाबरोबर आलेल्या मुलाची व त्याची नजरानजर मात्र झाली कीं कुत्र्यानें आपली झुपकेदार शेपटी हलवायला सुरुवात केली. एरवीं दुसऱ्यांवर उगाचच जातांयेतां गुरगुरणारें कुत्रें त्या मुलाला जणूं आपला दोस्तच बनवूं पाहात होतें.

विसूभाऊ गादीवर बसल्याबरोबर पांडोबा दळवी त्यांच्या कानाशीं लागला.

‘ तुमच्या घरचं कुत्रंच समजा ना ! तुमच्याकडं आणून द्यायला माझ्याकडं भांडं कुंडं राहिलं नाहीं. बैल, गाय, रेडा, कांहींसुद्धां राहिलं नाहीं. मग याला आणलं. तुमच्याकडं कांहीं तरी ठेवायला पाहिजेच ना. गहाणच नाहीं, तुम्हांला कायम खरेदी म्हणून देण्याकरतां हा जिन्नस आणला आहे. कुत्र्यापेक्षां खात्रीनं जास्त काम देईल. ’ तो म्हणाला.

विसूभाऊंनीं आपल्या सबंध सावकारीच्या जिनगानींत माणूस नव्हतें खरेदी केलें.

झालें, सौदा जमला.

‘ दास्या, आतां तुला इथंच राहायचं बरं का ! ’ गांवीं परत जातांना पांडोबानें सांगितलें. त्याचे हे शब्द ऐकून दासूला थोडें चमत्कारिकच वाटलें. पांडोबा काय सांगतो हें त्याला नीट समजलें नाहीं, तरी आतां पांडोबा आपल्याला या नवीन घरांत सोडून जाणार हें मात्र त्याला नक्की समजलें.

दासू सर्वसामान्य सात-आठ वर्षांच्या मुलासारखा दिसत होता. त्याचा वर्ण गोरा होता. अंगलट सडपातळवजा होता. नाकाडोळयांनीं तो नीटस व तरतरीत दिसत होता. पांडोबाकडे तो लहानाचा मोठा झाला. आश्चर्य हें कीं पांडोबाबद्दल किंवा पांडोबाच्या बायकोबद्दल त्याच्या मनांत जिव्हाळा उत्पन्न झाला नव्हता. प्रेमापासून प्रेम निर्माण होतें. दासूला थोडेसें समजूं लागल्यापासून पांडोबाची बायको म्हणजे धाक दाखविणारें माणूस अशी दासूची कल्पना झाली होती. पांडोबाच्या बायकोला पाहिलें कीं त्याला कधीं प्रेम वाटत नसे. भयच वाटत असे. दासू आपला औरस मुलगा नव्हे हें पांडोबानें विसूभाऊंच्या कानांत सांगितलें होतें. बेवारशी पोर त्यानें लहानाचे मोठें केलें अन् ज्या माउलीच्या स्तनाशीं तें बिलगलें ती पांडोबाची बायको लवकरच वारली. पांडोबानें म्होतूर लावून केलेली ही दुसरी बायको. या बायकोला पांडोबाच्या मुलाबद्दल—शिवाय ज्या पोराच्या आईबापाचा पत्ता नाहीं अशा पोराबद्दल—प्रेम कसें वाटणार ? त्यामुळें दासूला पांडोबाचें घर काय किंवा दुसऱ्या कोणाचें घर काय, सारखेंच होतें. जातां येतां पांडोबाच्या बायकोकडून थपडा खाव्या, दिलेल्या खांडगाळया शिव्या ऐकाव्या व डोळयांतून गळणाऱ्या पाण्याबरोबर तिनें दिलेले वाळलेकोळले तुकडे खावे. विसूभाऊंच्या घरांतील वातावरण यापेक्षां अगदीं निराळें असें अर्थात्च त्याला भासलें. येथें आल्याबरोबर त्याला जें खायला मिळालें तें अन्न पांडोबाच्या घरांतील अन्नापेक्षां किती तरी परीनें जास्त चांगलें व चवदार. पांडोबानें जातां जातां त्याला एक कुडतें शिऊन दिलें. पांडोबाची आठवण म्हणून दासूला हें कुडतें कांहीं दिवस उपयोगी पडलें इतकेंच.

दासूला निजायला बसायला पडवींतच कुत्र्याजवळची जागा मिळाली होती. दासू आल्यापासून या पडवींतल्या कुत्र्याचें व त्याचें जें प्रेम जमत चाललें तें औरच होतें. निजायकरतां त्याला एक पटकूर मिळालें होतें. कुत्र्याकरतां तसेंच एक पटकूर होतें. ‘ कुत्रंच समजा ना ! ’ असें पांडोबानें विसूभाऊंना बोलून दाखविलें होतें. विसूभाऊ कांहीं का समजेनात, विसूभाऊंच्या कुत्र्यानें मात्र आपला एक नवीन दोस्त म्हणून दासूवर प्रेम करायला सुरुवात केली. रात्रीं निजतांना दासू कुत्र्याच्या अंगावर डोकें टेकी व कुत्रेंहि त्याच्या अंगावर आपला पंजा ठेवून झोंपी जाई.

विसूभाऊंनासुद्धां वाड्यांत एक पोरगा पाहिजेच होता. घरांतलें उरलेंसुरलें खाऊन राहणारा असा हा पोरगा त्यांना मिळाला. कुत्र्याला संभाळील, त्याची व्यवस्था ठेवील, कुत्र्याच्या बसण्याची जागा व पडवी स्वच्छ राखील. याशिवाय काय थोडींथोडकीं

कामें आहेत ? पांडोबानें सांगितलें तेंच खरें. कुत्रें वाढत गेलें तर त्याचा उपयोग मर्यादितच. पण दास्या जसजसा वाढेल तसतशी त्याची उपयुक्तताहि वाढेल. हवें तें काम त्याच्याकडून करून घेतां येईल. फुकटचें फेंकून द्यायचें तें अन्न तो खाईल. त्याच्या पोटाकरतां म्हणून कांहींच खर्च नाहीं, अन् कपडे ते काय लागणार ! या सर्व खर्चापेक्षां खात्रीनें जास्त काम त्याच्याकडून करून घेतां येईल. रोजच्या, महिन्याच्या किंवा सालवार मजूरीनें कां होईना, एकादा पोर ठेवला तर त्याला ठरलेली मजूरी द्यावी लागेलच. शिवाय असला पोर दिवसेंदिवस जास्तजास्त मजूरी मागत सुटणार. दासूच्या बाबतींत ती काळजी नव्हती. कायमचा गुलाम. पांडोबानें आपल्या घरीं लहानाचें मोठें केलेलें पोर विकून टाकलें अन् विसूभाऊंनाहि पांडोबानें मागितलेले पैसे देतांना संकोच वाटला नाहीं. दासूला विचाऱ्याला हें सर्व काय माहीत ? भाऊ सावकारांच्या कुत्र्याबरोबर त्याची मैत्री जमली होती.

# २

'चल हो दूर. आईच्या मांडीवर शालीच बसणार. अधोलीभर भात घालून तुला विकत घेतलं बाबांनीं.' असें म्हणून शरद्च्या सर्वात मोठ्या बहिणीनें त्याला मागें लोटलें.

दुपारच्या जेवणानंतर नेहमींप्रमाणें विसूभाऊ वामकुक्षीकरतां सोप्यावरील देवघराच्या समोरील खोलींत निघून गेले होते. कोणाची गडबड ऐकायला नको म्हणून दार लावून ते स्वस्थपणें झोंपीं गेले. सुभद्राबाईकडे त्यांची धाकटी बहीण रमाबाई आपल्या मुलाबाळांसह उन्हाळ्याच्या सुट्टीच्या दिवसांत राहावयास आल्या होत्या. विसूभाऊ झोपी गेल्यावर या दोघी बहिणी सोप्यावर आल्या व झोपाळ्यावर बसल्या.

'काय ग कुसे, चावट कुठली, त्या पोराच्या मागं का लागलीस उगाच ?' सुभद्राबाईनीं शरदचा कैवार घेतला.

'शरदला कोणाकडून ग विकत घेतला, ताई ?' तिच्या धाकट्या बहिणीनें विचारलें.

'शरद्ला विकत घेतला ! शरद्ला विकत घेतला !' असें म्हणत त्याच्या बहिणी त्याच्याभोंवतीं नाचूं लागल्या.

'आई माऽऽझी, जा दूर, तुला विकत घेतला.' शालीनें त्याला धुडकावलें.

शरद आतां मात्र चांगलाच चिडला व रडूं लागला.

‘ गजगेवाल्या बाईकडून शरद्‌ला विकत घेतला. ’ कुसूमनें जसा कांहीं धोशाच लावला होता.

‘ का ग, चावटांनों, गप्प बसतां का नाहीं? ’ सुभद्राबाईनीं मुलींना दरडावलें.

‘ माझं बाळ तें. ’ सुभद्राबाईनीं शरदला पोटाशीं कवटाळलें. ‘ शालीला बसूं दे आईजवळ. तूं माझ्याजवळ बैस. मी तुला मोटार देत्यें, सुकं अंजीर देत्यें. ’ त्या म्हणाल्या.

‘ मला अंजीर ! मला अंजीर ! ’ शालीनें आईच्या मांडीवरून खालीं उडी टाकली व मावशीजवळ ती अंजिराची मागणी करूं लागली.

‘शरद्‌ला विकत घेतला ना? मग त्यालाच मी अंजीर देणार.’ सुभद्राबाई म्हणाल्या.

‘ आतां कशी ! ’ शरद् सुभद्राबाईंच्या कुशीशीं बिलगून बोलला.

इतक्यांत पडवींत धप धप असा आवाज झाला व त्याबरोबर किंचाळीहि ऐकूं आली.

सगळींच माणसें पायऱ्यांकडे धावलीं. सुभद्राबाईची मुलगी मालिनी सोप्यावरून पडवींत उतरणाऱ्या पायऱ्यांकडे रांगत जातां जातां खालीं पडली होती. दासूनें त्यांतल्यात्यांत प्रसंगावधान राखून मालीला उचललें होतें, तिच्या कपाळांतून रक्त वाहात होतें अन् रडणें तर चालूच होतें.

‘ अरे, झालं तरी काय ! कारट्यांनीं जसा कांहीं उच्छाद मांडलाय ! ’ विसूभाऊ निजण्याच्या खोलींतून ताडकन् दार उघडून बाहेर आले व पडवींत उतरून त्यांनीं दासूच्या गालावर दोन चपराका ठेवून दिल्या.

‘ का रे, हरामखोरा, डोळे फुटले होते का ? ’ ते ओरडून म्हणाले. दासूची समजूत कोण घालणार ! समजूत घालायला वेळहि नव्हती. मालीला लागलेली जखम फारशी मोठी नव्हती. रमाबाईनीं चपळाई करून जखम धुतली व तिच्यावर पट्टीहि बांधली. या अपघातानें सोप्यावरचा पूर्वीचा गलगा अजीबात थांबला.

‘ दासूनं मालीला उचललं म्हणून बरं, नाहीं तर मुलगी खालीं फरशीवर आदळली असती . ’ सुभद्राबाई म्हणाल्या.

विसूभाऊंनीं मारल्यानंतर दासू पडवींत एका कोपऱ्यांत जाऊन उभा राहिला होता. रमाबाई त्याच्याजवळ गेल्या.

‘ काय हें राक्षसी कृत्य ! पोराच्या गालावर पांची बोटं उठलीं आहेत. ’ असें म्हणून रमाबाईनीं दासूला जवळ घेऊन कुरवाळलें. ‘ पोरानं मुलीचे प्राण वांचविले अन् त्याला हें बक्षिस ! खासा न्याय ! ’

‘ कारट्यानं मुलीला अगोदर पडूं का दिलं ? त्या वेळीं कां लक्ष ठेवलं नाहीं ? ’ भाऊ ओरडून म्हणाले.

‘ म्हणजे म्हणतां काय तुम्ही ? पोराची जात. सोप्यावर मुलांचा दंगा चालला होता. तिकडं त्याचं लक्ष गेलं असेल. अगदीं पहिल्या किंचाळीबरोबर त्यानं मालीला उचलून घेतलं हें काय थोडं झालं ? ती आणखी एकदोन पायऱ्या खालीं लवंडत जाऊन फरशीवर आपटली असती तर बेशुद्धच झाली असती. ’ सुभद्राबाईंना उद्देशून रमाबाई म्हणाल्या व मालिनी अपघातांतून वांचली म्हणून सर्वांना पेढे वांटण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यांनीं तो बेत लगेच अमलांतहि आणला. बाजारांतून पेढे आणल्यावर त्यांनीं देवापुढें दोन पेढे ठेवले. घरादारांतील सर्व मंडळींत त्यांनीं पेढे वाटले. सगळ्या मुलांना पेढे मिळाले. दासूलाहि अर्थात् पेढे मिळाले. बशींत पेढे घालून सुभद्राबाईनीं भाऊंच्या पुढे गादीवर ती ठेवून दिली.

‘ मला नकोत ते पेढे ! त्या हरामजाद्या गुलाम कारट्याला चांगला झोडपून काढतों.’ भाऊ खेकसले.

‘ दासूकरतां हे पेढे वांटले नाहींत ! माली अपघातांतून वांचली म्हणून तिच्याकरतां हे पेढे आहेत. काय स्वभाव तरी ! ’ सुभद्राबाई म्हणाल्या.

‘ काय तूंहि त्या गुलाम कारट्याचा कैवार घेऊं लागलीस ? कारटं फुकटचं खातं अन् मुलीकडंहि लक्ष ठेवीत नाहीं.’

‘ फुकटचं नाहीं त्यानं खाल्लं. तो आपल्या अन्नाला जागला. त्यानं आपल्या मालीला वांचविलं ’ रमाबाई बोलल्या.

‘ काय म्हणतां काय तुम्ही दोघीजणी, काय म्हणे प्राण वांचविले ! अगोदर पडूंच कां दिली ? ’

‘ नाहीं, पटायचं नाहीं, उलट्या काळजाच्या माणसांना हें पटायचं नाहीं. ’ रमाबाईंच्या मनांतल्या उद्गारांना वाचा फुटली नाहीं.

या प्रसंगानंतर पाहुणे मंडळी दोनतीन दिवसांनीं निघून गेलीं. रमाबाईंना सुभद्राबाईशिवाय आतां माहेरचें कोणी राहिलें नव्हतें. रमाबाई व त्यांच्या चार मुलांनीं घर कसें भरून गेलें होतें. पण हीं सर्व मंडळी गेल्यावर घर सुनें झालें व दासूचें मनहि उदास झालें. मालीला दुसऱ्या पायरीवर उचलून घेऊन त्यानें पुढील अपघात टाळला होता तरी तिकडे विसूभाऊंनीं लक्ष दिलें नाहीं. या प्रसंगानंतर भाऊ जसे कांहीं त्याच्या मागेंच लागले व त्याच्या हालांत आणखी भरच पडली. त्याच्या गालावरील वण मावळत चालले पण भाऊंचा उग्र चेहरा व ‘ हरामखोर गुलाम कार्टा ’ हे त्यांचे शब्द मात्र त्याच्या चांगलें लक्षांत राहिले. ‘ शरदला त्रिकत घेतला ’ असा गोंगाट मुलांनीं केला, तो केवळ मजा म्हणूनच केला होता. पण दासूच्या हळव्या

झालेल्या मनांत हे शब्दहि चांगले ठसून लक्षांत राहिले. पैसा देऊन वाण्याच्या दुकानांतून विड्या आणतात त्याप्रमाणें माणसाला विकत घेत असतील. भाऊंच्याकरितां तो नेहमींच विड्या विकत आणीत असे, त्यामुळें ही कल्पना त्याच्या मनांत सहजच आली. मुलांच्या या गोंगाटाकडे त्याचें लक्ष वेधलें होतें, एरवीं माली सोप्याच्या कडेला रांगत येऊन खालीं पडलेला खुळखुळा घेण्याकरतां वांकून हात लांबवीत होती इकडे त्याचे लक्ष गेलें होतें. पण वरच्या गोंगाटाकडे लक्ष वेधल्यामुळें माली इकडे एक दोन पायऱ्यांवर घरंगळत गेली हें त्याच्या लक्षांत आलें नाहीं. तरी सुद्धां मालीच्या अगदीं पहिल्या किंचाळीबरोबर तिला त्यानें उचलून घेतलें व तिला खालीं पडवीवरील फरशीवर पडूं दिलं नाहीं, हें त्याचें प्रसंगावधान पाहून रमाबाईंनीं दासूचें उलट कौतुकच केलें व प्रेमळपणानें त्याच्या पाठीवरून हात फिरविला. भाऊंच्या शिवीनें दासूचें अंतःकरण होरपळलें तर रमाबाईच्या प्रेमळ हस्तस्पर्शानें व प्रेमळ नजरेनें त्याच्या अंतःकरणांत एक नवीनच भावना उत्पन्न झाली.

त्याच्या पाठीवर आतांपर्यंत कोणीच प्रेमानें हात फिरविला नव्हता, आणि प्रेमाची नजर कशी असते हें तर त्याला कधींच माहीत नव्हतें. रमाबाईंची कुसुम त्याच्या वयाची होती. तीन मुलींनंतर झालेला शरद हा त्यांचा मुलगा. साहजिकच तो रमाईंचा जीव कीं प्राण होता. शरदूचे नाना प्रकारचे लाड पुरवण्यांत येत होते. रमाबाईंचा स्वभाव जात्याच प्रेमळ होता. पण कुत्र्यापाशीं पडूनें व घरांतलें उरलेंसुरलें खाऊन राहणाऱ्या पोराकडे कोण लक्ष देणार ? शिवाय दासू दिवसा दुपारीं जेवणाच्या वेळेशिवाय बहुतेक घरीं नसायचाच. पहांटे पांच वाजल्यापासून रात्रीं दहा वाजेपर्यंत त्याच्यामागें एकामागून एक सारखीं कामें लावून दिलीं होतीं.

अपघाताच्या परवांच्या प्रसंगीं दासू कुत्र्याजवळ बसला होता हा एक अपवादच होता.

विसूभाऊंच्या घरीं पाहुणे मंडळी आली तर दासू कोण, कोठला याची चौकशी कोण कशाकरतां करतो ? रमाबाईंनीं अर्थात्च अशी कांहीं चौकशी केली नव्हती. विसूभाऊसारख्या सावकाराच्या घरीं असलीं कुणब्याचीं मुलं कामाला ठेवलेलीं असायचींच. घरांतल्या सर्वच माणसांनीं त्याला हवीं तीं कामें सांगावीं व त्यानें तीं मुकाट्यानें करावीं. दासू घरांतील व बाहेरील सर्वच कामें करीत होता. पण मालीच्या बाबतींत त्यानें दाखविलेल्या प्रसंगावधानानें रमाबाईंचें लक्ष दासूनें आपल्याकडे वेधून घेतलें होतें.

विसूभाऊ दासूला कुत्र्यापेक्षां जास्त किंमत द्यायला तयार नव्हते ही तर उघडच गोष्ट होती.

सुभद्राबाई तर घरच्या कारभारीण. दासूला घरांतलीं जीं ठरींव कामें नेमून दिलीं होतीं त्यांत तो चुकला तर तें त्यांना पसंत पडत नव्हतें अन् दासूच्या हातून अशा कांहीं

चुका झाल्या किंवा त्याच्या कामासंबंधानें विसूभाऊंच्या कानावर कांहीं तक्रार आली कीं विसूभाऊकडून त्याला थपडा बसायच्या. कधीं कधीं आपल्या हातांत धरायच्या वेताच्या छडीनेंहि भाऊ त्याचा समाचार घेत असत.

माहेराकरतां घरीं आलेल्या रमाबाईनींहि असले एकदोन प्रसंग पाहिले होते: पण त्या वेळीं त्या या बाबतींत मध्यें पडल्या नव्हत्या. पण मालीला दासूनें अगदीं वेळेवर उचलून सुद्धां त्याला जेव्हां थपडा मिळाल्या त्या वेळीं दासूसंबंधानें त्यांच्या मनांत सहानुभूति व दया उत्पन्न झाली. त्यांनीं साहजिकच यानंतर एकदां दासूसंबंधानें चौकशी केली. सुभद्राबाईंना तरी जास्त काय माहीत ? आईबाप नसलेलें अनाथ पोर एका शेतकऱ्यानें त्यांच्या घरीं नोकरीला ठेवलें हीच त्यांची कल्पना. विसूभाऊंनीं सर्वांची अशीच कल्पना करून दिली होती. पण पाहुणे मंडळी यानंतर चार दिवसांनीं गांवीं निघालीं त्या वेळीं रमाबाईंना जातांना दासूबद्दल काय वाटलें कोणास ठाऊक, त्यांनीं दासूला मुद्दाम बोलावून घेतलें, त्याच्या पाठीवरून हात फिरवला. " दासू गुणी बाळ आहे, मालीसारखीच त्याची काळजी घे, " असें त्यांनीं आपल्या वडिल बहिणीला सांगितलें. सुभद्राबाईंना ही गोष्ट थोडी चमत्कारिकच वाटली. त्या आपल्या बहिणीला पोंचविण्याकरतां स्टेशनावर गेल्या. गाडी आल्यावर त्यांच्याबरोबरच्या गड्यांनीं रमाबाईंचें सामान व्यवस्थित लावून दिलें. गाडी सुटण्याची वेळ झाली. इतर सर्व निरोप झाले.

' किती गरीब, सालस पोर. तुमच्या घरीं तें रात्रंदिवस राबतं. त्याच्याकडे थोडं पाहात जा बरं का ! ' असें रमाबाईंनीं गाडी सुटतां सुटतां दासूबद्दल पुन्हा एकदां आपल्या बहिणीला सांगितलें.

' येवढंसं पोर तें काय, अन् त्याची काळजी ती काय घ्यायची ! ' स्टेशनावरून परत येतांना सुभद्राबाईच्या डोक्यांत हेच विचार चालू होते.

स्टेशनावरून घरीं येईपर्यंत सुभद्राबाई बाकी सर्व विसरल्या पण रमाबाईंनीं दासूसंबंधानें सांगितलेल्या निरोपानें त्यांचा पिच्छा पुरवला.

* * * *

सोनगांव

ता.————

सौ. रमाबाई मौने

अनेक आशीर्वाद.

तुझें पत्र पोंचलें. माझें पत्र तुला पोंचेल त्या वेळीं तुम्ही सर्व मुंबईला जाण्याच्या गडबडींत असाल. विश्वासरावांची मुंबईला बदली झाली व त्यांना बढती मिळाली हें वाचून बरें वाटलें. मुंबईस गेल्यावर ताबडतोब खुशालीचें पत्र टाक व तुमचा मुंबईचा पत्ता त्यांत लिहिण्यास विसरूं नको. आतां इकडली हकीकत.

तूं इथून जाण्यापूर्वीं चार दिवस मुलं झोपाळ्याजवळ खेळत होतीं त्याच वेळीं माली पायरीवर पडली व तिच्या कपाळाला जखम झाली हें तुला माहीत आहे. जखम आतां बरी आहे, पण त्या दिवशींच रात्रीं मालीला थोडीशी कसर आली. जखमेमुळें कसर आली असें आपणां सर्वांनाच वाटलें. पण तूं इथून गेल्यावर मालीचा ताप वाढूं लागला. गेले तीन चार दिवस तर ती फारच बेजार झाली आहे. सकाळीं ताप थोडासा कमी असतो पण निखालस ताप कधींच उतरत नाहीं. गेल्या दोन दिवसांपासून ती तापांत बडबडूं लागली आहे. मधून मधून अशा किंचाळ्या फोडते कीं त्या ऐकून माझ्या काळजाचें पाणी होतें. त्या दिवशीं ती पायरीवरून खालीं पडली त्यावेळीं तिनें किंचाळी फोडली. तापांत बेशुद्ध होऊन ती किंचाळ्या फोडूं लागली म्हणजे त्या दिवशींच्या किंचाळीची मला आठवण होते.

आमच्या माणसांचा कंजूषपणा तुला माहीतच आहे. मुलगी भ्याली आहे, होईल बरी, या समजुतीनें मामुली औषधें तिला देण्यांत आलीं. अंगारे धुपाऱ्यांचेहि उपाय कोणी सांगितले ते झाले. गांवांतल्या वैद्यांनी कांहीं दिवस औषध दिलें, त्यानेंहि कांहीं झालें नाहीं. तापाचें लक्षण ठीक दिसत नाहीं, तिला डॉक्टरचें औषध देऊन पहा, असें वैद्यानेंच जेव्हां सांगितलें तेव्हां कोठें डॉक्टरला बोलावलें. येथें जवळच असलेल्या मिशनरी दवाखान्यांतील डॉक्टर चांगले प्रसिद्ध आहेत. पण डॉक्टरला बोलावलें म्हणजे पैसे खर्च करावे लागणार, म्हणून शक्य तितकें डॉक्टरला टाळायचा बेत त्यांनीं केला. मुलं तरी काय घरांत? एकुलती एक मुलगी. पण कवडीचुंबकपणा. शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं व मित्रांनीं जेव्हां नांवें ठेवायला सुरुवात केली तेव्हां नाइलाजानें डॉक्टरला आणलें. डॉक्टर रोज घरी येतात. मालीला औषध सुरू करण्यापूर्वीं तिला ताप केव्हां येऊं लागला, तिला जखम कशी झाली, ती कुठून खालीं पडली, तिला कुणी उचललें, वगैरे सारी हकीगत त्यांनीं पुन्हा पुन्हा विचारून घेतली. मालीचा ताप साधा थंडीवाऱ्याचा ताप नाहीं. सोप्याव न एकाएकीं खालीं पडल्यामुळें तिला जो धसका बसला त्याचा हा परिणाम आहे असें त्यांचें म्हणणें आहे. भिण्याचें कारण नाहीं, लवकरच उतार पडेल, असें ते म्हणत आहेंत. चपळाई करून दासड्यानें मालीला तिसऱ्या पायरीवरच उचललें, तिला खालीं पडूं दिलें नाहीं ही गोष्ट डॉक्टरांना कळली त्यावेळीं त्यांनीं दासड्याच्या चपळाईची वाहवा केली व या पोरानें तुमच्या मुलीला वांचविलें असें म्हटलें. गोरे डॉक्टर आहेत, पण मराठी कसं अगदीं चांगलं बोलतात. इकडच्या माणसांचा दासड्यावरचा राग अद्याप कमी झालेला नाहीं. "मालीला दास्यानें मुळीं पडूंच का दिली?" हा त्यांचा जप चालूच आहे.

मालीला ताप येऊं लागल्या पासून तेहि हवालदिल झाले आहेत. सारखे मालीच्या अंथरुणापाशीं बसून असतात. जागरणांमुळं त्यांचीहि तब्येत बिघडते कीं काय अशी मला भीति वाटूं लागली आहे.

तुला इकडील सगळी खरी खरी हकीकत कळविली ती तूं घाबरून जावंस म्हणून नाहीं. तसेंच अगदीं काळजी करण्यासारखें असतें तर तुला मीं ताबडतोब बोलावलें असतें. मुंबईला पोंचल्याबरोबर तुमचा तिथला पत्ता तारेनें कळीव, मग सविस्तर हकीकतीचें पत्र पाठीव. पण तुझी तार आली तरी इथून तार काय किंवा पत्र काय दोन्हीं पाठविणं सारखंच. काळजी करूं नकोस, मालीच्या प्रकृतीबद्दल मी तुला वेळोवेळीं कळवीन.

इकडचीं माणसं मालीजवळ नसलीं म्हणजे दासड्या त्यांची नजर चुकवून मालीच्या अंथरुणाजवळ येतो. माली जागी असली तर त्याला पाहून "दास्या" "दास्या" अशा बोबड्या शब्दानं त्याला हांका मारते.

गाडी चालू होत असतांना तूं सांगितलेला निरोप विसरणार नाहीं. इकडचीं माणसं त्याला हिडिस फिडिस करीत असलीं तरी मी त्याच्याशीं तसं वागणार नाहीं.

त्या दिवशीं मला कांहीं फारसं वाटलं नाहीं पण डाक्टरांनीं सांगितल्यापासून मी त्या प्रसंगाची आठवण करूं लागल्यें कीं दासड्यानं मालीला खरोखरीच जीवदान दिलं असं मला देखील आतां वाटूं लागलं आहे.

तुझ्या पत्राची किंवा तारेची वाट पहात आहे. सर्व मुलांना आशीर्वाद.

तुझी बहीण

सुभद्रा.

निखालस ताप निघून माली हिंडूं फिरूं लागण्यास एक महिना लागला. डॉक्टरांनीं व्हिजिट फीचें किंवा औषधाचें बिल पाठविलें नाहीं पण मिशनचें काम पाहणाऱ्या युरोपियन बाईनीं विसूभाऊ सावकारांकडे मिशनला १०० रु. ची देणगी मागितली. पैसे देतांना भाऊंचा जीव कासावीस झाला.

# ३

मालिनी चांगली बरी झाली. ती हिंडूं फिरूं लागली. सुभद्राबाईंना हायसें वाटलें. विसूभाऊंनाहि बरें वाटलें पण दुसऱ्याच एका गोष्टीनें त्यांच्या मनाला हुरहुर लावली होती. मालीच्या दुखण्यांत भरमसाट पैसा खर्चावा लागला याच विचारानें त्यांचें अंतःकरण सारखें तळमळत होतें. अन् ती तळमळ एकदां ओकून बाहेर पडलीच.

‘ गुलाम कारट्यानं पोरीला मुळीं पडूंच दिली नसती तर इतके पैसे कां खर्च झाले असते व इतकी दगदग तरी कां झाली असती ? ’

‘ गुलाम कारटं, गुलाम कारटं ! कां हें असं सदान्कदा बोलावं ? पाय चेपतां चेपतां सुभद्राबाईंनीं भाऊंना टोकलें. उतारवयांत तरणीताठी बायको केली, तिच्या हौशी विसूभाऊ काय पुरविणार ! अन् असल्या जरठ पतीशीं प्रसंग आल्यामुळें शारीरिक व मानसिक समाधान असल्या तरुण स्त्रियांना होणार तरी कसें ? पण त्यांच्या समाधानासंबंधानें जरठ पति काय म्हणून विचार करतील ? त्यांनीं केवळ आपल्या समाधानाकरतां असला अनैसर्गिक विवाहाचा उद्योग केलेला असतो. असल्या जरठांच्या तावडींत सांपडलेल्या स्त्रियांना मनांत नसतांहि त्यांच्या लहरी संभाळाव्या लागतात. सुभद्राबाईंनीं पाय चेपल्याशिवाय विसूभाऊंचें कधींच समाधान होत नसे. रोज रात्रीं ही सेवा झालीच पाहिजे. आणि अशा वेळीं एकाद्या विषयावर बोलणें सुरू झालें म्हणजे आपल्या पराक्रमाच्या गोष्टी सांगायची विसूभाऊंना जणूं काय स्फूर्ति चढत असे.

‘ हो ! गुलाम कारटं, गुलाम कारटं, अगदीं शेकडों वेळां म्हणेन. त्या कारट्याबद्दल तुला अलीकडे प्रेम वाटूं लागलेलं दिसतंय. ’

‘ गरीब बिचारं पोर. कुत्र्यापाशीं पडून राहतं. कुत्र्याला खायला मिळतं तसलं व तितकंहि त्याला मिळत नाहीं. माणसं तरी कशी उलट्या काळजाचीं. पोटच्या गोळ्यांना गहाण ठेवून पैसे नेऊं लागलीं. ’ सुभद्राबाई काकुळतीच्या स्वरांत म्हणाल्या.

‘ पांड्यानं पोराला गहाण नाहीं ठेवलं. त्यानं हें पोर पन्नास रुपयाला विकून टाकलं. ’

‘ काय म्हणतां ? पोटच्या पोराला विकून टाकलं ? ’

‘ पोटची पोरं ! या कुणबटांना कसली दया न् कसली माया ! पोरालाच काय ते आपल्या बाइलीलाहि विकतील. ’ विसूभाऊंनीं उत्तर दिलें.

‘ पुरे झालं असलं अचकट विचकट बोलणं. कुणबी झाले म्हणून काय झालं? तींहि माणसंच आहेत ना!’

‘कसलीं माणसं हीं! पैशाकरतां वाटेल तें देण्यास तयार होतील!’

‘मग काय, पांडोबानं आपल्या पोराला विकून टाकलं म्हणतां?’ सुभद्राबाईनीं विचारलें.

‘अग, हें पहा, कांहीं आश्चर्य करायला नको. पांड्यानं या पोराला विकलं व मी त्याला विकत घेतलं. पण एक सांगूं! पोटचा गोळा, पोटचा गोळा, असं जें तूं चालविलं आहेस, तें कांऽहीं नाहीं. पांड्याचं स्वतःचं हें पोर नाहीं, तर त्यानं आपल्या घरीं आणून वाढविलेलं हें पोर आहे.’

‘घरीं आणून?’ सुभद्राबाई आश्चर्याच्या मुद्रेनें म्हणाल्या. ‘म्हणजे पांडोबानं या पोराला कुठून तरी आणलं व आपल्या घरीं वाढविलं?’

‘कांहीं फारशी मोठी हकीकत नाहीं. पांड्यानंच ती सांगितली आहे. पण या गोष्टीची उगाच वाच्यता करायची नाहीं. पांड्याला त्याच्या गांवाबाहेरच्या महादेवाच्या देवळाच्या पायरीजवळ कपड्यांत गुंडाळून टाकलेलं असं एक पोर सांपडलं. पांड्याला मूलबाळ कांहीं नव्हतं. त्यानं ते आपल्या बायकोच्या स्वाधीन केलं. आपलंच पोर म्हणून त्या बाईनं तें वाढविलं. पुढं बायको मेली त्यावेळीं पांड्यानं पाटाची दुसरी बायको केली. ती या पोराला चांगली वागवेनाशी झाली. आतां ही बायको आजारी पडली. तेव्हां तिच्या औषधपाण्याला पैसे पाहिजेत म्हणून पांड्यानं ही घरांतली पीडा काढून टाकली. कारण हें कारटं घरांत आल्यापासून आपल्याला सुख कसं तें लागलं नाहीं अशी पांड्या तक्रार करीत होता.’ विसूभाऊंनीं थोडक्यांत सर्व हकीकत सांगितली.

‘काय ग बाई तरी, पोराचा त्यांत काय दोष! पोराला विकून आतां त्याची बायको बरी झाली ना!’

‘तेंच तर सांगतों. पांड्याला ते पैसे पचले नाहींत. त्याची बायको वारली अन् तेव्हांपासून पांड्यानं जें गांव सोडलं, तो त्याचा पत्ता नाहीं. बरं झालं आपली त्याच्याकडं बाकी नाहीं. या कारट्याकरतां पैसे दिले आहेत. केव्हांच वसूल करतां येतील.’

‘म्हणजे पोरापासून पैसे वसूल करणार! ते कसे काय?’

‘वाहवा, एवढंहि समजूं नये? वर्षानुवर्षं त्याला आपल्या घरीं राबवून घेऊन पैसे वसूल करणार. आतां त्याचं आहे कोण? उरल्या सुरल्या तुकड्यावारी पोरं राबवायला मिळालीं तर काय वाईट? शिवाय कारटं थोडंच असं लहान राहणार आहे? जसं जसं मोठं होत जाईल तसं तसं त्याच्याकडून जास्त काम करून घेतां येईल. अन्

हें सर्व भाकरीच्या तुकड्यावारी. पांड्या जाईना का कुठं मसणांत ! या कारट्याला मी राबविणार अन् पैसे वसूल करून घेणार. '

' काय बोलतां काय हें ? किती उलट्या काळजाचे आहां तुम्ही ! '

' हें पहा, हा व्यवहार आहे. बस्स, पुरे झाल्या गप्पा. नऊ वाजून गेले असतील. घरांतले सगळे दिवे मालवून टाक. त्या कार्ट्यानं कुत्र्याला नीट पांघरूण घातलंय कीं नाहीं पहा. नाहीं तर कुत्र्याचं पांघरुण आपल्याच अंगावर घेऊन तें निजेल. याबद्दल त्याला एकदां चांगली पाद्यपूजा मिळाली आहे. '

वाड्यांतले सारे दिवे मालवले गेले. सर्वत्र सामसूम झालें. विसूभाऊंचें वय घसरणीला लागलें होतें. त्यांच्या अंगावर मेद वाढत चालला होता. अपचन खोकला हे तर त्यांचे नेहमींचेच सोबती होते. त्यांच्या शक्ति कमी होत चालल्या होत्या. पण भोगेच्छा मात्र प्रबल होती. इच्छा असो वा नसो, मनाला कितीहि तिटकारा वाटो, सुभद्राबाईंना आपला देह भाऊंच्या वासनेला बळी द्यावा लागत होता. दमून भागून खोकून खोकून विसूभाऊ झोंपी गेले, पण सुभद्राबाईंना आज झोंप येईना. दासूला विकत घेतल्याची हाकीकत व त्याच्या संबंधाचे भाऊंचे विचार त्यांच्या मनांत घोळत होते.

आपल्याला सुद्धां असंच विकत घेतलं ! आपल्या बाबतींत तरी आज काय चाललं आहे ? आपल्या दुर्बल व गुलामी जीवनांतील अनेक प्रसंग त्यांना आठवूं लागले.

लग्नापूर्वीची गोष्ट. बाबांच्यावर होणाऱ्या फिर्यादीची नोटीस व मला घातलेली मागणी दोन्हीहि एकदमच आमच्या घरीं पोंचलीं. आमच्या घरांत खळबळ उडाली. नोटीस ज्या वकीलाच्या तर्फे आली होती त्यांच्या वडिलांनींच विसूभाऊ सोटनक्के यांच्या करतां मला मागणी घातली. फिर्याद विसूभाऊ जिंकणार यांत शंकाच नव्हती. फिर्यादीचा निकाल लागला की दहा हजारांची डिक्री विसूभाऊ बाबांवर बजावणार व त्यांची राहिलीसाहिली मालमत्ता जप्त होऊन लिलावांत निघणार हें निश्चित होतें. बाबांच्या तोंडचें पाणी पळालें. दुसरी कसलीहि तडजोड काढूं पण असली मागणी करूं नका असें बाबांनीं विसूभाऊंच्या मध्यस्थांना सांगितलें. मध्यस्थ लेचेपेचे नव्हते. त्यांनीं बाबांनाच उलट चार गोष्टी सुनावण्यास सुरुवात केली. विसूभाऊंचं वय कांहीं फारसं झालेलं नाहीं. डिक्री बजावून घेऊन आपलं घरं धुवून घेण्यापेक्षां आपलंहि घर राखा व विसूभाऊंचें घर उजळा, असा त्यांनी सल्ला दिला. आमचं घराणं अगदीं बाळबोध, जुनं घराणं. केवळ आईचाच आग्रह म्हणून माझं थोडं शिक्षण झालं. मराठी पांचवीनंतर मी शाळा सोडली. मध्यस्थाचं म्हणणं कीं मी चांगली न्हाती धुती मुलगी, विसूभाऊंच्या घराची शोभा वाढवीन—' अहो मुलींना काय विचारतां ? त्यांचं हित त्यांच्या आई-बापांच्या पेक्षां जास्त कोणाला समजणार ? शिवाय एकदां लग्न झालं व एक दोन मुलं झालीं कीं मग सगळं जमतं. संसार, संसार, म्हणजे तरी काय ? संतती अन् संपत्ति !

विसूभाऊंच्या घरी संपत्तीला कमी नाहीं. त्यांना संततीची जोड करून देण्याचं पुण्य तुम्ही आपल्या पदरीं बांधून घ्या. अहो कन्याविक्रय कसला! आपण संसारी माणसांनीं एकमेकांची सोय पाहिलीच पाहिजे.' बाबांना ही विचारसरणी मान्य नव्हती, तरी नकार देण्याचें धैर्य त्यांना झालं नाहीं. नोटिशीची मुदत सात दिवसांची होती. विचार करण्याला सात दिवस होते. फिर्याद करून घ्यायला तयार व्हावं किंवा कन्याविक्रयाला तयार व्हावं असा पेंच बाबांच्या पुढं पडला. बाबांनीं नोटीस स्वीकारली होती. मध्यस्थांची मागणी बाबांनीं मान्य केली तर ही नोटीस रद्द होणार होती.

आम्ही एकंदर सहा भावंडें. आईला माझ्या पूर्वीं सहा मुलें झालीं पण तीं सर्व लहानपणींच वारलीं. मी मोठी झाल्यें व माझ्या नंतर झालेलीं सर्व मुलेंहि जगलीं. मोठी शकुनाची बाळ म्हणून आई माझं नेहमीं कौतुक करी. पण तिच्या या शकुनाच्या बाळीवरच असा प्रसंग आलेला पाहून तिच्या काळजानं ठाव सोडला. आई व बाबा दोघेंहि या मागणीचा विचार करण्यांत चूर होतीं. इतक्या मुलांनंतर जगलेल्या आपल्या मुलीला एका वयस्क बिजवराच्या गळ्यांत बांधावी नाहींतर फिर्यादीला तोंड देऊन घरादाराचं वाटोळं करून घ्यावं. माझ्या बाबतींत घरांत चाललेल्या वाटाघाटींची कल्पना मला आलेली होती, मध्यस्थांचं व्यावहारिक शहाणपण मला ऐकायला मिळालं होतं, माझ्या आईबापांवर आलेल्या पेंचाची जाणीवहि मला झालेली होती. पण असल्या बाबतींत मला कसलं मत असणार? फिर्याद सावकार जिंकणार, जप्ती येणार व आपल्या घरादाराचें वाटोळें होणार म्हणजे काय होणार याची कल्पना मला त्यावेळीं आली नाहीं. पण मला एका बिजवर सावकारानं मागणी घातली आहे व त्यासंबंधानेंच आई व बाबा विचार करीत आहेत व कांहीं तरी ठरवीत आहेत इकडं माझं लक्ष लागलं होतं. हे विसूभाऊ म्हातारे असतील तर किती म्हातारे असतील, या फिर्यादीचा व मला विकून टाकण्याचा तरी संबंध काय, याचंहि मला त्यावेळीं कोडंच वाटलं.

'घरदार शेतीवाडी गेली तर गेली. भाड्याच्या घरांत भाजीभाकरी खाऊं, पण पोरीला असल्या जख्खड माणसाच्या गळ्यांत बांधणार नाहीं.' आई म्हणे.

बाबांना तें पटत नव्हतें. घराण्याची अब्रू, मुलांचं शिक्षण, मुलींचीं लग्नं! भाजीभाकरी खरी, पण ती तरी हमखास सुखानं मिळण्याची तरी आशा कशी करायची? यापेक्षां सगळ्या कुटुंबाचं बरं करण्याकरतां एका माणसाचा बळी द्यावा असंच बाबांचं मत पडलं. आईनंहि मोठ्या संकटानं या गोष्टीला रुकार दिला.

तीन मंगलाष्टकं झालीं. माझ्या डोक्यावर अक्षतांचा वर्षाव होत होता. अंतरपाट बाजूला झाला. वाद्यें वाजूं लागलीं.

कोणाला हार घालायचा?

' चल चटकन् हार घाल. मुहूर्त चुकेल.' भटजींनीं ओरडून सांगितलं. आमच्या घरचे, माझे नेहमीं लाड करणारे भटजी, मी त्यांच्याकडं पाहिलं. त्यांची दृष्टि निष्ठुर दिसली. बकरीच्या मानेवर सुरी ठेवणाऱ्या खाटकाची दृष्टि.

' अग, असं इकडे तिकडे पाहतेस काय, समोर पहा अन् हार घाल. भटजी ओरडले. ते त्यांचे शब्द अद्यापहि माझ्या कानांत घुमत आहेत.

बाबा नाहीं कुठं जवळ दिसले.

पण ते तरी काय दुसरं सांगणार होते ?

विचार करायला मला तरी कुठं वेळ होता ?

मी हार वर केला.

पुढं काय झालं मला माहीत नाहीं.

यानंतर आईनं ओक्साबोक्शीं रडत मला पुढल्या विधीकरतां त्याच प्राण्या जवळ पाटावर आणून बसविलं. यंत्राप्रमाणं माझे व्यवहार चालू होते.

दहा हजाराचा कागद माझे पति झालेल्या या विसूभाऊ सावकारांनीं चार मंडळींदेखत फाडला. मंडळींनीं यांची स्तुति केली.

' वचनाचा खरा !' लग्न जुळविणारांपैकीं एकजण म्हणाले. पण हा कागदांतल पैसा मुळींच खरा नव्हता. खरं देणं दहा हजार मुळींच नव्हतं. एका हजाराचे हे दह हजार झाले होते. यांच्या वडिलांनीं माझ्या बाबांना हे पैसे दिले होते. कर्ज काढीत राहणं ही इनामदारांची परंपरा. बाबांचे कांहीं सावकार खनपटीला बसून व्याज वसूल करीत. या विसूभाऊ सावकाराच्या वडिलांनीं व खुद्द यांनींहि ही खटपट केलं नाहीं. एका हजाराचे दहा हजार झाले, असं मला कळलं तेव्हां आश्चर्य वाटलें मला बापानं दिलेलं कर्ज त्याच्या या मुलाला अशा रीतीनं उपयोगी पडलं. प्रत्यक्ष दहा हजा माझे पति झालेल्या या विसूभाऊंनीं मोजले नव्हते. कागदांतला एक शून्यानं फुगलेल आंकडा कागद फाटल्या बरोबर नाहींसा झाला आणि या शून्यानं माझं आयुष्यहि सुनं करून टाकलं. मला जन्माची गुलाम बनविलं. बरं बाबांना काय मिळालं ? जप्तीची भीति नाहींशी झाली. एवढंच त्यांना पाहिजे होतं. पण याच्या बदला या विसूभाऊंन काय मिळालं ? बाबांना कर्ज दिलेले अनेक सावकार होते. जप्ती होऊन मालमत्ता लिला वांत निघाली असती तर त्यावर कितीतरी सावकारांनीं हक्क सांगितला असता. या हक्क दारांच्या यादींत यांचंहि नांव पडलं असतं. असल्या यादींत आपलं नांव सामील करू घेण्याऐवजीं यांनीं केवढा फायदा मिळविला ? ज्या आंकड्यांतला एक पैसाहि यांनं दिला नाहीं असले आंकडे असलेला कागद फाडून घरांत राबायला व भोगायला एक तरुण सुंदर मुलगी यांना मिळाली.

माझं सासर माहेर सुरू झालं. मला सासरीं धाडायची म्हणजे कसायाच्या घरीं गाय पोंचवायची असं आईला वाटे. कसांई कितीतरी बरा. त्याच्या तडाक्यांत सांपड-लेल्या गाईचा तो एकदम निकाल लावतो. पण हा कसाई गाईचे प्राण तिळतिळ तोडीत राहतो.

माझ्या लग्नानंतर आईनं हाय घेतली. ज्या पोराबाळांच्या रक्षणाकरतां व शिक्षणा-करतां आईनं माझ्या लग्नाबद्दल रुकार भरला ती माझी आई पोराबाळांचं रक्षण करण्या-करतां राहिली नाहीं. माझ्या लग्नानंतर दोन वर्षांनींच ती वारली.

आईच्या मरणानं बाबांच्या मेंदूवर परिणाम झाला. त्याना फिट्स येऊं लागल्या. ते आईच्या मरणानंतर सहा महिन्यांनीं मुलांना पोरकीं करून सोडून गेले. सगळी इस्टेट सरकारनं ताब्यांत घेतली. सरकारकडून दरमहा कांहीं मोजके रुपये माझ्या भावां-बहिणींना मिळूं लागले. सगळीं मुलं मामाच्या घरीं राहूं लागलीं. माझं माहेर संपलं. मामाच्या घरीं कधींच मी गेल्यें नाहीं.

माणसाला दोन मनं असतात, नाही का ? विसूभाऊंनीं दासूची हकीकत सांगितल्या-पासून सुभद्राबाईंना आपल्या खडतर जीवनांतील आठवणी होऊं लागल्या व त्याचं एक मन दुसऱ्या मनाला आपली करुण कहाणी सांगूं लागलं. असल्या आठवणींना एकदां सुरुवात झाली म्हणजे ब्रह्मांड आठवतं. सुभद्राबाईंपासून झोप जशी कांहीं आज पळून गेली होती. त्यांचं विचारचक्र चाललंच राहिलं. विसूभाऊ जवळच झोपी गेले होते. आपण एका पोराला विकत घेऊन त्याला गुलाम बनविल्याची फुशारकी सांगून ते झोंपी गेले होते. अन् ही फुशारकीच सुभद्राबाईंच्या विचारचक्राला जोरानं कलाटणी मिळण्यास कारणीभूत झाली होती. मध्यरात्र उलटून गेली होती. वद्य अष्टमीचा चंद्र वर येऊन त्याच्या अंधुक प्रकाशानं खोलीच्या खिडकींतून आंत प्रवेश केला होता. झोपी गेलेल्या विसूभाऊंचा चेहरा त्यांना दिसूं लागला होता. अद्यापि विसूभाऊंच्या पायापाशींच त्या बसल्या होत्या. पुन्हा त्या आपल्या मनाशीं बोलूं लागल्या.

काय माझं जीवन ! या घरांत तरी मला कोणतं सुख मिळालं ? एका मोठ्या साव-काराची बायको म्हणून बाहेर समाजांत तरी माझी त्या वेळीं काय प्रतिष्ठा होती ? नष्ट दुष्ट कवडीचुंबक सावकाराबद्दल वाटणाऱ्या द्वेषाची मीहि वांटेकरीण झाल्यें. माझ्या लग्ना-बाबत ज्या वाटाघाटी झाल्या त्यांची बातमी थोडीच झांकून राहते ! माझ्या आईबापांनीं मला या सावकाराकडे विकून टाकली याबद्दल त्यांनाहि लोक नांवें ठेवीत, तीं मला मुका-ट्यानं ऐकून घ्यावीं लागत. दागिन्यांना कांहीं कमतरता नव्हती. पण ते मला सलत असत. सणावारीं, सटी सामासीं मी दागिने घालीं. तसं करणें भागच पडे. तेव्हां लोक माझ्या-कडे अशा कांहीं विलक्षण दृष्टीनं पाहात कीं माझी मलाच लाज वाटे. लोक कां बरें माझ्याकडं असं पाहतात याचा मी विचार करूं लागें. माझ्या दागिन्यांकडे त्यांनीं तिटका-

त्यानें कां पाहावें ? दुसऱ्याचं बरं असलेलं कोणाला पाहवत नाहीं असाच हा प्रकार असेल असं मला वाटे. ' विकत तर घेतली, अन् दागिने घालून मिरवते. ' असंच मला लोक म्हणत असतील असं वाटे. या शिवाय भाऊंनीं हें सर्व धन कसें मिळविलें, यासंबंधानंहि चर्चा चालत त्या ऐकून तर माझ्या अंगावर शहारे येत. 'भाऊंच्या घरांत ज्यानं पाऊल टाकलं त्याच्या संसाराचं भाऊंनीं वाटोळं केलं. ' असलीं शिव्याशापाचीं बोलणीं माझ्या कानीं येत. हीं बोलणीं खरींच होतीं. जीं गरीबगुरीबं दीनवाणेपणानं अगदीं गरज पडली म्हणूनच भाऊंच्याकडे येत, त्यांना हातोहात फसविलेलं मी पाहात होत्यें. हा धंदा कसला ? कसायाचा धंदा आहे. यांत माणुसकी नाहीं. यांच्याजवळ पैसा आहे म्हणून गरीबगुरीबं यांच्याकडे तो मागायला येतात. पण यांच्या सारख्या सावकाराजवळ लोकांना देण्याइतका पैसा कसा जमा झाला ?

सुभद्राबाई फारच खोल विचारांत शिरल्या. अंथरुणावरची उशी कांखेखालीं घेऊन त्या आतां उजव्या कुशीवर लवंडल्या होत्या व उजव्या हातावर हनुवटी ठेवून या प्रश्नाचा विचार करीत होत्या. इतके पैसे एकाच माणसापाशीं जमा होतात कसे ? आंग मेहनतीनें, प्रामाणिकपणानें उद्योग करून असा इतका पैसा माणूस जमा करूं शकेल का ? त्यांच्या या प्रश्नाला त्यांच्या मनानें ' नाहीं ' असें उत्तर दिलें. गरजेनं होरपळलेल्या अडाणी माणसाला एकपट पैसे द्यावयाचे व कागदावर दुप्पट, तिप्पट, चौपट सुद्धां पैसे मांडायचे, त्याच्यावर त्याचा अंगठा उठवून घ्यायचा, या पैशाला भरमसाट व्याज लावायचं, व्याजावर व्याज चढवीत जायचं, अन् कागदाच्या जोरावर गरीबाजवळ असेल नसेल तें लुटून आणायचं, असा व्यवहार तर त्या रोजच पाहात असत. तेव्हां त्यांच्या मनानें केलेल्या प्रश्नाला आणखी निराळें उत्तर द्यायचं कारणच नव्हतं. मनाचा स्वभाव चमत्कारिक. तें एकदां एकाद्या प्रश्नाबाबत खोलांत शिरूं लागलें म्हणजे आणखी आणखी अधिक खोलांत जाऊन त्याचा तलास तें करूं लागतें. अन् त्यांतच त्याला समाधान वाटतं. सावकारीच्या वाढीला जर असं पापाचं खत घालावं लागतं तर त्याच्या मुळांत व बीजांतहि असंच सूक्ष्म रूपानं पाप सांठून राहिलं असलं पाहिजे अशी कल्पना त्यांच्या मनांत आली. झाडाच्या बीजांत व मुळांत जे गुणधर्म असतील त्यांना पोषक अशींच द्रव्यें त्यांना मिळालीं तर तें अधिकाधिक फोफावत जातें. सावकारीच्या वाढीला पापाचें खत घालावें लागतें तर त्याच्या बीजांत व मुळांतहि तसलेंच पाप वावरत असलें पाहिजे. ही कल्पना त्यांच्या मनांत आल्याबरोबर आपल्या घरातच या पापाची आठवण मूर्तिमंत वावरत असलेली त्यांच्या लक्षांत आली. ही मूर्तिमंत आठवण म्हणजे सुभद्राबाईची आतेवन्सं. ही त्यांची वन्सं आतां संधिवाताच्या दुखण्यानें अंथरूण धरून राहिली होती अन् या दुखण्याच्या वेदना असह्य झाल्या म्हणजे ही आपल्या मामाला म्हणजे विसूभाऊंच्या वडिलांना शिव्यांची लाखोली मोजीत असे. तिचें नेहमीचें म्हणणें असें कीं तिच्या

मामानें तिच्या संसाराचें वाटोळें केलें. आपल्या भोळ्या नवऱ्याला हातोहात फसवून त्याची सर्व इस्टेट व आपले दागदागिने घशाखालीं घातले. या नंतर नवरा लवकरच वारला व ही भाची विधवा झाली. मामंजींना इस्टेट मिळाली व त्याबरोबर घरांत जन्मभर राबून घ्यायला एक विधवाहि मिळाली. आपली तरी स्थिती काय आहे ? अथपासून इतिपर्यंत पापानें भरलेल्या या सावकारीची मी वांटेकरीण बनल्यें आहें ! कागदावरच वाढलेल्या दहा हजाराच्या फिर्यादीचा धाक घालून व बाबां-कडून मला विकत घेऊन यांनीं मला या पापाची वाटेकरीण बनविली आहे.

सुभद्राबाईच्या डोक्यांत हे विचार यायला नि विसूभाऊंना खोकल्याचा ठसका यायला एकच गांठ पडली. रात्रींतून तीन चारवेळां त्यांना असे खोकल्याचे ठसके येत. कधीं कधीं या ठसक्यांनीं विसूभाऊंचे प्राणहि कासावीस होत. दम्यानें व खोकल्यानें पछाडलेल्या नवऱ्याचे प्राण कासावीस झाले म्हणजे सुभद्राबाईचे प्राण कासावीस होत. वैधव्याच्या कल्पनेचें उग्र भूत त्यांच्या दृष्टीपुढें नाचूं लागे. ठसका आल्याबरोबर भाऊ अंथरुणावर उठून बसले, सुभद्राबाईनीं कंदील पेटविला. त्याची वात वर सारली. ठसका चालूच होता. पण ही उबळ थोड्याच वेळांत थांबली.

' अद्याप तूं जागीच वाटतं ! कां, झोंप न यायला काय झालं ? ' विसूभाऊंच्या या प्रश्नाला सुभद्राबाईनीं कांहींच उत्तर दिलं नाहीं.

विसूभाऊ अंथरुणावर लवंडले. या गडबडीमुळें सुभद्राबाईच्या विचाराच्या तंद्रींत अडथळा आला. ठसक्यानें दमून गेलेले विसूभाऊ डोळे मिटून पडले. सुभद्राबाईनीं त्यांना पांघरुण घातलें. त्यांच्या सांगण्यावरून त्यांनीं त्यांची पाठ चेपली. भाऊ पुन्हा निद्रावश झाले व सुभद्राबाई विचार करायला मोकळ्या झाल्या.

या खेपेस त्या पाठीवर लवंडल्या. मानेखालीं पांढऱ्या शुभ्र अभ्र्याची उशी त्यांनीं घेतली. आपले भरदार काळेभोर केस मोकळे करून त्यांनीं ते उशीवर पसरून दिले. चंद्र आतां बराच वर आला होता. समोर खोलीच्या छताखालीं असलेल्या खिडकींतून तो आंत डोकावूं लागला होता. चंद्राकडे त्यांची नजर गेली. अष्टमीच्या अर्ध्या चंद्राचा तो चांदीचा गोल तुकडा होता. खोलींत चंद्रकिरणांनीं चांगलाच प्रवेश केल्यामुळें त्याचा चेहरा आतां स्पष्ट दिसत होता. आत्मनिरीक्षणामुळें त्यांचें हृदय उदास झालें होतें, व या औदासीन्यामुळें रोडावलेल्या चंद्रबिंबाप्रमाणें त्यांचा गोरापान लांबट चेहरा सुकल्यासारखा दिसत होता.

'किती मी परस्वाधीन ! रोजचं हें असं चाललं आहे. स्वस्थपणानं झोंप घेईन म्हटलं तरी तें शक्य नाहीं.' सुभद्राबाईचें मन बोलूं लागलें. 'यांच्या घरांत येऊन मला कोणतं सुख लागलं आहे ? हातांत सांपडलेल्याला राबवून, राबवून तरी किती घ्यायचं ! आईबाप जिवंत होते, सासर माहेर चालूं होतं तोंपर्यंत आपला मोठेपणा दाखविण्याकरितां

घरांत स्वैपाक करण्याकरतां एक बाई ठेवण्यांत आली होती. बाबा वारले. माहेरच्या घराची वाताहात झाली. माझीं सगळीं भावंडं मामाच्या घरीं गेलीं. माझं माहेर बंद झालं. आतां कुणाला मोठेपणा दाखवायचा ! घरांत मदतीला असलेली स्वैपाकाची बाई यांना जड वाटूं लागली. जेवणाशिवाय या बाईला कांहीं पैसे ठरविले होते. पण पगार दिला म्हणून काय झालं ? माणसाकडून काम तरी किती घ्यायचं ! घरचा दोन्ही वेळचा स्वैपाक. तोहि कांहीं कमी नाहीं. पाहुणे नेहमीं असे असायचेच. शिवाय मळ्यांत काम करणाऱ्या गड्यांच्या दोन्ही वेळच्या भाकरीहि या बाईनेंच भाजून द्याव्या. बिचारीला दोन प्रहरीं थोडा वेळ सुद्धां लवंडायला मिळत नसे. बाईला उपास होता म्हणून एक दिवस मी तिच्या मदतीला गेल्यें. तिला जेवायला सांगितलें. गड्याच्या भाकरी भाजण्याचें काम मी करून दिलें. स्वारीला तें पाहवलं नाहीं. स्वैपाकघराच्या कामांत मुळीं सुद्धां लक्ष घालण्याचं कारण नव्हतं. पण स्वभावच चमत्कारिक. घरांत कामाकरतां ठेवलेल्या माणसाला राबवून त्याचा पिट्टा पाडायचा एवढंच ठाऊक. बाईचं थोडंसं काम मी केलेलं पाहून माझी राबायची हौस पुरी करण्याकरतां म्हणून त्या बाईला रजा देण्यांत आली. वन्सं काय, मामाकडे व नंतर त्याच्या मुलाकडे राबून राबून त्यांचीं हाडं पिचलीं होतीं तरी मी थोडी स्वस्थ बसल्यें हें त्यांना पाहवलं नाहीं. ' काय झालं काम न करायला ? चांगली तरणी धड-धाकट आहे. माणसाला अंग भरून काम पाहिजे. असं बोलून कंजूषपणाच्या वृत्तीला त्यांनीं उत्तेजनच दिलें.

स्वैपाकाचा सगळा लकडा माझ्यामागें लागला. गड्यांच्या भाकरी भाजून देण्याचें काम मला सांगितलं असतं तर तें मी नाकारलंच असतं. पाहुण्यांची गर्दी तर नेहमींचीच होती. स्वैपाकाची बाई काढून टाकून त्या ठिकाणीं मलाच राबविण्यांत येईल अशी मला कल्पना नव्हती. माझी तरी घरांत काय किंमत होती. पडेल तें काम करणारी मी एक बटीकच बनल्यें. एक दोन तीन वर्षे गेलीं. मला मूल झालं नाहीं. इस्टेटीला वारस पाहिजे होताच. दोन बायका पोर न होतां मेल्या. मी तिसरी बायको. मलाहि मूल होईना. सगळ्यांच्या दृष्टीनें मी वाझोटी ठरल्यें. वन्संच्या घालून पाडून बोलण्याला सीमा राहिली नाहीं. संधिवातानं पछाडलेल्या या वन्सं हातांत दोन काठ्या घेऊन त्यांच्या आधारावर सर्व घरभर वावरत. मामंजींना त्या खांडगाळ्या शिव्या मोजीत. त्यांच्यापुढं कोणाची बोलण्याची छातीच नव्हती. 'माझ्या मामानं मला बुडवलं. माझ्या संसाराचं वाटोळं केलं.' हे त्यांचं नेहमींचंच पालुपद. पण ही शापमूर्ति घरांत ठेवून घेणं मामंजींना भाग पडलं व त्यांच्या चिरंजिवांच्या घरांत तर त्या हक्कानं राहिल्या आहेत. त्यांचीं सगळीं कामं मीच करी. मला मूल होत नसल्यामुळें माझ्या बटिकपणांत आणखी भरच पडली. लग्न झाल्यापासून आमचं दोघांचं कधींच जमलं नाहीं. मला प्रेमाची अपेक्षा नव्हती. आईबापांनीं यांच्या पदरीं मला राबायकरतांच देऊन

टाकली आहे तेव्हां बिनतक्रार राबत राहावं व जे काय प्रसंग आपल्यावर येतील ते सोशीत राहावं याच विचारानं मी वागल्यें. मूल होण्याची कल्पना मनांत आली कीं अंगावर शहारे येत.

'म्हातारा नवरा असला तर काय झालं! आतां एक आवडणार नाहीं, पण मुलं होऊं लागलीं म्हणजे दोघांचं आपणच जमतं.' माझ्या लग्नाच्या वाटाघाटीच्या वेळीं निघालेले उद्गार माझ्या कानांत सारखे घुमत होते. 'नको, माझं कोणाशीं जमायला नको,' असंच मला वाटे. 'मुलं झालीं म्हणजे आपोआप जमतं,' याचा अर्थ काय, तर मुलं होऊं लागल्यावर नवरा बायको परस्परांवर प्रेम करूं लागतात! ही गोष्ट अगदींच खोटी. मुळांत जिथं प्रेम नाहीं तिथं कधींच जमायचं नाहीं. मुळांतच जिथं नवऱ्यासंबंधानं तिटकारा वाटतो, अन् बायको म्हणजे उपभोगासाठीं व संततीच्या निर्मितीसाठीं विकत घेतलेली वस्तु अशी जिथं भावना आहे, तिथं प्रेमाला जागा कशी असणार? शेजारच्या सावित्रीबाईचं नवऱ्याशीं कुठं जमत आहे? दोघेंहि एकमेकांवर जळफळतात. नवऱ्याला बायको शिव्या देत असते व बेताल व तापट नवरा बायकोच्या अंगावर हातहि टाकतो, तिला चांगली बदडतो. अन् असं असूनहि घरांत मुलांना तोटा नाहीं. काय करणार बिचारी! जसजशीं मुलं जास्त तसतशी गुलामगिरीची एक एक पकड जास्त. पठाणाच्या तडाक्यांत एकाकी सांपडलेली पोर प्रतिकार कसा करूं शकणार? इथं तर प्रत्यक्षच नवरा. त्याच्याबद्दल कितीहि द्वेष व तिटकारा वाटत असला तरी काय करणार? सावित्रीबाई! बिचारीच्या नवऱ्याचं नांव सत्यवान नाहीं. अन् तसं असतं तरी असला नवरा जन्मोंजन्मीं असावा अशी वटपौर्णिमेच्या दिवशीं वडाची पूजा करतांना ती कधींच प्रार्थना करणार नाहीं. यमानं स्वप्नांत येऊन असल्या सावित्रींना वर मागायला सांगितला तर त्या कोणता वर मागतील? जन्मोंजन्मीं असल्या नवऱ्याची पीडा नकोच पण आपली व पोरांची खाण्या-पिण्याची सोय होत असेल तर या जन्मीं सुद्धां ही पीडा नको असंच त्या म्हणतील.

मला मूल होत नाहीं म्हणून कोण जाच चालला होता. रात्रंदिवस सारखी मी बोलणीं खात होत्यें व केवळ जनावरासारखी राबत होत्यें. गाईची उपमा स्त्रियांना देतात ती अगदीं बरोबर आहे. मालकानं ज्याच्या पुढं नेऊन बांधली त्याचं जुलमाचं ओझं सहन केलंच.

मूल होण्याबद्दल मला अनेक औषधें देण्यांत आलीं. त्या बहुतेकांना मी मोरी दाखविली. नवस सायास करण्यास मला सांगण्यात आलें. मी कांहींच मनावर घेतलं नाहीं. 'सुभद्राबाईंना हरिवंश ऐकूं द्या. हरीच्या वंशासारखा वंश वाढेल. मुरलीधराच्या देवळांत चालू आहे.' अशी घरच्या भटजींनीं शिफारस केली. हरीचा वंश वाढला खरा! सोळा हजार एकशें आठ बायका अन् प्रत्येकीं दहा दहा मुलगे!

हरिवंश ऐकण्याची फलश्रुति कांहीं का असेना, पण हें पुराण ऐकण्याच्या निमित्तानं तरी मला बाहेर जाण्यास मिळूं लागलं. तिनकाच मनाला विरंगुळा वाटूं लागला. पुराणिक पुराण चांगलं सांगत. चातुर्मास संपला. पुराण समाप्तीच्या दिवशीं नेमकी मला बाहेर जाण्याची मनाई करण्यांत आली. पण वन्सं जेव्हां अंथरुणावरून गरजल्या व त्यांनीं झडती घेतली त्यावेळीं पुढं ठेवण्याकरतां मला एक पावली देण्याबद्दल कारकुनाला सांगण्यांत आलं. माझ्या मनांत पुष्कळ होतं पण करणार काय ? देवळांत जमलेल्या बायांनीं माझी पावली पाहून मला बोलून बोलून खाल्लं ! मला तोंड वर काढू दिलं नाहीं इतकी तर मी या घरांत स्वतंत्र होत्यें.

पुराणांतला हरि व त्याचा तो वंश पुराणांतच राहिला.

वन्संच्या हातापायांना तेल चोळणं व त्यांची सेवा शुश्रूषा करण्याचं काम माझ्या-कडंच होतं. पण ही सेवा घेतांना त्यांचं तोंड सारखं चालू असांयचं. त्यांचीं अचकट विचकट बोलणीं मला सहन होईनाशीं झालीं.

‘ या वांझोटीला घरांत राहूं दे अशीच राबायला. आणखी एकादी मुलगी का पाहात नाहीं ?’ असा सल्ला त्यांनीं आपल्या मामेभावाला द्यायला सुरवात केली. त्यांचं हें कृत्य पाहून माझ्या अंगाचा तिळपापड झाला.

सुभद्राबाईच्या डोक्यांत हा विचार यायला व कोंबडा आरवायला एकच गांठ पडली. मालिनी जागी झाली व सुभद्राबाईहि आपल्या विचारांच्या तंद्रींतून जाग्या झाल्या.

दासूला विकत घेतल्याचें भाऊंनीं मोठ्या फुशारकीनं सांगितलें. व त्याच वेळीं त्याला चांगला राबवून घेऊन हे पैसे फेडून घेणार असेंहि ते रात्रीं निजतांना म्हणाले. या गोष्टीनं सुभद्राबाईना आपल्या गुलामगिरीच्या जीवनाची आठवण करून दिली. ही जाणीव इतकी तीव्र होती की तिनें त्याना त्या रात्रींच जागविलें असें नाहीं तर त्या कायमच्या जाग्या झाल्या.

“ गुलामगिरीची जाणीव झाली कीं तिच्यांतून मुक्त होण्याचा अर्धा अधिक मार्ग मोकळा होतो. ”

## ४

पहांटेची वेळ. कसली कडक थंडी पडली होती. सोनगांवच्या भागांत गेले तीन दिवस थंडीची जोराची लाट आली होती. पण असल्या थंडींत डोक्यावर शेणाची पाटी व हातांत फुलांची परडी घेऊन दासू मळ्यांतून भाऊंच्या घराकडे चालला होता.

कुत्रा व दासू रात्रीं एकाच पांघरुणांत निजलीं होतीं. थंडी असो, पाऊस असो, रात्रीं जाग्रणहि झालेलें असो, विसूभाऊ पहांटे साडेचार वाजण्याच्या सुमारास उठत असत. रात्रीं निजण्यापूर्वी हातांत हरीकेन घेऊन कोण कोठें निजला आहे, कोणती जनावरें कोठें बांधलीं आहेत, त्यांच्यापुढें चारा वैरण टाकली आहे कीं नाहीं हें बारकाईनें ते पाहात व मग झोपीं जात व पहांटे उठल्यावर पुन्हा सर्वत्र पाहून ते नित्यकर्माला लागत. विसूभाऊंची रात्रीची फेरी झाल्यानंतर कुत्रा व दासू यांची नेहमींच गट्टी जमे. त्याप्रमाणें कुत्र्याचें पांघरुण घेऊन दासू निजलेला आहे असें पाहून विसूभाऊंनीं दासूच्या अंगावरलें पांघरुण ओढून काढलें, दासूला उठविलें, त्याला दोनचार शिव्या हांसडल्या अन् वरतीं दोन चपराकाहि लगावल्या. विसूभाऊंची स्वारी नंतर देवघराकडे वळली. फुलांची परडी नेहमींप्रमाणें तिच्या जागेवर नव्हती. ती मळ्यांतून आणण्याचें ते विसरले होते. अर्थात् हें काम दासूला त्यांनीं सांगितलें व त्याबरोबरच गाईचें शेणहि आणण्यास सांगितलें.

मळ्यांतून येतांना दासूला वरील प्रसंगाची सारखी आठवण होत होती. दासूच्या आंगावर एक पातळसें फाटकें कुडतें व लंगोटी या शिवाय दुसरें कांहीं नव्हतें. थंडी मी म्हणत होती. घराकडे येतां येतां दासूचीं बोटें कांकडली व त्याला नकळतच त्याच्या हातांतून फुलांची परडी खाली पडली. दासूला एकदम रडूंच कोसळलें. मातींत पडलेलीं सर्व फुलें, बेल, तुळस, दूर्वाच्या जुड्या मातीनें लिडबिडल्या. देवाला वाहावयाच्या पाना-फुलांची ही अवस्था पाहून भाऊ संतापतील व आपल्याला बदडून काढतील या कल्पनेनें तो गांगरून गेला. शेणाची पाटी त्यानें खालीं उतरली. सर्व दूर्वाफुलें गोळा करून त्यानें परडींत कशींबशीं भरलीं. थंडीनें कांकडून गेलेल्या बोटांनीं परडी धरणें अशक्य आहे असें त्याला वाटलें. परडी कांखेत धरून न्यावी अशी कल्पना त्याच्या मनांत आली पण तें अशक्य होतें. आतांपर्यंत एक हात पाटीला व एका हातांत परडी असें त्यानें केलें होतें पण यापुढें थंडी अंगाला सारखी झोंबत असतांना व हातपाय कांकडून जाण्याची पाळी आली असतांना या दोन्ही जिनसा घरीं घेऊन जाणें त्याला अशक्य वाटूं लागलें. वाघ्या बरोबर असता तर त्याच्या तोंडांत ही परडी दिली असती अशी एक कल्पना त्याच्या मनांत आली. देवावर वाहावयाच्या फुलांची परडी कुत्र्याच्या तोंडांत ! त्याला या कल्पनेचीच गंमत वाटली. दासूला या गोष्टीचा कांहींच विधिनिषेध वाटत नव्हता. त्याला जें काय भय वाटत होतें तें हें की फुलांची परडी कुत्र्याच्या तोंडांत कोणी पाहिली— विशेषतः विसूभाऊंनीं पाहिली—तर ते आकाश पाताळ एक करतील. सुभद्राबाई आपल्यावर थोडें प्रेम करीत असल्या तरी त्यांना सुद्धां ही गोष्ट सहन व्हावयाची नाहीं. कुत्र्याच्या तोंडांत फुलांची परडी द्यावी व वाड्यांत शिरण्यापूर्वी त्याच्या तोंडांतून ती काढून घ्यावी म्हणजे झालें असेंहि त्याच्या डोक्यांत आलें अन् गंमत अशी कीं त्याच क्षणीं वाघ्या

त्याच्याकडे येत असलेला त्याला दिसला. दासू वाड्याबाहेर पडलेला पाहिल्याबरोबर वाघ्यानें त्याला बांधून ठेवलेल्या सांखळीशीं इतकी झोंबाझोंबी व इतका आरडा ओरडा केला कीं त्याला मोकळा करणें विसूभाऊंना भागच पडलें. इतक्या पहांटे व थंडी कडक पडली असतांना बाहेर कोणींहि दिसत नव्हतें. वाघ्या जवळ आल्याबरोबर त्यानें परडी त्याच्या तोंडापुढें केली. परडीची वरची कडी त्यानें पटकन् तोंडांत धरली. विसूभाऊंनीं तोंडांत धरायला दिलेली छडी घेऊन त्यांच्या बरोबर वाड्यांत शिरायचा वाघ्याचा नेहमींचाच परिपाठ होता. वाघ्याला एवढा इशारा पुरे झाला. परडी तोंडांत धरून तो दासूबरोबर चालूं लागला इतकेंच नव्हे तर त्याच्या तो पुढेंहि गेला. थंडीमुळें हातपाय गारठून गेले होते. तो कसातरी वाट काढीत होता. वाघ्या निघाला. दासूची वाट पाहत राहिला नाहीं. त्यानें दासूला बरेंच मागें टाकलें. तो वाड्यांत शिरला. परडी त्यानें पडवींत आणून ठेवली. पुन्हां परतून तो दासूकडे आला. दासूचा जीव कासाविसे झाला. कुत्र्याच्या तोंडांतली परडी कोणी पाहिली असेल तर ? या कल्पनेनें तसल्या थंडींतहि दासूच्या अंगाला दरदरून घाम सुटला.

' कां, दास्या आला कीं नाहीं फुलांची परडी घेऊन ? ' भाऊ गरजले.

बाकी सगळें चुकेल पण भाऊंचें पहांटेचें स्नान, पूजा, गणपति अथर्वशीर्षाची एकादसणी-एकविसणी म्हटली तरी चालेल, रामनाम जप, शिवलीलामृत वाचन हा क्रम कधीं चुकायचा नाहीं.

भाऊंचा हा सर्व नेम चालवायचा तर त्या सगळ्याची तयारी करून देण्याकरतां सुभद्राबाईंना त्यांच्या अगोदर उठावें लागत होतेंच. या दिवशीं त्यांनीं आदल्या दिवशींच्या शिल्लक गोमयानें देवघर सारवून पूजेची सर्व तयारी करून दिली होती.

भाऊंची गर्जना ऐकल्यावर त्या बाहेर सोप्यांत आल्या, तों दासूच्या निजण्याच्या जागीं त्यांना फुलांची परडी दिसली. पण दासू कोठें दिसला नाहीं.

' अरे बोलत कां नाहीं ? ' गुलाम कार्टं आलं का नाहीं? का थंडीनं रस्त्यांतच कांकडून मेलं ?' भाऊ ओरडले.

' परडी इथं कशी आली ? सुभद्राबाईनीं फारसा विचार केला नाहीं. त्यांनीं ती उचलली. फुलांवर पाणी शिंपडलें, ती निथळली व भाऊंच्या पुढं आणून ती ठेवली. भाऊंनी त्यांतलीं फुलें, तुळशी, बेल, दूर्वाच्या जुड्या वेगवेगळ्या काढून तबकांत ठेवण्यास सुरुवात केली. त्यांना तीं सर्व मातीनें बरबटलेलीं दिसलीं.

' कार्ट्यानं परडी खालीं रस्त्यांत पाडली वाटतं. हीं घे सारी धुवून दे बघूं.'

भाऊंना जास्तकमी बोलायला वेळ नव्हता. शिवाय थंडीनं त्यांनाहि बेजार करून सोडलें होतें. सुभद्राबाईनीं सर्व परडी पुन्हां भरून चांगली धुवून दिली व दासू कोठें आहे हें पाहण्याकरतां त्या पुन्हां सोप्यांत आल्या.

दासू व वाघ्या दोघेंहि पडवींत वर चढत होतीं. सुभद्राबाईना पाहिल्याबरोबर दासूचे हातपायच गळाले. 'सुभद्राबाईनीं कुत्र्याच्या तोंडांत परडी पाहिली असली तर ? या विचारानें त्याला ' आतां आपली भरली ' असें वाटलें. या भीतीनें तो थरथर कांपूं लागला. त्याची मुरकुंडी वळली. त्याच्या डोक्यावरची पाटी खालीं पडली व तीबरोबर तोहि खालीं आला. गोठ्यांत शेणगोटा करीत असलेल्या गड्यानें धांवत येऊन त्याला आंवरलें. ' पोर थंडीनं कांकडून गेलं आहे. त्याला शेकायला पाहिजे. ' गडी उद्गारला.

सुभद्राबाईनीं लगबगीनें आपल्या खोलींत जाऊन तेथली पेटलेली शेगडी आणली.

' अरे, झालं तरी काय ? गडबड कसली चालली आहे ? '

' दासू थंडीनं कांकडून बेशुद्ध व्हायची वेळ आली आहे. '

' मरूं दे कार्ट्याला ! नीरांजनांतली वात पेटत नाहीं ती तेवढी पेटवून दे पाहूं. '

' इकडं पोर गारठून त्याचा जीव कासावीस झाला आहे नि तिकडं यांची आरती खोळंबली आहे ! '

सुभद्राबाईनीं पांची नीरांजनें पेटवून दिलीं. भाऊंची पंचारती सुरू झाली. नीरांजनाच्या पांच शुभ्र चकचकीत ज्योति भाऊ ज्या देवापुढें ओवाळीत होते त्यानें भाऊंच्या अंतःकरणांत साधा माणुसकीचा तरी प्रकाश पाडला का ? भाऊंचें अंतःकरण रोजच्या रोज पंचारत्या करीत राहूनहि काळेंकुट्ट राहिलें. या चकचकीत ज्योतींनीं सुभद्राबाईच्या हृदयांत मात्र एक निराळाच प्रकाश पाडला.

' कसली देवपूजा नि कसला जप ! रामनामाचा जप ! राम अनाथांचा नाथ, राम दीनांचा कनवाळू. नुसता रामनामाचा जप काय कामाचा ? असल्या थंडीचं पोराला मळ्यांत धाडलं. पोर गारठून गेलं. त्याचा जीव कासावीस झाला आहे तरी त्याची यांना पर्वा नाहीं. म्हणे मरूं दे कार्ट्याला ! काय हें ! असलीं हीं ढोंगं चालविणं म्हणजेच का धर्म ? '

सुभद्राबाईच्या डोक्यांत हे विचार चालू होते. भाऊंच्या पंचारतीनें सुभद्राबाईच्या हृदयांतील आत्माराम जागा झाला होता. केवळ बाह्योपचार, बाह्य आचरण हा कसला धर्म, हें ढोंग आहे असें त्यांना वाटूं लागलें. सुभद्राबाई बाहेर आल्या. गड्यानें शेगडींत आणखी जळण टाकून ती चांगली धगधगीत केली. आपल्या मुंडाशाच्या टोंकाचा बोळा करून त्यानें दासूची पाठ, हातपाय चांगले शेकून काढले. तो शुद्धीवर आला. सुभद्राबाईनीं त्याला निजण्याकरतां एक घोंगडी व ब्लॅंकेट आणून दिलें. गड्यानें त्याला चांगलें खालींवर पांघरूण घालून तिथेंच कुत्र्याशेजारीं निजविलें.

वाघ्या गड्याच्या पायाशीं घुटमळून आपली शेंपटी हलवीत होता. आपल्या दोस्ताची अशी शुश्रूषा केल्याबद्दल जणूं तो त्या गड्याचे आभारच मानीत होता.

सुभद्राबाईंचें लक्ष देवघराकडे गेलें. आरती संपून जपमाळेंतले मणी वर सरकूं लागले होते. डोळे मिटून विसूभाऊ माळेचे मणी ओढीत होते. नामजपाला आरंभ करण्यापूर्वीं त्यांनीं दासूचें कसें काय यासंबंधानें चौकशी सुद्धां केली नाहीं. विसूभाऊ डोळे मिटून एका मागून एक मणी ओढीत होते. त्या वेळीं सुभद्राबाईंचें लक्ष त्यांच्या चेहऱ्याकडे गेलें. ‘कसला बरं हे जप करीत असतील?’ सुभद्राबाईंच्या मनांत कल्पना आली.

‘काय ग ए! तुला आठवतो का, तो कानू सोनार आपल्याकडे केव्हां आला होता?’ भाऊंनीं जपाची माळ थांबवून सुभद्राबाईंना प्रश्न विचारला.

‘रामाचं ध्यान करीत आहांत ना! आतां कानू सोनाराची आठवण कशाला? रामनामाचा जप चाललाय का पैशाचा जप चाललाय?’ सुभद्राबाईंनीं भाऊंना टोकलें.

‘तुम्हां बायकांना कळत नाहीं तें हेंच. रामनामाचा जप तर आहेच. कानूची आठवण झाली, बरं झालं. आतां त्याचं खातं प्रथम पाहीन.’ भाऊ म्हणाले. त्यांची जपमाळ पुन्हा जोरानें हालूं लागली.

‘कसला जप नि कसलं ध्यान! कुणाच्या नांवावर किती पैसे, त्यांचीं व्याजं किती झालीं, कुणाची मुदत केव्हां संपणार? कुणावर केव्हां नोटीसा बजावायच्या, यांचीच नामावळी या जपाच्या वेळीं चालू असेल का?’

असा विचार करीत करीतच सुभद्राबाई घरकामाला लागल्या.

ज्या पूजेनें, आरतीनें व जपानें मनुष्याच्या हृदयांत भूतदयेच्या भावना उत्पन्न होत नाहींत व साध्या माणुसकीचा प्रकाशहि पडत नाहीं ती पूजा कसली न् जप कसला? रामाचं नांव घेत असतांना राम तरी यांच्या हृदयांत असा प्रकाश कां पाडीत नाहीं? पण राम तरी काय करणार? रामाचं ध्यान केलं तर रामरूप होतील. रामाच्या गुणांचं ध्यान केलं तर ते गूण अंगीं ठसतील. त्या गुणांचं आचरण करावंसं वाटेल! रामाचं नांव नुसतं तोंडांत, अन् हृदयांत कुणाचे गळे कसे कापावे हा विचार!’

सुभद्राबाई घरकामाला लागल्या होत्या पण त्यांच्या डोक्यांत वरील विचार थैमान घालीत होते.

‘कां, आज सुंठ कुठं दिसत नाहीं?’ भाऊंची कर्कश विचारणा सुभद्राबाईंच्या कानांवर आली. दासू संबंधाच्या गडबडींत व विचारांच्या नादांत त्या हें रोजचें काम विसरूनच गेल्या होत्या. त्यांनीं लगबगीनें सुंठसाखरेची तुपांत बनविलेली गोळी बशींत घालून भाऊंच्यापुढें सादर केली.

‘कां, आज झालंय काय? कामाकडे लक्ष कां नाहीं? रोजचीं कामं वेळेवर करूं नयेत म्हणजे काय?’ भाऊ हुकुमी आवाजांत बोलले.

‘ सगळं लक्ष आहे. माणूस म्हणजे कांहीं यंत्र नाहीं. कधीं तरी थोडासा विसर पडला तर काय एवढं बिघडलं ? ’ सुभद्राबाई उलट म्हणाल्या.

‘ सुभा वहिनी, तुझं तोंड दिवसेंदिवस बरंच सुटूं लागलं आहे बरं का ! ’ भागूवन्सं आपल्या अंथरुणावरून गरजल्या.

‘ अलीकडं असं कां तूं वागूं लागली आहेस समजत नाहीं. तुम्हांला गुरू तरी कोण भेटला ? ’

‘माझे गुरू आपणच.’ सुभद्राबाईनीं उत्तर दिलें. भाऊंना याचा अर्थ कळला नाहीं पण खरी गोष्ट हीच होती. दासूच्या खरेदीचा व त्याला राबवून पैसे वसूल करण्याचा आपला बेत सांगून विसूभाऊंनीं सुभद्राबाईना जागें केलें होतें. स्वतःच्या आपल्या जीवनाबद्दल या गोष्टीनें त्यांना विचार करायला लावलें होतें. त्यांचा स्वाभिमान जागा झाला होता. त्या रात्रीच्या जाग्रणानंतर प्रत्येक बाबतींत स्वतंत्र बुद्धीनें व स्वतंत्रपणानें वागण्याचें त्यांनीं ठरविलें होतें.

सुंठसाखर खाल्ल्यावर घाईघाईनें भाऊ परसाकडेला गेले. सुंठींत साखर कमी पडल्यामुळें त्यांना जोराचा ठसका आला. सुभद्राबाईच्या निष्काळजीपणाबद्दल त्यांना राग आला होता. पण बोलायला वेळ नव्हता त्यांना. सुभद्राबाईच्या हें पथ्यावरच पडलें. नवरा आणखी कांहीं बोलला तर त्याला उत्तर कसें द्यावयाचें हें त्यांनीं ठरविलें होतें. पण तो प्रसंग आला नाहीं.

पहांटे उठून स्नानसंध्या पूजा आटपली कीं संडासाचें दर्शन घ्यायचेंच. भाऊंचा हा नेहमींचाच कार्यक्रम होता. सोनगांव हें खेडेगांववजा गांव होतें. भंग्याचें काम करणाऱ्या डुकरांच्या झुंडी गांवांत फिरत होत्या. भाऊंनीं आपल्या वाड्यांतील संडास अशाच युक्तीनें बांधला होता कीं या भंग्यांना घाण काढण्यास अडचण पडूं नये. संडासांत वर माणूस आलें कीं खालीं थोड्या वेळांत डुकरांची भांडणें सुरू झालींच. माणसांना हें भांडण किसळवाणें वाटत असेल पण डुकरांचा हा रोजचाच जीवनकलह होता. सोनगांवच्या ग्रामसफाईचें हें काम हे पशू करीत होते म्हणूनच कीं काय ग्रामपंचायतीनें गांवांतून गटारें काढून घाण पाणी बाहेर काढून देण्याची व्यवस्था केली नव्हती. या भंग्यांना दिवसभर लोळायला पाहिजे म्हणून घाण दुर्गंध पाण्याचीं डबकीं तिनें सांठवून ठेवलीं होतीं. दोन प्रहरीं गांवांत ठिकठिकाणीं या डुकरांचे थवे या चिखलांत मजेंत लोळत असतांना दिसायचे. विसूभाऊ सोनटक्के हें तर गांवचे मुख्य सावकार. तेव्हां तेच ग्रामपंचायतीचे अध्यक्ष होते हें काय सांगावयास पाहिजे ?

विसूभाऊंचा संडास म्हणजे जवळ जवळ अंधार कोठडीच होती. वाड्याच्या एका कोपऱ्यांत त्यांनीं हा संडास कोरून काढला होता. संडासाच्या भिंतींच्या चाऱ्ही कोपऱ्यांत लालभडक झुरळांचे थवेच्या थवे पिढ्यान्‌पिढ्या वस्ती करून असलेले दिसत

होते.माणूस संडासाचें दार उघडून आंत आला की माशांचा गोंगाट होई व झुरळांचीहि तारांबळ उडे. सांडपाणी नीट वाहून जाण्याची व्यवस्था नव्हती. मोरी तुंबलेली होती. दरसाल नरकचतुर्दशीच्या दिवशींच काय ती या कोठडीची थोडीशी साफसूफ होई व दिव्याची पणती लागे. नरकासुरवधाचा व संडासाच्या साफसुफीचा संबंध कसा काय आला हा पुराणसंशोधनाचा प्रश्न. संडासाची साफसफाई–तेथें उजेड करणें म्हणजेच नरकासुराला मारणें असें असेल तर दररोजच नरकचतुर्दशी समजून नरकासुराला मारलें पाहिजे. रोज नरकचतुर्दशी कसली ? वर्षातून संडास एकदांच साफसूफ करायचा. चांगलें स्नान करून व शुचिर्भूत होऊन पूजाअर्चा आटोपल्यावर भाऊ या नारकी हवेंत अर्धा अर्धा तास जाऊन बसत. हा किळसवाणा प्रकार सुभद्राबाईंना आवडत नसे व ही जागा साफ ठेवण्याचा त्या प्रयत्न करीत. हें त्यांचें करणें भाऊंना मुळींच आवडत नसे. अशा रीतीनें पदोपदीं या नवराबायकोमधील वितुष्ट वाढूं लागलें होतें.

शौचविधी आटपून भाऊ विहिरीच्या पाळीवर आले. तेथें त्यांनीं हातपाय धुतले. त्या वेळीं पाण्याच्या पंपाकडे त्यांचें सहज लक्ष गेलें. पंपाचा दांडा हलत नव्हता. या वेळीं पंपाचा दांडा हलायलाच पाहिजे. दासूचें हें नेहमींचें काम होतें. व तें सुरू झालें नव्हतें.

' काय झालंय काय त्या कार्ट्याला आज सकाळपासून ? ' तणतण करीत भाऊ बाहेर सोप्याकडे जाऊं लागले.

सुभद्राबाईनीं मध्येंच चहाची आठवण दिली. खर्चाची गोष्ट म्हणून भाऊंच्या घरांत चहाचा प्रवेश झाला नव्हता. पण सुभद्राबाईच्या आगमनापासून चहानें भाऊ सावकाराच्या वाड्यांत प्रवेश केला व भाऊंनाहि तो आवडूं लागला.

'तब्येत बिघडलेली दिसते, थोडा चहा घ्यावा. ' सुभद्राबाईनीं विनवणी केली.

'चहाचं राहूं दे, तो गुलाम कार्टा अजून काय करतो आहे तें मला पाहूं दे.'

दासूची आतां घडगत नाहीं हें सुभद्राबाईच्या लक्षांत आलें. भाऊंच्या मागून त्याहि सोप्यांत आल्या. पडवींत कुत्र्याच्या बांधण्याच्या जागेजवळ भिंतीला लागून दासू निजलेला पाहून भाऊंच्या अंगाचा तिळपापड झाला. खालीं जाड काळी घोंगडी व वर उबदार निळें जाड ब्लँकेट पांघरावयास घातलेलें पाहून त्यांच्या संतापास सीमा राहिली नाहीं.

' या कार्ट्याचं बरंच प्रस्थ माजत चाललंय ! त्याला हें ब्लँकेट व घोंगडी कुणी दिली ? '

भाऊ ताडताड तिकडे चालून गेले. पन्नास रुपयाला खरेदी करून कामाला ठेवलेल्या या गुलाम पोराची इतकी बरदास्त ! विसूभाऊंना ही गोष्ट कशी खपणार ?

भाऊंनीं त्याच्या अंगावरचें ब्लँकेट खसकन ओढलें व त्यामुळें उघड्या पडलेल्या दासूला त्यांनीं एक लाथ ठेवून दिली. वाघ्या हें सर्व पाहात होता. तो असा कांहीं मोठ्यानें गुरगुरला कीं भाऊंची त्यामुळें तारांबळ उडाली. कुत्र्याची मान साखळींत अडकली होती म्हणूनच बरें झालें.

'अरेच्च्या ! कुत्रं सुद्धां या गुलाम कारट्याचं साथी ...' हें भाऊंचें वाक्य पुरें व्हायच्या आंत सुभद्राबाई पुढें आल्या.

'काय माणूस आहांत कीं राक्षस आहांत ?' सुभद्राबाई रागानें बोलल्या व लाथ खाऊन उठलेल्या दासूला त्यांनीं पोटाशीं धरलें.

'पुरे झाले कार्ट्याचे लाड ! काय तुझा बाप पंपाचा दांडा हलवील का ?' असें म्हणत त्यांनीं दासूला आपल्याकडे एका हातानें ओढलें व त्याला दुसऱ्या हातानें थपडा मारणार इतक्यांत 'नको, नको, मी जातों, जातों.' असें ओरडून दासूनें कशी तरी धडपड करून आपल्याला भाऊंच्या पकडींतून सोडवून घेतलें व तो मागें परसांतल्या विहिरीकडे धावला.

दासू गेल्यावर इकडे पतिपत्नीमध्यें जोराची शब्दाशब्दी सुरू झाली. संधिवातानें पिडलेल्या व अंथरुणावर पडून राहिलेल्या भागूवन्संनीं अर्थातच भाऊंचा पक्ष घेतला व त्यांच्याहि तोंडाचा पट्टा सुरू झाला.

'आजच केवळ नाहीं, तर थंडीचे दिवस संपेपर्यंत घोंगडी व ब्लँकेट दासूला मी दिलं आहे. मी त्याला उघडा निजूं देणार नाहीं.' सुभद्राबाईनीं भाऊंना निक्षून सांगितलें.

वन्संच्या अंगांत जणूं कैदाशीणच संचारली होती. त्या दोन्ही काठ्या टेकत धडपडत बाहेर सोप्यावर येऊं लागल्या. तितक्या अवकाशांत त्यांनीं अनेक खांडगाळ्या शिव्या सुभद्राबाईना व त्यांच्या माहेरच्या माणसांना मोजल्या.

'फार गमजा चालल्या आहेत. उद्यां भाऊ उरावर सवत आणून बसवील तेव्हां नीट डोळे उघडतील. भिकारडी ती भिकारडी अन् काय तोरा पहा. असं करीन न् तसं करीन. भाऊनं आधार दिला म्हणून बरं. तुमचं माहेर वांचलं, नाहीं तर वहिनीबाई, तुमचे आईबाप भिकेलाच लागले असते.'

सुभद्राबाईचा चेहरा संतापानें लाल झाला. त्यांचे ओठ थरथर कांपूं लागले. भाऊ जवळ उभे होते. नाहीं तर वन्संच्या हातांतल्या काठीनें त्यांचं टाळकं सडकून काढावं इतका राग त्यांना आला होता. इतक्यांत भागूवन्संच्या हाताखालची एक काठी घसरली व त्या जमिनीवर आदळतां आदळतां त्यांचें डोकें झोपाळ्याच्या कोपऱ्याला धडकलें.

'मेल्यें! मेल्यें!' वन्सं ओरडल्या. झोपाळ्याच्या कोंपऱ्याचा त्यांच्या कानशेलावर चांगलाच मार बसला होता. वन्सं कावऱ्याबावऱ्या झाल्या. धाडकन् खालीं पडल्या. त्यांना मूर्च्छा आली. त्यांनीं डोळे पांढरे केले. क्षणापूर्वीच संतापानें भडकलेल्या सुभद्राबाईनीं त्यांना सांवरलें. त्यांचें डोकें त्यांनीं मांडीवर घेतलें. पदरानें त्यांना त्या वारा घालूं लागल्या. भाऊंना त्यानीं पाणी आणण्यास सांगितलें. गडी माणसं जमा झालीं. डोक्यावर, कपाळावर पाणी शिंपल्यावर थोड्या वेळानें त्या सावध झाल्या. त्यांनी डोळे उघडले. सुभद्राबाईच्या डोळ्यातून गळलेले अश्रू त्यांच्या नजरेला पडले.

'मी मेल्यें कां नाहीं?' जिच्यावर आपण तोंडसुख घेतलें, नाहीं नाही तें आपण जिला बोललों तिच्याच मांडीवर आपलं डोकें आहे व तिच्याच डोळ्यांतून आपल्या या केविलवाण्या अवस्थेबद्दल आसवें वाहत आहेत हें पाहून त्यांना मेल्यापलीकडे वाटलें.

'पण वन्सं, मी हो काय तुमचं वाईट केलं आहे?' सुभद्राबाई कळवळ्यानें म्हणाल्या.

'खरंच, सुभा वहिनी! माझंच चुकलं. वहिनी, तूं किती ग प्रेमळ, सगळं सगळं एका क्षणांत विसरलीस! किती थोर अंतःकरणाची तूं! तुझ्या मांडीवरच डोकं ठेवून मला सुखानं मरूं दे.'

'असं भलतंसलतं बोलूं नये. मी विशेष तें काय केलं? माणसानं वागायला पाहिजे तसंच मी वागल्यें.' सुभद्राबाई म्हणाल्या.

* * * *

इकडे ही गडबड चालू होती तर तिकडे वाघ्या आपल्याला मोकळें सोडण्याबद्दल आपल्या साखळीशीं ओढाताण करीत होता. सारखे कर्कश स्वर काढून आपल्याला जखडून ठेवल्याबद्दल तो तक्रार करीत होता. दासू जवळ नसला कीं वाघ्याला कधींच चैन पडत नसे. वाघ्याची ही गडबड पाहून तेथें जमलेल्या गड्यापैकीं एकजण त्याच्या मदतीला धांवला. त्यानें त्याला मोकळें सोडलें.

मोकळा सुटल्याबरोबर वाघ्या थेट दासू जेथें पंपाचा दांडा हलवीत बसला होता तेथें येऊन पोंचला. त्याच्या कुशीशीं त्यानें आपलें डोकें घासलें. आपल्या प्रेमाची त्यानें त्याला जाणीव करून दिली. दासूनेंहि त्याच्याकडे प्रेमपूर्ण नजरेनें पाहिलें.

दासू मोठ्या कष्टानें काम करीत होता. त्याच्या या कामाला आजच बऱ्याच उशीरा सुरुवात झाली होती. दोन मोठे हौद त्याला आज भरावयाचे होते. सकाळीं मळ्यांतली फेरी होतांच लगेच तो या कामाला लागत असे व प्रहर दिवस यायच्या आंत तो आपलें हें काम संपवीत असे. पण हें काम वेळेवर झालें नाहीं कीं पुन्हां

आपली कंबक्ती होणार या भीतीनें दासूचे हात अधिकच लुळे पडत चालले होते. आपल्या सोबत्याची ही केविलवाणी दशा लक्षांत आली आहे या भावनेनेंच जणूं वाघ्या दासूकडे पाहात होता. आपल्या दुःखानें दुःखी होणाऱ्या आपल्या या मित्राकडे पाहून दासूचें अंतःकरण प्रेमानें उचंबळून आलें होतें. 'आपल्याला हें काम करतां आलं असतं तर आपण तें केव्हांच करून टाकलं असतं' असेंच तो म्हणत आहे असें वाघ्याच्या चेहऱ्याकडे व डोळ्यांकडे पाहून दासूला वाटलें. दासू व वाघ्या यांच्यांतील प्रेम कांहीं और होतें.

सकाळचा नित्यक्रम आटोपून विसूभाऊ आपल्या बैठकीकडे जाऊं लागले. कारकून येण्यास अद्याप उशीर होता.

ओल्या मातीनें बरबटलेलीं परडींतलीं दूर्वाफुलें, पंचारतीला झालेला उशीर, जळजळीत सुंठ-साखर, पत्नीनें दासूचा घेतलेला कैवार, वाघ्याचें गुरगुरणें, अंगावर धांवून आलेल्या वन्संवर सुभद्राबाईनीं मिळविलेला विजय, या सर्व एकामागून एक त्यांच्या मनाविरुद्ध झालेल्या गोष्टींमुळें ते त्रस्त झाले होते. गादीवर वसून व वहींतील पानें चाळून आपलें मन रिझविण्याच्या बेतांत ते होते. घाईघाईनें ते गादीकडे वळले त्यामुळें डेक्साच्या कोपऱ्याजवळ असलेल्या पिकदाणीकडे त्यांचें लक्ष गेलें नाहीं. त्यांच्या पायाचा तिला धक्का लागला. ती लवंडली. पिकदाणींतली घाण ती. सतरंजी, तिच्यावरची गादी, या पिवळ्या तांबड्या घाणीनें बरबटून गेली. भाऊंना झालेल्या मनःसंतापांत आणखी भरच पडली. पायाला डोळे कधींच नसतात. चांगल्या डोळस माणसाचे पायहि असला गुन्हा करतात. मग संतापानें आंधळ्या झालेल्या माणसाच्या पायांनीं असला गुन्हा केल्यास त्यांत कांहींच नवल नव्हतें. आपल्या धडपडीमुळें व दुर्लक्षामुळें पिकदाणी लवंडली इतका विचार भाऊंच्या डोक्याला कसा सुचणार ?

पाण्याचे हौद भरल्यावर पिकदाणी धुवून बैठक साफ करण्याचें काम दासू करीत असे. अद्याप पाण्याचे हौदच भरले नव्हते, त्यांत तो गुंतला होता, तेव्हां तो अर्थात्‌च बैठकीकडे आला नाहीं. पाणी भरून, बैठक साफ करून दासू गोठ्यांतल्या गड्याच्या मदतीकरनां जात असे. भाऊ बैठकीवर बसले कीं दासू गड्याबरोबर गोठ्यांत काम करीत असलेला दिसायचा. पण दासू आज पंपाशींच कशीतरी धडपड करीत होता.

पिकदाणी बैठकीवर लवंडली यांत दासूचा कांहींच गुन्हा नव्हता. पिकदाणी वास्तविक भाऊंच्या धडपडण्यामुळें लवंडली होती. दासूचा गुन्हा काय तर त्यानें वेळेवर येऊन पिकदाणी साफ केली नाहीं व बैठक झाडली नाहीं. या कामाकडे लागण्यास त्याला आज उशीर झाला होता इतकेंच. कांहीं थोडें बिघडलें कीं डोक्यांत राख घालून घेणाऱ्या भाऊंना एवढें निमित्त बस्स होतें.

' कुठं आहे तो गुलाम कार्टो ! पहांटेपासून या...च्यानं घर जसं डोक्यावर घेतलं आहे ! '

' कुणी घेतलं आहे ? दासूनं ? ' सुभद्राबाई माजघरांतून बाहेर येतां येतां म्हणाल्या.

घर डोक्यावर कोणी घेतलें होतें ? दासू सकाळपासून गरजत नव्हता. या ना त्या निमित्तानें भाऊंनीं सर्व घर दणाणून सोडलें होतें. भाऊंचा संताप अनावर झाला होता. या गोष्टीला महत्वाचें असें कांहींच कारण नव्हतें. संतापी व त्रासिक माणसांना कारण तरी कोठें लागतें ! निष्कारण तीं आपल्या मनाचा संताप करून घेत असतात. या स्वभावामुळें आपल्याला त्रास करून घेतात व दुसऱ्यांनाहि त्रस्त करून सोडतात.

सुभद्राबाईच्या वरील वाक्यामुळें भाऊ आणखी अधिकच भडकले.

' असले लाड नाहीं चालायचे. कुठलं गुलाम कारटं ! कुणाच्या बीजाचं, अन् त्याचा कैवार घ्यायला निघाली. पहा, तिकडे गादीकडे पहा. हें काम दास्यानं केलं नाहीं तर तुझा काका येऊन तें करणार आहे का ? '

' माझ्या माहेरच्या माणसांचं नांव नका घेऊं. ' सुभद्राबाई धिटाईनं बोलल्या.

' कां ? तुझ्याहि अंगांत आज आलंय वाटतं ? जा आंत, घरांत जा पाहूं ! ' भाऊंनीं हुकूम केला.

विसूभाऊंचा रुद्रावतार या वेळीं पाहण्यासारखा होता. त्यांचा चेहरा संतापानें लाल झालेला होता. भिंवया चढल्या होत्या. ओंठ थरथर कापत होते. या जमदग्नीपुढें उभे राहण्याची सोय नाहीं असें सुभद्राबाईंना वाटलें. विशेषतः त्यांनीं शेवटचा जो हुकूम केला त्यांत इतकी तुच्छता भरली होती कीं सुभद्राबाईंना त्यांचा संतापच आला. त्या मुकाट्यानें आंत गेल्या.

भागूवन्सं मात्र या खेपेस अगदीं स्वस्थ ऐकत राहिल्या होत्या. नवराबायकोच्या या प्रसंगांत त्यांनीं मुळींसुद्धां तोंड घातलें नाहीं.

सुभद्राबाई आंत निघून गेल्या. भाऊ पुन्हां बैठकीकडे वळले. कोपऱ्यांतली वेताची छडी त्यांनीं हातांत घेतली. त्यांनीं गड्याला हांक मारली. ग्यानबा धांवतच आला. भाऊ ताडताड परसांत गेले.

पुढचीं कामें तर राहिलींच आहेत. पाणी सुद्धां भरणें झालें नाहीं. आज आपली धडगत नाहीं या भीतीनें दासूची अगोदरच गाळण उडाली होती. व तो वाघ्याच्या गळ्याला मिठी मारून आपलें रडगाणेंच जणूं त्याच्यापाशीं गात होता. इतक्यांत भाऊ तेथें दाखल झाले. भाऊंचा संतप्त लालबुंद चेहरा, व त्यांच्या हातांतील छडी पाहून दासूनें जोरानें किंकाळी फोडली व तो संडासाकडे धांवत सुटला. आपल्या सोबत्यावर संकट आलेलें पाहून वाघ्या गुरगुरला.

‘ वाघ्या ! ’ भाऊहि त्याच्यावर जोरानें गुरगुरले व त्याच्या अंगावर छडी घेऊन धांवले. तो थोडाच त्यांच्या तडाक्यांत सांपडणार ? तो दासूकडे धांवत गेला.

‘ पकड त्या गुलाम कार्ट्याला ! ’ भाऊंनीं आपल्या मागून आलेल्या ग्यानबाला हुकूम केला.

दासूकडे धांवत जाऊन ग्यानबानें त्याला धरल्याबरोबर वाघ्या त्याच्या अंगावर धांवला.

भाऊ ग्यानबाच्या मागून गेलेच होते. त्यांनीं प्रथम वाघ्याच्या अंगावर एक चांगला जोराचा फटका मारला. दासूचा कान धरून त्याला ते ओढत ओढत सोप्याकडे घेऊन गेले. ग्याना त्यांच्या बरोबर होता. वाघ्या केव्हांच बाहेर पळून गेला होता.

सुभद्राबाई हा सर्व प्रकार माजघराच्या दारांतून पाहात होत्या. पुढें जाऊन दासूला सोडविण्याची हिंमत त्यांना झाली नाहीं. आपल्या दौर्बल्याला दोष देत त्या जागच्या जागींच उभ्या राहिल्या.

‘ चल, उचल त्याला ! ’ ग्यानाला त्यांनीं हुकूम केला.

‘ पाहतोस काय ? पकड तो आंकडा. ’ दासूला त्यांनीं दरडावलें. त्याच्यावर हा पहिला प्रसंग नव्हता.

लोखंडी तराजू टांगण्याकरतां लोंबकळत ठेवलेला लोखंडी आंकडा दासूनें दोन्ही हातांनीं धरल्याबरोबर ग्यानानें त्याच्या कंबरेभोंवतालचे हात सोडले.

एक, दोन, तीन, चार……

दासूच्या कुल्यावर व पाठीवर जमेल त्याप्रमाणें भाऊ सपासप छड्या उडवीत होते व दासूच्या हृदयभेदक किंचाळ्या चालू होत्या.

‘ त्या पोराचा प्राण घेतोस का काय ? ’ भागूताई आपल्या आंथरुणावरून ओरडल्या.

गडीमाणसें जमा झाली.

दासूला शिक्षा देण्याकरतां तात्यापंतोजीच्या शाळेंतील पद्धत भाऊंनीं सुरू केली होती. पांचसहा फूट उंचीवर एक आंकडा लोंबत ठेवायचा. मुलाच्या कंबरेला विळखा घालून त्याला शाळेंतल्या गड्यानें उचलायचें. मुलाला आंकडा दोन्ही हातांनीं धरावयास सांगावयाचें; त्याच्या कंबरेचा विळखा सोडून द्यावयाचा. याप्रमाणें मुलानें स्वतः टांगून घेतलें म्हणजे मग पंतोजी त्याला छड्या लगावीत. स्वतःच टांगून घेतलेलें असतें मुलानें आपल्याला. हात सोडावे तर खालीं आपटून पाय मोडण्याची भीति. हात सोडणें शक्य नसतें. अशा रीतीनें मुलाला स्वतः होऊनच टांगून घ्यावयाला लावून त्याच्या अंगावर छड्या उडविण्याची तात्या पंतोजीची अमानुष पद्धति भाऊंनीं दासूच्या बाबतींत अमलांत आणली होती.

चारपांच छड्या मारल्या म्हणजे भाऊ नेहमीं त्याला खालीं उतरावयाला ग्यानबास सांगत. ग्यानबानें कंबरेला धरलें कीं दासू आंकड्याला धरलेले हात सोडी व खालीं उतरे. पण भाऊ आज भानावर नव्हते. एकामागून एक छड्यांचे वार ते करीत होते. सहनशक्तीला सीमा आहेच.

मार सहन होईनासा झाल्याबरोबर दासूनें जोरजोरानें पाय हलविण्यास सुरुवात केली. यांपैकीं एक पाय ग्यानाला लागला. भाऊ अधिकच संतापले. पाय चुकवून ते आतां छड्यांचे वार करूं लागले.

पंधरा, सोळा, सतरा...दासूला हा मार असह्य झाला. त्याचें भान सुटलें व त्याबरोबर त्याचे हातहि सुटले.

ग्यानबानें त्याला वरचेवर धरला नसता तर तो खालीं फरशीवर आपटला असता.

इकडे ग्यानबानें दासूला वरच्यावर धरलें तर तिकडे सुभद्राबाईंनीं धांवत येऊन पतीच्या हातांतली छडी धरली.

'गुलाम पोर झालं म्हणून काय झालं, त्याला ठार मारतां का काय?' सुभद्राबाई संतप्त स्वरांत म्हणाल्या.

जमा झालेल्या गडी माणसांनाहि भाऊंचा हा क्रूरपणा आवडला नाहीं.

'अनाथ पोर! त्याला खायला घातलं म्हणून काय झालं? भाऊ, तुम्हांला हें शोभत नाहीं.' एक म्हातारा गडी म्हणाला.

मालीला कडेवर घेऊन पडवींत एका बाजूला उभी राहिलेली ग्यानबाची सून तो देखावा पाहून ओक्साबोक्शीं रडूं लागली. त्याबरोबर मालीहि रडूं लागली.

'घे मालीला जवळ घे. तिला अगोदर समजाव.' विसूभाऊंनीं छडीचा हात सोडतांना सुभद्राबाईंना उद्देशून म्हटलें.

'पोरगी थोडी रडली तर म्हाताऱ्याचा जीव खालींवर झाला अन् इकडं या अनाथ पोराचे प्राण कासावीस झाले तरी त्याची त्याला पर्वाहि नाहीं.' दुसरा एक गडी म्हणाला.

सगळें घर आपल्या विरुद्ध उठलें आहे असें भाऊंना वाटलें.

# ५

अमेरिकन मिशनच्या दवाखान्यांत येऊन दासूला १५ दिवस झाले होते. विसूभाऊंनीं आंकड्यावर टांगावयास लावून दासूला छडीचा बेदम मार दिला त्या दिवशीं रात्रींच त्याला फणफणून ताप आला. कुल्यावर, पाठीवर, दंड्यांवर, मांड्यांवर छड्यांचे वण उठले होते. मारामुळें दासूला कणकण आली असेल अशी सुभद्राबाईंची प्रथम कल्पना झाली. कुल्यावरच्या व पाठीवरच्या दोनचार वणांतून थोडेंसें रक्त फुटलें होतें. त्यांना तेल लावून व त्याचें अंग शेकून दासूला उबदार अंथरुणांत त्यांनीं निजविलें. त्याला त्यांनीं ऊन ऊन भात तूपमीठ लावून खायला घातला. गवती चहाचा काढा रात्रीं करून दिला. दासूला त्या दिवशीं झोंप आली नाहीं. मधून मधून गुंगी येई पण तो किंचाळ्या मारीत उठे. सुभद्राबाईंनीं या रात्रीं सोप्यावरच आपलें अंथरुण टाकलें. त्यांनाहि रात्रभर झोंप आली नाहीं. आपल्या पतीनें केलेल्या या अत्याचाराबद्दल त्यांना संताप आला होता. पण त्या बाबतींत आपण कांहीं करूं शकलों नाहीं हें पाहून आपल्या दौर्बल्याबद्दल त्यांना कींवहि आली. 'मेला बायकांचा जन्म किती परस्वाधीन! त्यांच्या दरडावणीला भिऊन गेल्यें. त्याच वेळीं हातांतली छडी काढून घेतली असती तर!' अनेकदां हे विचार त्यांच्या मनांत आले.

'कदाचित् आपल्यालाहि दोन तडाके लगावण्यास त्यांनीं कमी केलं नसतं... अन् असं झालं असतं तर...बरं झालं असतं...ग्यानबाला तें सहन झालं नसतं... दोन तडाके मला बसले असते पण पोर वांचलं असतं...पण आतां त्याचा उपयोग... मलाच धैर्य झालं नाहीं.'

सुभद्राबाईंच्या मनांत हे विचार एकामागून एक आले खरे. पण ते वस्तुस्थितीला धरून नव्हते. त्यांनीं धांवून जाऊन भाऊंच्या हातांतील छडी धरली तोच प्रसंग योग्य होता.

रात्रभर दासूचें विव्हळणें चालू होतें. सुभद्राबाईंचा डोळा रात्रभर लागला नाहीं. विसूभाऊ एकदां आपल्या खोलींत शिरले ते सकाळपर्यंत त्यांनीं बाहेर तोंड देखील काढलें नाहीं.

दुसरे दिवशींहि दासूचा ताप उतरला नाहीं. उलट रात्रीं जास्तच ताप भरला. किरकोळ काढा, औषधें, चालू होतीं. असेच आणखी तीन दिवस गेले. ताप मुळींच

उतरत नाहीं, उलट पोर अधिकाधिक बेजार होत चाललें. घरीं डॉक्टर बोलावून दासूच्या औषधपाण्याची सोय व शुश्रूषा होणें शक्यच नव्हतें तेव्हां त्याला साहजिकच मिशनच्या दवाखान्यांत ठेवण्यांत आलें. दासू दवाखान्यांत आला. डॉक्टरानें त्याला तपासलें, अंगावरचे माराचे वण अद्याप बुजले नव्हते. एकदोन व्रणांतून थोडा पूहि झाला होता. माराचा सर्व इतिहास डॉक्टराला समजला. विसूभाऊंनीं आपल्या घरांतल्या मजूर पोरावर केलेल्या या अत्याचाराबद्दल त्यांना संताप आला. या कृत्याबद्दल भाऊ सावकाराला चांगलाच धडा देण्याचें त्यांनीं ठरविलें. पण त्यापूर्वी दासूच्या आजाराकडे पाहणें जरूर होतें. दवाखान्यांतील शुश्रूषेखालीं आल्यावर दासूचा ताप हळूहळू उतरत चालला. न्युमोनियाची डॉक्टरला भीति वाटली होती. ती निराधार ठरली. सोनगांवहून हा दवाखाना दोन मैलांवर होता. सुभद्राबाई न चुकतां रोज बैलगाडींतून दवाखान्यास येत व दासूजवळ तास दोन तास बसून जात. मिशनच्या व्यवस्थापक बाईला याबद्दल आश्चर्य वाटे. घरांत नोकरीस असलेल्या एका कुणब्याच्या पोराबद्दल त्यांची इतकी आस्था पाहून सुभद्राबाईबद्दल आदराचे उद्गार त्या काढीत. वाघ्यानें तर दासूची पाठ मुळींच सोडली नाहीं. घराकडे व दवाखान्याकडे अशा त्याच्या येरझारा चालू असत. त्याला घरीं कोणी साखळींत अडकवून टाकलें तर आरडाओरडा करून तो घरच्या माणसांना सतावून सोडायचा. पहिले तीनचार दिवस वाघ्याला हा प्रकार करावा लागला. पण पुढें सुभद्राबाई वाघ्याच्या मदतीस धांवून आल्या. दासू दवाखान्यांत असेपर्यंत वाघ्याला कोणी सांखळींत अडकवायचें नाहीं असें त्यांनीं गड्यांना बजावून सांगितलें.

एके दिवशीं रात्रीं दासूची तब्येत एकाएकीं बिघडली. दवाखान्याचे मुख्य डॉक्टर त्याला पाहून औषधयोजना करून गेले. या वेळीं त्यांनीं दासूच्या कॉटजवळ बसलेल्या वाघ्याबद्दल नर्सजवळ चौकशी केली.

‘ रोग्याचा तो जिवलग मित्र आहे. ’ नर्सनें डॉक्टरांना इंग्रजींत सांगितलें.

दासूच्या औषधाबद्दल योग्य त्या सूचना दिल्यावर त्यांनीं नर्सचा निरोप घेतला.

‘ आतां तो ठीक आहे’ असें ते म्हणाले व तेथें उभा असलेल्या वाघ्याच्या पाठीवर त्यांनीं हात फिरवला व त्याला गोंजारलें. वाघ्यानेंहि त्यांच्या छातीला आपलें डोकें घासून व आपली भरदार शेपटी हालवून जणूं काय डॉक्टरांचे आभारच मानले.

‘कुत्रा फार उमदा व जातिवंत आहे.’ डॉक्टर म्हणाले. अन् या मुलाचे मालक सभ्य गृहस्थ त्याच्या समाचाराकरतां कधीं आले होते का अशी त्यांनीं चौकशी केली.

ते कधींच आले नाहींत असें कळल्यावर त्यांच्या कपाळावर आंठ्या चढल्या.

‘ ठीक आहे, मी त्यांना धडा शिकवीन. ’ असें म्हणून ते निघून गेले.

* * * *

‘ समजलं का, काल मिशनरी बाईंनीं दासूला मिशनमध्यें राहण्याबद्दल विचारलं. ’ या दिवसांतच एका रात्रीं निजायच्या वेळीं सुभद्राबाई विसूभाऊंना उद्देशून म्हणाल्या.

‘ मग तें कार्टं काय म्हणालं ? ’

‘ काय हें ? कार्टं ! कार्टं ! त्या पोरानं तुमचं काय एवढं घोडं मारलंय ? तुमचं अंतःकरण दगडासारखं कसं अगदीं ? तुम्हाला त्या पोराबद्दल प्रेम...कसलं म्हणा, पण दया सुद्धां कशी वाटत नाहीं ? ’

‘ विकत घेतलेलं कार्टं तें. प्रेम कसलं न् दया कसली ! कार्टं मेलं असतं तर माझे पैसे फुकट गेले असते. गुलामाला ठार मारायचं नसतं ही गोष्ट माझ्या हातांतली छडी तूं धरलीस त्याचवेळीं लक्षांत आली. बरं, त्या मिशनरी बाईचं काय ? ती त्या पोराला बाटवूं पाहते वाटतं ? ’ भाऊ उद्गारले.

‘ समजा, तें पोर बाटलं, तर बरंच होईल. मिशनमध्यें राहिलं तर त्याचे हाल नाहीं चुकायचे ?’ सुभद्राबाई मिस्किलपणें म्हणाल्या.

‘ वाहवा रे अक्कल ! आपल्या घरचं पोर असं बाटूं द्यायचं ? तें माझ्या मालकीचं पोर आहे. त्याला मी हातचं सोडायला तयार नाहीं. या मिशनऱ्यांचा कावा मी चांगला ओळखतों. असलं कांहीं तरी ही बाई करूं दे तर खरी. माझ्याशीं गांठ आहे म्हणावं. मिशननं केलेल्या या फसवेगिरीचा मी बाहेर चांगलाच गवगवा करीन अन् या बाईला सळो का पळो करून सोडीन. ’

‘ तुम्ही त्यांना सळो का पळो करून टाकयचं राहूं दे. हें सर्व प्रकरण मिशनच्या डॉक्टरनं पोलिसकडं द्यायचं ठरविलं आहे, हें माहीत तरी आहे का ? ’

‘ बरं, त्या पोरानं काय उत्तर दिलं त्या बाईला ? तें तर तिच्या काव्याला बळी नाहीं ना पडलं ? ’

‘माईला सोडून मी कुठं देखील राहणार नाहीं असं दासूनं त्या बाईला सांगितलं.’

‘ बरं तसं कां होईना ! माई तेवढी त्याची ! आम्ही कुणीच नव्हे ! ’

‘ तुमच्यासारख्या पाषाणहृदयी माणसाजवळ...’

‘ बरं,बरं, त्याला फुकटचं खायला घालावं म्हणतेस ? बरं तें राहूं दे. पोरच मिशनमध्यें राहायला तयार नसल्यावर हा मिशनरी डॉक्टर पोलिसकडं जाऊन काय करणार ?’

‘ दासू त्याच्या मिशनमध्यें राहो किंवा न राहो, पोलीसकडं हें प्रकरण देऊन आपल्याला चांगला धडा देण्याचं डाक्टरानं ठरविलं आहे असं तिथल्या एका नर्सनं मला सांगितलं. ’

‘अस्सं !’ भाऊंच्या चेहऱ्यावर घाबरटपणाच्या रेषा उमटल्या. ‘ पण आतां त्या पोराचं कसं काय आहे ?’

'अलीकडं त्याला ताप येत नाहीं. आणखी दहा दिवस तरी त्याला दवाखान्यांतून हलवितां कामा नये असं डॉक्टरचं म्हणणं आहे.'

'बरोबरच आहे ! त्याला जाळ्यांत गुंतवायला इतके दिवस पाहिजेतच. मी उद्यां दवाखान्यांत जाणार आहे.'

'दासूला दवाखान्यांत जाऊन एक महिना होऊन गेला. तुम्ही एकहि दिवस तिकडं फिरकलां नाहीं. तुमच्या या बेपर्वाईबद्दल डॉक्टर रागावले आहेत.'

'आमच्या घरची उठाठेव या मिशनऱ्याला कशाला ? आम्ही जाऊं किंवा न जाऊं !'

'तुमच्या घरचं पोर दवाखान्यांत आलं, अन् तुम्ही तिकडं फिरकलां सुद्धां नाहीं. पण डॉक्टरांनीं तें मनावर घेतलं नाहीं. दासूला त्यांनीं मरणाच्या जबड्यांतून बाहेर ओढून काढलं.'

'किती झाले तरी हे मिशनरी डॉक्टर !'

'पण ते तसे दिसत नाहींत. रोग्याला बरं करायचं एवढंच त्यांना माहीत आहे. मिशनच्या बाईसंबंधानं मात्र मला कांहीं सांगतां येत नाहीं.'

हें बोलणें येथेंच संपलें. भाऊंना रात्रभर झोंप आली नाहीं. पोलिस म्हटलें कीं भाऊंचें धाबें दणाणून जात असे.

दुसरे दिवशीं संध्याकाळच्या सुमारास विसूभाऊ दासूच्या समाचाराकरतां दवाखान्यांत गेले. त्यांना पाहतांच दासूनें होन्ही हातानीं आपलें तोंड झांकलें व तो रडूं लागला. नर्सनें भाऊंना तेथून जाण्यास व दासूच्या दृष्टीआड होण्यास सांगितलें.

पोर आपल्याकडे राहात नाहीं हें नक्की दिसत असतां नसत्या उठाठेवी कशाला असें मिशनच्या व्यवस्थापक बाईचें मत असतांहि डॉक्टरांनीं ही केस पोलिसकडे रिपोर्ट करायचें ठरविलें आहे असें भाऊंना समजल्यावर त्यांची पांचांवर धारण बसली. पैशाच्या जोरावर काय हवें तें करता येईल, अशी धमक त्यांना वाटत होती तरी कोर्टापुढें ही केस जाऊन आपली शोभा व्हावयाची, त्यापूर्वीच हें प्रकरण कसे मिटवितां येईल याचा विचार ते करूं लागले.

डॉक्टरपुढें पैशाचा कांहीं उपयोग नव्हता. पण शेवटीं अनेकांच्या भिडा घालून व डॉक्टरजवळ प्रत्यक्ष गयावया करून भाऊंनीं हें किटाळ टाळलें. मिशनच्या बाईनीं ही संधी फुकट घालविली नाहीं. त्यांनीं मिशनच्या दवाखान्याकरतां भाऊंकडून एक चांगलीशी देणगी उपटली. बाईच्या व्यवहारांत डॉक्टर चुकून सुद्धां लक्ष घालीत नसत.

दासू दवाखान्यांतून परत आल्याला दोन महिने झाले होते. या दिवसांत आपल्यावर सोंपविलेलीं कामें तो हळूहळू करूं लागला होता. लाथा, बुक्क्या, छडीचा मार या शिक्षा त्याच्या बाबतींत बंद झाल्या. फक्त केव्हां तरी कानपिचक्या गालगुच्चे, चिमटे, एवढ्यावरच भाऊ समाधान मानीत.

*　　*　　*

मुंबई, ता. ———

प्रिय माई,

अलीकडे तुझें पत्र आलें नाहीं. मागच्या पत्रांत इकडील पत्ता लिहिला आहे. आम्ही इथं मुंबईला येऊन दोन अडीच महिने झाले. कामाचं बरं चाललं आहे. रोज ऑफिसांत नेण्याकरतां मोटार येते. त्यामुळें जाण्यायेण्याची दगदग होत नाहीं. आम्हांला जागा चांगली मिळाली आहे. चार खोल्यांचा ब्लॉक आहे. हवाशीर आहे. कुसूम व शालिनी शाळेंत जाऊं लागल्या आहेत. कुसूमच्या वर्गावरील बाई तिला शिकवायला घरीं येतात अन् रविवारीं तर सबंध दिवस आमच्या घरींच असतात. बाई अविवाहित आहेत. इथं त्या आपल्या मामाच्या घरीं असतात. बाई वयानें फारशा मोठ्या नाहींत पण फारच सालस व सरळ स्वभावाच्या आहेत. त्या इतक्या मनमोकळया व थोर विचाराच्या आहेत कीं. त्यांच्याशीं बोलूं लागलं म्हणजे आपण कांहीं तरी नवीनच ऐकत आहों असं वाटतं.

मला वाटतं तूं एकदां इथं यावं अन् कांहीं दिवस राहून जावं. आपल्या भेटीला जवळ जवळ एक वरीस होत आलं कीं. माली आतां चांगली बरी झाली असेल. तिला पाहायची इच्छा आहेच. सगळीं मुलं, विशेषतः शाली, तिची फार आठवण काढते. तुम्ही सगळ्यांनींच इथं यावं व कांहीं दिवस मुंबईची मजा पाहावी अशी आपली इच्छा त्यांनीं बऱ्याच वेळां बोलून दाखविली. भाऊ आपला व्यवहारधंदा सोडून कधींच येणार नाहींत हें मला माहीत आहे. मुंबईला मजा पाहायला म्हणून ते कधींच यायचे नाहींत. त्यांचेंच कांहीं धंद्याचें काम निघालें तर अवश्य येतील. पण तुला मुंबईला यायला कांहींच हरकत नाहीं. तुलाहि थोडा विरंगोळा वाटेल. कुसुमच्या बाईशींहि तुझा सहवास होईल. आमच्या कुटुंबांत त्या आपलेपणानें वागतात व आम्हालाहि त्या आपल्याशा वाटतात. इथं आलीस तर कामाच्या दगदगींतून तूं कांहीं दिवस मोकळी होशील. तसेंच वत्सलाबाईच्या सहवासांत तुझ्या मनालाहि समाधान वाटेल.

येतांना दासूला बरोबर आणण्यास विसरूं नकोस.

तुझी लाडकी बहीण,

रमा

रमाबाईचें हें पत्र वाचून सुभद्राबाईना सहाजिकच मुंबईला जावेंसें वाटलें. विसूभाऊंनीं मोठ्या नाखुषीनें त्यांना तशी परवानगी दिली. भाऊंकडून खुषीच्या परवानगीची अपेक्षा त्यांनीं कधींच केली नव्हती. खर्चाचा प्रश्न तर होताच. त्यापेक्षांहि आपली कसल्याहि प्रकारची गैरसोय होतां कामा नये असें त्यांना वाटे. पण दासूच्या प्रकरणा-

पासून विसूभाऊ थोडेसे नरम आले होते. सुभद्राबाईंची योग्यता त्यांना कळूं लागली होती. त्यांच्या थोर स्वभावाची थोडीशी छाप त्यांच्यावर पडूं लागली होती. तेव्हां सुभद्राबाईंना नाखुष करणें त्यांच्या जीवावर आलें. सुभद्राबाई दासूला बरोबर नेणार होत्या. ही गोष्ट तर त्यांना मुळींच पसंत नव्हती पण या बाबतींत सुभद्राबाईंचा हट्टच दिसला तेव्हां त्यांनीं येथेंहि नमतें घेतलें. मात्र पंधरवड्याच्या आंत मुंबईहून परत आलेंच पाहिजे अशी अट त्यांनीं घातली व सुभद्राबाईनींहि ती मान्य केली.

मुंबई काय, सोनगांवपेक्षां थोडेसें मोठें गांव असेल असें दासूला वाटलें. आपल्याला मुंबईला घेऊन जाणार आहेत माई, हें ऐकून त्याला फार मजा वाटली. सोनगांवाला तो कंटाळला होता. भाऊंच्या रोजच्या कटकटीला व जाचाला तर तो फारच कंटाळला होता.

ठरल्याप्रमाणें सुभद्राबाई मालीला व दासूला घेऊन मुंबईला निघाल्या. दुसरा कोणी माणूस त्यांनीं बरोबर घेतला नव्हता. आगगाडीचा प्रवास त्यांना सुखकर झाला. सुभद्राबाई बरोबर दासूहि स्त्रियांच्या डब्यांत बसला होता. डब्यांत फारशी गर्दी नव्हती. दासूचा हा आगगाडींतला पहिलाच प्रवास होता. झाडें, झुडपें, तारेचे खांब, घरें, झोपड्या आपल्यापासून दूर दूर पळून जातांना त्यानें प्रथमच पाहिल्या. त्याच्या बालमनाला हें कोडें उलगडलें नाहीं. पुलावरून गाडी चालली म्हणजे होणारा घरघर आवाज व दोन्ही बाजूच्या तिकोनी कैंच्या सपासप मागें सरकतांना पाहून त्यांचें मन हदरून जाई. स्टेशनवर गाडी थांबली म्हणजे त्याला हायसें वाटे. किती तरी लोक डब्यांतून खालीं उतरत व त्यापेक्षांहि किती तरी जास्त लोक डब्यांत चढून गर्दी करीत. शिटांवर शिटा होत, भप् भप् भप् असा आवाज होई व गाडी चालूं लागे. असें होतां होतां मुंबई आली. काय ती माणसांची गर्दी! खेडेगांवांतल्या उरुसाच्या व यात्रेच्या वेळीं होत असलेल्या गर्दीपेक्षां किती तरी पटीनें जास्त लोक मुंबईच्या स्टेशनवर उतरले होते. इतके सगळे लोक मुंबईंत शिरणार? मुंबई केवढी मोठी असेल? एक ना दोन अनेक कल्पनांनीं त्याचें बालमन गांगरून गेलें होतें. बोरीबंदरावर सुभद्राबाईंना उतरून घेण्याकरतां अप्पासाहेब मोने आले होते. त्यांच्या बरोबरच्या गड्यानें सुभद्राबाईंचे सामान उतरलें. सुभद्राबाईंच्या कुशींत माली बिलगून राहिली होती. बोरीबंदरावरील गर्दी व धांवपळ पाहून गांगरून गेलेल्या दासूला अप्पांनीं हाताशीं धरलें.

मोटारीचा पों पों आवाज ऐकल्याबरोबर कुसुम, शाली, शरद धांवतच चाळीच्या दाराशीं आलीं. चाळीच्या एका टोंकाला अप्पासाहेबांचा स्वतंत्र चार खोल्यांचा ब्लॉक होता. दासूला आपण एका नवीनच जगांत प्रवेश केला आहे असें वाटूं लागलें.

मुंबईस आल्याबरोबर दासूच्या बाबतींत पहिला फरक झाला तो हा कीं त्याचा पोशाक बदलला. रमाबाईंच्या घरीं त्याच्याच वयाचा एक कोंकणी मुलगा कामाला होता. त्याच्या पोशाकाप्रमाणें निळी शॉर्ट, कातडी पट्टा व पांढरा शर्ट दासूला मिळाला. आतांपर्यंत फाटकं जाकीट व मळकी लंगोटी यावर दासूनें दिवस काढले. हा नवीन पोशाक घातल्यावर आपण कोणीतरी आहों असें त्याला वाटूं लागलें. मुंबईत आल्यावर त्याच्या डोक्यावरच्या केसांना नीट आकार देण्यांत आला. रमाबाईनीं त्याला चांगली ऊन पाण्याची आंघोळ घातली. त्याला नवीन पोशाक करून दिला त्याबरोबर त्याच्या घरीं कामाला असलेल्या गणूपेक्षांहि दासू एक कांकणभर जास्त हुशार व तरतरीत दिसूं लागला. या नवीन वातावरणांत दासूचा नूरच अगदीं बदलून गेला. पण दासूंत व गणूंत किती तरी फरक! गणू चुटचुटीत, बोलका होता. शहरची हुशारी त्याच्या डोळयांत नाचत होती. रमाबाईच्या तान्ह्या मुलीला तो सांभाळी, मुलींना शाळेंत पोचवी, संध्याकाळीं रमाबाईच्याबरोबर फिरायला जाई व त्यांच्या तान्ह्या मुलीची हातगाडी ढकली. गणूचीं हीं मुख्य कामें होतीं. याशिवाय बाकीच्या वेळांत रमाबाईच्या हाताखालीं किरकोळ कामें तो करी.

दासू ज्या वातावरणांत वाढला तें याच्या अगदीं उलट होतें. त्याचें आतांपर्यंतचें जीवन भिऊन मरण्यांतच गेलें. प्रत्येकाची त्याला भीति वाटे. पांडोबाच्या घरीं त्याच्या बायकोनें त्याला छळलें. कधीं सुखाचा घास त्याला खाऊं दिला नाहीं. किंवा कधीं ममतेनें त्याच्या पाठीवर हात फिरवला नाहीं. त्याच्याशीं ती प्रेमाचे दोन शब्दहि बोलली नाहीं. विसूभाऊंच्या घरीं तर त्यापेक्षांहि त्याला जास्त वाईट अनुभव आला. विसूभाऊच त्याला क्षणोक्षणीं हिडिस फिडिस करून वागवीत होते मग इतर कोण त्याच्याशीं ममतेनें वागणार? सगळेंच वातावरण त्याच्या विरुद्ध. असे दोनचार दिवस नसत कीं त्याला कांहीं शिक्षा किंवा मार मिळाला नाहीं.

गणूचा दिनक्रम पाहिल्यावर दासूला आपल्या आयुष्यांतल्या सगळ्या गोष्टी आठवल्या. गणू किती भाग्यवान्! मुंबईला आल्यापासून त्यानें गणूला रडतांना कधीं पाहिलें नाहीं. साऱ्या घरांतल्या माणसांचा तो लाडका बनला होता. रमाबाईच्या मुलांत तोहि एक, असेंच त्याला वागविण्यांत येत होतें. क्वचित एकादे वेळीं रमाबाई त्याला रागें भरीत. रमाबाईंचे पति अप्पासाहेब यांचा व गणूचा कधीं फारसा संबंध येत नसे. गणू किती सुखी! तो रमाबाईकडेच दोन्ही वेळां जेवत असे व शिवाय त्याला महिन्याला तीन रुपये पगार मिळे. दोन्ही वेळेला जेवल्यावर गणूला पैसे काय करायचे? दासब्याला मोठें आश्चर्य वाटे. गणूचे हे पैसे त्याचा बाप घेऊन जाई व ते तो आईकडे कोंकणांत पाठवी. गणूनें दासूला ही गोष्ट सांगितली. गणूचे पैसे त्याच्या आईला मिळतात! आई! आई! गणू आपल्या आई संबंधानें किती तरी

गोष्टी सांगे. आपल्याला कोठें तशी आई आहे? दासूच्या मनांत येई. पांडोबाच्या घरीं दासू लहानाचा मोठा झाला. पांडोबाची बायको घरांत होती पण ती आपली आई आहे असें दासूला कधीं वाटलें नाहीं.

आपली आई असेल? असेल तर कुठं असेल? आपल्याला आई नाहीं म्हणून आपल्याला पगार मिळत नाहीं. आई असती तर तिच्याकडे पाठविण्याकरतां आपल्याला खात्रीनें पगार मिळाला असता. पगाराचा व आईचा संबंध त्यानें अशा रीतीनें जोडला होता. मुंबईला आल्यानंतर पहिले तीन चार दिवस त्याला थोडा संकोच व भय वाटलें. पण रमाबाईच्या प्रेमळ वागणुकीमुळें तोहि त्यांच्या मुलांत मिसळून गेला.

रविवारचा दिवस होता. अप्पा घरींच होते. वामकुक्षी आटोपून ते दिवाण-खान्यांत आले होते. रमाबाईंची सर्वात मोठी मुलगी कुसूमहि तेथें आली. तिनें आजच्याकरतां आपल्या मैत्रिणींच्या घरीं जाऊन फोनोच्या नवीन प्लेटी आणल्या होत्या. त्यांपैकीं एक प्लेट तिनें लावली. दिवाणखान्यांत सर्व मंडळी हळूंहळूं जमा होऊं लागली. नेहमींच्या परिपाठाप्रमाणें कुसूमच्या बाईहि आल्या होत्या. सुभद्राबाई मुंबईस आल्या त्याच्या दुसरे दिवशीं वत्सलाबाई कुसुमला शिकविण्याकरतां आल्या त्या वेळींच रमाबाईनीं सुभद्राबाईंना त्यांचा परिचय करून दिला होता. वत्सलाबाई वयानें तरुण असल्या तरी मनानें पोक्त असल्याचा अनुभव सुभद्राबाईंना त्याच्याशीं एकदोन वेळां झालेल्या भेटींत आला होता. वत्सलाबाई आल्या व सुभद्राबाईच्या जवळच बसल्या. दोनतीन प्लेटी लावून झाल्या.

‘पुरे झाल्या आतां प्लेटी.’ वत्सलाबाई कुसूमला उद्देशून म्हणाल्या. ‘परवां आपल्या शाळेच्या ग्यादरिंगच्या वेळीं तूं जें भाषण म्हणून दाखविलंस तें म्हण पाहूं.’ त्यांनीं आणखी सूचना केली.

‘अप्पांकरतांच म्हणायचं कीं नाहीं? बाकी सर्वांनीं तें ऐकलं आहे. ग्यादरिंगच्या वेळीं अप्पांनीं कां येऊं नये! मुलींच्या शाळेचं ग्यादरिंग म्हणजे त्यांना यःकश्चित्‌ ...’

‘पुरे झालं! किती बडबडी आहेस!’ कुसुमला मध्येंच बोलतां बोलतां वत्सला-बाईनी दाबलें. ‘एकदां तोंडाचा पट्टा सुरू झाला म्हणजे थांबायची म्हणून नाहीं. असेल त्यांना त्या वेळीं कांहीं काम. पण तुझ्या मावशींनीं कुठं तुझं भाषण ऐकलं आहे? कर सुरू कर’ बाईनीं कुसूमला आज्ञा केली.

‘माईकरतां मी अवश्य म्हणेन. अप्पांनीं मात्र तें ऐकतां कामा नये.’

‘बरं बुवा, तूं आपल्या मावशीकरतां म्हणून दाखव, आम्ही आपले कानांत बोटं घालून बसूं’ असें म्हणून अप्पांनीं खरोखरीच कानांत बोटें घातलीं.

'अप्पांनीं भाषण ऐकायचं नाहीं तेव्हां त्यांनीं कानांत बोटं घातलीं. आम्ही सगळ्यांनीं तुझं भाषण ऐकलंच आहे. आम्हांला तर तें ऐकायचंच नाहीं. तेव्हां घाला रे सगळे कानांत बोटं. फक्त माईना व तिच्या बरोबर आलेल्या दासूला व मालीला तिचं भाषण ऐकूं दे.' कुसुमचा धाकटा भाऊ शरद् हुकुमी आवाजांत बोलला.

'मग काय कुमूताई ! सर्वांनीं कानांत बोटं घालायचीं ? ' गणूनें सवाल केला.

कुसूम खट्टू झाली. ती कांहीं तरी बोलणार इतक्यांत वत्सलाबाई म्हणाल्या,

'कोऽऽणी कानांत बोटं घालणार नाहींत. सगळे ऐकतील. नका अशा नाराज नका होऊं कुमाताई, बोला, सुरूं करा. '.

कुसूमनें आपल्या गोल पातळाच्या पदराचें टोक कमरेला खोवलें. सर्वांच्या मध्यें ती उभी राहिली. कुसूम लाल किनारीचें पांढरें शुभ्र पातळ नेसली होती. तिचें वय बारातेरा वर्षांचें होतें तरी ती पंधरासोळा वर्षांच्या मुलीसारखी उंच व उफाड्याची दिसत होती. पिवळ्या छटेनें युक्त असें तिचें गोरेंपणे होतें. रुंद व कपाळांतून सरळच्यासरळ उमटलेल्या तिच्या नाकामुळें व काळ्याभोर कमानदार भिवयांमधून चमकणाऱ्या तिच्या तेजस्वी तरतरीत निळ्या डोळ्यांमुळें तिचा चेहरा थोडासा उग्र दिसत होता. तरी ती बोलूं लागली म्हणजे बाहेर दिसणाऱ्या शुभ्र दंतपंक्तींनीं व तिच्या गालांवर उमटणाऱ्या खळग्यांनीं तिच्या चेहऱ्यांत मार्दवहि उत्पन्न केलें होतें. तिच्या काळ्याभोर केसांच्या दोन लांब शेपट्यांपैकीं एक शेपटा उजवीकडे पुढल्या बाजूनें तिनें सोडला होता. भाषण करण्याकरतां ती सर्वांच्या मध्यें उभी राहिली व त्यांचें मन तिनें आपल्याकडे आकर्षित केलें.

'भाषण संपल्यावर मी "इन्किलाब" म्हणेन. मग तुम्हीं सर्वांनीं "झिंदाबाद" म्हटलं पाहिजे बरं का !' कुसुमनें सर्वांना बजावलें.

'हो, हो तर, मी म्हणेन झिंदाबाद ! ' शरद्‌कडून होकार मिळाला. कुसुमनें आपली मर्मभेदक निळी दृष्टी फिरविली व भाषणास प्रारंभ केला:—

"आम्ही सोशालिस्ट आहों. याचा अर्थ असा कीं आम्ही खासगी मालमत्तेचे शत्रु आहों. या खासगी मालमत्तेनें समाजांत फूट पाडली आहे. एकमेकांविरुद्ध सशस्त्र होऊन लढण्यास तिनें लोकांना प्रवृत्त केलें आहे. खासगी मालमत्तेनें असत्याचें स्तोम माजविलें आहे.असत्य, ढोंग,मत्सर इत्यादि दोषांनीं समाजाला भ्रष्ट करून सोडलें आहे. श्रीमंत होण्याचें एक साधन म्हणून जो वर्ग माणसाचा उपयोग करतो त्याचें हें वर्तन माणुसकीविरुद्ध आहे असं आम्ही समजतों. असा वर्ग आमचा शत्रु आहे. त्याच्या नीतिकल्पनांशीं आम्ही समरस होऊं शकत नाहीं. या वर्गानें शारीरिक व नैतिक दृष्ट्या माणसाला गुलाम बनविलें असून त्याच्या विरुद्ध आम्ही पदोपदीं लढत राहूं. आम्ही कामगार आहों. प्रचंड यंत्रांपासून ते लहान मुलांच्या खेळण्यापर्यंत सर्व वस्तु ज्यांच्या

श्रमानें निर्माण होतात तीं माणसं आहों. आपले हेतु साध्य करण्याकरतां वरच्या वर्गाचे लोक आम्हाला राबायला लावतात म्हणून सर्व सत्ता बळकावतां येईल असें स्वातंत्र्य आम्हाला पाहिजे आहे. आम्ही क्रांतिकारक आहों. जोंपर्यंत खासगी मालमत्ता अस्तित्वांत आहे, कांहीं लोकांनीं फक्त हुकूम करावे व कांहींनीं फक्त राबावें असें जोंपर्यंत चालू आहे तोंपर्यंत आम्ही क्रांतिकारकच राहूं. आम्ही कामगार लोक विजयी होऊं. आमची शक्ति जिवंत आहे. अखिल कामगारवर्गाच्या प्रबल सामर्थ्याच्या जाणिवेनें ती सारखी वाढत आहे. श्रीमंत वर्गाचें प्रत्येक कृत्य शिक्षेला पात्र आहे. कारण जनेतेला गुलाम करणें हाच त्याचा हेतु. श्रीमंत वर्गानें तुकडे तुकडे केलेल्या जगाचें ऐक्य करून त्याचा प्रचंड गट निर्माण करण्याचें कार्य सोशालिझम करीत आहे. "

ठरल्याप्रमाणें कुसूमनें 'इन्किलाब' ची तीनदां घोषणा केली व प्रत्येक वेळीं वाढत्या संख्येनें तिच्या श्रोत्यांनीं 'झिंदाबाद' म्हणून साथ दिली. जयजयकार संपल्यावर विजयी मुद्रेनें कुसुमनें सर्वांकडे पाहिलें व आपल्या काळ्याभोर लांब शेपट्याच्या टोकाशीं असलेला लाल झुबका आपल्या उजव्या हाताच्या तर्जनीभोंवतीं ती फिरवूं लागली. कोणाकडून आतां आपलें अभिनंदन होतें हें पाहण्याकरतांच जणूं काय तिचे निळे टपोरे डोळे सर्वांच्या नजरेला नजर भिडवीत होते.

गंमत अशी झाली कीं गणू एकाएकीं उठून उभा राहिला. 'कॉमरेड कुसूम झिंदाबाद' अशी त्यानें घोषणा केली व व त्यानंतर 'कॉमरेड कुसूम लाल सलाम' असें म्हणून आपल्या हाताची मूठ वळवून व ती उंच उभारून कुसूमला त्यानें लाल सलामहि दिला. गणूच्या या कृत्यानें सर्वांचे डोळे त्याच्याकडे आकर्षित झाले. गणूचें हें कृत्य पाहून शरदनेंहि 'कॉमरेड कुमाताई लाल सलाम' असें म्हणून गणूचें अनुकरण करण्याचा प्रयत्न केला.

'वाहवा, वाहवा, कुमाताई, नाहीं—कामरेड कुमाताई, तुम्ही तर फारच बहार केली.' असें आप्पा म्हणाले.

कुसुम पुन्हां ग्रामोफोनच्या स्टुलापाशीं गेली व पुन्हां प्लेटींशीं चाळवाचाळव करूं लागली.

'एवढ्या प्रोग्रामनंतर आतां तुझ्या प्लेटी कोणी ऐकणार नाहीं.' बाई कुसुमला उद्देशून म्हणाल्या व फोनोची पेटी बंद करण्यास त्यांनीं तिला सांगितलें. 'का हो, वत्सलाबाई,' अप्पासाहेब बोलूं लागले. 'तुम्ही आमच्या मुलांना हेंच शिकवतां वाटतं ? आमचं सगळं घर कम्युनिस्ट बनविण्याचाच तुमचा विचार दिसतोय.'

'होय, असं दिसतंय खरं.' रमाबाईंनीं आपल्या पतीला साथ दिली.

‘ काय ग, ताई,’ सुभद्राबाईंची जिज्ञासा जागृत झाली. ‘ हे कम्युनिष्ट--कम्युनिष्ट कोण ग हे लोक आहेत ? परवां आमच्या सोनगांवांत एक हरिदासबुवा आले होते ते असंच कांहीं म्हणत होते व या कम्युनिष्टांना शिव्या देत होते. ते समाजबुडवे आहेत, त्यांना देव नाहीं, धर्म नाहीं, ते बंडखोर आहेत, आणिक काय तर ते समाजाची उलथापालथ करणार आहेत, असंच कांहींबाहीं ते सांगत होते. माझ्या बाई तें कांहींच लक्षांत आलं नाहीं. ’

‘ बरं आतां तरी कांहीं तुम्हाला कळलं का ? इतकं मोठं भाषण आमच्या कामरेड कुसुमनं केलं त्यांतलं तरी कांहीं तुम्हांला कळलं का ? ’ अप्पांनीं मध्येंच तोंड घातलें.

‘ अन् पुन्हां हे कामरेड, मला काय कळलं तें मी मग सांगेन. पण पहिल्यांदां हे कम्युनिष्ट व कामरेड काय तें मला सांगतां का वत्सलाताई ? ’

‘ वत्सलाताई कशाला ? मीच सांगतों .’ अप्पा म्हणाले. ‘ जे लोक असल्या प्रकारचीं भरमसाट व अर्थहीन बोलणीं बोलतात त्या लोकांना आमच्या या मुंबईत कम्युनिष्ट व कामरेड असं लोक म्हणूं लागले आहेत. ’

‘ काय म्हणालांत ? अर्थहीन ? कुमीच्या भाषणांतलं सगळं कांहीं मला समजलं नाहीं पण पुष्कळसं समजलं. ’ सुभद्राबाईंनीं उत्तर दिलें.

अप्पांच्या डोळ्यांत आश्चर्य चमकूं लागलें व त्यांच्या चेहऱ्यावर कौतुकाच्या रेषा उमटल्या.

कुसुमच्या भाषणानंतर वडिल मंडळींतच कडाक्याचा वाद सुरु झाल्यावर रविवारच्या या कार्यक्रमांत हजर असलेले बालश्रोते साहाजिकच पेंगूं लागले व कांहीं तर जागच्याजागींच झोंपींहि गेले.

कुसुम मात्र फोनोच्या स्टुलाजवळच्या खुर्चीवर बसून कान टवकारून हा वाद-विवाद ऐकत होती.

‘हो, हो, पुष्कळच समजलं.’ सुभद्राबाईंनीं बोलायला आरंभ केला. ‘श्रीमंतांना माणुसकी नसते. गरिबांना ते राबवितात. त्यांना छळतात. श्रीमंत लोक गरिबांचे शत्रु आहेत. श्रीमंत लोक आपल्या हाताखालीं काम करणारांना गुलामा सारखे वागवितात. त्यांना गुलाम करतात, श्रीमंत लोकांना शिक्षा केली पाहिजे. आणखी काय बरं, खरंच हे खासगी जमीन जुमला असणारे लोक कामगारांना नको आहेत. का हो वत्सलाताई, असंच ना ? ’ सुभद्राबाईंनीं असें विचारीत चौकस दृष्टीनें पाहिलें.

‘ तुम्हांला कांहीं कळलं नसेल असं मला सुद्धां प्रथम अप्पांच्या सारखं वाटलं होतं पण तुम्हाला बरंच समजलं कीं ! ’ वत्सला म्हणाली.

अप्पासाहेब तर सुभद्राबाईंचें हें भाष्य ऐकून गारच पडले.

आपली ही खेड्यांत राहणारी बहीण इतकी बोलायला शिकली कुठं असें रमाबाईंना वाटून त्याहि आश्चर्यचकित झाल्या.

'अहो, त्या भाषणांत न समजण्याजोगं आहे काय ? त्यांतले मोठे मोठे भारदस्त शब्द मला कळले नाहींत पण त्यांचा मतलब सर्व समजला. तो तर आमच्या रोजच्या अनुभवांतलाच आहे. एक गोष्ट मात्र समजली नाहीं. काय बरं तें, हो, कुसुम, काय ग तें ? "आम्ही क्रांतिकारक आहों" "सर्व सत्ता का काय ती बळकावली पाहिजे," हेंच काय तें थोडं मला समजलं नाहीं.'

'समजेल, समजेल, तेंहि समजेल.' अप्पा म्हणाले. 'सगळा स्वैपाक करायचं समजलं फक्त जेवायचं कसं, वाढून घ्यायचं कसं हें समजलं नाहीं असं म्हणण्यासारखंच आहे हें !'

'काय पण छान उपमा !' वत्सला उद्गारली.

'एकंदरींत काय, चागलं करतां आहां वत्सलाबाई, आमचं घरदार तुम्ही कम्युनिस्ट बनवीतच आहां, अन् सुभद्राबाईच्या खेड्यांतल्या वाड्यापर्यंतहि तुमचे हात पोचलेले आतां दिसत आहेत.'

'वाड्यापर्यंत कसले हात पोंचले !' इतक्या वेळ गप्प असलेल्या रमाबाई बोलल्या. 'आपल्या रोजच्या अनुभवांतल्या गोष्टींतलं मर्म माणसाला कळलं तर त्यांत बिघडलं कुठं ? आपण कोण आहों, काय करतों आहों, माणूस माणसावर कसा अधिकार गाजवितो आहे, कांही माणसं श्रीमंत व कांहीं त्यांचीं गुलाम हे ज्याला समजलं तोच कम्युनिष्ट अन् आणखी काय कामरेड असेल तर त्याच्याबद्दल भ्यायचं किंवा त्याला नांवं ठेवायचं कारण काय ?'

'वा वा काय पण छान बोललांत ! अप्पांनाच आतां विचारा कीं, ते इतके कम्युनिस्टांना का भितात ?' वत्सला मध्येंच बोलली.

'मला भ्यायचं काय कारण ? मी काय सुभद्राबाईंच्या मंडळीसारखा सावकार नाहीं किंवा जमीनदार नाहीं किंवा मी कोणी बडा कारखानदारहि नाहीं. सुभद्राबाईंना जें समजलं नाहीं त्यांतच कम्यूनिस्टांबद्दल वाटणारं भय सांठविलेलं आहे. कम्युनिस्टांना आपल्या हातांत सत्ता पाहिजे. काय करण्याची सत्ता पाहिजे तर या सावकारांच्या व जमीनदारांच्या हातांत गेलेल्या जमिनी व कारखानदारांच्या हातांत असलेले कारखाने आपल्या हातांत घेण्याची सत्ता पाहिजे आणि या सत्तेच्या, आलटापालटीलाच ते क्रांति म्हणतात......'

‘ मग यांत तरी मिण्यासारखं काय आहे ?’ अप्पांचें बोलणें संपण्याच्या आंतच सुभद्राबाई बोलूं लागल्या. ‘आपल्या हातांत म्हणजे काय काम करणाऱ्यांच्या, राबणाऱ्यांच्या हातांतच ना ? मग त्यांत काय बिघडलं ?’

‘ कां, इथपर्यंतहि तुमची तयारी झाली आहे म्हणायची !’ अप्पा उद्गारले.

‘ म्हणजे ? मला नाहीं समजलं !’

‘ सुभद्राबाई, मला हेंच तर सांगायचं आहे. अहो हें तत्वज्ञान समजायला तसं अवघड नाहीं पण त्याच्या अंमलबजावणीची कल्पना मनांत आली कीं श्रीमंतांच्या अंगावर कांटा उभा राहतो. अन् म्हणूनच तर हे सत्ता बळकावणारे, क्रांति करणारे कम्यूनिष्ट कामरेड श्रीमंतांना नको आहेत व याकरतांच ते या लोकांची हेटाळणी व नालस्ती करीत फिरत असतात.’

‘ अन् म्हणूनच तो श्रीमंतांच्या बिदागीवर पोसला जाणारा तुमच्या गांवांत आलेला हरिदास कम्युनिस्टांची निंदा बायकांच्या पुढं करीत असतो.’ वत्सला बोलली.

‘ असं कुणी कांहीं केलं म्हणून मला तर मुळींच भय वाटायचं नाहीं. आज तरी मरस्तोवर राबावं लागतंच कीं, यापेक्षां तुम्ही क्रांति का काय म्हणतां ना, ती झाल्यानंतर राबावं लागलं तर ते राबणं निदान अंगीं तरी लागेल.’

‘ बस्स, बस्स,कमाल केलीत तुम्ही सुभद्राबाई ! प्रत्यक्ष दुसऱ्याकरतां राबून मरणाऱ्या माणसाला कम्युनिझम शिकवावा लागत नाहीं असं कामरेड लोक म्हणत असतात तें तंतोतंत खरं आहे. पण सुभद्राबाई, तुमच्या सारख्या व्यक्तीचा हा प्रश्न नाहीं. समाजाचा प्रश्न आहे. समाजांतील एका विशिष्ट वर्गाचा प्रश्न आहे.’ अप्पांनीं आपलें बोलणें संपविलें. आणि रमाबाईनींहि आतां हा वादविवाद थांबविण्याची सूचना दिली. ‘ वत्सलाबाईंना ट्राम मिळायला पाहिजे,’ त्या म्हणाल्या.

‘ काय ग, धिटुकले, तूं ग काय इतकं ऐकत बसलीस ?’ वत्सलाबाईनीं कुसुमचा गालगुच्चा घेतला.

‘ काय हो बाई, आमचे अप्पा सुद्धां कम्यूनिस्ट झाले कीं !’

‘ अप्पा ! ! कधींच कम्यूनिस्ट व्हायचे नाहींत. वेडी पोर कुठली !’

‘ म्हणजे !’

‘ तुला तें समजायचं नाहीं.’ असें बोलून वत्सलाबाई दिवाणखान्यांतून बाहेर पडल्या.

# ६

पौर्णिमेचा चंद्र चांगला वर आला होता. वत्सला अप्पासाहेबांच्या घरांतून बाहेर पडून रस्त्यावर आली. शुभ्र चांदणें जिकडेतिकडे पसरलेलें पाहून तिचें आधींच उल्हसित झालेलें मन अधिकच उल्हसित झालें. लगेच तिला ट्रॅम मिळाली. तिला वाटला तितका उशीर झालेला नव्हता. ट्रॅममध्यें स्त्रियांच्या सीटवर ती सरळ जाऊन बसली. एक चांगली प्रौढ ख्रिश्चन स्त्री त्याच जागेंत बसली होती तिच्या समोरच वत्सलाहि जाऊन बसली. ही ख्रिश्चन स्त्री थोडीशी काळीसांवळी, थोडीशी उतारवयाला लागलेली, अशी होती. पण तिचा तो अगदीं अंगाबरोबरचा पोशाख पाहून वत्सलेला थोडी गंमतच वाटली. कमर, पोट, उरोभाग यांचा आकार पाहणाराच्या डोळ्यांना अगदीं स्पष्ट दिसेल अशा रीतीनें अंगावर ताणूनताणून कपडे चढविण्याची ही वाढत चाललेली फॅशन बरी आहे का, असा एक विचार तिच्या डोक्यांत येऊन गेला. करड्या रंगाच्या केसांनीं तिच्या कुरळ्या भरदार केसांची शोभा घालविण्यास सुरुवात केली होती. तिचे केस बॉब केलेले होते तरी चेहरा खुलून दिसेल अशा तऱ्हेनें तिनें आपल्या केसांची रचना केली होती व डोक्यावर उजव्या बाजूला एक चकचकीत रेशमी लाल फीत तिनें अडकविली होती. आतां ही केस पांढरे होत चाललेली, अंग सुटत चाललेली स्त्री कोणाला आकर्षित करणार होती ?

जाऊं दे की, आपल्याला काय करायचंय या दुसऱ्यांच्या पोषाखांच्या पद्धतींचा व नट्टापट्टयाचा विचार करून ? असें ती आपल्या मनांत सांगत होती इतक्यांत दारू पिऊन झिंगलेले तीन पुरुष एका स्त्रीला पुढें घालून ट्रॅमच्या बाजूनेंच ट्रॅममध्यें घुसले व ट्रॅमच्या अगदीं कडेच्या बाकांवर ही चौघेजण जाऊन बसली. सिनेमांतील स्टारलाहि मागें पाडील असा भपकेदार पोषाक या स्त्रीनें केला होता. लिपस्टिकनें तिनें आपले ओठ रंगविले होते: तिच्या गालावरील कृत्रिम लालीहि तिचा चेहरा खुलवीत होती; पण या लालीतच तिच्या टपोऱ्या डोळ्यांत चढत असलेल्या लालीनें आणखी भर टाकली होती. बरोबर असलेल्या पुरुषांप्रमाणें तिनें थोडी दारू झोंकली होती हें स्पष्टच दिसत होतें. या चोघांनी ट्रॅममध्यें पाऊल टाकल्याबरोबर सर्व पॅसेंजरांचे डोळे या चौकडीनें आकर्षित केले व त्यांच्यांत कांहीं कुजबुजहि सुरू झाली. विशेषतः त्या स्त्रीनें—फारशी सुंदर नव्हती ती—पण सर्वांचेच डोळे व मन आकर्षिलें होतें. काय झालें कोणास ठाऊक, ट्रॅमचा दुसरा स्टॉप येण्यापूर्वीच ती

स्त्री आपल्या जागेवरून उठली व 'चलो टॅक्सी देखो!' असें म्हणून ट्रॅममधून उतरण्याकरतां ती सज्ज झाली. 'चलो चलो!' त्या तिघांपैकीं भय्याचा पोषाक केलेल्या इसमानें दुजोरा दिला. ट्रॅम थांबते न थांबते तोंच ही चौकडी ट्रॅममधून मोठ्या मुष्किलीनें उतरली. ट्रॅमच्या पायरीवरून उतरतांना तिच्या बरोबरच्या भय्यानें तिच्या दंड्याला धरून तिला सांवरून धरली.

ही स्त्री वेश्या तर खासच होती. काय हा व्यवसाय? केवळ पोटाची खळगी भरण्याकरतांच म्हणून या बाईनें हा धंदा पतकरला असेल का? कुणी सांगावें काय खरें असेल तें. वत्सलेच्या डोक्यांत विचार येऊन गेले. ट्रॅम एका सिनेमागृहावरून चालली होती. इंटरव्हलकरतां लोक बाहेर पडले होते. पान-विड्यांच्या दुकानांवर लोकांची गर्दी लोटली होती. पान तंबाकूवाल्या दुकानदारानें एका तरुण जोडप्याच्या हातांत दोन त्रिकोणी पट्ट्या दिल्या व त्या दोघांनीं एकमेकांकडे पाहत व हंसत त्या आपल्या तोंडांत कोंबल्या. या दृश्यानें सिनेमागृह ओलांडतां ओलांडतां तिचें लक्ष वेधून घेतलें.

याच्या पुढच्या स्टॉपवरच वत्सला ट्रॅममधून खालीं उतरली. ज्या चाळींत वत्सला राहात होती ती चाळ येथून फार लांब नव्हती. तिनें आपल्या खोलीचें दार उघडलें. विजेच्या बत्तीचा स्विच तिनें खालीं दाबला. प्रकाश पडला पण तो मंद शांत निळसर असा प्रकाश पडला.

अप्पासाहेब मौने यांच्या घरांतून बाहेर पडतांना जो उल्हास वत्सलेला वाटला होता तो आतां मावळला होता. तिथें झालेला वादविवाद चांगला रंगांत आला व तिच्या मनाप्रमाणें त्या वादाचा शेवट झाला म्हणून तिचें मन उल्हसित झालें होतें. सुभद्राबाई घरची चांगली श्रीमंत होती पण तिनें कशी अगदीं बरोबर उत्तरें दिलीं हें पाहून तिच्या मनाला बरें वाटलें होतें. 'आज तरी मरस्तोंवर राबावं लागतंच कीं!' असं सुभद्राबाई कां म्हणाल्या? स्वतःच्या अनुभवाशिवाय त्या कांहीं असं बोलणार नाहींत. एवढी दागिन्यांनीं मढलेली बाई असं कां बोलते याचें वत्सलेला थोडें आश्चर्य वाटलें. पण सुभद्राबाई बोलल्या तें बरोबर बोलल्या व अप्पासाहेबांना त्यांनीं निरुत्तर केलं याचेंच समाधान वत्सलेला वाटलें व याच उल्हासांत ती त्यांच्या घरांतून बाहेर पडली. पण ट्रॅममधून घरीं येतांना जीं दोन तीन दृश्यें तिच्या लक्षांत राहिलीं त्यांमुळें तिचें मन व्यग्र झालें. फॅशनला बळी पडलेल्या त्या लठ्ठ ख्रिश्चन बाईबद्दल तिला कींव वाटली. फॅशनलाच केवळ ती बळी पडली नव्हती तर स्त्री जातीच्या नटवे-पणा करण्याच्या वृत्तीला ती बळी पडली हें पाहून तिला त्या बाईबद्दल जास्तीच कींव वाटली. एरवीं असा नटवेपणा करून ही काळी लठ्ठ बाई कोणत्या पुरुषाला आतां आपल्या प्रेमपाशांत अडकवायला निघाली होती!

यापेक्षांहि तीन पुरुषांनीं आपल्याबरोबर चालविलेल्या त्या सुंदर वेश्येबद्दलच्या विचारांनीं तिचें अंतःकरण जास्त दुखविलें. केवळ विषयवासना पुरविण्यासाठीं ही स्त्री त्या धटिंगणांच्या स्वाधीन झाली होती! छे! तें शक्यच नाहीं. आपलें शरीर कोणाच्याहि स्वाधीन करावें व त्यावर आपलें जीवन चालवावें, त्यांतच करतां येईल तेवढी चैन करावी! यामा कादंबरींतील अनेक पात्रें तिच्या मनांत येऊन गेलीं. तीन धटिंगण तर या बाईच्या मागें होतेच. या रात्रींत ते तिला कुठं घेऊन चालले होते व आणखी किती लोकांच्या विषयलालसेला ती बळी पडणार होती कुणाला ठाऊक? 'काल रात्रीं सोळा लोकांच्या ताब्यांत मला जावं लागलं.' यामामधील एका तरुण वेश्येचे शब्द तिला आठवले व तिच्या अंगावर शहारे आले. किती हें भयंकर जीवन! स्त्री जातीचा हा अपमान नाहीं का? स्त्रीला अशा दुर्गतीला कुणी पोचविलं? आजच्या समाजरचनेनंच ना? या समाजरचनेविरुद्ध सर्व स्त्री जातीनं बंड करून उठलं पाहिजे व तिचा अगदीं मागमूसहि ठेवतां कामा नये. संतप्त झालेलें तिचें बंडखोर मन तिला सांगूं लागलें.

तिसऱ्या दृश्यानं मात्र तिच्या विचारांना अगदीं निराळेंच वळण लावलें. ऐन तारुण्यांत असलेल्या तरुणतरुणींनीं एकमेकांकडे हंसत हंसत पाहून विडे तोंडांत घातले. आपणहि एकदां अशाच मजा करीत होतों ना! या विचारांच्या तंद्रींत असतांनाच ती आपल्या खोलींत आली व खोलींतल्या मंद प्रकाशानें तिच्या उदासीनतेंत आणखी भरच टाकली. या प्रकाशाचा तिला राग आला. या दिव्याची चावी तिनें फिरविली व लिहिण्यावाचण्याकरतां लावीत असलेल्या चकचकीत बत्तीचें बटण तिनें दाबलें. खोली चक्क शुभ्र प्रकाशानें भरून गेली पण तिच्या हृदयांत असल्या चकचकीत सफेत प्रकाशाला वाव नव्हता. असल्या मनःस्थितींतच ती आंतल्या खोलींत गेली. तिथलीहि वीजबत्ती तिनें चालू केली. तिनें हातपाय धुतले, चुळांवर चुळा भरल्या, डोळ्यांना पाणी लावलें. नेसतें पातळ तिनं बदललें. नीट घडी करून तिनं तें कपाटाच्या खणांत ठेवलें. निजायची तयारी तिनें केली. खोलीचे दरवाजे लावून घेतले. गादी साफसूफ करून उशी जागच्याजागीं ठेवली व अंथरुणावर तिनें अंग टाकलें. बत्ती बंद करून टाकावी असें तिला वाटेना. विचारांनीं तिला इतकें भंडावून सोडलें होतें. प्रकाशाची ही सोबत अशीच राहूं द्यावी असें तिला वाटलें. तिनें अंथरुणावर अंग टाकलें खरें, पण असल्या प्रक्षुब्ध मनःस्थितींत तिला झोंप कशी येणार?

'किती निर्दयपणाचं कृत्य आपण केलं!' तिनें आपलें तोंड दोन्ही हातांनीं झांकून घेतलें. 'त्या मजांचा परिणाम शेवटीं काय झाला? बापूंचं म्हणणं मी कां ऐकलं नाहीं. त्यानीं मला कधींच विरोध केला नाहीं. घाई करूं नको एवढंच त्याचं म्हणणं. वसंतच्या गोड गोड शब्दांना मी बळी पडल्यें. त्यानं मला फसविलं तरी मी काय

ठरविलं होतं? नको नको ते विचार. "ठरलं ना आपलं. बापूंना काय वाटतं कुणाला ठाऊक! मित्रे आहेत झालं. त्यांना वाटतं भलतंसलतं कांहीं तरी होईल? असं कुठं होत असतं का? अन् आपलं काय आतां लग्न झाल्यासारखंच आहे. भ्यायचं काय कारण?" एक ना दोन. मी कां फसावं? माझ्या मनावर मी ताबा ठेवूं शकल्यें नाहीं. लग्न झाल्यासारखंच मी त्याच्याशीं वागूं लागल्यें. एकदां, दोनदां, तीनदां, प्रत्येक वेळेला मला भय वाटे. बापूंच्या शब्दांची आठवण होई. पश्चात्ताप होई. पण हें सर्व तितक्या पुरतेंच. वसंत एकांतांत भेटला म्हणजे माझ्या वृत्ति उचंबळून येत. एकच प्याला! सुधाकरसारखी माझी स्थिति झाली. वसंतशीं मोकळपणानं वागण्यांत व त्याच्या इच्छा पुरवण्यांत मला आतां दिक्कत वाटेनाशी झाली. निसर्गाची जणूं आम्हां कसोटीच पाहात होतो. वसंत काय, अगदीं पुरुषांप्रमाणं वागला. त्याला कांहीं कशाचीच पर्वा वाटली नाहीं. जसजशी माझ्या परिस्थितीची जाणीव मला होऊं लागली व ती त्याच्या नजरेस मी आणून दिली, तसे त्यानं सरळ कानावर हात ठेवले. प्रेम! कसलं प्रेम! ज्याच्याकरतां प्रेम करायचं तें तर सफल झालंच होतं. वसंत इतक्या क्षुद्र वृत्तीचा असेल असं त्या वेळेला मला वाटलं नाहीं. पण आतां त्याचा काय उपयोग? एक उपभोग्य वस्तु म्हणून त्यानं मला वापरलं. वसंताचा यात काय अपराध? मी काय केलं? मी चांगली जाणती, शहाणी, शिकलीसवरलेली होत्यें ना! मी त्याला तसं कां करूं दिलं? मी देखील मोहाला, वासनेला बळी पडल्यें. प्रेमापासून आनंद लुटायच्या भरीला मी पडल्यें. आम्ही दोघंहि क्षणिक मोहाला एकदोनदां तीनदां नव्हे कितीकदां तरी बळी पडलों. पण त्यामुळें उत्पन्न झालेल्या जबाबदारीची जाणीव मात्र वसंत विसरला. त्यानं माझ्याकरतां किती पैसे खर्च केले? मला आवडतील त्या वस्तु त्यानं मला आणून दिल्या. किती तरी चित्रपट आम्ही चोरूनमारून पाहिले अन् तेहि बॉक्समध्यें एकांतांत बसून. माझ्या बाबतींत हवं तें स्वातंत्र्य मी त्याला घेऊं दिलं. प्रेमाशिवाय इतर कांहीं नीच वृत्तीनं तो माझ्याशीं असं वागत होता ही गोष्ट अशी अगदीं शेवटीं माझ्या लक्षांत आली. एक उपभोग्य वस्तु म्हणून त्यानं मला वापरलं. उपभोग्य वस्तु! स्त्री ही उपभोग्य वस्तु! ही कल्पना सुद्धां किती असह्य आहे?

वत्सला ताडकन् अंथरुणावरून उठली व खोलींत येरझाऱ्या घालूं लागली. इतक्यांत कोणीतरी मोठ्यानं हंसलें. आपल्या या गोंधळलेल्या मनःस्थितीकडे पाहूनच कोणीतरी हंसत असेल का, असें तिला वाटलें.

रविवारची रात्र. वत्सला ज्या चाळींत राहत होती तिच्या समोरील चाळींतल्या जॉली क्लबांत हा हंशा चालू होता. एकजण हंसल्याबरोबर इतरहि मंडळी हंसली. वत्सला अधिकच गळून गेली. 'सारेच लोक मला हंसतात. माझ्या मनांतले हे विचार

असेच हेंशावारी नेण्यासारखे आहेत असेंच जणूं काय हा हंशा मला सांगत आहे,' असें तिला वाटलें.

रागारागानें तिनें दोन्ही खोल्यांतल्या बत्त्या विझविल्या व आपल्या कॉटवर तिनें धाडकन आपलें आंग टाकलें.

वत्सला आपल्या मनाशीं यापूर्वी किती वेळां तरी अशी भांडली होती. तिनें डोक्यावरून पांघरूण घेतलें. झोंप आली तर किती बरें होईल. मनाचा जाच तिला असह्य झाला होता.

झोंपगुद्धां नेमकी अशाच वेळीं येत नाहीं. ती स्वस्थ पडून राहिली. कांहीं कांहीं सुद्धां विचार करायचा नाहीं असें तिनें ठरविलें. या प्रयत्नामुळें तिला कांहीं वेळ गुंगी आल्यासारखें वाटलें पण हा कांहीं वेळ म्हणजे कांहीं थोडीं मिनिटेंच.

'केवढें राक्षसी कृत्य मी केलें!' या विचारानें तिच्या मनाचा पुन्हा ताबा घेतला.

'किती गोजिरवाणं होतं तें माझं बाळ! त्याच्या गुलाबी गालावरचा तो गव्हाच्या आकाराचा तीळ! माझ्या बाळाला मी कधींहि विसरूं शकत नाहीं. माझं बाळ जिवंत असेल का? असलं तर तें आतां चांगलं सातआठ वर्षाचं झालं असेल. छे! कुठलं जिवंत असायला? असतं जिवंत तर त्यानं असं मला मुळींच छळलं नसतं. जिवंत माणसं अशीं समंधासारखीं मागं लागून दुसऱ्याचा छळ करीत नाहींत. मी कुठं त्याच्या प्राणांची पर्वा केली होती. काय ती अंधारी रात्र. तसल्या त्या भयंकर काळोखांत रस्ता माहीत नसतांना मी तशीच रानांत शिरल्यें. मला त्याचं कांहींच वाटलं नाहीं. त्या काळ्याकुट्ट अंधारांत काट्याकुट्यांतून ठेंचा खात चालल्यें होत्यें. 'दिवा काकरवाद्भीता रात्रौ तरति नर्मदाम्' (दिवसा कावळ्याची काव काव ऐकली कीं घाबरून जाणारी ललना जाराला भेटण्यासाठीं नर्मदा तरून गेली) असं एका कवीनं म्हटलं आहे. माझं धाडस तशाच प्रकारचं होतं. ती तरुणी जाराला भेटण्याकरतां चालली होती आणि मी! अब्रू बचावण्याकरतां एका निष्पाप पोराची वाताहात लावण्याकरतां चालल्यें होत्यें. त्या देवळाच्या पायरीच्या बाजूला मी तें काळें बोचकं ठेवलं व धूम पळत येऊन पुन्हा स्टेशन गांठलं. कोणाहि वन्य श्वापदाच्या भक्ष्यस्थानीं तें पडलं असेल.

'हें माझं बाळ जिवंत असलं तर!'

तिला प्रकाशाची जरूर वाटूं लागली. ती पुन्हा उठली. तिनें बत्तीचा स्विच दाबला. या प्रकाशाबरोबर तिचे डोळे विस्फारित झाले. 'बाळ जिवंत राहिलं असेल तर!' जितकी रम्य तितकीच ती भयंकर कल्पना होती. बाळ जिवंत राहिलं असेल व त्याची माझी पुन्हा गांठ पडेल तर!' ही त्याच्या पुढची कल्पना तर त्यापेक्षांहि भयंकर. 'काय मी त्या माझ्या बाळाला माझ्याजवळ करीन!'

'कु. वत्सला पंडित बी. ए., एस. टी. सी.' पुस्तकाच्या कपाटावरच्या पट्टीवर लिहिलेल्या या अक्षरांनीं तिच्याकडे जणूं काय टवकारूनच पाहिलें.

'आजच्या परिस्थितींत मी ही गोष्ट करूं शकेन ?'

सवाल केवळ काल्पनिकच होता. पण तो किती गंभीर स्वरूपाचा होता. कल्पना, केवळ कल्पनाच होती ती, पण तिचें मन या कल्पनेनें ग्रासून टाकलें. पुन्हां ती खोलींत झपझप येरझाऱ्या घालूं लागली. पारध्याकडून चोहोंकडून अडविलेला ससा चोहों बाजूंनीं इकडून तिकडे धांवत सुटावा व बाहेर पडण्याची त्यानें धडपड करावी, तशी तिच्या मनाची स्थिति झाली.

'हा माझा मुलगा आहे असं उघडपणें सांगून मी त्याला माझ्याजवळ घेईन ?'

आपल्या पूर्वींच्या घोर कृत्याबद्दलचे विचार या पूर्वीं वारंवार मनांत येऊन ते तिचा छळ करीत असत पण आज डोकें वर काढलेल्या या कल्पनेनें तिची त्रेधा उडवून दिली.

'जिवंत राहिलं असलं माझं बाळ, तर तें कुठं असेल ? चांगला आठ वर्षांचा मुलगा, काय करीत असेल ? कोणाच्या घरीं असेल ? कुणी त्याच्याकडे मायेनं पाहात असेल ? पोराला आई नाहीं म्हणून त्याला कुणी मायेनं कुरवाळीत असेल ? 'आई' म्हणून तें कुणाला तरी हांक मारीत असेल का ?'

एक का दोन, अनेक कल्पनांनीं तिला भंडावून सोडलें. कल्पनांचे धागे ते. विचाराच्या चरख्यावर बसून मन एकदां कल्पनेचें सूत कातूं लागलें म्हणजे त्यांतच तें रममाण होतें. सूत चांगलें पिळदार एकसारखें निघूं लागलें तर त्याला बरें वाटतें. तसें तें निघेनासें झालें तरी चरखा बाजूला टाकायला तें तयार नसतें. धागे मधून-मधून कितीहि तुटले तरी त्याची तें पर्वा करीत नाहीं, तुटलेले धागे पुन्हा पुन्हा जोडून चरखा सुरू ठेवण्यांतच त्याला बरें वाटत असतें. चरख्यांतच कांहीं बिघाड झाला तर मात्र तें त्रस्त होऊन जातें. वरील कल्पना तिच्या मनांत एकामागून एक आल्या.

पण 'मी त्या माझ्या बाळाला जवळ करीन का ?' हा ओबड धागा ओढला गेल्याबरोबर चरख्याची माळच तुटली.

ती भांबावून गेली. विजेचा प्रकाश किती झालें तरी निर्जीव.

इतक्यांत तिच्या दाराची कडी कोणी तरी वाजविली.

'कोण ? बापू ?'

'काय, तूं अजून झोंपली नाहींस ?'

'बापू, तुम्ही कसे अगदीं वेळेवर आलांत.'

'म्हणजे ?'

'सांगेन आतां.' असें म्हणून ती आंतल्या खोलींत गेली.

'मला आतां कांहीं नको. चांगला फराळ करून आलों आहे.'

वत्सलेनें त्यांची निजण्याची सोय करून दिली.

'मग काय, सांगशील का मी कसा वेळेवर आलों तें ?'

'नको आतांच. तुम्ही दमून आलां असाल. तुमचं काम कांहीं झालं का ?'

'हो, हो, झालं तर. चारपांचच तरुण मुलं आहेत, पण तीं फारच उत्साही आहेत. सगळीं शेतकऱ्यांचीं मुलं आहेत हें विशेष आहे. उत्सव, मिरवणूक, परिषद असं एकादं काम ठरलं म्हणजे रात्रदिवस कांहीं पाहाणार नाहींत. रोज दहावीस मैल पायीं हिंडतील. भूक, तहान, थंडीवारा यांची पर्वा करणार नाहींत. पण शिस्तीनं एकच काम हातीं घेऊन तें तडीस जाईपर्यंत त्याच्याच मागं चिकाटीनं लागायचं हें त्यांना माहीत नाहीं.'

'पण हा त्यांचा दोष नाहीं. त्यांच्या डोळ्यांपुढं आजचे पुढारी आहेत त्यांचंच ते अनुकरण करणार.'

'पण ही पद्धति बदलायला पाहिजे. कांहीं तरी भपकेदार काम झालं पाहिजे, एकाएकीं चमत्कार घडून आला पाहिजे असं त्यांना वाटतं. त्यांना ही गोष्ट हळूहळू पटूं लागली आहे. पण तुझं कसं काय चाललं आहे ?'

'राहूं दे तें. मी आतां कांहीं सांगत बसणार नाहीं. तुम्ही आतां झोंपा पाहूं. रात्रंदिवस काम काम.'

'तूं सांगणार असशील मला कंप्लीट रेस्ट घ्यायला. अग, तें मोठ्या लोकांना शोभतं. तेहि मोठे, त्यांचे डॉक्टर तर त्यांच्याहून मोठे. टिळकांनीं नैष्कर्म्याची थट्टा उडविली आहे ती मला फार पसंत पडली. पूर्ण, अगदीं पूर्ण विश्रांति घेण्याचं मी ठरविलं आहे, पण तें एकदांच.'

'भलतंच कांहीं तरी. सारखी गेले पंधरा दिवस तुम्ही पायपिटी चालविली आहे असं मला कालच कळलं. या खेपेला तुम्ही याल तेव्हां आठ दिवसपर्यंत अगदीं कुठं कुठं सुद्धां बाहेर जाऊं द्यायचं नाहीं असं मी ठरविलं आहे.'

'एकंदरींत मला कंप्लीट रेस्ट घ्यायला सांगणार.'

'बापू, बापू, असं कां हो तुम्ही म्हणतां ?' ती गहिंवरून आली. तिनें दोन्ही हात बापूंच्या खांद्यावर ठेवले.

'भलतंसलतं तुम्हांला मी बोलूं द्यायची नाहीं.' तिच्या तोंडांतून पुढें शब्द उमटेनात.

'वत्सी, माझं बाळ !' बापूंनीं वत्सलेला आपल्याजवळ बसवून घेतलें. तिच्या पाठीवरून त्यांनीं हात फिरवला.

'नाहीं, असं बोलणार नाहीं. पण हा म्हातारा...'

'काय तुम्ही बोलणार तें समजलं मला. या बाबतींत तुम्ही माझं ऐकलंच पाहिजे. मी तुम्हाला कुठं जाऊं देणार नाहीं. बरं आतां निजा पाहूं.'

'मला झोपविण्याकरतां थोपटणार आहेस का काय? अंगाई म्हणणार असशील एकादी?'

'खरंच बापू, बोलूं का? म्हातारपण म्हणजे दुसरं बालपण असं म्हणतात तें जरं खरंच असलं अन् त्यानंतर पुन्हा तरुणपण आलं तर इतका पन्नास-साठ वर्षांचा अनुभव गांठीं असलेला पुन्हा 'नवजवान' बनलेला हा तरुण जगाची हां हां म्हणतां उलथापालथ करून टाकील.'

'मग काय मी तरुण व्हावं अशी तुझी इच्छा आहे!'

'मी तरी काय, कांहीं तरीच विषय काढत्यें. तें कांहीं नाहीं. आतां यापुढे बोलायचं नाहीं. बत्ती मालवूं का?'

'ही मोठी आगवाली नको. तो डिम लाईट लाव.'

'मग आतां निजणार ना?'

'लहान पोराला कुणी तरी संभाळलंच पाहिजे.'

'होय, खरं ना!'

वत्सलेनें बापूंच्या अंगावर पांघरूण घातलें. बापूंनीं वत्सलेला डोळे भरून पाहिलें. वत्सला क्षणभर त्यांच्या डोळ्यांकडे पाहात राहिली. प्रेमाची पाखर! बापूंच्या या गोड प्रेमाच्या छायेखालींच वत्सला लहानाची मोठी झाली होती.

बापू आल्यावर वत्सलेला हायसें वाटलें. बापू दोनचार मिनिटांत घोरूंहि लागले. त्यांच्या बाबतींतला हा एक विशेष होता. झोंपायचें ठरल्यावर बापू चटकन् झोंपून जात. बापू स्वभावतःच झोंपाळू. पाठ जमिनीला लागली कीं निद्रा त्यांना आपल्या कबज्यांत घेत असे. पत्नी वारल्यानंतर अगदीं खास प्रेमाचें माणूस त्यांना कोणी मिळालें नव्हतें. तसं माणूस मिळविण्याचा त्यांनीं प्रयत्नहि केला नव्हता. पण यानंतर झोपेचें व त्यांचें जें प्रेम जमलें तें असामान्यच. बापूंना पाठ टेंकायला कधीं फुरसत मिळायची नाहीं. पण तो क्षण आला कीं प्रेमी माणसाच्या सर्वस्वीं कबजांत जावें त्याप्रमाणें बापूंची स्थिति होत असे. जन्मभर कधींच वियोग होणार नाहीं असें हें प्रेमी माणूस बापूंनीं मिळविलें होतें अन् पुढें तर ती त्यांची कायमचीच प्रियकरीण होती.

बापू झोपी गेले पण वत्सलेला तितक्या लवकर झोंप आली नाहीं. बापू आल्यामुळें वत्सलेच्या मनाची त्रस्तता नष्ट झाली होती. पण ज्या विचारानें तिच्या मनाची त्रेधा उडवून दिली होती त्यानें तिच्या मनाची पुन्हा पकड घेतली. 'लहान

पोराला संभाळायला कोणी तरी लागतेंच ' असें कांहीं तरी बापू निजण्यापूर्वी म्हणाले होते.

'माझ्या बाळाला कुणी संभाळलं असेल ?' आतां या बाबतींत जास्त विचार करण्याचं कारणच नाहीं. तिचे बापू आतां आले होते. आतांपर्यंतच्या अनेक पेंचप्रसंगांतून बापूंनीं तिला सोडविलें होतें. आजचा तिनं आपल्यापुढें उभा केलेला पेंचप्रसंग केवळ काल्पनिकच होता. कदाचित् तो वास्तवसृष्टींत उतरलाच, तर त्यांतून मार्ग काढायला बापू समर्थ होते. अनेक अडचणींच्या प्रसंगीं बापूंच्या मांडीवर डोकें ठेवून ती सुखानें झोंपी गेली होती. तिचें विचारचक्र थांबलें. ती लवकरच झोंपी गेली.

* * *

मुंबईस असलें म्हणजे मलबारहिलवर जाऊन उगवत्या सूर्याच्या सोनेरी किरणांचें स्वागत करण्याचा बापूंचा नेहमींचा परिपाठ असे. किरणें फैलावत जात व भोंवतालचीं फुलझाडें व फुलवेली प्रफुल्ल होत. बापू त्यांच्या या आनंदांत समरस होत.

'किती निर्मळ, निष्पाप व आनंदमय हें जीवन ! माणसाचं जीवनहि असंच शुद्ध व प्रेममय झालं पाहिजे.' बापू या फुलझाडांकडे पाहिलें म्हणजे नेहमीं म्हणत तशाच आशयाचे उद्गार आजहि त्यांच्या तोंडून बाहेर पडले.

'वाटणं निराळं व प्रत्यक्ष तसं होणं निराळं.' त्यांच्याजवळ बांकावर बसलेली वत्सला म्हणाली.

'म्हणूनच तर सगळी पंचाईत आहे. आपल्या सभोंवतालच्या या बागेकडेच पहा ना ! इथल्या बागवानांनीं तीनचार महिने आपल्या कात्रीचा हात यांच्यावर फिरविला नाहीं तर काय होईल ? बागवानांनीं आपल्या कात्र्यांनीं व इतर हत्यारांनीं इथल्या सर्व वनस्पतींना अलग जीवन प्राप्त करून देऊन त्यांचा विकास होण्यास संधी दिली आहे म्हणूनच ही लहानशी मोगऱ्याची कळी व ही पांढऱ्या चाफ्याचीं झाडं आपापलं वैभव व गुण प्रकट करण्यास समर्थ झालीं आहेत. इथल्या या बागवानांनीं सर्व फुलझाडांना व वेलींना जसं अलग अलग जीवन प्राप्त करून दिलं आहे तशीच त्यांची तिथल्यातिथं मनोहर रचना करून त्यांना सामुदायिक जीवनहि प्राप्त करून दिलं आहे. सगळ्या मानव जातीला अशा प्रकारचेच बागवान मिळाले पाहिजेत कीं जे प्रत्येकाला असलेल्या स्वतंत्रपणें जगण्याच्या हक्कांचं संरक्षण करतील, प्रत्येकाच्या अंगच्या सर्व शक्तींचा व गुणांचा पूर्ण विकास होईल अशी संधी निर्माण करतील व सर्वांनीं आपल्यांतील सर्व शक्तींचा उपयोग सर्वांच्या कल्याणाकरतां करावा

व सर्वांनीं सर्वांची सर्व प्रकारची काळजी घेऊन सर्वांचं जीवन प्रेममय व आनंदमय होईल अशीच समाजाची रचना उभारतील.' बापू या विचाराशींच तल्लीन झाले.

'मानवी जीवनाचं सर्वोच्च असं हें ध्येय आहे खरं पण तें प्राप्त होण्यास किती शतकं लागतील कुणास ठाऊक.' वत्सला म्हणाली.

'नाहीं, आतां फारशीं शतकं नाहीं लागायचीं. मानवी समाज या ध्येयाकडे आतां जोरानं धांव घेत आहे. ताजमहाल निर्माण करायला शहाजहानला वीस वर्षं खपावं लागलं. आजच्या सर्वच दृष्टींनीं सुधारलेल्या कालांत एखाद्या राष्ट्रीय सरकारनं मनांत आणलं तर अवघ्या वीस आठवड्यात ताजमहालच काय तर त्यापेक्षांहि भव्य व सुंदर कृती तें निर्माण करून दाखवील व सर्व जगाला थक्क करून सोडील.' बापू म्हणाले.

'ताजमहालासारखी एखादी जड वस्तू निर्माण करणं वेगळं व मानवी समाजाला एक नवीनच संस्कृति प्राप्त करून देणं वेगळं.' वत्सला बोलली.

'अहा ग, वेडे! उपमा ती उपमाच. सर्वार्थानं ती घ्यायची नसते. मानव जातीच्या साधनसंपत्तीची आज किती मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे व काल व स्थल यांचं अंतर तोडण्याच्या कामीं तिनं निसर्गावर कशी मात केली आहे हें सांगण्यापुरतीच ही उपमा होती.' मामा व भाची यांच्यांमधील हा संवाद असा रंगांत येत चालला होता व हिलवर आतां लोकांची गर्दीहि वाढत चालली होती.

बापूंना असल्या या गर्दीचा नेहमींच कंटाळा असे. ते आपल्या जागेवरून उठले. वत्सलाहि त्यांच्याबरोबर उठली व दोघेहि आपल्या बिऱ्हाडाकडे निघालीं. हिलवरून खालीं उतरेपर्यंत दोघेहि कांहीं बोललीं नाहींत. सपाटीच्या रस्त्याला लागल्यावर—

'बापू, त्या प्रश्नाचं उत्तर तुम्ही दिलं नाहींत.' वत्सलेनं विचारलें.

'काय, मी तर तेव्हांच दिलं. तुझ्या लक्षांत आलं नसलं तर पुन्हां तुला सांगू का? मी तर त्या पोराला तुझा मुलगा म्हणून, इतक्या वर्षांनीं आपल्या हातीं आलेलं रत्न म्हणून, तुझ्यापेक्षाहि जास्त प्रेमानं लहानाचा मोठा करीन.' बापूंनीं उत्तर दिलें.

'लोक काय म्हणतील?'

'काय म्हणतील? म्हणायचं तेंच म्हणतील व मला जें सांगायचं तें मी उघड उघडपणें सांगेन. जग इतकं सुधं नाहीं हें मला ठाऊक आहे. त्याचे काय परिणाम होतील हें मी पूर्णपणें जाणतों. कदाचित् आपला इतका सगळा पसारा मोडावा लागेल. पण त्याची पर्वा करण्याचं काहींच कारण नाहीं.'

पुन्हा बराच वेळ कोणी बोललें नाहीं. जसजसें बिऱ्हाड जवळ येत चाललें तसतशी बापूंच्या परिचयाची अनेक मंडळी त्यांना भेटली व त्यांचे नेहमींचे

शिष्टाचाराचे नमस्कार घेत व नेहमींच्या प्रकृती स्वास्थ्याच्या प्रश्नांना उत्तरें देत दोघं मामाभाची घरीं आलीं.

' बापू, किती चांगले आहां तुम्ही ! तुमचं म्हणणं त्या वेळींच मी ऐकलं असतं तर...' वत्सला गहिंवरून गेली.

' तरुणपणांत सहज घडून येणाऱ्या अशा या गोष्टी आहेत. त्या पुन्हा पुन्हा उगाळून करायचं काय ? ' बापूंनीं आश्वासनपर उद्गार काढले.

पहांटे वत्सला व बापू मलबारहिलवर जाण्याकरितां निघाले त्या वेळीं आदल्या रात्रीं घडून आलेले सर्व प्रकार वत्सलेनें बापूंना इत्थंभूत सांगितले होते व त्यावर त्यांची खूप चर्चाहि झाली होती. पण ज्या काल्पनिक पेंचप्रसंगानें वत्सलेला त्रस्त करून सोडलें होतें त्याचें उत्तर तिला आतां मिळालें होतें.

वत्सला आपल्या नेहमींच्या कामाला लागली. जेवण आटोपलें. इतर अनेक विषयांवर मामाभाची यांच्यांत मधून-मधून गप्पा चालूच होत्या. शाळेंत जातांना आप्पासाहेब मौने यांच्या घरीं जावयाचें व तेथून कुसुमला बरोबर घेऊन शाळेस जावयाचें व शाळा सुटल्यावर कुसुमचा एक तासभर अभ्यास घेऊन घरीं यावयाचें असा आज तिचा दोनअडीच वर्षाचा परिपाठ होता. त्यामुळें वत्सलेचे व अप्पा-साहेबांच्या घरच्या मंडळींचे ऋणानुबंधाचे व प्रेमाचे संबंध वाढत चालले होते. वत्सलाबाईला अप्पासाहेबांचीं मुलें व इतर माणसें बाई या नांवानें संबोधीत व वत्सला त्यांच्या घरीं आली कीं सर्वच मुलें ' बाई ' ' बाई ' म्हणून तिच्याभोंवतीं जमा होत. वत्सला त्यांच्या घरच्यापैकींच एक माणूस बनली होती.

वत्सला अप्पासाहेबांच्या घरीं आली तों आज तिला निराळाच प्रकार दृष्टीस पडला. सर्व मोठीं माणसें तिला चिंताग्रस्त दिसलीं. सुभद्राबाईंना निरोप देण्यांत सर्व मंडळी गर्क होती. सुभद्राबाईचे यजमान विसूभाऊ एकाएकीं बरेच आजारी झाले आहेत, ताबडतोब मिळेल त्या गाडीनें सर्व मंडळींना पाठवून द्यावें अशी अर्जंट तार अप्पासाहेब मौन्यांना सकाळीं उजाडतांच मिळाली होती.

या निरोप देण्याच्या कामांत वत्सलेनेंहि साहजिक भाग घेतला. सामानाची बांधाबांधी झाली होती व सुभद्राबाईंना स्टेशनावर पोंचविण्याकरतां येणाऱ्या मोटारीचीच वाट होती. वत्सला मौन्यांच्या घरीं आली त्या वेळीं शरद् ' बाई आल्या ! बाई आल्या ! ' असें म्हणत त्यांना येऊन बिलगला. रमाबाईंनीं सुभद्राबाईंना कुंकूं लावलें. मालीचा त्यांनीं मुका घेतला. दासूला त्यांनी आपल्याजवळ ओढला. त्याला कुरवाळलें व ' माई-माली जाऊं देत त्यांच्या गांवीं, तूं आमच्याच घरीं रहा. ' असें त्यांनीं मायेच्या स्वरांत दासड्याला विचारलें.

'नाहीं, नाहीं! मी माईना कधींच सोडायचा नाहीं.' असें म्हणून तो माईना जाऊन बिलगला.

'आहे काय त्या खेड्यांत? आपण इथं मुंबईसच राहूं.' गणू दासूला उद्देशून म्हणाला.

'जिथं माई तिथं मी. खेडं काय न् मुंबई काय, मला तें कांहीं कळत नाहीं.' असें बोलून तो सुभद्राबाईंना अधिकच बिलगला.

वत्सला हें सर्व जवळच उभी राहून पहात होती. दासूचा आवाज तिला अगदीं ओळखीच्या आवाजासारखा वाटला. आठ वर्षांपूर्वी ज्याच्यावर आपण प्रेम केलें त्या वसंताच्या आवाजासारखाच हा आवाज आहे असें तिचे कान तिला सांगूं लागले.

'माई, दासूला तुझा चांगलाच लळा लागलाय कीं. गरीब बिचारं मातृहीन पोर, त्याची चांगली काळजी घे बरं का. दासू, तूं आपल्या माईबरोबरच जा. आम्ही तुमच्या गांवीं येऊं तेव्हां परत येतांना तुला मुंबईस घेऊन येऊं.'

'तेव्हां सुद्धां मी तुमच्या बरोबर येणार नाहीं.' दासड्या निश्चयाच्या स्वरांत म्हणाला. या वेळीं दासड्याचा चेहरा पाहण्यासारखा होता. त्याचा गरगरीत वाटोळा गोरा चेहरा व त्याला शोभा देणाऱ्या काळ्याभोर टपोऱ्या डोळ्यांतील निश्चयाची चमक पाहून सर्वांनाच कौतुक वाटलें.

वत्सलेचें मन तर हा सर्व देखावा पाहून बावरून गेलें. 'दासड्याला आई नाहीं, आई नाहीं.' वत्सला त्याच्याकडे अधिकच तीव्र दृष्टीनें पाहूं लागली.

'काय दासूला आई नाहीं?' वत्सलेनें आर्द्र स्वरानें विचारलें. 'तुमच्या जवळ तो किती दिवस आहे?' तिनें पुन्हां लगेच सुभद्राबाईंना उद्देशून प्रश्न केला.

वत्सलेचा कावराबावरा झालेला चेहरा व तिच्या आवाजांतील हृदयभेदी कळकळ पाहून सुभद्राबाईंना, रमाबाईंना व तिथेंच जवळ उभी असलेल्या कुसुमला सुद्धां आश्चर्य वाटलें.

वत्सलेनें दासूचे दोन्ही हात धरले. 'काय दासू, तुला आई नाहीं?' असें त्यालाहि तिनें विचारलें.

'कोण म्हणते आई नाहीं! माईच माझी आई.' दासू हे शब्द बोलत असतांना वत्सलेला त्याच्या उजव्या गालावरील तीळ दृष्टीस पडला.

इतक्यांत मोटारीचा 'पों पों' आवाज ऐकूं आला. व त्या आवाजाबरोबर अप्पासाहेबहि आंत आले. वत्सला इतकी कावरीबावरी कां झाली आहे व तिच्याकडे सर्व मंडळी कां टवकारून पाहात आहेत हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. या प्रसंगाचा विचार करण्यालाहि त्यांना वेळ नव्हता. 'चला, आमच्याबरोबरच चला. तुम्हाला

वाटेंत शाळेसमोर सोडतों व सुभद्राबाईंना स्टेशनावर नेतों.' अप्पासाहेब घाईघाईत म्हणाले.

मोटारींत वत्साला दासूजवळच बसली होती. तिनें त्याला पूर्ण न्याहाळलें. तिनें त्याला आपल्या हृदयाशीं बिलगून धरलें. जवळ धावत आलेल्या वासराला गाय हुंगते व त्याला चाटूं लागते तसलाच कांहींसा प्रकार वत्सला करते आहे असें सुभद्राबाईंना वाटलें.

शाळेच्या भव्य दरवाजाजवळ मोटार उभी राहिली. वत्सालेला या ठिकाणीं उतरणें भागच होतें. सुभद्राबाईंचा तिनें निरोप घेतला व 'या बाळाला अंतर देऊं नका बरं का!' असं गडबडीनें तिनें सांगितलें. मोटार चालू झाली. कुसुम खालीं उतरली होती. मोटार नजरेआड होईपर्यंत वत्सला तिच्याकडे शून्य दृष्टीनें पाहात उभी राहिली. 'बाई चला की, शाळेची घंटा झाली!' कुसुमच्या या शब्दांनीं तिला जागें केलं व व्यथित मनानें ती शाळेच्या पायऱ्या चढूं लागली.

रमाबाईंचें एक रातो पण वत्सलेनें सुद्धां या पोराला जपण्याबद्दल मायेनें हृदय भरून सांगावें असें या पोरापाशीं आहे तरी काय ? सुभद्राबाईंचें मन याच विचारांनी स्टेशन येईपर्यंत ग्रासलें होतें.

## ७

गाडीत कोण गर्दी. बायकांच्या डब्यांतच सुभद्राबाईंना बसायचें होतें, पण तिथे देखील गर्दीच. शेवटी अप्पांनी सुभद्राबाईंची त्यांच्या बरोबरच्या मुलांसह सेकंड-क्लासमध्यें कशीबशी सोय करून दिली. पांडरपेशांच्या एक कुटुंबानें हा डबा रिझर्व केला होता. अप्पासाहेबांची निघाली दूरची ओळख व त्या मंडळींनी सुभद्राबाईंना जागा करून दिली. श्रीमंतीचा विचार केला तर सुभद्राबाई सेकंडक्लासमध्यें प्रवास करण्याच्याच योग्यतेच्या होत्या पण 'घरीं कळलं तर काय वाटेल ?' या विचारानें त्यांनीं तिसऱ्या क्लासचीं तिकीटें काढण्यास अप्पासाहेबांस सांगितलें होतें. अप्पासाहेबांना विसुभाऊंचा स्वभाव चांगला माहीत होता. तेव्हां त्यांनीहि या बाबतींत आग्रह धरला नव्हता पण नाइलाज झाला त्या वेळींच हा खर्चाचा मार्ग त्यांनीं पतकरला माणसं घरापर्यंत सुखानें गेलीं तर पाहिजेत !

तावडतोब प्रकृतीचें मान कळवा असें त्यांनीं सुभद्राबाईंना सांगितलें व त्याबरोबरच जास्तीकमी असल्यास आपण तिकडे येण्याचें आश्वासन दिलें. सुभद्राबाईंना तितकेंच बरें वाटलें.

गाडी चालू झाली. संध्याकाळची वेळ होती. आपल्या वाटेच्या कडेनें उभ्या असलेल्या झाडांना व त्यांच्या लांब लांब सावल्यांना मागें टाकीत गाडी झपाझप चालत होती. गाडी चालू झाल्यावर थोड्याच वेळानें माली सेकंडक्लासच्या मऊ गादीच्या पाळण्यांत झोंपी गेली. दासू चांगला जागा होता. त्याला हें सगळें जग नवीन होतें. वास्तविक सोनगांव सोडल्यापासूनच त्याच्या नव्या जगाला प्रारंभ झाला होता. मुंबई तर त्याला अगदीं नवीच. आपल्या सरळ व सालस दागणुकीमुळें त्यानें रमाबाई, अप्पासाहेब, कुसूम वगैरे मंडळींना आपलेंसें करून टाकलें होतें. मुंबईस आल्याबरोबर मिळालेल्या नव्या पोषाखांत तो एक नवाच माणूस बनला होता. गोरागोमटा वर्ण व ठसठशीत अवयव यांमुळें तो सुभद्राबाईच्या घरीं काम करणारा एक कुणब्याचा पोर नसून तो एक थोरामोठ्यांचा मुलगा असावा असेंच सर्वांना वाटत होतें व त्याच्या सर्व हालचालीची ठेवणहि अशीच उच्चवर्गाला शोभेशी होती. सुभद्राबाईंना गाडी चालू झाल्यावर थोडीशी विचार करण्याची फुरसत मिळाली त्या वेळीं 'घरीं तब्येत कशी असेल' या काळजीनें ग्रासलें. दम्याचा विकार केव्हां केव्हां जास्त बळावतो व आपल्या पतीची प्रकृति चिंताजनक स्वरूप धारण करते हें त्यांच्या अनुभवास आलें होतें. असाच कांहींसा प्रकार याहि वेळीं झाला असेल या विचारानें त्यांना गांगरून सोडलें होतें. मन चिंती तें वैरी न चिंती. असले कांहीं भलते विचार मनांत आले कीं त्यांचे डोळे पाण्यानें भरून येत. त्या वेळीं खिडकीबाहेरच्या शून्य आकाशाकडे पाहून व पाठमोरे होऊन आपली मनःस्थिति डब्यांतल्या मंडळीच्या लक्षांत न आणूं देण्याचा त्या प्रयत्न करीत. पण त्यांच्यासमोरच्या बांकावर बसलेल्या पतिपत्नीच्या लक्षांत ही गोष्ट केव्हांच आली होती.

अशा स्थितींत दोन तीन स्टेशनें गेलीं व डब्यांतल्या या कुटुंबांतील एका लहान मुलीनें आपल्या आईजवळ पाण्याची मागणी केली. आईनें बांकाखालचा फिरकीचा भला मोठा पितळी तांब्या बाहेर काढला, तर मुलीच्या बापानें फराळाची करंडी सोडली व 'दिवसा उजेडीं मुलांना खाऊं दे' अशी इच्छा प्रकट केली.

सुभद्राबाई आपल्या विचारांत इतक्या गर्क होत्या कीं त्यांचें या प्रकाराकडे मुळीं सुद्धां लक्ष नव्हतें.

मुलांच्या आईनें आपल्या दोन मुली व एक मुलगा यांच्या हातांत एकेक लहानसा लाडू ठेवला व जवळ बसलेल्या दासूकडे वळून त्याच्यापुढेंहि एक लाडू केला दासूनें तो नाकारला. 'घे बाळ, घे, आई नाहीं रागें भरायची,' असें मुलांची आई म्हणाली व ही असली विनंति मुलगा मान्य करीत नाहीं असें पाहून सुभद्राबाईकडे सन्मुख होऊन 'तुमच्या मुलाला लाडू घ्यायला सांगा कीं,' असें ती म्हणाली.

या उद्गारांनीं सुभद्राबाईंना चांगलेंच भानावर आणलें. परक्यांनीं दासूला आपला मुलगा म्हणावें याचें त्यांना आश्चर्य वाटलें. पण आश्चर्य करीत बसण्याची किंवा दासूचें आपलें नातें काय हें सांगत बसण्याची ही थोडीच वेळ होती ! त्यांनीं 'दासू, घे तो लाडू, लाजूं नको' असें दासूला सांगितलें व आपल्या जवळचा फराळाचा डबा उघडला. मालीला त्यांनीं उठविलें. सर्वच मुलें आतां फराळांत गुंतलीं. मोठ्या माणसांनींहि त्यांत आतां भाग घेतला. डब्यांतल्या पतिपत्नींनीं सुभद्राबाईंना खाण्याचा आग्रह केला पण त्याचा उपयोग झाला नाहीं. दासूनें पाणी मागितल्यावरून त्यांनीं फिरकीच्या तांब्यांतील पेल्यामध्यें पाणी ओतून दिलें. दासूनें पेला तोंडाला लावला न लावला इतक्यांत डब्यांतल्या एका मुलीनें त्याच्यावर झडप घातली व 'मला पाणी' म्हणून तिनें तो त्याच्या हातांतून हिसकावून घेतला व ती तो आपल्या तोंडाला लावूं लागली. सुभद्राबाईची जातीय वृत्ति आतां एकदम जागी झाली. 'तें कुणब्याच्या पोर'चं उष्टं भांडं नका तोंडाला लावून देऊं' असें त्या उद्गारल्या व स्वतःच त्या मुलीच्या हातचा पेला त्या घेऊं लागल्या.

'म्हणजे तो तुमचा मुलगा नाहीं म्हणायचा !' या डब्यांतील बाईंच्या प्रश्नास त्यांनीं नकारार्थी मान हालवून उत्तर दिलें.

हा सर्व प्रकार पाहून दासूचा चेहरा उतरला. आपल्या मातृहीनत्वाची व जातिहीनत्वाची जाणीव त्याच्या लहानशा अंतःकरणाला बोंचली व त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. यामुळें सर्वांचेंच लक्ष दासूकडे लागलें.

सुभद्राबाईनीं पेला घेण्याकरतां हात पुढें केला तरी मुलगी थोडेंच ऐकणार होती ? तिनें तो चटकन् तोंडाला लावला व त्यांतलें पाणी ती पिऊन गेली.

'कोण म्हणेल त्याला कुणब्याचा पोर ! आमच्या या मुलात व त्याच्यांत कांहीं फरक दिसतो का तुम्हाला ?' असें डब्यांतले गृहस्थ म्हणाले अन् खरोखरीच डब्यांतल्या या कुटुंबांतल्या पोरांत खपून जाण्याइतकी त्याच्या शरीराची ठेवण व वर्ण पाहून सर्वच आश्चर्यचकित झालीं. सुभद्राबाईना तर हें साम्य पाहू विशेषच आश्चर्य वाटलें.

ढब्यांत भेटलेल्या या कुटुंबांत मोठा मुलगा सहासात वर्षांचा होता व त्याच्या पाठच्या दोन मुली होत्या. दासू व हा मुलगा डब्यांत एका ओळीलाच बसले होते. डब्यांतल्या गृहस्थांनीं हा साम्यतेचा उद्गार काढल्याबरोबर हीं दोन्हीं मुलें जशीं काय आवळींजावळीं मुलें असावीं किंवा सख्खे भाऊ असावेत अशी कल्पना सुभद्राबाईंच्या मनाला चाटून गेली. डब्यांतल्या बाई तर या दोन मुलांकडे व आपल्या पतीकडे जणूं काय साम्यतेचीं लक्षणें ठरविण्याकरतांच न्याहाळून पाहूं लागल्या.

'खरंच हा तुमचा मुलगा नाहीं ?' बाईनें प्रश्न केला.

'आमच्याकडं हा नोकरीला आहे. गेलीं दीडदोन वर्षं तो आमच्याकडं आहे.' सुभद्राबाई म्हणाल्या.

'मग याचे आईबाप कुठं आहेत?'

'आमच्याकडल्याच एका कुळानं त्याला आमच्याकडं आणून सोडलं. पोराला ना आई ना बाप. पण आमच्या घरीं आल्यापासून त्याला माझा ळळा लागला आहे.' सुभद्राबाईनीं उत्तर दिलें.

'बाळ, तुझी आई तुला आठवते का रे?' दासूला उद्देशून बाईनं प्रश्न केला.

'आ ऽऽई! माझी आई म्हणतां ना! माझी आई, माई, या पहा ना आई!' दासू इतक्या धिटाईनं बोलेल असें सुभद्राबाईनाहि वाटलें नव्हतें.

दासूचा आवाज व त्याची बोलण्याची लकब पाहून डब्यांतल्या बाईला जशी कांहीं आणखी एक नवीनच गोष्ट आढळून आली व ती आपल्या पतीकडे साश्चर्य दृष्टीनं पाहूं लागली.

हा सर्व प्रकार पाहून व ऐकून डब्यांतील गृहस्थाची वृत्ती अधिक चमत्कारिक बनलेली दिसून आली.

'काय हा कुणब्याचा मुलगा म्हणतां? ज्या कुळानं तुमच्याकडे हा मुलगा नोकरीकरतां ठेवला त्यानं कांहीं तरी या मुलाचं आपलं नातं सांगितलं असेल?' गृहस्थांनीं सुभद्राबाईना उद्देशून प्रश्न केला.

'त्यानं कांहीं सांगितलं नाहीं. त्याच्या घरीं लहानाचा मोठा झालेला हा मुलगा एवढंच फक्त मला कांहीं दिवसांनीं कळलं.'

'पुन्हां तो आपल्या मुलाला परत नेण्याकरतां तुमच्याकडं नाहीं आला?'

'तो कसला येतोय? त्यानं या मुलाला आमच्याकडं ठेवून कांहीं पैसे आमच्याकडून नेले व पुन्हां त्यानं तोंड म्हणून दाखविलं नाहीं. त्याच्याहि बिचाऱ्याच्या संसाराची वाताहत झाली. त्याची बायको मेली व तो आपलं गांव सोडून कुठं निघून गेला याचा पत्ताहि लागला नाहीं.' सुभद्राबाईनीं सांगितलें.

'तो आपल्या मुलाला मागण्याकरतां पुन्हां येणार नाहीं म्हणतां?'

'काय सांगावं? येईलहि कदाचित्!'

'मग तो तुम्ही त्याच्या स्वाधीन कराल?'

'तें मी नाहीं सांगूं शकत.'

'याचं उत्तर त्या काय सांगणार! पुरुषमंडळींचं तें काम!' डब्यांतल्या बाई मध्येंच बोलल्या.

प्रवासांत सहज एकत्र आलेल्या या दोन कुटुंबांतील मोठ्या मंडळींत अशी चर्चा सुरू झाली तर इकडे या कुटुंबांतील लहान मंडळींचाहि आपापसांत 'स्नेह

जमण्यास वेळ लागला नाहीं. डब्यांतल्या बाईची मोठी मुलगी मालीच्या जवळ येऊन बसली. धाकट्या मुलीनें आपली कचकड्याची बाहुली मालीला दिली. त्यांच्या गुजगोष्टी सुरू झाल्या. मुलानें आपल्या जवळच्या पुस्तकांतील चित्रें दासूला दाखविण्यास सुरुवात केली. तसेंच चित्ररूप गोष्टींतील अर्थहि तो दासूला सांगूं लागला. दासूपेक्षां हा मुलगा लहान खरा, पण त्याला चित्रें समजण्याइतकें व बिन-जोडाक्षराच्या गोष्टी समजण्याइतकें अक्षरज्ञान झालें होतें.

'दासू, तुला वाचतां नाहीं येत?' मुलानें प्रश्न केला. दासू त्याला उत्तर काय देणार!

'मला कांहीं माहीत नाहीं.' तो म्हणाला.

'तूं शाळेंत नाहीं जात!'

त्यालाहि दासूकडून नकारार्थीच उत्तर मिळालें.

'तुझ्या आईनं तुला शाळेत नाहीं घातलं?' दासूला काय उत्तर द्यावें हेंच सुचेना.

'आई, आई, दासू शाळेत जात नाहीं इतका मोठा झाला असून!' मुलानें आपल्या आईला हटकलें.

डब्यांतल्या बाईनीं सुभद्राबाईकडे पाहिलें. त्या काय बोलणार! त्यांना शरमल्या-सारखे वाटलें. आपण या मुलाची खरी आई नव्हे. दासू आपल्याकडे नोकरीला आहे. या त्यांनीं सांगितलेल्या गोष्टींकडे मुलांचें लक्ष कोठून असणार?

'आतां गांवीं गेलों कीं मी शाळेंत जाणार आहे.' दासूनें बोलण्याची धिटाई केली.

'दासू, तूं आमच्या घरीं येतोस का, मग तूं मी मिळून शाळेंत जाऊं. मग काय गंमत गंमत होईल. तुला मी वाचायला शिकवीन.'

'कसे अगदीं भावाभावासारखे दिसतात नाहीं!' सुभद्राबाईच्या तोंडून अगदीं नकळतच हे शब्द बाहेर पडले.

'निसर्गाचा हा एक चमत्कारच म्हणायचा. कुणीकडं दासू अन् कुणीकडं आमचा विकास! दासू खेड्यांत कुणब्याच्या घरीं जन्मलेला, खेड्यांतच लहानाचा मोठा झालेला. अन् विकास! दोघांमध्यें इतकं साम्य!' डब्यांतल्या बाईनीं आपल्या यजमानांना उद्देशून वरील उद्गार काढले.

'निसर्ग काय काय करूं शकत नाहीं!' असलें मामुली उत्तर त्यांच्या यज-मानांनीं दिलें खरें पण या घटनेनें त्यांना जोरानें विचार करावयास लावलें. त्यांचा चेहरा गंभीर झाला.

'बाबा, दासूला आपण आपल्या घरीं नेऊंच.' मुलानें आपली सूचना आणखी एकदां पण दुसऱ्या प्रकारानें मांडली.

'दासू तयार असला तर जा त्याला घेऊन जा.' सुभद्राबाई थट्टायुक्त स्वरांत बोलल्या.

'नाहीं, नाहीं, मी कधींच जायचा नाहीं. माईना सोडून मी कुठंच जायचा नाहीं.' दासू निकरावर येऊन म्हणाला.

सुभद्राबाईनीं दासूला जवळ ओढलें. 'मी नाहीं तुला त्यांच्याबरोबर पाठवायची!' त्या म्हणाल्या.

कुणब्याच्या पोराच्या तोंडाला लागलेलें उष्टें भांडें न घेण्याबद्दल बजावणाऱ्या सुभद्राबाई दासूला असें जवळ घेतात व त्याला कुरवाळून त्याची समजूत काढतात या गोष्टीनेंहि डब्यांतल्या पती-पत्नींना आणखी अधिक आश्चर्यात ढकललें.

'दासूला तुमचा फारच लळा लागलाय कीं!'

'होय लागलाय खरा!' बाईच्या वरील प्रश्नाला सुभद्राबाईनीं उत्तर दिलें.

गाडी या वेळीं बोरघाटाच्या बोगद्यांतून चालली होती. मध्येंच एकदम गार वारा लागावा व दुसऱ्याच क्षणीं शेकोटीपाशीं शेकत बसल्याप्रमाणें ऊब वाटावी असा निसर्गाचा चमत्कार गाडी करून दाखवीत होती. खंडाळें स्टेशन आलें.

'आतां काय दोनच स्टेशनें राहिलीं बरं का तुम्हांला उतरायला.' असें डब्यांतले गृहस्थ उद्गारले.

लोणावळ्यास गाडी बराच वेळ थांबली व तेथल्या गडबडीनें सर्वांचेंच लक्ष आपणाकडे वेधून घेतलें.

गाडी चालू झाल्यावर सुभद्राबाईनीं सामानाची आवरासावर केली. 'खडकाळ्याहून तुमचं गांव किती लांब आहे?' डब्यांतल्या गृहस्थांनीं विचारलें.

'दोन एक मैल आहे.' सुभद्राबाईनीं उत्तर दिलें.

खडकाळ्यावर सुभद्राबाईना उतरून घेण्याकरतां दोन तीन कुणबी मंडळी आली होती.

गाडींतली ओळख गाडीपुरती. पण त्यांतल्यात्यांत निरोप देतांना डब्यांतल्या बाईनीं 'ओळखदेख ठेवा बरं का, नाहीं तर विसरून जाल' असे उद्गार काढले.

दासू आपल्याबरोबर येत नाहीं हें विकासला आतां पूर्णपणें कळलें होतें.

'दासू, तूं आम्हाला पुन्हा भेटशील का रे?'

'हो, भेटेन कीं केव्हां तरी असाच!' दासूनें सहजगत्या असें उत्तर दिलें पण त्यांत किती तरी अर्थ भरला होता.

दासूच्या या शेवटल्या शब्दांनीं व ज्या आवाजांत त्यानें ते उच्चारले त्या आवाजानें निरोप घेत असलेल्या गृहस्थाच्या हृदयांतल्या सुप्त भावनांनाच जणूं हात घातला.

'वत्सलेनं टाकून दिलेलं तर हें पोर नसेल!' अशी विचाराची एक चमक त्यांच्या अंतःकरणाला चाटून गेली व दासू दृष्टीआड होईपर्यंत ते त्याच्याकडे पाहतच राहिले. आपल्या जबाबदारीची जाणीव करून देणारी वत्सलेची दीनवाणी मुद्रा त्यांच्या मनश्चक्षूंपुढें उभी राहिली. विषाद व मिस्किलपणा यांच्या मिश्र छटा त्यांच्या चेहऱ्यावर उमटल्या.

डब्यांतले हे गृहस्थ नागपूरच्या एका कॉलेजांत प्रोफेसर होते. संस्कृत व इतिहास हे त्यांचे आवडते विषय. नागपूरच्या कॉलेज वातावरणांत एक रंगेल प्रोफेसर म्हणून ते विद्यार्थ्यांच्या 'आवडीचे झाले होते. मेघदूतांतील उत्तान श्रृंगाराचें वर्णन केलेले श्लोक आले कीं इतर संस्कृत प्रोफेसर नर्व्हस होत व कसा तरी गोळाबेरीज अर्थ सांगून ते दुसऱ्या श्लोकांवर जाण्याची घाई करीत. प्रोफेसर वसंत मधुपे यांचें वागणें याच्या अगदीं विरुद्ध असायचें. असले कांहीं श्लोक आले कीं ते कालिदासाशीं समरस होत. घोळून घोळून या श्लोकांतील प्रत्येक शब्द कसा अर्थपूर्ण आहे हें दुसरीं अनेक उदाहरणें देऊन आपल्या विद्यार्थ्यांच्या मनांचा ते कबजा घेत. वर्गातील विद्यार्थिनी विभागाकडे पाहून ते जेव्हां मिस्किलपणानें मधून मधून स्मित करीत त्यावेळी कांहीं चावट विद्यार्थी स्टँपिंगहि करीत. हा रसभंग मात्र त्यांना खपत नसे. असल्या विद्यार्थ्यांना ते दटावीत. आपल्या उचंबळणाऱ्या वृत्तींना असा उघड उघड वाव देण्यापेक्षां कालिदासाच्या कलेकडे लक्ष देण्यास ते त्यांना सांगत. कालिदास हा व्हॉलप्च्यूअस, मनांतील हलक्या भावनांना उत्तेजन देणारा कवि आहे असें मत व्यक्त करून इतर प्रोफेसर कालिदासासंबंधीं थोडीशी तिरस्कारात्मक टीका करीत. प्रो. मधुप्यांना ती सहन होत नसे. या प्रोफेसरांना कला कशाशीं खातात हें माहीत नसल्याचें सांगून त्यांची ते टवाळी उडवीत. कालिदासाच्या प्रत्येक शब्दांत कलेचा कसा पूर्ण आविर्भाव झाला आहे हें ते सांगूं लागले म्हणजे प्रो. मधुप्यांचें या कलात्मक विषयांतील अगाध वाचन व ज्ञान पाहून सर्वच विद्यार्थी वर्ग दंग होऊन जात असे. आनंद ही जीवनकला आहे. या आनंदाचें जो पोषण करतो तोच खरा कवि. शाकुंतलांतील दुष्यंतानें शकुंतलेशीं केलेल्या कामचेष्टांचें बहारीनें वर्णनकरून कालिदासानें कला आणि वास्तवता यांचें गोड संमेलन केलें आहे पण दुष्यंताला निर्मल ठरविण्याच्या खटपटीस लागून कालिदासानें वास्तवतेचा व कलेचा खून केला आहे व हा राजकवि पोटासाठीं शेवटीं कसा बारगळला याचें फारच मजेदार वर्णन ते करीत. या वेळीं इतिहासांतील व पुराणांतील ते अनेक दाखले देत. पोटासाठीं आपल्या बुद्धीचा विक्रय करणें ही समाजरचनेंतील एक·

वास्तवताच आहे या ऐतिहासिक सिद्धांताला ते मोठ्या चातुर्यानें बगल देत. कालिदासाच्या शकुंतलेपेक्षां व आकाशांतील ढगांशीं गुजगोष्टी करून त्यांच्याबरोबर आपल्या प्रियकराला निरोप देणाऱ्या मेघदूतांतील नायिकेपेक्षां शूद्रकाची वसंतसेना प्रो. मधुप्यांना एका विशेष अर्थानें आवडे. वेश्यावर्ग हा समाजावर कोसळलेला शाप नाहीं. समाजरचनारूपी देवीनें समाजाला दिलेला तो एक वर आहे. प्रो. मधुप्यांचें हें मत विद्यार्थी वर्गाला विचित्र वाटे. आपल्या पुढील दोन्ही जातीच्या विद्यार्थी वर्गाच्या चेहऱ्यावर ही जाणीव प्रकट झालेली पाहिली म्हणजे प्रो. मधुपे अगदीं रंगांत येत. इंद्रियांना आनंद देणाऱ्या अनेक वस्तूंप्रमाणें स्त्री ही एक उपभोग्य वस्तू आहे हें प्रो. मधुप्यांचें मत ऐकून विद्यार्थ्यांतील दोन्ही जाती विशेषतः विद्यार्थिनी चिडून जात हें खरें पण आजच्या समाजांत वेश्यावर्गाची उपयुक्तता किती आहे हें पलटणींतल्या शिपायांच्या व शहरांतील वाढत्या मजूर वर्गाच्या परिस्थितीचें वर्णन करून ते पटवून देत तेव्हां आपल्यावरील विद्यार्थ्यांचा राग थोडा कमी झालेला पाहून आपण आपल्या श्रोत्यांना कसें क्षणोक्षणीं झुलवतो या भावनेनें त्यांना वाटणारा मिस्किलपणाचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर प्रकट होत असे.

बोले तैसा चाले. माणूस बोलतो तसाच बहुतेक तो चालत असतो. त्याच्या पायां पडायचें कांहीं कारण नाहीं. प्रो. मधुपे यांचें वर्तन व भाषण अशींच एकरूप असत. संस्कृताप्रमाणें इतिहासाचा तास घेऊं लागले म्हणजे त्यांची अथांग विद्वत्ता पदोपदीं दिसून येई. इतिहास व अर्थशास्त्र यांत तर ते पहिल्या श्रेणींत पास झाले होते. बी. ए. करतां ठेवलेलें पहिलें बक्षीस त्यांनीं मिळविलें होतें. त्यांचीं इतिहासावरील व्याख्यानें माहितीपूर्ण असायचीं पण इतिहासावरून राजकीय प्रमेयें काढण्याच्या भरीस ते फारसे पडत नसत. इतिहासाचा राजकारणाशीं कांहीं संबंध आहे हें ते जसें कांहीं विसरूनच जात. हिंदुस्थानांतील कॉलेजांतून या विषयाची चर्चा करतांना राजकारणाचा विचार करणें हें वास्तवतेला सोडून आहे असें त्यांचें मत होतें. इतिहासांतून निघणारीं राजकीय प्रमेयें काढायचीं व ती हिंदुस्थानच्या आजच्या परिस्थितीशीं जोडून द्यावयाचीं व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या अनेक भानगडींना तोंड देत बसायचें! पाहिजे कशाला? परीक्षेंत बक्षिसें मिळवायला अशा चलाख वृत्तीची जरूरी नसते. परीक्षेकरतां विद्यार्थ्यांची तयारी करून देणें हें आपलें कर्तव्य. विद्यापीठाच्या अधिकारी वर्गाची हीच अपेक्षा. कॉलेजच्या वातावरणांतील या वास्तवतेशीं फारकत न करतां इतिहासांतील कलात्मक भागांचें वर्णन ते मोठ्या बहारीनें करीत असत. स्त्री ही सर्व काव्यांची व कलांची जननी आहे. कवीचीं काव्यनाटकें स्त्रीभोंवती पिंगा घालीत असतात. सर्व चित्रकार

आपल्या हृदयांतून सांठविलेल्या स्त्रीविषयक भावनांना प्रकट करीत असतात. या भावना जितक्या सत्यतेनें पाहणारांना प्रतीत होतात तितका तितका चित्रकार कलावान् गणला जातो. समाजांतील काव्य व चित्र स्त्रीनें व्यापलें आहे त्याप्रमाणेंच समाजाचा इतिहासहि स्त्रीच बनविते ही प्रो. मधुप्यांचीं मतें ऐकून विद्यार्थ्यांचीं मनें कुतूहल-पूर्ण होत. स्त्री हें अर्धांग नाहीं तर समाजरूपी पुरुषाचें सर्वांग आहे. समाज स्त्री भोंवतीं नाचत असतो व स्त्री समाजाला आपल्या भोंवतीं खेळवीत असते. रस्त्यावरून चालणाऱ्या माणसाच्या मनाला स्त्री आपल्याकडे खेंचीत असते. रस्त्यांच्या चौकां-चौकांतून दुकानादुकानांतून झळकणाऱ्या फलकांवर, भिंतींवर जिकडे तिकडे स्त्रियाच स्त्रिया. साधी टूथ पावडर कोठें घ्यावी हें कळवायचें असल्यास मोहक स्त्रीच्या मोहक हातांतून ब्रश व डबी देऊन आपल्या दुकानांचा पत्ता व्यापाऱ्यांना सांगावा लागतो. प्रो. मधुपे इतिहास शिकवतांना अशा रीतीनें वाहावत चालले तरी इतिहासाचा मुख्य विषय बनविलेल्या स्त्रीला ते आपल्या शब्दरूपी बोटांवर सारखे नाचवीत असल्यामुळें विद्यार्थी वर्गहि त्यांच्या बरोबर वाहून जात असे. आपण वाहावत चाललों याची जाणीव प्रो. मधुप्यांना झाली कीं त्यांच्या चेहऱ्यावरील स्मित अधिकच आकर्षक होई. कारण असें वाहून जाण्याचें कारण सुद्धां स्त्रीच असें आपल्या विषयांतराचें स्पष्टीकरण ते करीत. मग काय, त्यांच्या वर्गातील वातावरण हंशानें व स्टॅंपिंगनें दुम-दुमून जाई. वाल्मीकीची सीता, होमरची हेलेन, व्यासाची कुंति, द्रौपदी, दमयंती, राधा, त्याचप्रमाणें इंग्लंडची इलिझाबेथ, स्कॉटलंडची राणी मेरी, रशियाची कॅथेराइन जहांगीरची नूरजहान, शहाजहानची मुमताज, बाजीरावाची मस्तानी हे त्यांचे इतिहा-सांतील आवडते विषय. इतिहास शिकवितांना असल्या विषयांवर त्यांनीं कितीहि रसाळ व्याख्यानें दिली तरी त्याला कोणी आक्षेप घेणें शक्यच नाहीं अशी प्रो. मधुप्यांची खात्री होती. वस्तुस्थिती सुद्धां तीच होती. म्हणून संस्कृतचे व इतिहासाचे हे प्रोफेसर मधुपे हे 'रंगेल प्रोफेसर' म्हणून ख्यातनाम झाले होते.

रंगेलपणाबद्दल विद्यार्थीदशेपासूनच त्यांची ख्याति होती. प्रेमाच्या नांवाखालीं या दिवसांत अनेक रंग ते खेळले होते. आपल्या रंगेल वृत्तीचें समाधान करण्याकरतां 'प्रेम' हें एक त्यांनीं साधन बनविलें होतें. आश्चर्य हें कीं अनेक भोळ्या भाबड्या तरुणी त्यांच्या या प्रेमपाशांत फसून जात. वसंत मधुप्याची ही कला कॉलेजच्या इतर तरुणांनीं त्याचा हेवा करावा अशी होती. वसंत मधुपे गर्भश्रीमंत होता. पण सगळ्याच श्रीमंत आईबापांच्या तरुणांना ही कला साधतेच असें नाहीं. वसंत मधुपे बाहेर फिरायला निघाला, सिनेमा थिएटरांत त्यानें प्रवेश केला तर तो एकटा असा कधींच दिसायचा नाहीं. 'शहराच्या रस्त्यांतून काय एकटें गबाळासारखें फिरायचें? छे, आपल्या हातून अशी नामुष्कीची गोष्ट होणार नाहीं,' असे तो आपल्या मित्रांना

बोलून दाखवी. सदैव त्याच्याबरोबर कोणी ना कोणी मैत्रीण असायची अन् लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं या मैत्रिणींत बदल झालेला दिसायचा. 'आहेऽऽवुवा! आज कुणी नवीनच दिसतंय!' असे उद्गार एकाद्यानें काढले तर 'साधलंय खरं लेकाला!' असा दुसरा कोणी त्याला साथ द्यावयाचा. स्थिर राहील तें प्रेम कसलं? चंचलपणा हें प्रेमाचें मुख्य लक्षण असलें पाहिजे. वसंत मधुपेनें आपल्या या वर्तनाला साथ देईल असें तत्वज्ञानहि बसविलें होतें. बरेच दिवसपर्यंत त्याची मैत्रीण बनण्यांत वत्सलेनेंच थोडेसें यश मिळविलें होतें. वत्सलेच्या अंगसौष्ठवाला व सौंदर्याला तो लोलुप झाला होता पण वत्सलेच्या सौंदर्यालाहि मागें टाकणारी व त्याच्या भरतीला इस्टेट मिळवून देणारी मैत्रीण त्याला आढळल्यावर वत्सलेच्या असहाय्य स्थितींतहि त्यानें तिचा त्याग केला. नुसत्या सौंदर्यापेक्षां सौंदर्य व संपत्ति या दोघांचा लाभ करून देणारें प्रेम अधिक उच्च प्रकारचें. सौंदर्याबरोबर इतर उपभोगाचीं साधनें प्राप्त होण्याची संधी मिळाल्याबरोबर वत्सलेच्या दरिद्री सौंदर्याचा त्यानें साहजिकच त्याग केला व तसें करतांना वत्सलेला कोणत्या अवस्थेंत आपण सोडत आहों, त्याचा त्यानें मुळीं सुद्धां विचार केला नाहीं. पतकरली तर जबाबदारी, एरवीं ही जबाबदारी पदरीं बांधून ती पार पाडण्यास भाग पडणारी व्यवस्था व ताकद समाजांत नाहीं हें त्याला उघडच दिसत होतें.

एक गोष्ट मात्र खरी कीं प्रतिमेनें आपल्याबरोबर गडगंच संपत्ति आणून वसंत मधुपेच्या सर्व रंगेलपणाच्या हौशी मोठ्या चातुर्यानें पुरविल्या होत्या व या उडत्या पांखराला आपल्या प्रेमाच्या पिंजऱ्यांत कायमचें कोंडून ठेवलं होतें. कॉलेजमधील प्रोफेसरी ही वसंत मधुपेची एक करमणूक होती.

वत्सलेचा त्याग करून आठ वर्षे होऊन गेलीं होतीं. आठ वर्षांपूर्वीचा बेजबाबदार वसंत मधुपे व आजचे प्रोफेसर मधुपे यांत पुष्कळच फरक पडला होता. प्रो. मधुप्यांची रंगेल वृत्ति अद्याप ताजी होती तरी सुद्धां माणूस या नात्यानें आपल्यावर कांहीं जबाबदारी आहे व ही जबाबदारी ओळखून व्यक्तिमात्रानें वागावें अशी समाजाची अपेक्षा आहे या मधून मधून उत्पन्न होणाऱ्या जाणिवेनें त्यांच्या रंगेलपणांत विरस उत्पन्न करण्यास सुरुवात केली होती. मुंबईस त्यांच्या डब्यांत सहजगत्या शिरलेल्या कुटुंबांतील पोरानें त्यांच्या मनाला चटका लावून सोडला होता. दोन अडीच तास या पोराला व त्यांचा जो सहवास झाला त्यावरून हा मुलगा खात्रीनें कुणब्याचं पोर नसला पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें होतें व त्यांची मुलें व त्यांचीं पत्नीहि डब्यांत झोंपून गेली तरी याच विचारांनीं त्यांना जागें ठेवलें होतें. मनानें एकदां छळायचें ठरविल्यावर माणूस त्याच्या पुढें टेंकीला येतो. प्रो. मधुपे इतके जेरीला कधींच आले नव्हते. 'वत्सलेशीं आपण बेइमानी केली.' पण या पश्चातापाचा आतां इतक्या वर्षांनंतर काय उपयोग होता?

*

# ८

पौर्णिमेचा चंद्र आपल्या सर्व तेजानें दशदिशा व्यापीत वर येत होता. डोंगर, नदी-नाले, वाटा व आसपासचीं मावळ्याचीं खेडीं पांढऱ्या शुभ्र प्रकाशांत आपलें अस्तित्व प्रकट करूं लागलीं होतीं. पांढरी शुभ्र बैलजोडी जुंपलेली गाडी झपाट्यानें आपलें इच्छित स्थळ गाठण्याकरतां चालली होती. सोनगांवच्या प्रसिद्ध विसूभाऊ सावकारांची ही गाडी होती. गाडीच्या हेलकाव्याबरोबर गाडींत आपल्या मुलीला पोटाशीं धरून बसलेल्या सुभद्राबाईचें अंतःकरणहि हेलकावे खात होतें. आपल्या बरोबरच गाडींत असलेले त्यांचे आश्रित शामभट जोशी गाडीवानाला जलदीनें गाडी हांकण्यास सांगत होते. या गडबडींतच सुभद्राबाई जोशीबुवांना आपल्या यजमानांच्या प्रकृतिमानासंबंधानें खोदून खोदून प्रश्न विचारीत होत्या व जोशीबुवाहि प्रकृति बरी आहे, काळजी करण्याचें कारण नाहीं अशीं मामुली उत्तरें देत होते. सुभद्राबाईचें असल्या उत्तरांनीं थोडेंच समाधान होणार होतें ?

अशा मनःस्थितींतच सुभद्राबाई आपल्या वाड्यांत येऊन पोंचल्या. प्राण कासा-वीस करून सोडणारी दम्याची उबळ थोडीशी थांबून विसूभाऊंना थोडासा आराम वाटलेला पाहून त्यांच्या शुश्रूषेकरतां व समाचाराकरतां जमलेल्या मंडळींच्या चेहऱ्यांवर समाधानाच्या रेषा उमटलेल्या पाहून सुभद्राबाईला थोडेसें हायसें वाटलें. इकडे तिकडे न करतां सुभद्राबाई थेट रुग्णाइताच्या खोलींत गेल्या.

'आलीस. बरें झालें. देवाचीच कृपा म्हणायची तुझी भेट झाली.' विसूभाऊंनीं कसेबसे हे शब्द उच्चारले.

सुभद्राबाई आंत आल्याबरोबर विसूभाऊंच्या पलंगाभोंवतीं जमलेली मंडळी साहजिकच दूर झालीं व खोलींतून बाहेर पडलीं. पलंगावर आपल्या उशाशीं येऊन बसलेल्या सुभद्राबाईच्या मांडीवर डोकें ठेवून आपल्या उजव्या हातानें सुभद्राबाईच्या कमरेला विळखा घालून विसुभाऊ स्फुंद स्फुंदून रडूं लागले.

'कसं होईल माझ्या मालीचं ? '

'हें काय असं अगदीं पोरासारखं. लवकरच चांगले बरे व्हाल. '

सुभद्राबाईनीं हे शब्द उच्चारले पण ते सर्वस्वीं हताश झालेल्या पतीच्या केवळ समाधानाकरतां उच्चारलेले शब्द होते. आपल्या दमेकरी म्हाताऱ्या पतीची या

दुखण्यानें करून टाकलेली अवस्था पाहून त्यांच्या पोटांतहि धस्स झालें होतें. 'दमेकरी माणूस, केव्हां दगा देईल याचा नेम नाहीं' हे शेजाऱ्यांपाजाऱ्यांचे शब्द त्यांनीं कितीतरी वेळां ऐकले होते. यापूर्वी विसूभाऊंना अनेक वेळां दम्याच्या उबळी आल्या होत्या पण या खेपेला आलेल्या उबळीनें त्यांची करून सोडलेली अवस्था पाहून त्याहि घाबरून गेल्या होत्या. विसूभाऊंची प्रकृति या वेळीं फारच चिंताजनक झाली होती. व सुभद्राबाई येण्यापूर्वीच त्यांची प्राणांतिक अवस्था पाहून विसूभाऊंनीं मृत्युपत्र करून आपल्या इस्टेटीची त्यांच्या मनाप्रमाणें व्यवस्था लावावी अशी सूचनाहि त्यांनीं केली होती. पण आपली पत्नी येईपर्यंत त्यांनीं ही गोष्ट लांबणीवर टाकली होती.

पण सुभद्राबाई आल्या. त्याचा प्रेमळ शुश्रूषेचा हात त्यांच्या अंगावरून फिरूं लागला. कांसवी आपल्या पिलांना आपल्या प्रेमळ नजरेनें पोसते अशी एक कल्पना आहे. फारच अर्थपूर्ण आहे ही कल्पना. सुभद्राबाईच्या प्रेमळ नजरेनेंहि हाच चमत्कार घडवून आणला. विसुभाऊंच्या प्रकृतींत सुधारणा होऊं लागली. सुभद्राबाई आपल्या जीवनावर रुष्ट झालेल्या होत्या. विसूभाऊंच्या घरीं आल्यापासून त्यांना काडीमात्र सुख लागले नव्हतें. वयातीत वृद्ध माणसाचें पत्नीत्व तारुण्याच्या भरांत असलेल्या स्त्रियांना साहजिकच असह्य असतें अन् या जीवनांत सुद्धां एखाद्या बटकी प्रमाणें राबण्याचा प्रसंग आला म्हणजे तर तें जीवन तरुण स्त्रियांना नकोसेंच होतें. असें असूनहि काळानें आपल्या सौभाग्यावरच घाला घालण्याचा विचार केलेला पाहतांच आर्यस्त्री आपलीं सर्व दुःखें आपला सर्व छळ विसरून जाते व आपली सौभाग्याची वस्तु सुरक्षित राखण्याकतां प्रत्यक्ष काळाचा प्रतिकार करण्यास ती तयार होते. विसुभाऊंना आपल्या जीवावरल्या दुखण्यांत जो एक मोठा अनुभव आला तो हाच होता. सुभद्राबाईच्या प्रेमळ शुश्रूषेनें त्यांना वारंवार येणाऱ्या दम्याच्या उबळीचा जोर कमी होत चालला पण आतांपर्यंत आपण ज्या रीतीनें आपल्या तरुण पत्नीला वागविलें व पदोपदीं आपण जो तिचा छळ केला त्याच्या स्मृतीनें त्यांचें हृदय होरपळूं लागलें.

पातिव्रत्याची अतिरेकी कल्पना सरंजामशाहीला पोषक आहे व स्त्रीवर्गाला गुलाम बनविण्याला तिनें मदत केली आहे हें खरें आहे. तथापि समाजांत रूढ झालेल्या एखाद्या कल्पनेची दुसरीहि बाजू पाहणें जरूरीचें असतें. ज्या समाजांतील विवाहसंस्था प्रेमप्रधान नाहीं त्या समाजांतील कुटुंबसंस्थांना स्थिरता प्राप्त करून देण्यास असल्या उदात्त कल्पनांचा फार उपयोग होतो. पातिव्रत्याची ही भावना विवाहोत्तर प्रेमाची जननी असते व या प्रेमाचें पोषण करण्याचें व त्याला वाढविण्याचें कामहि ती बेमालुमपणें करीत असते. प्रेमप्रधान विवाहसंस्था असलेल्या समाजाला या भावनेचा उपयोग नसतोच असें नाहीं. प्रेमाचा पहिला भर ओसरूं लागला म्हणजे

पुरुष वर्ग आपल्या सहचारिणीकडून असल्या भावनेची अपेक्षा करीत असतो व आपलें कितीहि बिनसलें असलें तरी कुटुंबस्वास्थ्याच्या दृष्टीनें पुरुषानें आपल्याशीं एकनिष्ठ राहिलें पाहिजे या भावनेची अपेक्षा स्त्रीवर्गहि करीत असतो. चारी बेळा सारख्या नसतात. तेव्हां कुटुंबांतील मुख्य घटक असलेल्या पतिपत्नींना एकत्र व एक-दिल ठेवण्यास असल्या नैष्ठिक कल्पना रूढ करून ठेवण्याची समाजाला गरज असतेच. अतिरेक हा कोठेंहि झाला तरी घातकच. या अतिरेकाला वाव न देणें हें समाजां-तील विचारी नेत्यांचें कर्तव्य असतें. पण जेव्हां या पवित्र भावनेचा फायदा घेतला जातो, स्त्रीवर्गाला गुलाम बनविण्यास या भावनेची मदत घेतली जाते असें आढळून येतें त्यावेळीं समाजनेत्यांच्या कर्तव्यच्युतीचा तो परिणाम असतो व तो समाजाला अधोगतीला नेण्यास कारणीभूत होतो. सुभद्राबाईच्या बापानें पैशाच्या अडचणींत येऊन त्यांना विसूभाऊंच्या स्वाधीन केलें, त्यावेळीं कुलीन आर्यस्त्रीच्या अंगीं स्वाभाविक असलेल्या पातिव्रत्याच्या भावनेच्या भरंवशावरच त्यानें हा कन्याविक्रय केला होता. सुभद्राबाई व विसुभाऊ यांच्यांत प्रेमाचा उद्भव कधींच झाला नव्हता पण त्यांच्या ठिकाणीं असलेली पतिनिष्ठा जागी होती व तीच यावेळीं विसुभाऊंच्या मनाला आराम देणारी व त्यांच्या प्रकृतीला आराम वाटण्यास कारणीभूत झाली होती.

विसूभाऊंच्या दम्यावर योग्य ती औषधयोजना चालूच होती. जरूर तें पथ्य व प्रेमळ शुश्रूषा ही प्रत्यक्ष औषधापेक्षांहि रोग्याला बरा करण्याचें काम अधिक परिणामकारक रीतीनें व त्वरेनें करीत असतात. विसूभाऊंच्या दुखण्याच्या बाब-तींत हाच अनुभव येत होता. विसुभाऊ बरे होण्याच्या मार्गातहि होते पण इतक्यांत त्यांच्या अंतःकरणाला धक्का बसेल व त्याला तळमळायला लावील असा प्रकार घडून आला.

अर्धांगाच्या झटक्यानें लुल्या पांगळ्या होऊन पडलेल्या भागू वन्संनीं आतां कायमचें अंथरुण धरलें होतें. सुभद्राबाई ज्या प्रेमानें व आस्थेनें आपल्या पतीची शुश्रूषा करीत होत्या तितक्याच आस्थेनें व कळकळीनें त्या आपल्या वन्संचीहि अखेरची सेवा करीत होत्या. भागूवन्सं या दुखण्यांतून वांचत नाहींत अशी खात्री झाली होती. औषधी योजनेच्या मर्यादेपलीकडे त्या आतां गेल्या होत्या. अशा स्थितींतच त्यांना दोन दिवस सडकून ताप आला व त्यांतच वाताचा झटका येऊन त्या बडबडूं लागल्या. विसूभाऊपासून भागूवन्संची ही अवस्था लपून राहणें शक्य नव्हतें. दुखणाइत माणसाला—विशेषतः दमेकरी माणसाच्या नाजूक झालेल्या मनाला—धक्का देण्यास त्याच्या मामेबहिणीची ही अवस्था पुरेशी होती. विशेषतः वाताच्या झटक्या-

नंतर सुरू झालेली तिची बडबड त्यांच्या मनाला सारखे धक्के देत होती व त्यांच्या मनाच्या तळमळींत भर टाकीत होती.

विसुभाऊच्या या मामेबहिणीनं आपल्या या बेशुद्धावस्थेंत आपली जन्माची कहाणी सांगण्याचाच जणूं संकल्प केला होता.

'काय मेला बायकांचा जन्म...सगळा जन्म राबण्यांत गेला...चांडाळानं पूर्वजन्मींचा दावा साधला......बारावं वर्ष देखील उलटून गेलं नव्हतं......चांडाळ ग बाई चांडाळ...आपण गेला नि मला त्यानं पोतेरं बनवलं...किती मी किंचाळल्यें, आरडा ओरडा केला, कोण ऐकतो ? मला दावून धरून सोवळी करून टाकलं....'

'वन्सं, स्वस्थ निजा ना, डोळे मिटून घ्या म्हणजे झोप येईल.'

'काय म्हणतेस, डोळे मिटूं ! कायमची डोळे मिटल्यें, मग हो तूं कारभारीण. कोण तुला मग विचारणार ?'

'वन्सं, कां बरं असं बोलतां ?'

'बडबडूं दे आतां तिला एकटीच. ती आतां शुद्धीवर का आहे ? वाटेल तें तिला आतां बडबडून घेऊं दे.' विसूभाऊंनीं खोलींतूनच सुभद्राबाईना बजावलें.

'कां ग, आतां गप्प कां बसलीस ?' भागूवन्सं चमत्कारिक नजरेनं सुभद्राबाईकडे पाहून म्हणाल्या.

'मेल्यांनो, मरस्तंवर माझी हाडं भरडलीत. भोगाल त्याचीं फळं...भोगालच भोगाल...जन्माला येऊन काय केलं काय मी...त्या चांडाळानं मला कायमचं घरीं बसवलं अन् या चांडाळानं... कुठं आहे तो चांडाळ...'

भागू वन्स जणूं कांहीं कुणाला हुडकूनच काढीत आहेत अशा नजरेनं चोंहोंकडे पहात होत्या. वन्संच्या या जहरील्या नजरेकडे पाहून सुभद्राबाई भिऊन गेल्या.

'अन् या चांडाळानं, कुठं आहे तो......चांगला नरकांत पिचून पिचून निघत असेल...मला सर्वस्वी लुबाडलंन्, मला अन्नवस्त्रालाहि मोताद करून सोडलंन्. देवापुढं ठेवायला एक पैसा मागितला तरी त्या चांडाळानं मला दिला नाहीं...माझी जमीन, माझे पैसे माझ्यापाशीं असते तर...किती थापा मारल्यान् मेल्यानं...तुझ्या मांडीवर दत्तक मुलगा देतो, तुझं घर उभं करून देतो...सगळे कागदपत्र सगळे दागिने मी त्याच्या स्वाधीन केले...सगळं हबकून बसला...मला आपल्या घरांत बटिक बनवली...बटिकसुद्धां काम करणार नाहीं इतकी मी राब राब राबल्यें...चोवीस तास राबल्यें...वर्षोन वर्षं राबल्यें...कोणतं काम मी केलं नाहीं. किती बाळंतपणं केलीं...किती गुयेलीं मुतेलीं धुतलीं...किती भांडीं धुणीं केलीं...माझी जमीन, माझा पैसा माझ्या जवळ राहता तर...' भागू वन्संला आतां ग्लानी येऊं लागली. पण ती थोडा वेळच.

'कुठं आहे तो विश्या...त्यानं तरी काय केलं...मेल्यानं एका पातळावर दुसरं पातळ सुद्धां घेतलं नाहीं. कुठं तरी क्षेत्रांत मी राहिल्यें असत्यें...देऊळ बांधला असतं. देवा! तुझ्या घरीं राबल्यें असत्यें तर...बायकांचा जन्म...राब राब राबावं... जात्यें अं सुभद्रा, जात्यें बरं!' सुभद्राबाईच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले 'नष्ट मेलीं सगळीं माणसं...कोण सुभद्रा, माझी लाडकी वैनी...केव्हां आलीस...मी आतां तुला नाहीं छळायची...' भागूवन्संचा आवाज खोल जात चालला.जीभ लटकी पडूं लागली. 'सुभद्रा, वैनी, वैनी, देव तुझं भलं करो,' वन्संच्या तोंडांतून आतां शब्द उमटेनासा झाला. दोन दिवस अशाच बेशुद्धावस्थेंत त्या पडून होत्या. पण चमत्कार असा कीं तिसऱ्या दिवसापासून भागू वन्संच्या प्रकृतींत फरक पडूं लागला. दोन तीन महिन्यांनीं त्या माणसांत आल्या. पण जीवंत प्रेतापेक्षां त्यांच्या जीवनाला कांहीं अर्थ राहिला नव्हता.

विसुभाऊंना येणारी दम्याची उबळ जरी कमी झाली होती तरी त्यांची अशक्तता वाढत्या प्रमाणावर होती. विसुभाऊंना पूर्ण विश्रांतीची जरूरी असून त्यांचें मन संतप्त होईल किंवा त्यांच्या मनाला अस्वस्थता प्राप्त होईल असें कोणतेंहि कृत्य होतां कामा नये, अशी पूर्ण सावधगिरी बाळगण्याबद्दल डॉक्टरांनीं सुभद्राबाईंना पुनः पुन्हां बजावून सांगितलें होतें. हळूं हळूं त्यांना शक्ति येऊं लागेल, औषध तें काम करील, पण मनाला पूर्ण स्वास्थ्य मिळालें नाहीं तर औषधाचा कांहीं उपयोग होणार नाहीं असा विसुभाऊंच्या पूर्ण विश्वासांतल्या वैद्यांनीहि सल्ला दिला होता.

संध्याकाळची वेळ, गुरें रानांतून गावांत येऊं लागलीं. विसुभाऊंच्या वाड्यांतला गोठा गुरांनीं भरून गेला. सोनगांवीं आल्याबरोबर दासू आपल्या कामाला लागला होता. आंत आल्याबरोबर त्यानें व ग्यानबानें आपल्या डोक्यावरचे हिरव्याचार गवताचे भारे खालीं टाकले. घरांतल्या, रानांत न जाणाऱ्या दुभत्या गायीकरितां व म्हशीकरतां हे भारे आणण्यांत आले होते. दासूनें व ग्यानबानें सर्व गुरें जागच्याजागीं बांधलीं. ग्यानबानें बैलांच्या पाठीवरून थापा मारल्या. गोठ्यांतला कंदील शिलगांवून गोठ्यांतल्या मध्यभागीं लोंबकाळणाऱ्या लोखंडी आंकड्याला टांगला. वात खालीं सारून तो मिणमिणा केला.

'दास्या आला का, काय करतंय तरी काय?' विसुभाऊंनीं आपल्या जागेवरून विचारणा केली.

'आतांच तो गुरांबरोबर आला. गुरांना दावणींना बांधतोय.' सुभद्राबाईनीं उत्तर दिलें.

'ही भरलेली पिकदाणी मोकळी करून धुवून आणायला सांग त्याला.'

'हीं सगळीं कामं मी करत्यें आहे ना ! तो कशाला ? बाहेरचीं सगळीं कामं तो करतो आहे तें ठीक आहे !' सुभद्राबाईनीं उत्तर दिलें.

विसूभाऊ व सुभद्राबाई यांच्यांत दासू विषयीं बोलणें चालू असतांच पांडोबा दळवी वाड्यांत दाखल झाला.

विसूभाऊ हल्लीं दम्यानें बरेच आजारी आहेत, हें त्याला येथें येण्यापूर्वीच समजलें होतें. तो जो वाड्यांत आला तो थेट विसूभाऊंच्या खोलींतच शिरला. व त्यानें दासूला परत नेण्याकरतां आपण आलों असल्याचें विसूभाऊंना सांगितलें.

'काय म्हणतोस काय, दारड्याला तूं घेऊन जाणार ! घेऊन जा त्याला पण अगोदर ते पन्नास रुपये इथं मोजून ठेव व मग त्याला हात लाव.'

'पन्नास रुपये तुमचे मी घेतले होते व त्याप्रमाणं दोन अडीच वर्ष त्यानं तुमच्याकडे काम केलंच कीं नाहीं...'

'हरामखोर, काय म्हणतोस दोन अडीच वर्ष आमच्याकडे तो राहिला. तूं काय करार केला होतास माहित आहे ?' विसूभाऊ पांडोबाचें बोलणें संपण्यापूर्वीच खसकन ओरडून म्हणाले.

सुभद्राबाईनीं या वेळीं फारच प्रसंगावधानानें काम घेतलें. हें प्रकरण आतां हातघाईवर जाणार हें त्यांनीं पक्कं जाणलें. विसूभाऊंच्या नाजूक मनःस्थितींत असलें कांहीं होऊं देणें चांगलें नव्हे हेंहि त्यांच्या पक्कें लक्षांत येऊन चुकलें.

'हें पहा, पांडोबा, तुम्ही थोडं बाहेर बसा. वादावादी करण्याची ही वेळ नाहीं. मीच काढत्यें त्यांची समजूत.'

पांडोबानें सुभद्रावाईच्या चेहऱ्यावरील भाव ओळखला. दासूला परत घेऊन जाण्याचा हाच तर चांगला मोका होता.

'दासूला परत नेल्या...'

'तुम्हांला काय मी सांगितलं ? येथून तुम्ही बाहेर जा पाहूं.' सुभद्राबाईनीं त्याला दटावलें.

अर्धे अधिक यश आपण मिळविलें असें जाणून पांडोबा आजाऱ्याच्या खोलीं-तून बाहेर येऊन पडवींत जाऊन बसला.

'पाहिलीं हीं कुणबटं, अश्शीं हीं बदमाष, पाजी असतात.'

'आपल्याला काय करायचंय. पन्नास रुपये त्याच्याकडून घेतल्याशिवाय दासूला मी त्याच्या स्वाधीन करीत नाहीं. मग तर झालं.'

'तें कांहीं नाहीं, त्यानं माझ्यासमोर रुपये मोजून ठेवले पाहिजेत.'

'सगळं कांहीं होईल. आपण मनाला त्रास करून घेऊं नये.' असें थोड्याशा

अधिकारवाणीनेंच त्यांनीं विसूभाऊंना सांगून त्यांचें मन स्वस्थ केलें. प्रेमळ शुश्रूषेनें त्यांनीं हा अधिकार आपल्याला प्राप्त करून घेतला होता.

औषधाचा डोस देण्याची वेळ झालेली पाहून त्यांनीं विसुभाऊंना पेल्यांत औषध ओतून दिलें. औषध घेऊन झाल्यावर त्यांच्या हातावर त्यांनीं पेपरमिंटाची चौकोनी पांढरी वडी ठेवली व पिकदाणीचें तस्त हातांत घेऊन त्या बाहेर पडूं लागल्या.

‘ दासज्याला सांगावं कीं नाहीं पिकदाणी न्यायला. ’ विसुभाऊ म्हणाले.

‘ मला कोणी मदत करायला नको या बाबतींत. शिवाय तो तरी आपल्यापाशीं कुठं आतां राहतोय ? ’

‘ पहा तुमच तुम्ही पहा. मी नाहीं आतां कांहीं बोलत. ’ सुभद्राबाईनीं विसुभाऊंवर जो अधिकार जमविला होता तो असा होता.

सुभद्राबाई बाहेर आल्या. बाहेर पडवींत पांडोबा बसलाच होता. ग्यानबा सुभद्राबाईच्या हातांतली पिकदाणी घेण्याकरता आपला हात पुढं करीत होता इतक्यांत दासूनेंच लगबग करून त्यांच्या हातांतली पिकदाणी घेतली व ती धुवून टाकण्याकरतां तो मागच्या परसांत निघून गेला.

सुभद्राबाईनीं वर सोप्यावर पांडोबाला बोलावलें. त्या झोंपाळ्यावर बसल्या. पांडोबा खालीं पडवीच्या चौथऱ्यावर बसला.

‘ का, दासज्याला मी केव्हां घेऊन जाऊं ? ’ त्यानें घाईघाईनें प्रश्न विचारला.

सुभद्राबाई झोंपाळ्यावर बसल्या होत्या त्याच्या समोरच देवघर होतें. देवा पुढला नंदादीप मिणमिणत होता त्याला त्यांनीं आंत उठून जाऊन सतेज केलें. त्या पुन्हां झोंपाळ्यावर येऊन बसल्या.

‘ काय विचारायचं तें हळूच बोलून विचारा. ’ असें त्यांनीं प्रथम पांडोबाला बजावून सांगितलें.

दासूला नेण्याकरतां तो आला आहे व तो त्याला आतां घेऊन जाणार या विचारानें त्यांची मुद्रा चिंताग्रस्त झाली होती. नंदादीपाच्या त्यांच्यावर पडलेल्या अंधुक प्रकाशांतहि पांडोबाच्या नजरेस ही गोष्ट आलेली होती. पन्नास रुपये देऊन दासूला आपण कायमचें विकत घेतलें आहे या कल्पनेमुळें विसुभाऊ दासूला फुकट हातचा सोडण्यास तयार नव्हते. सुभद्राबाईच्या मनांत तसा विचार येणें शक्य नव्हतें. सुभद्राबाईंना जी काळजी वाटली ती निराळ्याच स्वरूपाची होती. मुंबईहून दासूला घेऊन सुभद्राबाई परत आल्या त्या वेळीं ‘ या पोराची चांगली काळजी घ्या बरं ’ असें एकामागून एक तिघांकडून त्यांना बजावण्यात आलें होतें. या तिघांना उलट आश्वासन

देऊन दासूला संभाळण्याची जबाबदारी त्यांनीं पतकरली होती. वास्तविक तसें करण्याचें प्रयोजनहि नव्हतें व या तीन्ही प्रसंगीं त्या ज्या घाईत व काळजींत होत्या त्याचा विचार केला असतां असें समाधानकारक आश्वासन देणेंहि त्यांना शक्य नव्हतें.

गरीब, सालस, गोरागोमटा, देखणा, हुशार पण अनाथ असा हा पोर वाया जाऊं नये, आपल्या बहिणीकडे तो लहानाचा मोठा व्हावा अशा केवळ भूतदयेच्या भावनेनें रमाबाईनं त्यांना असें बजावलें असेल हें त्या जाणत होत्या.

पण वत्सलेनें त्यांना असें बजावलें त्या वेळीं सुभद्राबाईना थोडें चमत्कारिक वाटलें होतें. ज्या आवाजांत वत्सलेनें हे शब्द उच्चारले होते, त्यांतील मार्दव, आस्था, प्रेमळपणा, आपलेपणा त्यांना त्या वेळीं तीव्रतेनें आठवला व हळुवार भावना व्यक्त करणारे तिचे किंचित् ओलसर झालेले डोळे व गोरामोरा झालेला तिचा चेहरा त्यांच्या मनश्चक्षूंपुढें वावरूं लागला.

प्रो. मधुप्यांनीं या पोरासंबंधानें काळजी घेण्यास सांगितलें तेव्हां मात्र त्यांच्या आश्चर्यास पारावार राहिला नव्हता. डब्यांतील कुटुंबाचा निरोप त्यानीं घेतला त्या वेळीं सहज शिष्टाचाराची ही गोष्ट असेल असें त्यांना वाटलें पण आतां पांडोबा दासूला घेऊन जाण्याकरतांच आला त्यावेळीं या सर्व त्यांच्या आठवणी ताज्या झाल्या.

कोणाकरितां नसलें तरी निदान वत्सलेकरितां तरी आपण दासूला आपल्यापासून दूर करूं नये असें त्यांचें मन त्यांना सांगूं लागलें.

विसुभाऊंची दृष्टि केवळ पैशापुरती. पैशाकरतां गहाण ठेवलेल्या वस्तूप्रमाणें पैशाची फेड करावी व गहाणाची वस्तु परत घेऊन जावी अशा साध्या व्यवहाराप्रमाणें त्यांनीं या गोष्टीची विल्हेवाट लावली. मेहेरबानी हीच कीं या रुपयांवरचें व्याज त्यांनीं मागितलें नाहीं. जवळ बसलेल्या आपल्या पत्नीचें त्यांना भय वाटलें असेल का? कांहीं असो, त्यांना या वेळीं मनाचा इतका हलकेपणा दाखविण्याचें धैर्य झालें नाहीं हेंच खरें.

झोपाळ्यावर पांडोबाबरोबर या प्रश्नाचा निर्णय करण्यापूर्वीं त्यांच्या मनांत वरील विचार भराभरा येऊन गेले.

'हें पहा, पांडोबा,' सुभद्राबाईनीं आपण होऊनच या प्रश्नाला तोंड फोडलें. 'दासूला तुम्ही आमच्या घरींच ठेवावा, त्याला घेऊन जाऊं नये अशी माझी तरी इच्छा आहे.'

'म्हणजे, म्हणतां काय? दासड्याला मी कायमचा विकून टाकला नाहीं.'

'असं इतकं निकरावर यायचं कांहीं कारण नाहीं. बोलूनचालून तो तुमचा मुलगा, असंच ना?' पांडोबाकडे त्यांनीं तीव्र नजरेनें पाहिलें.

'होय, होय, माझाच तो मुलगा आहे. मी त्याला लहानाचा मोठा केला आहे.'

‘ मी कुठं म्हणत्येंय नाहीं म्हणून ! पण तुम्ही त्याला लहानाचा मोठा केला तसाच तो आतां आमच्याकडे राहूं द्या. अजून तें लहान पोरच आहे, तें आमच्याकडं मोठं होऊं द्या. त्याचा मी सांभाळ करीन.’ सुभद्राबाई म्हणाल्या.

‘ वाहवा रे लाघवीपणा. मी त्याला नाहीं फसणार ! सावकारांची ती तऱ्हा अन् तुमची ही तऱ्हा ! माझा पोरगा मी घेऊन जाणार ! ’

‘ अहो तुमच्या पोरावर तुमचा हक्कच आहे. पण दोन वर्षापूर्वी तुम्ही आमच्याकडे त्याला आणून ठेवलंच ना ! तसाच तो यापुढंहि राहूं दे. ’

‘ माई तुम्ही कितीहि पोटांत शिरलांत तरी मी कांहीं फसायचा नाहीं. ’

‘ हळूं बोला. खरं सांगूं, मला मुळींच तुम्हाला फसवायचं नाहीं. गेलीं दोन अडीच वर्षं तो आमच्याकडे आहे असाच तो आमच्याकडं राहूं दे एवढंच माझं म्हणणं. ’

‘ कळलं, कळलं, असाच तो राहूं दे तुमच्याकडं चार तुकड्यांसाठीं राबायला. त्या पोराचे इथं काय काय हाल झाले हें मला सगळं समजलंय. गुलामासारखं चोवीस तास पोर तुमच्याकडं राबतं, ना धड त्याला अंगावर कपडा, न पांघरायला कांबरून. ’

‘ ज्यांच्या घरीं तुम्ही त्याला आणून ठेवलं ते त्याला कसं वागवतील हें तुम्हाला माहीत होतं. खरं सांगा पांडोबा, दासू तुमचा मुलगा आहे ? ’ सुभद्राबाईंच्या तोंडून हे शब्द बाहेर पडतात न पडतात इतक्यांत पिकदाणी चांगली घासून चक्क करून दासू सोप्यावर आला व ती आंत भिमुभाऊंच्या कडे नेऊन ठेवूं का असें त्यानें नजरेनें सुभद्राबाईंना विचारलें.

‘ नको, इथंच ठेव. आंत त्यांच्या खोलींत तूं आतां जाऊं नको. वैद्यांचं घर तुला माहित आहे ना ? त्यांच्याकडून औषध घेऊन ये.’ सुभद्राबाईंचे शब्द त्यानें ऐकले पण त्याबरोबरच तेथें खालीं खांबाजवळ बसलेल्या पांडोबालाहि त्यानें पाहिलें. दोघांची दृष्टादृष्ट झाली.

‘ पांडोबा का आला ? आपल्याला तो घेऊन तर जाणार नसेल ? ’

दासूच्या मनांत विचार आला व त्याची वृत्ति विचलित झाली. सुभद्राबाईंच्या सांगण्याप्रमाणें त्याला वैद्याकडे जावयाचें होतें.

दासूच्या अंगावर आतां लक्तरें नव्हतीं. मुंबईला जी शॉर्ट व शर्ट त्याला करून दिला होता तोच त्याच्या अंगावर होता. गेल्या दोन वर्षात तो चांगला सुधारला होता. त्याच्या चेहऱ्यावर व डोळयांत हुशारीचें तेज चमकूं लागलें होतें. हें सर्व पाहून ज्या कामाकरतां दासूला घेऊन जाण्याचें पांडोबानें ठरविलें होतें त्या कामाकरतां तो योग्य आहे असें त्याला वाटूं लागलें. अन् दासूला कांहीं झालें तरी आपल्या बरोबर घेऊन जावयाचेंच असें त्यानें आपल्या मनाशीं निश्चित केलें.

‘हो, माझाच तो मुलगा आहे व मी त्याला माझ्या बरोबर घेऊन जाणार,’ असें त्यानं सुभद्राबाईला पुन्हां एकदां सांगितलें.

‘मी तुम्हाला असं कुठं म्हणत्यें आहे कीं त्याला तुम्ही घेऊन जाऊं नका म्हणून? पण पांडोबा, तुम्ही कांहीं म्हणा, दासू तुमचा पोटचा पोरगा नाहीं हें तर खरं आहे ना?’

‘होय, तें मुद्दा खरं आहे. तो माझा प्रत्यक्ष पोटचा मुलगा नसला तरी माझ्या पहिल्या बायकोनं त्याला आपलं थान पाजून लहानाचा मोठा केला आहे.’

‘मी तरी तेंच म्हणत्यें. तुम्ही जेव्हां प्रथम आमच्या घरीं दासूला ठेवून त्याच्याबद्दल पन्नास रुपये घेऊन गेलांत त्या वेळींच मला ही गोष्ट त्यांच्याकडून थोडीबहुत समजली होती. तुम्ही त्याला इतके दिवस संभाळलंत, यापुढं मला तो द्या, मी त्याचा संभाळ करीन.’

‘तें मात्र कधींच व्हायचं नाहीं. आपला मुलगा म्हणून माझ्या पहिल्या बायकोनं त्याला आपल्या थानाशीं लावलं अन् तिची आठवण म्हणून मी त्याला घेऊन जाणार.’

‘इथं सुद्धां तुमची आठवण म्हणून त्याला आमच्याकडं ठेवा ना! तुमची कांहीं अडचण असली तर ती मी पुरी करीन.’

‘अस्सं, अस्सं, तें कांहीं नाहीं. एकदां मी पोराला पैशाकरतां विकलं, आतां पुन्हां मी तसं करायला तयार नाहीं. आतांच सावकारांनीं पहिले दिलेले पन्नास रुपये मोजून मागितले. इतके दिवस माझ्या पोरानं तुमच्याकडं हाडं झिजविलीं, पुन्हां पैसे पाहिजेतच. माझ्यापाशी पैसे नाहींत. तुमच्याकडं त्यानं भाकरीचा तुकडा खाल्ला तरी त्याच्या चौपट त्यानं कामहि केलं आहे. पैसे बिसे कांहीं नाहींत. मी त्याला तस्सा घेऊन जाणार.’

‘हळूं बोला म्हणून मी सांगत्येंय ना तुम्हाला?’

‘हळूं कशापायीं, चोरीचा मामला थोडाच आहे?’

‘ते आजारी आहेत. तुला माहीत आहे ना!’

‘आजारी आहेत!’ पांडोबानें आवाजाची उंची थोडी कमी केली.

‘अन् परवां मी गांवीं आलों त्यावेळीं वाईट बातमीहि मी ऐकिली होती. तुमचं कुंकूं व काकणं बळकट. आजारी आहेत. भरंवसा नाहीं. पण पैशाचा लोभ नाहीं सुटत.’

‘पांडोबा, मला पैशाची गरज नाहीं. खरं सांगाल तर मला त्याच्या कामाचीहि गरज नाहीं. माझ्या मालीप्रमाणंच मी त्याचा यापुढं सांभाळ करीन. तुमची अडचण पाहिजे तर भागवीन असं मी तुम्हाला म्हटलं तें तो आमच्या घरीं राबवायला

सांपडावा म्हणून म्हटलं नाहीं. त्याचा मला लळा लागला आहे व त्यालाहि माझा लळा लागला आहे म्हणून म्हटलं.'

'कितीहि लळा लागला तरी तें कुणब्याचंच पोर ना, तें तुमच्या गादीवर थोडंच बसायचं आहे. लळा, तुमचा थोरामोठ्यांचा लळा कसला? मी तरी त्याला माझा मुलगा म्हणूनच संभाळायला नेतों आहें. कसला लळा न् कसलं काय आम्हां कुणब्यांना तें कांहीं समजत नाहीं.'

'नाहीं, तें कुणब्याचं पोर नाहीं......'

'काय चाललंय काय तिकडं इतकं हितगुज. पांड्या अजून गेला नाहीं का?' आजारी माणसाच्या खोलींतून आवाज ऐकूं आला.

'अग बाई, मी आंत जाऊन येत्यें. बसा थोडा वेळ इथं.' असें म्हणून सुभद्राबाई लगबगीनें विसुभाऊंच्या खोलींत आल्या. त्या आंत यायला न् विसुभाऊंना दम्याची उबळ यायला एकच गांठ पडली. सुभद्राबाईनीं आपल्या पतीच्या मानेला हात देऊन उठविलें, त्यांना तक्याशीं टेंकून बसविलें. दम्याची उबळ आली कीं ती माणसाचा जीव कासावीस करून सोडते. विसुभाऊंची तब्येत इतकी नाजूक झाली होती कीं असली एकादी उबळ आली कीं त्यांची प्राणांतिक अवस्था होत असे. दुखणेकऱ्याला या वेळीं होत असलेले कष्ट पाहात बसण्या शिवाय त्याच्या जवळच्या माणसाला कांहीं करतां येत नाहीं. दोन तीन मिनिटांनीं दम्याच्या या उबळीचा जोर कमी झाला, विसुभाऊंना हायसें वाटलें त्यापेक्षांहि सुभद्राबाईच्या मनाला जास्त बरें वाटलें. दासू औषधाच्या पुड्या घेऊन आला होता. त्याला त्यांनीं आंत बोलावलें. पुड्यांबरोबर आलेल्या चिठ्ठीप्रमाणें त्यांनीं एक पुडी मधांत कालवून विसूभाऊंला चाटण्याकरतां दिली. उशीवर डोकें टेकतांच विसूभाऊंनीं पुन्हां पांडोबाची चौकशी केली. 'पोराला आमच्याकडेसच ठेवण्यास तो तयार नसला तर पैसे मोजल्याशिवाय पोराला त्याच्या बरोबर जाऊं देऊं नका. बरा असतों तर ...'

'जाऊं दे, तें सर्व मी पाहत्यें. आपण उगाच विचार करूं नये. स्वस्थ पडून रहा कसे!'

'काय ही पैशाची हांव, क्षणाचा भरंवसा नाहीं.' सुभद्राबाईचें मन या विचारांनीं कचरलें. आपण आपल्या पतीसंबंधानेंच हा विचार करतों आहों ना! आपल्याला असा विचार करणें शोभत नाहीं असे त्यांच्या मनानें त्यांना दूषण दिलें.

विसुभाऊंच्या अंगावर पांघरूण घालून त्यांच्या अंगावर त्यांनीं हात फिरवला व ते दमून जाऊन शांतपणें पडून राहिले आहेत असें पाहिल्यावर त्या पुन्हा बाहेर आल्या.

आपल्याला येथून घेऊन जाण्याकरतां पांडोबा येथें आला आहे हें दासूला आतां पक्केपणीं समजलें होतें. पांडोबाला पाहिल्या बरोबरच तो घाबरून गेला होता. आतां हा आपल्याला इथून घेऊन जाणार व माई आपल्याला या पुढें दिसणार नाहींत या कल्पनेनें तर त्याला जास्तीच गर्भगळित केलं होतं.

'दासू, पांडोबा तुला आपल्या घरीं नेण्याकरतां आले आहेत. त्यांच्याबरोबर जातोस ना?'

दासू या प्रश्नाला काय उत्तर देणार?

'माई, तुम्हा सोडून मी कुठं जाणार नाहीं' असें कांहीं तरी तो म्हणेल अशी सुभद्राबाईंची कल्पना. पण ती खोटी ठरली. दासूच्या तोंडून एकहि शब्द बाहेर पडला नाहीं. पांडोबा आपला धनी आहे. त्यानें आपल्याला येथें आणून सोडलें, आतां तो आपल्याला घेऊन जाणार. तो घेऊन जाऊं लागला तर आपल्याला त्याच्याबरोबर गेलेंच पाहिजे. बैलाला नाहीं का त्याचा धनी हांकून घेऊन जात? अशीच त्याची कल्पना.

'त्याला काय विचारतां? माझा मुलगा मी घेऊन जाणार! त्याला काय विचारतां?' पांडोबा उद्गारला.

दासूला जें काय कळत नव्हतें तें हेंच. विसूभाऊंच्या घरीं आल्यापासून 'अनाथ पोर, ना आई ना बाप!' असेच त्यानें अनेक वेळां अनेकांच्या तोंडून आपल्या संबंधानें निघालेले उद्गार ऐकले होते. आपल्याला आई नाहीं व बापहि नाहीं अन् पांडोबा आपल्याला 'मुलगा' 'मुलगा' काय म्हणतो? विसुभाऊंच्या घरीं राहून व रमाबाईच्या मुलांचा जो प्रकार त्यानें पाहिला त्यावरून आई म्हणजे काय हें त्यास समजूं लागलें होतें. त्यामुळें मालीप्रमाणें सुभद्राबाईनाच ती आपली आई आहे असें तो मानूं लागला होता व त्याच्या भावनेला पोषक होईल अशा प्रेमळपणानें सुभद्राबाईहि त्याला वागवीत होत्या.

पांडोबाची दृष्टि व त्याच्या बोलण्यांतला जोर पाहून त्याच्यापुढें कांहीं बोलण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं.

'माईना सोडून मी कुठं राहणार नाहीं' असें त्यानें मुंबईस असतांना एकदां म्हटलें होतें तसेंच त्यानें यावेळींहि म्हटलें असतें तरी त्याचा कांहीं उपयोग झाला नसता हें सुभद्राबाईंना पांडोबाच्या आजच्या वर्तनावरून कळून चुकलें होतें.

'बरं तर पांडोबा, दासूला नेणार तर न्या. मी कांहीं तुमच्या आड येत नाहीं. मला वाटलं होतं तुम्ही त्याला आमच्या पाशींच ठेवाल. पण तुमचा विचार तसा दिसत नाहीं. पण पैशाचं काय करणार?'

'पैसे? माझ्यापाशी कवडीहि नाहीं.' पांडोबानें साफ सांगितलें.

विसुभाऊपर्यंत हें प्रकरण यापुढें न नेतां पांडोबाच्या स्वाधीन दासूला करून त्याला जाऊं दिला तर पैशाची चौकशी ते करणारच. पांडोबानें पैसे दिले नाहींत, तसाच तो दासूला घेऊन गेला असें विसुभाऊंना सांगायची सोय नव्हती. पैसे देऊन घेऊन गेला असें खोटें तरी कसें सांगणार ?

हा पेंच सोडवायचा कसा ? विसुभाऊंच्या मनाला यत्किंचितहि त्रास न होतां हें प्रकरण मिटवायचें कसें ?

सुभद्राबाईच्या मनांत एक विचार चमकला.

ग्यानबा गाई म्हशीची धार काढण्याकरतां व गुरांपुढें वैरणकाडी टाकण्याकरतां आला होता तेव्हा दासू अर्थात् तिकडे सहाजिकच निघून गेला होता.

‘ हें पहा पांडोबा आतां असं करा, दासूला घेऊन जाऊन तुम्ही माझं मन दुखविणारच आहां; पण यामुळं त्यांच्या मनाला त्रास न होईल याची खबरदारी घेतली पाहिजे. प्रकृति कशी तोळा मासा झाली आहे. आतां रात्रीं तर त्याला तुम्हीं कुठं घेऊन जात नाहीं. एक गोष्ट मात्र माझी तुम्ही ऐकलीच पाहिजे. उद्यां सकाळींच या. पैशाची व्यवस्था मी करत्यें. मात्र ही गोष्ट तुम्ही कोणापाशीं बोलतां कामा नये. पैसे त्यांच्या समोर मोजा व तुमच्या पोराला तुम्ही घेऊन जा. ’

पांडोबा थक्कच झाला सुभद्राबाईची ही तजवीज पाहून.

गांवातल्या आपल्या एका नातेवाइकाकडे पांडोबा निघून गेला.

विसूभाऊंनीं पथ्यपाणी झाल्यावर पांडोबाची चौकशी केली.

‘ उद्यां तो दासूला घेऊन जाणार आहे. ’

‘ पैशाचें काय ? ’

‘ करील कांहींतरी व्यवस्था. ’

आपल्या पतीच्या या स्वभावाबद्दल सुभद्राबाईंना कींव वाटली पण त्याच बरोबर कसें का होईना त्यांच्या मनाला त्रास न होतां हें प्रकरण मिटविण्याची आपल्याला युक्ति सुचली याबद्दल त्यांना त्यांतल्या त्यांत समाधान वाटलें.

सकाळीं चार घटका दिवस आल्यावर पांडोबा विसुभाऊंच्या वाड्यांत दाखल झाला. त्यानें दहा दहांच्या पांच कोऱ्या नोटा विसूभाऊंच्या पुढें ठेवल्या.

सुभद्राबाईंनीं दासूला आज कोठें पाठविलें नव्हतेंच. पांडोबा विसूभाऊंच्या खोलींतून बाहेर येण्यापूर्वीच सुभद्राबाई बाहेर सोप्यावर आल्या होत्या. त्यांनीं दासूला हृदयाशीं घट्ट धरलें. त्यांनीं त्याच्या दोन्ही गालांचे मुके घेतले. मनाला मोठ्या धैर्यानें आंवरून दासूला त्यांनीं पांडोबाच्या स्वाधीन केलें. पांडोबानें प्रत्यक्षच हातांत धरून दासूला चालविलें त्यावेळीं आधींच हुंदके देऊं लागलेल्या दासूला कोठून धैर्य आलें कोणास ठाऊक ? त्यानें पांडोबाचा हात झिडकारला.

'नाहीं मी माईना सोडून कुठं जाणार!' असें म्हणून त्यानें सुभद्राबाईंच्या पायांना विळखा घातला.

'काय झालंय काय, त्या कार्ट्याला!' विसूभाऊंच्या खोलींतून आवाज ऐकूं आला.

इतका वेळ आपण घेतलेली खबरदारी वायां जाणार असें वाटून सुभद्राबाईनीं रागाचा आविर्भाव चेहऱ्यावर आणला. दासूच्या हातांची मिठी त्यांनीं सोडविली. 'तुझ्या बापाबरोबर तुला गेलं पाहिजे' असें दासूला त्यांनीं दटावून सांगितलें. दासूचा चेहरा खर्रकन् उतरला. आपल्या असहाय्यतेची त्याला जाणीव झाली. पांडोबानें त्याचा उजवा हात जोरानें दाबून धरला व त्याला तो दरवाज्याकडे घेऊन चालला. सुभद्राबाईंचा रागाचा आविर्भाव व दटावणें केवळ तेवढ्यापुरतेंच होतें. क्षणापूर्वीं रागीट दिसलेल्या सुभद्राबाईंचे डोळे पाण्यानें भरून आले. दरवाज्यापर्यंत त्या पांडोबाला पोंचवायला गेल्या. दासूने दरवाज्याबाहेर गेल्यावर पुनःपुन्हां सुभद्राबाईंकडे पाहिलें. तोहि मुसमुसत होता. पांडोबा व दासू दृष्टीआड होईपर्यंत सुभद्रबाई दरवाज्या बाहेर उभ्या होत्या.

आंत येऊन हताश झाल्या सारख्या त्या पडवीच्या पायरीवरच बसल्या. त्यांचें सांत्वन करायला वाड्यांत आज कोणीच नव्हतें. गडीमाणसांपैकीं ग्यानबाच काय तो जास्त घरोब्याचा. पहांटेच गुरें सोडून त्यांना चारण्याकरतां घेऊन तो रानांत गेला होता.

पांडोबा हल्लीं कोठें असतो, त्याच्या घरची स्थिती काय, दासूला तो कोठें घेऊन जाणार होता, हें कांहींच कसें आपण त्याला विचारलें नाहीं? या सर्व गडबडींत तें राहूनच गेलें. या विचारानें तर त्यांचें मन अधिकच अस्वस्थ झालें. आपल्या पतीच्या नाजूक मनाची आपण काळजी घेतली ती तर घ्यायलाच पाहिजे होती: आपण केवळ आपल्या पायापुरतेंच पाहिलें. 'दुसरें कोणाचें राहो पण उद्या कधींमधीं वत्सलेची गांठ पडली व तिनें दासूची चौकशी केली तर तिला काय सांगणार? दासूला ज्यानें जसें आमच्या घरीं आणून ठेवलें तसें तो त्याला घेऊन गेला हेंच का तिला मी सांगणार? काय मी हा गबाळेपणा केला! किती मी स्वार्थी!'

पण असल्या विचारांचा आतां कांहींच उपयोग नव्हता.

# ९

पौर्णिमेची रात्र. पण आकाशांत ढगावर ढग येऊन एकमेकांना चाटून जाण्याची ते स्पर्धा करीत असल्यामुळें चांदण्याचें मातेरें होऊन गेलें होतें व राधामंदिरासमोरील फूटपाथवर निजून राहिलेल्या मजुरांची मनें यामुळें उदास बनलीं होतीं.

' नाम्या, लेका, आज पाणी तर पडणार नाहीं ? '

' पडलं तर पडलं. आपण समोरच्या त्या जिन्याखालची जागा गांठूं म्हणजे झालं ! पांड्या, तूं असा घाबरट कसा ? '

निमगांवाहून शहरांत मजूरी करण्याकरतां हे दोघे मित्र आले होते. निमगांवांत शेतीच्या मजूरीला कंटाळून शहरांत जास्त मजूरी मिळेल या आशेनें शहरांत आलेले हे दोघे मित्र होते. नामदेव तर फटिंग होता. त्याच्यामागें कोणताच पाश नव्हता. पांडोबानें एका मागून एक दोन लग्नें केलीं पण दोघी बायकांनीं एकीमागून एक इहलोक सोडून पांडोबाला दगा दिल्यामुळें तोहि आतां फटिंग बनला होता. कर्जवाम करून कां होईना, पांडोबानें संसार थाटण्याचा प्रयत्न एकदांच नाहीं, दोनदां केला, पण तो त्याला साधला नव्हता. पहिल्या बायकोच्या मरणाचें त्याला कांहीं वाटलें नाहीं. आपल्या मरणानें बिचारी मेली असें त्याला वाटलें. पण त्याची दुसरी बायको सुंदर तरणीताठी होती. आपल्या खात्यावरची जी काय थोडी जमीन होती ती गहाण टाकून बायकोला त्यानें घरीं आणलें होतें. त्याची ही बायको म्होतुराची असल्यामुळें तिच्या आईबापांनीं हवा तसा पैसा पांडोबाकडून उपटला होता व गांवातल्या पंचांनींहि सबंध गांवाला जेवण देण्याची सक्ती करून पांडोबाला चांगलेंच पेंचांत आणलें होतें. पण लग्नाकरतां व नवीन संसार थाटण्याकरितां त्यानें हा सर्व खर्च केला होता. पांडोबानें दुसरें लग्न केलें त्या वेळीं त्याच्या घरीं दासू होताच. पण हें त्याच्या पहिल्या बायकोच्या पोटचें पोर नाहीं, पांडोबानें पाळलेलें हें पोर आहे, असा गांवांतल्या सर्वच लोकांचा समज होता व तोच खरा होता. पांडोबाची दुसरी बायको चांगली न्हातीधुती होती. घरांत ती आल्याबरोबर पांडोबाला आपला संसार पुन्हा थाटला हें पाहून समाधान वाटलें होतें. ही नवी बायको आपण घरीं वाढवलेल्या या पोराची काळजी घेत नाहीं, ती त्याचा छळ करते हें पांडोबाच्या लक्षांत आलें होतें, पण त्याला त्याची पर्वा नव्हती. पण ही त्याची आवडती बाळंतपणांत आजारी झाली. पांडोबाचें हें दुसरें लग्न होऊन एक-दीड

वर्षच झालें होतें. लग्नामध्यें भरमसाट खर्च करून कफल्लक बनलेल्या पांडोबाला बायकोच्या या दुखण्याच्या वेळीं औषधपाण्याकरतां खर्च करायलाहि पैसा राखतां आला नव्हता. दासूला गहाण टाकून त्यानें विसूभाऊ सावकाराकडून पन्नास रुपवे जेमतेम आणले. त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्याच्या बायकोच्या औषधपाण्यासाठीं या पैशाचा उपयोग होण्याऐवजीं तिच्या व तिला झालेल्या तान्ह्या मुलाच्या मौतीसाठीं व दिवसांसाठीं हा पैसा खर्ची पडला.

पांडोबाचें घराणें निमगावांत बऱ्यापैकीं समजलें जात असे. त्यामुळें बायकोच्या या दिवसांच्या पायींहि त्याला थोडा जास्तच पैसा खर्च करावा लागला. तरी सुद्धां गांवांतल्या वृद्ध मंडळींना समाधान वाटलें नाहीं. पांडोबाच्या कंजूषपणाबद्दल त्यांनीं त्याला नांवें ठेवलीं. पांडोबानें त्याची पर्वा केली नाहीं. दिवसांकरितां पुन्हा कर्ज काढण्याची त्याची इच्छा नव्हती. बायकोचे हे दिवस कसेबसे पार पाडले व आप्तइष्टांची व गांवांतल्या शिष्ट मंडळींचीं तोंडें त्यानें कशींबशीं गोड केलीं. पण या दिवसांपासून मात्र पांडोबाचें मन उदास झालें. संसारावरचें त्याचें मन उडालें. त्यानें आपलें राहतें घर—दोन खोल्या व थोडीशी पुढची बखळ—या पूर्वींच गहाण टाकली होती. आपलें घर त्याला भयाण वाटूं लागलें. घरांत बाईल नाहीं तर तें घर कसलें ? रानांत आतां त्याचें असें शेत राहिलेंच नव्हतें. याच गावांत जिथें त्यानें मानानें दिवस काढले त्याच ठिकाणीं दुसऱ्याच्या शेतावर मजूरी करून पोट भरण्यास त्याचें मन तयार नव्हतें. तो शहरास जाण्याचा विचार करूं लागला.

नामदेवहि त्याच गावचा. लहानपणींच त्याचे आईबाप वारले होते. मामीच्या घरीं तो लहानाचा मोठा झाला. समजूं लागल्यापासून त्याच्या मामीनें त्याला अर्थातच घरीं स्वस्थ बसूं दिलें नव्हतें. गुरें वळण्यापासून तें गवत कापणें, मोटा हाकणें, नांगरटी करणें, वाफे तयार करणें, पिकाला पाणी देणें वगैरे सर्व कामें त्यानें केलीं होतीं. नामदेव वयांत आला पण कोणी कितीहि सूचना केल्या तरी सावकाराकडून कर्ज काढून लग्न करण्याची त्याची इच्छा नव्हती. नामदेवाच्या स्वभावांतील हा विशेष होता. असल्या माणसाला कोण मुलगी देणार ? नामदेवाच्या मामीची इच्छा कीं नामदेवानें थोडेसें लग्नापुरतें कर्ज काढून विवाहित व्हावें व त्यानें व बायकोनें आपल्या घरींच राहावें. नामदेवाला ही गोष्ट कबूल नव्हती. यामुळें त्याचें व त्याच्या मामीचें पटेनासें झालें. तोहि गावांत राहून शेतीच्या तोटक्या मजुरीवर राहण्यास कंटाळला होता. गांव सोडून शहराची हवा पाहूं इच्छिणाऱ्या नामा-पांडूची साहजिकच मैत्री झाली. या दोघांनीं एकदमच गांव सोडलें. ते शहरांत आले. शहरांत एकदम नोकरी थोडीच मिळणार ? शहरांत आल्यावर आपल्या भाईबंदांच्या ओळखी काढून कोठें तरी कारखान्यांत नोकरी मिळविण्याचा दोन-चार दिवस त्यांनीं प्रयत्न

केला पण पदरची पुंजी संपूं लागली तेव्हां शहरांतील इतर शेंकडो मजुरांप्रमाणें बेकार मजुरांच्या चौकांत ते रोज सकाळीं उठताच जाऊन उभे राहूं लागले. काम मिळवितांना शक्य तितकी आपली जोडी न फुटेल अशी काळजी ते घेत होते. आपल्या राहुत्या खेड्यापेक्षां शहरांत त्यांना जास्त मजुरी मिळत होती त्यांतच ते खूष होते. त्यांनीं एका मराठा बाईच्या खानावळींत जेवणाची सोय केली होती. बाई मोठी वस्ताद होती. रोख पैसे मोजल्याशिवाय तिनें त्यांना कधींच जेवायला घातलें नाहीं. जेवण तरी काय! दोन जाड्या भाकरी व त्यांवर थोडें कोरड्यास! पण सकाळीं उठतांच त्यांना या दोन उन्हउन्ह भाकरी अगदीं वेळेवर बिनचूक मिळत होत्या. शहरांत आल्यावर चार दोन दिवस ते आपल्या भाईबंदाच्या खोल्यांच्या बाहेरच्या कट्टयांवर निजले. पण हें फार दिवस चाललें नाही. खानावळीणबाईच्या खोलीबाहेर थोडी जागा होती, पण तिनें त्यांना ती जागा उपयोगूं देण्याचें नाकारलें. तेव्हा रस्त्याच्या बाजूच्या फूटपाथवर रात्र काढण्याचा राजमार्ग त्यांनीं पतकरला. त्याच्या बरोबर बेकार चौकांत उभे राहणारे बरेच कामगार असेच बाहेर रस्त्याच्या कडेला निजत हें त्यांनीं पाहिलेंच होतें. त्यांत त्यांना गैर असें कांहींच वाटलें नाहीं. हिंवाळा उलटून गेला होता. उन्हाळ्याचा ताप हळूहळू वाढत होता तेव्हां दिवसभर कोठें तरी अंगभर काम करून खानावळींत दोन भाकरी खाऊन बाहेर उघड्या हवेंत निजणें त्यांना मजेचेंच वाटलें. घोंगडी, मुंडासें, सदरा व नेसतें धोतर हेंच काय तें त्यांच्या जवळचें बारदान. मुंडासें उशास घ्यावें व खालींवर घोंगडी घ्यावी व फूटपाथच्या फरशीवर आंग टाकावें. जमीनीला पाठ टेकली कीं लगेच ते घोरूं लागत. ते स्वतंत्र मजूर होते. वाटेल त्या दिवशीं सुट्टी घेण्याचें पूर्ण स्वातंत्र्य त्यांना होतें. खिशांत खानावळीला द्यायला पुरेसे पैसे आहेत असें दिसलें कीं हें स्वातंत्र्य उपभोगण्याची त्यांना लहर येत असे. मग त्या दिवशीं ते कोठें तरी रहदारी नसलेल्या शहराच्या भागांतील म्युनिसिपालिटीच्या नळावर मनसोक्त स्नान करीत. अंगावरील कपडे तेथेंच उन्हांत वाळवीत. अशा प्रकारचें मनसोक्त स्नान झालें म्हणजे त्यांच्या मनाला हुशारी वाटे. जवळ पैसे शिल्लक असले तर हे दोघे कामगार मित्र असल्या मोकळ्या दिवशीं सिनेमा पाहायलाहि जात. पण त्यांत त्यांचें मन फारसें रमत नसे. चित्रपटांतल्या नटीचे उघडे नागडे नाच त्यांची थोडी करमणूक करीत पण या नटींचे प्रेमालाप व प्रेमगीतें तसेंच त्यांची विरहगीतें व प्रेमी जनांच्या वियोगामुळें त्यांच्या हृदयाची झालेली हाय हाय, या दोन्ही घटनांचा त्यांच्या मनाला फारसा बोध होत नसे. या सर्व घटनांत त्यांना आपलें जीवन कोठेंच प्रतीतीस येत नसे व आपण एका निराळ्याच जगांत वावरत आहों असें त्यांना वाटे. शहरी जीवनांतील असले प्रेमाचे चोचले

त्यांनीं आपल्या खेड्याच्या आयुष्यांत कधींच पाहिले नव्हते. तेव्हां प्रेम करणें व त्याच्याकरतां रडत राहणें ही मोठ्या लोकांचीं कामें असें त्यांना वाटे. पण केव्हांतरी सिनेमा पाहावयाचा एवढ्या एका गोष्टीशिवाय त्यांना दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींचा अद्याप नाद लागला नव्हता. एका प्रसंगीं एका विडीकाडीच्या दुकानदाराकडून त्यांनीं दोन पानविडे दोघांकरतां मागितले. दोन सुंदर पिकल्या पानांचे तिकोनी विडे दुकानदारानें नामदेवाच्या हातांत ठेवले व त्याचे दोन आणे मागितले. नामदेवानें विडे परत नाहीं केले. पैसे दिले. पण 'नाम्या लेका, असल्या भानगडी नको करूं, आपल्याला ते नाहीं परवडायचं. मोठ्या लोकांची हीं कामं.' पांडोबानें त्याला बजावलें. बेकार चौकांत आपल्या बरोबर उभे असलेल्या आपल्या कामगारभाईंपैकीं कांहीं मजूर बिड्या फुंकतांना त्यांनीं पाहिले होते पण या धूर सोडण्यांत कसली मजा कोणास ठाऊक असें त्या दोघांनाहि वाटे. त्यांना जी मजुरी मिळे ती त्यांना जेवणाला पुरी पडत नसे. केव्हां केव्हां बारा वाजून गेले तरी त्यांना कोणी कामाकरतां बोलावून नेत नसे. तेव्हां असल्या सक्तीच्या खाड्याच्या दुसऱ्या दिवशीं भाकरीकरतां रोख पैसे द्याव-याचाहि पेंचप्रसंग त्यांना सोडवावा लागे. पण एकंदरींत त्यांचा हा आयुष्यक्रम त्यांना त्यांतल्या त्यांत सुखाचा वाटूं लागला होता. अडतीच्या बाजारांत हमालीचें काम केल्यास जास्त मजुरी मिळते म्हणून तेथें ते दोघे दोन चार दिवस कामाला गेले. हें कामहि त्यांना मुष्किलीनें मिळालें पण असलें पाठीवरून भरलेलीं पोतीं वाहण्याचें काम त्यांच्या मावळी देहयष्टीला झेपलें नाहीं. त्यांनीं तो नाद कायमचा सोडला. नामदेवापेक्षां पांडोबा त्यांतल्या त्यांत थोडासा हुशार. त्यानें एकदां जुन्या बाजारांतून रंग लावण्याचा ब्रश व काठी खरेदी केली. शहर गांवांत हें काम बहुतकरून रोज मिळतें असें त्यानें पाहिलें होतें. या दिवसापासून पांडोबाच्या बरोबरच्या सामानांत या ब्रशाच्या काठीनें आपलें स्थान पटकावलें होतें. अशा एकाद्या दिवशीं नामदेवाची व त्याची कामाच्या वेळांत ताटातूट होई पण ते जेवायच्या जागीं व पुढें निजण्याच्या जागीं एकत्र येत.

शहरांत येऊन या दोघां कामगार मित्रांना दोन अडीच महिने होऊन गेले होते. पावसाळ्याचे दिवस जवळ येत आहेत हें ते पाहात होते व त्या दिवसांत रात्रीं आंग कोठें टाकायचें या काळजीनें त्या दोघांचीं मनें ग्रस्त होऊं लागलीं होतीं.

ज्येष्ठी पौर्णिमेची ती रात्र होती. पाऊस थोडा लांबलाच होता. रात्रीं पाऊस पडला तर कोठें आसरा घ्यावा या विचारानें त्यांना आज जागें ठेवलें होतें.

पावसाळ्याच्या आरंभींच्या दिवसांत आकाश भरून यायला कितीसा अवकाश! आकाश भरून आलें तरी पाऊस नेहमीं पडतोच असें नाहीं. आज तसें झालें नाहीं. पावसाळ्यांत आपल्याला कोठें जागा मिळणार असा विचार करतांच दोघांनाहि झोपेनें ग्रासलें होतें. 'आला पाऊस तर जाऊं समोरच्या जिन्याखालीं आश्रयाला,' हें

भरंवशाचें आश्वासन देणारा नामदेव चांगला झोंपून गेला. पांडोबाला झोंप येत होती. पण पावसाचा दचका मनांत असल्यामुळें त्याला चांगलीशी झोंप आली नाहीं.

पण मध्यरात्र होऊन गेली. सिनेमाची रहदारी बंद होऊन रस्ते सामसूम झाले. या एकांतामुळें पांडोबालाहि गाढ झोंप लागली. सोसाट्याचा वारा सुटला व त्याबरोबरच पावसाची जोराची सर आली व हां हां म्हणतां फूटपाथवर निजलेल्या लोकांना तिनें जागच्याजागीं चिंब भिजवून सोडलें. पावसानें कधीं कुणाची काळजी केली आहे ? हजारों लोक शहरांतून फूटपाथवर निजून रात्र कंठीत असतात पण त्यांच्याकरतां तो थोडाच थांबून राहणार ! फूटपाथवर एकच गोंधळ झाला. जो तो आसरा पाहण्याकरतां इतस्ततः धांवूं लागला. पाऊस आला तर जिन्याच्या खालच्या पोकळीचा आधार घेण्याचें नामदेवानें ठरविलें होतें त्याप्रमाणें नामदेव व पांडोबा जिन्याकडे धांवले. त्यांच्या अगोदरच ही जागा दुसऱ्या लोकांनीं व्यापून टाकली होती. त्यांतच हे दोघेहि घुसले.

बाहेर पावसाची रपारपी चालू होती. दोन चार मिनिटांत सर्वत्र पाणीच पाणी होऊन गेलें. पाऊस थोड्याच वेळांत थांबला. जणूं काय या लोकांना छळण्याकरतांच तो आला होता. जिन्याखालीं आसऱ्याकरतां गोळा झालेल्या कामगारांचे कपडे भिजून गेले होते. आकाशांतले ढग कमी झाले नव्हते. उलट ढगांवर ढग येऊन चांदणें बेपत्ता झालें होतें. पावसानंतर गार वारा सुटला. फुटपाथच्या फरशा पाण्यानें ओल्याचिंब झाल्या होत्या. निजायचें कोठें ? सर्व रात्र जागत काढावी लागणार होती. जिन्याखालीं अर्थात् थोड्याच लोकांना आसरा मिळाला. बाकीचे किती तरी कामगार दुकानांच्या व पायऱ्यांवर कट्ट्यांवर सर्व पाऊस अंगावर घेऊन ओल्या कपड्यानें कुडकुडत बसले होते. इतक्यांत जिन्यासमोरच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्याची एक खिडकी उघडली गेली व एका तरुण माणसानें खिडकीबाहेर डोकावून पाहिलें. खोलीत विजेच्या बत्तीचा चक्क प्रकाश पडला. तरुणानें खूण केल्यावरून एक तरुणी त्याच्या जवळ येऊन उभी राहिली. दोघेहि खालील समोरच्या मजुरांच्या जमावाकडे पाहून खदखदां मोठ्यानें खिदळलीं. पावसानें कशी मजा केली असें त्यांना वाटलें.

'आमचे कपडे भिजले, थंडीनें कुडकुडतों आहोंत आम्ही, अन् हे खिदळताहेत.' नामदेवानें म्हटलें.

'असच आहे बाबा. देवानें त्यांना पलंग, गादी न् मच्छरदाणी न् ऊबदार खोली दिली. मजेंत आहेत. आमची मजा त्यांनीं कां पाहूं नये ?' त्या जमावांतला एक लुकडा म्हातारा कामगार म्हणाला.

'देव त्यांच्याकडेच पाहतो. आम्ही त्याला दिसत नाहीं. हजारों कामगार आज

भिजून गेले, त्यांना निजायला जागा नाहींशी झाली. देवानं डोळे मिटून घेतले असले पाहिजेत.' त्यांतल्या त्यांत एक हुशार कामगार बोलला.

'मागच्या जन्मीच्या कर्माचं फळ आतां भोगतो आहेस, आणखी देवाला नको नांवं ठेवूं.' म्हातारा उद्गारला.

'आमच्या सारख्या हजारों लोकांनीं अशीं कोणतीं पापं केलीं समजत नाहीं!' आणखी एकजण म्हणाला.

'जाऊं दे रे बुवा, आज दोन दिवस काम मिळालं नाहीं. नुसत्या चहावर व चुरमुरे फुटाण्यावर दिवस काढले. खायला अन्न नाहीं व निजायला जागा नाहीं अन् पुन्हां ही मागच्या जन्मींच्या पापाची टोंचणी.' आणखी एक जण बोलला.

'टोंचणी म्हणजे! नशीबी आलं तें भोगलंच पाहिजे.' म्हाताऱ्यानें पुन्हां उद्गार काढले.

'अरे ए म्हाताऱ्या, गप्प बसतो का नाहीं! तू आतां जन्मभर कांहीं पाप केलं नाहींस ना, मग आतां जन्म घे त्या विसुभाऊच्या घरीं अन् बैस त्याच्या गादी-वर!' इतका वेळ गप्प बसलेला पांडोबा बोलला.

'काय म्हणतोस? तो सोनगांवचा विसुभाऊ सावकार? तसल्या नष्ट साव-काराच्या घरीं जन्म!' असें बोलतां बोलतां म्हाताऱ्यानें अंगावर शहारे आल्यासारखें केलें.

'पुढच्या जल्मीं सुख भोगायचं असेल तर असंच कुठं तरी सावकाराच्या घरीं जन्मलं पाहिजे.' पांडोबानें उत्तर दिलें.

'त्याच्या पापाचा पैसा मला नको!'

'सुख पाहिजे असेल तर पैसा पाहिजे अन् पैसा तर पापाशिवाय जमा होत नाहीं.'

'अरे ए! काय लावली आहे कटकट! तुम्ही दोघे तिकडचेच दिसतां! त्या म्हाताऱ्याला विसुभाऊचं घर नको असेल तर आमच्या अकोल्याकडलं पीतांबर शेटचं घर देवापाशीं त्याला मागून घे म्हणावं.' नगरकडला एक .कामगार म्हणाला.

'स्वर्ग अन् नरक न् यमाचा दरबार हें सर्व खरं असतं तर कुणीच पाप केलं नसतं. सब झूट आहे. करावं तसं भरावं, डाव्या हातानं करावं न् उजव्या हातानं भोगावं.'

'ए म्हाताऱ्या, मागच्या जन्मीं तूं कोण होतास अन् तूं काय काय केलंस, ओठवतं तुला हें?'

'आतां तो पुढल्या जन्मीं शिरीमंत झाला म्हणजे आम्हांला तो असं फूटपाथ-वर निजूं देणार नाहीं व थंडीनं कुडकडूं देणार नाहीं.'

‘ अरे तें पुढच्या बिल्डिंगमधलं जोडपं तुम्हांला पाहून खिदळलं तें विसरलास वाटतं इतक्यांत. ’

खूपच चर्चा सुरू झाली या मंडळींत जन्म, कर्म, नशीब, न् भोग या विषयांवर.

‘ अरे, लेको, या जन्मानं, कर्मानं, नशीबानं तर दुबळं बनविलं आहे आम्हांला. ’

एका कामगाराच्या वरील उद्गारानीं या विषयाला नवीन वळण लागणार असें दिसूं लागलें.

‘ पहा, पाहा, साल्या ! अरं, यानं तर आज एक नवीनच आवा आणली. ’

जिन्यासमोरच्या रस्त्यावर उभ्या राहिलेल्या रिक्षेकडे पाहून जिन्याच्या अगदीं कोपऱ्यावर बसलेल्या कामगारानें आपल्या सोबत्यास उद्देशून वरील उद्गार काढले.

‘ देवीच्या यात्रेला भिरक्यांतून पाटील आवा मागं बसवून आणतात अन् इथं शहरांतून या रिक्षांमधून हीं तरुण बामणाचीं पोरं मजा मारतात. ’

रिक्षावाला जिन्यासमोरच्या रस्त्यावरच थांबला. रिक्षेंतील तरुण खालीं उतरला. तरुणीहि खालीं उतरली. तरुणानें रिक्षावाल्याच्या हातात ठरलेलें भाडें दिलें व त्याच्याशीं कांहीं संकेत केला. रिक्षावाला तेथून निघून गेला. तरुण व तरुणी जिन्यापाशीं येतात तों तेथं कोण गर्दी. पण जिना व्यापून बसलेल्या या कामगारांना वर जाऊं पाहणाऱ्या या जोडीकरतां वाट करून देणें भागच होतें. जिन्याच्या पहिल्या पायरीवर पाय ठेवल्याबरोबर कठड्यावर असलेलें विजेचें बटन तरुणानें दाबलें. जिन्याच्या पहिल्या सज्जावरील बत्तीनें या जोडीच्या चेहऱ्यांवर चक्क प्रकाश पाडला. कामगारांनीं पायऱ्यांवरील मोकळ्या करून दिलेल्या वाटेनें ही तरुण जोडी चटाचट वर चढून गेली. जाता जाता वरच्या विजेच्या बत्त्या शिलगावीत व खालच्या बत्त्या बंद करीत ही जोडी तिसऱ्या मजल्यावरील आपल्या इच्छित स्थळीं आली. तरुणानें आपल्या खोलीचें कडीकुलूप काढून तिचें दार उघडलें. दोघेंहि आंत शिरल्यावर त्यांच्यामागून खोलीचें दर लागल्याचा आवाज खालच्या मंडळींना ऐकूं आला.

‘ काय पण नखरा ! मजा आहे बुवा ! ’ भिरक्यांतील आवाची गोष्ट सांगितलेल्या कामगारानें उद्गार काढला.

‘ तुला काय करायचंय लेका, मोठ्या लोकांचं सगळंच कांहीं और ! ’ त्याच्या शेजारच्या कामगारानें त्याला दाबलें.

निजायचें कोठें ? सगळ्यांच्या पुढेंच हा प्रश्न होता. फरशा वाळण्याचा संभव तर नव्हताच. अंगावरले कपडे तर ओलेच होते. पण असल्या स्थितींतहि एकमेकांचा आसरा घेऊन सर्व कामगार झोंपून जाण्याच्या मार्गाला लागले होते.

अर्धा पाऊण तास होऊन गेला असेल इतक्यांत एक मोटार जिन्याच्या बाजूच्या इमारतीवर प्रकाश पाडीत जिन्यासमोर येऊन उभी राहिली.

'काय कटकट आहे !' अर्धवट जागे असलेल्या कामगारांपैकीं एक जण कुरकुरला.

'हेंच तें राधाभुवन !' मोटारींतून खालीं उतरलेल्या दोन माणसांपैकी एक जण उद्गारला व त्यानें आपल्या हातांतील टॉर्चचा प्रकाश जिन्याच्या पायऱ्यांवर पाडला. अर्धवट जागे असलेले आतां पुरे जागे झाले होते. पावसामुळें फुटपाथवर निजणारे बेकार जिन्याच्या पायऱ्यांवर व त्यांच्या आजूबाजूच्या जागांवर गर्दी करून राहिले आहेत हें टॉर्चवाल्या इसमानें ओळखलें होतें.

'अर्ध्या पाऊण तासापूर्वी इकडून एकादी रिक्षा गेली का ?' टॉर्चवाल्यानें जिन्याच्या पायथ्याशीं कोपऱ्यावर बसलेल्या व कौतुकानें आपल्याकडे पाहात असलेल्या कामगाराला विचारलें.

रिक्षा इकडून गेली नाहीं, तर ती इथेंच समोर थांबली, त्यांतून एक तरुण जोडी बाहेर पडली. जिना चढून ती वर गेली व त्या जोडीतील तरुण फक्कड तर नेहमीच अशा आवा आणतो, असें त्या कामगारानें एका दमांत सर्व कांहीं सांगून टाकलें. कांहीं तरी भानगड आहे असा या कामगारानें या चौकशी वरून तर्क केलाच होता. भानगड अन् ती तरुण तरुणीं मधील भानगड ! कोण इसम असा आहे कीं ज्याला या असल्या भानगडी पाहून मजा वाटत नाहीं ?

'पाहिलं, बस्स, तोच. चला आतां वर मग दाखवितों हा सूर्य हा जयद्रथ.' टॉर्चवाल्यानें बरोबरच्या इसमाला उद्देशून उद्गार काढले.

'पण या वेळीं वर चढून जाण्याला वाट मिळणें मुष्किल होतें. या भानगडीची मजा चाखूं पाहणाऱ्या कामगारानें व त्याच्या जवळच्या दोस्तानें या नवीन आलेल्या दोघां इसमांना वाट करून देण्याचें मनावर घेतलें. मध्यरात्र उलटून गेली, वर जाणारीं माणसें निघून गेलीं, आतां कोण आणखी येणार, या कल्पनेनें जिन्याच्या पायऱ्यांवरील व विशेषतः जिन्याच्या पहिल्या सज्जावरील कामगार एकमेकांवर कोलमडून जाऊन झोंपी गेले होते. पण या लोकांना वरील दोन्ही कामगारांनी शिव्यागाळी करून उठविलें व वर जाऊं पाहणाऱ्या दोघां इसमांना वाट करून दिली.

'काय पहा शिंचे, वर निवाऱ्याला येऊन पडले तरी गडबड करतायतच.' दुसऱ्या मजल्यावरील एका खोलीचें दार उघडलें गेलें व त्यांतून बाहेर पडलेल्या एका म्हाताऱ्यानें टोकलें.

इतक्यांत वर जाऊं पाहणारे दोन इसम तेथें दाखल झाले.

‘ काय त्रास आहे बुवा ! वेळेवर येतां येत नाहीं या आपल्या करणीमुळं शेजाऱ्यांच्या झोपेचं मातेरं होतं याचा विचार कोण करणार ! ’

टॉर्चवाला व त्याच्याबरोबरचा इसम तिसऱ्या मजल्यावर निघून गेले. म्हाताऱ्याला उत्तर देण्याच्या भानगडींत अर्थातच ते पडले नाहींत. त्यांच्यामागून थोडें अंतर टाकून हे दोन कामगारहि तिसऱ्या मजल्यावर दाखल झाले.

टॉर्चवाला एका खोलीच्या दरवाजाशीं थांबला व त्यानें आपल्याबरोबरच्या इसमाला खोलीच्या चौकटीवर ठोकलेली नांवाची चकती दाखविली.

‘ मधुकर शारंगपाणी. ’

‘ मधुकर, अहो मधुकर, दार उघडा पाहूं.’ त्याच्या बरोबरचे इसम दारावर ठोसे मारण्याच्याच आवेशांत होते पण त्यांनीं तो आवेश आंवरला. कोणास ठाऊक त्यांना काय वाटलें ?

‘ अग बाई, काकांचा आवाज, मधुकर आतां कसं होईल ? काका मला झोडपूनच काढतील. ’

‘ घाबरट कुठली. सुमे, तुझ्या काकाला मी आतां कसा बनवितों पहा. तूं मात्र अवसानघातकीपणा करूं नकोस. ’

खोलींतली कुजबुज ऐकून बाहेरच्या इसमाला जणूं दम निघेनासा झाला.

‘ कां, दार उघडतां कीं नाहीं, मधुकर ? ’ त्यानें खडसावलें.

मधुकरानें आपल्या अंगाशीं बिलगलेल्या सुमनला बाजूला सारलें. इतर कोणी शेजारचे जागे होण्यापूर्वी सुमनच्या काकांना आंत घेतलेलें बरें असें ठरवून मधुकरानें दार उघडलें.

सुमनचे काका-आंत आले व त्यांच्या मागून टॉर्चवाला इसमहि आंत शिरला.

‘ कोण शरद्, तूं का ? ’ मधुकर साश्चर्य उद्गारला.

‘ होय मीच. हे काकासाहेब पुरंदरे. सुमन कुठं आहे हें दाखविण्याकरतां त्यांना मी इथं घेऊन आलों. ’ शरद्नें उत्तर दिलें.

सुमनचे काका खोलींतला थाट पाहून थक्कच झाले होते. सभोवतीं रंगोबेरंगी झालर लावलेल्या पलंगावरील मच्छरदाणीनें त्यांचें लक्ष वेधून घेतलें होतें. सुमन तेथंच पलंगाच्या एका कोपऱ्या जवळ उभी होती.

‘ सुमनला मी काहीं पळवून नाहीं आणली. हें पहा काकासाहेब सुमन आज मोठ्या मुष्किलीनं वांचली. चित्रा थिएटर मधून ती बाहेर पडली व तिच्या मागें दोन सोल्जर लागले. सुमन अगदी घाबरून गेली. इतक्यांत मी पुढें होऊन सुमनला गांठलेलें पाहून सोल्जर मागें परतले. रिक्षा करून सुमनला मी इथं आणली. आतां मी तिला तुमच्याकडं पोंचविणारच होतों. ”

'कां ग सुमन, मधुकर काय सांगताहेत खरं आहे का हें ?'

मधुकराच्या या बतावणीला साथ देणें सुमनला शक्यच नव्हतें.

'कोण म्हणतं तूं सुमनला पळवून आणलीस म्हणून. तूं व ती सिनेमा पाहायला गेलांत. बॉक्समध्यें बसून सिनेमा पाहिलांत व सिनेमा संपल्यावर रिक्षामध्यें बसून तूं तिला आपल्या खोलीवर घेऊन आलास असें सरळ सांगा कीं ! सोल्जरांची ही बतावणी कशाला ? '

खरी हकीकत अशीच होती.

काकासाहेबांनीं मधुकरकडे व सुमनकडे पाहिलें. मधुकर ओशाळा झाला होता व सुमन तर हा सर्व प्रकार बाहेर आलेला पाहून गर्भगळित होऊन थरथर कांपत होती.

मधुकर व सुमन आज एके ठिकाणीं सांपडलीं तर मधुकरला चांगला धडा देण्याचें काकांनीं मनाशीं ठरविलें होतें. पण आपलेच दांत व आपलेच ओठ. या प्रकरणामुळें आसपासची मंडळी जागीं झालीं असतीं. तसें करणें सुमनच्या हिताचें नाहीं, तिच्या जन्माचें मातेरें होईल हा विचार त्यांच्या मनांत चमकून गेला. ते थंड पडले.

'बस्स, पुरे झाले तुमचे हे प्रेमाचे प्रताप. सुमन, चल आतां घरीं.' काका थोड्याशा कडक आवाजांत म्हणाले.

सुमनला काकांचा हुकूम मानणें भागच होतें. शरद्, सुमन व तिचे काका खोलींतून बाहेर पडले व जिना उतरूं लागले.

'असा कांहीं प्रकार आमच्या गांवांत झाला असता तर मुडदेच पडले असते.' शरद् व काकासाहेब यांच्या मागून येऊन दारापाशीं थांबलेल्या कामगारांपैकीं एकजण म्हणाला.

'साधी व सरळ मनाचीं असतां तुम्हीं खेडेगांवचीं माणसं. तुमच्यांत व शहरगांवच्या पांढरपेशा माणसांत हाच तर फरक असतो.' काकासाहेब बोलून गेले.

'तुमचा तो मधुकर का कोण, मोठा रंगेल गडी आहे. त्यानं मागं एकदां दोनदां अशाच निरनिराळ्या आवा आणल्या होत्या.' कामगार म्हणाला.

'काय म्हणतोस......'

'आम्ही तर हें नेहमींच पाहतों. पहा आतां आणखी एक दोन दिवसांत त्याच्या खोलींत दुसरीच कोणी नखरेबाज पोरगी दिसेल.' काकासाहेबांचें बोलणें पुरें होण्यापूर्वींच तो पुन्हां बोलला.

परत जिन्यावरून उतरतांना काकासाहेबांना फारसा त्रास पडला नाहीं. शरद् काका व सुमन मोटारमध्यें बसलीं. मोटार आली तशी मुकाट्यानें निघून गेली.

जिन्याच्या भागांत जमलेल्या कामगार मंडळींत हाच एक चर्चेचा विषय झाला व रात्र केव्हांच निघून गेली.

रात्रीं झोप मिळाली नाहीं तरी या बेकार कामगारांना आपल्या ठरलेल्या जागीं सकाळीं काम मिळविण्याकरतां उभें राहणें भागच होतें.

बेकार चौकांत पांडोबा व नामदेवहि नेहमींप्रमाणें उभे होते. दोघांच्याहि अंगांतले सदरे ठिकठिकाणीं फाटले होते. पांडोबा रंगसफेती करण्याच्या ब्रशची काठी घेऊन उभा होता.

दोघांनाहि आज एकाच ठिकाणीं काम मिळालें होतें. तीन मागच्या खोल्या व पुढचें दुकान रंगवायचें होतें. एका मराठ्या बाईची ही जागा होती. खानावळीचें काम संभाळून बिडीकाडीचें दुकानहि तिनें चालविलें होतें. याच्या भरतीला एक म्हैसहि तिनें पाळली होती.

दोघेहि या जागीं आल्याबरोबर कामाला लागले. अशा वेळीं नामदेवानें शेण-माती कालवून भिंती सारवून द्यावयाच्या व चुन्याचे व रंगाचे हात पांडोबानें मारायचे अशी वांटणी या दोघांनीं आपापसांत केली होती.

‘ आजच्या आज हें काम झालं पाहिजे बरं का.’

‘ तुमच्या समक्षच काम करतों. हरामाचा पैसा आम्हांला नको. संपलं तर बरंच झालं.’ पांडोबानें उत्तर दिलें.

‘ हा चुना, ही पिवळी माती. चांगले दोन तीन हात द्यावे लागतील. अगदीं झक्क काम झालं पाहिजे.’

‘ अगदीं तुमच्या मनासारखं झालं तरच पैसे द्या.’

दोघांनीं कामाला सुरुवात केली न केली इतक्यांत एक गिऱ्हाइक आलें.

‘ चंद्रभागाबाई, थोडं दूध द्याल का आज?’ गिऱ्हाइकानें मागणी केली.

‘काय मेला तो नाग्या. आज धार काढायला आलाच नाहीं. असाच अळं टळं करतो. चहालासुद्धां आज दूध मिळालं नाहीं. मीच दुसरीकडून आज दूध आणलं.’

‘ पाहुणे आले आहेत घरीं. मंडळी खोळंबून बसलीं आहेत.’

‘ मला दूध थोडंच काढतां येतंय. म्हैस सुद्धां किती हरामी. नाग्याशिवाय ती दुसऱ्या कोणाला थानाला हात लावूं देत नाहीं.’ चंद्रभागाबाई काळजीच्या स्वरांत बोलल्या.

‘ पांड्या, देईनास तेवढी धार काढून.’ नामदेवानें पांडोबाला टोकलें.

पांडोबाचा होकार दिसतांच ‘ माझा हा दोस्त म्हशीची धार काढून देईल. त्याला आहे संवय धारा काढायची.’ नामदेव चंद्राबाईंना उद्देशून म्हणाला.

‘ काय तुला धार काढतां येते ? ठीक आहे. पण पहा. म्हैस फार अवलादीची आहे.’

‘ तें माझ्याकडं लागलं.’

पांडोबानें म्हशीला खालपासून वरपर्यंत न्याहाळलें. म्हशीच्या नजरेला नजर भिडविली. चंद्रभागाबाईनीं पाण्याची बादली व चक्क घासलेली चरवी त्याच्यापुढें आणून ठेवली.

‘ अंबोण ठेवतां ना म्हशीपुढं ? ’ पांडोबानें विचारलें.

‘ हें काय, तयारच आहे.’

पांडोबानें अंबोणाचे घमेलें म्हशीपुढें ठेवलें. म्हशीच्या पाठीवरून हात फिरविला. शेवटीं एक थाप मारून त्यानें बादलींतल्या पाण्यानें म्हशीची कास धुवायला सुरवात केली. म्हशीनें एक दोन वेळां पाय उचलला पण थोड्याच क्षणांत ती शेपटी हलवूं लागली. प्रेमळ दृष्टीचा व हाताचा गुण असा असतो. नाग्याशिवाय कोणालाहि जवळ फिरकूं न देणारी म्हैस या नव्या माणसाला इतकी वश झालेली पाहून चंद्राबाईला आश्चर्य वाटलें व कौतुकानें ती या देखाव्याकडे पाहतच राहिली.

पांडोबानें दोन्ही पायांत चरवी धरून भराभर दोन्ही हातांनीं धार काढण्यास सुरवात केली. धारेच्या प्रत्येक चुर्र, चुर्र आवाजाबरोबर चंद्राबाईचें अंतःकरणहि हर्षानें थरारत होतें. बघतां बघतां चरवी दुधानें भरून गेली. चंद्राबाईनें घाईघाईनें घरांत जाऊन दुसरी एक धाकटी चरवी आणली. नेहमीपेक्षा म्हशीनें एक धार जास्तच दूध दिलें.

चंद्राबाईनें गिऱ्हाइकाला पाहिजे होतें तेवढें दूध मोजून दिलें. म्हशीपुढल्या गव्हाणींतली वैरण जवळ जवळ संपली होती.

‘ वैरण टाकूं का म्हशीपुढं ? ’ असें म्हणतां म्हणतां जवळच्या कडब्याच्या गंजीकडे पांडोबा वळला.

‘ थांब मी ती तोडून घालत्यें.’ असें म्हणत चंद्राबाई हातांत कोयता घेऊन आल्या.

‘ आणा तो कोयता इकडं ! ’ चंद्राबाईला ही विनंती नाकारणें शक्य झालें नाहीं. तिनें पांडोबाच्या हातांत कोयता दिला. चार पांच पेंड्या वैरण पांडोबानें झराझर तोडली व त्यांतला कांहीं भाग त्यानें म्हशीपुढें टाकला.

पांडोबा म्हशीच्या धारेकडे लागला पण नामदेव तोंपर्यंत स्वस्थ बसला नव्हता. त्यानें एका खोलींतलें सामान मधोमध रचून तिला शेणमातीचा हात देण्यास सुरुवात केली होती. पांडोबानेंहि आपल्या कामाला हात घातल्याबरोबर चंद्राबाईनें रंगसफेती कशी करायची, कोणत्या जागीं किती हात द्यायचे हें सांगितलें.

'तें कांहीं नका सांगू. काम पहा, मग बोला.' पांडोबा आत्मविश्वासाच्या आवाजांत बोलला.

चंद्राबाईनें आपलें पानपट्टीचें दुकान उघडलें. थोडी साफसूफ केली. दुकानांतल्या पितळी फुल्यांच्या लाल रंगीत पाटावर बसून तिनें आपल्याकरतां एक विडा तयार केला तो तोंडांत टाकला. तीहि आपल्या व्यवहाराकडे पाहूं लागली.

सूर्य डोक्यावर आला. सुटीचा वेळ झाला. चंद्राबाईनें घरांत येऊन दोघानाहि काम बंद करावयास सांगितलें व भाकरी खाऊन येऊन कामाला पुन्हा लवकर लागण्याबद्दल बजावलें.

'कुठं जायचंय भाकरी खायला? आम्हांला काय, घर ना दार. तुमच्या खाना-वळींतलीच भाकरी द्या. पैसे घ्या कापून.' नामदेवानें सुचविलें.

'काय तुमचं इथं घर नाहीं?'

'अहो घरं कुठलं, खानावळींत भाकरी खायची अन् फूटपाथवर निजायचं!'

'अहो भीमाबाई, भाकरी आहेत का शिल्लक?' चंद्राबाईनीं टोकलें. 'द्या या दोघांना भाकरी द्या. कोरड्यासाला काय आहे?'

'सगळं कांहीं आहे, त्यांना द्या आंत पाठवून.'

दोघांनीं आवारांत असलेल्या नळावर हातपाय धुतले.

खुंट्याशीं ओढाताण करीत असलेल्या म्हशीकडे सर्वांचेंच लक्ष गेलें.

पांडोबानें तेथेंच भिंतीशीं असलेली बालदी घेतली व तो नळाकडे जाऊं लागला.

'दोन तीन दिवस झाले म्हशीला धुतली नाहीं.'

'मग धुवून टाकतो कीं. हौदांत पाणी तर भरपूर दिसतंय!'

चंद्राबाईला तेंच पाहिजे होतें. म्हशीला हौदावर नेऊन दोघांनीं अगदीं खस-खसून धुवून चांगली काळी कुळकुळीत व चकचकीत करून सोडली. पांडोबानें म्हशीला जागेवर आणून बांधली. तिच्यापुढें पुन्हां वैरणीचा कवळा टाकला.

दोघांनीं भाकऱ्या खाल्ल्या. भीमाबाईनीं कोरड्यासाकरतां सबंध शिजलेलीं दोन वांगीं दोघांना दिलीं होतीं.

संध्याकाळपर्यंत दोघांनीं काम केलें. काम जवळजवळ संपलेंच होतें. एका खोलीला एक पिवळ्या मातीचा हात व दुकानाला अस्मानी रंगाचा शेवटचा हात द्यावयाचा राहिला होता. एकट्याचेंच फक्त एक दिवसाचें काम राहिलें होतें.

'काय हरकत नाहीं, पांडोबा उद्यां येईल. मी दुसरीकडं काम पाहीन. आम्हांला कु' नेहमीं एके ठिकाणीं काम मिळतं?' नामदेव म्हणाला.

दोघांनीं रात्रींचें जेवण चंद्राबाईच्या खानावळींतच केलें. चंद्राबाईनें फक्त चार आणे कापून बाकीचा एक रुपया नामदेवाच्या हातांत ठेवला. पांडोबा दुसरे दिवशीं कामावर येणार होताच. त्याचे पैसे तेव्हांच चुकते करायचे ठरवलें.

जेवण झाल्यावर दोघांनीं आपली ठरलेली फूटपाथवरची जागा गांठली. त्यांची जागा रिकामी होतीच.

फूटपाथवर निजायला आल्यावर कोण कुठं कामाला गेलें, कोणाला कसलें काम मिळालें, याबद्दल नेहमी मनोरंजक चर्चा चालत. पावसामुळें काल रात्रभर बहुतेकांनाच जाग्रण झाल्यामुळें गप्पा मारण्याकडे कोणाची प्रवृत्ति नव्हती. पण कोणाला किती पैसे मिळाले ही चर्चा तर झालीच पाहिजे; कारण या चर्चेवरच दुसऱ्या दिवशीचे मजूरीचे दर ठरायचे असतात. बेकारांची यूनियन अशी नव्हती हें उघड आहे. तथापि मजूरीच्या दरांनीं त्यांना साहजिकच एकत्र आणलें होतें. मजूरीचे साधारणतः दर ठरले म्हणजे चार दोन आणे कमजास्त कोणी कबूल केले तर चाले, पण त्यापेक्षां कमी पैसे घ्यायला कोणी तयार झाला तर त्याच्यावर सगळे तुटून पडत व त्याला जबरदस्तीनें बाजूला ओढून नेत.

कालच्या पावसामुळें आजचा मजूरीचा दर सव्वा रुपया ठरला होता तेव्हां तोच उद्यांकरतांहि कायम ठेवायचा कीं नाहीं यासंबंधानें बरीच भवति न भवति होऊन पुन्हां सव्वा रुपयाच कायम करण्यात आला.

'काळा बाजार करून खूप पैसे मिळताहेत भडव्यांना. मग आम्हीच तेवढे पैसे कमी का घ्या?' एक कामगार म्हणाला.

'अरे, शिव्या कां देतोस, उगाच जळफळून काय फायदा, सव्वा रुपायाच का, दोन रुपये घेतले पाहिजे. तुमची एकी कुठं आहे बेट्यो!'

'मिळायजोगे असले तर एकी करायची. उगाच हट्ट धरून कसं चालेल?'

'दोन नाहीं तरी दीड तर खरा.'

'सव्वा ठरला ना! पघूं एक दोन दिवसांत.' सगळयाच बेकार कामगारांचें असें कांहीं तरी ठरलेलें असतें असें नाहीं. पण या फूटपाथवर निजणारा बेकारांचा गट संख्येनें बराच मोठा होता. थोडा जास्त बोलका, आपल्या भाषणानें व इतर हाव-भावांनीं इतरांना दबकावणारा इसम सहाजिकच त्यांचा पुढारी बनतो. नामदेवाच्या अंगीं हा गूण होता.

कोणी कोठें काम केलें हें सांगतां सांगतां नामदेवानें चंद्राबाईकडल्या कामाची हकीकत फारच फुलवून सांगितली. तिचें पानपट्टीचें दुकान, तिचें विडा खाणें, तिचा रंगेलपणा, तिची खानावळ, तिचा म्हशीचा धंदा व कामावर जातांना कांहींएक ठर-

लेलें नसतांना पांडोबानें गड्याच्या अभावीं उडूं पहात असलेल्या म्हशीला कशी पान्हवली, तिच्या दुधानें चरवी भरून देऊन मालकिणीला कसें खूष केलें, ही सगळी हकीकत त्यानें सांगितली.

'या जादा कामाकरतां मालकिणीनें कांहीं बक्षिसी दिली का नाहीं?' एकानें विचारलें.

'पांडोबा उद्यां पुन्हां तिच्याकडेच कामाला जाणार आहे, येतांना काय बक्षिसी मिळवून आणतो पाहावं.' नामदेव म्हणाला.

'बरी मालकीण मिळाली पांड्याला. तिच्या म्हशीची धार काढणारा येत नसेल तर तिच्या म्हशीला पान्हवायला व तिची धार काढायला रोजच कां जात नाहीं तिच्याकडे?'

'म्हशीची ती मालकीण एकटीच आहे नव्हं का. म्हशीची धार काढतां काढतां बनून जा म्हणावं पांड्याला तिचा कारभारी.'

'कुणी सांगावं, तसं बी होईल.' नामदेवानें वरील थट्टेला उत्तर दिलें.

'लेका कुणाचं झालं तरी बरं चिंतावं. कसं काय पांड्या, त्या उडाळ व खोडकर म्हशीला जशी तू पान्हवलीस तशीच त्या मालकिणीवरहि कांहीं जादू करूं नको ल्येका!'

'पुरे करा ल्येको थट्टा! आपल्याला तशी कांहींच जादू माहित नाहीं.' इतका वेळ गप्प बसलेला पांडोबा बोलला.

झालें. बोलणें इतक्यावरच थांबलें. फूटपाथवर जमलेल्या कामगारांत गटागटानें चाललेल्या गप्पा हळूहळू थांबल्या व सर्व कामगार झोंपेच्या आहारीं जाऊं लागले.

आदल्या दिवशींच्या पावसाची गडबड आज नव्हती. अशी गडबड होण्याचा संभवहि नव्हता. पिठासारखें स्वच्छ चांदणें पडलें होतें. चंद्र भराभर वर येत होता.

पांडोबा घोंगडी अंगाभोंवती गुंडाळून घेऊन इतरांप्रमाणें फूटपाथच्या फरशीवर लवंडला. पण त्याला इतरांप्रमाणें झोंप येईना.

चंद्राकडे पहात त्यानें फरशीवर आंग टाकलें होतें. पण दिवसभर जिच्याकडे काम केलें त्या चंद्राबाईनें त्याचें मन खेंचून घेतलें होतें.

इकडे चंद्राबाईचीहि तीच अवस्था झाली होती. तिच्या खट्याळ व खोडकर म्हशीला ताळ्यावर आणणारा पांडोबा रात्रीं जेऊन तिचें घर सोडून आपल्या ठरलेल्या फूटपाथच्या रस्त्यावर आला खरा, पण येतांना चंद्राबाईचें चित्तहि आपल्याबरोबर घेऊन आला अन् चंद्रानें पांडोबाच्या मनाला आपल्या बरोबर आणलेल्या दुसऱ्या एका मनाचीच जणूं आठवण करून दिली. मनोमन साक्ष आणखी दुसरी काय असायची?

पांडोबाची शरीरयष्टि तशीच मोहक होती. त्याच्या शरीराचा थाट पैलवानी नव्हता. तरी त्याचे अवयव रेखीव होते. त्याच्या तांबुस गोऱ्या चेहऱ्यावरील निळसर डोळे कोणत्याहि संगमोत्सुक स्त्रीला वेड लावतील असे होते.

चंद्रा स्वतंत्र वृत्तीची होती. नवरा मेल्यावर तिच्याजवळ जी कांहीं पुंजी होती तिच्या जोरावर आपला स्वतंत्र धंदा तिनें थाटला होता. लग्न करून कोणाची तरी बटीक होऊन राहायचें नाहीं या विचारानें तर तिनें हा स्वतंत्र धंदा थाटला होता. खानावळींत किंवा दुकानाच्या व्यवहारांत काय तिच्याशीं ज्या लोकांचा संबंध आला त्या सर्वांच्या बरोबर सडेतोड जितक्यास तितकें अशीच तिची वागणूक असल्यामुळें तिच्याकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची कोणाचीहि छाती नव्हती. पण चंद्रा तरुण होती. तिचे शरीरभाव ताजेतवाने होते. कधीं कधीं ते उचंबळून येत. त्या प्रसंगांपैकीं आजचा प्रसंग होता.

' पांडोबाला आपल्या घरीं कायमचा ठेवून घेतला तर—' या विचारानें चंद्राची झोप उडविली होती.

' म्हशीच्या मालकिणीचा कारभारी बनून जा कीं.' एकानें त्याची थट्टा केली होती अन् नामदेवाने ' काय सागावं, तसं बी होईल !' असें म्हटलें होतें. पांडोबाच्या कानांत हेच शब्द घुमत होते.

भिकाऱ्यानें पद्मिणीची इच्छा करावी अशी अगदीं दुष्प्राप्य ही गोष्ट होती असें मात्र नाहीं. पांड्या चांगला धट्टाकट्टा पिळदार गडी होता. कसलींहि श्रमाचीं कामें रेटून नेण्याची ताकद त्याच्या अंगीं होती. चंद्राबाईला असाच कोणी तरी सहकारी पाहिजे होता.

'काय मजा होईल त्या विधवा बाईचा कारभारी झालों तर !' या गोड विचारांची घोकणी करीत करीतच त्याचें दिवसभर काम करून थकून गेलेलें शरीर व मन झोंपेच्या आहारी गेलें.

पण पहांटे उठला तो वेळेवर. नेहमीच्या पेक्षां थोडी लवकरच त्याला जाग आली. कामाच्या दृष्टीनें नामदेवाची व त्याची फारकत झाली होती. उठल्याबरोबर त्यानें चंद्राचें घर गांठलें. चंद्रा त्याचीच वाट पाहात होती.

आल्याबरोबर त्यानें म्हशीखालचें शेण काढून गोठा साफ केला. अंबोणाची पाटी म्हशीपुढें ठेवून त्यानें धार काढली. चंद्राच्या गिऱ्हाईकांना वेळेवर चहासाठीं दूध मिळालें ! म्हशीची वैरणकाडी करून मोकळे झाल्यावर कालचें शिलकी काम पुरें करण्याच्या व्यवस्थेला तो लागला.

पांडोबा आल्यानंतर कामाला लागला व एकाद्या रुळलेल्या माणसाप्रमाणें त्यानें सर्व कामें चटाचट करून टाकलीं. पण येवढ्या अवकाशांत चंद्राच्या घरीं कामाला

असलेल्या म्हाताऱ्या बाईनें पांडोबाला कायमचेंच नोकरीला ठेवलें तर बरें होईल अशा प्रकारच्या चर्चेला सुरुवात केली होती. म्हातारीनें पांडोबाच्या कामाची तऱ्हा आदल्या दिवशीं व आजहि पाहिली होती. माणसाची तिला पारख होती. पांडोबा बेकार होता तरी या कामगारांत आढळनात त्याप्रमाणें लुच्च्या लफंग्या मवाली कामगारासारखा तो नव्हता असें पांडोबाच्या बोलण्याचालण्यावरून व इतर वागण्यावरूत म्हातारीनें पाहून ठेवलें होतें. या आपल्या विश्वासांतल्या म्हाताऱ्या भीमाबाईबरोबर पांडोबा-संबंधानें चंद्राला बोलायचेंच होतें. भीमाबाईनेंच विषय काढल्यावर चंद्रानें या गोष्टीला रुकार दिला व पांडोबाला तसें विचारण्याबद्दल म्हातारीला सांगून ठेवलें.

म्हातारीनें केलेली सूचना नाकारण्याचें पांडोबाला कांहींच कारण नव्हतें. त्यानें ती तावडतोब मान्य केली. चंद्राकडेच तो आतां राहूं लागला. त्याच्या मागचा फूटपाथ संपला. चंद्राच्या घरचीं सर्वच प्रकारचीं कामें तो पाहूं लागला. पानपट्टीच्या दुकानांतील देवघेवीची त्यानें माहिती करून घेतली. केव्हां केव्हां तोहि दुकानावर बसूं लागला. पांडोबा चंद्राकडे कामाला लागून दोन महिने होऊन गेले. वृद्ध अनुभवी व चाणाक्ष भीमाबाईनें यापुढें वेळ न गमावतां आपण होऊनच मध्यस्थी करून पांडोबाचा चंद्राबाईबरोबर म्होतुर लावून दिला.

अगदीं अनपेक्षितपणें पांडोबा-चंद्राबाईच्या नव्या संसाराला सुरवात झाली. दोघेंहि आपल्या धंद्याच्या भरभराटीच्या दृष्टीनें एकदिलानें सहकार्य करूं लागलीं. कांहीं थोड्या लोकांना भाकरी कोरड्यास पुरविणारी खानावळ बंद करून शहरांतल्या अनेक हॉटेलांप्रमाणें चहाचे व इतर अनेक खाद्यपदार्थ पुरविणारें हॉटेल काढण्याचें दोघांनीं ठरविलें. जरूरीपुरतें भांडवल चंद्रानेंच अर्थात् उभें केलें. हें हॉटेल शहराच्या वस्तींत न काढतां एकाद्या कारखान्याजवळ त्याच्या बाहेरच्या रस्त्याच्या बाजूला काढणें जास्ती फायदेशीर आहे ही गोष्ट पांडोबानें चंद्राला चांगली पटवून दिली. पण कोणत्या कारखान्याजवळ हॉटेल काढावयाचें हें ठरविण्याचें काम मात्र चंद्रानें आपल्याकडे घेतलें. पांडोबा-चंद्राबाईच्या या व्यवहारांत तिनें नव्यानें थाटलेल्या संसारांत चंद्राबाईचाच अर्थात् वरचष्मा होता. पांडोबाला आपला नवरेपणा गाजविण्याची इच्छाहि नव्हती. चंद्राबाईला पांडोबा आवडला व त्या दोघांमधील प्रेम वाढत गेलें याचें हें एक मुख्य कारण होतें. पांडोबा सर्वस्वी तिच्या तंत्रानें वागत होता. प्रसंगीं योग्य तो सल्ला तो तिला देत होता. त्याचा सल्ला तिनें एकादे वेळीं मानला नाहीं तरी तिच्या कामांत तो मनापासून सहकार करीत होता. आपल्या स्वतंत्रपणाला धक्का न लावणारा असाच मर्द तिला पाहिजे होता. तो तिला मिळाला होता म्हणून ती फार खुषींत होती. नवऱ्याला मुठींत ठेवण्याची बायकांना फार हौस. चंद्राची हौस पुरी झाली होती.

# १०

चंद्रोदय शुगर मिल्सच्या मेनगेटाजवळ निघालेलें चंद्राबाईचें हॉटेल सुरू होऊन सहाच महिने होऊन गेले पण एवढ्या दिवसांत तें फारच लोकप्रिय झालें होतें. हॉटेलची सजावट करण्याचें काम पांडोबानें आपल्या हातीं घेतलें होतें. या कामीं लागेल तो पैसा खर्च करण्यास चंद्रानें मागेंपुढें पाहिलें नाहीं. शहरांतील इराणी हॉटेलच्या धर्तीवर आपलें हॉटेल अगदीं अपटुडेट बनविण्याची दोघांचीहि महत्वाकांक्षा होती. हॉटेलला इलेक्ट्रिक लाइटचें कनेक्शन मिळविण्याच्या कामीं पांडोबानें कारखान्याच्या मॅनेजरला भेटून खटपट केली पण ती यशस्वी झाली नाहीं तेव्हां चंद्रानें स्वतः मॅनेजरची मुलाखत घेऊन हें कनेक्शन मिळविलें. हॉटेलच्या मध्यावर रेडियोचीहि व्यवस्था केली. पत्र्याच्या शेडमध्यें हें हॉटेल सुरू झालें पण शेडच्या विटांच्या भिंती सुबक रंगवून व त्यांवर आकर्षक चित्रें काढून पांडोबानें तें नयनमनोहर केलें. ठिकठिकाणीं सिनेमानटींच्या व राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या तसबिरा त्यानें योग्य त्या ठिकाणीं टांगल्या. सर्व फर्निचर चकचकीत व स्वच्छ राखण्याच्या कामीं पांडोबा दक्षता घेत असे. हॉटेलच्या एका कोपऱ्यांत पानपट्टीचें दुकान ठेवून तेंहि चंद्रानें फारच सुबकपणें सजविलें होतें. गल्ल्यावर स्वतः चंद्रा बसत असे व दासूनें आपल्या कोमल व स्पष्ट शब्दानें ओरडून सांगितलेले पैसे ती गिऱ्हाइकांकडून मोजून घेई.

पांडोबानें चंद्राच्या परवानगीनें आपल्या विश्वासांतला पोरगा म्हणून दासूला याच हॉटेलांत काम करण्याकरतां विसुभाऊच्या घरांतून काढून येथें आणलें होतें. विसुभाऊंच्या घरांतलीं कामें आणि इथलीं कामें यांत कितीतरी फरक. दासू जात्याच हुषार. कांहीं थोड्या दिवसांच्या सरावानें तो या कामांत तरबेज झाला. जसजशीं इथलीं कामें वाढत गेली तसतशी त्याची चपळाईहि वाढत गेली. हॉटेलांत गिऱ्हाइक आलें तें टेबलाजवळच्या खुर्चीवर बसलें की त्याला काय पाहिजे तें विचारावयाचें, आपल्या हॉटेलांत कोणते पदार्थ तयार आहेत तें सांगून त्याला लागतील ते जिन्नस त्याला ताबडतोब पुरवावयाचे व गिऱ्हाइक परत जातांना त्याला कोणते जिन्नस दिले तें लक्षांत ठेवून त्यांच्या किंमतीचा पुकारा करावयाचा, हीं सर्व कामें तो इतक्या चपळाईनें व हुशारीनें करावयाचा कीं त्यांत कधींच चूक आढळायची नाहीं. हॉटेलच्या सुरुवातीच्या दिवसांत तो सर्वच कामें पांडोबाला करूं लागे. या दिवसांत त्याचे फार हाल झाले आणि

हॉटेलचें काम झपाझप वाढूं लागलें तसतशी त्याची हुशारीहि वाढूं लागली व त्याच्या हालांतहि भर पडली. हॉटेलांतील इतर नोकरांप्रमाणें तो पगारी नोकर नव्हता. पोटावारी नोकर होता तो. पांडोबानें हें पाहूनच त्याला येथें आणलें होतें. सकाळीं भल्या पहाटे उठावें व रात्रीं अकरा बारा वाजेपर्यंत राब राब राबावें, दुसऱ्या दिवसाकरितां हॉटेल साफसूफ करून ठेवावें, तेव्हां कोठें त्याला आंग जमिनीवर टाकण्यास फुरसत मिळत होती. नोकरांकडून काम करून घेण्याच्या बाबतींत दोघेहि नवराबायको मोठीं दक्ष होतीं. कोण जास्ती कमी खातो, मालाची नासधूस कोण करतो कीं काय, इकडे गल्ल्या-वर बसणाऱ्या चंद्राची अगदीं बारीक नजर असे. रोजंदारीच्या मजुरांपैकीं कोणीं कप-बशी फोडली किंवा इतर कांहीं नुकसानी केली कीं त्याच्या मजुरींतून ती कापून घेतली जात असे. दासूच्या बाबतींत तसा प्रकार नसल्यामुळें असली कांहीं चूक त्याच्या हातून झाला कीं त्याला भरपूर मार मिळे. चंद्राला पहिल्या नवऱ्यापासून कांहीं मूलबाळ झालें नव्हतें अन् पांडोबाबरोबर तर तिचा नवाच संसार सुरू झाला होता. मार देण्याच्या कामांत पांडोबापेक्षां ती अधिकच निर्दय होती. शिव्यागाळी देण्याच्या कामांत तर ती पुरुषालाहि मागे टाकील अशा मर्मी बोंचणाऱ्या शिव्या देई. स्त्रिया स्वभावानें कोमल असतात या सामान्य नियमाला ती अपवाद होती. दासूचा पूर्वे-तिहास पांडोबाकडून तिला कळला होता. तेव्हां आईबापांचा पत्ता नसलेल्या दासूला अशा कांहीं निवडक शिव्या ती देई कीं आपल्या हीन दीन स्थितीची त्याला वारंवार आठवण व्हावी. चंद्रानें त्याच्या पाठींत दोन जास्त धपाटे घातले तर ते त्याला परवडत पण आपल्या अनाथ स्थितीची जाणीव करून देणाऱ्या व ज्यांत त्याचा कांहींच अपराध नव्हता अशा त्याच्या जन्मासंबंधीच्या शिव्या चंद्रा देऊं लागली म्हणजे त्या त्याला मुळींच सहन होत नसत. विसूभाऊंकडे कामाला असतांना त्याला पदोपदीं शिव्या ऐकून घ्याव्या लागत पण किती झालें तरी त्या ब्राह्मणाच्या घरच्या शिव्या. पण इथें हॉटेलांत कामाला आल्यापासून त्याच्या कामांत बदल झाला त्याप्रमाणें त्याच्या भोंवतालच्या वातावरणांतहि बदल झाला. विसुभाऊ-कडे असतांना त्याचा कैवार घेणाऱ्या सुभद्राबाई होत्या, पण तसें इथें त्याचें कोणी नव्हतें. दासूला निर्दयपणानें वागविण्यांत दोघां नवराबायकोंची जणूं चढाओढच लागली होती. दासूला इथें मिळणाऱ्या शिव्यांचा प्रथम कांहीं दिवस अर्थ समजत नव्हता व उमजहि पडत नव्हता. पण इथल्या वातावरणांत तो जसजसा रुळूं लागला व आजूबाजूच्या त्याच वातावरणांत मोठ्या झालेल्या त्याच्या-सहकाऱ्यांशीं त्याचें जसजसें संघटन होऊं लागलें त्याबरोबर या शिव्यांचा अर्थ त्याला समजं लागला व असल्या प्रत्येक खांडगाळी शिवीबरोबर त्याचें हृदय व्याकुल होऊं लागलें. पण पोर स्वभावामुळें तो त्या शिव्या विसरून जाई व कामाला लागे.

वास्तविक इतर सर्व मुलांपेक्षां व नोकरांपेक्षां त्याच्या आंगीं दिसून आलेली जास्त हुशारी पाहून पांडोबाचें राहूं दे पण चंद्रानें तरी त्याला मायेनें वागवून आपलासा करून टाकायला हवें होतें. पण हें पोर आपल्या मालकीचें आहे, आपल्याशिवाय त्याला सत ना गत, या मगरूरीच्या भावनेनें त्याच्याशीं ती निष्ठुरपणानें वागे. यामुळें त्याच्याहि मनांत पांडोबा व चंद्राबाई यांच्या संबंधानें आपलेपणा व वाटतां तो यांच्या-पासून दुरावत चालला. सबंध दिवस व अर्धी रात्रपर्यंत राब राब राबावें पण त्याचें फळ काय, तर घटकोंघटकीं शिव्या. तो आपल्या हातानें गिऱ्हाइकांना चहा, चिवडा, भजीं, शेव, लाडू, शिरा, पुरी, भाजी, गिऱ्हाइकांना पुरवायचा. पण त्याच्या वांटणीला शिरा, लाडू कधीं आलाच नाहीं. शिळीं शिल्लक राहिलेली भजीं, वाळलीकोळली शेव व निवून गेलेला चहा, यावरच त्याला दिवस काढावे लागत. शिळा राहिलेला माल फुकट जाऊं द्यावयाचा नाहीं या बाबतींत चंद्रा मोठी दक्ष होती. शिळीं राहिलेलीं दोनतीन दिवसांची भजीं रात्रीं पाण्याचा हपका मारून भिजवायचीं व चांगल्या ताज्या भिजलेल्या पिठांत तीं बेमालूमपणें मिसळून द्यावयाचीं व पुन्हां अशा रीतीनें मिसळीच्या पिठाच्या तळलेल्या भजांची लज्जत मात्र कमी होऊं द्यायची नाहीं, ही हातोटी चंद्राला चांगली साधली होती. ताज्या भजांच्या प्लेटी दासू गिऱ्हा-इकांना वांटायचा पण हीं भजीं खरोखरी ताजीं नाहींत हें त्याला माहीत असल्यामुळें हें खरें नव्हें, गिऱ्हाइकाची आपण फसवणूक करतों आहोंत ही भावना दासूच्या मनाला टोंचल्याशिवाय राहात नसे. जी हातचलाखी भजांच्या बाबतींत तीच शिरा-पुरींत. पण या गोष्टीशीं त्याला काय करायचे होतें ? तो तर हाटेलांतला सामान्य नोकर. पण मालकांशीं संबंध असलेला नोकर असल्यामुळें त्याला या मखल्या इतर नोकरांपेक्षा चांगल्या माहीत असायच्या इतकेंच.

या हॉटेलांत दासूनें जवळजवळ वर्षभर काढलें. थंडीच्या दिवसांत तर त्याचे फारच हाल झाले. दोन फाटकीं पोतीं हेंच त्याचें अंथरुणपांघरूण. रात्रीं फारफार तर तीनचार तास त्याला निजायला सांपडे. हॉटेलाच्या एकाद्या कोपऱ्यांत फाटक्या पोत्यांत कसें तरी अंग मुदडून घेऊन थंडीनें सारखा कुडकुडत त्याला रात्र काढावी लागे. हॉटेलचें काम वाढलें त्या वेळीं त्याच्या जोडीला असाच त्याच्यासारखा सहकारी नोकर छोकरा त्याला मिळाला. हा पोरगा अर्थात् पगारी होता. हॉटेलांत मिळेल तें खाऊन महिन्याला तीन रुपये पगार त्याला मिळे. पण गंमत अशी कीं, पगाराच्या वेळीं लक्ष ठेवून त्याचा काका त्यांपैकीं दोन अडीच रुपये घेऊन जायचा. हे पैसे नेत असतांना चुलत्यापुतण्याची खूब हुज्जत व्हावयाची. 'भडव्या भीक मागत फिरत होतास तुला अन्नाला लावलं विसरलास वाटतें ?' अशी कांहीं तरी धमकी देऊन तो ते पैसे

घेऊन जायचा. 'महिनाभर मी इथं रात्रंदिवस राबतो अन् हा माझे पैसे घेऊन जातो.' ही या पोराची कुरकुर पुन्हा महिनाभर चालू राहायची. या पोराचें नांव सदू. सदूच्या या कुरकुरीनें दासूला एक नवीनच गोष्ट शिकविली होती. महिनाभर श्रम करून जेवणाव्यतिरिक्त सदूला जे थोडेसे पैसे मिळायचे ते त्याच्या जवळच राहतील तर तो त्या पैशांत नवीन कुडतें विकत घेईल. एक-दोन महिने पैसे सांठवून पांघरायकरतां तो एकादी घोंगडी विकत घेईल. पण काका हे पैसे लुबाडून घेऊन जात असल्यामुळें सदूला आपल्यासारखी थंडींत कुडकुडत रात्र काढावी लागते हें तो पाहात होता. दासूला अंथरापांघरायला दोन फाटकीं पोतीं तरी होतीं पण या सदूला त्याच्या काकानें दिलेल्या फाटक्या धोतराशिवाय दुसरें कांहीं अंथरापांघरायला नव्हतें.

'तीन रुपये कां होईनात आपल्याला कां ते मिळत नाहींत? इथं कामाला लागून वर्ष होऊन गेलं. महिन्याला तीन रुपये धरले तर छत्तीसांवर रुपये झाले.' दासूच्या मनांत विचार येऊन गेला. पांडोबानें दासूला आणलें. तेव्हां त्याला मजूरी द्यायची कीं नाहीं हें त्याच्या मर्जीवर. घरांतलाच मजूर माणूस, त्याला मजूरी काय म्हणून? दासू आपला मुलगा आहे असें पांडोबा कधीं कधीं सांगे पण तें सपशेल खोटें आहे हें दासूला आतांशा नक्की समजून चुकलें होतें. घरचा मुलगा म्हणून दासूला महिन्याला पगार मिळत नव्हता. उलट महिन्यांतून निदान आठ दहा वेळां तरी आंगभर मार मात्र मिळायचा. इतर पगारी मुलांच्या आंगावर हात टाकण्याची पांडोबाची किंवा चंद्राची छातीच नव्हती. एकदा सदूला पांडोबानें चापट मारली तेव्हां त्याच्या काकानें 'मुलाला मारायबिरायचें काम नाहीं' असे पांडोबाला दरडावून सांगितलें होतें. पगारी नोकरांना कधीं काळीं फार तर शिव्या बसत. पण दासूच्या बाबतींत सगळेंच निराळें. दासूला कशाहि प्रकारच्या शिव्या दिल्या किंवा त्याला कितीहि झोडपलें तरी गुपचुप राहून तो हें सर्व सहन करीत असे. महिना पंधरा दिवसांनीं सदू किंवा इतर नोकरांपैकीं कोणी घरीं राहिला तर त्याला रजा मिळत असे. कोणी सुटी मागितली तर ती त्याला मिळत असे. या सुटींत ते लोक सिनेमाला जात व इतर मजाहि करीत. पण दासूला सुटी म्हणजे काय चीज आहे हें माहीत नव्हतें. मुंबईला सुभद्राबाईच्या बरोबर तो गेला होता त्या वेळीं त्यानं एकदां दोनदां सिनेमा पाहिला होता. त्यानंतर सिनेमा पाहायला वेळ कुठला व त्याकरतां लागणारे पैसे तरी कुठले? सदूच्या सांगण्यावरून त्यानें चंद्राबाईजवळ एकदा सुटीची मागणी केली त्याबरोबर तिनं संतापाचा आव आणला, खूप शिव्या मोजल्या व दासूच्या पाठींत दोन चांगले धपाटेहि दिले यामुळें सुटीची किंवा सिनेमाची गोष्ट त्यानें पुन्हा चंद्राबाईपाशीं किंवा पांडोबापाशींहि काढली नाहीं.

पण इतर नोकरांच्या बाबतींत दोघें नवरा बायको पडतें घेऊन वागतात आणि आपल्याच बाबतींत इतका राग काय म्हणून ? याचा उलगडा दासूला होत नव्हता. आपण त्यांच्या 'घरचं माणूस' म्हणावं तर त्याप्रमाणेंहि वागवीत नाहींत. तो आपलेपणा तरी कुठं आहे ? कामाच्या दृष्टीनें पाहावें तर हॉटेलमधल्या सर्व मुलांत दासूइतका हुशार मुलगा कोणीच नव्हता. सदूला सहा महिन्यांनंतर आणखी दोन रुपये वाढून मिळायचे होते. पण दासू कामाला लागून वर्ष होऊन गेलें तरी त्याला पैसा असा हातांत कधींच मिळाला नाहीं. दासू आतां मोठा होत चालला होता. पैशाची किंमत त्याला कळूं लागली होती त्याचप्रमाणें श्रमालाहि कांहीं किंमत आहे हें आपल्या इतर सहकाऱ्यांकडे पाहून त्याला समजूं लागलें होतें. आपल्या श्रमाच्या मोबदल्यांत आपल्याला काय मिळतें व इतरांना काय मिळतें याची तुलना तो आतां करूं लागला होता. त्याचबरोबर इतरांपेक्षां कामाच्या दृष्टीनें आपण यत्किंचितहि कमी नाहीं किंबहुना थोडें जास्तच चांगलें काम करतों असे उद्गार हॉटेलमधल्या गिऱ्हाइकांच्या तोंडूनहि त्यानें कधींमधीं ऐकले होते.

इतरांप्रमाणें आपण काम तर करतों. काम चांगलेंहि करतों. पण मनाजोगें पोटभर खायला मिळत नाहीं. अंगावरचे कपडे पाहावे ते फाटून गेलेले, काळे मिचकुट झालेले, कामापासून सुटका नाहीं, सदानकदा हॉटेल, हॉटेल ! दासूचें मन गांजून गेलें होतें.

याच्या उलट ज्यानें आपल्याला इथें कामाकरतां आणलें त्याच्या चैनी तो पाहत होता. त्याचें खाणें पिणें, पोशाख, त्याची निजायची व्यवस्था, आपल्या कामावर देखरेख करावी, हवें तसें कोठेंहि भटकावें, रात्रीं बारा बारा वाजेपर्यंत हॉटेलमध्यें परत येऊं नये. पांडोबा स्वतः असा वागतो अन् आपल्याकडे तो कांहींच पाहात नाहीं या गोष्टीचा त्याला फार राग आला होता.

त्याचा सहकारी सदू त्याचीहि हीच अवस्था होती. हॉटेलच्या कोपऱ्यांत हे दोघे रात्रीं कुडकुडत पडले म्हणजे त्यांच्यांत अशाच प्रकारची कुजबुज चाले. या असमाधानवृत्तीमुळें दासूचें कामाकडे लक्ष लागेनासें झालें. एके दिवशीं टेबलावरील कपबशा आवरतां आवरतां दासूच्या हातून एक बशी खालीं पडली व तिचे तुकडे झाले. क्षमा ही चीज चंद्रापाशीं नव्हतीच. तिनें त्या दिवशीं दासूला अनेक वाईट साईट शिव्या देऊन चांगलें अंग भरून बदडून काढलें. त्याच दिवशीं गिऱ्हाइकाचा खोळंबा केल्याबद्दल सदूवरहि शिव्यांचा भडिमार झाला होता.

'दास्या, आपण कांहीं इथं यापुढं काम करणार नाहीं.' रात्रींच्या एकांतांत सदू कुजबुजला.

‘ मलासुद्धां कंटाळा आला आहे. पण जायचं कुठं ? ’ दासूनें विचारलें.

‘ कुठंबी जाऊं पण इथं राह्यचं नाहीं. ’ सदू निश्चयी स्वरांत म्हणाला.

या प्रसंगाला तीन दिवस होऊन गेले. चौथे दिवशीं दोन्ही पोरें नेहमींच्या त्यांच्या कामावर हजर नाहींत असें पांडोबाला आढळून आलें. पांडोबानें आजूबाजूला पुष्कळ तपास केला. दोघांचाहि पत्ता लागला नाहीं.

पोरांना चांगलें न वागविल्याबद्दल पांडोबा व चंद्रा यांच्यांत खूप खडाजंगी झाली. दोघांनीं परस्परांना दोष दिला. पोरांचा तपास करण्यापेक्षां हॉटेलच्या कामाची व्यवस्था करणें जास्त जरूरीचें. यामुळें पांडोबाचा तो दिवस हॉटेलमध्येंच गेला. या नंतर त्यानें आसपास सर्वत्र दोघांचा तपास केला पण कांहींच मागमूस न लागल्यामुळें त्यानें तो नादहि सोडून दिला. या दोन्ही पोरांनीं हॉटेलांतून कोणाला न कळतां पोबारा केला होता पण जातांना त्यांनीं हॉटेलांतील तनसडीलाहि धक्का लावला नव्हता. आपल्या अंगावरच्या फाटक्या तुटक्या वस्त्रानिशीं तीं पळून गेलीं होतीं. पांडोबानें व चंद्रानें या पोरांचा तपास लावण्याचे कामीं यापुढें लक्ष घातलें याचें हेंहि एक कारण होतें. हीं दोन्ही पोरें गेल्यामुळें विशेषतः दासू गेल्यामुळें त्यांच्या हॉटेलांत जवळ जवळ अगदीं फुकट व अक्कल हुशारीनें काम करणारा एक नोकर नाहींसा झाला होता. पांडोबापेक्षां चंद्राला या गोष्टीची जास्त जाणीव असल्यामुळें ती अधिक नाराज झाली होती व या पोराला आपण थोडें मायेनें व आपलेपणानें वागविलें असतें तर बरें झालें असतें अशी अनुतापाची एक झलकहि तिच्या हृदयांत चमकून गेली. पण या अनुतापाचा आतां कांहींच उपयोग नव्हता.

हीं दोन्हीं पोरें वैतागून हॉटेलांतून पहांटे गुपचुप बाहेर पडलीं. चाराचा सुमार होता. कृष्ण पक्षांतील कलाहीन चंद्र बराच वर आला होता. सदूजवळ पांघरायला फाटकें धोतर तरी होतें पण दासूजवळ तेंहि नव्हतें. त्यानें आपले दोन्ही हात छातीवर दाबून पांघरले होते. थंडी मी म्हणत होती. त्यांतच पहाटेच्या वाऱ्यानें ती दोघांना बोंच बोंचून खात होती. हॉटेलांतून बाहेर पडतांना कोठें जावयाचें हें दोघांनीं नक्की ठरविलें नव्हतें तरी तेथून तीन मैलांवर असलेल्या स्टेशनाकडे त्यांचे पाय सहजच वळले. चंद्राबाईच्या हॉटेलांत यापुढें राहायचें नाहीं. मजुरी तर करायचीच आहे पण त्या मजुरीचे सर्व पैसे आपल्याला मिळाले पाहिजेत व त्या पैशांत आपण खूप चैनीनं राहूं ही दोघांची कल्पना. पहांटेच्या वेळेला थेट मुंबईकडे जाणारी एक गाडी स्टेशनावर येते ही गोष्ट सदूला माहीत होती. स्टेशन जवळ आलें त्याबरोबर सदूला वरील गोष्ट आठवली व तो हर्षभरांत म्हणाला.

‘ चला, आपण ममईला जाऊं. ’

' ममईला ? ' दासू एकदां सुभद्राबाईबरोबर मुंबईला आला होता. दीड दोन वर्षांपूर्वीची ती गोष्ट होती.

दासूनें वरील शब्द अशाच आवाजांत उच्चारले होते कीं ते ऐकून सदू आश्चर्यचकित झाला.

'कां ममईला तूं गेला होतास ? ' सदूनें त्याला विचारलें.

' हो, गेलों होतों. आमच्या माईबरोबर गेलों होतों.' दासूनें उत्तर दिलें.

' कोणच्या माई ? चंद्राबाईबरोबर ? '

'नव्हे रे ! चंद्राबाई, तिचं नांव नको काढूं !'

' मग कोण ? '

' काय सांगूं तुला ? हो ! हो ! त्या सोनगांवच्या त्या माई !' आठवल्या-सारखें करून दासूनें उत्तर दिलें.

' कुणीकडं हे सोनगांव ? '

' तें कांहीं मला माहीत नाहीं. ' दासू म्हणाला.

स्टेशन आलें. कोण गर्दी ! सदूला व दासूला ही गोष्ट पथ्यावरच पडली. दोघेहि एकमेकांचे हात धरून गर्दीत घुसले. गाडी आली सदूनें लटपट करून ज्या डब्यांतून लोक उतरत होते तो डबा गांठला व त्यांत तो शिरला व दासूलाहि त्यानें त्या डब्यांत दारांतून वर ओढून घेतलें. गाडी मिळाली. डब्यांत झालेल्या गर्दीत दोघांना ऊबहि मिळाली. गाडी एक दोन स्टेशनें जाते न जाते इतक्यांत दोघेहि एक-मेकांना कवटाळून धरून झोंपीहि गेले. जंक्शनच्या स्टेशनावर गाडी आली व आजू-बाजूचे लोक उतरूं लागले त्यावेळीं ते जागे झाले.

' तिकीट ! तिकीट आहे का ? ' तिकीट तपासणारानें दोघांनाहि खडसावून विचारलें. दासू बिचारा घाबरून गेला. सदू या कामांत तरबेज होता. तो घाबरला नाहीं.

' कुठं चाललाय कुठं ? ' जवळच्या एका इसमानें दोघांना विचारलें.

' ममईला. ' सदूनें उत्तर दिलें.

' तुमच्या बापानं ठेवलीय ममई, चला उतरा खालीं. ' तिकीट तपासणारानें सदूच्या मुस्कटांत एक ठेवून दिली. सदूला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. त्यानें गाल चोळले व दासूवरहि हा प्रसंग येण्यापूर्वींच त्याला हाताशी धरून तो दरवाज्याकडे गेला व तेथेंच थबकून राहिला.

' कां खालीं उतरतो कां नाहीं. कां पाहिजे आणखी एक थप्पड. ' तिकीट चेकरनें डरकाळी फोडली.

आतां या डब्यांत आपलें जमत नाहीं असें पाहून सदू दासूला घेऊन खालीं उतरला. तिकीट चेकर तोंपर्यंत दरवाजांत आलाच होता.

‘ पुन्हा वर चढशील तर पोलिसच्या हवालीं करीन समजलें.’ तिकीट चेकर याप्रमाणें आपल्या मागेंच लागला असें पाहून सदूचा नाइलाजच झाला.

गाडी निघून गेली. तिकीट चेकरनें बिनतिकिटाचे पुष्कळच भिकारी व बैरागी एकत्र केले व सदू-दासूसह या सर्वांना स्टेशनच्या कंपाउंडच्या बाहेर हांकून लावलें

‘ आतां ममईला कसं जाणार ? ’ दासूनें चिंताग्रस्त स्वरांत उद्गार काढले.

‘ ममईलाच काय ठेवलंय. इथं कुठं तरी आपण काम पाहूं.’ सदूनें त्याला आश्वासन दिलें.

चंद्राच्या हॉटेलांतून सदूनें व दासूनें पोबारा केला तेव्हां दासूजवळ अर्थात एक पैहि नव्हतां. कारण त्याला खासगी खर्चाकरतां कधींसुद्धां पैसा मिळाला नव्हता. सदूजवळ त्याच्या काकानें राहूं दिलेल्या पैशांपैकी आठबारा आणे शिल्लक होते. स्टेशन-बाहेर पडल्यावर दोघांनाहि भुकेनें ग्रासलें. जंक्शनच्या स्टेशनचें गांव बरेंच लांब होतें. रेल्वे जंक्शनमुळेंच या गांवाला महत्व आलें होतें व स्टेशनाजवळची वस्ती मात्र भराभर वाढत होती. स्टेशनांतून बाहेर पडल्यावर तेथेंच जवळ असलेलें एक हॉटेल दोघांनीं गांठलें. हॉटेल बऱ्यापैकी होतें. दोघांनी सिंगल चहाची व स्लाईसची मागणी केली. त्यांची सकाळची न्याहारी झाली खरी पण बिल सहा आणे आलेलें पाहून सदूच्या पोटांत धस्स झालें. बिल तसें अवास्तव नव्हतें पण सदूजवळ आतां सहाच आणे शिल्लक राहिले. होते. काम मिळालें तर बरें नाहींतर दिवस कसे काढायचे या काळजीनें त्याला घेरलें होतें.

पण हॉटेलांतून हे दोघे बाल कामगार मित्र बाहेर पडतांच जवळच थोड्या अंतरावर एका मोठ्या इमारतीचें काम चालू आहे व त्या ठिकाणीं बरेच मजूर गोळा झालेले त्यांनीं पाहिले. जवळ गेले तों त्यांना आढळलें कीं, कंत्राटदार मजुरांची भरती करीत आहे. सदू जातीनेंच थोडा धीट होता. त्यानें पुढें जाऊन आपणां दोघांना काम मिळेल का, असें कंत्राटदाराला विचारलें. कंत्राटदारानें दोघांच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिलें. दोन्ही पोरें त्याला हुशार दिसलीं.

‘ काय काम कराल ? ’

‘ सांगाल तें ! ’

‘ गवंड्याच्या हाता खालीं काम करावं लागेल. ’

‘ मजूरी ? ’

‘ इतर मुलांना जी मिळेल ती. ’

‘ जात कोणती ? ’

‘ मऱ्हाटी. ’

‘ बरं, मिस्त्री या दोघांना घ्या तुमच्या हाताखालीं. ’

मिस्त्रीनें त्या दोघांना त्यांचीं नांवें विचारलीं. सदूनें चटकन आपलें नांव सांगितलें : ‘ सदू ग्यानू जाधव. ’

‘ तुझें रे नांव काय ? ’

‘ दासू. ’

‘ बापाचें नांव काय ? ’

दासूवर हा असा पहिलाच प्रसंग होता. तरी तो डगमगला नाहीं.

‘ पांडोबा. ’

‘ आडनांव ? ’

‘ आडनाऽऽव. ’

‘ असं लाजतोस काय ? ’ सदूनें दासूला हटकलें.

‘ दासू पांडोबा दळवी. ’ असें त्यानें त्याचें नांव रेटून सांगितलें.

मिस्त्रीला सदूपेक्षा दासू हुशार दिसला.

‘ शाळेंत कधीं गेला होतास काय ? ’

‘ शाळा ? ’

‘ शाळा कसलीन् काय ? तुमच्या हाताखालीं काम करायला शाळा कशाला पाहिजे ? ’ मुकादमानें मिस्त्रीची थट्टा केली.

दोघेहि कामाला लागले.

चुन्याच्या घाणीवरच दोघांना काम मिळालें.

दुपारीं काम बंद झालें त्या वेळीं दोघांनीं सिंगल चहा भजीं खाऊन भूक भागविली.

संध्याकाळीं, काम बंद झाल्यावर रोजंदारीच्या मजुरांचीं नांवें पुकारून त्यांना मजुरी देण्यात आली. सदूला व दासूला ही पद्धत अर्थातच बरी वाटली. दासूच्या हातांत सहा आणे पडले. सदूलाहि तितकेच पैसे मिळाले. दिवसभर मजुरी करून हातांत पैसे मिळाले याचाच दासूला आनंद झाला होता. दासूच्या आयुष्यांतला हातांत पैसे मिळाल्याचा हा पहिलाच प्रसंग.

दिवसभर अंग भरून काम केल्यामुळें सदूला व दासूला चांगलीच भूक लागली होती. दोघांचे मिळून आतां बारा आणे त्यांच्यापाशीं होते. दोघेहि हॉटेलांत गेले. दोघांचे मिळून दहा आणे खर्च झाले तरी चांगलें पोट भरून जेवल्याचें त्यांना समाधान झालें नाहीं. त्यांना भाकरी पाहिजे होती.

निजायचे कोठें ? ज्या इमारतीच्या कामावर ते होते तिकडेच ते पुन्हा आले. जवळच असलेल्या झोंपड्यांच्या मध्यभागीं शेकोटी पेटवलेली त्यांना दिसली. इतर कांहीं

मजुरांप्रमाणें या शेकोटीभोंवतीं तेहि शेकत बसले व त्यांच्याप्रमाणेंच बाहेरून कामाकरतां आलेले मजूर या इमारतीच्या एका कोपऱ्यांत उभारलेल्या पत्र्याच्या टॅपररी शेडमध्यें झोंपत होते त्या ठिकाणीं त्यांनीं दिवसभर राबून दमलेल्या शरीरास विश्रांति दिली. या ठिकाणीं कोणी कोणाची चौकशी केली नाहीं. सगळेच मजूर पोटाच्या फिकीरींत होते. दिवसभर काम करून मिळणाऱ्या मजुरीनें त्यांचें पोट देखील भागत नव्हतें. ही मजुरी अपुरी आहे, अशा प्रकारच्या कांहीं तरी गप्पा त्यांच्यांत चालू होत्या. दिवसभर दमून गेल्यामुळें या गप्पा ऐकत राहण्याच्या मनःस्थितींत ते नव्हते.

दुसरे दिवसापासून पुन्हां ते कामाला लागले. चंद्राच्या हॉटेलमध्यें सतरा अठरा तास ते काम करीत होते पण तें सर्व काम त्यांना फारसें जाचक होत नव्हतें. इथें आठदहा तासच त्यांना काम करावें लागलें पण तें सर्व उन्हांत. शिवाय अंगमेहनतीचें हें काम होतें. तिथेंच आसपास चालू असलेल्या मराठी खानावळींत त्यांना भाकरी मिळण्याची सोय लागली पण या भाकरीच्या जेवणाला दोन्ही वेळां मिळून पांच आणे पडूं लागले. त्यांच्या अंगावरचा कपडा अगदीं फाटून गेला होता. नवा सदरा घ्यावयाचा तर मजुरीपैकीं कांहीं तरी पैसे शिल्लक राहायला पाहिजेत. मजुरीच्या सहा आण्यांपैकीं एक आणा शिल्लक राही तो सकाळच्या न्याहारीकरतां खर्च होई. सदऱ्याकरतां पैसे शिल्लक ठेवायचे म्हणजे केव्हां केव्हां रात्रीचें जेवण चुकवून अडीच आणे शिल्लक टाकावयास पाहिजेत. एका महिन्यांत असेहि कांहीं दिवस काढून दोघांनीं एक एक सोलापुरी खादीचा आयता शिवलेला सदरा विकत घेतला. सदऱ्याचें कसेंतरी भागलें तेव्हां शॉर्टची पाळी आली. आणखी अशी उपासमारीची सवड करून तीहि गरज त्यांनीं भागविली. यानंतर इमारतीचें काम दोन तीन महिने चाललें त्यांत उपासमारीची पाळी त्यांच्यावर आली नाहीं.

पण आतां नवीनच प्रश्न उत्पन्न झाला. इमारतीचें काम संपत आलें. मजुरींची संख्या कमी होऊं लागली. त्यांत या दोघां मित्रांवरहि बेकारीचा प्रसंग आला.

* * * *

चंद्राच्या हॉटेलांतून दासू पळून गेला त्याच्या बरोबर सदूहि पळून गेला. तेव्हांपासून चंद्राच्या या धंद्याला जणूं काय उतरती कळाच लागली. कसाहि छळ झाला व कितीहि हाल सोसावे लागले तरी दासू या हॉटेलमध्यें अत्यंत तत्परतेनें काम करीत होता व त्याच्याबरोबर सदूहि तितक्याच हुशारीनें काम करीत होता. हीं दोन्ही मुलें गिऱ्हाइकांच्या सेवेला केव्हांहि हजर असत व त्यांना लागेल त्या वस्तु पुरविण्याच्या कामांत त्यांनीं कधींहि बोभाटा होऊं दिला नव्हता. माणसाची किंमत त्याच्या

गैरहजिरींतच करून येते. हीं दोन मुलें गेल्यापासून पांडोबाला आपला उजवा हातच गळून गेल्यासारखें वाटूं लागले, व गल्ल्यावर बसणाऱ्या चंद्राला तर त्याची पदोपदीं आठवण होऊं लागली.

'शिवीगाळ करून व मारहाण करून दासूला घालवून बसलीस. त्याच्याइतका हुशार मुलगा आपल्याला आतां मिळणार नाहीं.' पांडोबा एकदां चंद्राला उद्देशून म्हणाला.

'त्याला बोलूं नको व मारूं नको तर त्याला डोक्यांवर का बसून घ्यायचा होता?' चंद्रा तावातावानें म्हणाली.

'अग, या गोष्टीला तरी मर्यादा असतेच कीं नाहीं?' तुझ्या या अशा वागण्यामुळेंच तो पोरगा निघून गेला.' पांडोबा तिला टोंचून बोलला.

'दासू स्वतः होऊन कधींच गेला नसता. त्या सद्यानं त्याला इथून बहकावून नेला. मोठा कैवार घ्यायला निघाला दासूचा. तूं तरी कधीं त्याच्याकडं लक्ष दिलंस? तो खातो काय, पितो काय, त्याच्या अंगावर कांबरून आहे कां, तो कुठं निजतो, त्याला अंथरायपांघरायला कांहीं आहे कां नाहीं हें तूं तरी पाहिलंस कां?' चंद्रानें उलट टोमणा दिला.

'तूं तर हॉटेलाची मालकीण.'

'अन् तूं कोण? तूं काय इथला बिगारी आहेस वाटतं?'

'अग मी जर इथला मालक असतो तर...'

'पुरे पुरे. तुझ्या जीवावर तर मी हें हॉटेल काढलं. आतां हीं पोरं गेल्यापासून हॉटेल नीट चालेना तेव्हां लागलास वाटतं हात झाडायला!'

'हात कोण झाडतोय. दुसरीं पोरं पाहिलींच कीं, कां तूं तीं पाहायला गेली होतीस?'

'बरं बरं, तोंड पुरे कर.'

अशा प्रकारची तोंडातोंडी हीं पोरं गेल्यापासून पांडोबा व चंद्रा यांच्यामध्यें वारंवार होऊं लागली व दोघांचीं मनें एकमेकांपासून अलग होऊन एकमेकांचे दोष काढण्याला व एकमेकांना घालून पाडून बोलण्यालाहि सुरुवात झाली.

वास्तविक चंद्राच या हॉटेलची मालकीण होती. तिचेंच सगळें भांडवल होतें. हॉटेलची व्यवस्था पाहणारा व पडेल तें काम करणारा असें पांडोबाचें या ठिकाणीं नातें होतें. पांडोबाला अगदीं स्वतःच्या मुखत्यारीनें हॉटेलची व्यवस्था करतां येत नव्हती तरी चंद्राबाईचें सर्व लक्ष पानपट्टीच्या दुकानांत असल्यामुळें व तेथें येणाऱ्या मंडळींना रिझविण्यांत तिचा सारा वेळ जात असल्यामुळें हॉटेलचीं सर्व कामें तो बिनतक्रार पार पाडीत असे. हॉटेलच्या व्यवहारांतील देवघेव वगैरे पांडोबाच्याच हातांत

होती. व हॉटेलमध्ये जोपर्यंत चांगला नफा होत होता तोपर्यंत चंद्रा त्याच्या कारभारा-कडे लक्षहि देत नव्हती.

पण हीं दोन्हीं पोरें एकाएकीं गेल्यामुळें दुसरीं मुलें मिळेपर्यंत पहिले दोन चार दिवस पांडोबाची फारच तारांबळ झाली. व जीं दुसरीं मुलें त्यानें या कामाकरतां आणलीं त्यांना या कामाची माहिती नव्हती, संवयहि नव्हती व नवीन आलेलीं मुलें कामें तर व्यवस्थित करायचीं नाहींतच, उलट गिऱ्हाइकांचा खोळंबा करीत, खाण्याच्या जिनसांची नासधूस करीत, स्वतः चोरूनमारून खात व दुसऱ्या नोकरांनाहि या अव्यवस्थेमुळें आपल्यांत मिसळून घेत. हॉटेलची घडी पुन्हा कशी व्यवस्थित बसेल या चिंतेनें पांडोबाचें मन अस्वस्थ झालें होतें. त्यांतच पांडोबाचें मन या कामापासून उडायला आणखी एक बलवत्तर कारण घडून आलें.

पांडोबा चंद्राकडे नोकरीला राहिला पण त्या वेळची चंद्रा आतां राहिली नव्हती. तिच्यांत आतां कितीतरी फरक पडला होता. पानपट्टीचें दुकान तिनें या ठिकाणीं चालविलें होतें. गिऱ्हाइकाशीं ती जितक्यास तितकाच संबंध ठेवीत असे. ती स्त्री होती. तरुण सुंदर स्त्री होती. पानपट्टीचें तिचें दुकान. सर्व प्रकारचे लोक तिच्या दुकानीं यावयाचे. कांहीं चावट तरुण मुलेंहि तिच्या दुकानावर येत. अचकट विचकट बोलत. लघळपणा करीत. पण त्यांच्या या वर्तनाला आपणाकडून उत्तेजन मिळेल असें वर्तन चंद्रा कधींहि करीत नसे. तिच्या शब्दांत कडकपणा होता. तिची वागणूकहि तशीच कडक होती. त्यामुळें तिच्या दुकानांत कोणाचीहि डाळ शिजत नसे. किफायतशीर धंदा या दृष्टीनेंच तिनें हें पानपट्टीचें दुकान चालविलें होतें. त्याच्या जोडीला तिनें एक लहानशी खानावळ चालविली होती. चंद्रोदय फॅक्टरीच्या मुख्य रस्त्यावर तिनें हाच धंदा मोठ्या प्रमाणावर सुरू केला.

पण या फॅक्टरीच्या वातावरणांत आल्यावर तिच्या वागणुकींत फरक पडूं लागला. या ठिकाणीं दोनचार पानपट्टीचीं दुकानें व खानावळीहि होत्या पण चंद्राच्या हॉटेलनें या भागांतल्या गिऱ्हाइकाचें मन आकर्षण केलें होतें. हॉटेलची अद्यावत व्यवस्था या आकर्षणाचें एक कारण होतें पण त्यापेक्षांहि तिच्या पानपट्टीच्या दुकानानें तिथल्या कामगारांना जसें कांहीं वेडावून सोडलें होते. पानपट्टीचें दुकान चालविणारी चंद्रा ही एकच स्त्री होती. कोणालाहि आकर्षित करील असें तिचें सौंदर्य होतें.

कागदी लिंबालाहि लाजवील असें तिचें तजेलदार गोरेपण होतें. फार सडपातळ नाहीं व फार लठ्ठहि नाही अशी तिची गुटगुटीत अंगलट, तिचा गोल चेहरा, अणकुचीदार हनुवटी, गुबगुबीत गाल, किंचित् नकटें पण ठसकेदार नाक, काळेभोर डोळे, कमानदार भुंवया, रुंद कपाळ, भरपूर काळ्या केसांचा मानेवर रुळणारा अंबाडा, विडा खाऊन रंगलेले तिचे वक्र ओंठ, व कपाळावरील लालभडक

कुंकवाची चंद्रकोर. शेंकडो कामगारांनी गजबजलेल्या त्या कारखान्याच्या वातावरणांत चित्ताला मोहून टाकणाऱ्या अशा सर्व सौंदर्याच्या चिजा चंद्राजवळ एकत्र झाल्या होत्या. तिचा चेहरा स्वाभाविकच हंसरा होता. बोलूं लागतांच तिच्या दोन्ही गालांवर बारिकशा खळग्या पडत यामुळें तिनें स्वतः तयार केलेला तिकोनी पिवळ्या पानाचा विडा 'घ्या ना' म्हणून तिनें आपला हात पुढें केला कीं कोणत्याहि गिऱ्हाइकाला त्याचा स्वीकार करतांना धन्यता वाटत असे. तिच्या अंगलटाला व गोरेपणाला शोभेल असाच तिचा पोषाख असे. सुंदर किनारीचीं झिरझिरीत तलम लुगडीं ती चापून चोपून नेसत असे व आपल्या गोरेपणाला जास्त खुलवतील अशाच रंगाचीं ती पसंत करी. तंग चोळीखाली लपविलेले उन्नत उरोज गिऱ्हाइकांच्या व समोरून जाणारा येणारांच्या नजरा खेंचून घेत व या आशाळभूतांची नजर त्यांना लागूं नये म्हणूनच कीं काय किंचित् स्मित करीत लफ्फेदार पदरांत त्यांना ती आणखी लपवून ठेवण्याकरतां पुन्हा पुन्हा प्रयत्न करी. तिला पाहात राहणाऱ्या उल्लू नेत्रांना ती एक मेजवानीच वाटे. चंद्राच्या भिवयांतील उग्रपणा व तिच्या शब्दांतील पूर्वीचा कडकपणा घालविण्यास, तरुण कामलोलुप कामगारांच्या नजराच कारणीभूत झाल्या होत्या. शेंकडो कामगार कारखान्यांत कामावर आले होते. प्रत्येकानें आपली कारभारीण येथें थोडीच आणली होती किंवा प्रत्येकाचें थोंडेंच लग्न झालें होतें ? कारखान्याच्या गरम व घरघरीच्या वातावरणांत व त्याच्या भोंवती अवाढव्यपणें पसरलेल्या शेतांतून उन्हांत काम करून थकून भागून गेलेल्या कामगारांची क्षुधा शांत करण्याचें व माणसांत स्वाभाविकपणें सतत जागृत असणाऱ्या कामुक वृत्तींना उत्तेजन देण्याचें स्थान चंद्रानें निर्माण केलें होतें व आपल्या सहज सौंदर्यानें व वशीकरण चातुर्यानें तिनें त्यांना उल्लू बनवून सोडलें होतें. कारखान्याची कामाची आठ तासांची पाळी बदलली कीं चंद्राच्या हॉटेलांत कामगारांची गर्दी होत असे आणि विशेषतः संध्याकाळच्या वेळीं तर सर्वच दिशांकडून येऊन कामगार तिच्या दुकानांत गर्दी करीत असत. रेडियोच्या निनादांनीं गुंजत राहिलेलें चंद्राचें हॉटेल म्हणजे एक मोठा अड्डाच बनला होता अन् विशेषतः थोडासा अधिक पैसा मिळविणाऱ्या मुकादमांनीं व फोरमनांनीं तर चंद्राचें हॉटेल म्हणजे आपलें घरच बनविलें होतें. पूर्वी आपल्या गिऱ्हाइकांबरोबर कडक रीतीनें जितक्यास तितकें वागणारी चंद्रा या ठिकाणीं आल्यापासून अगदीं बदलून गेली होती. तिच्या भोंवती रोजच्या रोज जमणारे कामगार तिला आपल्या शब्दांवर व नजरांवर झेलून धरीत होते. या सर्वांच्या हलक्या मनोवृत्तींना उत्तेजित करणारी ती एक उत्सवमूर्तीच बनली होती. अशा परिस्थितींत कोणती स्त्री अशी आहे कीं जी या सर्व लोलुप नजरांना डावलूं शकेल व त्यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या प्रलोभनांना बळी पडणार नाहीं ! ! चंद्रा सुद्धां एक

सामान्य स्त्रीच होती. ती अगदीं ऐन तारुण्यांत नव्हती तरी तारुण्याचे सहज-विकार जागे होऊन तिच्या सुप्त मनोभावनांना उद्दीप्त करून सोडतील अशा वयांत ती होती. स्त्रीची काय किंवा पुरुषाची काय या असल्या तारुण्य किंचित् ओसरून गेलेल्या मध्यम वयांत त्रेधा उडून जाते. या वयांतच त्यांचे सर्व निश्चय ढांसळतात.

चंद्राचें मन असल्या गोत्यांत आतां सांपडलें होतें व आपल्या मनाच्या अपुऱ्या राहिलेल्या हौशी पुऱ्या करून घेतां येतील या भावनांमुळे आपल्या भोंवतालचें वातावरण धोक्याचें आहे असें वाटण्याऐवजीं तें आपल्याला अनुकूल असून त्याचा आपण भरपूर फायदा घ्यावा, असेंच तिला वाटूं लागलें होतें. चंद्राचें व पांडोबाचें बिनसत चाललें त्याच्या मुळाशीं चंद्राची ही बदललेली मनोवृत्ति होती. कारखान्यांतल्या फोरमन, मुकादमाप्रमाणें कारखान्याच्या आफिसांतील कांहीं तरुण कारकूनहि चोरूनमारून चंद्राच्या नादीं लागले होते. असल्या लोकांशीं चंद्रा अघळपघळ बाता मारीत बसायची, त्यांना विड्यांवर विडे तयार करून द्यायची, हें पाहून पांडोबाचें मन संतापानें वेडें होत असे. चंद्रानें पांडोबाशीं म्होतुर लावला त्या वेळीं त्याला ती आपल्यापेक्षां कमी लेखीत होती तरी प्रत्यक्ष वागणुकीच्या बाबतींत त्याचा अपमान न होईल अशी काळजी ती घेत होती. आपलें पूर्वीचें शहरांतलें पानपट्टीचें दुकान बंद करून ती चंद्रोदय फॅक्टरीवर आली तरी पहिले कांहीं महिने तिच्या वरील वागणुकींत फरक पडला नव्हता. पण आपलें हॉटेल व पानपट्टीचें दुकान लोकप्रिय होण्यास या दुकानांतील व्यवस्थेपेक्षां व गिऱ्हाइकांची मर्जी संभाळण्याच्या दक्षतेपेक्षां आपलें सौंदर्य, आपला गोड शब्द, आपलें स्मित, व आपले कटाक्ष कारणीभूत आहेत असें चंद्राला वाटूं लागलें व त्याबरोबरच पांडोबाला वागविण्याची तिची तऱ्हाहि बदलूं लागली. आणखी एक विशेष कारण असें कीं चंद्राचें गिऱ्हाइकांबरोबर मोकळेपणानें व अघळपघळपणानें वागणें पांडोबाला आवडत नाहीं असें तिला आढळून आल्याबरोबर तर ती त्याच्याशीं अधिकच हेटाळणीनें वागूं लागली. दासू व सदू हॉटेलमध्यें काम करीत होते तेव्हांपासूनच या धुसफुशीला सुरुवात झाली होती. हीं दोन्ही पोरें गेल्यावर हॉटेलच्या व्यवहारांत जेव्हां प्रत्यक्ष तूट येऊं लागली त्या वेळीं तर पांडोबाचा नवरेपणा तिला अधिकच जड व तुच्छ वाटूं लागला. आपण होऊन नवरेपणास चढविलेल्या माणसाची मर्जी काय म्हणून संभाळायची? आपल्याबरोबर मोकळेपणानें वागणाऱ्या माणसांबद्दल त्याला वाटणाऱ्या हेव्यादाव्याची पर्वा काय म्हणून करायची? माझी मी मुखत्यार आहे. माझ्या व्यवसायाकडे व वागणुकीकडे लक्ष ठेवणारा व त्यासंबंधानें वांकडेंतिकडें बोलणारा पांडोबा कोण? चंद्राच्या मनांत या दुरभिमानानें व स्वाभिमानानें स्थान पटकावल्यावर व पांडोबाबद्दल इतकी तिरस्काराची भावना तिच्या मनांत उत्पन्न

झाल्याबरोबर पांडोबाचें तिच्या हृदयांतून जसें उच्चाटण झालें त्याचप्रमाणें तिच्या बाहेरच्या व्यवहारांतून पांडोबाला डच्च्यू मिळण्याचा प्रसंग येणें स्वाभाविक होतें. अन् असा प्रसंग लवकरच झाला.

संध्याकाळची वेळ होती. चंद्राच्या हॉटेलांत गर्दी होण्याची हीच वेळ. पण अलीकडे हॉटेलाची व्यवस्था मोडत चालल्यामुळें इकडचें गिऱ्हाइक कमी होत चाललें होतें तरी चंद्राच्या हातच्या पानपट्टीची अपेक्षा करीत तिष्ठत राहणाऱ्या गिऱ्हाइकांची संख्या कायमच होती. या गिऱ्हाइकांपैकीं एका नेहमींच्या चंद्राच्या मर्जींतील गिऱ्हाइकानें चहाची मागणी केली.

'पांडोबा, अव पांडोबा, मुकादम साहेबांना चहा आणून द्या कीं!' चंद्रानें पांडोबाला आज्ञा केली.

'चहा संपला आहे, अन् बाकीच्या गिऱ्हाइकांनाहि मी तसंच सांगितलंय!' पांडोबानें उत्तर दिलें.

'म्हणजे आहे तरी काय, तुम्हाला एवढीबी व्यवस्था ठेवतां येत नाहीं? चहा संपला कसा अन् चहा संपत आलाय असं पाहिल्यावर तो विकत आणून कां ठेवला नाहीं?'

'तें नको तूं मला सांगायला.'

'अस्सं, डोळे फिरले वाटतं! काय पण माणसं निमक...'

'बस्स, बस्स पुरे कर, तुझे डोळे आतां फिरले आहेत. काय फुकट खाल्लं नाहीं. तुला आतां मी नकोसा झालों आहे कारण पुष्कळ ध...'

'कां, जीभ फार मोकळी सोडली आहे. आणखी एक शब्द काढ तोंडांतून कीं चपलानं सटकावून काढीन.'

'इतके दिवस मी गय केली, काय समजलीस काय तूं? माझ्याहि वाहणांना आजच नवे कोरे नाल लावून आणले आहेत. तुझे हे नवे थेर मी यापुढं सहन करणार नाहीं. टाळकं असं बडवून काढीन कीं डोक्यावर एक केंसहि राहूं देणार नाहीं.'

'माझंच खाऊन माझ्यावर उलटलास का मेल्या!' असें म्हणून चंद्रा आपल्या जागेवरून उठली व तिनें तिथेंच कोणी तरी सोडलेली वहाण हातांतहि घेतली.

जवळचे बसलेले लोक अर्थात्च धावले व त्यांनीं तिला आंवरून धरली.

'सोडा त्या रांडेला.' पांडोबाहि तिच्या अंगावर धांवून गेला.

'कां रांड, रांड म्हणतोस?'

'हो रांड, रांड, पन्नासदां म्हणतो! आतां तोच धंदा तुला करायचाय. तुझा हा बाजारबसवीपणाचा धंदा मला आतां पाहायचा नाहीं. तुझा तुलाच तो लखलाभ होवो.'

‘ जा, जा, मेल्या कुठंहि उलथून जा ! म्हणे बाजारबसवी.’

‘ आतां मला जास्त बोलायला लावूं नको. मी इथं आतां क्षणभरहि राहायला तयार नाहीं.’ असें म्हणून तो हॉटेलच्या बाहेर पडलाहि.

‘ अरे त्याची झडती घ्या झडती.’ तेथें जमलेल्या लोकांपैकीं एक जण वात्रट-पणानें म्हणाला.

हे शब्द ऐकल्याबरोबर पांडोबा सापासारखा चवताळून मागें फिरला.

‘ कोण आहे तो हरामखोर माझी झडती घेणारा ? ’

पांडोबा चंद्रासंबंधानें कांहीं बोलला असला तरी पांडोबाचें शुद्ध चारित्र्य तेथें रोज येणाऱ्या सर्वच लोकांना माहीत होतें.

’ जाऊं दे, त्याच्या नादाला नका लागूं.’ असें म्हणून जमलेल्या मंडळीपैकीं कांहीं लोक पांडोबाच्या आड आले.

पांडोबाचा तो आवेश पाहून वरील वात्रट उद्गार काढलेला इराम केव्हांच पळून गेला होता.

पांडोबाचें चरित्र व त्याची नेकनियत माहीत असणाऱ्या लोकांना चंद्रानें पांडोबाच्या बाबतींत काढलेले उद्गार व तिनें केलेलें वर्तन पसंत पडलें नाहीं. दोघांचीहि समजूत काढण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. चंद्राचा होत असलेला अधःपात पांडोबा रोजच्या रोज पाहत होता अन् त्या अधःपाताच्या मार्गात ती इतकी वाहवून गेली होती कीं ती पुन्हा मागें फिरणें अशक्य अशी पांडो-बाची खात्री होऊन चुकली होती. पांडोबाची ही समजूत मुळींच चुकीची नव्हती ही गोष्ट दोघांची तडजोड करूं पहाणाऱ्या लोकांनाहि अंतर्यामीं माहीत असल्यामुळें त्यांनीं केलेला तडजोडीचा हा प्रयत्न केवळ शिष्टाचारच ठरला व पांडोबानें चंद्राला व तिच्या हॉटेलला कायमचा रामराम ठोकला.

चंद्राला अंतःकरणापासून तेंच पाहिजे होतें. आपण होऊनच का होईना, चंद्रानें पांडोबाशीं म्होतूर लावला होता. पांडोबा कसाहि असला तरी तो तिचा नवरा होता. त्याच्या देखत तिला आपल्या वेगानें उसळणाऱ्या कामवृत्तींना उघडउघडपणें मोकळें सोडणें शक्य नव्हतें. पांडोबा गेल्यामुळें तिला एका प्रकारें हायसेंच वाटलें.

चंद्राला पैशाची ददात नव्हती. पांडोबाच्या दक्ष व चोख व्यवहारामुळें त्या धंद्यांत तिला बरेच पैसे मिळाले होते. वास्तविक हे पैसे पांडोबाच्या मेहनतीचे होते तेव्हां त्यांतील कांहीं हिस्सा त्यानें मागितला असता तर त्यांत कांहींच गैर नव्हतें. पण चंद्राशीं फारकत करताना त्यानें तो विचार मनांत आणला नाहीं. ‘ कुठं भांडत बसायचं ? ’ पांडोबानें मनांतच आणलें असतें तर तो हक्कानें तिच्याकडून कांहीं पैसा काढूं शकला

असता. या बाबतींत त्याला तेथल्या कांहीं मंडळींची मदतहि मिळाली असती. पण या सर्व खटाटोपांत होणारा वेळेचा अपव्यय व चंद्राच्या व त्याच्या नात्याच्या बाबतींत होणारी नाचक्की त्यानें टाळली व त्याच्या जवळ जे कांहीं थोडे पैसे होते ते घेऊन व आपले जरूर ते कपडे घेऊन तो तेथून निघून गेला.

पांडोबा निघून गेल्यावर हॉटेल अर्थात् बंद पडलें. चंद्राला आतां या धंद्याची जरूरी राहिलेली नव्हती. तिच्या या अलीकडच्या स्वैर वर्तनामुळें एका नवीनच धंद्याचा उगम झाला होता. पांडोबाची चंद्राशीं बाचाबाची झाली त्या वेळीं त्यानें रागाच्या भरांत अगदीं नागव्या शब्दांत या धंद्याचा उल्लेख केला होता, तो अगदींच कांहीं खोटा नव्हता. दासू व सदू निघून गेल्यानंतरच्या काळांत अगदीं लपूनछपून या धंद्याला सुरुवात झाली होती. या गोष्टीच्या मुळाशीं केवळ पैसा मिळविणें हाच उद्देश होता काय ? मुळींच नाहीं. चंद्राची विषयसुखाची लालसा हीच या धंद्याच्या मुळाशीं होती. नवऱ्यानें टाकून दिली, समाजानें धुडकावली, निराश्रित झाली, अशा सर्वतोपरी असहाय्य परिस्थितींत साहजिकच एकादी तरुण स्त्री समाजावर सूड घेण्याच्या बुद्धीनेंच जणूं काय आपल्या अब्रूचा विक्रय करावयास तयार होते. तसेंच आजच्या पिळणुकीवर आधारलेल्या समाजांत बेकार झालेला पुरुषहि आपली श्रमशक्ति विक्रीस काढतो. पोटाकरतां त्याला तसें करावें लागतें, त्याचप्रमाणें बेकार झालेल्या स्त्रियाहि आपल्या अब्रूला बाजारांत विकायला काढतात. स्त्रीत्व ही एक उपभोग्य चीज आहे. आंबा, पेढा, गुलाब, मोगरा, अत्तर वगैरेंना बाजारांत किंमत आहे व त्यांना खरेदी करणारें गिऱ्हाइकहि आहे त्याचप्रमाणें आपल्या स्त्रीत्वाला बाजारांत कमी अधिक किंमत आहे, त्यालाहि हवें तेवढें गिऱ्हाइक आहे अन् या जिनसाची विक्री करून त्यावर आपला उदरनिर्वाह करतां येईल व प्रसंगीं चैनीनेंहि राहतां येईल असें दिसल्यावर या जिनसाची विक्री करणारी एक जात निर्माण झाली तर त्यांत कांहींच नवल नाहीं. अशा या व्यवसायांत विषयवासना किंवा भोगेच्छातृप्तीचा मुळींच भाग नसतो, प्रेमाचा तर या व्यवहारांत मुळींच मागमूस नसतो. अनाथ व बेकार झालेल्या तरुण स्त्रिया तेवढ्या या धंद्याला प्रवृत्त झाल्या तर त्यांत त्या स्त्रियांचा दोष नाहीं, तर ज्या समाजपद्धतीनें अशा जिनसा खरेदी करणारें गिऱ्हाइक निर्माण केलें व जिनसा विक्रीस ठेवण्यास स्त्रियांना भाग पाडलें, त्या पद्धतीचा हा दोष आहे.

चंद्राची परिस्थिति अशा प्रकारची नव्हती. ती अनाथ नव्हती. ती निराश्रित झालेली नव्हती. अब्रूनें जीवन निर्वाह करतां येईल असा समाजाला उपयोगी धंदा तिला चालवितां येत होता. असें असूनहि तिनें या व्यवसायाला हात घातला.

भुंगा एका कमलावरून उठून दुसऱ्या कमलांत शिरतो, तेथून उडून तिसऱ्यांत प्रवेश करतो व त्यांच्या पाकळ्या बाजूला सारून त्यांतील मधाचा यथेच्छ उपभोग

घेतो. विषयासक्त स्वैर वृत्तीच्या पुरुषाला कवि लोक वरच्या सारख्या मधुपाची म्हणजे भुंग्याची उपमा देत असतात. पण स्वैर वर्तनाचा हा दोष म्हणा किंवा गुण म्हणा पुरुषांतच आढळून येतो असें नाहीं, तर स्त्रीवर्गांतहि आढळून येतो. चंद्रा या वर्गातील स्त्री होती. विषयवासनेला बळी पडणारा व नित्य नव्याची लालसा धरणारा पुरुष काय किंवा स्त्री काय, समाजाच्या तोंडाला काळोखी फांसतात व त्याला अधोगतीला पोंचविण्यास कारणीभूत होतात. पण चंद्राला या गोष्टीची कल्पना तरी होती का ? शहरांत असतांना आपला हा व्यवसाय यशस्वी रीतीनें चालविणाऱ्या किती तरी स्त्रिया तिनें पाहिल्या होत्या. तेव्हां आपल्यातील भोगेच्छातृप्तीची आग शमवून पुन्हां अर्थप्राप्ति होतेच होते असें पाहिल्यावर चंद्रानें पांडोबा निघून गेल्याबरोबर आपल्या पानपट्टीच्या दुकानाबरोबरच हा धंदाहि जोरानें चालविण्याचें ठरविलें व तो चांगल्या रीतीनें चालेल अशी सुंदर साधनसामुग्रीहि तिला उपलब्ध असल्यामुळें या धंद्यांत तिला चांगलीच बरकत झाली. चंद्राच्या वृत्तीं-तील कायापलटामुळें समाजानें तिला नांवें तरी ठेवलीं का ? उलट कारखान्यांतील चांगल्या चांगल्या लोकांना हें एक चांगलेंच करमणुकीचें उपभोग्य स्थान मिळाल्या-मुळें बरेंच वाटलें. समाज समाज म्हणजे काय, आपल्या भोंवतालचे लोकच कीं नाहीं ? पण तो तर तिची हांजी हांजी करीत होता व तिच्या प्रेमकटाक्षांना मरून पडत होता. पण यापेक्षांहि एक मोठा समाज जगांत आहे व त्यांत आपली इज्जत राहिलेली नाहीं याची जाणीव चंद्राला होत नव्हती असें नाहीं. पण या गोष्टीची तिनें पर्वा केली नाहीं.

आपण निघून गेल्यावर चंद्राची काय स्थिती होईल हें पांडोबानें पूर्णपणें जाणलें होतें. पण शिखरावरून निसटलेल्या या दगडाला आपण अडवून धरूं शकत नाहीं असें पाहूनच त्यानें चंद्राचा नाद सोडून दिला होता. पांडोबाचें चंद्राशीं लग्न होऊन दोन वर्षे होऊन गेलीं होतीं. एवढ्या अवकाशांत चंद्राला एकादें मूल झालें असतें तर चंद्राचा हा अधःपात थांबला असता असें पांडोबाला वाटत होतें. पण ही गोष्ट थोडीच त्याच्या हातांतली होती ? पांडोबाचें चंद्रावर खरेखुरें प्रेम होतें. पण प्रेम ही प्रेमी जनांच्या हृदयांत वसणारी अन्योन्यावलंबी चीज आहे. चंद्राला सोडून बाहेर पडल्यावर आपण आपल्या काळजाचा तुकडा तोडून टाकून जात आहों असें पांडोबाला वाटत होतें. रागाच्या भरांत आपण चंद्राला नाहीं नाहीं तें बोललों व तिच्या अंगावरहि धांवून गेलों याबद्दल पांडोबाला फार वाईट वाटलें. पश्चात्तापानें त्याचें अंतःकरण होरपळूं लागलें. पण चंद्राला त्याच्याबद्दल काय वाटलें ? आपल्यावरचें चंद्राचें प्रेम नष्ट होत चाललें आहे. आपण चंद्राच्या घरीं कामाला राहिलों. दोघां-मधील प्रेम वृद्धिंगत झालें व त्याचाच परिणाम चंद्राशीं त्याचा म्होतुर लागण्यांत

झाला. ते दिवस खरोखरीच किती सुखाचे व आनंदाचे होते ! या शुद्ध प्रेमामुळेंच त्यानें चंद्राशीं तिच्या धंद्यांत सहकार्य केलें. पहिला धंदा चालवितांना व नवीन धंदा चालवितांना आपण दोघांनीं प्रेमानें परस्परांची सल्लामसलत घेतली. पण हें प्रेम पुढें ओसरत चाललें. चंद्राचें आपल्यावरील प्रेम कमी होण्याला व पुढें तें नाहींसें होण्याला आपल्या हातून तसें कांहीं विपरीत वर्तन घडलें नाहीं. नवीन जागीं आल्यावर ज्या वातावरणांत चंद्रा वावरूं लागली त्या वातावरणानें चंद्राच्या वृत्तींत बदल घडवून आणला हें पांडोबा पाहत होता. तथापि चंद्रावरचें त्याचें प्रेम कमी झालें नव्हतें. या परिस्थितींत चंद्राकडून त्याचा अपमान झाल्याचे अनेक प्रसंग आले पण ते त्यानें सहन केले होते. कोणत्याहि गोष्टीला मर्यादा असतेच. शेवटचा प्रसंग केवळ निमित्त मात्र होता. पुष्कळ दिवस सांठून सहनशीलता संतापाच्या रूपानें या शेवटच्या प्रसंगीं चवताळून प्रगट झाली होती. पण हा प्रसंग संपतांच प्रेमाच्या भावनेनें पांडोबाच्या मनांत उचल खाल्ली. पण आतां तिचा कांहीं उपयोग नव्हता. सर्वच परिस्थिति बदलून गेली होती. आपलें चंद्रावर कितीहि प्रेम असलें तरी तिची वृत्ति बदलण्याचा यत्किंचितहि संभव नाहीं असें पाहूनच पांडोबा चंद्रापासून दूर दूर जात होता.

चंद्राला सोडून बाहेर पडल्यावर पांडोबा दुसरीकडे कोठें जाणार होता? पुन्हां तो आतां एकाकी झाला होता. कोठें तरी पोटाकरतां धंदा पाहणें त्याला जरूर होतें. तेव्हां त्यानें सहजच जवळच्या स्टेशनचा मार्ग धरला व तेथून कोठल्या तरी शहरीं जाऊन तेथें कांहीं तरी काम पाहण्याचें त्यानें साहजिकच ठरविलें. आणि या खेपेला दुसरीकडे कोठें न जातां मुंबई गांठायची असें त्यानें शेवटीं आपल्या मनाशीं निश्चित केलें.

पांडोबा स्टेशनावर आला. गाडीला अद्याप थोडा अवकाश होता. त्यानें मुंबईचें तिकीट काढलें. तिकीट हातांत पडतांच चंद्राला सोडून आपण किती किती दूर जात आहों हा विचार त्याच्या मनाला चाटून गेला. तो प्लॅटफॉर्मवर अगदीं एकीकडे जाऊन उभा राहिला. गाडीची पहिली घंटा झाली. किती सुखाचे होते ते दिवस ! बेकारीच्या दिवसांत दोन दोन चार चार दिवस कामच मिळायचें नाहीं आणि मिळालें काम तर दिवसभर राबून जे कांहीं पैसे हातांत पडायचे ते आपल्या श्रमाच्या मानानें काहींच नाहींत असें त्याला वाटायचें. जितके पैसे मिळत तितके त्या दिवशींच जवळजवळ खर्चून जायचे. काम नाहीं त्या दिवशीं फाकाच पडायचा. पण हे दिवस अकस्मात् संपले. चंद्राच्या मनांत माझ्याबद्दल प्रेमभाव उत्पन्न झाला. किती अभिमानाची होती ही गोष्ट ! चंद्रावरील आपलें प्रेम दिवसेंदिवस वाढतच गेलें. आम्ही दोघे एकजीव झालों. चंद्राचें काम म्हणजे आपलेंच काम.

चंद्राशीं म्होतूर लागल्यानंतर तर आमच्या दोघांच्या कामांत मुळींच भेदाभेद राहिला नाहीं. जितकें काम करावें तेवढें थोडेंच. जितकें काम करावें व पैसे मिळवावे ते सर्व आपलेच. चंद्रा, चंद्रा, आपण दोघांनीं किती गंमती केल्या. नाहीं, पुन्हां असे दिवस येणार नाहींत...पांडोबानें एक लांब सुस्कारा टाकला. पुन्हां आतां बेकारी, पुन्हा उपासमार, पुन्हां एकाकीपणा. बेकारीपेक्षां व उपासमारीपेक्षांहि आपण आतां एकटे झालों याच विचारानें त्याचें मन अधिक व्यथित झाले.

गाडी आली. पांडोबाजवळ सामान फारसें नव्हतेंच. गाडी चालू झाल्याबरोबर त्याच्या विचारांनाहि गति मिळाली. संध्याकाळची वेळ होती. आपल्या लांबवर पडलेल्या सांवलीला मागें टाकीत गाडी झपाझप पुढें जात होती. पांडोबाचे बाहेरचे डोळे गाडीपासून भराभर दूर मागें सरकणारा सृष्टीचा देखावा पाहात होते पण त्याच्या अंतश्चक्षूपुढून त्याच्या गत आयुष्यांतील अनेक स्थित्यंतरांचे पडदे एकामागून एक भराभर सरकत चालले होते व त्यांतील दृश्यांप्रमाणें त्याच्या चेहऱ्यावर सुख-दुःखाच्या भावना उमटत होत्या. भर आवसेच्या रात्रीं काळया कपड्यांत गुंडाळलेले मूल आपण बहिरोबाच्या देवळाच्या पायरीजवळून आणलें. कोणत्या चांडाळणीनें हें मूल असें ठेवून दिलें असेल ! प्रेम, माया, दया, अशी चीज तरी जगांत आहे का ? बहिरोबाच्या देवळापुढें पडलेलें हें मूल उचलून आपण घराकडे चाललों आहों या अंतश्चक्षूंनीं त्याच्यापुढें उभ्या केलेल्या देखाव्यानें त्याचें अंतःकरण विव्हल होऊन वरील विचार त्याच्या मनांत आले. घरीं आणून आपण वाढविलेलें पोर म्हणजेच दासू ना ! पण मी तरी किती निर्दय ! माझ्या स्वार्थासाठीं अन् चार कवड्यांसाठीं मी त्या पोराला गुलामासारखें विकून टाकलें ना ! बरं मी त्याला तेथून आपला मुलगा म्हणून आणलें व हॉटेलांत त्याला कामाला लावलें. पण चंद्रानें म्हटलें तें खोटें नव्हतें. खरोखरीच मी त्याची वास्तपुस्त केली नाहीं. पोर हॉटेलांत चोवीस तास राब राब राबत होतें पण एक दिवस सुद्धां त्याच्याशीं मायेचे दोन शब्द मी बोललों नाहीं. कुठं असेल दासू ! पुन्हां तो आपल्याला भेटेल का ? इत्यादि एक का दोन अनेक विचारांनीं त्याचें मन त्रस्त करून सोडलें होतें. जंक्शनचें स्टेशन आलें तेव्हां त्याला बरें वाटलें, वरील विचारांच्या भुतांना झाडून तो आपल्या डब्याबाहेर पडला व प्लॅटफार्मवर वावरणाऱ्या अनेक रंगीबेरंगी लोकांत तो मिसळून उभा राहिला. डब्यांत चढणारीं माणसें उतरणाऱ्या माणसांना उतरूंहि देत नाहींत. डब्यांतून माणसें उतरत आहेत असें पाहिल्यावर तेथेंच सगळे जमून येतात व एकमेकांना धक्काबुक्की करीत आंत घुसण्याचा प्रयत्न करतात हें पाहून त्याला मजा वाटली. उतरणाऱ्या चढणाऱ्या प्यासेंजरांच्या घासाघिशींत डब्यांतून खालीं उतरून एक म्हातारी चिरडून जाण्याचा प्रसंग आला. 'मेल्यें, मेल्यें, मेल्यांनो टाका

मला इथंच मारून!' असे हृदयभेदक उद्गार तिनें काढले, त्याबरोबर पांडोबा तत्काळ त्या डब्यासमोर जाऊन तेथील गर्दी हटवून त्यानें तिला सुरक्षित खालीं उतरून घेतलें.

'कशाला एवढी तसदी घेतलीस? मेल्यें असत्यें तर कायमची या त्रासांतून सुटल्यें असत्यें.' म्हातारीजवळ तिचें गाठोडें पांडोबानें ठेवलें त्या वेळीं म्हातारी म्हणाली.

'मरतांय कशाला इतक्यांत? अन् मरायचंच तर असं गर्दींत चिरडून मरण्या-पेक्षां आपल्या मुलां--नातवंडांच्या घोळक्यांत आनंदानं मरा.'

'मुलं न् नातवंडं सारीं ममईला गेलीं मला म्हातारीला सोडून.'

'मग त्यांच्याबरोबरच जायचं.'

'त्यांनीं मला खेड्यांत घर राखायला ठेवलंय.'

म्हातारीनें आपलें गाठोडें उचललें व ती दादराकडे जाऊं लागली. पांडोबानें पानपट्टीवाल्याकडून विडीकाडी व पानपट्टी घेतली. भजीवाल्याकडून थोडीं भजींहि विकत घेतलीं. भजी खातां खातां तो नळाकडे पाणी पिण्याकरतां जात असतां अगदीं मागच्या डब्यांत चढण्याचा प्रयत्न करीत असलेलीं दोन मुलें त्यानें पाहिलीं. सदू-दासू तर हीं नसतील? त्याला संशय आला. पाणी पिण्याचें सोडून तो तिकडेच लगबगीनें गेला व त्यानें एका मुलाच्या खांद्यावर हात ठेवला. मुलानें त्याच्याकडे वळून वर पाहिलें. दोघांची नजरानजर झाली.

'बरा सांपडलास.' पांडोबानें हायसें वाटल्याप्रमाणें निःश्वास टाकून उद्गार काढले.

'नाहीं. मी आतां नाहीं तुमच्याबरोबर येणार.' मुलगा ओरडून म्हणाला व पांडोबाच्या पकडींतून निसटून जाण्याचा त्यानें प्रयत्न केला.

हीं दोन्हीं मुलें दुसरीं कोणी नसून सदू न् दासूच होतीं.

'सोडा त्याला. आम्ही नाहीं पुन्हा त्या हॉटेलांत येणार!' सदू गरजून बोलला. व त्यानें दासूला सोडविण्याचा प्रयत्न केला.

'हें पहा, दासू, नको असा घाबरूं. मी तुला तिथं नेण्याकरतां आलों नाहीं. तुम्ही हॉटेल सोडलं तसं मीहि हॉटेल सोडलं. माझं कांहीं तिथं काम राहिलं नाहीं.'

'अस्सं? मग तुम्ही आतां चाललां कुठं?' सदूनें आश्चर्याच्या आवाजांत विचारलें.

गाडीला पुष्कळ अवकाश होता. पांडोबानें दोन्ही मुलांना बाजूला घेतलें. दासूला त्यानें पोटाशीं धरलें. त्याचें अंतःकरण गहिंवरून आलें.

दासूला हा अनुभव अगदीं नवीन होता. दासूला इतक्या मायेनें अद्याप कोणीच पोटाशीं कवटाळून धरलें नव्हतें. पांडोबालाहि त्याच्या पश्चात्तप्त हृदयानें आज असें हळुवार बनविलें होतें.

हीं दोन्हीं मुलं गेले दोन दिवस गाडीच्या वेळीं तारेमधून उड्या मारून प्लॅट-फार्मवर येत होतीं. तिकिट चेकरनें त्यांच्यावर नजर ठेवून प्रत्येक वेळीं तिकीट विचारून त्यांना स्टेशनच्या बाहेर हाकून लावलें होते. तिकीट चेकरचीं हीं भुतें अशींच असतात. एकदां तीं कुणाच्या मागें लागलीं म्हणजे त्यांचा पिच्छा सोडीत नाहींत. पण त्यांच्याहि हातांवर तुरी देणारीं माणसें असतातच. तिकीटचेकरची पाठ फिरली व गाडी सुटायची वेळ झाली कीं तीं डब्याच्या दाराशीं झगडून आंत शिरतातच. असल्या बुवा-बैराग्यांना त्यांच्या बायकामुलांसह आंत येतांना पाहून डब्यांतल्या माणसांची भूतदयावृत्ति जागृत होते. 'येऊं दे त्यांना आंत.' असें कोणी म्हणतात, तर 'कशाला येऊं देतां चोऱ्या करायला ?' असेंहि कोणी म्हणतात. अशा गडबडींत त्यांना डब्यांत शेवटीं जागा मिळते. आज तिसऱ्या दिवशीं सदू–दासूला डब्यांत शिरण्याची चांगली संधी मिळाली होती. पण यावेळीं पांडोबाची व त्यांची गांठ पडली. पांडोबानें हीं दोन्हीं मुलें कोठें चाललीं होतीं त्याची चौकशी केली.

'आम्ही ममईला चाललोंया.' सदू म्हणाला.

'अन् तिकीट ?' पांडोबानें विचारलें.

'तिकीटाला पैसे कुठं आहेत ?'

'वाटेंत पकडलं तर ?'

'मग आणखी कुठं तरी, जिथं उतरून देतील तिथं !'

'बरं बरं ठीक, मी तुमचीं आज तिकीटं काढतो ममईचीं.' असें म्हणून पांडोबा त्यांचीं तिकीटें काढायकरतां निघाला इतक्यांत तिकीट चेकर आलाच. पण त्यानें येऊन मुलांना दरडावण्यापूर्वीच पांडोबानें आपण त्यांचीं तिकीटें काढतों असें सांगितलें.

पांडोबा दोन्ही मुलांना घेऊन भायखळा स्टेशनवर उतरला. पहांटेची ती वेळ होती. गार वारा सुटला होता. पांडोबानें दिलेल्या घोंगडींत हीं दोन्ही मुलें गुरफटून घेऊन डब्यांत निजलीं होतीं. किती तरी दिवसांनीं त्यांना असें हें उबदार पांघरूण मिळालें होतें. ती घोंगडीच अंगावर घेऊन तीं पांडोबाच्या मागून चाललीं होतीं. भायखळ्याचा लांबच लांब प्लॅटफॉर्म मजुरांनीं व त्यांच्याबरोबर आलेल्या बायांनीं भरून गेला होता. ही सर्व मंडळी पाहून मुंबईला आलों तरी आपल्या मंडळींतच आलों असें दासूला वाटलें. पांडोबा कधींच मुंबईला आला नव्हता. मुंबईत गिरणींत काम करणाऱ्या त्याच्या गांवच्या एका ओळखीच्या माणसाचा कांहीं तरी पुसट

पत्ता त्याला माहीत होता. अद्याप थोडा काळोखच होता. मुंबई अजून जागी व्हावयाची होती. चांगलीं उन्हें पडल्यावर आपण स्टेशनाच्या बाहेर पडूं असें पांडोबानें मनाशीं ठरविलें व स्टेशनच्या वेटिंग रूममध्यें एका कोपऱ्यांत हे तिन्ही नवीन प्रवासी बसून राहिले. पांडोबाप्रमाणें आणखी किती तरी नवीन मजूर मंडळी या वेटिंग रूममध्यें उजाडण्याची वाट पाहत बसली होती. जो तो एकमेकांना कुठं जायचं, चिंचपोकळी इथून किती आहे, लालबाग कुणीकडे आहे, परळचा रस्ता कुठून लागतो अशी चौकशी करीत होता. इतरांप्रमाणें पांडोबानेंहि दादर कुणीकडे आहे असें विचारलें.

'दादरला जायचं, मग भायखळ्यावर क आलां? दादरवरच उतरायचं का नाहीं?'

'मला काय माहीत? भायखळ्याहून दादर असेल एका हांकेवर म्हणून भायखळ्याचंच तिकीट काढलं.' पांडोबानें उत्तर दिलें.

'अरे कोण रे हा! अगदींच नवीन दिसतोय! ए गड्या, आतां तुझी ती हांकबीक बाजूला ठेव, ही ममई आहे समजलास का! इथं हांक नाहीं कुणाला समजायची. दादर इथून किती मैलांवर आहे, दादरला जायचं तर किती पैसे पडतात, असं विचार.' एका पॅसेंजरनें पांडोबाला टोकलें.

'अरे, हा तर पांड्या, शिरगांवचा. तूं इकडं कुठं आलास? आम्ही तर असं ऐकलं होतं कीं तुला एक आवा मिळाली अन् तूं मोठा मजेंत आहेस म्हणून?'

'काय ग्यानबा, तुम्ही इकडं कुणीकडं, ममई पाहायला आला वाटतं?' पांडोबानें या ओळखीच्या माणसाला विचारलें.

'ममई पाहायला नाहीं आलों, तर ममईत आतां कायमचं राहण्याकरतांच आलों आहे.' ग्यानबानें उत्तर दिलें.

'म्हणतोस काय तूं ग्यानू? शेत खंडानं देऊन इकडं आलास वाटतं?'

'खंडानं कसलं? शेतवाडी सगळी विकून टाकून इकडं आलों. त्या विसूभाऊच्या मढ्यावर सगळं घालून इकडं आलों.'

'विसूभाऊ सावकारानं तुझं सगळं रान शेवटीं खरेदी घेतलं म्हणायचं!'

'करायचं काय? राब राब वरसभर राबावं अन् समदं धान्य त्याच्या कोठारांत पोचवावं, यापेक्षां सगळं रान त्याला खरेदी देऊन टाकलं अन् इकडं आलों. अरे पण तुझ्या आवाचं काय? तुझ्याबरोबर तर ती कुठं दिसत नाहीं?' ग्यानबानें खोचकपणानें विचारलें.

'त्या आवानं तुझ्याशीं म्होतूर लावला अन् आपला धंदा तिनं तसाच चालू ठेवलाय.' ग्यानबाजवळ बसलेल्या दुसऱ्या एकानें ग्यानबाच्या माहितींत आणखी भर टाकली.

'कोण राघू, अन् तूंहि आज इथं? बरं झालं समद्यांची बरी गांठ पडली. पण तूं इथं आज कसा?'

'ग्यानबाला मी ममईला घेऊन आलों इथली हवा दाखवायला. बरं पण त्या आवाचं काय? तिचा धंदा इथं तर चांगलाच चालेल.'

'त्या रांडेचं नांव नको घेऊं...'

'आतां ती रांड झाली काय? तिच्याशी म्होतूर लावलास, मजा मारलीस, अन् आतां ती रांड झाली? तुला तिच्या धंद्याशीं काय करायचं होतं? मजा तर तिच्याशीं करायला सांपडत होती.' पांडोबाचें बोलणें संपण्यापूर्वी राघूनं आपलं वक्तृत्व पुढं चालविलें.

'मला वाटलंच होतं तिच्याशीं तुझं जमायचं नाहीं. इतक्या दिवस तूं तिच्याबरोबर कसा राहिलास याचंच आम्हाला नवल वाटत होतं.' ग्यानबा मध्येंच बोलला.

'पांड्या तिला सोडून आला म्हणतोस? साफ खोटं. मंमईच्या गिरणभागांत एकादी चांगली जागा पाहायकरतां हा इथं आलाय. तिचाहि धंदा चालेल अन् तिला हा इथं मदत करील.'

'राघ्या, जरा तोंड आवरून बोल. तूं काय समजतोस काय मला तूं?' पांडोबा रागाच्या आवाजांत बोलला.

'समजायचंय काय, तुझ्या जागीं मी असतों तर तिचा मुडदाच पाडला असता. असले बाजारबसवीचे चाळे मी कधींच चालू दिले नसते.'

'बस्, बस् पुरे कर. पळून गेलेली व आपल्या सोद्याकडे सहा महिने राहिलेली तुझी बायको पुन्हा तूं घरांत घेतलीस ना!' पांडोबा म्हणाला.

आता हें प्रकरण वर्दळीवर जाणार असें पाहिल्यावर ग्यानबा मध्यें पडला.

'उगीच नका उखाळ्या पाखाळ्या काढूं. घरोघरीं मातीच्याच चुली. बरं तें राहूं दे. तूं इथं कशाकरतां आलाय तें तरी सांगशील का नाहीं? अन् हीं पोरं तूं तुझ्या बरोबर कशाला आणलीस?'

हा वादविवाद चालू असतांना दासू व सदू पांडोबानं दिलेल्या घोंगडींत गुरफटून झोंपी गेले होते.

ग्यानबाच्या या समजुतीच्या धोरणाचा इष्ट तोच परिणाम झाला. पांडोबानं आपण कां इथं आलों, आपलें व आपल्या नवीन बायकोचें कसें जमलें नाहीं, तिला कायम सोडून देण्याचें आपण कसें ठरविलें, वाटेंत येतांना हीं दोन्हीं मुलें आपल्याला कशीं भेटलीं, ही हकीकत सांगितली व या ठिकाणीं तिघांनाहि काम मिळण्याची सोय होईल का नाहीं याची विचारणा केली.

राघू मुंबईतील दिग्विजय गिरणींत जॉबर होता. थोड्याच क्षणांपूर्वी या मंडळींत बाचाबाचीचें वातावरण निर्माण झालें होतें पण कामाचा प्रश्न निघाल्यावर सर्वच वातावरण गंभीर झालें. प्लॅटफॉर्मवर जमलेल्यांपैकीं बरीच मंडळी मुंबईत काम पहाण्याकरतांच आली होती. मुंबई अफाट असली, अनेक गिरण्या व कारखान्यांनीं ती भरलेली असली तरी बाहेरच्या माणसाला या ठिकाणीं एकाएकीं काम मिळतेंच असें नाहीं. अनोळखी माणसाला येथें कितीतरी दिवस बेकार राहावें लागतें. हजारों माणसें आपल्या समोर गिरण्यांतून व कारखान्यांतून शिरत आहेत हें तो पाहात असतो. रस्त्यांत जिकडे तिकडे पाहावें तों प्रत्येक जण गर्दीत असलेला त्याला दिसतो. रस्त्यानें तो कोठेंहि कितीहि भटकला तरी त्याला कोणी विचारीत नाहीं. बारा वाजले. भुकेचे कढ पोटांत सुरू झाले. हॉटेलांतून पाय ठेवायला रीघ नाहीं. पण आपल्याला कोण जाऊं देणार आंत ? येतांना बरोबर आणलेली पुंजी संपली, कामाचा पत्ता नाहीं. आतां आपलें कसें होईल ? एवढी अफाट वस्ती, जिकडेतिकडे माणसेंच माणसें. सर्व आपल्याच जातीचीं. सर्व हवें तेवढें खात आहेत, पीत आहेत, सिगारेट-विड्या फुंकीत आहेत, विडे चघळीत फिरत आहेत, पण आपली कोणीच कशी चौकशी करीत नाहीं, असें त्याला आढळून येतें. कोणाला कांहीं काम विचारायला जावें तर तो झिडकारतो. ‘ जा गिरणीवर जा, तिथं विचार. इथं काय विचारतोस ? ’ असेंच प्रत्येकजण म्हणणार. गिरणीच्या दाराशीं जावें तर गेटवरचा भय्या तेथें उभें राहूं देत नाहीं. वास्तविक मुंबईसारख्या ठिकाणीं हजारों माणसें कामावरून निघतात, कामें सोडून निघून जातात व त्यांच्या ठिकाणीं इतर माणसांची भरती होते. पण या लोकांत वर्णी कशी लागायची ? शहरभर रिकाम्या पोटानें भटक भटक भटकावें. संध्याकाळ झाली. रात्र होऊं लागली. केवढ्या मोठमोठ्या इमारती, किती तरी मोठ-मोठ्या चाळी. पक्षी आपआपल्या ठरलेल्या झाडांतून शिरून गडप होतात, कबुतरें, पोपट आपापल्या घरट्यांतून शिरतात, त्याप्रमाणें पुरुष, बायका, मुलें आपापल्या घरांतून शिरतात. चिमण्या आपल्या झाडांतून शिरून आपली जागा कायम करीपर्यंत किलबिलाट करतात. चाळीचाळींतून माणसें हजारोंनीं आंत शिरलीं म्हणजे एकमेकांच्या स्वागताच्या निमित्तानें असाच किलबिलाट होतो. पण आपण कोठें जावें, कोठें बसावें, दुपारीं घास मिळाला नाहीं आतां रात्रीचा घास तरी कोठें मिळणार ? बरें अंग तरी कोठें टेकावें ? मुंबईत आलेल्या अनोळखी व बेकार माणसांना आपल्यासारखे लोक एकाच ठिकाणीं मिळतात व ती जागा म्हणजे फूटपाथ. याच ठिकाणीं हजारों बेकार उपासमारीनें गांजलेलें आपलें शरीर टेकायला जमलेले असतात. सर्व दिवसभर आपण भटकलों. आपल्याला कोणी ‘ माणूस ’ म्हणून ओळखलें नाहीं, माणूस असून माणसापासून आपण वेगळे पडलों. पण फूटपाथवर मात्र आपल्यासारखींच माणसें

आपल्याला भेटलीं असें त्याला वाटतें. सर्वांना आधार देणारा असाच हा फूटपाथ असतो. बेकारांचेंच तेवढें तो स्वागत करतो असें नाहीं तर बेकार हिंडतां हिंडतां ज्यांना थोडें केव्हां काम मिळालें पण अंग टेकायला जागा नाहीं अशा निराश्रित माणसांचाहि तो पाहुणचार घेत असतो. आणि आश्चर्य हें की मुंबईत कोठेंहि काम मिळेल या भरंवशावर आलेल्या पण कित्येक दिवस उपासमार काढीत फिरत असलेल्या माणसांना हा फूटपाथच कामाची दिशा दाखवून देतो. बेकार, अर्धवट बेकार, पाटीवाले, हमाल, अशा हजारोंनीं गजबजलेला हा फूटपाथ बेकाराचा शेवटीं मित्र बनतो. फूटपाथवर अंग पसरलेल्या सर्वांनाच झोंप सारखी वश करूं शकत नाही. काम ज्यांना मिळालें, पाट्या वाहून व हमाली करून जे बेजार झाले, फूटपाथवर पाठ टेकायची फुरसत, ते निद्रावश होतात. पण ज्यांना जुजबी तास दोन तासांचें काम मिळालें, ज्यांना वण वण हिंडूनहि काम मिळालेंच नाहीं व पोटांत घांसहि गेला नाहीं अशा अर्धबेकार, अर्धपोटी, काम नाहीं व पोटांत अन्नहि नाहीं अशा उपासमारीनें वखवखलेल्या बेकारांना झोंप कोठून येणार ? या लोकांत अर्थात उद्यांच्या भविष्यासंबंधानें चर्चा सुरू होते. सगळ्यांचा दिवसाभराचा अनुभव आपापली कहाणी सांगूं लागतो आणि या चर्चेत यदृच्छेनें एकादा काम मिळालेला कामगार मिसळला तर तो या बेकारांना दुसऱ्या दिवशीं काम मिळवून देण्याची खटपट करणारा म्होरक्याहि बनतो. ही केवळ यदृच्छाच असते. माणसाचें जीवन तरी काय असतें ? यदृच्छेनेंच भरलेलें नसतें काय ? आशा माणसाला जगायला लावते. तसेंच यदृच्छाहि माणसाला जगण्याचा मार्ग केव्हां केव्हां दाखविते. यदृच्छेनें सहज कोणाला केव्हां तरी काम मिळतें हेंहि बेकार माणसें पाहात असतात. यदृच्छा व आशा अशी ही जोडी आहे. आज ना उद्यां केव्हांतरी मिळेल काम याच आशेवर लटकत राहून हजारों बेकार मुंबईसारख्या शहरांतून आपलें खडतर जीवन कंठीत असतात.

पण पांडोबाचें तसें नव्हतें. यदृच्छेच्या वाऱ्यावर हवाला ठेवून तो मुंबईस आला नव्हता. खुद्द त्याच्या गांवची व आसपासच्या गांवची बरींच माणसें मुंबईत कामावर होतीं. त्यांच्यापैकींच एका सोयऱ्याच्या ओळखीनें आपल्याला काम मिळवतां येईल या खात्रीनें तो मुंबईस आला होता. या खात्रीच्या जोरावर तो एकटाच मुंबईस आला होता असें नाहीं तर त्यानें आपल्याबरोबर दासू-सदूलाहि आणलें होतें. भायखळ्याच्या प्लॅटफार्मवर त्याच्या ओळखीची मंडळी आयतीच भेटल्यामुळें काम मिळविणें त्याला अधिकच सोपें गेलें. राघूबरोबर त्याची थोडीशी बाचाबाची झाली खरी पण काम मिळविण्याच्या बाबतींत ती आड आली नाहीं. राघू दिग्विजय गिरणींत जॉबर होता. त्यानें आपल्याबरोबर असलेल्या दोन्ही मुलांनाहि काम लावून देण्याचें कबूल केलें. हीं कामें लावून दिल्यावर राघूला आपल्या पगारांतील कोणी किती हिस्सा द्यावयाचा हेंहि अर्थात् याच वेळीं ठरविण्यांत आलें.

# ११

विसूभाऊ दुखण्यांतून साफ बरे झाले. त्यांच्या सावकारीचा खाक्या पुन्हा जोरांत सुरू झाला. त्यांची सकाळची पूजाअर्चा व संध्याकाळचें देवदर्शन अगदीं नेमानें सुरू होतें. सावकारी जसजशी वाढूं लागली तसतशी देवाधर्माचीं कृत्यें बिनचूक करण्याची त्यांची वृत्तीहि वाढत चालली होती. स्नान, संध्या, पूजा, ब्रह्मयज्ञ झाल्याशिवाय तोंडांत घास घालायचा नाहीं. संध्याकाळीं गावांतल्या गणपति, विष्णु, शंकर, लक्ष्मी, बहिरोबा, मारुति इत्यादि देवतांचें दर्शन घेतल्याशिवाय रात्रीचा फराळ व्हावयाचा नाहीं. अशीं कडक बंधनें त्यांनीं आपल्याला लावून घेतलीं होतीं. सावकारीच्या कामाकरतां ते कोठें फिरतीला गेले तर पूजेचें सर्व साहित्य ते बरोबर घेऊन फिरत असत. दर महिन्याला सत्यनारायणाची पूजा झालीच पाहिजे असाहि नेम त्यांनीं ठेवला होता. घरीं ब्राह्मण आला तर त्याला ते रिक्त हस्तानें कधींच परत जाऊं देत नसत.

याच्या जोडीला आपल्या सावकारीच्या धंद्यांतहि ते अगदीं काटेकोरपणानें वागूं लागले होते. धंदा म्हणजे धंदा. त्यांत कोणाची दयामाया नाहीं. व्यवहारांत दयामाया केली तर चालणार कसें ? मालीनंतर किती तरी वर्षांनीं सुभद्राबाई गरोदर राहिल्या. विसुभाऊंचा आनंद गगनांत मावेनासा झाला. फार दिवसांची पुत्रप्राप्तीची इच्छा पुरी होईल का ? या आशेनें त्यांचें मन भरून गेलें होतें. इस्टेटीला मालक आपल्या मागें राहिला नाहीं तर इतकी इस्टेट मिळवायची कशाला ? विसुभाऊंची इच्छा पूर्ण झाली. त्याना आतां स्वर्ग दोन बोटें उरला. या नवीन मालका करतां आतां किती इस्टेट वाढवूं असें त्यांना झालें. जसजसा हा नवीन मालक वाढत चालला तसतशी त्याची इस्टेटहि वाढत चालली. बापानें मरतांना आपल्याकरतां जेवढी इस्टेट करून ठेवली त्याच्या पांचपट इस्टेट आपण आपल्या रमेशाकरतां वाढविणार अशी महत्वाकांक्षा विसुभाऊंनीं मनाशीं बाळगली होती.

व्यवहारांत दयामाया नाहीं त्याप्रमाणें खऱ्याखोट्याची पर्वा नाहीं. विसुभाऊ पंचायतनाची पूजा नेमानें करीत होते. रामाचें दर्शन कधींच चुकत नव्हतें; पण त्यांच्या अंतःकरणांत रामानें प्रवेश केला नव्हता. सत्यनारायणाचें व्रत त्यांनीं घेतलें होतें पण सत्यव्रत आपण व्हावें असें त्यांच्या मनांत कधींहि चुकूनसुद्धां आलें नाहीं. धर्म आणि व्यवहार एकमेकांपासून अगदीं अलग. धर्माचा व व्यवहाराचा कांहीं संबंध नाहीं. धर्माची व व्यवहाराची, धर्माची व नीतीची सांगड झाली तर मनुष्याला धंद्यांत यश यावयाचें नाहीं हें त्यांनीं अनुभवानें ठरविलें होतें. धर्मानें परलोकाची प्राप्ति होते

व व्यवहार इहलोकीं माणसाला सुखी करतो. पूजा अर्चा, देवदर्शन, व्रतें उद्यापनें, कशाकरतां करावयाचीं ? तर त्यांनीं आपल्या व्यवहारांत बढती करण्यास मदत करावी म्हणून. इहलोकीं संपत्ती व मेल्यावर मोक्ष. सत्यनारायणाची कथा हेंच सांगत नाहीं काय ? संपत्ति मिळविल्याशिवाय मिळत नाहीं. तिच्याकरतां रात्रंदिवस धडपड करावी लागते. खाटल्यावर निजून राहिलें तर हरि खायला घालत नाहीं. व्यवहाराचें कर्म तर केलेंच पाहिजे आणि हें कर्म चोख व यशस्वी रीतीनें करावयाचें तर तें व्यवहारांत अनुभव आलेल्या पद्धतीनेंच केलें पाहिजे. संपत्ति वाढवायची तर तिला एक पद्धति आहे त्या पद्धतीचाच अवलंब केला पाहिजे. विसूभाऊंचें व्यावहारिक तत्वज्ञान अशा प्रकारचें होतें. अगदीं विचार करून त्यांनीं हा सिद्धांत ठरविला होता का ? तसेंहि नाहीं. पैसे मिळविण्याच्या व इस्टेट वाढविण्याच्या मागें ते लागले होते आणि सहजच या बाबतींत रूढ असलेल्या सनातनी मार्गाचा ते अवलंब करीत होते. आणि या मार्गात जसजसे ते यशस्वी होत चालले होते तसतसे आपल्यावर ईश्वरी कृपा आहे त्यामुळें आपल्याला हें सर्व साधतें असें त्यांचें मन त्यांना नेहमीं सांगत होतें.

तिसऱ्या प्रहरची वेळ. विसुभाऊंना वामकुक्षी करून उठायला आज नेहमीं-पेक्षां फारच उशीर झाला होता. विसुभाऊंचा कारकून अद्याप आला नव्हता. सुभद्रा-बाई सोप्यांतल्या झोपाळ्यावर आपल्या मुलाला मांडीवर घेऊन मंद झोके घेत बसल्या होत्या. इतक्यांत एक कुणब्याची बाई वाड्यांत आली. तिच्या कडेवर तान्हें मूल होतें. तिच्या बरोबर एक मध्यम वयाचा शेतकरी होता. त्यानें सावकार घरीं आहेत का, अशी चौकशी केली.

'आहेत, निजले आहेत. आतां बाहेर येतील.' सुभद्राबाईनीं उत्तर दिलें.

विसुभाऊंनीं बाहेरची हालचाल ऐकली होती व कोणी तरी कूळ आपल्याकडे आलं आहे हें त्यांनीं ताडलें त्या बरोबर ते पाण्याची चूळ भरून डोळ्यांना पाणी लावून बाहेर आले.

'कोण कोंड्या, बऱ्याच वर्षांनीं आलास.' विसूभाऊंनीं गादीवर बसतां बसतां विचारलें.

'होय सावकार, परवांच ममईहून आलों. वईनीचं शेत मोकळं करून तिची व्यवस्था करून परत जावं म्हणून आपल्याकडे आलों.' कोंडीबानें उत्तर दिलें.

'काय शेत मोकळं करून घ्यायला! कुणाचं बरं शेत, हां, तुझा मावसभाऊ तो पिंपळगांवचा विठू जाधव त्याचं शेत नाहीं का ?' विसूभाऊंनीं आपल्या मेंदूला त्रास दिला व डोक्यावरून हात फिरविला व शेंडीची गांठ चांचपून पाहिली; व पदर तोंडावर ओढून बाजूला तोंड करून बसलेल्या बाईकडे त्यांनीं ओझरती नजर टाकली.

‘होय सावकार, तेंच.’ असें म्हणून कोंडीबानें विठू जाधव आठ महिन्यांपूर्वी मुंबईस वारल्याची व त्यानंतर शेत मोकळें करून घेण्याच्या आपल्या वहिनीच्या आग्रहाची कहाणी थोडक्यांत सांगितली.

‘विसूभाऊंनीं पुन्हा आपला उजवा हात डोक्यावरून फिरविला. विसूभाऊंनीं हें शेत अर्थात् गहाण खरेदी करून आपल्याकडे घेतलें होतें. शेतावर कर्ज किती, त्याचें व्याज किती झालें वगैरेचें स्मरण ते करीत होते पण त्याचा नक्की हिशेब त्यांच्या मेंदूनें त्यांना आठवून दिला नाहीं.

‘कागदपत्र पाहिले पाहिजेत, कारकून तर आला नाहीं, उद्यां येईनास.’

‘तसं नको सावकार. मला परवा ममईला परत गेलंच पाहिजे. या खेपेस जो काय हिशेब असेल तो मोकळा करून व वहिनीची तिच्या घरीं कायमची व्यवस्था लावून ,जाण्याचा विचार मी केला आहे. हिशेब काय उघड उघड आरशावाणी आहे. तुम्हीच ते झटकन् पहा ना ! ’

कोंडीबाच्या एकंदर भाषेवरून व हावभावांवरून या व्यवहाराचा निकाल करण्याकरितां तो आला आहे हें विसुभाऊंनीं ताबडतोब ताडलें. ते जागेवरून उठले. त्यांनीं एक कपाट उघडलें. त्यांतून दोन तीन वह्या व एक दप्तर बाहेर काढलें. घरीं चालून आलेली रक्कम कारकून आला नाहीं म्हणून लांबणीवर टाकण्यास ते तयार नव्हते. त्यांनीं वह्यांचीं पानें चाळण्यास सुरुवात केली. इतक्यांत एक वृद्ध शेतकरी वाड्यांत आला व त्यानें विसुभाऊंना राम राम घातला.

‘या ग्यानबा, इकडे आज कोणीकडे ? ’ विसुभाऊंनीं प्रश्न केला.

‘असंच कोंडी बरोबर आलों होतों. विठू माझ्या सोयऱ्याचा नातू. त्याच्या मागं त्याच्या बायकोपोराची व्यवस्था लागली तर बरं नाहीं का ? ’

‘अस्सं, अस्सं, ठीक, बसा. ’ विसुभाऊंनीं सतरंजीवर बसण्याचा ग्यानबांना इशारा केला.

इकडे विठूचें पोर आपल्या आईच्या हातांतून सुटून झोपाळ्याकडे रांगत रांगत गेलें होतें व सुभद्राबाईच्या मांडीवरील रमेशहि त्या मुलाकडे पाहून आपल्या पायावर नाचूं लागला होता व हातवारे करीत होता. जणूं काय त्याला तो आपल्याजवळ बोलावीतच होता.

विठूचें पोर चांगलें बाळसेदार गोजिरवाणें होतें. किंचित् काळे सावळें, नाकाडोळ्यानें तरतरीत होतें. त्याच्या डोक्यावर रंगीबेरंगी रेशमी गोंड्याचें टोपरें बांधलें होतें. काळ्या ठिपक्याचा स्वच्छ पांढरा सदरा त्याच्या अंगांत होता. गळ्यांत चांदीचा ताईत होता. त्याच्या दोन्हीं बाजूला तीन तीन काळे टप्पोरे मणी ओवले होते. हातांत चांदीचीं कडीं होतीं. कमरेंत चांदीचा कडदोरा व मध्यभागीं असलेलें

पिंपळपान त्याच्या लहानशा नुन्नीसमोर हेलकावत होतें. पायांत चांदीचे साखळ्या वाळे होते. असलें हें गोंडस मूल झोंपाळ्याकडे येत असलेलें पाहून सुभद्राबाईनीं आपल्या मुलाला एका हातानें आवरून दुसऱ्या हातानें त्याला उचलून झोंपाळ्यावर घेतलें. दोन्ही मुलें दोन मांडीवर बसलीं व त्यांचा बालसंवाद सुरू झाला.

विसूभाऊंचें इकडे लक्ष नव्हतें. ते हिशेब पाहण्यांत गुंग झाले होते. शेवटीं कीर्द खतावणी मूळचा कागद वगैरे पाहून त्यानीं एका चिठ्ठीवर हिशेब लिहिण्यास सुरुवात केली.

कोंडीबाबरोबर आलेली रखमाई या सर्व व्यवहाराकडे पाहात होती. सुभद्राबाई-कडे आपल्या मुलानें संधान लावलें व तो त्यांच्या मुलाशीं खेळूं लागला हें पाहून तिला जसें कौतुक वाटलें तितकीच भीति आतां सावकार हिशेब करून किती रक्कम सांगतो या विचारानें तिला वाटत होती. शेवटीं विसूभाऊंनीं एकदांचा हिशेब सांगितला.

‘ हें पहा कोंडीबा, विठू जाधवाच्या कर्जाचा हिशेब आजतागाइत ६०० रु. होतो. तेवढा चुकता करून टाका. आजच्या आज कागद फाडून टाकूं.’ विसूभाऊ गंभीरपणानें म्हणाले.

‘ काय म्हणतां सहाशें ! विठूनं तुमच्याकडून ऐंशी का शंभर रुपये आणलेले मला आठवतात.’

‘ होय, मलाबी तसंच वाटतं. सावकाराकडून पैसे आणून आपल्या आजीचे दिवस त्यानं घातले व किरकोळ देणीं फेडून तो ममईला गेला. ’

‘ ऐंशी घेतलेन् शंभर घेतले हें कांहीं मला माहीत नाहीं. हा कागद काय सांगतो पहा. कागद दोनशेंचा आहे. हे दोनशें रुपये देऊन पांच वर्षें होऊन गेलीं. अगदीं सरळ हिशेबाप्रमाणें व्याजासह ६०० रु. झाले आहेत. व्याज अगदीं माफक लावलं आहे. आमच्या घरचा व्यवहार चोख असतो. त्यांत बोटसुद्धां शिरकायचं नाहीं. बोला सहाशें द्यायचेत का ? मला वेळ नाहीं तुमच्या बरोबर बोलत बसायला.’ विसूभाऊंनीं उत्तर दिलें. त्यांचा आवाज या वेळीं थोडा चढला होता.

या बोलण्याकडे रखमाईचें जसें लक्ष होतें तसें सुभद्राबाईचेंहि लक्ष होतें. हा आंकडा ऐकून रखमाई तर घाबरूनच गेली होती. निराशेनें तिचा चेहरा काळवंडला होता.

एकदां रखमाईकडे, एकदां तिच्या आपल्या मुलाशीं खेळत असलेल्या मुलाकडे व एकदां आपल्या पतीकडे त्यांची दृष्टी फिरत होती. सर्व प्रकार त्यांच्या लक्षांत आला होता. असले व्यवहार त्यांच्या डोळ्या समोर वारंवारच घडत होते. विसुभाऊंनीं कागद पत्रावरून व वह्यांवरून एक रक्कम सांगावी. कर्ज घेतलेल्या माणसाला ती कधींहि पटूं नये. उभय पक्षांत वादावादी व चर्चा व्हावी हे प्रसंग त्यांच्या नित्य

परिचयांतले होते. आजचा प्रसंग थोडासा निराळा होता. एक विधवा बाई आपलें एक मूल घेऊन आपला हिशेब चुकता करून घेण्याकरतां आली होती.

'काय सहाशें? आमच्या आवांक्याबाहेरची रक्कम आहे. इतका हिशेब झाला म्हणतां? आम्हांला त्याची कल्पनाहि नाहीं. आम्ही आमच्या कल्पनेप्रमाणं कांहीं रक्कम देऊन विठूची जमीन मोकळी करून वहिनीला द्यावी म्हणून आलों होतों.' कोंडी बाम्हणाला.

'विश्वास वाटत नसेल तर हा पहा कागद मूळचा. यांत काय लिहिलंय पहा. कागदांत लिहिलेल्या रक्कमेवर व्याज किती आकारायचं ठरलं तें पहा व इतक्या वर्षात सहाशें म्हणजे कांहींच नव्हेत.' असें म्हणून विसुभाऊंनीं कागद व वह्या भराभर कोंडीबापुढें टाकल्या.

'मला काय कळतंय अडाण्याला, सावकार! कागदांतली रकम व प्रत्यक्ष हातांत पडलेली रकम ही नेहमींच निरनिराळी असते हें काय सांगायला पाहिजे? उगाच ओढून धरूं नका. या बाईकडं व पोराकडं पहा. कसं तरी घ्या मिटवून. अन् विठूच्या ऋणांतून मला मोकळं करा. विठूनं मला अन्नाला लावलं. त्याच्या मागं त्याच्या मंडळीची व्यवस्था लावली तर बरं वाटेल मला. काय ग्यानबा, खरं का नाही?' कोंडीबानें आपली कहाणी विसुभाऊंपुढें मांडली.

'कोंड्याचं म्हणणं खोटं नाहीं. विठू व कोंडी मावसभाऊ खरे पण सख्ख्या भावांप्रमाणं राहात होते. काढा कांहीं तडजोड नि लावा अन्नाला या पोरीला नि तिच्या मुलाला.' ग्यानबाच्या बोलण्यांतील प्रत्येक अक्षरांत कळकळ व्यक्त होत होती.

पण विसूभाऊ 'सावकार' होते.

'कोंडीबा, ग्यानबा, असलं काहीं मला सांगू नका. मला माझा व्यवहार पाहिला पाहिजे. असल्या बाता मी ऐकत राहीन तर माझ्या संसारावर मला पाणीच सोडावं लागेल. जाऊं दे उगाच लांबण कशाला? तडजोड म्हणतां ना, चला पंचवीस रुपये कमी करा. हे कागद व हिशेब पाहिलांत ना? उद्यां कोर्टातच गेलों तर व्याजासकट व कोर्टखर्चासकट पैन् पै वसूल मला करतां येईल. तुम्ही आलांतच इतके लांबून, तर करा पंचवीस कमी अन् घ्या कागद फाडून.'

कोंडीबानें विसूभाऊकडे, ग्यानबाकडे व रखमाईकडे.व सुभद्राबाईच्या मांडीवर जाऊन बसलेल्या तिच्या मुलाकडे ओळीनें नजर फिरविली व तो म्हणाला,

'ग्यानबा, नाहीं जमत हें. आपल्या बापाच्यानं इतकी रकम देणं नाहीं व्हायची. खाऊं दे, सावकारालाच हें शेत खाऊं दे. त्यांच्या घशांत तें गेलंच आहे. आतां कसचं बाहेर निघणार! बाबा, मगरीच्या गळ्यांत गेलेलं माणिक कधी बाहेर ओढून काढतां येईल?'

‘ कोंडीबा, असा कां येतोस निकरावर ? जरा दमानं घे ना ! हें पहा सावकार, या पोराच्या शब्दाकडं नका लक्ष देऊं. कांहीं तरी योग्य तडजोड काढा ना ! ’

‘ ग्यानबा, तुम्हीच इथं आहां म्हणून याचं हें बोलणं ऐकून घेतलं. दिवसें-दिवस हीं तरुण पोरं फारच शेफारत चाललीं आहेत. इतका मगरूरपणा आहे, तर द्या ना सगळी रकम ! पण जाऊं दे. तुम्हांलाच विचारतों मी, यांत तडजोड ती काय काढणार ! व्यवहार चोख आहे. पांच पंचवीस मागंपुढं. चवताळून अद्वातद्वा बोलायला ठीक आहे, पण इथं पैशाशीं गांठ आहे हें या पोरांना कळत नाहीं. बरं, तुम्ही तर बोला ना काय तडजोड काढायची ! ’

‘बोलायजोगं यांत आणखी काय आहे ? विठूनं शंभर रुपये घेतलेलं मला माहीत आहे. पांच सहा वर्षं झाली या गोष्टीला हें कबूल आहे. फार तर दामदुप्पट. सावकारांचा हट्टच असला तर पांच पंचवीस रुपये जास्त. एवढी तजवीज कशीहि करूं. यापेक्षां... ’

‘ ग्यानबा,’ कोंडीबाचे बोलणें संपण्यापूर्वींच विसुभाऊ बोलूं लागले. ‘ असंच असेल तर मुळींच जमायचं नाहीं. चला मला उगीच नका त्रास देऊं. माझा मार्ग मला मोकळा आहे. ’ असें म्हणून विसुभाऊ गादीवरून उठूं लागले.

‘ बसा सावकार, कांहीं तरी गरीबाकडं पाहा. इतकी घाई कां ? ग्यानबाच्या आवाजांत थोडासा अधिकार होता. विसूभाऊंचा उठण्याचा केवळ तो फार्स होता. प्रकरणं बोटचेपं आहे हें त्यांनीं पूर्वींच जाणलें होतें. दामदुपटीहून थोडे जास्त पैसे देण्यास कोंडीबा तयार झालाच होता. आणखी ताणून धरलें तर कांहीं फारसें बिघडायचें नाहीं ही खूणगांठ त्यांनीं मनाशीं बांधली होती.

कोंडीबा व ग्यानबा यांच्यांत यानंतर थोडी कुजबुज झाली. ग्यानबा अडीचशें पर्यंतची रक्कम सांगणार होते व आणखी ओढाताण करून तीनशेंवर यायचा त्यांचा विचार होता. कशाला इतकी घासाघीस ? आपल्याला जास्तींत जास्त काय देतां येईल तें सांगून मोकळें व्हावें या कल्पनेमुळें त्यानं ग्यानबाला तीनशें रुपयांचा आंकडा शेवटचा म्हणून सांगावा असें सुचविलें. ग्यानबाला ही गोष्ट आवडली नाहीं तरी कोंडीबाच तयार आहे असें पाहिल्यावर

‘ सावकार, आतां नका मागं पुढं करूं. तीनशें रुपये घ्या न् टाका कटकट मिटवून. ’

‘ ग्यानबा, तुम्हीच मध्यें पडलां म्हणून सांगतों. पांचशें रुपयांपेक्षां एक पैहि मी कमी घेणार नाहीं. ’ विसुभाऊ निक्षून बोलले.

अशी ही रस्सीखेंच चालू असतांच विसुभाऊंचे कारकून हजर झाले. सावकार व कारकून यांची कुजबूज व ग्यानबा–कोंडीबाची कुजबूज, मध्येंच वाटाघाट, थोडीशी

बाचाबाची, असें करतां करतां चारशें रुपयांवर ही तडजोड ठरविण्यांत आली. विसुभाऊंनीं कारकुनावर खूप रागावण्याचा फार्स केला. ग्यानबानें कोंडीबाच्या भोळे-पणाबद्दल त्याला दोष दिला.

तडजोड ठरली खरी पण इतकी रक्कम कोंडीबाजवळ तयार नव्हती. त्यानें गावांतून तीनशें रुपयांची व्यवस्था केली होती. तेव्हां दुसरे दिवशीं याच वेळीं सर्व रक्कम मोजायची व कागद फाडून घ्यायचा असें ठरलें.

दुसरे दिवशीं ही सर्व मंडळी आली त्यावेळीं सुभद्राबाई मुद्दाम हजर होत्या. हा व्यवहार इतक्या थोडक्यांत मिटला हें पाहून रखमाईला तिच्या मुलासह सुखानें निरोप द्यावा अशी त्यांची इच्छा होती. पण ती सफळ झाली नाहीं. दुसरे दिवशीं रखमाई विसु-भाऊंकडे आली त्यावेळीं तिच्या गळ्यांतली वज्रटीक सुभद्राबाईंना दिसली नाहीं अन् पोराला तर अगदींच बुच्चा करून टाकण्यांत आलें होतें. रखमाईच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते पण ते क्रोधाचे ऊनऊन अश्रू होते. तिनें सुभद्राबाईकडे नीट पाहिलें देखील नाहीं. सुभद्राबाईंच्या कडेवरील मुलाकडे तिचा मुलगा धांव घेत होता तरी तिनें त्याला तिकडे जाऊं दिलें नाहीं. कालची तडजोड अगदीं नाइलाजानें झाली होती तरी ती पुरी करण्याकरतां रखमाईला आपलें सर्वस्व खर्ची घालावें लागेल अशी त्यांची कल्पना नव्हती. तडजोड झाली त्याअर्थीं दोन्हीं पक्षांचें समाधान झालें असलें पाहिजे अशी त्यांची कल्पना. पण ती खोटी ठरली. कागद फाडला त्यावेळीं सुभद्राबाई माजघराच्या दारांत उभ्या होत्या. रखमाईकडे पाहिल्यावर सोप्यांत पाऊल टाकण्याची त्यांची छाती झाली नाहीं. रखमाईच्या रोषयुक्त नजरेला नजर भिडविण्याची हिंमत त्यांना झाली नाहीं. ओझरत्या कां होईना, पण त्यांनीं पाहिलेल्या रखमाईच्या उग्र चेहऱ्यानें व रोषानें लाल झालेल्या तिच्या टप्पोऱ्या डोळ्यांनीं त्यांच्या काळजाला भयभीत करून सोडलें. त्या जहाल नजरेपासून रक्षण करण्याकरतांच जणूं काय, त्यांनीं आपल्या पोराला पोटाशीं झांकून धरलें.

* * * *

' कां आज तुला काय झालंय काय, झोप येत नाहीं ? ' विसूभाऊनीं आपल्या पत्नीला विचारलें.

रात्रीचे बारा वाजून गेले होते. अमावास्येची रात्र होती. बाहेर काळोख मी म्हणत होता. रातकिड्यांनीं आपल्या किरकिऱ्या आवाजांनीं सर्व वातावरण कर्कश करून सोडलें होतें. मधून मधून घुबडाचे घूत्कारहि ऐकूं येत होते. सुभद्राबाईंच्या भयभीत झालेल्या काळजाला ते अधिकच भयभीत करून सोडत होते.

' आजचा व्यवहार तीनशें रुपयाबर मिटवला असता तरी त्यांत आपलं कांहींच नुकसान होत नव्हतं. तो म्हातारा शेवटीं काय म्हणाला ध्यानांत आहे ? ' सुभद्राबाईंनीं झोंप न येण्याचें कारण सांगण्याकरतांच जणूं काय बोलायला सुरुवात केली.

'म्हणे, हे पैसे यशाला जायचे नाहींत.'

विसुभाऊ खदखदां हांसले. 'असं तर सगळींच कुळं म्हणतात. संतोषानं कुणी आपलं कर्ज कधीं फेडलंय का ? या लोकांचीं हीं बोलणीं मनावर घेतलीं तर आपला व्यवहार आटोपता घ्यावा लागेल.' विसूभाऊ आपली बाजू सांवरीत म्हणाले.

'संतोषानं, संतोषानं, कसं शक्य आहे ? कुळांकडून पैसे लुबाडायला तरी कांहीं मर्यादा आहेच कीं नाहीं ?'

'मर्यादा ? कसली ?'

'म्हातारा म्हणाला तें अगदीं खरं. असले पैसे यशाला जायचे नाहींत. विठूनं रक्ताचं पाणी करून मिळविलेले पैसे घाला......काय ग बाई अभद्र शब्द कोंडीबा बोलला. तुम्हाला याचं कसं कांहींच वाटत नाहीं ?'

'वाटायचंय काय ? आपला सर्व व्यवहार अगदीं साधा व रास्त आहे. कागदावर जें काय मांडलं असेल तें सव्याज वसूल करायचं. मग कुणी कांहींहि'म्हणो.'

'खोटं, खोटं, सगळं खोटं. म्हणे कागदावर मांडलं असेल तें सर्व वसूल करायचं. मुळांतच सगळं खोटं, अन् त्याच्यावर रचलेलं सगळं अवडंबर तर खोटंच खोटं. पाप, पाप, हें सगळं पाप फेडाल कुठं ?'

'पाप ? यांत पाप काय आहे ! हा साधा व्यवहार आहे. जितकी रक्कम प्रत्यक्ष द्यायची तितकीच कागदांत मांडायची असं कुठं झालंय ? जितके प्रत्यक्ष दिले त्याच्या दुप्पट, तिप्पट, चौपट, जसं कूळ असेल तसे मांडायचे, हा सावकारी व्यवहार आहे. सगळेच असं करतात.'

'सगळेच करतात म्हणून तें कांहीं पुण्य होत नाहीं. पाप तें पापच. आतांच पहा ना. विठूनं तुमच्याकडून शंभर रुपयेच नेले होते ना ? त्याचे तुम्ही कागदावर लिहून घेतले दोनशें. दोनशेंचे सहाशें केलेत आंकडे मोडून अन् चारशें रुपये त्या बिचारीकडून खणाखण वाजवून घेतलेत. दिले शंभर रुपडे अन् घेतले चारशें. म्हणे साधा रास्त व्यवहार आहे.'

'मग काय ? तुझं म्हणणं काय ?'

'म्हणणं काय असायचंय ? हे पापाचे पैसे ! ही पापाची इस्टेट ! रखमानं जातां जातां माझ्याकडं ज्या नजरेनं पाहिलं, जी नजर तिनं माझ्या कडेवर असलेल्या बाळावर टाकली, तिनं तर माझ्या काळजालाच हात घातला. असल्या पैशानं माझ्या पोरांचं कल्याण होईल ? लोकांनीं रक्ताचं पाणी करून पैसे मिळवावे अन्...'

'बस्स, बस्स, पुरे कर. कोंड्यानं जे म्हटलं तेंच तूं म्हणणार असशील !' विसूभाऊंनीं सुभद्राबाईचें वाक्य पुरें होण्यापूर्वीच मध्येंच म्हटलें.

'नाहीं, असले अभद्र शब्द मी कसे उच्चारीन ? पण...'

‘ पण पण काय ? मी जें करतोय तें पाप आहे असं मला मुळींच वाटत नाहीं. पापच असेल तर पुण्य काय मी थोडंथोडकं करीत नाहीं. रामाचं दर्शन घेतल्या-शिवाय व पूजा केल्याशिवाय तोंडांत पाण्याचा थेंब घेत नाहीं अन् सत्यनारायण तर वर्षानुवर्षं चालला आहे. बोलून चालून व्यवहार तो व्यवहार. व्यवहारांत कांहीं वेडं-वाकडं होत असलं तर त्याचं निरसन करण्याकरतां तर धर्म घालून दिला आहे.’

‘ नका, मला जास्त बोलायला नका लावूं.’

‘म्हणजे आज तुला झालंय तरी काय ? ऐन मध्यरात्रीची ही वेळ. यावेळीं कसं बाळाला सुखानं कुशींत घेऊन झोपीं जायचं, तें हें भलतंच काय तुझ्या डोक्यांत शिरलंय ? अग, व्यवहार तो व्यवहार, अन् धर्म तो धर्म.’

‘ जळला तो धर्म ! काडी लावा त्याला ! निव्वळ ढोंग आहे ढोंग ! म्हणे रामाची पूजा करतों, दर्शन घेतों अन् सत्यनारायण करतों. तुमच्याबरोबर त्या रामालाहि नका ओढूं या नरकांत. राम एकवचनी होता. बापाचं बोलणं खरं करण्याकरतां त्यानं वनवास पतकरला. त्याचं नांव कशाला घेतां ? आज कित्येक वर्सं मी पाहत्यें आहे. कसले खोटेनाटे व्यवहार चालले आहेत तुमचे. दुसऱ्यांचीं, गरीबागुरीबांचीं घरंदारं शेतंभातं लुटून आपलं घर भरायचं काम तुमचं चाललं आहे. सत्याचा यांत यत्किंचितहि अंश नाहीं. कशाला तें रामायण वाचतां, रामाची पुजा करतां, न् दर्शन घेतां ?

‘ मग काय तुझं म्हणणं तरी काय ? ’

‘ म्हणणं का असायचंय ? ज्या रामाची तुम्ही भक्ति करतां असं म्हणतां, त्याच्या सारखं थोडं तरी वागा. ’

‘ खरं सांगूं ? असंच वागायचं मनांत आणलं तर आमच्या वाडवडिलांपासून जो व्यवहार चालत आला आहे, जे कागदपत्र दप्तरांत आहेत त्या सर्वाला काडी लावली पाहिजे.’

‘ काय म्हणतां ? असं इतकं हें पाप आपल्या घरांत भरून राहिलं आहे ? आहे खरंच पाप... ’

सुभद्राबाईचें वाक्य पुरे होतें न होतें इतक्यांत बाहेर कुत्रीं भुंकूं लागलीं. “ चोर, चोर ” “ आग, आग, ” असा एकच गलबला झाला.

पण हा दरवडा सोनगांवांतल्या दुसऱ्याच एका गुजर सावकाराच्या घरावर पडला होता. दरोडेखोरांनी त्याच्या घराची यथेच्छ लूटमार करून शेवटीं त्याला आग लावून चोर पळून गेले होते. या गलबल्यामुळें सगळें गांव जागें झालें होतें. जो तो दरवड्याच्या व आगीच्या जागेकडे धांव घेत होता. आग विझवितां येणें शक्यच नव्हतें. त्यांतल्यात्यांत बरें म्हणायचें कीं वाड्याचे मालक केवळचंद आपल्या बायका-

मुलांसह परगांवीं लग्नाकरतां गेले होते. दरवडेखोरांनीं हा मोक्का साधला होता. अगदीं मशाली लावून चोहोंकडे बंदोबस्त ठेवून दरवडेखोरांनीं वाड्यांतली सुतळीन् सुतळी हलविली होती पण एवढ्यानें समाधान न झाल्यानेंच जणूं काय त्यांनीं या सावकाराच्या वाड्याला व त्याच्या परसांतल्या गंजींना आगी लावून ते पळून गेले होते.

दरवडेखोरांवर चालून जाण्याची कोणाची छाती झाली नाहीं. सावकाराच्या घरावर दरवडा पडला न् त्याला आग लागली तरी त्याच्या बचावाकरतां आपला जीव धोक्यांत घालण्यास कोण काय म्हणून तयार होणार ?

दरवड्याची व आगीची वार्ता ऐकून सुभद्राबाईच्या पोटांत धस्स झालें. विसुभाऊ निजण्याच्या खोलींतून बाहेर पडले खरे, पण ते आपल्या वाड्याच्या दरवाजांतच उभे राहिले. पुढें गेले नाहींत. आगीच्या ज्वाळा त्यांच्या डोळयांत चमकत होत्या. त्यांच्या अंतःकरणाचाहि भडका उडाला होता. कोणत्या विचारांनीं त्याच्या अंतःकरणाचा भडका उडविला असेल बरें ?

दोनतीन दिवस केवळचंदाचा वाडा जळत होता. गांवांतल्या त्याच्या स्थावर इस्टेटीची राख झाली होती. गांवांत हाच विषय सर्वतोमुखीं होता. हा नाश झालेला पाहून गांवांत कोणीहि हळहळलें नाहीं. झालें तें बरेंच झालें असेंच प्रत्येकाचा चेहरा जणूं काय सांगत होता.

लहान मोठ्या खेडेगांवांतून असले प्रकार तर नेहमींच होतात. असल्या प्रकारांनीं सावकार कधींच घाबरत नाहीं. त्याच्या अत्याचारांना हे प्रकार कधींच अडथळा आणूं शकत नाहींत.

गांवांत झालेल्या या गडबडीचा विसूभाऊंच्या मनावर एक मात्र परिणाम झाला व तो म्हणजे त्यांचा जिभेचा पट्टा सारखा सुरू झाला. पिसाळलेलें कुत्रें ज्याच्या त्याच्या अंगावर धांवतें व त्याचा चावा घेतें, त्याप्रमाणें विसूभाऊंशीं ज्याचा संबंध येई त्यावर ते खसकन् अंगावर जात व नाहीं नाहीं तें वर्मी बोलत. सुभद्राबाईची याच्या अगदीं उलट स्थिति झाली होती. केवळचंदाच्या घरादाराचा सत्यानास झालेला पाहून त्यांचें मन अधिकच हळुवार बनलें.

'आमचं कसं होईल ?'

या विचारानें त्यांना सळो का पळो करून सोडलें. या प्रसंगापासून' विसूभाऊ चेकाळल्यासारखेच झाले होते. त्यांचें वय वाढत चाललें होतें. पण त्यांच्या धंद्याला जणू ऐन तारुण्य प्राप्त झालें होतें. रात्रंदिवस जुनेपाने कागदपत्र तपासून त्यांनीं आपल्या कुळांवर फिर्यादीवर फिर्यादी लांवून डिक्र्या मिळविण्यास सुरुवात केली होती. तडजोड करणें, आपसांत मिटवून घेणें याचें नांवहि त्यांनीं सोडलें होतें. कोर्टापुढें आपला हक्क

शाबीत करून जमीनीच्या डिक्र्या मिळविणें हा त्यांचा हातचा मळ झाला होता. अलीकडे आणखी एका खास महत्वाकांक्षेनें त्यांना पछाडलें होतें. आपल्या वडिलांनीं आपल्या-करतां जेवढी इस्टेट जमा करून ठेवली, त्याच्या चौपट इस्टेट रमेशकरतां संपादन करण्याचें तर त्यांनीं ठरविलेंच होतें, पण आपली एकुलती एक मालिनी हिच्याकरतां एक गांवचें गांव खरेदी करण्याचा नाद त्यांना लागला होता. सोनगांव जवळच असलेल्या शिरसगांवावर विसुभाऊच्या वडिलांची नजर होती. त्यांनीं आपल्या हयातींत या गांवच्या शिवारांतील अर्ध्या अधिक जमिनी बळकावल्या होत्या. आतां बाकीच्या सर्व जमिनी बळकावून मालीचें कन्यादान करतांना या गांवच्या सर्व जमीनींचेंहि उदक आपल्या भावी जांवयाच्या हातावर सोडण्याचा संकल्प विसुभाऊंनीं केला होता. या संकल्पाचा उच्चार त्यांनीं सुभद्राबाईपुढें अनेकदां केला होता व 'सत्य संकल्पाचा दाता नारायण' हें तुकोबाचें वचन भरीला घालून आपलें हें कृत्य किती उदात्त आहे हेंहि आपल्या पत्नीला ते भासवीत होते. विसुभाऊंनीं मनाशीं बाळगलेला संकल्प सत्य व शुद्ध होता काय ? अनेक गरीब कुटुंबांच्या घरादारांची व संसारांची होळी करून आपली तुंबडी भरायची व त्या कृत्याला 'सत्य' संकल्प म्हणायचें ही गोष्ट सुभद्राबाईंना केव्हांहि पटण्याजोगी नव्हती. विसुभाऊंच्या कर्तृत्वावर त्यांचा विश्वास होता. पण त्यांचें सारें कर्तृत्व दुसऱ्याच्या संसारांचा सत्यानास करण्याचे कामीं खर्चीं पडत आहे हें पाहून त्यांच्या अंगाचा तिळपापड होत होता. विसूभाऊंबरोबर लग्न झाल्यानंतर बरींच वर्षे त्यांना मूल झालें नव्हतें व 'वांझोटी' म्हणून त्यांची नणंद त्यांना हिणवीत होती. 'आपण वांझोटी होतों हेंच बरं होतं. मला मुलंच झालीं नसतीं तर दुसऱ्याच्या संसारांचं वाटोळं करून आपलं घर भरण्याचा नाद तरी आपल्या नवऱ्याला लागला नसता. गरीबगुरीबांचे संसार मातींत गाडून त्यांवर उभारलेल्या या इस्टेटी आपल्या मुलांच्या कल्याणाला कारणीभूत होतील का ?' या काळजीनेंच सुभद्राबाई आतांशा झुरणीला लागल्या होत्या. सुभद्राबाईचें हें झुरणें वास्तविक नव्हतें. त्या ज्या वर्गात व समाजांत वावरत होत्या त्यांतील व्यक्तींना हें झुरणें माहीत नव्हतें. त्यांच्या बाबतींत ही गोष्ट अस्वाभाविक होती. आपलें वैभव व आपल्या इस्टेटी वाढत असतांना व त्या कायदेशीरपणें वाढत असतांना दुसऱ्याच्या संसारांचें काय होतें याचा विचार करण्याचें कारण काय ? कायदेशीरपणें योग्य तो धंदा करून आपला संसार सुखाचा करणें यांत गैर तें काय ?

पण सुभद्राबाई या सामान्य वृत्तीपलीकडच्या होत्या. विसूभाऊंनीं जो धंदा अलीकडे विशेष जोरानें चालविला होता त्याच्या मुळाशीं जाऊन विचार करण्याची खोड सुभद्राबाईना लागली होती आणि या खोडीमुळेंच आपल्या समाजांत त्या एक अपवादात्मक व्यक्ति बनल्या होत्या. या झुरणीमुळें सुभद्राबाईच्या प्रकृतीवर परिणाम

ोत होता. पण विसुभाऊंजवळ त्याचें औषध नव्हतें. बोलून चालून हा व्यवहार आहे, बायकांनीं त्यांत विशेष घालूं नये हा विसुभाऊंचा महामंत्र होता. आणि असले कांहीं न्यायान्यायाचे वाद घरांत सुरू झाले कीं या महामंत्राचा ते सर्रास उपयोग करीत व सुभद्राबाईंना गप्प बसवीत.

मळणीचे दिवस संपले होते. खळ्यांतला माल शेतकऱ्यांच्या घरांत आला होता. शेतकऱ्याच्या मालाला खळ्यावरच अनेक प्रकारची गळती लागते. पण ही सर्व गळती बंद होऊन शिलकी माल घरांत आला म्हणजे शेतकऱ्याला हायसें वाटतें. राधाबाई पठाऱ्यांचें घराणें शिरसगांवांत फार जुनें व नांवाजलेले होतें. पण इतर अनेक शेतकरी घराण्यांप्रमाणेंच या घराण्यालाहि नेहमींच्या शेतकऱ्यांच्या शत्रू असलेल्या सरकारी, सावकारी गावगुंडी जळवांनीं शोषून टाकून नामशेष होण्याच्या मार्गाला लावलें होतें. या भौतिक आपत्तींना दैविक आपत्तींनींहि साथ दिल्यामुळें शिरसगांवांतून पठारे घराण्याचें उच्चाटण होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. गांवांत पुढारी म्हणून मानला गेलेला राधाबाईचा नवरा ज्योतीबा मरण पावला व त्याच्या पाठोपाठ तीन चार वर्षांत राधाबाईचे काळाशींहि समोरासमोर दोन हात करतील असे चार धट्टेकट्टे मुलगे प्लेगला व कॉलऱ्याला एका मागून एक बळी पडले. थोरल्या दोघां मुलांच्या बायकांपैकीं एकीनें नवऱ्याच्या मरणानंतर एका तरुण शेतकऱ्याशीं म्होतुर लावून शिरसगांवांतून पळ काढला. सर्वांत वडिल मुलाचीं बायको व तिचा एक मुलगा हींच काय तीं माणसें पठारे घराण्यांत आतां जिवंत राहिलीं होतीं. धाकट्या मुलांचीं लग्नेंच झालीं नव्हतीं. पण राधाबाई भक्कम देलाची होती. या सर्व आपत्तींना तिनें धैर्यानें तोंड दिलें होतें. आपल्या घराण्यां-तील ही शेवटची ज्योत कायम ठेवून पुन्हा त्याला ऊर्जितावस्थेस आणण्याच्या महत्वाकांक्षेनें प्रत्यक्ष काळाशींहि झुंजण्याची तिची तयारी होती पण एकाच हृद्रोगानें ती पछाडली होती.

‘ सावकाराचें काय करायचें ? ’

माल घरांत आला. आतां सावकार दाराशीं येणारच. त्याचें समाधान कसें करायचें. या विचारांनीं राधाबाईला बेचैन करून सोडलें होतें. पठारे घराण्याचे विसूभाऊ हे पिढीजाद सावकार. विसूभाऊंच्या घराण्यांतील ही सावकारी म्हणजे पठारे घराण्याला लागलेली जीवंत जळूच होती. या अवदसेचें समाधान राधाबाई दरसाल कसें तरी करीत होती पण या वर्षीं शेवटचा पाऊस वेळेवर न पडल्यामुळें व त्यांतल्या त्यांत पिकावरून हींव गेल्यामुळें वर्षभर खायला पुरेल इतका माल देखील शेतांत आला नव्हता. शेतीचें सर्व काम ती भाड्यानें व मोलमजूरीनें करून घेत होती पण मुलाला दूध पाहिजे म्हणून एक गाय व दोनतीन शेळ्या तिनें पाळल्या होत्या. माल

तर घरांत आला. काढूं सावकाराची कशीतरी समजूत. या भरंबशावर राधाबाई निर्भर होती.

पण विसुभाऊ शिरसगांवावर जो हल्ला या वर्षीं चढविणार होते त्याचा आरंभ पठारे घराण्यापासूनच करावयाचा असें त्यांनीं ठरविलें होतें.

सकाळीं नवाचा सुमार होता. शेतकरी मंडळी आपल्या घरांतून कामाकरतां बाहेर पडायच्या आंतच विसूभाऊंनीं शिरसगांव गांठलें होतें. जप्ती करण्याकरितां लागणारा सर्व लवाजमा त्यांनीं बरोबर आणला होता. जप्तीचा रोख राधाबाई पठारेच्या घरावर आहे ही बातमी गांवांत वाऱ्यासारखी पसरली. राधाबाईचें घर चावडीपुढील मैदानाच्या एका टोंकाशीं होतें. साहजिकच बायकामुलांची गर्दी चावडीसमोर जमा झाली. राधाबाईला ही गोष्ट कळतांच तिच्या तोंडचें पाणी पळालें. ती धीराची बाई खरी पण एकाएकीं आलेल्या या जप्तीच्या हल्ल्याला कसें तोंड द्यायचें ? तिची मति गुंग झाली. पठारे घराण्याचा व विसूभाऊंच्या घराण्याचा फार दिवसांचा संबंध. प्रथम कांहीं तडजोडीच्या गोष्टी झाल्याशिवाय सावकार एकदम जप्तीच घेऊन येईल याची कल्पनाहि राधाबाईला नव्हती. पण पैशाच्या व वजनाच्या जोरावर खेड्यांतील अडाणी शेतकऱ्यांवर एकाएकीं हल्ले चढवून त्यांना नेस्तनाबूत करण्याचा विसूभाऊंनीं अलीकडे जणूं विडाच उचलला होता. विसूभाऊंनीं राधाबाईविरुद्ध सहाशें रुपयाची डिक्री मिळविली होती व हे रुपये वसूल न झाल्यास तिच्या स्थावर जंगम इस्टेटीची जप्ती करण्याचा हुकूम त्यांनीं मिळविला होता. जप्तीचा हुकूम मिळविला होता तरी अखेरचा प्रयत्न म्हणून तडजोडीचीं बोलणीं गांवांतल्या कांहीं वृद्ध मंडळीमार्फत सुरू झाली. पण विसूभाऊ सहाशें रुपयांत एक पैहि कमी करण्यास तयार नसल्यामुळें या खटपटीचा उपयोग झाला नाहीं. अखेर गोष्टी निकरावर आल्या. राधाबाईच्या वाड्यांतील सर्व चीजवस्त, धान्यधून्य, भांडीकुंडी, गुरेंढोरें सर्व बाहेर काढण्याकरतां सरकारी माणसें पुढें सरसावलीं.

राधाबाईला हें सर्व पाहवलें नाहीं. ती नागिणीसारखी चवताळली. तिनें पदर नीट सरसावला व कमरेशीं खोंवला.

'कोण मेला माझ्या वाड्यांत पाऊल टाकतो तें पाहत्यें !' असें म्हणून ती वाड्याच्या दारांत उभी राहिली. राधाबाई उतार वयाची होती तरी चांगली उंच व बळकट हाडापेरांची होती. म्हातारपणच्या चिरम्या तिच्या चेहऱ्यावर दिसत होत्या. तिचे सर्व दांत शाबूत होते. तिचा वर्ण तांबुस गोरा होता. तिचे केस भुरे पांढरे झाले होते. रुंद कपाळ, सरळ नाक व मनाचा कट्टरपणा दाखविणारी तिची हनुवटी तिच्या-कडे पाहणाऱ्याच्या मनांत धाक उत्पन्न करीत होती आणि जाड भुऱ्या केसांच्या

भिवयांखालून लकाकणाऱ्या तिच्या लाल झालेल्या तेजस्वी डोळ्यांनीं तर तिच्या वाड्याच्या दरवाजासमोर आलेल्या सरकारी माणसांच्या मनांत कांपरें भरविलें होतें.

राधाबाईचा गंभीर व निश्चयी आवाज चावडींत बसलेल्या विसूभाऊंनीं ऐकला तेव्हां तेहि जागेवरचे उठले. व तिच्या वाड्याच्या रोखानें येऊं लागले. वाड्याच्या दरवाजांत पुढे मधोमध उभ्या राहिलेल्या राधाबाईच्या उग्र चेहऱ्याकडे पाहून विसुभाऊहि क्षणभर चमकले.

'हें पहा राधाबाई, हा सरकारी हुकुम आहे. सरकारी माणसांना तुम्ही अड-थळा करूं नका. बाजूला व्हा.' धिटाईच्या स्वरांत विसुभाऊ बोलले.

'कोण तूं, विश्या का? आमच्या घरच्या माणसांनीं तुला अंगाखांद्यावर खेळवलं त्याचे उपकार फेडायला आलास वाटतं. चल! पुढं पाऊल तर टाक, चांगलं थोबाड देईन रंगवून.'

विसुभाऊंनीं राधाबाईच्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाहीं. आपल्या अंगावर हात टाकण्याची बाई माणसाची काय हिंमत, या घमेंडींत ते तसेच पुढं सरसावले.

राधाबाईनें बोलण्याप्रमाणें खरेंच करून दाखविलें. सर्व जमलेली मंडळी आश्चर्य-चकित झाली. आपल्यावर एका यःकश्चित बाईनें हात टाकला हें पाहून विसुभाऊंचें भान सुटलें. त्यांनीं राधाबाईचे दोन्ही हात धरून तिला बाजूला ओढण्याचा प्रयत्न केला. भोंवतालीं जमलेल्या बायांचा स्वाभिमान आतां जागा झाला. सावकार झाला म्हणून काय झालें? एका घरंदाज बाईचे हात धरून तो तिला ओढतो म्हणजे काय? विसुभाऊंचा हा अगाऊपणा पाहून राधाबाईची सून आतां पुढें सरसावली.

'चल बाजूला हो, भट्टरगा कुठला!' तिनें विसुभाऊंना दरडावलें.

'कोणाला ग भट्टरगा म्हणतेस रांडे?' विसुभाऊंच्या तोंडून हा शब्द निघा-यची फुरसत कीं राधाबाईच्या सुनेनें पायांतली वहाण हातांत घेतली. इतक्यांत आजूबाजूच्या बायाहि धांवत आल्या. त्यांनीं विसुभाऊंना धरलें व त्यांची चांगलीच पाद्यपूजा करीत त्यांनीं त्यांना चावडीपर्यंत मारीत नेलें. संतापानें बेहोष झालेल्या या बायांना अडविण्याची कोणाची छाती होती?

विसुभाऊंना बायांनीं वहाणांखालीं बेदम मारून त्यांना चावडी दाखविली खरी. पण जप्तीकरतां आलेल्या सरकारी माणसांचें काय? या बाबतींत कांहीं तरी निर्णय ठरविणें जरुरीचें होतें. गावांतल्या बुद्रुक मंडळींनीं आतां पुढाकार घेतला. त्यांनीं बायांना चार सांत्वनाचे शब्द सांगितले. विसुभाऊंना त्यांच्या हातांतून सोडविलें. गांवांतल्या सर्वांत निबर व सर्वांवरच वजन असलेल्या शेकूजी पाटलांनीं दोन्ही पक्षांना सारख्याच शिव्या हांसडल्या व सर्वत्र शांतता प्रस्थापित केली. त्यांनीं विसु-भाऊंना विश्वासांत घेतलें व राधाबाईच्या देण्याबद्दल आपण जबाबदार आहों असें

सांगून जप्ती परत नेण्याबद्दल त्यांना विनंति केली. ही विनंति मान्य करण्याशिवाय विसूभाऊंना या वेळीं गत्यंतरच नव्हतें.

पण हें सर्व प्रकरण एवढ्यावरच मिटणें शक्य नव्हतें. अगदीं नाइलाज म्हणूनच विसुभाऊंनीं शेकूजी पाटलाच्या शब्दाला मान दिला होता. शिरसगांवात झालेला अपमान त्यांच्या मनांत सलत होता. त्याचा पूर्णपणें सूड कसा घ्यावा याच्या ते आतां विचाराला लागले. शिरसगांवांत जप्तीकरतां गेले असतांना तेथील गांवकऱ्यांनीं आपल्यावर हल्ला केल्याचा अतिशयोक्तिपूर्ण रिपोर्ट त्यांनीं जिल्हाधिकाऱ्याकडे केला. सरकारी अधिकारी त्यांना सामील होतेच. आपल्याला मिळालेल्या डिक्रीची अंमलबजावणी करावयाची असल्यास आपल्याला भरपूर पोलिससंरक्षण पाहिजे असल्याची त्यांनीं मागणी केली. ही त्यांची मागणी मंजूर होण्यास वेळ लागला नाहीं. शिरसगांवांत झालेल्या अपमानाचे वण ताजे असेपर्यंतच एक भली मोठी पोलिस तुकडी घेऊन ते शिरसगांवांत दाखल झाले. यावेळीं त्यांनीं आपला मुक्काम गांवाबाहेर सरकारी अधिकाऱ्याच्या तंबूंत ठेवला. पोलिस अधिकाऱ्यांनीं गांवांत शिरतांच जिकडे तिकडे पोलिस पाहरा उभा करून राधाबाईच्या वाड्यावर हल्ला चढविला. वाड्यांत होती नव्हती ती सर्व चीजवस्त त्यांनीं चावडीसमोर जमा केली. राधाबाईला तिच्या सुनेसह व नातवासह वाड्याबाहेर काढून त्याला सीलबंद मोहरेचें कुलूप ठोकलें. सर्व माल, गुरेंढोरें तालुक्याच्या गांवी नेण्यांत आलीं. पोलिसाचा एवढा कडेकोट बंदोबस्त पाहिल्यावर गांवचे लोक साहजिकच घाबरून गेले. शिरसगांवच्या लोकांवर–विशेषतः शिरसगांवच्या स्त्रीसमाजावर–विसुभाऊंनीं विजय संपादन केला. पोलिसच्या मदतीनें विसुभाऊंनीं हा विजय संपादिला होता. त्यांच्याजवळच्या पैशानें हा विजय संपादिला होता. या विजयानंतर शिरसगांवला एक दोनदां ते जाऊन आले त्यावेळीं शिरसगांवची व त्याच्या आजूबाजूच्या गांवची मंडळी त्यानंतर सोनगांवी आली त्यावेळीं त्यांच्या हृदयांत सांठून राहिलेली सूडबुद्धि त्यांच्या वाणीच्या रूपानें बाहेर पडत होती.

'रांडा कशा अगदी चेकाळून गेल्या होत्या. सावकाराचा बच्चा आहे मी. राधीच्या घरावर आतां नांगरच फिरवीन. भीक मागत जा म्हणावं आतां गांवोगांवीं.' एक ना दोन, असले विजयोत्मादानें भरलेले व दुसऱ्याच्या वर्मावर घाव घालणारे उद्गार हे लोक मुकाट्यानें ऐकून घेत होते. सावकाराला आळविणारे, त्याचें लांगूलचालन करणारे बगलबच्चे सर्वत्रच असतात. सोनगांव व शिरसगांवीं असलेल्या असल्या कांहीं गांवगुंडांनीं आपला स्वार्थ साधण्याकरतां विसुभाऊंना डोक्यावर चढवून ठेवलें होतें. या प्रकरणानंतर तर हे गुंड विसुभाऊंच्या गळ्यांतले जणूं काय ताइतच बनले होते. आणि या गुंडांच्या जोरावर या भागांत आपण करूं ती पूर्व या हुकुमशाही वृत्तीनें वागण्याची महत्वाकांक्षा विसुभाऊंच्या मनांत वाढत चालली होती.

बरोबर याच्या उलट शिरसगांव व त्या आसपासच्या गांवांतील जनतेच्या मनाची स्थिति होती. विसुभाऊ या भागांत हुकूमशहा होऊं पहात होते. विशेषतः सर्व शिरसगांव आपल्या मांडीखालीं घालून त्यांतील शेतकऱ्यांना गुलाम बनवून सोडण्याचा त्यांनीं विडा उचलला होता. पोलिसांच्या मदतीनें विसुभाऊंनीं पठारे घराण्याच्या मालमत्तेवर नांगर फिरविला तेव्हांपासून सर्व शिरसगांव व्यापून टाकण्याकरतां व आपल्या सावकारी जाळ्यांत शिरसगांवाला अडकून टाकण्याकरतां विसुभाऊ जसजसा जोराचा प्रयत्न करूं लागले तसतसें या त्यांच्या प्रयत्नाला कसें तोंड द्यावयाचें, सावकाराच्या या अत्याचाराचा कसा प्रतिकार करावयाचा याचा विचार शिरसगांवचे शेतकरी करूं लागले होते.

विसुभाऊंनीं आपलीं कर्जें वसूल करण्याचा धोशा लावला होता. यामुळें त्यांच्या तिजोरींत पैशाची भर पडत होती व त्याबरोबरच त्यांची स्थावर इस्टेटहि भराभर वाढत चालली होती. विसुभाऊंच्या महत्वाकांक्षेप्रमाणे शिरसगांवच्या बहुतेक सर्व जमिनी त्यांच्या मालकीच्या झाल्या होत्या. पण हें सर्व करतांना विसुभाऊ जे उपाय अमलांत आणीत होते त्यांच्या एक एक हकीकती जसजशा सुभद्राबाईच्या कानावर जात तसतसें त्यांचें पापभीरू हृदय अधिकाधिक घाबरून जात होतें. शिरसगांवला विसुभाऊंनीं आगाऊपणा केला व तेथल्या शेतकरी बायांनीं त्यांचा अपमान केला ही सर्व हकीकत त्यांना कळली त्यावेळीं लज्जेनें त्यांनीं आपली मान खाली घातली. या प्रसंगानंतर दोन्ही नवरा बायकोंत आठ पंधरा दिवस जवळ जवळ अबोलाच होता. यानंतर पोलिसच्या मदतीनें आपण या अपमानाचा सूड उगवला असें विसुभाऊंना वाटलें पण सुभद्राबाईची त्याच्या अगदीं उलट भावना झाली. पोलिसनें राधाबाईची सर्व मालमत्ता वाड्यांतून बाहेर काढली व तिला, तिच्या सुनेला व तिच्या नातवाला आपल्या अंगावरच्या वस्त्रासह बाहेर काढलें हा खरोखर विजय नव्हे. हा भ्याडपणा आहे असें त्यांना वाटलें आणि या प्रकरणानंतर विसुभाऊ आपल्या पराक्रमाबद्दल ज्याच्या त्याच्या पाशीं जें बरळत होते तें ऐकून तर आपल्या पतीच्या या कृत्याबद्दल त्यांना अधिकच लाज वाटूं लागली होती. विसुभाऊंचा उन्माद तर दिवसेंदिवस वाढतच चालला होता. विसुभाऊंच्या या कृत्यांमुळें त्यांची इस्टेट वाढत होती. त्यांचें ऐहिक वैभव वाढत होतें पण नैतिक दृष्टया आपल्या पतीचा अधःपात होत चालला आहे ही गोष्ट सुभद्राबाई जाणत होत्या. पतीच्या अधःपतनाबद्दल त्यांचें अंतःकरण तिळतिळ तुटत होतें. या अधःपतनापासून त्यांना कसें वांचवावें हें त्यांना सुचत नव्हतें. विसुभाऊ एका बाजूनें भराभर इस्टेटवाले बनत होते तर तितक्याच झपाट्यानें ते शेतकरी समाजांत अप्रिय बनत चालले होते. कांहीं तोंडपुजे स्वार्थी गुंड विसुभाऊभोंवतीं नाचत असले तरी आजूबाजूच्या गांवांतील–विशेषतः शिरसगांवांतील–शेतकरी त्यांच्यावर दांत ओठ खात होते ही

गोष्ट सुभद्राबाईच्या लक्षांत आली होती. विसुभाऊंना या सर्व परिस्थितीची जाणीव देऊन त्यांच्या वर्तनांत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न तर बाजूलाच राहिला, उलट असलें कांहीं कोणी सांगूं लागला म्हणजे तो आपल्या बऱ्यावर नाहीं, आपल्याबद्दल त्याला मत्सर व हेवा वाटूं लागला आहे असें विसुभाऊंना वाटूं लागले होतें. सुभद्राबाईच्या बाबतींत त्यांना तसें वाटणें शक्य नव्हतें. पण बायकांचें शहाणपण चुलीपुरतें, त्यांनीं असल्या व्यवहाराच्या गोष्टींत मन घालूं नये असें सांगून ते सुभद्राबाईना धुडकावून लावीत. व असला नेभळटपणाचा उपदेश आपल्याला करण्याच्या भरीस कोणी पडूं नये असेंच ते प्रत्येक वेळीं बोलून दाखवीत. फिर्यादीवर फिर्यादी लावून आपण आपलें कर्ज दामदुपटीनें, तिपटीनें, चौपटीनें वसूल करीत चाललों आहों, आज अमकी जमीन घेतली, उद्यां अमक्या जमिनीचा कबजा घ्यावयाचा, असा तडाका आपण चालविला आहे यामुळें आपली ऐपत व इस्टेट वाढत आहे हें खरें असलें तरी त्याबरोबरच आपण आसपासच्या खेड्यांत झपाट्यानें अप्रिय होत चाललों आहोंत, आपल्याकडे सर्वच शेतकरी तुच्छतेनें व द्वेषदृष्टीनें पाहात आहेत हें त्यांच्या ध्यानांत आलें होतें. पण त्याची त्यांना पर्वा नव्हती. आपल्या या व्यवहारांत कोणी आडवे आले, मग ते कितीहि असले तरी त्यांचा कांटा काढावयाचा, या आवेशानें त्यांनीं आपला धंदा चालविला होता. विसूभाऊपाशीं हवा तेवढा पैसा होता. सरकारी अधिकाऱ्यांना ते आपल्या बोटावर नाचवीत होते. पण जनतेच्या रोषापुढें आपल्या या सामर्थ्याचा कांहीं उपयोग नाहीं हा अनुभव त्यांना यावयाचा होता.

# १२

केवळ वत्सलेकरतांच बापू नेहमी मुंबईला येत व तिच्या आग्रहामुळें मुंबईत कांहीं दिवस राहात. एरवीं मुंबईला राहण्यांत त्यांना कधींच मजा वाटत नसे. बापूंनीं मुंबईला राहून चांगली विश्रांति घ्यावी असें वत्सलेला वाटे. पण चार आठ दिवसांत बापू मुंबईला कंटाळले असें पाहिल्यावर वत्सला त्यांना मुंबईस ठेवून घेण्याच्या भरीस फारशी पडत नसे. माणूस आनंदानें व सुखानें एखाद्या ठिकाणीं राहील तर त्याला विश्रांति मिळेल. पण जेथें राहावयाचें तेथल्या वातावरणाचाच माणसाला कंटाळा आल्यावर त्याच्या मनाला विश्रांति कशी मिळणार ? अन् मनाला विश्रांति नसेल तर शरीराला तरी काय सुख लागणार ? प्रकृति फारच खालावलेली दिसली तर वत्सला बापूंना मुंबईहून बाहेर जाऊं देत नसे. पण प्रकृतीची सबब नसल्यावर या बाबतींत बापूंच्या मनाविरुद्ध ती कधींच वागत नसे.

बापूंना मुंबई आवडत नव्हती याचें एक विशेष कारण होतें. मुंबई आपलें कार्यक्षेत्र नव्हे असें बापूंना नेहमी वाटे.

'खेड्यांतच काय आहे? मुंबईंत सुद्धां पुष्कळ काम करतां येईल.' असें वत्सला केव्हां तरी म्हणायची.

'मुंबईतहि पुष्कळ काम आहे व तें खेड्यांतील कामापेक्षां अधिक उपयुक्त व अधिक परिणामकारी आहे. पण माझ्या हातून तें व्हायचं नाहीं. मी खेडेगांवांत गेलों, एखाद्या शेतकऱ्याच्या कंबळाच्या झोंपडींत शिरलों, मंडळींशी मी बोलूं लागलों म्हणजे त्यांच्या सुखदुःखाच्या गोष्टी मला जितक्या कळतात व त्यांच्या भावनांशीं मी जितका समरस होतो तितका आपलेपणा कामगारांच्या चाळींत शिरून त्यांच्याबद्दल मला वाटेल कीं नाहीं कुणास ठाऊक? कामगारांत वावरूं लागल्यावर व त्यांच्याशीं सुख-दुःखाच्या गोष्टी बोलल्यावर कदाचित त्यांच्याबद्दलहि आपलेपणा मला वाटूं लागेल. पण तो प्रयोग करायला मला आतां वेळ नाहीं.' असें सांगून ते वत्सलेची समजूत काढीत.

'वेळ नाहीं म्हणे. ही सबब तर फारच लंगडी. कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी.'

शहरांतलें काम व खेड्यांतलें काम या संबंधांत मामाभाचींत वाद सुरू झाला म्हणजे वरील संस्कृत वचन आधाराला घेऊन बापूंना गप्प बसविण्याचा प्रयत्न वत्सला करीत असे.

'काल अमर्याद असेल, पण माझ्या बाबतींत त्या कालाला मर्यादा आहेच कीं नाहीं?'

'पण त्याचा विचार काय म्हणून करायचा? काल अमर्याद आहे. कामाचेहि डोंगर अमर्याद पसरले आहेत. आपल्या हातून होईल तेवढें काम करावें यांत प्रयोग करण्याचा व त्याला वेळ नसण्याचा प्रश्न तरी कुठं येतो?'

'वत्से, तुझं हे आर्ग्युमेंट बिनतोड आहे खरं, पण नवीन प्रयोग करण्यांत वेळाचा व श्रमाचा अपव्यय होतो हें तुझ्या लक्षांत कसं नाहीं येत?'

'बापू, तुम्ही कांहीं म्हणा. माझं तर असं मत आहे कीं तुम्ही जर उद्यां कामगारात शिराल तर थोडक्याच दिवसांत त्यांना तुम्ही आपलेसे करून टाकाल. आतां तुम्ही केवळ आवडीचाच प्रश्न काढला तर मात्र कोणी कांहीं या बाबतींत म्हणूं शकणार नाहीं.'

'बरीच लबाड आहेस कीं. कामगारांना जागृत करणं महत्वाचं व क्रांतिकारक काम आहे असं एका बाजूनं म्हणायचं व आपल्याला तें आवडत नाहीं असं म्हणून तें बाजूला टाकायचं असली ही आवडीनावडीची सबब काय कामाची, असं तूं यापुढं म्हणणार, नाहीं का?'

' नाहीं बापू, माझ्या मनांत ही कल्पना मुळींच आली नाहीं. तुमच्या कामासंबंधानं व तुमच्या आवडीनिवडीसंबंधानं चर्चा करण्याचा मला अधिकार तरी काय ?'

' कां, तुला असं कां वाटू लागलंय समजत नाहीं. '

'खरं सांगू बापू ? माझ्या या मास्तरकीच्या कामाचा मला कंटाळा आला आहे.'

' आपलीं बालकं म्हणजे आपले आत्मेच. समाजानं तुमच्या सारख्या शिक्षकिणींच्या ते स्वाधीन केले आहेत. त्यांना वळण लावण्याचं किती तरी महत्वाचं काम तूं करीत आहेस. '

' बोलायला ठीक आहे. कसले आत्मे न् कसलं काय ? आमच्या शाळेंत समाजाच्या कोणत्या वर्गाच्या मुली येतात हें तुम्हांला माहीतच आहे. आतांशा मुलींचीं लग्नं लवकर होत नाहींत तेव्हां त्यांना दिवसभर घरीं ठेवण्यापेक्षां शाळेंत कांहीं वेळ पाठविलेल्या बऱ्या, म्हणूनच केवळ आमच्या मुलींच्या शाळा भरलेल्या दिसतात. शिक्षणाची व ज्ञानसंपादनाची आवड आहे कुणाला ? शिक्षणक्रमांत जीं पुस्तकं लावलीं आहेत तीं इतकीं गचाळ आहेत कीं त्यांपासून बोध घेण्याजोगं कांहीं नसतं. अन् त्यांतूनच मुलांना कांहीं नवीन सांगूं लागलं कीं त्या मास्तरणीच्या नांवाचा जिकडे तिकडे बोभाटा होतो. पुस्तकांत असेल तेवढंच बोलावं व परीक्षांकरता मुलींना कशा तरी तयार कराव्या हें आमच्या शिक्षण संस्थांचं ध्येय. या गोष्टीपासून कोणी एकादी शिक्षकीण इकडे तिकडे सरली कीं तिच्या नांवानं रिपोर्ट होऊन तिला नोकरीवरून दूर होण्याचा प्रसंग......'

' मग तूं काय करायचं ठरविलं आहेस ?' बापूंनीं विचारलं.

' मध्यम वर्गातल्या व श्रीमंत वर्गातल्या मुलींचे शिकण्याचे चोचले पुरविण्यापेक्षां एकाद्या गिरणींत काम करून पोट भरलेलं बरं असं मला वाटूं लागलं आहे. पोटा करतां कांहीं तरी गुलामीच करायची तर असल्या श्रीमंतांच्या पोरीचे चोचले पुरविण्याची हमाली करण्यापेक्षां गिरणींत जाऊन चार पाळ्या वाहिलेल्या काय वाईट ? '

' वाहवा ! तूं आतां गिरणींत कामाला जाणार व थोड्याच दिवसांत स्त्री कामगारावर देखरेख करणारी नायकीण बनणार वाटतं ? '

' नाहीं बापू, मी थट्टा करीत नाहीं. गिरणीच्या कामासंबंधानं मी आपली सहज बोलल्यें. खरोखरीच मला या मुलींच्या हायस्कुलांतील कामाचा तिटकारा आला आहे. काय त्या शिक्षकिणी न् काय त्या मुली, त्यांचीं फुलपाखरांसारखीं रंगीबेरंगी पातळं, त्यांचे झंपर, त्यांचे फ्रॉक, त्यांचे शेपटे, शेपट्याच्या टोंकाना हलकावे खात असलेले झुबके, त्यांचे डूल, त्यांच्या पावडरी व वासाची तेलें. या सर्व मुली शाळेंत शिकण्याकरतां आलेल्या नसतात. कोण मुलगी चांगली नटते व सिनेमांतल्या नटींची नक्कल करण्यांत कोण कोणाशी किती स्पर्धा करते हें दाखविण्याकरतांच जणूं काय या शाळेंत

आलेल्या असतात. उच्च वर्गाच्या राहणींतील अनेक फॅशनींप्रमाणें शिक्षण ही एक फॅशनच झाली आहे. या फॅशनला उत्तेजन देण्याचा मला आतां अगदी कंटाळा आला आहे.'

'पण हें पहा, वत्से, तुला आपल्या मास्तरकीच्या कामाचा कितीहि कंटाळा आला असला तरी तें सोडून तूं गिरणींत कामाला जावंस हें मात्र मला मुळींच आवडायचं नाहीं. गिरणींत एकाद्या मजूर स्त्री प्रमाणं काम करण्यापेक्षां समाजाला उपयुक्त असं दुसरं कोणतंहि चांगलं काम तुला करतां येईल.'

'गिरणीच्या कामासंबंधानं मी आपली उगीच बोललें. मुलींच्या हायस्कुलांतील शिक्षकिणींची हमाली गिरणींतील स्त्री कामगारांच्या हमालीपेक्षां किती निकृष्ठ दर्जाची आहे हे दाखविण्यापुरतंच तें बोलणं होतं. मी यापुढें काय करायचं ठरवलं हें तुम्हाला सांगू? नर्सिंगचा कोर्स पुरा करून रोगांनीं व व्याधींनीं गांजलेल्या जीवाच्या वेदना शमविण्यास मदत करणारी व त्याला रमवणारी एक चांगली सिस्टर होण्याचं माझ्या मनांत आहे.'

वत्सलेची ही कल्पना बापूंना अर्थातच पसंत पडली. त्यांनीं तिचा हा कोर्स संपविण्याकरतां लागणाऱ्या खर्चाची व्यवस्था केली. वत्सलेजवळची पुंजीहि या कामीं उपयोगी पडली. वत्सलेनें थोड्या उशीरा हा कोर्स घेतला होता तरी पहिल्या वर्षाच्या परीक्षेंत चांगल्या रीतीनें ती उत्तीर्ण झाली. एवढ्या अवकाशांत बापूहि आपल्या आवडत्या शेतकरी संघटनेच्या कामाकरितां मुंबईहून तीन चारदां बाहेर जाऊन आले.

उत्तर हिंदुस्थानांत, बंगालमध्यें व आंध्रमध्यें किसान सभेची संघटना करून तिच्या द्वारें तेथील जमीनदारीचं उच्चाटन करण्याची चळवळ जोरांत चालू होती. महाराष्ट्रांत या चळवळीचें लोण पोंचलें होतें आणि सारासुटीचा व कर्ज रद्द करून घेण्याचा कार्यक्रम इकडील किसान संघटनावाल्यांनीं हातीं घेतला होता. या सर्व चळवळीच्या कामीं बापू प्रामुख्यानें लक्ष घालीत होते. सारासुटीचा प्रश्न सोडवावयाचा तर सरकारशींच दोन हात करणें प्राप्त होतें. पण त्यापेक्षाहि महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांना अधिक जाचक होणारा प्रश्न म्हणजे सावकारीचा प्रश्न होता. सावकाराशीं दोन हात करणें हें महाराष्ट्रीय शेतकऱ्यांच्या अंगवळणीं पडलेलें काम आहे. सावकाराविरुद्ध मराठी शेतकरी चटकन संघटित होतो. त्याला या बाबतींत पुढाऱ्याची जरूर भासत नाहीं. सावकाराला ताळयावर आणण्याचा प्रसंग आला कीं महाराष्ट्रांतील गांवचे गांव ताबडतोब संघटित होतात. सावकारशाहीविरुद्ध असलेला द्वेष महाराष्ट्रीय शेतकऱ्यांच्या अंगीं पिढ्यान् पिढ्या भिनला आहे. ही सावकारद्वेषाची आग मराठा शेतकऱ्याच्या हृदयांत सारखीच धुमसत असते. केव्हां कोणत्या

निमित्तानें या ज्वालामुखीचा स्फोट होईल हें सांगतां येत नाहीं. अतिवृष्टि व अनावृष्टि याची जोड या जाचाला मिळाली म्हणजे या द्वेषाग्नींत सावकारांची आहुती नेहमींच पडते. पण हीं दोन्हीं कारणें नसली तरी एकाद्या ठिकाणचा सावकारी लोभ अनावर झाला व तो शेतकऱ्याला जाचक होऊं लागला म्हणजे सापाच्या शेपटीवर पाय पडल्याप्रमाणें हा मराठा शेतकरी चवताळून उठतो व त्या भागांतील सावकारांवर झेप घालून त्याला कवटाळल्याशिवाय राहत नाहीं.

सोनगांव भागांत दुष्काळ पडला नव्हता किंवा अतिवृष्टि किंवा हींव पडून तिकडील पिकें जळूनहि गेलीं नव्हतीं. पण तिकडील सावकारांनीं जणूं काय शेतकऱ्यांचा पिच्छा पुरवला होता. सावकार मग तो गुजर असला काय, किंवा मारवाडी असला काय किंवा ब्राह्मण असला काय, सावकारच. केवळचंदाचा वाडा भस्मसात् झाला पण त्याचें नशीब इतकें शिकंदर कीं त्याची सेफ व त्याची सावकारी कागदपत्रांची दप्तरें सहीसलामत बचावलीं. केवळचंदाच्या हातीं हें एक कोलीतच मिळालें. एकीकडून केवळचंद व दुसरीकडून विसूभाऊ यांनीं आपली सावकारी वसूल करण्याचा सोनगांव भागांत जणूं काय धुमाकूळ उडवून दिला होता. सावकारी वसूल करण्याच्या बाबतींत गुजर मारवाडी सत्यासत्याची पर्वा न करणारे निर्दय व निष्ठुर असतात, पण विसूभाऊंनीं या बाबतींत गुजर मारवाड्यांहि मागें सारलें होतें. सावकारींतला आसुरीपणा जातीवर अवलंबून नाहीं. सावकारीच्या धंद्याचाच तो गुण आहे. या पेशाच्या नादी लागलेला ब्रह्मेंद्र स्वामी देखील आपली सावकारी वसूल करतांना आपला स्वामीपणा व वैराग्य विसरून जातो. विसूभाऊ तर एक सामान्य संसारी गृहस्थच होता.

पण विसूभाऊंच्या सावकारी जाचामुळे सोनगावांतील शेतकरी मंडळी अगदीं त्रासून गेली होती व या जाचांतून सुटण्याकरतां प्रतिकाराचा उपाय शोधण्याच्या मार्गास ती लागली होती. सावकाराला ताळ्यावर आणण्याकरतां त्याची जमीन पडीत पाडावयाची. कोणीहि ती लागवडीला घ्यायची नाही, मागचा राहिलेला खंड द्यायचा नाहीं. पुढें खंडानें जमीन घेतली नाहीं म्हणजे पुढील खंडहि बंद. आणि याच्या भरीला सावकाराला त्याचें रोजचें जीवन जगणें अशक्य करून सोडायचें. सोनगांव भागांतील शेतकऱ्यांनीं विसूभाऊंच्या बाबतींत हे सर्व उपाय योजण्याचें ठरविलें. या प्रस्तावांत शिरसगांवच्या लोकांनीं प्रामुख्यानें घेतला होता हें सांगावयास नकोच. शिरसगांवच्या जमिनी जसजशा विसुभाऊंच्या गळीं उतरूं लागल्या तसतसें हें गांव म्हणजे आपलें इनामी गांवच आहे या भावनेनें त्याच ठिकाणी येऊन राहण्याचा विसुभाऊंनीं बेत केला होता. मालिनीच्या नवऱ्याला, आपल्या घरजांवयाला, शिरसगांव आंदण द्यावयाचें तर गांवच्या नुसत्या जमिनी देऊन काय उपयोग? सभोंवार सुंदर बागाइत असलेला एक शोभिवंत टुमदार बंगला बांधून त्याला द्यावयाचा असा बेत करून

विसुभाऊंनीं तशी व्यवस्थाहि केली होती व सोनगांव सोडून याच बंगल्यांत ते अलीकडे येऊन राहिले होते.

याप्रमाणें विसुभाऊ आपल्या मुलीच्या व जांवयाच्या भावी वैभवाचें मनोराज्य मनांत वागवून या बंगल्याच्या सुखसोयी वाढविण्यांत गुंग झाले होते, तर शिरसगांवचे शेतकरी विसुभाऊचा कांटा आपल्या गांवांतून कायमचा कसा काढून टाकतां येईल याच्या विचाराला लागले होते.

महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांची स्थिति सुधारायची असल्यास पन्नास टक्के सारा कमी करण्यांत यावा व त्याच प्रमाणें त्याच्यावरील सर्व कर्ज रद्द करून त्याला सावकारी पाशांतून एकदां पूर्णपणें मोकळा करण्यांत यावें या जोडमागण्यांवर किसान-सभेचें संघटनेचें काम बापूंनीं चालविलें होतें, जबर सारा व डोईजड कर्ज यामुळें मराठा शेतकरी जेरीस आला आहे. त्याला पुन्हां आपल्या पायावर उभा राहण्यास समर्थ करावयाचें असल्यास वरील दोन्हीं उपायांचा अंमल करण्यांत आला पाहिजे असें बापूंचें स्पष्ट मत होते. बापूंनीं चालविलेली ही चळवळ सरकारला मान्य नव्हती आणि सावकार .वर्गानें तर बापूंच्या या चळवळीविरुद्ध मोठाच गिल्ला उठविला होता. अशा परिस्थितींतच सोनगांव भागांतील शेतकऱ्यांनीं—विशेषतः शिरसगांवच्या शेतकऱ्यांनीं—सावकारांशीं दोन हात करण्याची तयारी चालविली तेव्हां आपल्या मागण्या उचलून धरणाऱ्या बापूंचा त्यांनीं आपल्याला पाठिंबा मिळविण्याचा साहजिकच प्रयत्न केला व त्यांत त्यांना यश मिळालें. बापूंची या बाबतींत एकच अट होती व ती म्हणजे अभेद्य एकजुटीची. सोनगांव भागांतील सावकारांनीं चालविलेल्या जुलमासंबंधानें बापूंकडे तक्रारी गेल्या त्या वेळींच बापूंनीं या शेतकऱ्यांना एकजुटीचा महामंत्र सांगितला होता. .पण शिरसगांवच्या शेतकऱ्यांनीं सावकाराच्या जमिनी पडीत ठेवण्याची व सावकारावर बहिष्कार घालण्याची तयारी चालविली आहे हें जेव्हां त्यांना समजलें त्या वेळीं एकट्या दुकट्या गांवाने अशा प्रकारचा प्रयत्न करण्यापेक्षां या भागांत सर्वत्र मोठ्या प्रमाणावर संघटित रीतीनें खंडबंदीच्या चळवळीचें निशाण उभारावें असें त्यानीं या चळवळींतील म्होरक्यांना कळविलें होतें. शिरसगांवच्या शेतकऱ्यांवरील जुलमाचें माप कांठोकाट भरलें होतें. तेथील शेतकरी दम धरण्यास तयार नव्हते. मग बापूंना तरी कसा दम निघणार? शेतकरी आपण होऊन संघटित होतात व एखादी चळवळ करूं पहातात असें दिसल्यावर त्यांना निरुत्साह काय म्हणून करायचें? व्यापक व सार्वत्रिक चळवळ परिणामकारक खरी पण त्या पूर्वींच एखादा नासलेला भाग गळूच्या रूपानें डोकें वर काढून बाहेर आला तर त्याला कापून काढण्यास कांहींच हरकत नाहीं.

सावकाराचा चालू खंड द्यावयाचा नाहीं, त्याच्या जमिनी कोणीहि लागवडीस आणावयाच्या नाहींत, त्या पडीत पाडावयाच्या, कोणी दुसरे शेतकरी या जमिनी

वाहाण्यास आले तर त्यांना तसें करूं द्यावयाचें नाहीं व सावकारावर सामाजिक बहिष्कार घालावयाचा. सोनगांव विभागांतील शेतकरी चळवळीचा हा कार्यक्रम होता. या चळवळीचा रोख इतर सावकारांपेक्षा विसूभाऊ सावकाराला ताळ्यावर आणण्याकडे विशेष होता. शिरसगांवच्या शेतकऱ्यांनीं एकजुटीनें या चळवळीस हात घातला होता. सावकारीचें उच्चाटण करून शेतावर जो राबतो त्याच्या मालकीच्या जमिनी करण्याचें बीज या कार्यक्रमांत अंतर्भूत होतें. या कार्यक्रमांत एकच उणीव बापूंना भासत होती. या चळवळीचें कार्यक्षेत्र फारच संकुचित होतें. तथापि सावकारी जुलूम नाहींसा करण्याच्या शुद्ध हेतूनें व शुद्ध भूमिकेवर या चळवळीची तयारी करण्यांत आली होती हें पाहून बापूंनीं या चळवळींत पुढारीपणानें भाग घेण्याचें ठरविलें व या तिच्या जोरावर इतर ठिकाणींहि तिचा फैलाव करण्याचें त्यांनीं निश्चित केलें.

'जो नांगरतो त्याची जमीन असं म्हणणं फार सोपं आहे पण हें ध्येय साध्य करणं शक्यतेच्या कोटींत आहे असं मला वाटत नाहीं.'

रविवारची सुट्टी होती. बापू पुन्हां शेतकरी चळवळींत भाग घेणार. सोमवारी ते मुंबईहून शिरसगांवला जाणार हें ठरल्यामुळें वत्सलेनें बापूंची पाठ सोडली नव्हती. तिनें हॉस्पिटलच्या अधिकाऱ्याकडून सोमवारचीहि रजा मागून घेतली होती. रविवारचा सबंध दिवस बापूंची तयारी करून देण्यांत तिनें घालविला. संध्याकाळच्या वेळीं दोघेंहि चौपाटीवरील प्रचंड वाळवंटांतील एका बाजूच्या जागीं जाऊन बसलीं होतीं. ओहोटीची वेळ होती. समुद्राची खळबळ बेताची होती पण वत्सलेच्या मनाची खळबळ तिला स्वस्थ बसूं देत नव्हती. चौपाटीच्या वाळवंटांत येऊन बसल्यावर सहजच शेतकरी संघटनेच्या विषयावर बोलणें सुरू झालें व वत्सलेनें वरील उद्गार काढून आपल्या मनांतील निराशावाद प्रकट केला.

'जो नांगरतो त्याची जमीन हें ध्येय साध्य करणं कठिण असेल पण तें अशक्य आहे असं मात्र नाहीं.' बापू बोलूं लागले. 'हिंदुस्थान पूर्ण स्वतंत्र करणें, ब्रिटिश साम्राज्यशाही संपूर्ण नष्ट करून हिंदुस्थानांत शुद्ध लोकशाही प्रस्थापित करणें ही गोष्ट कांहीं कमी कठिण नाहीं. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या प्रचंड भौतिक सामर्थ्यापुढें हिंदुस्थानचें बल तें किती पण हा लढा हिंदुस्थाननें चालविला आहेच कीं नाहीं? आयर्लंड सारख्या एका छोट्या राष्ट्रानें या ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या नाकी नव आणले व त्यांना आपलें स्वातंत्र्य मान्य करावयास लावलें. सातशें वर्षे आयरिश लोक स्वातंत्र्याचा हा लढा लढवीत होते. शेवटीं त्यांनीं विजय संपादन केला. हिंदुस्थानहि तसेंच पूर्ण स्वतंत्र होईल पण मानव्याचा हा लढा स्वातंत्र्यापर्यंतच आतां थबकून राहिलेला नाहीं. राष्ट्रीय स्वातंत्र्याबरोबर जनतेलाहि पूर्ण स्वातंत्र्य मिळालें पाहिजे. तिची गुलामी नष्ट झाली पाहिजे, तिची पिळणूक थांबली पाहिजे. शेतकरी जनतेची ही

पिळणूक थांबायची म्हणजे जमीन तिच्या मालकीची झाली पाहिजे, हें उघड आहे.'

'बापू, तुमच्या म्हणण्याप्रमाणें राष्ट्रीय स्वातंत्र्य हिंदुस्थानला कदाचित् संपादन करतां येईल पण " कसतो त्याची जमीन व राबतो त्याचे कारखाने " हें ध्येय मात्र अशक्यप्राय आहे. हिंदुस्थानच्या बाबतींत तर तें अशक्यप्रायच आहे.'

'वीस वर्षापूर्वी हिंदुस्थानचें स्वातंत्र्य देखील अशक्यप्रायच वाटत होतें. आतां तें आपल्या नजरेच्या टप्प्यांत आहे हें आपण पाहतोंच आहों. तसेंच जनतेच्या पूर्ण स्वातंत्र्याचें ध्येयसुद्धां आज थोडेसें अशक्य वाटणें साहजिक आहे. पण राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळच योग्य नेतृत्वाखालीं झाली तर हें स्वातंत्र्यहि शक्यतेच्या कोटींत आलेंच पाहिजे.' बापू म्हणाले.

'पाहिलं, तुमचं जर तर मध्ये आलंच.' वत्सला म्हणाली. 'जणूं काय आज जी स्वातंत्र्याची चळवळ चालू आहे ती योग्य नेतृत्वाखालीं चालू नाहींच. जें नेतृत्व राष्ट्राला कमींत कमी मुदतीत स्वातंत्र्य मिळवून देईल तें योग्य नेतृत्व असेंच कोणीहि म्हणेल.'

'स्वातंत्र्य किती दिवसांत मिळवायचं असा हा सवाल नसून सत्ता कोणाच्या हातात जावयाची हाच या बाबतींत मुख्य प्रश्न आहे.' बापू म्हणाले.

'समजा निजामासारखा एकादा संस्थानिक बंड करून उठला. बाहेरच्या एकाद्या राष्ट्राशी त्यानें संगनमत केलें व ब्रिटिश राज्यसत्तेला त्यानें ताबडतोब घालवून दिलें तर तें स्वातंत्र्य कोणीच नाकारणार नाहीं.'

'वत्सले, उगाच कल्पनातरंगांत नको वाहून जाऊं. केवळ तात्विक दृष्ट्याच या गोष्टीचा विचार करून चालत नाहीं. ब्रिटिश साम्राज्यशाहीवरच केवळ ज्यांचें जिणें अवलंबून आहे ते संस्थानिक स्वातंत्र्याकरितां चालू सत्तेविरुद्ध बंड करून कसे उठतील? एकाद्या संस्थानिकानें मध्यवर्ती सत्तेविरुद्ध बंड करून उठावें, परकीय सत्ता नामशेष करून त्या ठिकाणीं एकतंत्री सत्ता स्थापन करावी, असल्या खुळचट कल्पना करण्याचा काल आतां उरलेला नाहीं. उगाच वेड घेऊन पेडगांवाला जाऊं नको.'

'बरं तें राहूं दे. आज ज्यांच्या नेतृत्वाखालीं स्वातंत्र्याची चळवळ चालली आहे ती यशस्वी झाली तर तें स्वातंत्र्य...'

'आम्ही नाकारणार नाहीं हें उघड आहे.' बापू मध्येंच म्हणाले. 'पण ज्या जनतेच्या बळावर हें स्वातंत्र्य मिळावयाचें आहे ती जागी असली तर सर्व उत्पादनाचीं साधनें जनतेच्या हातीं आली पाहिजेत हें ध्येय साध्य होण्यास वेळ लागणार नाहीं.'

'मला तें कांहीं समजत नाहीं. उद्यां स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर देशांतील भांडवलवाले, जमीनदार व सावकार आपल्या ताब्यांतले कारखाने कामकरी व शेतकरी जनतेला देऊन टाकण्यास तयार होतील, असें नाहीं मला वाटत.'

'ज्यांच्या हातांत आज जमीनी व कारखाने आहेत ते लोक आपण होऊन हीं उत्पादनाचीं साधनं जनतेच्या स्वाधीन करण्यास तयार होतील असं कोणीच म्हणत नाहीं. ब्रिटिश साम्राज्यशाहीपासून हिंदुस्थानचं स्वातंत्र्य जसें हिसकावून घ्यावें लागेल त्याचप्रमाणें वरच्या वर्गाकडून जमीनी व कारखाने बळकावून घेऊन त्यांवर आपली मालकी जनतेला प्रस्थापित करावी लागेल.'

'म्हणूनच तर मी म्हणत्यें कीं, कसतो त्याची जमीन हें ध्येय साध्य होणें अशक्यप्राय आहे म्हणून. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या हातीं असलेली राज्यसत्ता देशांतील वरच्या वर्गाच्या हातीं जाणार हें तर उघड आहे ना! कां तुमचं म्हणणं असं तर नाहीं कीं ब्रिटिश साम्राज्यवादी गेले कीं त्या जागीं एकदम देशांतील राबणारी जनताच येणार आहे? असं असेल तर गोष्ट निराळी. मग हातांत सत्ता आल्याबरोबर राबणारी जनता भांडवलदारांचा व जमिनदार सावकाराचा कांटा तावडतोब काढील. पण तुमच्या बोलण्यावरून तसं दिसत नाहीं आणि आज जी स्वातंत्र्याची चळवळ चालली आहे तीवरूनहि असं दिसत नाहीं कीं सत्ता संक्रमण होतांना ही सत्ता जनतेच्याच हातीं जाईल. याचा सरळ अर्थ असा कीं जनतेला दुहेरी लढा लढवावयास पाहिजे. स्वातंत्र्य प्राप्तीकरितां ब्रिटिश साम्राज्यवाद्यांशीं व त्यानंतर जमीनीच्या व कारखान्यांच्या मालकीकरतां सत्ताधारी असलेल्या भांडवलदार जमीनदार वगैरे वर्गाशीं. असा दुहेरी लढा जनता लढवूं शकेल?'

'वर्गजागृत व संघटित झालेली जनता काय काय करूं शकणार नाहीं?'

'बापू, तुम्हाला ही गोष्ट इतकी सोपी वाटते?'

'सोपी आहे असें कोणीच म्हणत नाहीं पण तूं म्हणतेस त्याप्रमाणें हा दुहेरी लढा लढणें व त्यांत यश मिळविणें अशक्य मुळींच नाहीं.'

'आत्मविश्वासाच्या गोष्टी बोलण्यास कांहीं हरकत नाहीं पण ज्या वर्गजागृती-मुळें व संघटनेमुळें आपल्या हातांतील राजप्रसत्ताच केवळ नव्हे तर आपल्या हातची मालमत्ता देखील गमावून बसावी लागेल तसली जागृति व संघटना वरचा वर्ग होऊं कशी देईल?'

'आतां अगदीं बरोबर बोललीस. हिंदुस्थान स्वातंत्र्य संपादन करील तें कोणाच्या सामर्थ्यावर? या स्वातंत्र्ययुद्धांत कोण बळी पडतील? अखेरचा लढा कोण लढवील? या लढ्यांत कोणाच्या रक्ताचे पाट वाहतील? समाजांतील कोणता वर्ग यांत प्रामुख्यानें भाग घेईल?'

'अर्थात् सामान्य राबणारा वर्ग, शेतकरी कामकरी वर्गातील लोकच हा लढा लढवतील.' वत्सलेने चटकन उत्तर दिलें.

'झालं तर. या लढ्याकरितां शेतकरी-कामकरी वर्गाची संघटना होईल ती याच्या पुढच्या लढ्याच्या कामीं नाहीं का उपयोगी पडायची? प्रश्न एवढाच असतो कीं हा

लढा चालवीत असतांना आपण कशाकरितां लढतों आहों, आपलें अंतिम ध्येय काय आहे याची जाणीव मात्र या लढाऊ वर्गाला द्यावयाची असते. शिवाय आणखी एक गोष्ट तुझ्या लक्षांत नाहींसे दिसतें. भांडवलशाही आपल्या दफनाचा खड्डा आपणच खणून ठेवीत असते त्यांतील गूढार्थहि लक्षांत घ्यावयास पाहिजे. भांडवलशाहीच्या कालांत उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण होतें त्याप्रमाणेंच कामकरी जनताहि हजारोंच्या संख्येनें एकत्रित येते. आपलीं दैनंदिन गाऱ्हाणीं दूर करण्याकरतां त्यांना एकत्र येऊन लढण्यास ही परिस्थिति अनुकूल असते. दैनंदिन गाऱ्हाणीं दूर करून घेण्याकरता या वर्गाला संघटित व्हावें लागतें, आपले हक्क काय हें पूर्णपणें समजल्याशिवाय ही संघटना बल धरूं शकत नाहीं. शेतकरी वर्ग पांगलेला असल्यामुळें त्याची संघटना करण्यास थोडें जड जातें. कामगार संघटनेइतकें हें काम सोपें नसतें. पण एकादें तीव्र गाऱ्हाणें निघालें की वाड्यांवाड्यांतून व आखाड्यांतून पांगलेला शेतकरी वाऱ्यासारखा एकत्र येतो. एकजुटीनें आपला लढा लढवितो व त्यांत यशस्वीहि होतो. स्वातंत्र्याचा लढा असो किंवा दैनंदिन मागण्यांकरितां किंवा गाऱ्हाण्यांकरता केलेला झगडा असो, या क्रांतिकारक जनतेपुढें ध्रुवताऱ्याप्रमाणें त्यांचें अंतिम ध्येय असावें लागतें. पिळणूक करणाऱ्या साम्राज्यवाद्यांशीं व भांडलवलदार जमीनदार वर्गाशी सहकार्याचे व तडजोडीचें धोरण न स्वीकारतां वर्ग कलहाच्या तत्वावर निकरानें तो लढवावा लागतो.'

'पण स्वातंत्र्याचे हे वारे आपल्यालाहि उधळून लावणार हें पाहून देशांतील भांडवलदार, जमीनदार परकीय साम्राज्यवाद्यांशींहि संगनमत करतील व राबणाऱ्या जनतेची वर्गीय संघटना मुळांतच हाणून पाडतील व अंतिम स्वातंत्र्याचा लढा अशक्यप्राय करून सोडतील असं बापू, तुम्हाला नाही वाटत?'

'पुन्हा तुझं आपलं तेंच रडगाणं. अडचणींचे प्रचंड डोंगर पुढें असतांना रशियन क्रांतिकारकांनीं झारशाहीला नाहीं कां नमविलं!'

'बापू, झारशाही पुरवली. झारशाहीचा जुलूम अमानुष होता खरा पण त्यामुळें क्रांतीची धार दिवसेंदिवस अधिकाधिक तीव्र होण्यास मदतच झाली. पण अहिंसा, प्रेम, सहकार्य, हृदयपालट वगैरेंचें ढोंग पुढें करून क्रांतीची धार बोथट करण्याचा जो प्रयत्न चालू आहे तो वर्गीय संघटनेच्या चळवळीला मूळच धरूं देणार नाहीं. झारशाही एका दृष्टीनें बरी पण ही गांधीशाही फार बिकट. "मजूर कारखान्याचे मालक आहेत" असं म्हणायचं न भांडवलदारांना सांगायचं काय, तर वरील गोष्ट लक्षात ठेवून त्याप्रमाणें वागा. शेतकरी कामकरी राज्यच शेवटीं प्रस्थापित करायचं. पण भांडवलदार व जमीनदार यांच्या सहकार्यानें हें ध्येय अमलांत आणायचं. झारशाहीनें उघड उघड हल्ले चढविले. पण प्रेम, शांति, सहकार्य या तत्वांची ढाल पुढें करून वर्गीय संघटनेच्या काळजालाच ही हात घालीत आहे व क्रांतीची धार बोथट करून टाकीत आहे.'

‘ वाहवा, वत्से, तूं तर बहार केलीस. देशांतले भांडवलदार व जमीनदार गांधीबाबांना कां मदत करीत आहेत याचें रहस्य इतक्या चांगल्या रीतीनें तुझ्या लक्षांत आलं असेल असं मला वाटलं नव्हतं.’

‘उगीच माझी वाहवा नका करूं. उघड शत्रू पुरवतो पण शांतीच्या व प्रेमाच्या नांवाखालीं काळजांत शिरून मनाला मारून टाकणाऱ्या अंतःशत्रूला तोंड देणें अत्यंत कठीण.’

‘ वत्से, नर्सचा कोर्स तूं काय म्हणून घेतलास समजत नाहीं. जनतेचे खरे शत्रू कोण आहेत व त्यांचें अतरंग कशा प्रकारचे आहे हें तुला चांगलं समजलं आहे. मलमपट्ट्या बांधीत असतांना तुला हें अचूक शहाणपण कसं सुचतं समजत नाहीं. ’

‘ विषयांतर नका करूं बापू , नर्सचें काम करतांनाच मला हें रहस्य समजलं आहे. पण तो विषय निराळा. पण गांधींच्या शेतकरी कामकरी राज्याच्या घोषणेपुढें तुमची वर्गसंघटना व वर्गलढे फिके पडणार किंबहुना त्यांना वावच मिळणार नाही असं माझं तर मत झालं आहे.’

‘ पुन्हा तेंच. प्रत्यक्ष काळजाच्या भागांत गोळी शिरली तरी ती काढून टाकण्यास डाक्टराला मदत करणाऱ्या व सर्वस्वी हताश झालेल्या रोग्याला धीर देऊन त्याला बरं करणाऱ्या नर्सनं असं म्हणावं हेंच आश्चर्य आहे. जसा रोग तसं औषध. उघड उघड ऑपरेशन करून भागणार नाहीं तर हाडांत मुरत चाललेल्या रोगाला नाहींसें करण्याकरतां तशींच जालीम इंजेक्शनं द्यावीं लागतील असंच कीं नाहीं ? प्रेमाचं व शांतीचं ढोलगं वाजविणाराचें गारुड कांहीं मर्यादेपर्यंतच टिकतं. पिळणुकीच्या मूळच्या प्रश्नाला हात घातला कीं हें सर्व ढोंग बाहेर पडतं. या ढोंगाला चव्हाट्यावर आणायला थोडा वेळ लागेल हे खरं आहे पण त्यामुळं हा लढा अशक्य-प्राय आहे असं जें तूं धरून बसली आहेस तें मात्र खोटं आहे. प्रेम व शांति-पाठांच्या भुतानं तुलाहि पछाडलेलं दिसतंय.”

‘ मला तें पछाडूं शकत नाहीं पण या भुताला गाडणारे गवाई शांतिपाठक कसे निर्माण होतील याचाच मी विचार करीत आहें.’

‘ मग ठीक आहे, झाडाला कोणत्या भुतानं पछाडलं आहे हें नक्की समजल्यावर त्याला गाडून टाकणारा उतारा शोधून काढणं मांत्रिकाला सोपं जातं. रोगाचं अचूक निदान होणंच कठिण. तें झाल्यावर रोग्याला त्याच्या तडाक्यांतून वांचविणं कठिण जात नाहीं; हें तुलाहि माहीत आहेच.’

‘ किती वाजले कांही पत्ता आहे का ? ’

‘ हो माहीत आहे. मनगटाकडे पहा ना !’

‘ तुमच्या बरोबर येण्याच्या गडबडींत मी घरींच तें विसरल्यें.’

‘बरं तर तो गुरू पहा, तो विंचवाजवळ आला. आतां उठलंच पाहिजे.’ असं म्हणून बापूंनीं आकाशांतील गुरूकडे हस्तनिर्देश केला.

‘बापू, तुमचा या ग्रहांवर व ज्योतिषावर विश्वास आहे का हो?’ वत्सलेनं विचारलं.

‘छे, मुळींच नाहीं. वेळ समजून घेण्यापुरताच मला या ग्रहांचा चांगला उपयोग होतो.’

दोघेंहि मामा भाची आपल्या जागेवरून उठलीं व चौपाटीच्या रस्त्याकडे येऊं लागलीं. या वेळीं बहुतेक वाळवंट निर्मनुष्य झालें होतें. कांहीं ठिकाणीं उसाचे कवे विकणारे व चिवडेवाले आपल्या पाट्यांसह व त्यांच्या बाजूला रोंवलेल्या रॉकेलच्या दिवट्यांसह रस्त्याकडे चालले होते. रस्त्यावर येईपर्यंत दोघेंहि चुपचाप चाललीं होतीं. दोघेंहि विचारमग्न होतीं. रस्ता गांठल्यावर बापूंनीं या स्तब्धतेचा भंग केला.

‘वत्से, तुझा अभ्यास कसा चालला आहे?’ त्यांनीं विचारलें.

‘हो, तें मी मग सांगेन. पण तुम्ही येथून गेल्यावर परत केव्हां येणार?’

‘नक्की अमक्याच दिवशीं असं कसं सांगतां येईल? नेहमींप्रमाणें येईन मधून मधून.’

‘पण या खेपेला मला थोडी भीति वाटूं लागली आहे.’

‘कसली भीति वाटते?’

‘लवकर तुम्ही येणार नाहीं, तुम्हाला कांहीं तरी त्रास होईल.’

‘प्रेमाचा तो स्वभावच आहे. आपल्याला प्रिय असलेल्या माणसांवर कांहीं तरी संकट येईल व त्याची आपली ताटातूट होईल असं प्रेमानं हळुवार झालेल्या मनाला नेहमींच वाटतें.’

‘तुम्ही समजतां इतकी मी हळुवार मनाची नाहीं. मला भीति वाटते त्याचं कारण आहे.’

‘काय कारण आहे बुवा?’

‘महाराष्ट्रांतील शेतकरी सुखी व स्वावलंबी व्हावयाचा असेल तर सारा निम्मा करण्यांत यावा, त्याच्यावर असलेलें कर्ज अजीबात रद्द करावें व शेतकऱ्यांनीं एकजूट होऊन खंडबंदी करावी असलीं भाषणें तुम्ही अलीकडे करूं लागलां आहां असं मी ऐकलं.’

‘अगदीं बरोबर ऐकलंस तूं.’

‘तेंच तर मी म्हणत्यें. वर्गकलहावर व वर्गद्वेषावर आधारलेली तुमची शेतकरी चळवळ आतां कोणी चालू देणार नाहीं.’

‘कुणाची मर्जी खपा होऊ नये म्हणून शेतकऱ्यांना त्यांच्या मूळ जन्मसिद्ध हक्कांची जाणीव करूं देतां कामा नये असं का तुझं म्हणणं आहे?’

'साऱ्याचं एक राहूं दे पण सावकाराला व जमीनदाराला खंड देण्याचं बंद करावं, शेतकऱ्यानं घेतलेलं कर्ज त्याला अजिबात माफ करण्यांत यावं ही तुमची चळवळ कांहींतरीच आहे.'

'नांगर ज्याला माहीत नाहीं, खुरपं मुद्दां ज्यानं कधी हातांत घेतलेलं नाहीं, त्याच्या घरीं शेतकऱ्यांनीं वर्षभर राबून पिकविलेलं धान्य ओतावं व त्याचीं कोठारं भरावीं काय म्हणून ? अन् शेतकऱ्यावरील कर्ज म्हणजे काय हें तर सर्वांनाच माहीत आहे. कागदांतील आंकड्याला व शेतकऱ्याच्या हातांत प्रत्यक्ष पडलेल्या पैशाला कधींच मेळ असत नाहीं. खरं पाहिलं तर शेतकऱ्यांनीं आपल्यावरील कर्ज कधींच फेडून टाकलं आहे. तेव्हां शेतकऱ्याला कर्जात बुडवून ठेवणारे हे कागद अजीबात जाळून टाकावे असं म्हटलं तर त्यांत बिघडलं कुठं ? पठाण सावकारांनीं दिलेलं कर्ज तर अजीबात रद्द झालं पाहिजे व पठाणाला खेड्यापाड्यांतून फिरायला कायद्यानें बंदी करण्यांत आली पाहिजे. बरं हें राहूं दे. तुझ्या अभ्यासाबद्दल तूं कांहींच सांगत नाहींस ?'

'सांगायजोगं असं त्यांत कांहीं नाहींच. अभ्यास ठीक चालला आहे. पुढील वर्षी माझा कोर्स संपेल व सर्टिफिकीट मिळालेली नर्स म्हणून मी काम करूं लागेन.'

वत्सलेनें आपल्या अभ्यासाबद्दल बापूंना जें मोघम उत्तर दिलें होतें तेंच बरोबर होतें. पुस्तकी अभ्यास तर तिनें चांगलाच केला होता पण हॉस्पिटलमध्यें रोग्याची शुश्रूषा करण्याचें काम हा कोर्स घेणाऱ्या विद्यार्थिनींना करावें लागतें त्या बाबतींत तिनें चांगलीच लोकप्रियता संपादन केली होती. हॉस्पिटलमध्यें ट्रीटमेंट करतां आलेल्या रोग्यांची ती खरोखरचीच सिस्टर बनली होती. इतर तिच्या बरोबरच्या विद्यार्थिनी त्यांना नेमून दिलेलें काम गटवारी करीत असत पण हृदयाच्या जिव्हाळ्यानें त्या तें काम करीत नसत. ऊन पाण्यानें रोग्याचें अंग पुसून काढायचें साधें काम खरें, पण वत्सला तें काम किती मायाळूपणानें करी. रोगी, मग तो कोण-त्याहि जातीचा, केवढ्याहि वयाचा, कोणत्याहि वर्णाचा, आणि कसल्याहि रोगानें पीड-लेला असो, वत्सला रोग्याजवळ गेली व हें काम करूं लागली म्हणजे ऊन पाण्याची ऊब रोग्याच्या शरीराला मिळे व त्याबरोबर मायाळूपणाची ऊबहि त्याच्या हृदयाला मिळे. इतर विद्यार्थिनी हें काम करतांना रोग्यांना त्या हिरमुसलेल्या दिसत, केवळ जुलमाचा राम राम म्हणून हें काम त्या करीत आहेत असें रोग्यांना दिसून येई. इतर विद्यार्थिनी धसमुसळेपणानें रोग्याचे हातपाय उचलीत ते खालींवर करीत व एकाद्या दगडाच्या पुतळ्यावर कापडाचा बोळा फिरवावा त्याप्रमाणें ऊन पाण्यांत भिजविलेला कापडाचा बोळा रोग्याच्या अंगावर घाशीत. अन् हें काम करतांना आपल्या सहकारी विद्यार्थिनींबरोबर दुसऱ्याच कांहींतरी विषयावर बोलत व आपल्यांतच फिदीफिदी हंसत. हातांतल्या कामाकडे त्या लक्ष द्यावयाच्या नाहींत, मग रोग्यांच्या भावनांकडे कुठलं

लक्ष असायला ? असल्या अंग पुसण्यानें रोग्यांना ऊब वाटण्याऐवजीं त्यांच्या अंगावर थंडीनें कांटाच उभा राही. वत्सलेची वागण्याची तऱ्हा अगदींच निराळी. ती सर्वच रोग्यांकडे आपलेपणानें पाहात असे. विशेषतः गरीब शेतकरी व कामगार वर्गातल्या स्त्री पुरुष रोग्यांच्या बाबतींत ती विशेष दक्षता बाळगीत असे. धर्मार्थ हॉस्पिटल असलें तरी कांहीं वशिल्याचे खास ट्रीटमेंटखालचे रोगी असायचे. पण असल्या रोग्यांकडे जाण्याचें ती बहुत करून टाळीत असे. या खास रोग्यांना खास औषधेंहि मिळायचीं व खास जागेंत त्यांची खास सोयहि व्हायची. असल्या रोग्यांकडे कांहीं विद्यार्थिनी हौसेनें जायच्या, तेव्हां या लोकांपेक्षां गरीबगुरीब रोग्यांनाच आपली जास्त गरज आहे असें वत्सलेला वाटे. यामुळेंच वत्सलेची कामाची पाळी एकाद्या वार्डावर आली कीं तिथल्या रोग्यांना आपलें माणूस आज आलें आहे असें वाटे. विशेषतः रात्रीं दहा वाजून गेले कीं पाण्याकरितां किंवा पिसाबाच्या व शौच्याच्या भांड्याकरतां रोग्यांना कंठशोष करावा लागे व त्यांच्याकडे कोणी लक्ष द्यावयाचें नाहीं. हेड नर्सच्या नजरेला ही गोष्ट आली व तिनें चापलें म्हणजे इतर विद्यार्थिनी जुलमानें हें काम करीत व करवून घेत. पण वत्सलेची पाळी आली कीं असले प्रकार कधींच होत नसत. हॉस्पिटलमध्यें कमीजास्त मुदतीचे रोगी नेहमींच असायचे. कमी मुदतीच्या रोग्यांना वत्सलेच्या बाबतींत आपल्याला हॉस्पिटलमध्यें एक देव माणूस भेटल्याची आठवण राही व जास्त मुदतीचे रोगी आपल्याकडे समाचाराला येणाऱ्या माणसाजवळ या माणसांची स्तुति व देव त्याला सुखी राखो असा दुवा मागत. औषध देतांना, पांघरूण घालतांना, रोग्यांचें प्रकृतिमान पाहून तें टिपून ठेवतांना वत्सला कधींहि हिरमुसलेली अशी दिसायचीच नाहीं. रोग्याचें मानसिक समाधान औषधयोजनेला साहाय्यभूत होत असतें या दृष्टीनेंच औषधाप्रमाणें प्रेमळ शुश्रूषेलाहि महत्व आहे या गोष्टीची पूर्ण जाणीव वत्सलेच्या मनात सदैव जागृत असे. यामुळें रोग्याच्या मनाला समाधान वाटेल असें वागण्याचा ती अत्यंत कसोशीनें प्रयत्न करी. कांहीं कांहीं रोगहि असे असतात कीं आपल्या अंतःकरणांतली तळमळ कोणापाशीं तरी ओकून टाकल्याशिवाय रोग्याला समाधान वाटत नाहीं. वत्सला जवळ असली कीं असला रोगी विश्वासानें आपली कहाणी या प्रेमळ सिस्टरला सांगे व आपल्या मनाचें समाधान करून घेई. या प्रमाणें हॉस्पिटलमधील सिस्टरचें कर्तव्य जाणून त्याप्रमाणें वागणारी वत्सला रोग्यांमध्यें अत्यंत लोकप्रिय झाली होती.

अभ्यासाबद्दल बापूंनीं विचारलेल्या प्रश्नास वत्सलेनें मोघम उत्तर दिलें तें वास्तविक होतेंच पण या अभ्यासाशिवाय नर्सच्या कर्तव्याची जी योग्य शिक्षा तिनें संपादन केली होती त्याबद्दल वत्सला स्वतः होऊन काय बोलणार ? तिच्या संबंधाचे गुणानुवाद बापूंच्या कानावर कधीं कधीं जात त्या वेळीं सिस्टर या नात्यानें तिचें तें कर्तव्यच आहे असें बापू बोलून दाखवीत.

' सुप्रसिद्ध किसान कार्यकर्ते देशभक्त बापूसाहेब गंभीर यांना १२४ व १५३ कलमाखाली अटक '

जनशक्ति दैनिक विकणाऱ्या पोऱ्याची वरील आरोळी ऐकल्याबरोबर ' हें भविष्य मी केलंच होतं' असे वत्सलेनं उद्गार काढले व कुसुमनं रस्त्यावर धांवत जाऊन जनशक्तीचा अंक त्या पोऱ्यापासून मागून घेऊन ती तशीच धांवत वर आपल्या बिऱ्हाडांत आली. ' पैसे पैसे ' करीत जनशक्तीचा पोऱ्याहि तिच्या मागून वर आला. वत्सलेनं त्याच्या हातांत आणेली ठेवली.

' वाच पाहूं ती हकीकत.' वत्सलेनं कुसूमला सांगितलं. बातमी त्रोटक होती. सोनगांव येथें झालेल्या भाषणाबद्दल बापूसाहेब गंभीर यांना १२४ ( राजद्रोह ) व १५३ ( वर्गावर्गात द्वेष पसरविणें ) या कलमांअन्वयें अटक करण्यांत आली आहे. सोनगांवच्या वकिलांनीं त्यांना जामीनावर सोडवून घेण्याचा प्रयत्न केला. मॅजिस्ट्रेटानं जामिनकीचा अर्ज नामंजूर केला. सोनगांवच्या लॉक-अप मध्येंच तूर्त त्यांना ठेवण्यांत येणार आहे. '

ही बातमी वाचून कुसुम भोंवतीं जमलेल्या सगळ्या मंडळींचेच चेहरे गंभीर झाले.

वत्सलेचा निरोप घेऊन बापू मुंबईहून गेल्याला चार महिने होऊन गेले होते. वत्सलेनें नर्सिंगचा कोर्स घेतला होता तरी अप्पासाहेब मौने यांच्या घरचें तिचें येणें जाणें कायमच होतें. बापू परगांवीं गेल्यानंतर ती नेहमींच इकडे येई. अन् रविवारीं तर सबंध दिवस व रात्र त्यांच्याकडेच राहत असे.

बापू मुंबईहून बाहेर पडले ते प्रथम सोनगांव विभागांतच गेले. शिरसगांवच्या लोकांची खंडबंदीची व सावकारावर बहिष्कार घालण्याची जय्यत तयारी त्यांनीं पाहिली. शिरसगांवच्या शेतकऱ्यांनीं या चळवळीची तयारी केली असली तरी सबंध सोनगांव विभागांतील खेडुतांचा या चळवळीला पाठिंबा मिळावा व त्यांनींहि याच धर्तीवर मोठ्या प्रमाणांत चळवळ करण्याची तयारी करावी या उद्देशानें या सर्व भागांतील शेतकरी संघटित करण्यासाठीं त्यानीं या भागांत दौरा काढला. सोनगांव भागांतील सत्तर ऐंशी गांवेंच फक्त या खेपेस संघटित करायचीं असा बापूंचा संकल्प होता. बरोबर कोणी असो नसो, गाडी मिळो न मिळो, बापूंच्या दौऱ्याला खंड म्हणून कधीं पडायचा नाहीं. क्वचित् एकाद्या प्रसंगीं एकाद्या शेतकऱ्यानें बापूकरतां टांगा जोडला तर त्याचा उपयोग ते करीत. पण अमूक एका दिवसांत व अमूक एका पद्धतीनें आपलें संकल्पित कार्य पार पाडायचें असल्यास परस्वाधीन असलेल्या या साधनांची ते कधींच अपेक्षा करीत नसत. बापू एकाद्या गांवीं गेले व तेथल्या मारवाड्याच्या किंवा पांढरपेशा सावकाराच्या घरीं उतरले असें व्हावयाचें नाहीं. गांवांत गेले म्हणजे कोणाहि सामान्य शेतकऱ्याच्या झोपडींत ते आपलेपणानें शिरत. व या झोपडीचा मालक त्यांचें आनंदानं

स्वागत करी. मालकानें हातांतल्या पटकुरानें जागा झटकून तें पसरून दिलें कीं, बापू त्याच्यावर बसण्यापूर्वीच गांवांतल्या ठळक ठळक मंडळीसंबंधानें चौकशी करीत व त्यांना निरोप पाठविण्यास सांगत. झोपडीच्या मालकानें बापूंना 'कांहीं खालं आहे का ?' विचारलें कीं 'अगोदर काम मग खाणें' असा त्यांचा जबाब असे. खाण्यापिण्याच्या बाबतींत आवडीनिवडीला ते कधींच थारा देत नसत. झोपडीच्या मालकिणीला त्यामुळें कांहींच पंचाइत वाटत नसे. असेल ती झुणकाभाकर ती त्यांच्या पुढ्यात आणून ठेवी. बापू त्याचा आनंदानें स्वीकार करीत. बापूंचें लक्ष जेवणाकडे नसेच. मंडळी जमा झाली कीं, चालू परिस्थितीसंबंधानें व राजकारणासंबंधानें त्यांच्याशीं ते चर्चा करीत. शेतकऱ्यांच्या जीवनाशीं समरस होऊन ते त्यांच्याशीं बोलत. त्यामुळें शेतकऱ्यांचा त्यांच्यावर साहजिकच विश्वास बसे. सरकारचा व सावकारांचा जुलूम सर्वांनाच सहन करावा लागत होता. जमीनदारांच्या जाचानें तर ते गांजून गेले होते. शिरसगांवच्या शेतकऱ्यांनीं सावकाराचा खंड द्यायचा नाहीं व त्याच्यावर बहिष्कार घालून त्याला ताळ्यावर आणावयाचें ठरविलें आहे ही गोष्ट सोनगांव भागांतील खेड्यांपाड्यांतून माहीत झाली होती. शिरसगांवच्या लोकांप्रमाणें सर्वांनींच सरकार, सावकार जमीनदारांविरुद्ध कंबर कसून उठलें पाहिजे. आपण सर्वांनी एकजूट झालें पाहिजे अशा चर्चा बापू त्या गांवांत असतांना शेतकरी आपसांत करूं लागत. जंगलें कोणी तोडली ? जमीनी कोणी तयार केल्या ? पडीत जमीनी लागवडीस कोणी आणल्या ? आमच्या बापजाद्यांनींच ना ! आजहि या जमीनी कोण पिकवितो ? ऊन तहान न पाहातां या जमीनींतून श्रमाचें खत कोण घालतो अन् त्याचें सर्व फळ कोण उपटतो ? वंशपरंपरागत हा अन्याय चालू आहे. या अन्यायाला तोंड दिलेंच पाहिजे. एकजुटीनें त्याचा प्रतिकार केलाच पाहिजे, अशी नुसती जाणीव होऊनच उपयोगी नाहीं तर त्याबरोबरच शेतकऱ्यांनीं आपल्या संघटनेलाहि हात घातला पाहिजे. हें काम स्वतः शेतकऱ्यांनींच केलें पाहिजे, या कामाकरतां शेतकऱ्यांत शेतकऱ्यांचे पुढारी निर्माण झाले पाहिजेत. बापू जेथें जेथें जात तेथें तेथें हा संदेश शेतकऱ्यांना सांगत. सोनगांव भागांतीलच नव्हे तर महाराष्ट्राच्या सर्व तालुक्यांतील, जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनीं एकजुटीची जागती संघटना केली तर आपली गमावलेली जमीन पुन्हां आपल्याला मिळाल्याशिवाय राहणार नाहीं असा विश्वास शेतकऱ्यांच्या हृदयांत बापू उत्पन्न करीत.

अंधार पडत चालला होता. गांव तीन फर्लांग अंतरावर होतें. बापू झपाझप पावलें टाकीत चालले होते. सोनगांव भागांतील ज्या कांहीं गांवांत थोडें चांगलें पीक आलें होतें त्यांपैकीं हें गांव होतें. सौगणीचे दिवस होते. दिवसां पाखरांपासून पिकाचें रक्षण करावयास पाहिजे व रात्रीं चोरापासून. बहुतेक शेतकरी आपल्या शेतांतून

कोऱ्या बांधून राहिले होते. खांद्यावर घोंगडी टाकून गांवाकडे भरभर चाललेल्या या माणसाकडे एका शेतकऱ्यानें पाहिलें. बापूच आहेत हे, असें त्यानें ओळखलें.

'बापू, चला कीं माझ्या कोपींत. गांवांत जाऊन काय करतां?' एका शेतकऱ्यानें बापूंना हटकलें.

बापू त्याच्या मागून गेले. शेवरीचीं शेकाटें एका खांबाभोंवतीं गोल बांधून व त्यावर पानाड बांधून ही कोपी तयार केली होती. कोपीभोंवती तुराट्यांचें कुंपण होतें. शेतकरी तरुण होता. त्याची बायको व तीन मुलें हा त्याचा संसार. दोन शेळ्या कुंपणाजवळ बांधल्या होत्या. बापू कोपीजवळ जाऊं लागतांच कुत्र्याचें पिलूं भूं भूं करीत त्यांच्याकडे धांवून आलें. शेतकऱ्यानें त्याला आंवरलें. 'तो भाकरीला जागला' बापू म्हणाले. शेतकऱ्याच्या बायकोनें अंथरलेल्या पटकुऱ्यावर बापू जाऊन बसले. समोर कुत्रें बसलें होतें. बापूंनीं त्याच्याकडे पाहून त्याला जवळ बोलावलें. डोळे वटारून त्याच्यावर तें गुरगुरलें. बापू मोठ्यानें हंसले. किती इमानी जात! कोपीच्या आंतल्या बाजूस धोतराची लांबट झोळी बांधून त्यांत निजवलेलें मूल जागें झालें. 'घ्या त्याला इवलंसं. मी भाकरी टाकन्यें.' शेतकऱ्याच्या बायकोनें नवऱ्याला सांगितलें. कोपी पुढेंच पाच सहा हाताच्या अंतरावर जागा चापून चोपून सारवून तयार केली होती. तिथंच थोडी खोलगट जागा करून चूल मांडली होती. कारभारणीनें तळाशीं थोडा पाचोळा टाकून व त्यावर रानशेणींचे चार तुकडे टाकून चूल पेटविली. त्यावर पुन्हां थोडा पाचोळा टाकला. कोपीचा व तिच्या आजूबाजूचा भाग प्रकाशमान झाला. किती रम्य होता तो देखावा. वद्य द्वितीयेचा चंद्र वर येत होता. वाऱ्याची मंद झुळुक सुटली होती. सोंगणीला आलेलीं पांढरीं शुभ्र ताटें आपल्या वरील भरदार कणसांसह डुलत होतीं. चूल पेटलेली पाहतांच कुत्रें तिकडे धांवलें. व त्याबरोबर मुलेंहि तिकडे धांवलीं व चुलीसमोर प्रकाशाकडे पहात बसलीं. त्या तीन्ही पिलांचे बारीक डोळे किती आनंदानें चमकत होते. इतक्यांत दाव्यांत अडकून ठेवलेलें कोंकरू आपल्याला सोडवून घेऊन त्या ठिकाणीं दुडकत आलें व या पोरांतच मिसळलें. 'पकडा त्याला, काटवटींत पाय टाकील. पोरांबरोबर याचीहि मेल्याची गडबड.' कारभारणीनें नवऱ्याला सांगितलें. काटवटींत पीठ मळून तिनें भाकरी करायला सुरुवात केली होती. पितळेच्या कढईंत पिठलें शिजून तयार झालें होतें. कढई खालीं उतरून चुलीवर तवा ठेवण्यांत आला. हातावरच्या जाड भाकरीचा आकार वाढत चालला होता. मधून मधून चुलींत जळण सारायचें व वाऱ्यानं खालीं आलेला पदर सांवरून घ्यायचा अशा गडबडींत गळून तिचे तुकडे कसे पडत नाहींत इकडेच बापूंचें लक्ष लागलं होतें. तव्याच्या आकाराची पांढरीशुभ्र जाड भाकरी तव्यावर टाकली गेली हें हे पाहतांच बापूंना हायसें वाटलें.

शेतकऱ्यानें बापूंच्या पुढें थाळी ठेवली. पाण्याचा तांब्या भरून दिला व चूळ भरण्यास सांगितलें. बापूंनीं हात धुतले.

'तेवढी शेळी पिळा कीं,' कारभारीण म्हणाली.

थाळी धूवून बापूंपुढें ठेवून शेतकऱ्यानें शेळीला चुलीच्या प्रकाशाकडे ओढलें. तिचा एक पाय जांघेंत अडकवून धरून झरझर शेळीची धार त्यानें काढली. 'वटकण दिलं का ?' पुन्हां कारभारणीनें नवऱ्याला विचारलें. गवरीचे दोन लहान तुकडे शेतकऱ्यानें थाळीच्या पुढल्या बाजूच्या खालीं ठेवले. इतक्यांत कारभारणीनें ऊन ऊन भाकरी चार चतकोरांत मोडून बापूंच्या थाळींत ठेवली.

'पोरं जेवलीं का ?' बापूंनीं विचारलें.

'भाकरी कुसकरा, दुध घालतों, तोपर्यंत पोरांकरतां भाकरी तयार झालीच.' शेतकरी म्हणाला.

'इतकी जाड, खुसखुशीत, सगळा पापड सुटलेली हातावरची भाकरी ब्राह्मणांच्या बायकांना नाहीं करतां यायची !' बापू म्हणाले.

'तुमच्या मंडळींचं सगळंच नाजूक ! आमचं आपलं हें ओबडधोबड !' शेतकऱ्यानें उत्तर दिलें.

'ओबडधोबड कसें ? किती कुशलतेनं व चलाखीनं ही भाकरी भाजली आहे ! यावर कुठं नावालासुद्धां काळा डाग नाहीं. अन् भाकरी तर खुसखुशीत सर्व बाजूंनीं भाजलेली.'

'बापू, सोडा हा विषय. आमच्या गरीबांचं काय घेऊन बसलां ! असली ओबडधोबड भाकरी तरी कुठं वर्षभर खायला मिळतीया !'

'किती निरुपद्रवी व निरागस, शेतकऱ्याचं जीवन !' बापूंच्या डोक्यांत विचार आला. 'याच्या श्रमाचें फल पूर्णपणें याच्या पदरांत पडलें तर तोहि सुखानं वर्षभर जगेल व समाजालाहि जगवील.'

'पट्टी कशीतरी भरतां येईल पण सावकाराचं देणं नसतं तर वर्षभर पुरण्याइतकी भाकरी हें शेत देतं.' आपलें अपुरें राहिलेलें बोलणें शेतकऱ्यानें संपविलें.

'किती एकर आहे तुझं हें शेत ?'

'आहे चार बिघे. एकर बिकर आपल्याला माहीत नाहीं.' शेतकऱ्यानें उत्तर दिलें. 'आणखी एक पंचाईत गांवांत असते. पहा, बापू, गांवांत कुणाचं चांगलं कुणाला पाहवत नाहीं. कुणाचं शेत चांगलं पिकलं, कुणी आपल्या वावरांत विहीर खणली, तिला पाणी लागलं, त्यानं आपलं बारदान वाढविलं कीं गेलंच त्याच्याकडे सावकाराचं लक्ष. त्यानं पेरलेले गांवांतले गुंड लागले त्या शेतकऱ्याला त्रास द्यायला. या गुंडांचे लाड पुरविले तर ठीक. नाहींतर लागले त्याच्यामागं हात धुवून. गांवांत एकी करा, एकी

करा, असं तुम्ही म्हणतांय ! एकी व्हायची कशी असले गुंड गांवांत असल्यावर ?' शेतकऱ्यानें निराशाजनक उद्गार काढले.

'शेतकऱ्यांच्या एकीपुढें या गुंडाचंहि कांहीं चालत नाहीं हें तुझ्या लक्षांत नाहीं आलं. शिवाय चळवळीचा मोठा लोंढा वाहूं लागल्यावर या सामान्य झाडा-झुडुपांची काय कथा ?' बापूंनीं त्याचें समाधान करण्याचा प्रयत्न केला.

बापू आले आहेत असें समजल्यावर आजूबाजूच्या कोप्यांतील व गांवांतील कांहीं मंडळी जमा झाली. शिरसगांवच्या लोकांनीं खंडबंदीची व सावकारावर बहिष्कार घालण्याची कशी तयारी चालविली आहे, या चळवळीला पाठिंबा तर दिलाच पाहिजे पण त्याबरोबरच मागेंपुढें अशा प्रकारची चळवळ आपल्यालाहि करावी लागेल असेंहि त्यांनीं सांगितलें.

सोंगणी संपत आली. माल खळ्यांतून येऊं लागला. या अवकाशांत बापूंनीं बहुतेक सर्व गांवांतून फिरून सावकाराच्या जमीनी यापुढें खंडानें करावयाच्या नाहींत या चळवळीची संघटना करण्याचा आदेश दिला व शेवटीं सोनगांवांत त्या विभागांतील खेडोंपाडीं राहणाऱ्या शेतकऱ्यांची परिषद भरवून या चळवळीला व्यापक स्वरूप देण्याचें त्यांनीं ठरविलें. इकडे सोनगांवांत या परिषदेची तयारी चालू होती तर शिरसगांवांतील शेतकऱ्यांनीं आपल्या गांवापुरता हा लढा सुरू करण्याचें ठरवून त्याची तारीखहि मुक्रर केली होती.

शिरसगांवच्या बहुतेक सर्व जमीनी विसूभाऊ सावकाराच्याच मालकीच्या असल्यामुळें या लढ्याचा सारा रोख साहजिकच विसुभाऊविरुद्ध होता. सावकार शिरसगांवास राहायला आला तर त्याच्यावर संपूर्ण बहिष्कार घालायचा, पुढील वर्षापासून त्याच्या जमीनी खंडानें करावयाच्या नाहींत, इतकेंच नव्हे तर विसूभाऊ सावकारानें केलेल्या अनन्वित जुलमाचें प्रायश्चित्त म्हणून त्याला या वर्षाचाहि खंड द्यावयाचा नाहीं असें त्यांनीं ठरविलें होतें.

शिरसगांवचे शेतकरी अशा प्रकारची कांहीं तरी चळवळ करणार आहेत अशी कुणकुण कानीं आली असतांहि विसूभाऊंनीं नेहमींप्रमाणें घमेंडीच्या भरांत या गोष्टीकडे लक्ष दिलें नाहीं किंवा त्या संबंधानें कांहीं चौकशीहि केली नाहीं. दरसालप्रमाणें विसूभाऊंनीं मळणीचे दिवस झाले कीं शिरसगांवाला जाण्याचें निश्चित केलें व त्याप्रमाणें दोन तीन दिवसांत तिकडे ते निघणार इतक्यांत सोनगांवला आसपासच्या गांवांतील शेतकऱ्यांची परिषद झाली. या परिषदेची सर्व तयारी बापूंनींच केली असल्यामुळें सभेंत त्यांचेंच मुख्य भाषण झालें. सभेस हजारों शेतकरी जमा झाले होते. त्यांच्यावर या भाषणाचा चांगलाच परिणाम झाला व येत्या वर्षापासून सावकाराच्या व जमीन-

दारांच्या जमीनी न करतां शेतकऱ्यांनीं त्या पड पाडायच्या व शक्य असेल तेथें सावकाराच्या घरावर बहिष्कार घालायचा असा निर्णय या परिषदेंत घेण्यांत आला.

या निर्णयामुळें सोनगांव व आसपासच्या गांवांतील सावकारांचें व इनामदारांचें धाबे दणाणलें. बापूसाहेब गंभीर या चळवळीचे पुरस्कर्ते आहेत हें पाहिल्यावर तर या भागांतील सावकार इनामदारांचा वर्ग हादरून गेला. बापूंच्या भाषणाचे पोलिसरिपोर्ट वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे गेलेच होते. त्याच्या भरतीला इकडील सावकार-इनामदार वर्गानेंहि त्यांना या सभेची व त्यांतील भाषणासंबंधीची हकीकत अतिशयोक्तीनें रंगवून कळविली. ही चळवळ वेळींच दडपून टाकण्यांत आली पाहिजे अशीहि विनंति केली. बापूंविरुद्ध व या चळवळींविरुद्ध वरिष्ठ अधिकाऱ्याकडे ज्या कारवाया करण्यांत आल्या त्यांत विसूभाऊचा हात अर्थात्च होता.

तेव्हां या चळवळीचें रोप मुळांत खुडून टाकण्याकरितां दुसरे दिवशीं सोनगांवाहून बापू मुंबईकडे निघण्यापूर्वी त्यांना सोनगांवच्या पोलिसांनीं अटक केली. पुण्यामुंबईच्या वर्तमानपत्रांतून या धरपकडीची व सोनगांव भागांत होऊं घातलेल्या चळवळीची हकीकत मोठमोठीं हेडिंगें देऊन प्रसिद्ध करण्यांत आली.

वत्सलेनें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या बातम्या वाचल्याबरोबर ताबडतोब सोनगांवाला जाण्याची तयारी केली. रमाबाईंना—विशेषतः अप्पासाहेब मौन्यांना—बापूंसंबंधानें अत्यंत आदर वाटत होता. अप्पासाहेबहि वत्सलेबरोबर सोनगांवास जाण्यास तयार झाले. वत्सलेला कोणी तरी पुरुष माणूस सोबत पाहिजेच होतें. अप्पासाहेब अर्थात् विसूभाऊकडेच उतरले. वत्सलेचीहि सुभद्राबाईशीं ओळख झालीच होती. विचित्र एवढेंच होतें कीं, ज्या विसूभाऊंनीं बापूंच्या चळवळी-विरुद्ध अतिशयोक्तीच्या हकीकती सरकारी अधिकाऱ्यांकडे कळविल्या होत्या त्यांच्याचकडे हीं दोन्हीं माणसें उतरलीं. बापूंना जामिनावर सोडण्यासंबंधाचा अर्ज मॅजिस्ट्रेटनें पूर्वींच फेटाळून लावला होता. बापूंची मुलाखत घेण्यासंबंधानें मॅजिस्ट्रेटची परवानगी मागण्यांत आली व तीहि मोठ्या मिनतवारीनें वत्सलेलाच तेवढी मिळाली.

वत्सला भेटण्यास आली आहे असें बापूंना कळलें. पण तिची भेट इतर सामान्य गुन्हेगार कैद्यांप्रमाणें लॉकपच्या कोठडीबाहेर उभे राहून घेतां येईल, गजाच्या पिंजऱ्यांतून आपल्याला भेटीकरतां बाहेर काढण्यांत येणार नाहीं असें जेव्हां बापूंना कळलें तेव्हां त्यांनीं वत्सलेची भेट घेण्याचेंच नाकारलें.

वत्सलेची अर्थात् निराशा झाली. पण याहिपेक्षां आणखी एका गोष्टीनें तिची फारच निराशा केली.

वत्सला सोनगांवास निघाली त्या वेळींच बापूंच्या भेटीसंबंधानें तिच्या मनांत औत्सुक्य उत्पन्न झालें होतें. त्याचप्रमाणें सुभद्राबाईंनीं आपल्याबरोबर मुंबईला

आणलेला मुलगाहि तेथें आपल्याला भेटेल अशी उत्कट आशा तिनें आपल्या मनांत बाळगली होती.

वत्सलेनें भाऊंच्या वाड्यांत पाऊल टाकल्यापासून एकादी हरवलेली चीज मनुष्य जसा पाहत असतो तशा कावऱ्या बावऱ्या दृष्टीनें वाड्यांत ती चोंहोंकडे पाहात आहे ही गोष्ट अप्पासाहेबांच्या लक्षांत आली होती. सुभद्राबाईच्या लक्षांत तर ती ताबड-तोबच आली. पण बापूंच्या मुलाखतीची मुष्किलीने दिलेली परवानगी व बापूंनीं या बाबतींत दिलेला नकार या गडबडींतच सगळा दिवस निघून गेला.

रात्रीं जेवणें वगैरे आटोपल्यावर सुभद्राबाई बरोबर एकान्तपणें बोलण्याची सवड जेव्हां वत्सलेला मिळाली त्या वेळीं तिनें दासू संबंधानें त्यांना पृच्छा केली. सुभद्राबाई तरी या बाबतींत जास्त काय सांगणार होत्या ? दोन अडीच वर्षापूर्वीं एके दिवशीं दासूचा बाप पांडोबा घरीं आला व आपल्या मुलाला घेऊन गेला असें त्यांनीं सांगितलें. 'दासूला तो कोठें घेऊन जाणार होता. हें तरी तुम्ही त्याला विचारलेंत का ? ' असें वत्सलेनें सद्गदित स्वरांत विचारलें.

' तेवढं मात्र मी अगदींच विसरल्यें. मागाहून ही चूक माझ्या लक्षांत आली. रमाताईनं व तुम्ही दासूची काळजी घेण्यासंबंधानें हडसून खडसून बजावलं होतें पण दासूला आपल्या घरीं ठेवून घेणें मला शक्य झालें नाहीं. पांडोबाचा फारच आग्रह दिसला. पण दासूला घेऊन जात असतांना त्याला कोठें नेणार हें मी विचारावयास पाहिजे होतें. पण मला मेलीला त्या वेळीं आठवणच झाली नाहीं. माझ्या या चुकी बद्दल मला फार वाईट वाटलें पण त्याचा कांहीं उपयोग नव्हता. मळ्यांतल्या गडीमाणसांजवळ मी तपास केला. तीं बिचारीं काय सांगणार ? मी अशी चौकशी करत्यें ही गोष्ट त्यांना उलट चमत्कारिकच वाटली.'

' सुभद्राबाई, माझी फार निराशा झाली.' वत्सलेचा कंठ दाटून आला. तिला यापुढें बोलवेना. वत्सलेच्या पांढऱ्या फटक चेहऱ्याकडे सुभद्राबाईची नजर गेली. तिचे डोळे अश्रूंनीं भरले होते व डोळ्यांत तुंबून राहण्यास अवकाश न मिळाल्यामुळें तिच्या दोन्ही गालांवरून ते पटापट खालीं घसरत होते.

वत्सलेची ही अवस्था पाहून सुभद्राबाई आश्चर्यचकितच झाल्या.

' दासूबद्दल तुम्हांला इतकं प्रेम व आपलेपणा वाटत होता ? ' सुभद्राबाई कळवळ्याच्या स्वरांत म्हणाल्या.

' योग्य प्रसंग पाहून त्याला तुमच्याकडून नेऊन माझ्या जवळच ठेवण्याचं मी ठरविलं होतं. बापूंनींहि या गोष्टीस संमति दिली होती. दिवसामागून दिवस गेले. शाळेंतली नोकरी सोडून मी नर्सिंगचा कोर्स घेतला. हा कोर्स संपल्यावर दासूला आपल्याकडे घेऊन यायचेंच अशी पक्की खूणगांठ माझ्या मनाशीं मी बांधली होती.

बापूंना माझा हा बेत मी कळविला होता. तुमच्याकडून त्याच वेळीं दासूला घेऊन आपल्या घरीं मुंबईस आणण्यास बापू केव्हांहि तयार होते पण मीच त्यांना तसं करूं दिलं नाहीं. तुमच्या घरीं तो सुरक्षित आहे. त्याचं तुमच्यावर प्रेम आहे. माई माई करीत तो तुमच्यामागून फिरतांना मी त्याला मुंबईस पाहिलं होतं. प्रेमाच्या माणसापाशींच तो राहात आहे. आपल्याकडं त्याला केव्हांहि आणतां येईल या भरंवशावर मी होत्यें. पण आतां काय भलतंच झालं ! माई, तुम्ही काय हो केलंत हें? दासू मला आतां कुठं भेटेल ?'

'दासू संबंधानं तुमच्या मनांत इतका आपलेपणा व प्रेम वाटत होतं याची मला कल्पना नाहीं. रमाकडून पत्रें येत त्यांत केव्हांतरी दासूचा उल्लेख असायचा पण तुमच्याकडून मला एकहि पत्र आलं नाहीं अन् इतक्या दिवसांत चुकून सुद्धां तुम्ही त्याची चौकशी केली नाहीं.'

'होय, खरं आहे तुमचं म्हणणं. माझीच चूक आहे. तुमच्याकडं त्याचा कांहीं दोष नाहीं. आयुष्यांत एक मोठी ...' पुढचा शब्द तिनं उच्चारला नाहीं– 'नाहीं, नाहीं, राहूं दे तो विषय. दासूसंबंधानं मला इतकं प्रेम वाटत होतं तर मी तुम्हाला वारंवार पत्रें पाठवून त्याची चौकशी करावयास पाहिजे होती. दासूला त्याचा बाप घेऊन गेला व तो कुठं घेऊन गेला हें तुम्हाला माहीत नाहीं. आतां या गोष्टीची जास्त चर्चा कशाला?'

'वत्सलाबाई, तुम्ही हें खरं बोलत नाहीं. माझा तर्क खरा असला तर तुम्ही जें केलं तेंच बरोबर होतं. वारंवार त्याच्यासंबंधानं कशी चौकशी करणार? त्यातील अडचण मीहि जाणूं शकत्यें. पण ...... '

'नको, हा विषयच आतां नको. दासू माझा कोणी नाहीं. उगीच आपलं सहज त्याच्या संबंधानं मी कांहीं तरी सांगितलं तुम्ही मुंबईहून इकडे परत येतांना.' वत्सला मध्येंच बोलली.

सुभद्राबाई या बाबतींत अधिक ठाव घेण्याच्या भरीस पडल्या नाहींत. 'बापूंच्या खटल्याची चौकशी कुठं होईल ?' त्यांनीं बोलण्याचा विषय आपण होऊनच बदलला.

'कुणी सांगावं ? पुण्यास किंवा कदाचित् मुंबईस देखील होईल.' वत्सलेलाहि हेंच पाहिजे होतें.

'मुंबईस त्यांचा खटला चालला तर तो ऐकायला मी अवश्य येईन. हो, हो, पण विसरल्येंच. आमच्याकडं ही चळवळीची गडबड चालू आहे ना, ती संपेपर्यंत कसलं येणं होतंय मुंबईला.'

सुभद्राबाईच्या तोंडून हें वाक्य संपतें न संपतें इतक्यांत विसूभाऊंच्या खोली-कडून खोकल्याचा आवाज ऐकूं आला व त्याबरोबरच इशारेवजा खालील शब्दहि त्यांना ऐकायला मिळाले.

' मुंबईहून आलेल्या पाहुण्यांना आतां निजूं दे. बिचाऱ्यांना त्यांच्या मामांची भेटहि घेतां आली नाहीं. '

विसूभाऊंनीं वरील शब्द अगदीं अंतःकरणापासून उच्चारले होते का ? बापूंच्या विरुद्ध सरकारी अधिकाऱ्यांकडे त्यांनीं रिपोर्ट केले असतील ! पण मामा-भाचीची भेट झाली नाहीं याबद्दल त्यांनाहि वाईट वाटलें नसेल कशावरून ? य। भेटीमुळें त्यांचें कांहींच बिघडत नव्हतें.

सोनगांवाला आल्यानंतर मुलाखतीच्या बाबतींत ज्या खटपटी झाल्या त्या अवकाशांत विसूभाऊसंबंधानें वत्सलेला बऱ्याच गोष्टी समजल्या त्यांत वरील गोष्टहि त्यांच्या कानीं आली होती. बापूंबद्दल सहानुभूति वाटणाऱ्या सोनगांवच्या एका तरुण वकीलानें विसूभाऊंच्या चारित्र्याची कल्पना वत्सलेला दिली होती. वत्सला एकटीच सोनगांवाला आली असती तर या वकीलांकडेच ती उतरली असती पण अप्पासाहेब मौने तिच्याबरोबर आले. अप्पांना साडूचें घर सोडून दुसरीकडे उतरणें कसें शक्य होतें ? अप्पांची पाहुण्यांच्या खोलींत निजण्याची व्यवस्था केली होती व ते केव्हांच झोंपी गेले होते.

विसूभाऊंच्या चारित्र्याच्या व रिपोर्टच्या गोष्टी ऐकून वत्सलेच्या मनांत त्यांच्या संबंधानें चीड उत्पन्न झाली होती. भाऊंचा वरील इशारा त्यांना मानभावीपणाचा वाटला. बापूंनीं वत्सलेची मुलाखत घेण्याचें नाकारलें ती अट विसूभाऊ मध्यें पडले असते व त्यांनीं मॅजिस्ट्रेटला दोन शब्द सांगितले असते तर मान्य झाली असती. पण विसूभाऊंनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. या प्रकरणामुळें मॅजिस्ट्रेटच्या मनाचा क्षुद्रपणा मात्र व्यक्त झाला.

वरील इशारा मिळाल्यावर सुभद्राबाईंनीं निजण्याची तयारी केली. पण भाऊंना खोकल्याची जोराची उबळ आल्यामुळें त्यांना तिकडे जावें लागलें. सुभद्राबाई पुन्हां परत सोप्यावर येईपर्यंत वत्सला गाढ झोंपी गेली होती. रमेश तर केव्हांच झोंपी गेला होता. सुभद्राबाई आंथरुणावर लवंडल्या. त्यांनाहि झोंप लागली. सर्वत्र सामसूम झालें. सुभद्राबाईच्या उशागती वात बारीक करून ठेवलेला हरीकेन मिणमिण प्रकाश देत होता. मधून मधून त्याची तडतड चालू होती. गोठ्यांतलीं गुरेंहि आराम घेत होतीं. त्यांच्या जोराच्या श्वासोच्छ्वासानें वातावरण भरून गेलें होतें. मान इकडची तिकडे केल्यामुळें वासरांच्या गळ्यांतील घुंगुरूंचा किणकिण आवाज केव्हां तरी होई. पण तो या शांत वातावरणाला पोषक असाच असे.

' नका नका त्याला फटके नका मारूं ' वत्सलेच्या या हृदयभेदक किंकाळीनें या वातावरणाचा एकाएकीं भंग झाला. सुभद्राबाई ताडकन् जागेवरून उठल्या. उशाकडच्या दिव्याची वात त्यांनीं वर सारली.

'वत्सलाबाई, स्वप्नांत तुम्ही भ्यालांत होय?' त्यांनीं मायेनें वत्सलेजवळ येऊन तिच्या पाठीवर हात फिरविला व वरील शब्द उच्चारले. किती मार्दव होतें सुभद्राबाईंच्या या शब्दांत.

'झोपेंत बडबडतीय वाटतं.' भागूवन्सं माजघरांतून कर्कश आवाजांत बोलल्या. वातावरण पुन्हा शांत झालें.

वत्सलेचा खोपा मुटून अस्ताव्यस्तपणें तिचे काळेभोर कुरळे केस उशीवर पसरले होते. सुभद्राबाईंनीं वत्सलेच्या तोंडावर आलेले केस बाजूस सारले. व तिच्या नेत्रांतून चाललेल्या अश्रुधारा पाहून त्यांचेंहि अंतःकरण कळवळून गेलें.

'काय भयंकर स्वप्न! फटक्याच्या तिकाटणीवर बांधून दासूला कोणीतरी जोर-जोरानं फटके मारीत होता असं मला दिसलं.' वत्सला अंथरुणावर उठून बसली. तिनें सुभद्राबाईच्या गळ्यांत मिठी मारली.

'माई, माई, तो तुम्हाला माई म्हणत होता नाहीं का? कुठं असेल आतां तो? त्यानं असा कोणता गुन्हा केला होता?'

वत्सला हे शब्द बोलतांना सुभद्राबाईचें लक्ष उशीकडे गेलें. तिच्या पांढऱ्या शुभ्र अभ्र्यावर लाल दोऱ्यांत आठवण हीं अक्षरें ओवलीं होतीं.

'वत्सलाबाई, स्वप्नांत असं कांहीं तरी विचित्र दिसत असतं केव्हां केव्हां! आपल्याला कल्पनाहि करवत नाहीं अशा गोष्टी स्वप्नांत दिसतात.'

'माई, दासूवर असा प्रसंग खरंच आला होता?'

'भलतंच कांहीं तरी. तुम्ही आतां स्वस्थ निजा बघूं.'

'या सगळ्या अनर्थाला मीच कारण आहे. मुंबईत तो तुमच्याकडं दिसला त्याचवेळीं मी कां त्याला जवळ केला नाहीं?'

'स्वप्नांतल्या गोष्टी कधीं खऱ्या असतात? तुम्ही माझं ऐकत नाहीं? आतां निजा पाहूं.' असें म्हणत असतांना सुभद्राबाईच्या डोळ्यांना उशीवरील 'आठवण' ही अक्षरें जणूं काय भेडसावीतच होतीं. अक्षरें किती सुंदर वळणाचीं व रंगी बेरंगी फुलांत ओवली होतीं पण हीं अक्षरें सुभद्राबाईंना आज भेसूर वाटली. 'आठवणी, नेहमींच गोड असतात असें नाहीं. गोड प्रसंगपेक्षां कटू प्रसंगच माणसाला आपल्या जीवनांत अनुभवावे लागतात. आपलें जीवन तरी अशा कटू आठवणींनींच भरलेलं नाहीं कां?' सुभद्राबाईंच्या मनांत वरील विचार चमकून गेले.

सुभद्राबाई वत्सलेपेक्षां वयानें अर्थातच मोठ्या होत्या. वत्सलेला निजण्या-संबंधानें त्यांनीं दिलेला इशारा थोड्याशा अधिकार वाणीनेंच दिला होता. त्या नुसतें असें बोलूनच थांबल्या नाहींत तर त्यांनीं वत्सलेला बळेंच आडवी व्हावयास लावलें.

तिचे इतस्ततः पसरलेले केस त्यांनीं सावरले. त्यांच्या हाताला ते मऊ रेशमासारखे लागले व त्याबरोबरच तिचे अंतःकरणहि किती कोमल व हळुवार आहे याची त्यांना प्रतीति आली. वत्सलेच्या जीवनाबद्दल त्यांच्या मनांत कींव उत्पन्न झाली.

'मनांत आतां कसलेहि विचार आणूं नका. दासू चांगला गालस मुलगा आहे. स्वप्नावर कुणी कधीं भरंवसा ठेवलाय ? निजा आतां. पांडोबाच्या स्नेही मंडळीकडे मी त्याचा तपास करत्यें. दासू कुठं तरी खुशाल असेल. नका उगीच काळजी करूं ! डोळे मिटून आतां स्वस्थ निजा पाहूं.'

'दासू मला पुन्हां कधीं भेटेल का हो ?'

'कां भेटणार नाहीं ? अगदीं जरूर भेटेल.'

'भेटेल ना ? भेटेल ना तो मला ? तुमच्या तोंडांत साखर पडो.' माणूस एकदां का एकाद्या भावनेच्या आहारीं गेलें म्हणजे तें पोराहूनहि पोर बनतें.

'बरं मी निजत्यें आतां. तो मला भेटेल, भेटेल.' वत्सलेला गुंगी आली. सुभद्राबाईनीं वत्सलेच्या अंगावर पांघरुण घातलें. त्यांनीं तिच्या केसांवरून हलकासा हात फिरविला. 'किती पोरासारखा स्वभाव आहे.' सुभद्राबाई मनाशीं पुटपुटल्या.

सुभद्राबाईनीं वत्सलेला थोडेसें गोंजारून तर थोडेसें दटावून निजविलें खरें, पण त्यांना कांहीं केल्या झोंप येईना. मुंबईहून परत सोनगांवला यावयाच्या पूर्वी कांहीं वेळ व मोटारींत निरोप देत असतांना वत्सलेनें दासूसंबधानें जे शब्द उच्चारले होते त्याची आठवण आजच्या या प्रसंगानें त्याच्या मनांत पुन्हा ताजी झाली. त्यानंतर वाटेंत डब्यांत गांठ पडलेल्या कुटुंबांतील गृहस्थानींहि दासूबद्दल जी आस्था दाखविली त्या आठवणीनेंहि याच वेळीं डोकें वर काढलें, आणि या दोन्ही आठवणींनीं त्यांचें मन गांगरून गेलें.

'दासू वत्सलाबाईचा मुलगा असेल ! अन् त्या गाडींतल्या गृहस्थांचा काय संबंध ?' सुभद्राबाईचें मन गोंधळून गेलें.

'दासू म्हणजे एक गूढच आहे.'

या विचारांतच त्या गुंग झाल्या व त्यांतच त्यांचा डोळा लागला.

दुसरे दिवशीं वत्सलाबाई व अप्पासाहेब परत मुंबईला निघाले. बापूंची मुलाखत झाली नाहीं याबद्दल वत्सलेला वाईट वाटत होतें. पण सुभद्राबाईच्या घरीं दासू भेटेल अशी आशा वत्सलेच्या मनांत डोकावत होती तीहि निष्फळ झाली. सुभद्राबाईनीं वत्सलेचा निरोप घेतला. तिच्या मनः स्थितीची जाणीव सुभद्राबाईंना झाली होती तेव्हां त्या जास्त कमी कांहीं बोलल्या नाहींत. पण बैलगाडींत चढतां चढतां अप्पासाहेबांनीं इकडे तिकडे पाहिलें.

'अरे हो, मी तर अगदींच विसरलों. तुमचा तो दासू कुठंच कसा दिसला नाहीं कालपासून? दुसऱ्या गावीं कोठें त्याला पाठविलें आहे वाटतें? बरा आहे ना तो?' अप्पासाहेबांनीं भराभर प्रश्नामागून प्रश्न विचारले.

'त्याचा बाप त्याला कांहीं महिन्यांपूर्वी घेऊन गेला.' गाडीजवळ हजर असलेल्या विसूभाऊंनीं रुक्ष स्वरांत उत्तर दिलें.

'चांगलं होतं पोर. तुमच्या घरींच तर तें राहणार होतं?' अप्पासाहेब पुन्हां बोलले.

'होतं खरं. पण ज्यानं त्याला आमच्या घरीं ठेवलं तोच त्याला घेऊन जाण्याचा हट्ट धरून बसला. आम्ही त्याला त्याच्या स्वाधीन करून मोकळे झालों.'

विसूभाऊंच्या या उत्तरांतील कृत्रिमपणा सुभद्राबाईच्या लक्षांत आला पण त्याबद्दल कांहीं बोलण्याची ही वेळ नव्हती.

बैलगाडी स्टेशनवर अगदीं वेळेवर पोंचली. आणखी दोन मिनिटें उशीरा आली असती तर गाडी मिळणें मुष्किल झालें असतें. वत्सला डब्यांतील खिडकींतून तोंड बाहेर काढून समोरून मागे धांवत जाणाऱ्या निसर्गाकडे शून्य दृष्टीनें पाहात होती. तिचा चेहरा उतरून गेला होता. मधून मधून तो गोरामोरा होत होता. व तिचे डोळेहि आसवांनी भरून येत होते. बापूंची भेट न झाल्यामुळे वत्सलेची ही अवस्था झाली असेल अशी अप्पानीं आपल्या मनाची समजूत करून घेतली. वत्सलेच्या या करुणामय स्थितीला बापूंची भेट न होणें हें थोडेसें कारण असलें तरी दासूची भेट तिला झाली नाहीं, रात्रीं तिला दासूसंबंधानेंच स्वप्न पडलें व त्यामुळे तिचें मन जास्तच हादरून गेलें हें आणखी एक सबळ कारण होतें याची कल्पना अप्पासाहेबांना आली नाहीं.

जंक्शनच्या स्टेशनवर गाडी थांबली त्यावेळीं एका डब्याजवळ लोकांची बरीच गर्दी जमलेली अप्पासाहेबांनी पाहिली. जिज्ञासू बुद्धीनें तेहि तेथं गेले. पाहातात तों पोलिसांच्या घेऱ्यांत बापू तेथं बसलेले त्यांना आढळले.

'तुम्हीहि याच डब्यांत!' बापूंनीं प्रश्न केला. 'अन् वत्सी.'

बापूंचे हे पुढचे शब्द ओझरते कानावर घेता घेतांच ते आपल्या डब्याकडे धांवले अन् वत्सलेला आणून त्यांनी बापूंच्या डब्याच्या खिडकीपाशीं उभे केले.

'पाहिलं? आतां इथं मॅजिस्ट्रेट काय करणार?' बापू उद्गारले.

पोलिसांनीं बापूंना खिडकीजवळ येऊं दिलें.

'वत्से, भेटलीस एकदां.' असें म्हणून त्यांनीं आपले दोन्ही हात तिच्या खांद्यांवर ठेवले.

'बापू........' वत्सला सद्गदित झाली.

'खुळी कुठली. हें तर नेहमीचंच आहे. सरकार सावकार दोन्ही एकच. सावकाराचं रक्षण सरकारला केलंच पाहिजे.'

डब्याजवळ बरीच गर्दी जमली. सर्व्हंटच्या डब्यांत बापूंना बसविण्यांत आलें होतें. पोलिसांशिवाय त्यांत दुसरें कोणीहि नव्हतें. अप्पासाहेबांनीं त्यांतल्यात्यांत गडबड करून खूपशीं फळें आणून दिलीं. पोलिसांनीं अर्थात् त्यांचा स्वीकार केला.

अप्पासाहेब व वत्सला आपल्या डब्यांत येऊन बसलीं. बापू आपल्या बरोबरच मुंबईला चालले आहेत हें पाहून वत्सलेच्या चेहऱ्यावरील उदासीनता थोडी मावळली अप्पासाहेबांनाहि यामुळें बरें वाटलें.

मुंबईतील एका कोर्टापुढें तडकाफडकी बापूंचा खटला घेण्यांत आला. बापूंनी आपल्यातर्फे वकील दिला नाहीं. १२४ कलमावरील पुरावा मॅजिस्ट्रेटला कच्चा वाटला म्हणून त्यांच्यावरील या कलमाखालचा आरोप रद्द करण्यांत आला कीं त्याला दुसरें कांहीं कारण झालें हें बाहेर आलें नाहीं. बापूंच्यावर वर्गावर्गांत द्वेष माजविण्याचा आरोप ठेवण्यांत आला हा केवळ फिर्यादी पक्षाचा आकसच होता असें शेवटीं दिसून आलें. हें कलम लागू करण्यासारखें बापूंच्या भाषणांत काय आहे हें नक्की दाखवून देण्याबद्दल मॅजिस्ट्रेटनें सरकारी वकिलाला पुष्कळदां छेडलें. सरकारी वकिलाची या बाबतींत त्रेधा उडाली तरी सुद्धां बापूंना तब्बल चार वर्षांची साधी शिक्षा मॅजिस्ट्रेटनें ठोठावली.

## १३

'पाण्यांत राहून माशाशीं वैर. शिरसगांवला यंदां जाऊं नये. येथें राहूनच तिकडील खंड व बटाईचं धान्य वसूल करावं.' असें सुभद्राबाईंनीं विसुभाऊंना परोपरीनें सांगितलें. इतर कांहीं स्नेह्यांनीं त्यांना तोच सल्ला दिला.

पण बापूंना पकडून नेल्यानंतर विसूभाऊंना अस्मान ठेंगणें झालें होतें. 'बापूचा कांटा काढला. आतां कोणाची हिंमत आहे चळवळ चालवायची ? कोण कसा खंड देत नाहीं व व्याजाचं धान्य घालीत नाहीं तें पाहतों. एकेकाची हड्डीच नरम करतो.' असले घमेंडीचे उद्गार ते प्रत्येकाजवळ काढीत.

विसूभाऊंच्या या घमेंडखोरपणाला उत्तेजन देणारे लोक सोनगांवांत कांहीं होतेच.

'अडाणचोट साल्टीं ही कुणबटं, कुणाच्याहि मागं मेंढरासारखीं धांवतात. सावकाराच्या जमीनी करणार नाहीं तर काय. माती खाणार ? असल्या खुळचटांना चांगलाच धडा दिला पाहिजे.'

असल्या सल्ल्यामुळें विसूभाऊ फारच शेफारले व शिरसगांवला मुक्काम करून त्या गांवच्या शेतकऱ्यांनीं पुन्हा कधी अशा गमजा करूं नयेत असा कायमचा धडा देण्याचें त्यांनीं ठरविलें.

बापूंना मुंबईकडे नेण्यात आलें त्याच्या तिसऱ्याच दिवशीं विसूभाऊंनीं आपलें सर्व बिऱ्हाड सोनगांवहून हलविलें. शिरसगांवच्या बहुतेक जमीनी त्यांच्या मालकीच्या झाल्या होत्या. ' गांव आपलेंच आहे. बाहेरच्या लोकांनीं इकडं येऊन शेतकऱ्यांचीं मनें बिथरविलीं असलीं तरी आपल्याशिवाय त्यांना सत ना गत. करतील चार दिवस टुरटुर. आपणच मग ताळ्यावर येतील. ' या भावनेनें आपल्या सर्व बाडबिछाडा-सहित ते शिरसगांवास दाखल झाले.

पहिलाच अनुभव असा आला कीं गांवांतलें चिटपांखरूं देखील त्यांच्याकडे फिरकलें नाहीं. सोनगांवहून बरोबर आणलेला ग्यानबा बैलाच्या टांग्यावर हाकाऱ्या करतां बसला होता. गाडींतून सामान काढायला त्याच्या शिवाय दुसरें कोणी नाहीं. भाड्याच्या गाड्यांचे मालक सामान उतरण्यास तयार होईनात. शिरसगांवच्या भाऊच्या मळ्यांतील गडी व बायका भाऊंची मंडळी येणार गांवाला असें कळतांच आदले दिवशींच काम सोडून निघून गेलीं होतीं.

शिरसगांवच्या मळ्यांतील वाड्यापुढें गाड्या येऊन उभ्या राहिल्या. भागू वन्सं करतां स्वतंत्र गाडी होती. या पांगळ्या बाईला बरोबर घेणें जरूरच होतें. वाड्यापुढे गाडी थांबल्याबरोबर आपल्याला खालीं उतरून घेण्याबद्दल तिनें आरडा-ओरड सुरू केली. गांवचे लोक नव्यानें मळ्यावर फार तर कामाला येणार नाहींत. पण जुन्या गडीमाणसांनीं व त्यांच्या बायांनीं मळा सोडून जाण्याचं कारण काय ? शिरसगांवच्या मळ्यांत तीन शेतकरी कुटुंबें व तीन चार फालतू गडी राहात होते. इतकीं माणसें असल्यावर गांवच्या माणसांची आपल्याला काय गरज ? पण भाऊंची ही कल्पना खोटी ठरली. भाड्याच्या गाड्यांचे मालक परत जायला उतावीळ झाले होते. मळ्यांत तर कोणीच गडी माणूस नाहीं. तेव्हां या लोकां-चीच मनधरणी केल्याशिवाय भाऊंना गत्यंतर राहिलें नाहीं. या लोकांनीं प्रथम भागू वन्संना खालीं उतरून घेऊन वाड्याच्या सोप्यांतील एका कोपऱ्यांत त्यांची निजण्याची सोय करून दिली. आपल्या गाड्या मोकळ्या करून घ्यायच्या एवढाच त्यांचा हेतू; यामुळें गाड्यांतील सामान त्यांनीं भराभर कांहीं बाहेर, कांहीं आंत असें उतरून ठेवून हातांत भाडें पडतांच ते निघून गेले.

गांवांतले लोक मळ्यांतील गडी माणसांनाहि फुसलावून नेतील व मळ्यांत आपल्याला अगदीं एकटें राहावयास भाग पाडतील अशी सुभद्राबाईंना देखील कल्पना नव्हती. पण प्रसंग आला खरा त्याला तोंड दिलेंच पाहिजे. रमेशला

पाजवून त्याला त्यांनीं भागू वन्संपाशीं ठेवलें. उजेड असेपर्यंत आपलें जरूरीपुरतें सामान त्यांनीं व ग्यानबानीं वाड्यांत योग्य त्या ठिकाणीं लावून घेतलें. दिवाबत्ती केली व जेवण ाच्या तयारीला त्या लागल्या.

गाड्या रिकाम्या होऊन त्यांचें भाडें चुकतें केल्यावर विसूभाऊंना आपला हा पहिला पराभव आहे असें वाटलें. ते एकटेच तणतणत गांवांत गेले. पाटील कुलकर्ण्यांची व आपल्या नेहमींच्या ओळखीच्या माणसांची त्यांनीं चौकशी केली. पाटील शेतावर गेले होते. कुळकर्णी लवकरच गांवांत येणार होते. त्यांच्या ओळखीपैकीं एका म्हाताऱ्याची त्यांना गांठ पडली. त्याच्यापाशीं भाऊंनीं तणतण करून पाहिलें. गांवच्या लोकांना त्यांनीं शिव्या हांसडल्या. मादरचोद, हरामजादे, बेइमानी, खाल्ल्या घरचे वासे मोजणारे, एक ना दोन. पण या शिव्या ऐकून घेण्यास गांवात होतें कोण ? तर्ई ग्यार दोन माणसें चावडीच्या आसपास होतीं, तीं कौतुकानें भाऊंच्या हावभावां-कडे पाहात होती. भाऊंच्या शिव्यांची दखल घेण्याचें त्यांना कांहीं कारण नव्हतें.

भाऊंना भेटल्या म्हाताऱ्यानें कानावर हात ठेवले.

'गांवाबाहेर आपण नाहीं, मी कितीहि सांगितलं तरी कुणीहि मळ्याकडं येणार नाहीं. अन् मीहि पन् त्यांना कोणत्या तोंडानं सांगणार ? लोक मला गांवांत राहूं देणार नाहींत.'

'पाटील गांवांत आल्यावर त्याला माझ्याकडं पाठीव.' असा निरोप त्यांनी त्या म्हाताऱ्यास हुकमी आवाजांत सांगितला.

'तुमचं तुम्ही पाहून घ्या. पाटलांना मी कोण काय सांगणार ?'

त्याचे हे शब्द ऐकून भाऊ तर आश्चर्यचकितच झाले. घर फिरलं म्हणजे त्याचे वासेहि फिरतात. एरवीं हा म्हातारा म्हणजे भाऊंचा शिरसगांवांतला जानी दोस्त, त्यांचा पित्त्या. कोणतें कुळ कसें, कोणाला कसें गंडवावें, याची माहिती सांगून भाऊंना हरघडी मदत करणारा त्यांच्या विश्वासांतला माणूस. भाऊ शिरसगांवला आले ते अशा आपल्या कांहीं पित्त्यांच्या भरंवशावरच आले होते. पण गांवच्या लोकांनीं या सावकारी पित्त्यांनाहि आपलेसे करून घेण्यांत यश मिळविलें होतें.

विसूभाऊखेरीज इतर कांहीं सावकारांकडे थोड्या जमिनी होत्या. पण त्यांच्या बाबतींत लक्ष द्यावयाचें नाहीं, त्यांचा खंड दिला किंवा त्या वाहतुकीला घेतल्या तरी त्याकडे लक्ष द्यायचें नाहीं, प्रथम विसूभाऊचा कांटा काढायचा असें त्यांनीं ठरविलें होतें. विसूभाऊंचे पित्ते म्हणून जे लोक समजले जात होते त्यांच्या जमीनीसुद्धां विसूभाऊंनीं हबकल्याच होत्या. पण भाऊतर्फे गुंडगिरी करण्याबद्दल त्यांना अधून मधून बक्षिसी मिळत होती, यामुळेंच ते विसूभाऊ गांवांत आले म्हणजे त्यांच्या आगे मागें राहून लाळघोटेपणा करीत होते. आतां सर्व गांवानेंच जेव्हां एकजूट होऊन भाऊ

सावकाराचा यंदाचा खंड द्यायचा नाहीं, पुढेंहि त्याच्या जमिनी करायच्या नाहींत, दुसरा कोणी या जमिनी करण्याकरतां आला तर त्याला त्या करूं द्यायच्या नाहींत व आपल्या गांवांतलें सावकाराचें अरिष्ट अजीबात कायमचें नष्ट करायचें असा निर्णय गांवानें घेतला त्या वेळीं भाऊंच्या या पित्त्यांनींहि गावांशीं मिळून राहण्याचें ठरविलें. गांवच्या या कामाला यश आलें तर आपल्या जमिनी आपल्याला कायमच्या मिळतीलच. गांवाशीं वांकडे होऊन काय फायदा ? विसूभाऊंनीं गांवच्या शिवारांतील ज्या जमिनी हबकल्या होत्या त्यांपैकीं बहुतेक सर्व जमिनी त्यांच्या मालकांकडेच खंडानें दिल्या होत्या. हा खंड कांहीं बाबतींत पैशाच्या रूपानें ठरला होता तर कांहीं शेतकरी धान्याच्या रूपानें हा खड भाऊंकडे भरीत होते. जमिनीची मालकी भाऊ सावकारांकडे गेली होती अन् पूर्वींचे मालक आपल्याच जमिनीवर उपरी कुळें बनून विसूभाऊ मागतील तो खंड भरून जमिनी पिकवीत होते. जमीन पिको, न पिको, भाऊंना त्याची पर्वा नसे. पिकें आलीं नाहींत, एकहि दाणा शेतकऱ्यांच्या हातीं लागला नाहीं असें दिसत असतांहि खंड वसूलीकरतां व त्याच्याच भरतीला कांहीं शेतकऱ्यांच्या बाबतींत व्याज वसूलीकरतां शेतकऱ्यांचीं घरचीं भांडीं भाऊ बाहेर काढीत होते. शेत आपल्या मालकीचें. शेतावर मेहनत आपणच करायची. अन् मळणी झाल्याबरोबर आपल्या श्रमाचें निम्में धान्य सावकाराच्या घरीं मुकाट्यानें नेऊन घातलें पाहिजे. कारण काय, तर अनेक लांड्यालबाड्या करून सावकारानें आपल्या जमिनी कबज्यांत घेतल्या म्हणून. असला हा व्यवहार आपण यापुढें चालू देणार नाहीं, निदान शिरसगांवला पछाडून राहिलेलें हें भूत तरी आपण गाडून टाकूं, असा निश्चय तेथील शेतकरी मालकांनीं केला होता.

हा निर्णय घेत असतांना दोन गोष्टींबद्दल गांवच्या चावडींत या वाटाघाटीकरतां जमलेल्या मंडळींत बराच वादविवाद झाला. एक गोष्ट म्हणजे गतसालचा खंड न देण्याबद्दलची व दुसरी सावकारावर संपूर्ण बहिष्कार घालण्याची. भाऊ सावकाराला वठणीवर आणायचें तर या दोन्ही गोष्टी केल्या पाहिजेत असा गांवातल्या तरुण शेतकऱ्यांचा चांगलाच आग्रह होता. वृद्ध मंडळी असल्या गोष्टी करून सावकाराला सतावूं नये व चिडवूं नये अशा मताचीं होतीं; पण तरुण मंडळीच्या आवेशापुढें व उत्साहापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. आपला लागू असलेला खंड आपण वसूल करूं शकत नाहीं याची प्रतीति सावकाराला आली पाहिजे अन् त्याचबरोबर आपण शिरसगांवांत राहूं शकत नाहीं असें त्याला दिसलें पाहिजे. प्रत्येक वेळीं बाहेरच्या गांवाहून गांवचा खंड वसूल करणें अशक्य आहे असेंहि त्याला दिसलें पाहिजे. खंड वसूल करण्याकरतां तो काय काय करतो, कोणाच्या घरांवर किती जप्त्या आणतो हें तरी पाहूं.

'जमीनीचा ठरलेला खंड न देणें हें बेकायदेशीर आहे.' भाऊच्या एका पित्त्यानें हळूच मध्येंच तोंड घालून हा कायद्याचा प्रश्न उपस्थित केला. त्यावेळीं चावडीत जमलेल्या मंडळींपैकीं एका तरुण शेतकऱ्यानें दिलेलें उत्तर फारच मार्मिक व मजेदार होतें.

'अनेक लांड्या लबाड्या व फसवेगिरी करून जमीनीवर मालकी प्रस्थापित करायची, याच जमिनी पुन्हा त्यांच्याच मूळ खऱ्या मालकांना खंडानें द्यावयाच्या, त्याला जमीनीवर राबायला लावायचें व शेतांतलें निम्मे उत्पन्न घरीं बसून खंड म्हणून हबकायचें अन् पीक न आलें तरी सुद्धां खंडाचे पैसे वसूल करून जमीनीच्या मालकाला भिकेला लावायचें. हा काय न्याय आहे ? कायदा न्यायाकरतां असतो ना ? मग जो कायदा खंड वसूलीला मदत करून शेतकऱ्याला देशोधडीला लावतो तो कायदा कसला ? बेकायदेशीर असं आम्हाला कांहीच करायचं नाहीं. जो कायदा न्यायाला धरून असेल तो पाळायला आम्ही तयार आहों. पण जो कायदा सावकाराचेंच हित पाहील, त्याच्या गुंडगिरीला मदत करील, आमच्या मूळच्या मालकीचा व श्रमाचा विचार लक्षांत घेणार नाहीं, असला अन्यायाला उचलून धरणारा कायदा पाळला तर तें न्यायाला धरून होणार नाहीं.'

'इतकं पाहिजे कशाला ? यंदां आम्ही खंड देणार नाहीं. मळणी करून धान्याची रास करून ठेवली आहे त्यांतला खंडाचा भाग सावकाराला स्वतः येऊन उचलून घेऊन जा म्हणावं.' दुसरा एक शेतकरी म्हणाला.

चावडींत जमलेल्या शेतकऱ्यांत झालेला तो वादविवाद. त्यांना भांडवलशाही सरकारच्या कायद्यांतील खाचाखोंचा काय माहीत ? सावकाराचा जुलूम त्यांना असह्य झाला होता व त्याचा कांटा काढून आपल्या गेलेल्या जमीनी पुन्हा आपल्या मालकीच्या करण्याकरतां खटपट करण्याचें त्यांनीं योजलें होतें. त्यांतील महत्वाची गोष्ट हीच होती कीं या बाबतींत या एका गांवची कां होईना, अभेद्य एकजूट बनली होती.

बापूंना पकडल्यामुळें शिरसगांवच्या शेतकऱ्यांच्या या योजनेला मुळींच धक्का लागला नाहीं. बाहेरच्या पुढाऱ्यांच्या सल्ल्याशिवाय व मदतीशिवाय या गांवच्या लोकांनीं ही चळवळ उभारण्याचें ठरविलें होतें. या करतां गांवांतलें तरुण वृद्ध मंडळीचें एक पंच मंडळ त्यांनीं निवडलें होतें व त्याच्या नेतृत्वाखालीं या चळवळीला त्यांनीं हात घातला होता.

विसूभाऊला खंड द्यायचा नाहीं, त्याला गांवांत राहूं द्यायचें नाहीं, त्याचें व्याज किंवा कर्ज फेडायचें नाहीं, त्याच्या जमीनी करायच्या नाहींत. सारांश विसूभाऊचा आपल्या गांवाशीं असलेला सर्व प्रकारचा संबंध तोडायचा एवढ्याच उद्देशानें

शिरसगांवच्या लोकांनीं आपल्या गांवापुरती अभेद्य एकजुटीची संघटना निर्माण केली होती.

विसूभाऊ नेहमींसारखे मळणीच्या दिवसांत आपल्या मळ्यांत आले कीं त्यांच्यावर पूर्ण बहिष्कार घालावयाचा हें या योजनेपैकीं पहिलें काम होते व त्या दृष्टीनें मळ्यांतील सर्व गड्या-माणसांनाहि आपणाकडे वळवून तो त्यांनीं ओस पाडला होता.

विसूभाऊ गावांत तणतणत गेले तसेच पुन्हां तणतणत परत मळ्यांत आले. विसूभाऊंना हा अनुभव अगदीं नवीन होता.

शिरसगांवच्या मळ्यांतील वाड्यांत विसूभाऊ आले कीं त्यांच्या भोवतीं मळ्यांतील गडीमाणसें ताबडतोब जमत असत. भाऊ गांवाला आले अशी बातमी लागतांच तेथील त्यांची परिचयाची व मिंधी असलेली मंडळी येत व भाऊंच्या सर्व सोयी लावून देण्याच्या कामीं या सर्व मंडळींत अहमहमिका लागे. पण आजचा प्रकार अगदींच निराळा. त्यांनीं नोकरीस ठेवलेलें गडी माणूस जेथें मळ्यांत राहिलें नाहीं तेथें इतर मंडळी कोठून येणार त्यांच्या समाचाराला ? शिवाय आणखी एक अशी पंचाईत झाली कीं त्यांच्या बरोबर आलेला ग्यानबाहि शिरसगांवचाच राहणारा होता. मळ्यांत आल्याबरोबर ग्यानबाहि आपल्याला सोडून जातो कीं काय अशी भीति विसूभाऊंना वाटली. पण तो अद्याप वाड्यांतच सुभद्राबाईंच्या हाताखालीं काम करीत होता. ग्यानबा शिरसगांवचा राहणारा खरा पण त्याचें ना गांवांत घर, ना शिवारांत शेत. यामुळें शिरसगावांत चाललेल्या या गडबडीच्या बाबतींत तो बेपर्वा होता. विसूभाऊंना तोच एक मोठा आधार वाटला.

भागू वन्सं मळ्यांतील वाड्यांत आली तेव्हांपासून तिच्या वटवटीला सारखी सुरवात झाली होती.

‘ गांवचे लोक विरुद्ध होते नि त्यांनीं बहिष्कार घालण्याचं ठरविलं होतं तर इथं भाऊ आलाच काय म्हणून?’ हें त्यांचें पालूपद ऐकून सुभद्राबाई कंटाळून गेल्या पण त्यांच्या तोंडाला लागायचें कोणी?

जेवणाची तयारी झाली. भाऊ जेवणाकरतां आंत आले त्या वेळीं भागूवन्संचें वरील पालूपद जेव्हां त्यांच्या कानीं पडलें त्या वेळीं अगोदरच त्रासून गेलेला त्यांचा जीव अधिकच त्रस्त झाला.

’ अग ए पांगळे, का स्वस्थ पडून राहते कां नाहीं का देऊं एक लाकूड टाळक्यांत ठेवून ? ’

‘ मार, मार, तुझ्या या मरत पडलेल्या बहिणीला मारून तरी टाक. मेल्यांनो, शरम कशी वाटत नाहीं. म्हणे, वटवट पुरी कर. माझं सगळं होतं नव्हतं हबकून

बसलांत, माझ्या संसाराचा सत्यानास केलात, भोगा आतां त्याचीं फळं. गांव सगळा विरुद्ध झाला ना! होणारच. पापाचा घडा केव्हां तरी भरणारच.'

'काय ग ए बोडके, करतीस का नाहीं तोंड बंद! पापाचा घडा! पापाचा घडा! दादा वारल्यानंतर तुला घरांत ठेवून घेतली म्हणून, नाहीं तर गेली असतीस कुठं भीक मागत.'

'अस्सं, अस्सं, पहा कशा चोराच्या उलट्या बोंबा.' भागूवन्सं ओरडली.

'वन्सं, वन्सं, काय आहे तुम्ही हें आरंभलं. वेळ काळ कांहीं आहे कां नाहीं?' सुभद्राबाई दरडावणीच्या स्वरांत म्हणाल्या!

'तुझ्या नवऱ्यालाच दाब. म्हणं बोडके, बोडके, माझंच खाऊन मला आणखी बोडकी म्हणतोय. मेल्याचं तळपट कां होत नाहीं?'

'नाहीं, तसं ती ऐकायची नाहीं.' विसूभाऊ ताटावरून उठले व जवळच सामानांत पडलेली धुण्याची काठी घेऊन ते आपल्या बहिणीकडे धांवले अन् तिच्या कपाळावर काठीचा घाव मारणार इतक्यांत सुभद्राबाईनीं मध्यें हात घातला व तो घाव मनगटावर झेलला. मनगटावर घाव पडतांच तेथल्या सर्व बांगड्या खळकन् पिचून गेल्या. कांचेचे कांहीं तुकडे मनगटांत रुतले व त्यांतून रक्तहि गळूं लागलें.

विसूभाऊंचा काठीचा घाव भर जोरानें त्यांच्या बहिणीच्या कपाळावर आदळला असता तर तिचा कपाळमोक्षच झाला असता. बहिण वांचली पण आपल्या या घावानें सुभद्राबाईच्या हातांतील सर्व बांगड्या पिचून गेलेल्या पहातांच त्यांच्या पापी मनाला धसकाच बसला.

भाऊंनीं हातांतली काठी दूर भिरकावून दिली. त्यांनीं सुभद्राबाईचा उजवा हात कोपरापाशीं धरला. वाडा चौसोपी होता. पण माजघरच्या बाजूच्या सोप्यावर एक पणती सुभद्राबाईनीं लावून ठेवली होती अन् तिथंच कोपऱ्यामध्यें भागूवन्संचें अंथरुण घातलें होतें. भाऊंनीं आपल्या पत्नीचा हात वर उचलून पाहिला. त्यांच्यावर तीन-चार ठिकाणीं काचांचे तुकडे मासांत रुतलेले त्यांना दिसले. त्यांनीं कोनाड्यांतल्या पणतीजवळ हात नेला व त्यांतील गोल कांचेचे तुकडे हळुवार हातानें त्यांनीं काढून टाकले. तुकडे निघतांच त्या ठिकाणीं रक्ताचे थेंब उभे राहिले व कांहीं क्षणांनीं ते त्यांच्या हातावर पसरूंहि लागले. सुभद्राबाईचें मनगट रक्तानं लाल झालेलें पाहून त्यांच्या तोंडून सहज उद्गार बाहेर पडले:

'काय झालं हें!'

'सोडावा माझा हात. टाकत्यें मी तो बांधून.' असें म्हणून सुभद्राबाईनीं आपला हात भाऊंच्या हातांतून सोडवून घेतला. उजव्या हातालाच हे ओरखडे होते.

ते धुण्याच्या कामीं, त्याला मलम लावण्याचे कामीं व शेवटी त्यावर पट्टी बांधण्याच्या कामीं भाऊंची मदत अर्थात्च त्यांना घ्यावी लागली.

हा सर्व प्रकार पाहून भागू वन्सं मात्र अगदीं चिप पडून राहिल्या. पती पत्नीचीं जेवणें झालीं. ग्यानबाहि जेवून मोकळा झाला. वन्संकरतां सुभद्राबाईंनी भाजणीचें थालीपीठ लावलें होतें. वन्संनींहि तें थोंडें खाल्लें.

पण सबंध मळयांत ग्यानबा, भाऊ, सुभद्राबाई, भागू वन्सं तर पांगळ्याच, या ईनमीन तीन माणसांशिवाय कोण होतें? भाऊ आले म्हणजे रात्रंदिवस मळा कसा गजबजलेला असायचा. विशेषतः हे खंडवसुलीचे दिवस. गाड्यांवर गाड्या धान्य या दिवसांत शेतकरी भाऊंच्याकडे आणून घालीत असत. एकदां हें धान्य येऊं लागलें म्हणजे भाऊंना तें मोजून घेतां घेतां उसंत पडत नव्हती. या धान्यांनीं वाड्याखालीं तयार केलेलीं बळदें भरून जात. चोराच्या भयापासून रक्षण होईल अशा सर्व प्रकारच्या तजविजी वाडा बांधतांना भाऊंनीं केल्या होत्या. शिवाय त्यांच्या नोकरींतील व गांवांतलीं माणसें वाड्यांत या दिवसांत निजाय बसायला राहात असत.

या वर्षी पाहावें तो सगळाच प्रकार निराळा. बापूंच्या सभांमुळें व पकडापकडीमुळें शिरसगांवला यायला विसूभाऊंना अगोदरच थोडा उशीर झाला होता. बापूंनीं उडवून दिलेल्या गडबडीमुळें प्रथम कांहींसा अडथळा झाला तरी एकदां शिरसगांवांत शिरल्याबरोबर आपल्या पित्त्यांच्या मदतीनें व पाटील तलाठ्याच्या सहाय्यानें यंत्रसारखीं कामें करून घेतां येतील अशी घमेंड भाऊंना वाटत होती. पण शिरसगांवच्या मळ्याच्या फाटकापाशीं आल्यापासून भाऊंना जो अनुभव आला तो अगदींच निराळा. गाड्यांतून सामान उतरून घ्यायला सुद्धां कोणी नाहीं ! गांवांत गेलें तर तेथें कोणी कुत्र्यानें सुद्धां त्यांना विचारलें नाहीं. पाटील तलाठ्यांनीं गुंगारा दिला. भाऊंना आपलासा वाटणारा एक म्हातारा भेटला. तोहि कसला वस्ताद. 'गांवाबाहेर आपण नाहीं' अशी सबब सांगून तो भाऊंबरोबर त्यांच्या मळयांत देखील आला नाहीं. संध्याकाळच्या वेळीं एकटें दुकटें गावांत फिरण्याचीहि भाऊंना भीति वाटूं लागली. भाऊंचा जीव मळयांत टांगला होता. सुभद्राबाई व रमेश मळयांत होतीं. परत येतांना कांहीं माणसें भाऊ आपल्या बरोबर आणतील असें सुभद्राबाईंना वाटलें होतें. पण तें फोल ठरलें. सबंध गांवानें सोडलें तरी काय झालें. पिढ्यान्पिढ्या सावकारांच्या घरीं कुळें म्हणून कामें केलीं. ज्यांच्यावर भाऊंनीं उपकार केले तीं माणसें भाऊंना अशीं एकाकी सोडणार नाहींत असें सुभद्राबाईनाहि वाटलें होतें. काल बदलला आहे. जुलमानें गांजलेल्या माणसांना आपल्या गुलामीची जाणीव झालेली आहे. पिढ्यान्पिढ्या चालत आलेली कुळें म्हणजे पिढ्यान्पिढ्या चालत आलेले गुलाम. आपल्या हाडींमासीं खिळलेल्या गुलामगिरीचा नाश करण्याकरतां आपण कटिबद्ध

झालें पाहिजे असें या गुलामांना वाटूं लागलें आहे. एवंच गांवांतलीं इतर कुळें तर राहिलींच पण त्यांचीं पिढीजाद कुळेंहि गांवानें सुरू केलेल्या स्वातंत्र्याच्या झगड्यांत सामील झालीं.

मळयांत आल्यानंतर एकटा ग्यानबा सगळीं कामें तरी कशीं करणार ? मळयांतलीं गुरें पाण्याविना तडफडत आहेत असें त्यानें पाहिलें. सकाळपासून हीं गुरें आपापल्या जागीं बांधून पडलेलीं होतीं. घरांतल्या कामाची थोडी व्यवस्था झाल्यावर त्यानें गुरांना पाणी पाजण्याची व्यवस्था केली. सर्व माणसें निघून गेलीं होतीं तरी मळयांतली तनसडीहि त्यांनीं इकडची तिकडे हलविली नव्हती. गांवांतल्या पंच मंडळींनीं त्यांना स्पष्टपणें बजावलें होतें कीं मळयांतला कोणताहि जिन्नस इकडचा तिकडे होतां कामा नये. मळयांत दोन बाजूला दोन मोठ्या विहिरी होत्या. वाड्या-जवळच्या विहिरीवर रहाटगाडगें बसविलें होतें. ग्यानबानें रेडा जोडून रहाटगाडगें सुरू केलें. सर्व गुरांना पाणी पाजलें. सुभद्राबाईनींहि घरांतलें पाणी भरून घेतलें. जेवणें झाल्यावर ग्यानबानें गुरांना चारा घातला. परत तो वाड्यांत आला. सर्व परिस्थिति ग्यानबाच्या लक्षांत आली होती; पण त्यानें या बाबत एक शब्दहि तोंडावाटे काढला नाहीं. जेवणें झाल्यावर त्यानें निजण्याची तयारी केली. सुभद्राबाईनीं आपल्या व भाऊंच्या निजण्याची व्यवस्था करण्याच्या बाबतींत ग्यानबाला मुळींसुद्धां तसदी दिली नाहीं.

भाऊच्या कुटुंबाला मळयांतली ही पहिली रात्र अत्यंत भयानक गेली. विशेष हें कीं कोणीहि हूं कां चूं केलें नाही. मामूली निजण्यासंबंधाच्या चार गोष्टी झाल्या पण चालू परिस्थितीबाबत कोणी कांहीं सुद्धां बोललें नाहीं. रमेश तर पोरच. नव्या जागेंत त्यानें थोडा आईला त्रास दिला. तो प्रथम कांहीं केल्या निजेचना. पण दादा-पुता करून सुभद्राबाईनीं त्याला आपल्या मांडीवरच थोपटून निजवलें.

रमेशशिवाय इतर माणसांना परिस्थितीची जाणीव झाली होती. पण आतांच या गोष्टीची चर्चा करण्यांत अर्थ नाहीं असेंच सर्वांनीं ठरविलेंसें दिसलें. भागूबन्सं कांहीं तरी बोलल्या व त्याचा परिणामहि बरा झाला नाहीं. सर्वांचींच मनें त्रस्त व नाजूक करून टाकणारी अशी ही गंभीर परिस्थिति होती. यावेळीं कोणी कांहीं न बोलणेंच बरें असें सर्वांना वाटणें साहजिक होतें.

वद्य पक्षाचे दिवस होते. द्वादशीला सकाळीं शुभमुहूत पाहून विसुभाऊ शिरस-गांवला आले होते. पण या पुढल्या रात्रीं एकापेक्षां एक गडद काळोखाच्या होत्या. गांवापासून दोन अडीच फर्लांगावर असलेल्या या मळयांत असल्या काळो-खाच्या रात्रीं भाऊच्या कुटुंबावर कोणीं हल्ला केला असता व भाऊंना तोडून टाकलें असतें तर कशास कांहीं दाद लागली नसती. या ठिकाणची एकेक रात्र म्हणजे

भाऊंना युगासारखी वाटली. पण अशा भयानक परिस्थितींतहि तीन दिवस व तीन रात्री गेल्या.

या अवकाशांत भाऊंनीं शिरसगांवांत दिवसा बरेच हेलपाटे घातले. अगदीं यदृच्छेनें त्यांना कोणी कुळें आढळलीं त्या वेळीं त्यांनीं खंडाची गोष्ट काढली.

'पंच मंडळींना विचारा.' अशी त्यांनीं भाऊंना सरळ उत्तरें दिली. पंच मंडळी कोण ? अगोदर भाऊंना त्यांचीं कोणाचीं नांवें समजलीं नाहींत. अत्यंत खटपटीनें त्यांना या मंडळीपैकीं एका दोघांचीं नांवें समजलीं. भाऊंनी त्यांना भेटण्याचा प्रयत्न केला. त्यांतील एक शेतकरी मळ्याजवळच्या एका कोपींत राहत होता. चवथ्या दिवशीं सकाळीं त्याची भेट झाली त्यावेळीं त्यानें या बाबत कानावर हात ठेवले. 'गांवाला विचारा,' तो म्हणाला.

'सावकार, आतां या झाडाला सोडा ना !' त्यानें शेवटीं सांगितलें. कितीतरी गर्भित व खवचट अर्थ या वाक्यांत सांठविला होता. गेले तीन दिवस भाऊंनीं अत्यंत काळजींत काढले खरे पण या दिवसांत अस्वाभाविक असें कांहीं घडलें नाहीं हें पाहून गांवचे लोक आपल्याला वचकून आहेत, भलतें सलतें करण्याची त्यांची ताकद नाहीं, असें भाऊंना वाटत होतें.

कोणीहि कुळ आपला खंड आणून द्यावयाला तयार नाहीं. गांवांतलें चिट्-पाखरूंहि इकडे फिरकत नाहीं. कोणत्या वेळीं काय प्रसंग येईल याचा नेम नाहीं. यापेक्षां सोनगांवला परत जाऊं असा सल्ला सुभद्राबाईनीं तीन चारदां देऊन पाहिला. भाऊंच्या पांगळ्या बहिणीनेंहि ह्या संकटांतून बचावून निघण्याबद्दल व सोनगांवला परत फिरण्याबद्दल गयावया करून सांगितलें. पण भाऊंवर त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. एकएक दिवस जाऊं लागला तसतसा भाऊंच्या ठिकाणचा सैतान जागा होऊं लागला. अन् आणखी कांहीं दिवस गेले तर गांवांत फूट पाडून व इतर कांहीं उपायांनीं आपल्या कुळांना वठणीवर आणण्याचा त्यांचा निश्चय बळावत चालला.

चौथे दिवशीं सकाळीं पंच मंडळीपैकीं एक शेतकरी त्यांना गर्भितार्थानें वरील शब्द टोंचून बोलला, ही गोष्ट सहजच त्यांच्या मानी मनाला सहन झाली नाहीं. या शेतकऱ्याला त्यांनीं या वेळीं उत्तर दिलें नाहीं. आपला पक्ष किती दुर्बल आहे ही गोष्ट त्यांच्या आतां पूर्ण लक्षांत आली होती. या प्रसंगानंतर भाऊंनीं तलाठ्याची गांठ घेतली. गेल्या तीन दिवसांत सोनगांवला निरोप पाठवावा म्हटलें तर त्यांना चिठ्ठी घेऊन जाण्याला एक मनुष्यहि मिळाला नाहीं. शिरसगांवच्या महारवाड्यांत दोन तीन कुटुंबें होतीं त्यांपैकींहि कोणी त्यांचें हें काम करण्यास तयार झाला नाहीं. तलाठी सोनगांवला कांहीं कामाकरतां निघाला होता. त्याच्याजवळ त्यांनीं एक लखोटा दिला व सोनगावांतील आपल्या कारकुनाजवळ देण्याबद्दल त्यांनीं त्याला अगदीं मिनतवारीनें

सांगितलें. सोनगांवास निघण्यापूर्वी तलाठी मळ्यांत आला त्या वेळीं भाऊंच्या व त्याच्या एकांतांत बऱ्याच गोष्टी झाल्या. या गुप्तगूमध्यें तलाठ्यानें आपल्याला या प्रसंगीं मदत केली तर ती फुकट जाणार नाहीं असेंहि आश्वासन त्यांनीं त्याला दिलें.

पण तलाठी निघून गेल्यावर आपण या बाबतींत थोडी घाईच नव्हे तर चूकहि केली असें त्यांना आढळून आलें. शिरसगांवला हा तलाठी येऊन वर्ष सहा महिनेच झाले होते. तलाठी थोडा स्वाभिमानी वृत्तीचा होता. आपल्याकडे आलेल्या शेतकऱ्यांचीं कामें तो कधींहि फुकट करून देत नसे हें खरें. पण अडल्या नडल्या शेतकऱ्याला उपयोगी पडण्याची माणुसकी त्याच्या ठिकाणीं केव्हां तरी दिसून येत असे. सावकारांचीं कामें तर तो कधींच फुकट करून द्यायचा नाहीं. याच्या पूर्वींचे तलाठी सावकारांच्या ताटाखालचीं मांजरें होतीं; पण हा तलाठी ताठर आहे असें पाहून त्याला आपला इंगा दाखविण्यासाठीं विसूभाऊंनी त्याच्याविरुद्ध रिपोर्ट पाठविण्याचा उद्योग केला होता. यामुळें हा तलाठी आपल्यावर नाराज आहे हें ठाऊक असतांहि आपण त्याच्यावर विश्वास ठेवला याबद्दल त्यांना पश्चात्ताप वाटला.

आपल्या कारकुनाला देण्याकरतां म्हणून एक लखोटा त्यांनीं तलाठ्याजवळ दिला होता त्यांत त्यांनीं दोन लेखी अर्ज ठेवले होते. मामलेदाराकडे केलेल्या अर्जात खंडवसुलीकरतां सरकारी कायदेशीर मदत त्यांनीं मागितली होती व फौजदाराला पाठविलेल्या अर्जात आपल्या संरक्षणाकरतां पोलिस मदत त्यांनीं मागितली होती. सर्व गांवकऱ्यांनीं आपल्यावर बहिष्कार घातला आहे, आपल्या राहत्या मळ्यांतील माणसें धाकदपटशा दाखवून लोकांनीं हाकून लाविलीं, आपल्या घरावर लोक केव्हां हल्ला करतील याचा नेम नाहीं, रोज लोक मळ्यांत येऊन खुनाच्या व मारामारीच्या धमक्या देतात, जाळपोळीच्याहि धमक्या देतात, माझं जीवित अत्यंत धोक्यांत आहे, एक ना दोन अनेक खोट्यानाट्या गोष्टी लिहून फौजदाराकडे मोठ्या मिनतवारीनें प्राणसंकटांत मदत करण्याबद्दल विनंति केली होती.

लखोटा कोरा होता. त्याच्यावर भाऊंनी पत्ता लिहिला नव्हता. भाऊंनी असें कां केलें होतें हें कळावयास मार्ग नाहीं, पण तलाठ्यानें या गोष्टीचा फायदा घेण्याचें ठरविलें. लखोटा फोडून आंत काय आहे हेंच ज्याला पाहावयाचें आहे तो मनुष्य लखोट्यावर पत्ता लिहिलेला असता तरी तेवढ्यानें अडचणींत पडला असता असें नाहीं. पण कोरा लखोटा तलाठ्याच्या सोयीला पडला. त्यानें आंतील सर्व कागदपत्र लक्षपूर्वक वाचलें.

शिरसगांवच्या लोकांनीं अर्जात लिहिल्याप्रमाणें कोणत्याच गोष्टी केल्या नसतांना पोलिसफोर्स मागवून गांवच्या लोकांत दहशत उत्पन्न करण्याची भाऊ सावकाराची

कारवाई पाहून तलाठ्याला साहजिकच संताप आला. त्यानें हें सर्व कागदपत्र लखोट्यांत पुन्हां कोंबलें. कारकुनाकडे त्यानें लखोटा पोंचविला. पण या एकतर्फी रिपोर्टाचा उपयोग काय ? गांवच्या पोलिस पाटलाकडून वरील प्रकारचे रिपोर्ट गेले पाहिजेत व या अर्जानंतर पोलिसतर्फे झालेल्या चौकशींत वरील गोष्टींत कांहीं तरी तथ्यांश आहे असें सिद्ध झालें पाहिजे हें त्याला माहित होतें.

जी गोष्ट तलाठ्याच्या लक्षांत आली तीच गोष्ट बरोबर भाऊंच्या लक्षांत आली तो सोनगांवकडे रवाना झाल्यावर. आपल्या माहितीला पाठिंबा मिळावा म्हणून पोलिस-पाटलाकडून तसा रिपोर्ट करविण्याकरतां ते त्याच दिवशीं संध्याकाळीं पाटलाच्या घरीं आले. भाऊ सावकार अन् पोलिस पाटलाच्या घरीं ! हा अपूर्व योग होता. आपल्या घरीं हुडकत सावकार आलेले पाहून पाटलाला फारसें आश्चर्य वाटलें नाहीं. भाऊवर तसाच बांका प्रसंग आला होता. यंदाचा खंड भाऊंच्या घरीं नेऊन घातला नाहीं, अन् खंडाचे पैसे तर कुणीच दिले नाहींत. हे पैसे एकदम कोणीच कधीं देत नाहीं. पण जवळचें धान्य तेवढ्या पैशापुरतें विकायचें असा कांहीं कुळांचा परिपाठ होता. तो तर कोणीच पाळला नाहीं. या बाबतींत आपण कांहींच मदत करूं शकत नाहीं मग भाऊ आपल्याकडे कां आले ?

पाटलांनीं भाऊ घरांत शिरल्यावर रामराम घातला. दरवाजाला लागून असलेल्या ओट्यावर भाऊ चढून गेले. लोकरीची चवाळी शिवून पाटलानें तयार केलेल्या बैठकी-वर ते जाऊन बसले. पाटलानें मुलाच्या नांवानें हांक मारून तक्क्या आणायला सांगितलें. काथ्या भरून तयार केलेला तक्या त्यांनीं भाऊंना टेकायला दिला. इतर कांहींच न विचारतां चहा सांगू का करायला असा पाटलानें प्रश्न केला. ‘ अन् अरे हो ! तुम्ही कसले आमच्याकडे चहा घेणार ! ’ असें आपण होऊनच त्यानें उत्तर दिलें.

‘ ते बापू गांवांत आले म्हणजे कुणाकडंहि जेवतात व कुणाकडंहि दूध चहा घेतात. ’ असें पाटलाचा मुलगा म्हणाला.

‘ त्यांची गोष्ट निराळी. ते चळवळ्ये लोक ...... ’

‘ त्यांना धर्म वगैरे कांहीं नाहीं, धर्मभ्रष्ट आहेत ते लोक. ’ असं पाटलाचें बोलणें संपायच्या आंतच भाऊंनीं उत्तर दिलें.

‘ बापू अन् धर्मभ्रष्ट ! त्यांच्या सारखा देवमाणूस नाहीं. गरीबाच्या कल्याणाकरतां आपलीं हाडं झिजविणारा धर्मभ्रष्ट ! ’

‘ धर्मभ्रष्ट नाही तर काय ? ना स्नान, ना संध्या, ना देवपूजा, ना तपजप ! ’ भाऊ म्हणाले.

भाऊंचें हें धर्माचें पुराण ऐकल्याबरोबर पाटलाचा तरुण मुलगा जोरानें हंसला.

' स्नान संध्या, देवपूजा नि नामजप करणारे ब्राह्मण बगळे पुष्कळ पाहिले आहेत. इकडे माळा ओढायच्या अन् तिकडे गरीबांचे गळे कापायचे. '

' दादू पुरे कर आतां हा वाद. भाऊ सावकार आपल्या घरीं कशाला येतात? कधीं नव्हे ते आले अन् हा वाद! भाऊ तुम्ही इकडे कसे आलां तें तर सांगाल. '

' हें पहा पाटील, तुमच्याशीं, अगदीं तुमच्याशींच, मला कांहीं बोलायचं आहे.'

' मग काय, दादूला बाजूला जायला सांगूं म्हणतां? '

भाऊंनीं मानेने होकार दिला. पाटलानें आपल्या मुलाला आंतल्या बाजूला जायला सांगितलें.

दादू दृष्टीआड झाला खरा पण हा म्हातारा सावकार आपल्या बापाबरोबर इतकें गुपित काय बोलणार था जिज्ञासेनें त्याला बेचैन केलें. तो आंतल्या खोलींत दृष्टीच्या टप्प्याबाहेर गेला पण ऐकण्याच्या टप्प्याबाहेर गेला नाहीं. या दोन्ही खोल्यांच्या मध्यें वरच्या बाजूला असलेल्या खिडकीच्या खालीं उभा राहिला. भाऊंच्या लक्षांत ही गोष्ट येणें शक्य नव्हतें.

' भाऊ, इतकं गुपित असं तुमचं काय काम आहे? ' दादू आंत बाजूला गेल्यावर पाटलानें पृच्छा केली.

बाळा पाटलाला आपली गुप्त गोष्ट सांगण्यापूर्वी पाटलाच्या व आपल्या घराण्याचा कसा पिढीजाद स्नेह आहे, आपल्या वडिलांनीं बाळा पाटलाच्या घराण्यांतच पाटीलकी राहावी म्हणून कशी मदत केली, व आपणहि पाटलाचा शब्द कधीं कसा खालीं पडूं दिला नाहीं हें भाऊंनीं सांगितलें.

भाऊ सावकार इतकी ज्या अर्थीं प्रस्तावना करीत आहेत त्या अर्थी आज कांहीं विशेष काम आपल्या हातून भाऊला साधून घ्यावयाचें आहे हें बाळा पाटलाच्या चांगलें लक्षांत आलें होतें. अन् सर्व प्रस्तावना शांतपणें ऐकून घेतल्यावर भाऊंच्या घराण्याकरतां आपण काय करावें अशी बाळा पाटलानें पृच्छा केली. पाटलाच्या आवाजांतील रुक्षपणा पाहून भाऊंना बरें वाटलें नाहीं. पण कांहींहि करून पाटलाला आपल्या कारस्थानांत सामील करण्याचें भाऊंनीं ठरविलें.

गांवच्या लोकांना ताळ्यावर आणायचें तर त्यांच्यांत फूट पाडली पाहिजे व त्यांच्या मनांत दहशतहि उत्पन्न केली पाहिजे. बाळा पाटलांच्या साह्यानें आपण या दोन्ही गोष्टी करूं शकूं असें भाऊंना वाटलें. पाटील वश झाल्यावर काय होणार नाहीं? पाटील गांवचा राजा. या राजाला हातांत घेतल्यावर गावांतली इकडची दुनिया तिकडे करून टाकतां येईल. त्यानीं बाळा पाटलांच्या वडिलांची स्तुति केली

त्याप्रमाणें बाळा पाटलाच्या कर्तबगारीचेंहि त्यांनीं खूप वर्णन केलें व आपलें काम झाल्यास बाळा पाटलाची मदत फुकट जाणार नाहीं व याबद्दल त्याला योग्य मोबदला मिळाल्याशिवाय राहणार नाहीं असेंहि ते बोलून गेले. तलाठ्याबरोबर त्यांनीं गुपित केलें त्यावेळीं त्याच्याबद्दल त्यानां थोडा संशय आला होता पण बाळा पाटलाच्या बाबतींत तसा संशय घेण्याचें कांहींहि कारण नाहीं अशी भाऊंनीं आपली समजूत करून घेतली. शेवटीं सोनगांवच्या मामलेदाराला व फौजदाराला आपण अर्ज पाठविले असून त्यांत शिरसगांवचीं कुळें आपल्याला कशा नाना प्रकारच्या जाळपोळीच्या व खुनाच्या धमक्या देत आहेत हें कळविलें आहे तेव्हां बाळा पाटलांनीं तशाच प्रकारचा रिपोर्ट करावा व पोलिसची मदत मिळवून देण्याच्या कामीं मदत करावी अशी त्यांनीं त्यास सूचना केली.

'सावकार, गेले चार पांच दिवस मी पाहतोंय, गांवचा एकहि मनुष्य तुमच्या मळ्याकडे फिरकत सुद्धां नाहीं, मग असा खोटा रिपोर्ट मी कसा करूं ?'

'मग तुमची मदत ती काय ?'

'काय बी म्हणा, असलं खोटं काम मी करणार नाहीं अन् गांवचा कोणताहि माणूस तुमच्या वाटेस जात नसतांना तर असला रिपोर्ट मी मुळींच करणार नाहीं.'

'हें पहा पाटील, आजच्या आणीबाणीच्या प्रसंगीं तुम्ही मला मदत केली पाहिजे.' असें म्हणतां म्हणतां विसूभाऊंनीं आपल्या खिशांतील नोटांचें पुडकें बाहेर काढलें. 'हा फक्त पहिला हप्ता समजा.' असेंहि ते बोलून गेले.

दहा दहा रुपयांचें तें पुडकें पाहून बाळा पाटलाचें मन चलबिचल झालें. भाऊच्या विनवणीला मान द्यावा असें त्याच्या मनांत येऊं लागलें. बाळा पाटील यावर कांहीं बोलणार इतक्यांत मागच्या खोलींतून त्याचा मुलगा दादू झपाट्यानें बाहेर आला. त्यानें त्या नोटांच्या पुडक्यावर झडप घातली व सावकाराच्या हातांतून तो तें हिसकावून घेऊं लागला.

'दादू, दादू, हें काय, सोड तें पुडकं.' बाळा पाटील ओरडला.

'नाहीं बाबा, तुमच्या हातून हें पाप मी होऊं देणार नाहीं.' हिसकाहिसकी चाललीच होती.

'भाऊ सावकार तुमच्याशीं काय बोलले हें सर्व मी ऐकलं आहे.' भाऊंचा चेहरा पांढरा फटफटीत झाला.

दादूनें भाऊंच्या हातून पुडकें हिसकावून घेऊन त्यांना असा जोराचा धक्का दिला कीं, भाऊ मागे धडपडत जाऊन भिंतीवर आदळले व "मेलो मेलो" असा त्यांनीं आरडा ओरडा केला. दादूनें दिलेल्या धक्क्यामुळें भाऊ नुसते भिंतीवर आदळले

व ढुंगणावर आपटून खाली बसले. इतका आरडा ओरडा करण्याइतकी त्याना कांहीं दुखापत झाली नव्हती.

"जाळा त्या नोटा, या कागदांच्या चिटोऱ्याकरतां माझ्या बाबांना खोटा रिपोर्ट करायला सांगतां काय ?"

असें म्हणून दादूनें त्या नोटा जोरानें हवेंत भिरकावून दिल्या. अन् त्या इतस्ततः उडून अंगणांत चोहोंकडे उडत जाऊन पडताहेत तोंच दरवाजांतून दोन पोलिस व त्याच्या बरोबर गांवातली शिष्ट मंडळी व इतर कांहीं लोक पाटलाच्या वाड्यांत दाखल झाली. वाऱ्यानें हवेंत उडून इकडे तिकडे पडत असलेल्या त्या नोटा पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटलें. या मंडळीपैकीं कांहींनीं त्या नोटा उचलल्या.

'काय आहे काय हें प्रकरण बाळा पाटील!' पोलिसांपैकीं एकानें साश्चर्य उद्गार काढले. पाटलांना ही पृच्छा करणारे हवालदार होते, व दुसरा साधा कानस्टेबल होता.

या सर्व नोटा हवालदाराजवळ जमा झाल्या. त्यानें त्या मोजून पाहिल्या. दहा-दहाच्या पंचवीस नोटा होत्या त्या.

'सावकारांनाच विचारा, हें काय प्रकरण आहे तें!' बाळा पाटलाऐवजी त्यांच्या मुलानेंच उत्तर दिलें.

हवालदारांची दृष्टि विसूभाऊंकडे वळली. ते आतां अंग सावरून उभे होते. हवालदारांनीं त्यांच्याकडे खालपासून निरखून पाहिलें. त्यांच्या अंगाला कोठें दुखापत वगैरे झालेली नव्हती. दोन्ही कोपरांना कोटावर माती लागलेली होती त्याचप्रमाणें पाठीचा कांहीं भागहि मातीनें भरून गेला होता.

हवालदार भाऊकडे गेले. पुष्कळ दिवसांचे त्यांचे ते दोस्त होते. त्यांनीं भाऊंना हाताशीं धरलें व त्यांना तक्क्याशी आणून बसविलें व त्यांना केलेल्या पहिल्या प्रश्नाच्या उत्तराची वाट न पाहातांच हवालदारांनीं आपल्या बरोबरच्या शिपायाच्या थैलींतून अर्जाचे कागद बाहेर काढले व फौजदारांना केलेला अर्ज हातांत घेऊन गांवच्या लोकांनीं त्यांना केव्हा धमक्या दिल्या त्या ठिकाणीं कोणकोण होते त्यांचीं नांवें सांगा असा त्यांनीं दुसरा प्रश्न केला. तसेंच पाटलाकडे वळून गांवांत इतकी गडबड चालू असतां, सावकारांना लोक खुनाच्या व जाळपोळीच्या धमक्या देत असतां मुख्य ठाण्याकडे रिपोर्ट कसा केला नाहीं असा त्यांनीं बाळा पाटालांनाहि सवाल केला.

'सावकारांना विचारा असें मी पहिल्यांदा म्हटलें ना तसेंच । सर्व प्रश्न चा जाबहि सावकारांनाच विचारा.' दादू पुन्हां खड्या आवाजांत म्हणाला.

'बाळा पाटील, हा कोण तुमचा मुलगा वाटतं. बराच मोठा झालाय कीं,' हवालदार मध्येच म्हणाले. 'सावकारांना काय विचारायचंय. गांवांतल्या गडबडीचा रिपोर्ट पाटलानं करायचा असतो सावकारानं करायचा नसतो.'

'म्हणूनच तर मी सांगतो कीं, ही गोष्ट सावकाराला विचारा. कारण बाबांनीं तुम्हांला कांहीं कळवायच्या आधीं सावकारांनीं तुमच्याकडं अर्ज केले आहेत ना. मग त्या अर्जातल्या गोष्टी कितपत खऱ्या आहेत हें प्रथम सावकारांना विचारा व मग त्याचें उत्तर बाबा देतील.'

'बाळा पाटील, तुम्ही आपल्या तर्फे चागला वकील उभा केला आहेत बुवा! बरं असं आहे तर विसूभाऊ तुम्ही सांगा ना हें सर्व प्रकरण काय आहे तें.' हवालदारानें भाऊंना सवाल केला.

विसूभाऊ हताश होऊन तक्क्याला टेकून बसले होते. त्यांच्या चेहऱ्यावरचा रुबाब अजीबात नष्ट झाला होता. इतक्या सर्व लोकांदेखत बेअब्रू होण्याचा प्रसंग त्यांच्यावर कधीं आला नव्हता. हवालदारांच्या सवालाला ते काय जाब देणार? त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडेना.

'विसूभाऊ बोलत कां नाहीं?' सांगा ना हें सर्व काय प्रकरण आहे तें?'

'भाऊ सावकार नाहीं बोलायचे. मीच आतां या सर्व भानगडी सांगतो.' असें म्हणून दादूनें विसूभाऊ बाळा पाटलाच्या घरीं आल्यापासून ते बाहेरून आलेल्या लोकांनीं नोटा वेचेपर्यंतची सर्व हकीकत इत्थंभूत सांगितली व 'भाऊ सावकार, यात एकहि शब्द खोटा असल्यास सांगा' असें त्यानें उलट आव्हान केलें.

'काय विसूभाऊ हें सर्व खरें का?' भाऊ कांहींच बोलत नाहींत असें पाहून 'काय तुम्हाला म्हतारचळ तर लागला नाहीं?' हवालदार उद्गारले.

ही हकीकत सांगितल्यावर त्यानें गेल्या आठवड्यांत गांवांत झालेल्या गडबडी संबंधानेंही माहिती सांगितली व 'भाऊ मळ्यांत उतरल्यापासून गांवांतील चिटपांखरूहि तिकडे फिरकलें नाहीं. मग धमक्या देण्याचें बाजूलाच राहिलें.' तो आवेशानें म्हणाला.

'काय भाऊ तुम्ही बोलत कां नाहीं?' हवालदारानें भाऊंना पुन्हा खडसावलें. 'याचा जाब तुम्ही नीट देणार नसला तर तुमच्यावर कोणते गुन्हे शाबीत होत आहेत हें लक्षांत आहे ना?'

विसूभाऊंची जणूं दांतखिळीच बसली होती. दादूनें सांगितलेला शब्दन् शब्द खरा होता.

विसूभाऊंची साठी उलटून गेली होती. एवढ्या मोठ्या आयुष्यांत त्यांनीं अनेक उलाढाली केल्या. खोटे कागद केले, खोट्या सह्या केल्या, खोटे रिपोर्ट केले, सरकारी लोकांना पैसे चारणें हा तर त्यांचा नेहमींचाच उद्योग. सावकारीचा धंदाच मुळीं असत्यावर उभारलेला व या धंद्यासाठीं त्यांनीं काय काय केलें नाहीं. बाया बापड्या, गरीब गुरीब, लहान सान, अडाणी भाबडी त्यांच्या हातांत जीं जीं सावजें सांपडलीं

त्या सर्वांना त्यांनीं आत्मसात करून टाकलें. पण या खेपेला मात्र ते अगदीं प्रत्यक्ष गुन्हा करतांना हातोहात सांपडले. या परिस्थितींत विसूभाऊ बोलणार काय ? त्यांचें मौन म्हणजे त्यांनी केलेल्या गुन्ह्याची कबुलीच होती.

दिवस मावळत चालला होता. बैल, गाईवासरें, शेळ्या रानांतून येऊन गावांत शिरू लागल्या होत्या. गांवच्या वेशीजवळचें सर्व वातावरण धुळीनें व्याप्त झालें होतें. बाळा पाटलाच्या घरीं भाऊ केव्हांचे गेले आहेत व त्या ठिकाणीं सोनगांवचे पोलिसहि आले आहेत ही बातमी गावांत व गावांबाहेरच्या कोप्यांतून वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळें जो तो पाटलाच्या वाड्याकडे धांव घेत होता.

वाड्यांत भाऊंच्या या ताज्या गुन्ह्यांची जणू चौकशीच चालली होती. भाऊंच्या तोंडून चकार शब्दहि बाहेर पडत नव्हता. या वेळीं भाऊंनीं धैर्यानें पुढें येऊन पाटलाची व गावकऱ्यांची माफी मागितली असती तर या प्रकरणाला निराळेंच वळण लागलें असतें. सुंभ जळला तरी पीळ जळत नाहीं. भाऊ अन् माफी. अगदींच अशक्य. माफी न मागतां आपला हट्ट चालविण्याकरतां ते आकाश पातळ एक करतील, पण या प्रसंगांत त्यांना कांहींच करता येण्याजोगें नव्हतें. दादूनें हवालदारासमोर दिलेली जबानी शब्दन् शब्द खरी होती व पाटलाला देऊ केलेला लांच नोटांच्या रूपानें हवालदारापुढें हजर होता.

' भाऊ, तुम्हाला या बाबतींत कांहीं सांगायचें आहे का ?' असें हवालदारांनीं भाऊला आणखी एकदां विचारून पाहिलें. विसुभाऊंनीं आतापर्यंतच्या आयुष्यांत कोर्टापुढें उभे राहून अनेक वेळां गुन्हा नाकबूल केला होता व ईश्वराची शपथ घेऊन खोट्या साक्षीहि दिल्या होत्या. पण बाळा पाटलाच्या घरीं जमलेल्या खेड्यांतील जनतेपुढें असला खोटा शब्द उच्चारण्याची त्यांची छाती झाली नाहीं. ते जागच्या जागीं तसेच स्तब्ध बसून राहिले.

' मग बाळा पाटील, काढा कागद. मला या सर्व प्रकरणाचा पंचनामा केलाच पाहिजे. गांवचा तलाठी कुठं आहे ? दादू, तुला लिहितां येतं ना ? मी सांगतों तें लिही. ' हवालदारांनीं याप्रमाणें पंचनाम्याची तयारी केली इतक्यांत गांवचे तलाठीहि पाटलाच्या वाड्यांत दाखल झाले.

आतां मात्र विसूभाऊंच्या अंगांतील सैतान जागा झाला. ते आपल्या जागेवरून ताडकन् उठले. त्यांनीं प्रथम वांकून हवालदारापुढें पडलेल्या नोटांच्या ढिगावर हात घातला. पोलिस व दादू हवालदाराजवळच होते. दोघांनीं भाऊंना वरच्यावर उचलून धरलें. भाऊंना तें सहन झालें नाहीं. त्यांनीं दोघांना जोराने झिडकारलें. त्यांच्या हातांतून सुटल्यावर हे छडी फिरवीत वाड्याबाहेर पडूं लागले.

' करा करा पंचनामा अन घाला तो...'

'विसूभाऊ तुम्ही कोणापुढं हे शब्द उच्चारतां हें माहीत आहे ना?' हवालदार अधिकारवाणीनं म्हणाले.

'हो हो माहीत आहे.' असें दिमाखांत म्हणून ते पुढें दरवाजाकडे जाऊं लागले.

'पण भाऊ तुम्हीं चाललांत कुठं? तुम्हाला इथून जातां यायचं नाहीं. हा पंचनामा लिहून संपेपर्यंत तुम्हाला इथं थांबावं लागेल अन् पुढं सुद्धां आमचे नजरेखालींच राहावें लागेल.'

'तुम्ही मला पकडू शकत नाहीं. हा मी चाललो.'

'हें पहा भाऊ, उगाच तुम्ही आपली इतक्या लोकांत शोभा करून घेऊं नका. मुकाट्यानं आपल्या मघाच्या जागेवर स्वस्थ बसा पाहूं. नाहीं तर ......'

हवालदारांच्या या शब्दांत अर्थात् जरब होती व तिनं भाऊंनाहि ताबडतोब नरम आणलं.

'करा करा तुमच्या अधिकारांत आहे तें करून घ्या. पुढें मी पाहून घेईन.'

हवालदाराचा चेहरा सस्मित झाला.

'पुढे काय पहायचं तें पहा पण आतां तुम्ही आमच्या हातांत आहां हें विसरूं नका.' हवालदार मिस्किलपणे बोलला. हवालदाराचा एक एक शब्द काळजाला झोंबतो आहे असें विसूभाऊंना वाटलें. पण त्यांचा नाइलाज झाला. ते परत फिरले व पुन्हा तक्याशीं जाऊन बसले.

त्या वेळीं वाड्यांत जमलेल्या लोकांमध्ये मोठाच हशा पिकला. या हशानं भाऊ अधिकच संतापले. पण निर्वीर्य असा हा संताप होता.

पंचनामा लिहिला गेला. दादूची जबानी त्यांत मुख्यत्वानं सामील करण्यांत आली. दहा दहांच्या पंचवीस नोटा एका पिशवीत बांधून तीवर सील करण्यांत आलें. विसूभाऊ हा सर्व प्रकार मुकाट्यानं पाहात होते.

पंचनाम्याचें काम आटोपलं त्यावर पंचांच्या सह्या आंगठे घेण्यांत आले. विसूभाऊ जावयास निघाले. हवालदारांनीं त्यांना पुन्हा बसवून घेतलें.

'धमक्याची गोष्ट राहूं दे. हे खंडबंदीचें प्रकरण काय आहे.' हवालदारांनीं बाळा पाटलास विचारलें.

पण बाळा पाटील बोलू लागण्यापूर्वींच पुन्हा दादूनें या बाबतींतही घडलेल्या हकीकती सांगण्यास सुरवात केली.'

'बाळा पाटील तुम्ही आपल्या या मुलाला गप्प बसवा पाहूं. मी तुम्हाला विचारतो आहे तुम्ही त्याचें उत्तर द्या.'

‘ मी बोललों काय किंवा दादू बोलला काय एकच आहे. तो खरं आहे तेंच सांगेल. शिवाय माझ्या पेक्षां चांगल्या तऱ्हेनें सांगेल.’

‘ बरं दादूचे म्हणणं मागून ऐकून घेऊं पण त्याच्याहि अगोदर विसूभाऊ या बाबतींत तरी तुम्ही कांहीं बोलाल कीं नाहीं.’ हवालदारांनी विसूभाऊंना मागे कांहीं घडलेंच नाहीं अशा भावनेनेंच जणूं काय विचारलें.

‘ या बाबतींतहि मला कांही सांगायचं नाहीं. मामलेदारसाहेबांकडे मी अर्ज केला आहे. माझी कुळं मी पाहून घेईन.’

‘ त्यांना काय विचारतां ? ’ दादूनेंच बोलण्यास प्रारंभ केला. ‘ आजवर अनेक लांड्यालबाड्या करून विसूभाऊंनीं शिरसगांवच्या जमिनी मिळविल्या. गांवच्या सबंध आवारांत शेतकरी मालक असा राहिला नाहीं. सर्व शेतकरी मालक आपल्याच जमीनीवर उपरी कुळें बनलीं आहेत. या भाऊ सावकारांनीं शेतकऱ्यांना असे गुलाम करून सोडलें आहे. शेतकऱ्यांचें म्हणणें एवढंच कीं आतापर्यंत अम्हाला तोडतोडून खाल्लं. आतां आमच्या जमीनी आम्हाला परत द्या. सावकारीचे शिरगांवासंबंधाचे कागद फाडून टाका. मालक म्हणून स्वतंत्रपणानें आम्हाला गावांत नांदूं द्या. ’

‘ हवालदार साहेब, आतां माझं इथं कांहीं काम नाहीं. इथल्या गावकऱ्यांनीं खंड देण्याचं बंद केलं आहे. अन् पुढंहि माझ्या जमीनी पड पाडण्याचा त्यांनीं विचार केला आहे. लोकांची माझी जुंपलीच आहे. पाहून घेईन बेट्यांना ! फारच शेफारले आहेत. ’ असें म्हणून ते जागेवरून उठले व दरवाजाकडे जाऊं लागले.

हवालदारानें त्याना अडथळा केला नाहीं. लोकांची झिमड वाड्यांत झाली होती.

‘ त्यांना वाट द्या, वाट द्या, ’ हवालदारानें लोकांना ओरडून सांगितलें.

‘ शेफारलंय कोण ? अन् पाहून घेणार म्हणे गावकऱ्यांचं ! ’ विसूभाऊंच्या कानावर हे शब्द पडले.

‘ हो, हो, पाहून घेईन अन् सव्याज पाहून घेईन. फार माजलांत नाहीं का ? ’ भाऊ आवेशांत येऊन म्हणाले.

‘ कां रे थेरड्या माजलंय कोण तूं कां आम्ही ? फौजदाराला खोटं खोटं कळवून पोलिसला इथं आणणार होतास नाहीं का ? ’ गर्दींतील एक शेतकरी म्हणाला.

विसूभाऊंना आतांपर्यंत तोंडावर एकेरी शब्दांत असें कोणी हटकलें नव्हतें. इतका वेळ हवालदारानें त्यांच्या अब्रूच्या धिंडवडे उडविले ते त्यांना चालले. पण एक सामान्य शेतकरी त्यांना असें तोंड टाकून बोलतो म्हणजे काय ?

विसूभाऊंचा आतापर्यंत तुंबून राहिलेला संताप बाहेर पडला. आपल्या हातांतील काठी उगारून ते त्या शेतकऱ्यावर धांवले.

'थेरड्या, थेरड्या, कुणाला म्हणतोस? एकेकाची हड्डी लोळवीन. अन् तुरुंगांत दाणे पिसायला लावीन तेव्हां समजेल.'

विसूभाऊंचें हें बोलणें संपतें न संपतें इतक्यांत एक म्हातारा शेतकरी गर्दीतून बाहेर आला. त्यानें विसूभाऊंच्या उगारलेल्या काठीला हात घातला.

'आमची हड्डी लोळवायचं बाजूलाच राहिलं. शहाणपणा करा अन् इथून मुकाट्यानं बाहेर पडा नाहींतर तुमचीच चांदी उडल्याशिवाय राहाणार नाहीं. आम्हाला कुणालाही तुमच्या वाटेस जायचं नाहीं. पोलिसांना आणा कुणालाबी आणा. खंडांचा एक दाणा किंवा एक पैसाहि तुम्हाला या गांवांत आतां मिळायचा नाहीं समजलात.'

'पाहिलं पाहिलं का हवालदार साहेब हें काय चाललंय तें.' भाऊनी अकरताळ्या स्वरांत हवालदाराला हटकलें.

'पाहिलं, भाऊ, चांगलं पाहिलं. आतां तुम्ही इथं राहूं नका. तुमच्या अंगाला कोणी हात लावणार नाहीं. जा तुम्हीं आतां आपल्या बंगल्यावर जा.'

हवालदाराचें हें बोलणें ऐकल्याबरोबर भाऊंना लोकांनीं वाट करून दिली, व तेहि यापुढें कांहीं न बोलता वाड्यांतून बाहेर पडले. 'सगळें जगच आपल्या विरुद्ध उठलें आहे' असें त्यांना वाटलें.

पाटलाच्या घरांतून भाऊ बाहेर पडले त्याबरोबर तेथें जमलेल्या लोकांचीहि पांगापांग होऊं लागली होती. या मंडळींतूनच भाऊ मळ्याकडे जाऊं लागले. आजूबाजूला पाहात भीतभीतच भाऊ चालले पण कोणीहि त्यांच्या वाटेस गेलें नाहीं. भाऊंनी तालुक्याहून पोलीस मागविण्याकरतां पाटलास पैसे देऊं केले, ते त्यानें घेतले नाहींत. लाच देण्याबद्दल भाऊवर आता खटला होणार आहे अशी कुजबुज मात्र भाऊंच्या कानीं आली. त्यांच्या हळव्या झालेल्या मनाला एवढी गोष्ट बस्स होती.

विसूभाऊ वाड्यांत आले ते अगदी गळूनच आले.

पण त्यांना इथें कांहीं निराळाच प्रकार दिसला. त्यांच्या बरोबर आलेला ग्यानबा त्यांना कोठें दिसला नाहीं. भाऊ तर घाबरूनच गेले. ग्यानबाला दुपारी थंडी वाजून आली असून त्याला माजघरांत निवाऱ्याला निजविलें आहे असं सुभद्राबाईनीं त्यांना सांगितलें अन् त्याबरोबरच ग्यानबाला त्याच्या नातेवाईकाकडे पोचविण्याबद्दलहि त्यांनीं भाऊंना सुचविलें. ग्यानबा तापानें फणफणला होता. मधूनमधून तो बडबडहि करीत होता. आपल्या माणसांकडे गावांत पोचवावें ही त्याची मुख्य बडबड होती.

भागूवन्संनीं तर आज दुपारपासून अन्नच खायचें सोडून दिलें होतें. सोनगांवला जाण्याचा हट्ट त्यांनीं धरला होता व तेथें गेल्याशिवाय आपण अन्नाला शिवणार नाहीं अशी शपथ त्यांनीं घेतली होती.

ग्यानबा आजारी पडल्यामुळें सुभद्राबाईंनाच आज घरचीं व दारचीं कामें करावीं

लागलीं. रहाटगाडगें सुरूं करून बैलांना पाणी त्यांनीं कसें तरी पाजलें. सगळीं जनावरें सकाळपासून मोकळींच होतीं. गेल्या आठवडाभर जवळजवळ सबंध मळा अगदीं ओसाड पडला होता. जेथें गुरांना पाणी मिळण्याची मुष्कील तेथें पिकांना कोण देणार ? उसाला पाणी देता आलें नाहीं म्हणून भाऊंचा जीव कासावीस होत होता. पण ऊंसच काय सर्वच पिकें आतां जळून खाक होणार या विचारानें भाऊंच्याहि पोटांत आग पडली होती.

ग्यानबा पायावर उभा होता तोपर्यंत तो घरचीं सर्वच कामें संभाळीत होता व सुभद्राबाईंना पदोपदीं मदत करीत होता. गांवातल्या लोकांनीं कडक बहिष्कार घातला होता तरी त्यानें चोरून मारून गेले तीन दिवस पीठ दळून आणलें होतें. सुभद्राबाई कामाला धडधाकट होत्या पण सर्वच कामें त्या एकट्या कशा रेटूं शकणार ? आतां तर ग्यानबा आजारी झाला त्याची शुश्रूषा व पथ्य-पाणी केलें पाहिजे. भाऊंची प्रकृति तोळामासा. त्यांनीं जर का अंथरुण धरलें तर मग विचारायलाच नको.

शिरसगांवला आल्यानंतरच्या या दिवसांत भाऊसाहेबांच्या कुटुंबाची अगदीं दैना उडून गेली. दिवसा-ढवळ्या मळ्यांत त्यांच्या वाड्यावर कोणी हल्ला केला व लूटमार करून त्यांना नागविलें तर कोणाला कांहींसुद्धां पत्ता लागायचा नाहीं ही कल्पना मनांत आली कीं भाऊंच्या हृदयाला कांपरें भरून जाई.

ग्यानबा आजारी. त्याच्या नातेवाइकाकडे त्याला पोंचविणें जरूरच होते. भागू वन्संचा हट्ट. ती कांहीं केल्या ऐकायची नाहीं. सुभद्राबाईवर सर्वच कामाचा भार पडल्यामुळें रमेशचीहि आबाळ होऊं लागली. चुलीला जळण लागलें तर ग्यानबानें लांच दोन ओंडके तोडून जळण तयार करून दिलें होतें. भाऊसाहेबांना ही गोष्ट शक्य तरी कशी होती ?

सर्व गांव बिथरलें असतांना शिरसगांवला आपण जाऊं नये असें सुभद्राबाईना वाटत होतें. पण आपला सल्ला कोणी ऐकणार नाहीं हें जाणूनच त्यांनीं भाऊपाशीं या बाबतींत एक चकार शब्दहि काढला नाहीं. 'ज्याचं त्यालाच कळलं पाहिजे.' आपण सांगून कांहीं उपयोग होणार नाहीं हें जाणून त्यांनीं या बाबतींत अगदीं मौन स्वीकारलें होतें. शिरसगांवला आल्यापासून त्या बिनतक्रार पडेल तें काम करीत होत्या.

भाऊ गावांतून अपमान पावून वाड्यांत आले व येथें सर्व बाजूंनीं उत्पन्न झालेली प्रतिकूल परिस्थिति पाहून त्यांचे हातपाय अधिकच गळाले. आजच्या परिस्थितींत शिरसगांव सोडून सोनगांवला जाणें म्हणजे येथील इस्टेटीवर पाणी सोडून जाण्यासारखेंच आहे असें त्यांच्या मनानें पक्के घेतलें होतें. दरसाल एव्हांपर्यंत खंडाच्या व व्याजाच्या धान्यानें भरून जाणारीं त्यांच्या वाड्याचीं कोठारें आज अगदीं रिकामी पडलीं होतीं. खंडाची एक दमडीहि त्यांना आजपर्यंत कोणी आणून दिली

नव्हती. हा सगळा वसूल केवळ कायद्याच्या जोरावर करावयाचा तर त्याला किती काळ लागेल याची कल्पनाहि त्यांना करवत नव्हती अन् आपण कायद्याच्या आधारानें भांडलों तरी आपल्या हातीं प्रत्यक्ष किती लागेल याचीहि त्यांना शंका होती. गाडी सुरळीत चालली आहे तोंपर्यंत ठीक पण एकदा का ती रुळावरून खाली घसरली कीं किती अनर्थ घडून येतात याचीं वर्णनें त्यांनीं वर्तमानपत्रांतून अनेक वेळां वाचलीं होतीं. शिवाय हा कायदेशीर उद्योग कोठें राहून करायचा ? शिरसगांवास वर्षान् वर्षे राहून तेथील शेतकऱ्यांवर खटले चालविता येतील हें त्यांना शक्य दिसत नव्हतें. बहिष्कार हें प्रतिपक्षाच्या हातांतील एक अजब शस्त्र आहे. जालिमांचे अत्याचार सुद्धा ज्यांच्यावर जुलम होतो त्यांच्या सहकार्यानेंच चालू नसतात काय ? जुलमानें गांजलेला दुर्बल समाज जालिमाच्या अत्याचाराला नाइलाजानें बळी पडतो इतकेंच नव्हे तर आपल्या पडत्या मनोवृत्तीमुळें जालिमाच्या अत्याचारांना उत्तेजन देतो व आपसांतील दुहीमुळें या अत्याचारांच्या बाबतींत त्याच्याशीं सहकार्यहि करीत असतो. दलित वर्गाचें दौर्बल्य, त्याचा अडाणीपणा, त्याच्यांतील फूट, त्याच्याकडून मिळणारें सहकार्य ह्या खतपाण्यावरच जुलमी वर्गाचें अत्याचाराचें पीक पोसलेलें असतें. पण एकदां का हें खतपाणी बंद झालें तर हें पीक जळून जाण्यास वेळ लागत नाहीं.

शिरसगांवांत आजवर पिकविलेला जुलमाचा मळा तेथील लोकांनीं वर्गजागृत होऊन एकजुटीनें भाऊंशी सहकार्य करण्याचें नाकारल्याबरोबर जळून खाक होण्याच्या मार्गाला लागला होता. शिरसगांवचे लोक खोट्या कागदांवर सह्या आंगठे देत होते, सावकाराच्या घरीं खंड आणून घालीत होते, आपसांतल्या चुरशीनें खंडाचें प्रमाण वाढवीत होते, जप्तीच्या वेळीं मदत करीत होते व लिलावांत भाग घेत होते तोंपर्यंतच भाऊच्या सर्व गमज्या चालू होत्या. पण या सर्व लोकांनीं एकजुटीनें सावकाराशीं कोणत्याहि प्रकारचें सहकार्य करण्याचें नाकारल्याबरोबर भाऊंच्या या गावांतील सर्व व्यवहाराचा धुव्वा उडाला इतकेंच नाहीं तर त्यांना गावांत आपले जीवित कंठणेंहि अशक्य झालें.

भाऊ गांवांतून मळ्यांत आले व येथील परिस्थिति पाहून सर्वतोपरी हताश झाले. आतां पुन्हां सोनगांवला जायचें ठरविलें तरी गांवच्या गाड्या मिळतील कां नाहीं याचीहि त्यांना पंचाइत वाटूं लागली. सर्व बाजूंनींच आकाशच कोसळल्यावर भाऊंनीं शिरसगांव सोडण्याचें मनाशीं ठरविलें व आपला हा विचार ते सुभद्राबाईला बोलून दाखविणार इतक्यांत वाड्याच्या दरवाजांत कोणाची तरी पावलें वाजलीं.

"काय देवासारखे आलांत नाना !"

आलेले गृहस्थ विसूभाऊंचे कारकून होते.

भाऊंनीं आपले पिढीजाद कारकून धोंडजी नाना यांचें अति उत्साहानें स्वागत केलें. सबंध सोनगांवची मामूली विचारपूस केली व गेल्या आठवड्यांतील शिरसगांवच्या परिस्थितीची माहिती करून दिली.

नाना आलेले पाहून सुभद्राबाईनाहि बरें वाटलें. शिरसगांवला आल्यापासून उत्पन्न झालेल्या अडचणी, गांवच्या लोकांनीं आपल्यावर टाकलेला कडकडीत बहिष्कार व या बाजूच्या जागीं आपल्यावर कोणत्या वेळीं काय प्रसंग येईल याची भीति, याची जाणीव धोंडजी नानाला व्हावी म्हणून भाऊच्या बोलण्यांत त्यांनीं कांहींहि अडथळा केला नाहीं. शिवाय जेवणाची तयारी त्या करीत होत्या त्यामुळें मध्यें बोलायला त्यांना वेळहि नव्हता.

जेवणें आटोपलीं. विसूभाऊ, सुभद्राबाई व धोंडजी नाना या तिघांमध्यें चालू प्रसंगाबाबत चर्चा होऊन सोनगांवला परत जावयाचें ठरविण्यांत आलें.

धोंडजी नाना गांवात सर्वत्र फिरून आले तरी त्यांना कोणीहि गाडी देईना. शेवटीं बाळा पाटलानें पंच मंडळीकडे जाऊन त्यांची व धोंडजी नानाची गांठ घालून दिली. आपल्या गांवांतून बाहेर जाणाऱ्या सावकारी पीडेला अडथळा तरी काय म्हणून करायचा अशा विचारानें भाऊंना पोंचविण्यापुरती एका गाडीची जेमतेम व्यवस्था करण्यांत आली. मळ्यांत काम करायला कोणीच तयार नव्हतें तेव्हां तेथली गुरें सोनगांवला नेणें भागच होतें. धोंडजी नानांनीं गावच्या मंडळीच्या साह्यानें मोटनाडा नांगर, कुदळ वगैरे सर्व बारदान वाड्यांत नेऊन ठेवलें. ग्यानबाला त्याच्या नातेवाइकांकडे पोंचविण्यांत आलें. विसुभाऊ सावकार सोनगांवाला परत निघाले. प्रत्यक्ष गांवांत येऊन आपण खंड वसूल करूं शकलों नाहीं आतां बारा मैल दूर असलेल्या गांवीं राहून तो कसा वसूल करणार? शिवाय ज्या मळयाची त्यांनी जोपासना केली होती त्याची तर वाताहात झालेली त्यानीं प्रत्यक्ष डोळ्यांनींच पाहिली. सोनगांवांत परत जातांना शिरसगांवांत आतां आपल्याला स्थान राहिलें नाहीं या कल्पनेनें त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले. पण त्यांच्या मनाचें सांत्वन करण्याला त्यांच्याइतका तेथें होता कोण? शिरसगांवाला आल्यापासून सुभद्राबाई केवळ कर्तव्य म्हणून यंत्राप्रमाणें काम करीत होत्या. भाऊंच्या सावकारी व्यवहारासंबंधानें त्यांना कधींच सहानुभूति वाटत नव्हती. शिरसगांवच्या सर्व इस्टेटीची अशी धुळधाण होत असलेली पाहून सुभद्राबाईंना बरें वाटणें शक्य नव्हतें तरी ती कशी मिळविली याची कल्पना त्यांना असल्यामुळें भाऊंच्या दुःखांत समभागी होण्याइतक्या भावना त्यांच्या मनांत उचंबळल्या नाहींत हें मात्र खरें. धोंडजी नानांनीं तेवढा विसूभाऊंना धीर दिला. वर्ष सहा महिन्यांत मागच्या खंडाची वसूली आपण करूंच पण गांवच्या लोकांना त्यांनीं चालविलेल्या दांडगाईबद्दल चांगलेंच प्रायश्चित्त देऊं व सर्व गाडें सुरळीत रस्त्यावर आणूं असें आश्वासन त्यांनीं दिलें.

धोंडजी नानाला पंच मंडळीपैकीं एकाकडून मोठ्या मिनतवारीनें एक गाडी-बैल व सोनगांवाला मळ्यांतील बैल वगैरे हांकून नेण्याकरतां एक गडी मिळाला होता. माणसाशिवाय इतर सामान घेण्यास गाडींत जागा नव्हती. पांगळ्या भागू वन्संनींच गाडीची बरीचशी जागा अडविली होती. अशा परिस्थितींत शिरसगांवच्या कागद-पत्रांची पेटी गाडींत घेणें शक्यच नव्हतें. वाड्यांतच ती इतर सामानाबरोबर ठेवण्यांत आली.

विसुभाऊ सावकार परत सोनगांवला निघाले त्या वेळी पंच मंडळीपैकीं एक शेतकरी व इतर कांहीं लोक मळ्याच्या फाटकाशीं हजर होते. या लोकांचे चेहरे हसरे दिसत होते. सावकाराची बरी फजीती झाली, ही भावनाच जणू त्यांचे चेहरे व्यक्त करीत होते.

" सावकार, आतां या झाडाला कायमचे सोडा." असा निरोप गाडी दिलेल्या शेतकऱ्यानें भाऊंना सांगितला. गांवांत या पंचाची एकदा या पूर्वीं गांठ पडली त्या वेळीं त्यानें अशीच खवचट सूचना भाऊंना केली होती. भाऊ या वेळीं कांहीं बोलले नाहींत पण वरील शब्दांनीं त्याच्या मर्मावर चांगलाच घाव केला.

अन् गमतीची गोष्ट ही कीं, पांगळ्या भागू वन्संना प्रथम या शब्दाचा अर्थ कळला नाहीं पण थोड्या विचारानंतर या सूचनेचें मर्म जेव्हां त्यांच्या लक्षांत आलें तेव्हां त्या म्हणाल्या,

' अगदीं बरोबर बोलला तो. सावकारी पिशाच्च शिरसगांवला आतां झोंबणार नाहीं. पिशाच्चाला गांवाबाहेर हांकून देण्याचा उपाय सांगणारा वस्ताद मांत्रिक गावकऱ्यांना भेटला. '

आपल्या पांगळ्या बहिणीचें हें बोलणें ऐकल्यावर तिला खाऊं कां गिळूं असें भाऊंना वाटलें. पण त्यांना आपला संताप आवरावा लागला. भावाबद्दल डांचत असलेला द्वेष भागू वन्संच्या मनांतून बाहेर पडला पण असें बोलण्याचा हा प्रसंग नव्हे असें सुभद्राबाईना वाटलें.

वाटेंत या कुटुंबाचे फार हाल झाले. उघड्या गाडींत संबंध दुपारचें ऊन भाऊंना खावें लागलें त्यामुळें त्यांचें कपाळ दुखूं लागलें. मध्यंतरीं थोडी विश्रांति या मंडळींनीं घेतली. ओढ्याच्या कांठीं गर्द आंब्याच्या सावलींत आणखी थोडा वेळ राहण्याचा भाऊंचा विचार होता. पण काळोख पडायच्या आंत सोनगांवला पोंचायचें होतें त्यामुळें धोंडजी नानांनीं येथून निघण्याची घाई केली. बैलगाडीचा खडकाळ रस्ता. मधून मधून झाडी. चोरांचें भय. तेव्हां काळोख पडण्याच्या आंत सोनगांव गांठलेंच पाहिजे होतें.

कशीबशी अगदीं काळोख पडण्याच्या सुमारास गाडी सोनगांवास पोंचली.

भाऊंना एक प्रकारें हायसें वाटलें. पण पराभवाच्या टोल्यानें त्यांचें मन गळून गेलें होतें. अन् भरतीला वाटेंतल्या हालांनीं त्यांच्या शरीरांतला त्राण नाहींसा झाला होता.

सोनगांवांत येऊन दोन चार दिवस होतात न होतात इतक्यांत मामलेदार कचेरींत जाब देण्याबद्दलचें समन्स त्यांना पोचलें. शिरसगांवच्या कुळांना ताळयावर आणण्याचा एकच मार्ग त्यांना माहीत होता. व तो म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांशीं संगनमत करून कुळांच्या मनांत दहशत उत्पन्न करायची. पण पाटलाच्या घरीं घडून आलेल्या प्रकरणामुळें एक नवीनच लचांड उपस्थित झालें. सरकारी नोकराला लांच देण्याच्या आरोपाबाबत जाब देण्याबद्दलचें समन्स त्यांच्यावर लागू करण्यांत आलें. आतां मात्र त्यांची पांचावर धारण बसली. पण असल्या कामांत वाकबगार असलेल्या धोंडजी नानांनीं त्यांना धीर दिला. अनेक भिडा, वशिले खर्ची घालून शेवटीं जितके पैसे त्यांनीं बाळा पाटलाला देऊं केले होते त्याच्या दुप्पट पैसे तालुक्याच्या अधिकाऱ्यांत वांटून त्यानीं नानांच्या मदतीनें या प्रकरणांतून आपली सुटका करून घेतली. या सर्व खटपटींत त्यांचे तीन महिने खर्ची पडले व शिरसगांवच्या कुळांकडून सरकारी मदतीनें खंड वसूल करून घेण्याचें काम दिरंगाईवर पडलें.

पावसाळा आला. शिरसगांवच्या शिवारांतील त्यांच्या कांहीं जमिनी पडीत राहिल्या व कांहीं जमीनी नवीन कबुलायती न देतांच दाबून पेरण्यांत आल्या आहेत असें त्यांना समजलें. दहा एकराचा मळा मात्र लोकांनीं ओसच पाडला. या ओस पडलेल्या रानांतील वाड्याकडे अर्थातच कोण लक्ष देतो. शिरसगांवच्या रानांत झोपड्या बांधून राहिलेल्या चित्रकथ्यांच्या टोळीनें वाड्याचें कुलूप तोडून पैशाच्या आशेनें त्यांतील पेट्या फोडल्या, कागद पत्र जाळून टाकले, अशी बातमी पाटलामार्फत तालुक्याच्या गांवीं आली ती विसूभाऊंनाहि समजली. पोलिस पार्टीनें तिकडे जाऊन कांहीं चित्रकथी पकडून आणले. पण त्यांच्यापाशीं मुद्देमाल कांहीं सांपडला नाहीं. वाड्यांत चोरण्याजोगें असें कांहीं नव्हतें. शिरसगांवचे सर्व कागद-पत्र मात्र या चोरट्यांच्या हल्ल्यास बळी पडून त्यांचा निकाल लागला.

शिरसगांवच्या लोकांनीं केलेली खंडबंदी, विसूभाऊंच्या कुटुंबावर त्यांनीं घातलेला कडकडीत बहिष्कार, गांवांत त्याचा पदोपदीं झालेला अपमान, त्याच्या आवडत्या मळयाची नासधूस, लांच प्रकरण व अखेर ज्यांच्या आधारावर खंड व व्याज वसूल करायचे त्या सर्व कागदपत्रांचा नाश हे सर्व एकामागून एक झालेले आघात आपल्या पतीच्या मेंदूला सहन होणार नाहींत असें भय सुभद्राबाईला वाटलें व तें खरें झालें. विसूभाऊंना चित्तभ्रम झाला. त्यांतच त्यांना पक्षघाताचा झटका आला व त्यांचा अंत झाला.

# १४

भायखळ्याच्या प्लॅटफॉर्मवर यदृच्छेनें एकत्रित आलेल्या मंडळींत ठरल्याप्रमाणें राघू जॉबरनें पांडोबाला व त्याच्या बरोबरच्या दोन्हीं मुलांना दिग्विजय गिरणींत काम लावून दिलें. दासू व त्याच्याबरोबर आलेला त्याचा सोबती सदू या दोघांची डॉफर बाईज म्हणून भरती करण्यांत आली.

याप्रमाणें दासूचें जीवन गिरणीच्या यंत्रांशीं जोडण्यांत आलें. या नवीन जीवनांत दासू प्रथम प्रथम बिचकल्यासारखा वागत असे पण लवकरच या जीवनाशीं त्यानें जुळवून घेतलें. त्याच्या वयाचीं कितीतरी मुलें गिरणींत काम करीत होतीं. त्यांच्यांत तो मिसळून गेला.

रोज सकाळीं सूर्य उगवतो, संध्याकाळीं तो मावळतो, पुन्हां तो दुसरे सकाळीं उगवतो व आपल्या वेळेला बरोबर मावळतो. त्याच्या या कामांत कधी व्यत्यय येत नाहीं. गिरणीचें जीवन असेंच नियमित असतें असें त्याला वाटलें. रोज सकाळीं पांडोबाबरोबर तो गिरणींत जाई व संध्याकाळीं पुन्हा आपल्या चाळींत तो परत येई. जेवणें, निजणें, गिरणींत जाणें हीं सर्व कामें त्याला इतरांप्रमाणें नियमितपणें करावीं लागत. रोज सकाळीं अगदीं नेमक्या वेळेला गिरणीची शीट वाजे, यंत्रें सुरू होत; व त्या यंत्रांबरोबर माणसेंहि कामाला लागत. यंत्रांचीं मोठमोठीं चाकें, त्यांच्यावरून घेतलेल्या पट्टयांनीं चालणारीं लहान चाकें, हीं चाकें गरगर फिरूं लागलीं कीं, त्यांच्याबरोबर चालू होणारीं इतर लहानमोठीं यंत्रें व त्या यंत्राबरोबर कामें करणारीं लहानमोठीं माणसें आणि हीं सर्व कामें कशी व्यवस्थित जुळवून आणलेलीं आहेत हें सर्व पाहून त्याचें मन दंग होई. तो आपल्या खात्यांत कामाकरतां गेला कीं यंत्रें सुरू होत व नंतर तो कांड्याच्या टोकऱ्या भरभरून इकडून तिकडे नेई. भरलेल्या कांड्या पोंचवाव्या, रिकाम्या कांड्या परत आणाव्या. पुन्हा आपली टोकरी भरलेल्या कांड्यांनीं भरावी, ती रिकामी करावी व रिकाम्या कांड्या आणून पुन्हा पहिल्या जागीं पोचवाव्या, असें हें काम त्याला दिवसभर करावें लागे. यंत्रें सुरू झालीं कीं आपलें काम सुरू होतें, तीं बंद पडलीं कीं आपलेंहि काम बंद होतें. तेव्हां आपण यंत्राच्या आधीन आहोंत. यंत्रें बंद पडलीं, आपलेंहि काम बंद. आपलें काम सुरू होण्याला यंत्रें प्रथम सुरू झालीं पाहिजेत. म्हणजे यंत्रें प्रथम व आपलें काम नंतर. यंत्रामागून माणूस कामास लागतो. पट्ट्यावर चालणारी शेंकडों चाकें कशीं गिरगिर फिरतात

व त्यांच्यामुळें चालणाऱ्या हजारों सुताच्या चात्याहि आपल्या भोंवती कशा फिरूं लागतात याचें गूढ त्याला प्रथम किती तरी दिवस उलगडलें नाहीं. एकदां असें झालें.

गिरणीची दुसरी शीट झाली कीं, पांच मिनिटांत सर्वत्र कामें सुरू होत. या दिवशीं असें घडून आलें नाहीं. पट्टा तुटला असेल, इंजिन बिघडलें असेल असें जो तो त्याचा सोबती म्हणूं लागला. बस्स ! मजा झाली असें म्हणून त्याचे कांहीं सोबती एकमेकांकडे कांड्या फेंकून व झेलून आपापसांत खेळूंहि लागले. पण दासूचें मन गोंधळून गेलें. असें कां झालें, याचें उत्तर त्याला मिळेना. त्याच्या सोबत्यांपैकीं एक दोन मुलें एंजिनरूमकडे धांवलीं. पोरांना कोण अडथळा करणार ? दासूहि त्यांच्याबरोबर धांवत गेला. पांडोबा एंजिन रूममध्यें कोळसे वाहण्याचें काम करीत होता. पांडोबाला त्याच्या काळ्या मिट्ट पोशाखांत त्यानें कधीं पाहिलें नव्हतें. एंजिनचीं माणसें तें सुरू करण्याकरतां झटत होतीं. पांडोबा तेथेंच आपल्या या काळ्या यूनिफॉर्ममध्ये विडी फुंकीत बसला होता.

' दासू तूं इकडं कुणीकडं ? '

' हीं मुलं आलीं, मीहि आलो.' पांडोबाच्या प्रश्नाला दासूनं उत्तर दिलें. पांडोबा त्याला प्रथम ओळखलाच नाहीं. त्याचा तो काळामिट्ट पोशाख, त्याचे काळे कुट्ट हात. गालावर व कपाळावर उमटलेले काळे पट्टे. पांडोबाकडे पाहून दासूला गंमत वाटली. पिस्टन बिघडला आहे, रॉड घासतो आहे, स्पार्क घेत नाहीं, असें कोणी कांहीं, कोणी कांहीं म्हणत होते. दासूला तें कांहीं समजलें नाहीं.

एवढें मोठें इंजिन, त्याला जोडलेलें प्रचंड चाक, त्याला जोडलेला पट्टा, हीं सर्व स्तब्ध व थंड पडलेलीं होतीं. इंजिन चालेल तर चाक हालेल, चाक हालेल तर पट्टा फिरूं लागेल, पट्टा फिरेल तर दुसरीं चाकें फिरूं लागतील, चाकें फिरूं लागतील तर यंत्रें चालू होतील.

' हीं प्रचंड यंत्राचीं धूडें काय कामाचीं, माणसानं खपून त्यांच्यात जीव घालावा तेव्हां तीं चालणार! थोडेसें कांहीं बिघडलें की बंद पडणार. पुन्हा माणसानेंच काय बिघडलें ते पहावें, दुरुस्त करावें, गेलेला जीव पुन्हा आणावा तेव्हां तीं काम देणार ! ' जमलेल्या मंडळीपैकीं एकजण म्हणाला.

' अरे हीं यंत्रांची निर्जीव धूडें. सजीव माणसांनीं खपावें तेव्हां कुठं तीं हालूं लागणार. ' दुसरा एकजण म्हणाला.

' माणूस म्हणजे सजीव यंत्रच. हें सजीव यंत्र जेव्हां प्रथम निर्जीव यंत्रामागे लागतें तेव्हां तें सजीव होतें व माणसाच्या उपयोगी पडूं लागतें.' तिसरा एकजण म्हणाला.

दासू या सर्व चर्चा लक्षपूर्वक ऐकत होता. तेव्हां यंत्रें प्रथम चालूं लागतात मग

माणसें कामाला लागतात असें नसून माणसें प्रथम कामाला लागतात मग यंत्रें चालू होतात व त्यांचा उपयोग माणसें करून घेतात. तेव्हां यंत्राच्या स्वाधीन माणसें नाहींत तर माणसाच्या स्वाधीन यंत्रें आहेत अशी कल्पना त्याच्या मनांत आली. ती खरी असली तरी माणसें यंत्रें तयार करतात अन् तीं अशा रीतीचीं बनवितात कीं, यंत्राच्या आधीन झाल्याशिवाय माणसाचें भागत नाहीं. यंत्राच्या कलानेंच माणसाला घ्यावें लागतें ही गोष्ट त्याच्या लक्षांत अजून यावयाची होती. यंत्रें माणसाच्या स्वाधीन तर कधीं माणसें यंत्राच्या स्वाधीन असें हें परस्परावलंबी कोडें आहे. असें हें तंत्र दासूसारख्या बालमनाला कसें लक्षांत येणार ? पण एवढी गोष्ट खरी कीं, माणूस मनांत आलें तर सर्व यंत्रें बंद पाडूं शकतो व चालवूंहि शकतो हें मात्र त्याला पक्कें समजलें.

बंद झालेलें इंजिन पुन्हा चालू झालें. पट्टे भराभर फिरूं लागले. सर्व गिरणी सजीव झाली. तो व त्याचे सोबती गडबडीनें धांवत आपल्या जागीं येऊन कामाला लागले.

दासू जात्याच चाणाक्ष होता. पांडोबानें त्याला विसूभाऊकडे विकून टाकलें. भाऊंच्या घरांत व पुढेंहि चंद्राच्या हॉटेलांत काम करतांना त्याच्या बुद्धीच्या विकासाला वाव मिळेल असें कांहीं नव्हतें. पण गिरणींत आल्यापासून त्याच्या डोळ्यापुढें जीं अनेकविध कामें चालू होतीं त्यांच्याकडे पाहून हें असें कां व तें तसें कां, अशी त्याची बुद्धि त्याला सारखें विचारूं लागली होती. इतर मुलांप्रमाणें केवळ यंत्राप्रमाणें तो आपलीं कामें करीत नव्हता. तो डोळस कामगार होता. आपलें काम संभाळून तो गिरणींतल्या इतर खात्यांतहि जाई. त्याची हुशारी पाहून कोणीहि त्याला जवळ करी. कापूस पिंजण्यापासून सुंदर तलम रंगदार तऱ्हतऱ्हेच्या काठांचें कापड विणण्यापर्यंतचीं सर्व कामें गिरणींत होत असत. गिरणीच्या एका टोकावरच्या यंत्रांत कापूस पिंजण्याकरतां टाकला जाई व दुसऱ्या टोकावर सुंदर घड्या घालून कापड बाहेर पडे तेव्हां या मध्यंतरींच्या कापसाच्या सर्व अवस्था पाहून त्याला मोठी मजा वाटे. गिरणी करते काय तर कापसाचें रूपांतर कापडांत करते आणि हें रूपांतर होत असतांना क्षणोक्षणीं माणूस यंत्राला राबवून त्याच्याकडून हवें तसें काम करून घेतो हें त्यानें पाहिलें त्या वेळीं त्याचें मन आश्चर्यानें भरून गेलें. गिरणींत वर्षानुवर्षें कामें करून आपल्या खात्याशिवाय दुसऱ्या खात्यांत पायसुद्धां न टाकलेली कितीतरी कामगार माणसें गिरणींत होतीं. निर्जीव यंत्राबरोबर काम करणारीं सजीव यंत्रेंच होतीं हीं. या माणसांना आपला वरचा माणूस जें काम नेमून देईल तें करण्याचें तेवढेंच ठाऊक होतें. आपलें काम करतांना आपण ज्या यंत्राकरतां माल पुरवतो, ज्या यंत्राकडून काम करून घेतो, ज्या यंत्राशीं झगडतो तें यंत्र कशा प्रकारचें आहे हें पाहण्याची जिज्ञासा कधीं त्यांच्या मनांत उत्पन्न होत नसे. पण

दासूच्या ठिकाणीं हाच विशेष होता कीं त्याच्या मनांत ही जिज्ञासा उत्पन्न होई आणि आपल्यावर देखरेख करणारा म्हणजे आपल्याकडून यंत्राप्रमाणें काम करून घेणारा फोरमन, फोरमनांवर नजर ठेवणारा मुकादम व त्यांच्यावरहि नजर ठेवणारा जॉबर अशीं एकावर एक कामें करणारीं माणसें पाहिलीं म्हणजे आपल्यालाहि तसें होतां येईल का असेंहि त्याच्या मनांत येई.

दासूच्या आंगच्या या विशेष गुणामुळें गिरणीच्या एकाच खात्यांत तो सारखा जखडून राहिला नाहीं. वर्षा दीड वर्षात त्याची बदली होई व ही बदलीसुद्धां वर-वरच्या महत्त्वाच्या खात्यांतून होत असे. याप्रमाणें गिरणींत आल्यापासून दासूची प्रगतीच होत गेली. त्याचें वय वाढूं लागलें त्याप्रमाणें त्याचा पगारहि वाढूं लागला व एकाहून एक अधिक महत्त्वाचीं कामें जबाबदारीनें अंगावर घेऊन तो करूं लागला.

दासू गिरणीच्या कामांत रस घेऊं लागला. गिरणीकामगार या दृष्टीनें त्याचें हें वर्तन अपवादात्मकच होतें. गिरण्यांतून काय किंवा कारखान्यांतून काय कामगारांना असें वागविण्यास येतें कीं, आपण करीत असलेल्या कामाकडे त्यांचें लक्षच लागत नाहीं. पहिली गोष्ट कामगारांना मजूरी भरपूर मिळत नाहीं. सकाळपासून संध्या-काळपर्यंत कामगाराला राबावें लागतें. या श्रमामुळें साहजिकच तो थकून जातो. दिवसभर दमल्याभागलेल्या या माणसाला दुसरे दिवशीं पुन्हा ताजेतवाने होण्याइतकें अन्न मिळालें नाहीं तर कामाकडे त्याचें लक्ष कसें लागणार ? पोटाकरतां काम करणें तर भागच असतें पण दिवसभर काम केल्यानें झालेली झीज भरून निघण्या-इतकें अन्न त्याला मिळालें नाहीं तर तो दिवसेंदिवस जास्तजास्तच थकत जाणार, हें उघड आहे. अशा स्थितींत कामगाराचें कामाकडे लक्ष असावें, आपल्यावर सोंपविलेल्या कामासंबंधीं त्याला जबाबदारी वाटावी, आपल्या कर्तव्याची जाणीव त्याला असावी अशी अपेक्षा करणेंच चुकीचें आहे व अवास्तविकहि आहे. काम-गाराला अगोदर भरपूर खायला, प्यायला, ल्यायला मिळत नाहीं. अन् याच्या भरतीला कामगाराला जी वागवणूक मिळते तीहि माणुसकीला धरून नसल्यामुळें हातांत असलेल्या कामाकडे त्याचें लक्ष असत नाहीं; जड यंत्राप्रमाणें तो सुद्धां यंत्रच बनतो. फरक एवढाच कीं, तो सजीव असतो.

दासू मुंबईला आला व कामाला लागला. पण महिन्याचा पगार त्याच्या हातांत मिळेनासा झाला. दासूचा व त्याच्याबरोबर असलेल्या सदूचा दोघांचा पगार पांडोबाच घेत असे व त्यांतला राघू जॉबरचा हिस्सा दिल्यावर जो पगार शिल्लक राही त्यापैकीं या दोन्ही मुलांची खानावळ भागविल्यानंतर बाकीचे पैसे तो स्वतःच हबकीत असे. सदूला ही गोष्ट आवडत नव्हती. दोन महिने त्यानें हा

प्रकार सहन केला. तिसऱ्या महिन्याच्या प्रारंभी सदूनें पांडोबाला राम राम ठोकला व अफाट मुंबईत तो कोठें निघून गेला याचा पत्ताहि पांडोबाला लागला नाहीं. आपल्याला काय मिळतें, पांडोबा त्यापैकीं किती घेतो, याचा विचारच दासूनें कधीं केला नाहीं. त्याचें लक्ष महिन्याला मिळणाऱ्या पगारापेक्षां कामाकडेच जास्त होतें.

पांडोबा मुंबईत येऊन कामास लागला त्या वेळीं आपल्या बरोबरच्या दोन्ही मुलांसह तो एका चाळींतील खोलींत राहूं लागला. ही खोली त्याला मोठ्या मिनत-वारीनें मिळवावी लागली होती. चार खणांची ही लांबोळी खोली होती. अन् पांडोबा आपल्या मुलांसह तीत शिरल्याबरोबर तिच्या रहिवाश्यांची संख्या वीसांवर गेली. दोन्ही तिन्ही वेळा हॉटेलांतून खायचें व रात्रीं या खोलींत विश्रांतीकरतां अंग पस-रायचें. खोलींत निजण्याकरतां बैठक अशी नव्हती. ज्याच्या जवळ जें जादा कापड असेल ते एकमेकांना खेंचून अंथरावे व त्यावर पडावें. ही खोली प्रथम ज्यानें घेतली त्या वेळीं त्यानें एक रॉकेलची चिमणी उजेडाकरतां घेतली होती. कोपऱ्यांत केलेल्या एका लाकडाच्या तुकड्याच्या बैठकीवर ही चिमणी ठेवलेली असे. खोलींत प्रथम जो कोणी येई तो ती चिमणी शिलगावीत असे. अन् चिमणी लावल्यापासून तासा दीड तासांत खोलीचे सर्व भाडेकरू आले व त्यांनीं आपल्या पथाऱ्या पसरल्यावर त्यांवर ते लवंडले कीं या चिमणीच्या प्रकाशाला रजा देण्यांत येई. दासूच्या खोलींत कोणी बाई माणूस नव्हतें यामुळें दिवा असला तरी त्याची फारशी कोणाला अडचण भासत नव्हती. पण ज्या खोल्यांमधून तीन तीन चार चार कुटुंबें राहात होतीं त्यांना आपण एकमेकांपासून वेगळे आहों असे मानून घ्यायला खोलींत अंधार गुडुप करणें भागच पडत असते. अशा परिस्थितींत या कुटुंबांतील स्त्री-पुरुषांची अदला-बदल झाली व त्यांच्यांत कांहीं अनीतीचे व्यवहार झाले तर अंधार त्यांचें संरक्षण करीत असे. यामुळें मुंबईसारख्या शहरांतील मजूरांच्या चाळी अनीतीचा फैलाव करणाऱ्या गुहा होत असें जे म्हटलें जातें त्याचें कारण हेंच असतें. जागेच्या अभावामुळें मजूर कुटुंबें याप्रमाणें एका एका खोलींतून कोंबलीं जातात व त्या ठिकाणीं स्वाभाविकच असे प्रकार घडून येण्यास वाव सांपडतो. मुंबईत कामाकरतां आलेला तरुण मजूर आपली बायको मुंबईस आणण्यास तयार नसतो याचें कारण हेंच असतें. बरें आपण मुंबईस कामाकरतां आल्यावर बायकोला तरी खेडेगांवांत आपल्या नाते-वाइकांजवळ किती दिवस ठेवणार. यामुळें बायकोला गांवांत फार दिवस ठेवतां येत नाहीं व मुंबईत जागा नसल्यामुळे तिथें आणता येत नाहीं अशी मजूर कुटुंबांची नेहमीं कुचंबणा होते.

बरें मुंबईत बायकोला आणल्यावर एकादे वेळीं निराळी स्वतंत्र जागा मिळाली

तरी बायकोला घरीं एकटी ठेऊन कामावर कसं जावें ? बायकोला कामावर न्यावें तर दोघांना एकाच ठिकाणीं काम थोडेंच मिळतें ! काम मिळालें तरी तें कोणच्या प्रकारचें मिळेल याचा भरंवसा नाहीं. बायकांच्या कामावर देखरेख करणारे पुरुष असले तर त्यांच्या कचाट्यांतून तरुण स्त्री कामगारांची सुटका होणेंहि कठिण जातें. कारखान्यांतल्या एकाद्या तरुण सुंदर स्त्रीवर खुद्द कारखानदाराची किंवा त्याच्या तरुण मुलाची जर का नजर गेली तर मग विचारूंच नका. या तरुणीला वश करण्याकरतां नानाप्रकारचे उपाय केले जातात. तिला भ्रष्ट केली जाते. भांडवलशाहीच्या जमान्यांत कुटुंब संस्थेचा नाश अशा रीतीनें होत असतो.

पण इतका दूरवर विचार दासूला सुचणें शक्य नव्हतें. त्याचें वय वाढत चाललें त्याप्रमाणें त्याच्या कामांत मात्र त्याला बढतीहि मिळूं लागली. पण त्या मानानें त्याचा पगार मात्र वाढला नाहीं. पूर्वीप्रमाणें पांडोबा त्याचा पगार परस्पर घेत नसे. त्याचा पगार त्याच्या हातांत पडे पण महिन्याच्या कांठीं त्याच्याजवळ कांहींच शिल्लक राहात नसे. अंगावरचे कपडे फाटले असतांना नवीन कपडेसुद्धा त्याला करतां येत नसत. स्पिनिंग खात्यांत चात्यांवर देखरेख करण्याचें काम तो करीत होता. त्याच्याच पलीकडे वीव्हिंग खात्याचें काम चालू होतें. रोज शेकडों वार कापड विणून तयार होत असलेलें तो पहात होता. तो ज्या गिरणींत काम करीत होता तशा प्रकारच्या गिरण्या परळ व दादर भागांत किती तरी होत्या. गिरणभागांत बाहेर पडलें की जिकडे तिकडे उंच उंच गेलेलीं लोखंडी धुराडीं त्याच्या दृष्टीस पडत. हीं धुराडीं काळ्या मिट्ट धुराचे लोट बाहेर टाकींत अन् हे धुराचे ढग एकत्र जमून मुंबईच्या इतर भागांवर पसरत. मुंबई हें कारखान्याचें शहर. कापडगिरण्या हाच मुंबई शहरांतील मोठा उद्योगधंदा. मुंबईला एकंदर कापड विणणाऱ्या गिरण्या ऐशींवर आहेत असें दासूनें ऐकलें होतें. दासू ज्या गिरणींत काम करीत होता तीपेक्षां इतर गिरण्या किती तरी मोठ्या होत्या व रोज हजारों वार कापड त्या विणीत होत्या. पण हें कापड तयार करणाऱ्या मजुरांची काय अवस्था होती? या मजूरांपैकीं शेंकडा नव्याण्णव माणसांच्या अंगावर लकतरें लोंळत असलेली जेव्हां तो पाही त्या वेळीं त्याला साहजिकच आश्चर्य वाटे. मुंबईंत लाखो लोक बेकार आहेत. अन्न वस्त्राशिवाय व कामाशिवाय ते दिवस कंठीत असतात. फूटपाथवर पडावें व मुंबईचें घाण व सर्द वातावरण पांघरावें अशी त्यांची स्थिती होती. या लोकांचें एक राहो. हे लोक कामच करीत नाहींत तेव्हां त्यांना अन्न वस्त्र कोठून मिळणार ? पण जे खुद्द गिरणींतच कामें करतात त्यांचीं अंगें तरी कापडांनीं चांगलीं झाकलेलीं अशी असावयास पाहिजेत. वस्तुस्थिति तशी नव्हती. लाखो वार कापड प्रसवणाऱ्या गिरण्यांत काम करणाऱ्या स्त्री पुरुष कामगारांच्या अंगावरचं धड वस्त्र दिसत

नसतें मग इतर कारखान्यांतील मजूराची व काम करण्याची इच्छा असून काम न मिळणाऱ्या बेकारांची व पोटाकरतां दारोदार हिंडणाऱ्या भिकाऱ्यांची काय कथा? इतकें लाखों वार कापड जातें कोठें? देशांतील लाखोंनीं मोजल्या जाणाऱ्या जनतेला जर तें मिळत नाहीं तर हें सर्व कापड कोणाकरतां विणण्यांत येतें याचें कोडें दासला कांहीं केल्या उलगडत नसे.

गिरणीचें गोदाम कापडाच्या गठ्ठ्यांनीं शिगन् शीग भरलें आहे. मजूरांनीं हें कापड विणून तयार केलें आहे तेव्हां त्यांनीं आपापसांत लागेल तेवढें वाटून घेतलें तर किती मजा होईल. पण तसें त्यांना करतां येत नाहीं. सूत कातणाऱ्या व कापड विणणाऱ्या कामगारांना या गोदामांतलें कापड घेतां येत नाहीं. कापडाच्या स्वतंत्र मार्केटांतून कापडाचे ढीगचे ढीग पडलेले असतात त्यांच्यावरहि त्यांचा हक्क नाहीं. हें कापड त्यांनाच देण्यांत येतें कीं जे खिशांतून पैसा बाहेर काढतात. जो पैसा देईल त्याला कापड मिळेल. इतरांनीं या कापड तयार करण्याच्या कामांत कितीहि मेहनत केली असली तरी त्याला तें मिळणार नाहीं. जो पैसा देईल त्याला अवश्य कापड मिळेल. त्यानें या कापडाकरतां कांहीं मेहनत केली आहे का हें कोणी पाहाणार नाहीं. मजूरांच्या अंगावर धड वस्त्र नाहीं. तेव्हां थंडीवाऱ्यापासून त्यांचें रक्षण व्हावें म्हणून कापड काढण्यांत येत नाहीं. जो कापडाकरतां पैसा देतो त्याच्याकरतां हें कापड काढण्यांत येतें. गरज पुरविण्याकरतां कापडाची पैदास होत नाहीं तर पैशाकरतां ती होत असते.

ही कल्पना मनांत आल्याबरोबर केवढी तरी मोठी गोष्ट आपल्याला समजली असें दासूला वाटलें. गिरणींत असतांना दासू आपल्या कामांत गर्क होई तर गिरणीबाहेर पडलें कीं दासू विचारांत गर्क होई. त्याचें हें वर्तन गिरणींतल्या त्याच्या सहकाऱ्यांना मुळींच आवडत नसे. पांडोबाची व दासूची जेव्हां जेव्हां गांठ पडे त्या त्या वेळीं दासू आपला कांहीं तरी विचार करतो आहे असें त्याला आढळे. हा पोरगा इतका विचार कसला करतो, याचें पांडोबाला मोठें नवल वाटे. दासू स्पिनिंग खात्यांत चात्यांवर देखरेख करण्याचें काम करूं लागला. त्याला पूर्वीपेक्षां अर्थात् थोडी जास्त मजूरी मिळूं लागली. त्यानें आपली राहण्याची चाळ बदलली. या नवीन चाळींत त्याला एक नवीन गोष्ट आढळली ती म्हणजे रात्रीची शाळा. या शाळेचा फायदा घेण्याचें त्यानें ठरविलें. या शाळेंत दहाबारा वर्षांचीं मुलेंच तेवढीं दिसत. वास्तविक प्रौढ वयाच्या मजूरांत साक्षरता प्रसार करण्याकरतां शहरच्या कांहीं शिक्षणप्रेमी लोकांनीं हा वर्ग उघडला होता. पण प्रौढ मुलें या शाळेकडे ढुंकूनहि पाहात नसत. त्यांना या शाळेंत बसायला होता कोठे वेळ? मिळेल तेवढी रात्रीची वेळ मजेंत घालवायची सोडून शाळेंत डांबून

काय म्हणून राहायचें ? तरुण मजूरांमध्ये दिसणारी ही वृत्ती अगदीं अस्वाभाविक नव्हती. दिवसभर गिरणीच्या घरघरींत वेळ काढल्यावर मनाला विरंगोळा मिळून ते चाळीबाहेर पडले. पान विड्याच्या दुकानांतून विडे घेऊन त्यांनीं ते तोंडांत कोंबले. पिचकाऱ्या टाकून त्यांनीं रस्ते लाल करून सोडले. विड्या फुंकीत रस्त्यांतून आपल्या दोस्तांच्या खांद्यावर हात टाकून ते फिरले व सिनेमाला ते बिनचूक हजर राहिले तर त्यांत गैर मानण्याजोगें असें कांहींच नव्हतें. या तरुण मजूरांमध्यें कोणी कोणता चित्रपट किती वेळां पाहिला याची चढाओढ लागत असे. दासू या मंडळींत फारसा मिसळत नसे तरी त्याला ते कधीं कधीं आपल्या बरोबर ओढून नेत. सिनेमा पाहत असतांना त्याचे भोंवतालचे दोस्त पडद्यावर दिसणाऱ्या नट नटींचीं गाणीं त्यांच्या बरोबर तोंडपाठ म्हणत, नट नटींच्या तोंडचे उद्गार बाहेर पडण्यापूर्वींच ते बोलून जात हें पाहून त्याला आश्चर्य वाटे. व 'पकड, पकड,' 'हां दमानें', 'पीट साल्याला' असले उद्गार समोर चाललेल्या प्रसंगानुसार जेव्हां त्याचे दोस्त काढीत व आपल्या बाकांवर गडबड उडवून देत तेव्हां तर त्याला फारच मजा वाटे. पडद्यावर प्रकट होणाऱ्या वीर रसानें त्याच्या दोस्तांचीं मनेंहि वीर रसानें भरून जात, पडद्यावर हंसणाऱ्या पात्रांबरोबर ते हंसत व केव्हां केव्हां पडद्यावरच्या पात्रांबरोबर ते रडत व त्यांच्याहि डोळ्यांतून आंसवेंहि गळत. असल्या प्रसंगीं दासूहि आपल्या दोस्तांप्रमाणें पडद्यावरच्या प्रसंगाशीं समरस होई. पण मागें असलेल्या दहा आण्याच्या, चौदा आण्याच्या, रुपयाच्या, दोन रुपयाच्या जागांवर बसलेल्या लोकांत इतका उत्कटपणा कां दिसत नाहीं असा विचार त्याच्या मनांत आला कीं त्याचें पडद्यावरील लक्ष उडून जाई. या मागच्या लोकांना पुढें पडद्यावर काय चाललें आहे हें समजत नसलें पाहिजे किंवा समजत असून त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या भावनांना सभ्यपणाच्या व शिष्टपणाच्या नांवाखालीं ते दडपून तरी टाकीत असले पाहिजेत. कांहीं कां असेना पुढच्या पांच आण्याच्या लोकांत व मागच्या जास्त किंमतीच्या लोकांत भेद आहे खास. हा विचार त्याच्या मनाला चाटून जाई व या मागच्या लोकांपेक्षां पडद्यावरच्या प्रसंगाशीं व पात्राशीं एकरूप होणारे आपले दोस्त कितीतरी चांगले. आंत बाहेर असें त्यांच्यापाशीं कांहीं नाहीं. अंतः-करणाला ज्या भावना प्रतीत झाल्या त्याच कृतीरूपानें ते प्रगट करीत. किती निर्मळ व शुद्ध या लोकांचें मन. सिनेमा पाहून दासू परत आपल्या चाळींत आला म्हणजे पडद्यावरच्या कथानकाबरोबरच समाजांतील या दोन भिन्न वृत्तींच्या वर्गाबद्दलचे विचारहि त्याच्या मनाला ग्रासून सोडीत.

करमणुकीच्या कोणत्याहि कार्यक्रमाकरता दासू चाळीबाहेर कधीं पडत नव्हता व त्याच्या दोस्तानीं आग्रह केला तर त्यांचा शब्दहि तो मोडत नव्हता. त्याचें लक्ष

चाळींत चालू असलेल्या शाळेकडे होतें व या संधीचा फायदा घेण्याचें त्यानें ठरविलें होतें. दासू वयानें मोठा, उंच, चांगल्या हाडापेराचा होता तरी लहान मुलांत जाऊन बसण्यास तो कांहीं लाजला नाहीं. अगदीं अक्षर ओळखीपासून त्यानें आपल्या शिक्षणाला आरंभ केला व अवघ्या एका वर्षात तो चांगलें वाचायला शिकला. कोणी पत्र लिहायला सांगितलें तर तें लिहून देण्याइतकें लिहायलाहि तो शिकला. वाचायला येऊं लागल्याबरोबर आपल्याला एका नवीन जगाचीच ओळख झाली असें दासूला वाटूं लागलें. सबंध दिवस गिरणींत काम केल्यावर त्याचे दोस्त हॉटेलांत जात तर दासू मुंबईत रोज प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमान पत्रांपैकीं एकादें पत्र विकत घेई व चाळींत रात्रीचें जेवण झाल्यावर तें सगळें वाचून काढी.

या पत्रांतून कधीं कधीं कामगारांसंबंधाच्या बातम्या प्रसिद्ध होत व त्या तो चाळींतल्या मजूरांनाहि वाचून दाखवी नि त्यांवर चर्चाहि करी.

कामगार मैदानावर कोण गर्दी ! मे दिन साजरा करण्याकरतां कामगारांची जाहीर सभा होणार असल्याची बातमी त्यानें आदल्या दिवशींच वर्तमान पत्रांतून वाचली होती. चोहोंकडून कामगारांच्या मिरवणुका येऊन त्या या गर्दीत सामील होत होत्या. दासू अगदीं सभा होण्याच्या वेळीं कामगार मैदानावर आला. त्याला आपल्या गिरणींतील कांहीं कामगार या सभेंत आलेले दिसले.

" भाई हो, कामगारांच्या रक्तानें भिजलेल्या लाल बावट्याखालीं आपण मे दिन साजरा करीत आहों. "

मैदानांतील प्रमुख जागीं तयार केलेल्या प्लॅटफॉर्मवर उभे राहून एका वक्त्यानें वरील वाक्य उच्चारलें. त्याचें हें वाक्य संपतें उ संपतें तोंच सभेत जमलेल्या कामगारांनीं लाल बावट्याचा जयजयकार केला. प्लॅटफॉर्मावर उभा राहून बोलत असलेला हा वक्ता एक तरुण कामगारच होता. या कामगारानें प्रथम मे दिनाचें महत्व सांगितलें. सन अठराशें नव्वद या वर्षी युरोप-अमेरिकेंतील कामगारांनीं आपली आठ तासांच्या दिवसांची मागणी मिळवून घेण्याकरतां सुरू केलेल्या चळवळींत चिकागो शहरीं मिरवणूक निघाली असतां तेथल्या भांडवलशाहीच्या पोलिसांनीं त्यांच्यावर गोळीबार करून कामगारांच्या रक्ताचे पाट वाहविले. मे महिन्याच्या पहिल्या तारखेला ही मिरवणूक निघाली होती. या दिवसापासून जगांतील सर्व कामगार पोलिसांच्या गोळ्यांना बळी पडलेल्या कामगारांची आठवण ताजी ठेवण्याकरतां हा दिवस साजरा करीत असतात. याप्रमाणें प्रस्तावना करून या वक्त्यानें कामगार वर्गानें दोन शतकांपूर्वी सुरू केलेल्या झगड्याची कल्पना दिली.

या झगड्याला प्रथम इंग्लंड व फ्रान्स वगैरे युरोपमधील देशांतच सुरुवात झाली. वाफेच्या शक्तीचा शोध लागला. तिचा उपयोग करून मोठ्या प्रमाणावर माल काढण्या-

करतां निरनिराळ्या प्रकारच्या अनेक यंत्रांचा शोध लावण्यांत आला. इंग्लंड व फ्रान्स मधील पैसेवाल्यांनीं मोठमोठे कारखाने काढले. त्यांत हजारों लोक कामावर लावले. कसेबसे जिवंत राहतील इतकी थोडी मजूरी देऊन व दिवसाचे बारा चौदा तास कामगाराला राबवून मालांचे ढीगचे ढीग हे पैसेवाले निर्माण करूं लागले. कमींत कमी मजूरी व जास्तीत जास्त काम हा भांडवलवाल्यांचा दंडक असतो. या पद्धतीमुळें कामगारांची स्थिति अत्यंत निकृष्ट होत जाते. लहान लहान धंदे नाहीसे झाले. दहा माणसांचें, शंभर माणसांचें काम एक एक यंत्र करू लागलें. असलीं यंत्रें तयार करण्याचें कारखाने निघाले. या कारखान्यांतून निघालेल्या यंत्रांच्या साहाय्यावर प्रचंड प्रमाणावर मालाची पैदास होऊं लागली. एकीकडे मोटमोठे कारखाने निघाले तर दुसरीकडे हजारो माणसें बेकार होऊं लागलीं. माणसाची किंमत नाहींशी झाली. हवीं तेवढीं माणसें कारखानदारांना मिळूं लागलीं. देशांतील सर्व कामगार वर्गाला भांडवलदारांनीं गुलाम करून सोडलें. धान्य आपण पिकवितों,कापड आपण विणतो, घरें आपण बांधतो, पण आपल्याला खायला अन्न नाहीं, ल्यायला वस्त्र नाहीं व राहायला घर नाहीं. आपल्या याच शहरांत हजारों कामगार फूट पाथवर निजून रात्र काढीत असतात. आपण उत्पन्न केलेल्या मालावर आपला हक्क नाहीं. भांडवलवाल्यांनीं आपणाला गुलाम करून सोडलें आहे. ही गुलामगिरी नष्ट झाली पाहिजे. कामगारांची अभेद्य एकजूट व संघटना केली तरच आपली पिळणूक नाहींशीं होईल, गुलामगिरींतून आपली सुटका होईल. शेतकरी व जमीनदार, कामगार व मालक या दोन वर्गांत आज लढा, चालू आहे. हा लढा यशस्वी करण्यास संप हाच रामबाण उपाय आहे. मे दिनाच्या दिवशीं आपण एक होऊं व आपला अंतिम लढा चालविण्याची आपण प्रतिज्ञा करूं. अशा आशयाचें भाषण करून या तरुण कामावर वक्त्यानें " जगांतील कामगारानों एक व्हा " हा क्रांतिवादी कामगार पुढाऱ्यांचा आदेश कामगारांना सांगितला व आपलें भाषण संपविलें.

यानंतर आणखी कांहीं वक्त्यांचीं भाषणें झालीं. त्यांनींहि कामगारांचा संप लढा यशस्वी करण्याकरतां कामगार यूनियन बळकट करण्याचा आदेश दिला व हजारो कामगारांनीं यूनियनचे सभासद होऊन आपलें एकजुटीचें सामर्थ्य वाढवावें असें सांगितलें.

सभा चालू असतांना लालबावट्याचे व कामगार-शेतकरी एकजुटीचे सारखे जयजयकार होत होते. आपल्या जिव्हाळयाच्या प्रश्नासंबंधानें सभेंत झालेलीं भाषणें ऐकून कामगारांचा उत्साह वाढतच गेला. सभा समाप्त झाली. कामगार घरोघरीं जाऊं लागले. दासूनें सभेचें मैदान सोडण्यापूर्वीं कामगार यूनियनसंबंधानें सर्व

प्रकारची माहिती सभेच्या चालक कामगारांकडून करून घेतली. दासूच्या विचारनां आतां एक नवीनच विषय मिळाला.

एके दिवशीं मधली सुटी संपल्यावर दिग्विजय गिरणींतले कामगार आपापल्या कामावर रुजू झाले. दासूहि आपल्या बाजूवर कामास लागला. याप्रमाणें कामाला सुरुवात होऊन अर्धा तास झाला असेल तोंच गिरणींत एकाएकी गडबड उडाली. 'चला बाहेर पडा' 'काम बंद पाडा' अशी एकच आरोळी जिकडून तिकडून ऐकूं येऊं लागली. वीव्हिंग खात्यांत प्रथम या गडबडीला सुरुवात झाली. हातमागाचे धोटे भराभर हवेंत भिरकावलेले दिसूं लागले. वीव्हिंग खात्याचे लोक आपापले साचे सोडून बाहेर पडूं लागले. त्यांतील कांहीं कामगार स्पिनिंग खात्याकडे आले. तेथील कामगारांनींहि आपल्या हातांतलीं कामें सोडलीं. संपाची आरोळी इतर खात्यांतूनहि वाऱ्यासारखी पसरली. वाइंडिंग खात्यांतल्या स्त्रिया काम सोडून बाहेर पडूं लागल्या. जे थोडे लोक इकडेतिकडे चुकूनमाकून कामें करीत होते त्यांना त्यांनीं बाहेर काढलें. या सर्व मंडळीबरोबर दासूनेंहि आपलें काम थांबविलें. इतर लोकांप्रमाणें तो एकाएकीं गिरणीच्या बाहेर पडला नाहीं. त्यानें या प्रकाराची चौकशी केली. बटन दाबावें व जिकडेतिकडे विजेचे बल्ब प्रकाशमान व्हावे त्याप्रमाणें एकाएकी पसरलेला हा संप होता. एका जॉबरनें विणकाम खात्यांतील एका जबाबदार कामगाराला शिवीगाळ केली व त्याच्या अंगावर हात टाकला. या बिजली संपाला जॉबरचा हा अत्याचार कारणीभूत झाला होता.

संपाची हाक झाल्याबरोबर स्त्री व पुरुष कामगार आपापली हातांतलीं कामें टाकून बाहेर पडले व गिरणीच्या दाराजवळच्या मैदानांत साहजिकच जमा झाले. म्यानेजर धांवत आला. तेथल्या एका ऑफिसच्या वरच्या पायरीवर तो उभा राहिला व त्यानें कामगारांना थांबण्यास सांगितलें. कामगार त्याच्यासमोर एकजुटीनें उभे राहिले. त्यानें लोकांना खालीं बसण्याबद्दल हातानें इशारा केला. नरमाईच्या स्वरांत तो कांहीं क्षण बोलला व नंतर आपल्या गिरणींत असल्या गमजा चालायच्या नाहींत, जॉबरनें ज्या कामगाराला मारलें असेल किंवा ज्याला तो बोलला असेल तो उगाच बोलला नसेल, कामगारांकडून कांहीं तशीच चूक झाली असेल, तेव्हां मुकाट्यानें सर्वांनी कामावर जावें एरवीं त्याचे परिणाम भयंकर होतील, अशी त्यानें शेवटीं धमकी दिली.

म्यानेजरची ही धमकी कामगारांच्या मनावर कांहींच परिणाम करूं शकली नाहीं. 'जॉबरला कामावरून काढून टाका,' 'त्याला आमच्यासमोर माफी मागायला लावा,' अशा आरोळ्या कामगारांच्या बाजूनें ऐकूं येऊं लागल्या. इतक्यांत एक तरुण कामगार या घोळक्यांतून पुढें आला व त्यानें दोन शब्द बोलण्याची म्यानेजरला परवानगी मागितली. हा तरुण कामगार दुसरा कोणी नसून दासू होता. त्याचा हा धीटपणा पाहून

म्यानेजरलाहि आश्चर्य वाटलें. गेली पांच सहा वर्षें बिनतक्रार आपल्या गिरणींत टिकून राहिलेला व आपल्या हुशारीनें पुढें आलेला हा कामगार आहे ही गोष्ट म्यानेजरला माहीत होती. दासूनें बोलण्याची परवानगी मागितल्यावर ती नाकारणें म्यानेजरला शक्य झालें नाहीं. परवानगी मिळाल्याबरोबर दासू थेट गर्दींतून जो बाहेर पडला तो म्यानेजर ज्या पायरीवर उभा राहून बोलत होता तिच्यावर तो चढला व म्यानेजरच्या बरोबरीनें उभा राहून तो बोलूं लागला. कांहीं म्यानेजरला उद्देशून व कांहीं कामगारांना उद्देशून असें तो बोलूं लागला.

' आम्ही कामगार असलों तरी माणसें आहोंत. आम्हाला रोजच्यारोज आमचे श्रम विकावे लागत असले तरी पूर्वीच्या कालाप्रमाणें आम्ही विकत घेतलेले गुलाम नाहीं. मालकांचे आम्ही गुलाम नाहीं तर रोजंदारीचे गुलाम आम्हीं आहों. आम्हालाहि कांहीं हक्क आहेत, आम्हालाहि कांहीं अब्रू आहे. गिरणींत आम्ही काम करण्याकरतां येतो. आमच्या कामांत कांहीं चुका होणें स्वाभाविक असलें तरी त्या चुका दाखवून देण्याचा हा मार्ग नाहीं. काम करण्याकरतां आम्ही येतो. वरच्या माणसाच्या शिव्या ऐकण्याकरतां व त्याचा मार खाण्याकरतां आम्ही येत नाहीं. ज्या जॉबरनें आमच्या एका भाईला मारलें तो येथें कुठं दिसत नाहीं. या बाबतींत मी चौकशी केली आहे. सुताची गुंतागुंत सोडविण्याकरतांच साचा कांहीं वेळ बंद पडला होता. कामगाराच्या तक्रारीकडे योग्य लक्ष न देतां जॉबरनें शिव्यागाळीला व मारामारीला सुरुवात केली. साचेवाले येथें हजर आहेत. जॉबरच्या अत्याचाराला बळी पडलेला कामगारहि येथें हजर आहे. कामगारानें उलट हात उचलला नाहीं किंवा उलट शिवीगाळही केली नाहीं. जुलमाचा प्रतिकार एककल्यानें न करतां सामुदायिकपणें कसा करावा हें आतां आम्हाला माहित झालें आहे. जॉबरलाच केवळ ताळ्यावर आणायचें तर हा विणकर कामगार कामगार एकटा समर्थ होता. त्यानें त्याला ताबडतोब जमिनीवर लोळविलें असतें. या कामगारावर झालेला अत्याचार कामगार वर्गावर झालेला अत्याचार आहे असें आम्ही समजतो म्हणूनच कामगारांनीं हा ताबडतोबीचा संप करण्याचें मनांत आणलें व कामहि बंद पाडलें. या बाबतींत म्यानेजरसाहेबांना आमची एक विनंति आहे. त्यांनीं आम्हाला कोणत्याहि प्रकारच्या धमक्या देऊं नयेत. त्यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं. आमची बाजू न्यायाची आहे. अत्याचार करणाऱ्या जॉबरला पुढे बोलावून सर्वांसमक्ष त्यानें आपल्या चुकीची माफी मागितली तर आम्ही सर्वजण या क्षणीं पुन्हा कामावर जाण्यास तयार आहों.'

दासूचें हें भाषण बिनतोड होतें. म्यानेजरनें प्रथम या प्रकरणाची चौकशी केली त्या वेळीं कामगाराचा कांहीं दोष नसून जॉबरनेंच अधिकारमदांत हा अत्याचार केला आहे असें त्यालाहि आढळून आलें होतें. पण जॉबरनें कामगाराची माफी

मागायची म्हणजे काय ? गिरणीच्या अधिकारी वर्गाच्या इभ्रतीला यामुळें धक्का बसणार म्हणून दमदाटीचा उपयोग करून कामगारांना ताळ्यावर आणण्याचा त्यानें प्रयत्न चालविला होता. पण दासूसारखा एक शांत डोक्याचा, विचारी व आपली बाजू बिनतोडपणें म्यानेजरपुढें मांडणारा पुढारी कामगाराला मिळाला.

सर्व कामगारांनीं दासूच्या या म्हणण्याचा पाठपुरावा केला. जॉबरनें माफी मागितल्यास कामावर जाण्याची तयारी दाखविली.

म्यानेजरचा चेहरा उतरला. या वेळपर्यंत इतरहि कांहीं अधिकारी या ठिकाणीं जमा झाले होते. म्यानेजरनें प्रसंगाचें महत्व जाणलें. आपली बाजू लंगडी असल्याचें त्याच्या लक्षांत आलें होतें. इभ्रत सांभाळण्याच्या भरीला तो पडला नाही. त्यानें जॉबरला कामगारासमक्ष आणून उभे केलें व त्याला माफी मागावयास लावलें.

कामगारांनीं लालबावट्याचा जयजयकार केला. दासूला अगदीं प्रत्यक्ष उचलून एकानें त्याला आपल्या खांद्यावर बसविलें व संपाचा पुढारी म्हणून नव्हे तर गिरणीमधून बाहेर न पडतां आपल्या वाक्चातुर्यानें कामगाराची मागणी पूर्ण करणारा पुढारी म्हणून त्याला मिरवीत ते गिरणीच्या निरनिराळ्या खात्यांत शिरले. थोड्याच वेळांत गिरणी पुन्हां पूर्वीप्रमाणें सुरू झाली.

कामगारांपुढें उभे राहून भाषण करण्याचा दासूचा हा पहिलाच प्रसंग होता व त्या प्रसंगांत त्यानें कामगारांना विजय मिळवून दिला होता. या प्रसंगामुळें तो कामगारांना प्रिय झाला तर अधिकारी वर्गात त्याच्या संबंधानें कुजबुज सुरू झाली. कामगारवर्गाला जो प्रिय वाटूं लागला तो अधिकारी वर्गाला कसा प्रिय वाटणार ?

दिग्विजय गिरणींत कामाला लागल्यापासून दासूसंबंधानें कोणी कधींच तक्रार केलेली नव्हती. आपल्या कामांत तो अत्यंत दक्ष होता. नवीन नवीन कामें तो शिकत गेला व त्याच्या कामांतील चोखपणामुळें त्याची बढतीहि होत गेली. आणि त्याच्या ठिकाणची हुशारी आतां कामगारांनाहि उपयोगी पडूं लागली ही गोष्ट त्याच्या वरच्या अधिकाऱ्यांना आवडेनाशी झाली. पण दासूच्या बाबतींत शिकायत करण्याला अवकाशच न मिळाल्यामुळें त्यांना चुप राहणें भागच पडलें.

' दासू कुठं इतकं बोलायला शिकला ? आपली बाजू त्यानं कशी छान मांडली. ' याबद्दल दासूच्या दोस्तांना आश्चर्य वाटलें तसाच त्याच्याबद्दल त्यांना आदरहि वाटूं लागला अन् दासूच्याहि मनांत या प्रसंगामुळें आत्मविश्वास उत्पन्न झाला. दिग्विजय गिरणींतील कामगारांचें लक्ष आपल्या युनियनकडे नव्हतें. दासूनें वरील प्रसंगाचा फायदा घेऊन गिरणींतील कामगारांना युनियनचे सभासद करून घेण्याचा प्रयत्न केला व त्यात त्याला बरेंच यश मिळालें.

सबंध दिवसभर गिरणीत काम केल्यानंतर करमणुकीकरता इकडे तिकडे भटकण्याचें सोडून तो थेट कामगार युनियनच्या दप्तरांत येऊं लागला. आपल्या गिरणींतल्या कामगारांना आपल्या बरोबर आणून त्यांना तो यूनियनचे सभासद बनवीत असें व हें काम संपल्यानंतर यूनियनच्या दप्तरांत जे कामगार आपल्या तक्रारी घेऊन येत त्याहि तो लक्षपूर्वक ऐकत असे. नाना प्रकारच्या या तक्रारी असत. पण त्या गिरणी मालकाकडून मिटवून घ्यायच्या तर या बाबतींत कामगारांना जे कायदेशीर हक्क आहेत ते समजून घेणें जरूरीचें आहे असें. त्याला वाटूं लागलें. हे कायदे इंग्रजींत असले तरी यूनियनच्या कार्यकर्त्याकडून त्याचे मराठी तर्जुमे त्यानें मागवून घेतले व ते सारेच्या सारे थोड्याच दिवसांत वाचून काढले.

एकदा गिरणीतून काम संपवून बाहेर पडतांना वाइंडिंग खात्यांतील कांही स्त्रियांनीं त्याला गांठलें. त्यांचे प्रसूतीचे दिवस जवळ आले होते. व कायद्याप्रमाणें त्यांना योग्य अलावन्स मिळावा म्हणून त्यांनीं गिरणीच्या अधिकाऱ्याकडे अर्ज केला होता. पण नियमाप्रमाणें प्रसूतीपूर्वीची सहा महिन्यांची त्यांची हजेरी भरत नाहीं असें सांगून त्यांच्या अर्जाला वाटाण्याच्या अक्षता लावण्यांत आल्या होत्या. बायांचें म्हणणें असें कीं, आपण सबंध वर्षात कधींच काम सोडलें नाहीं. पण तें सिद्ध व्हावें कसें ? दासूनें या बाबतींत बायांच्या कामावर देखरेख करणाऱ्या नायकिणीचें हजेरी बुक मोठ्या कुशलतेनें मिळविलें. या बुकांत या बायांची वर्षभराची बिनचुक हजेरी दाखल असलेली त्याला आढळली. यूनियनच्या कार्यकर्त्यामार्फत वरील पुराव्यासह त्यानें योग्य त्या सरकारी अधिकाऱ्यांकडे या स्त्री कामगारांचा अर्ज पाठविला. सरकारी चौकशींत आढळून आलें कीं, गिरणीच्या आफिसच्या हजेरी बुकांत या स्त्रियांच्या नावावर गैरहजेरी मांडण्यांत आली आहे. कायदेशीर रीतीनें या गरोदर स्त्रियांचा प्रसूती भत्ता बुडविण्याकरतां गिरणीच्या अधिकाऱ्यांनीं ही कारवाई केली होती. दासूच्या खटपटीनें या स्त्रियांना भरपूर भत्ता मिळाला इतकेंच नव्हे तर सरकारी अधिकाऱ्यांनी गिरणी मालकाला असल्या दोन हजीरींतल्या तफावतीबद्दल दोषी ठरवून दंडहि केला. वर्तमान पत्रांतून जेव्हां हें प्रकरण प्रगट झालें तेव्हां गिरणी मालकांच्या या कारवाईचा सर्वत्र बोभाटा झाला.

दासूच्या चाणाक्षपणाची प्रतीती आणखी एका प्रसंगीं चांगलीच आली. दिग्विजय गिरणीच्या मालकानें एकदां गिरणीचें काम दहा मिनिटें उशीरा बंद केलें. दहा मिनिटें सर्व कामगारांना जास्त राबवून घेतलें अशी कुरबूर कांहीं कामगारांनीं आपसांत केली. सामान्य कामगारांना इतका काटेकोरपणा कोठून लक्षांत येणार ? गिरणी मालकाला ताळ्यावर आणण्याला ही संधी चांगली आहे असें पाहून दासूनें आपल्यांतील कांहीं कामगारांना यूनियनच्या ऑफिसांत पाठविलें. स्वतः तो जवळच्याच

इराणी हॉटेलमधील टेलीफोनवर गेला व यूनियनच्या सेक्रेटरीला ही गोष्ट त्यानें कळविली. यूनियनच्या सेक्रेटरीनें तावडतोब मालकाला फोन करून या बाबतींत चौकशी केली. मालकानें या बाबतींत किंचित कांकू करतांच यासंबंधांत आपल्यापाशीं पक्का पुरावा आहे, गिरणींतून कोणताहि कामगार ही गोष्ट शपथेवर सांगेल असें म्हटल्यावर मालकाला हा दहा मिनिटांचा ओव्हर टाइम कबूल करावा लागला व या जादा वेळेची मजुरीहि देण्याचें त्याला कबूल करावें लागलें. हॉटेलमध्यें जाऊन दासू टेलिफोन हाताळूं लागला त्या वेळीं ही कला त्यानें केव्हां हस्तगत केली याबद्दल त्याच्या दोस्तांना आश्चर्य वाटलें. पण त्यापेक्षांहि प्रसंगावधान राखून सर्व कामगारांना त्यानें दहा मिनिटाची ओव्हर टाइमची मजूरी मालकाला कबूल करावयास लावली त्या वेळीं तर दासूच्या दक्षतेबद्दल त्यांना कौतुक वाटलें.

आपल्या हक्काच्या संरक्षणाकरतां कामगारांनीं डोळ्यांत तेल घालून दक्ष राहिलें पाहिजे असें दासू नेहमींच सांगत असे. पण त्यापूर्वीं कामगारांना त्यांचे सर्व प्रकारचे हक्क समजावून दिले पाहिजेत असा त्याचा आग्रह असे. कामगारांच्या यूनियनमध्यें तो काम करूं लागला तेव्हांपासून त्यानें या जागृतीच्या कामाला सुरुवात केली होती. कामगारांच्या सर्व लहान मोठ्या तक्रारी दूर करणें हें तर यूनियनचें काम आहेच पण त्यापेक्षांहि कामगाराला वर्गजागृत करणें हें यूनियनचें पहिलें कर्तव्य आहे असें अधिकारानें यूनियनच्या कार्यकर्त्यांना सांगण्याइतकी स्वतःची तयारी दासूनें केली होती. कामगारविषयक कायद्याचे मिळतील ते मराठी तर्जुमे त्यानें वाचून टाकले होते त्याच प्रमाणें कामगार विषयक मराठींत झालेलें वाङ्मयहि त्यानें वाचण्यास आरंभ केला होता. गिरणीच्या कामाखेरीज राहिलेल्या वेळापैकीं बराचसा वेळ तो यूनियनच्या दप्तरांतच घालवी. यामुळें यूनियनच्या सर्व कामाची माहिती त्याला झाली. ज्या त्या गोष्टीची चौकसपणें विचारपूस करणाऱ्या दासूनें टेलीफोनवर बोलण्याची संवय केली यांत कांहींच आश्चर्य नव्हतें. ही तर एक क्षुल्लक गोष्ट होती.

केवळ दासूच्या उद्योगामुळें दिग्विजय गिरणीच्या मालकाला दहा मिनिटाचा ओव्हरटाईम कामगारांना द्यावा लागला ही गोष्ट बाहेर पडली त्या वेळीं दासू पांडू दळवी याचें नाव गिरणी मालकाच्या ब्लॅकलिस्टांत जाऊन पडलें. हा तरुण पोरगा मालकाला दहशतीसारखाच वाटूं लागला. अन् याच्या उलट कामगारांना दासू म्हणजे आपला एक मोठा आधार आहे असें वाटूं लागलें.

सात वाजले. गिरणीची शीट वाजली. कामगार गिरणींतून घोळक्या घोळक्यानें बाहेर पडूं लागले. त्यांचे चेहरे उतरले होते. ते गळून गेले होते. चरकांतून पिळून निघालेल्या उसाप्रमाणें त्यांची शरीरें रक्तहीन व निस्तेज दिसत होतीं. गिरणीच्या गेटांतून ते एकमेकांना ढकलीत भराभर बाहेर पडत होते. सकाळीं पांच साडेपांचला

आपल्या खोल्यांतून बाहेर पडावें, गडबडीनें गिरणी गांठावी, आपापल्या कामावर रूजू व्हावें. रोज तेंच तेंच काम. जड लोखंडी यंत्राचें ठीक आहे. एंजिनची चाकें, त्यांना जोडलेले पट्टे, पट्टयांनीं फिरवलेली शेकडों लहान मोठीं चाकें, आपल्यावर पट्टा पांघरून चाकांनीं चालविलेलीं अनेकविध कामें करणारी यंत्रें रोज एकाच दिशेनें फिरत एकाच प्रकारची तींच तींच कामे करीत. पण या यंत्रांना जोडलेल्या सजीव यंत्रांनीसुद्धां रोज रोज तसलींच कामें अगदीं न चुकतां केलीं पाहिजेत. यंत्राची घरघर, चात्यांचा किलबिलाट, धोट्यांचा खडखडाट सारखे दहा दहा तास ऐकत राहून कामगारांचे कान दमून जातात. निरनिराळ्या खात्यांतील कुंद वातावरण अन् वरच्या अधिकाऱ्याची जरब कामगारांच्या मनाला कंटाळा आणतात. यामुळें गिरणी सुटण्याची शिटी झाल्यावर कामगारांना हायसें वाटतें व कधीं एकदां मोकळ्या हवेंत जातो असें त्यांना होतें. जो तो गिरणीपासून दूर दूर पळून जाण्याचा प्रयत्न करतो. कामगारांच्या मागें हें गिरणीचें भूत रोजच लागलेलें असतें. पोटाकरतां दोन घास पाहिजेत ना, मग या भुताच्या स्वाधीन झालें पाहिजे व तें नाचवील तसें नाचलें पाहिजे. गिरणीचं हं भूत कामगारांच्या अंगांत शिरून त्याला पिळून काढतें, त्यांच्या शरीराच्या चोयट्या बनवितें. रोजचा हा अनुभव असतांना सुद्धां रोजच्या रोज दहा अकरा तास आपलीं शरीरें गिरणीच्या कारखानदार भुतांना विकलींच पाहिजेत. गिरणींतून बाहेर पडलेल्या कामगारांच्या मनांत असले नाउमेदीचे विचार येत असतील का? अथवा हे विचार मनांत येऊन तरी काय उपयोग? त्यांतून सुटका थोडीच होणार आहे?

म्हणूनच प्रत्येक कामगार गिरणीबाहेर पडतांच तिला विसरून जाण्याचा प्रयत्न करतो. दासू व त्याचे दोस्त असेच एकदां गिरणींतून बाहेर पडले. गिरणीचा विसर पाडण्याकरतां दासू अलीकडे नेहमीच कामगार यूनियनच्या दप्तराच्या आश्रय घेई पण दासूच्या दोस्तांनीं त्याला तसें करूं दिलें नाहीं. ते त्याला प्रथम हॉटेलामध्ये घेऊन गेले. तेथें त्यांनीं चहा घेतला. नंतर एकानें सुचविलें 'चल। आपण आज राणीच्या बागेंत जाऊं.'

'कां, आज तुम्ही हें काय आरंभलें आहे?' दासूनें प्रश्न केला.

'आज तुझ्याबरोबर आम्हाला पुष्कळ बोलायचं आहे.'

'मग यूनियनच्या आफिसांत जाऊं. राणीच्या बागेंत कशाला?'

'रोज यूनियनमध्यें जातोसच तूं दासू. आमच्याबरोबर आज चल बागेंत. तिथं थोडी आपण मजा करूं.'

'मला नाहीं तिथं मजा वाटायची. श्रीमंत लोकांच्या फिरायच्या जागा त्या. अन् फिरायला न् मजा करायला आमच्यासारख्या मजूरांना वेळ तरी कुठं असतो.'

'राणीचा बाग केवळ श्रीमंतांकरतां नाहीं. मजूरांकरतांहि आहे. मजुरांचाहि त्यावर हक्क आहे.' एक दोस्त म्हणाला.

'मजूरांना मजा करायला वेळ नसतो खरा पण आजच्याप्रमाणें जेव्हां केव्हां वेळ मिळतो त्या वेळीं राणीच्या बागेंतच मजुरांनीं कां जाऊं नये?' दुसऱ्यानें पुष्टी दिली.

'तुमचा आग्रहच असेल तर चला बुवा!'

दासूची संमति मिळाल्यावर हे सर्व मजूर दोस्त राणीच्या बागेंत येऊन पोचले.

इतक्यांत त्यांच्या मागून दोन मोटारी आल्या. त्यांतून पुरुष स्त्रिया न् मुलें अशी आठ दहा मंडळी खाली उतरली. पोषाखावरून व वर्गावरून हें श्रीमंताचें कुटुंब होतें हें दासू वगैरे मंडळीना उघडच दिसलें. स्त्रियांच्या जरीकांठी साड्या, त्यांच्या गळ्यांतले व हातांतले सोन्यामोत्यांचे निवडक दागिने, मुलांच्या जरीच्या टोप्या व त्यांच्या तलम कापडाच्या शेरवान्या व विजारी हें पाहून दासूच्या दोस्तांचे डोळे दिपून गेले. या स्त्रियांबरोबर असलेले पुरुषहि तसल्याच भपकेदार व किमतीच्या पोषाखानें झांकलेले होते. स्त्रिया मोटारींतून खालीं उतरल्या त्या खिदळतच उतरल्या. पुरुषांनीं त्यांना साथ दिली. बरोबरच्या नोकरांनीं मुलांना हातांत धरून चालविलें होतें. त्यातलीं एक दोन उच्छृंखल मुलें पुढें धावूं लागलीं. त्यांना आवरतां आवरतां नोकरांना पुरेवाट झाली. त्यांतील एका तरुण मुलीनें ठेचकळल्याचें निमित्त केल्याबरोबर एका तरुणानें तिला सावरून धरलें त्याबरोबर या कुटुंबांत आणखी मोठाच हशा पिकला. संध्याकाळची वेळ होती. सूर्याचीं सोनेरी किरणें बागेच्या सुंदर फुलझाडांवर पडून त्यांची शोभा वाढवीत होतीं. बागेतींल दळदार गुलाब आनंदानें डुलत होते त्याप्रमाणें त्या गुलाबांनाहि लाजविणारे व रंगरंगोटीनें सजविलेले या स्त्रियांचे गुलाबी चेहरे लोकांचे डोळे आपल्याकडे आकर्षून घेत होते.

पण दासू व त्याचे दोस्त श्रीमंतांच्या या चोचल्यांकडे पाहात राहिले नाहींत. त्याच्याकडे पाहून दासूच्या चेहऱ्यावर तर तिरस्काराच्या रेषा उमटल्या. एका हिरवळीवर बसण्याकरतां ते जाऊं लागले.

'त्या अंजिरी साडीच्या मुलीला बाजारांत नेऊन उभें केलें व तिच्या आंगावरील दागिने व पोषाख विकला तर आमच्या शंभर कामगार स्त्रियांना लागणारीं वर्षाचीं लुगडीं घेतां येतील.' दासूच्या दोस्तांपैकीं एकजण हिरवळीवर बसतां बसतां म्हणाला.

'अरे तो त्यांच्या मागून सावकाश चालणारा हत्तीच्या पिलासारखा गोरापान माणूस पहा ना. याच्या अंगावर हें इतकें मांस चढलें कोठून? आपल्या सर्वांच्या वजनापेक्षांहि त्याचं वजन जास्त असेल.' दुसरा म्हणाला.

'केवळ चेष्टा करण्यासारखी ही गोष्ट नाहीं. आपल्या समाजांतील भेदाचं हें प्रत्यक्ष उदाहरण आहे.' दासू गंभीरपणें म्हणाला.

'खरोखरच हें असं कां असावं समजत नाहीं.' दासूच्या दोस्तांपैकीं एक साधारण अल्लड वयाचा पोरगा म्हणाला. 'माझा हा शर्ट फाटत चालला आहे. कोपरा-पाशीं तो फाटला आहे. पाठीवरहि फाटत चालला आहे. दुसरा शर्ट करीन म्हणतों तर तीन महिने सवडच होत नाहीं. अन् या फाटक्या शर्टाकरतां मी दिवसभर काम करतों मग असल्या रेशमी उंची तलम पोशाखांकरतां या लोकांना किती काम करावें लागत असेल.'

आपल्या या अल्लड दोस्ताचें हें बोलणें ऐकून दासूसकट सर्वच कामगार दोस्त खदखदा हंसले.

'राम्या लेका फाटक्या शर्टकरतां दिवसभर कां तीन तीन महिने तूं राबतोस पण उंची, तलम मौल्यवान् पोषाकाकरतां या लोकांना मुळींच राबावें लागत नाहीं.' एकानें या अल्लड कामगाराला उत्तर दिलें.

'मग काय या रेशमी साड्यांना, शेरवान्यांना, जरीच्या टोप्यांना लागणारा पैसा वरून आकाशांतून खालीं पडतो वाटतं.'

रामाचें हें बोलणें ऐकून दासूनें त्याच्याकडे कौतुकानें पाहिलें. त्याचा चेहरा सस्मित झाला. त्याला कसें उत्तर द्यावें याचा तो विचार करूं लागला.

'आकाशांतून कशाला पडायला पाहिजेत. तिजोरी भरली आहे ना!' दुसऱ्याच एका दोस्तानें रामाला उत्तर देण्याचा प्रयत्न केला.

हें उत्तर अर्थात् समाधानकारक नव्हतें.

'तिजोरींत तरी पैसे कुठून आले? ती रोजच्या रोज कोंबडी अंडी घालते त्याप्रमाणें वीत तर नाहीं?' रामानें चटकन् अगदीं अपेक्षित असाच प्रश्न केला.

दासू अद्याप विचारच करीत होता. कसें उत्तर द्यावें?

'पैसे आकाशांतूनहि पडत नाहींत व तिजोरीहि रुपयांच्या नोटा वीत नाहीं.' दासू बोलूं लागला. 'रामू तूं गिरणींत दिवसभर राबतोस तुला किती मजूरी मिळते दहा आणे, दहा आण्याकरतां तूं दहा तास राबतोस. या दहा तासांच्या मेहनतीची किंमत म्हणून तुझ्या हातांत दहा आणे पडतात.'

दासू रामूच्या प्रश्नाला उत्तर देऊं लागला व आपण यूनियनच्या ऑफिसांत न जातां बागेंत आलों हें बरें झालें अन् बागेंत केवळ चकाट्या न पिटतां समाजांतील वर्गभेदाचा व समाजांत वावरणाऱ्या पैशाच्या उत्पादनाचा प्रश्न चर्चेला निघाला हें पाहून तर त्याला जास्तच बरें वाटलें.

‘ तुझ्या म्हणण्याप्रमाणें पैसे मिळवून शर्ट शिवायचा असें जर या श्रीमंतांना करावें लागलें तर एकच जन्म काय अनेक जन्म ते राबले तरी त्यांना असले उंची कपडे करतां यावयाचे नाहींत. आतांच आपल्यापैकीं एकानें त्या तरुण बायांच्या अंगावरील साड्यांची व दागिन्यांची किंमत केली. खरोखरीच हजारों रुपये किंमतीचा माल तिच्या अंगावर होता. रामू तुझ्या बहिणीप्रमाणें ही बाई जर वाइंडिंग खात्यांत काम करूं लागली तर हिला असा पोषाख करतां येईल ? कधींच नाहीं. तेव्हां एक गोष्ट खरी कीं प्रामाणिकपणानें रोज मजूरी मिळवून इतके मौल्यवान कपडे व दागिने घालण्याइतके पैसे जमा करतां येत नाहींत.’

‘ हें तर उघडच आहे. ती अंजीरी साडी नेसलेली बया अन् तिच्याबरोबर गुलाबी लफ्फेदार पातळ चापून चोपून नेसून उंच चकचकीत बुटांच्या टांचावर फुलपांखराप्रमाणें उडत चालणारी तिची सोबतीण मजूरी कसली करणार ? सुताच्या कांड्या भरलेला हारा तिच्या डोक्यावर दिला कीं ती मटकन् खालींच बसेल. आमच्या आया बहिणींप्रमाणें या काम करूं लागल्या तर त्यांची फ्यां फ्यां उडेल.’

‘ कोण हा बोलला सदू कां, जाऊं दे रे, त्यांची चेष्टा कशाला करायची ! या लोकांनीं मजूरीवर पैसे मिळवून अशा चैनी करायच्या म्हटलें तर तें शक्य नाहीं एवढेंच त्यापासून घ्यायचें.’ दासूनें सदूला गप्प बसविलें.

‘मग सांगा कीं, त्या बाईला अंजीरी साडी व मोत्याची माळ घ्यायला पैसे कुठून मिळाले ? ’ सदूनें विचारलें.

‘ हे पैसे त्यांना तुम्ही मिळवून दिले. ’ दासू म्हणाला.

‘ आम्ही मिळवून दिले ! आम्ही मिळवून दिले ! ’ दासूचे सगळेच दोस्त एकदम म्हणाले.

‘ होय तुम्हीच मिळवून दिले. ’ एक तिसराच आवाज दासूच्या दोस्तांच्या कानीं पडला. हे उद्गार या मंडळीजवळच थोड्या अंतरावर बसलेल्या मोटार ड्रायव्हरचे होते. या मंडळींना घेऊन आलेल्या दोन मोटार ड्रायव्हरांपैकीं हा ड्रायव्हर होता. त्यानें दासूला दुरूनच ओळखलें होतें. दिग्विजय गिरणींत एक लहानसा संप झाला त्या दिवशीं म्यानेजरजवळ धीटपणें उभा राहून बोलत असतांना त्यानें दासूला पाहिलें होतें. तेव्हां दासू व त्याचे दोस्त ज्या ठिकाणीं बसले होते तिकडे तो आला होता व या मंडळींत चाललेली वाटाघाट तो ऐकत होता.

‘ अरे दिग्विजय गिरणीच्या मालकाचें हें कुटुंब. तुम्ही सर्व तिथंच काम करतां नाहीं का ? दासूला दाराजवळ मी पाहिलें तेव्हांच मी तें ताडलें. तुम्ही सर्वजण त्या गिरणींत राबतां अन् तुमच्या जिवावर हे लोक आपली चैन चालवीत आहेत. ’ ड्रायव्हर सहज बोलला.

' असें मोघम बोलून नाहीं चालणार. एवढें बरें झालें कीं, ही मंडळी कोण आहेत तें समजलें. ' दासू बोलूं लागला. ' या लोकांना चैन करायला पैसे कसे मिळाले हें सांगायला आतां सोपें जाईल. हें पहा मंडळी, दिग्विजय गिरणींत कापूस पिंजण्यापासून कापड विणेपर्यंत व तें रंगविण्यापर्यंत सगळीं कामें होतात. गिरणींत एकंदर स्त्री पुरुष धरून पंधराशें कामगार आहेत. '

' नको बुवा ते आंकडे, ' दासूचें बोलणें पुरे होण्यापूर्वींच त्यांचा आणखी एक दोस्त गोविंदा म्हणाला. ' आम्ही इतके दीड हजार मजूर गिरणींत काम करतों, आम्ही सर्व भुकेले राहतों, आमच्यांतल्या एका कामगाराला तीन महिने झाले तरी फाटका शर्ट टाकून देऊन नवा शर्ट घेतां येत नाहीं अन् या मालकांच्या टवळ्या रेशमी साड्या नेसून व मोत्याच्या माळा घालून आमच्यापुढें नाचतात. माझी मावशी गेले दोन महिने आजारी आहे. डाक्टर तिला इंजेक्शन द्यायला पाहिजे म्हणतो. मजजवळ त्याच्याकरतां एक पैसाहि शिल्लक नाहीं. '

' अरे, मी तरी तेंच सांगणार होतों. मालक आम्हाला दहा तास राबवून जो माल तयार करून घेतो त्याच्या किंमतीचा दहावा हिस्साहि तो आम्हाला देत नाहीं. नऊ तासाच्या आमच्या कामाचा पैसा तो खातो व एक तासाचा मोबदलासुद्धां आमच्या पदरांत पडत नाहीं. '

' काय म्हणतोस दासू,' रामा बोलूं लागला. ' म्हणजे आम्ही मालकाला लाखो रुपये मिळवून देण्याकरतांच नऊ तास राबतो असंच नाहीं का ? '

' कां आतां कळलं कीं नाहीं या मालकाच्या तिजोरींत पैसा कुठून आला तो.' सदूनें रामूला टोकलें.

' म्हणजे नऊ तास आम्हाला राबवून, आम्हाला चिपाडें बनवूनच मालकाच्या अंगावर इतकं मांस चढलं आहे असंच म्हण ना. ' गोविंदा एकदम चवताळून म्हणाला.

' आतां माझ्या लक्षांत आलं. ' आतापर्यंत अगदीं गप्प बसलेला एक दोस्त उद्गारला.

' काय लक्षांत आलं ? आतां तुला वाचा फुटली. काय लक्षांत काय आलं ? ' रामू त्याला उद्देशून म्हणाला.

' परवा ती मे दिनाची सभा झाली ना ! तेव्हां एकानें सांगितलें कीं, गिरणी मालक, भांडवलवाले, आमचं रक्त शोषून घेतात. ती गोष्ट मला आतां बरोबर समजली. दहा तास आम्हाला जनावरासारखे राबवून त्याचा मोबदला ते आम्हांला कांहींच देत नाहींत. कसें तरि जीवंत राहतां येईल व राबतां येईल एवढींच चिपाडें ते आमच्यापुढें टाकतात. वांबोरीस माझ्या घराजवळच एक टांगेवाला आहे. तो घोड्याला झोडप झोडप झोडपतो. स्टेशनच्या खेपा करतां करतां घोड्याची हाडंन् हाडं निघालीं

आहेत. त्याला तो कांहींच खायला घालीत नाहीं. गाडीखान्यांत राहिलेलीं चिपाडें त्याची बायको गोळा करून आणते तीं त्याच्यापुढें टाकतात. घोड्याला मारून मारून मिळालेलं भाडं हा टांगेवालाच खाऊन जातो. '

' पुरे तुझी ती रामकहाणी. हातांतल्या कांकणाला आरसा कशाला. ' सदू मध्येंच ओरडला. 'भाड्याचीं तट्टं, अन् विसरलोंच, लोणाऱ्याचीं गाढवं इथं काय कमी आहेत ? तुझा तो वांबोरीचा टांगेवाला घोड्यापुढं चिपाडं तरी टाकतो पण दिवसभर मातीच्या व दगडाच्या गोण्या वाहून घेऊन रात्रीं उकिरड्यावर गाढवाला सोटा मारून लोणारी हांकून लावतो. रात्री उकिरडा फुंकावा अन् दिवसभर पाठ मोडेपर्यंत गोण्या वहाव्या.'

"वाहवा, तूं सुद्धां नीच रामकहाणी सुरू केलीस ! ' गोविंदा बोलला. ' सगळ्याचं तात्पर्य काय तर मालक आमच्या श्रमाचा योग्य मोबदला आम्हांला देत नाहीं. आम्ही उत्पन्न केलेल्या मालाचे पैसे स्वतः हबकून बसतो नि गिरणींत कामावर येणारे मेले गेले तरी पर्वा करीत नाही, हेंच ना ! '

' मालक आमचं रक्त खातो, आमच्या श्रमाचे पैसे चोरतो. '

' अरे, हो हो, रामू ! ' दासूनं रामूला बोलतांना थांबविलं.

' पण आम्ही पंधराशें माणसं, तो एक मालक. एक मालक पंधराशें माणसांच्या श्रमाचे पैसे चोरतो याचा अर्थ काय ? ' सदू उद्गारला.

' अरे, हेंच तर मला आतां सांगायचं आहे.' दासू म्हणाला.

' बरं बोला, पुढारी, बोला आतां, हा मालक इतकी मोठी चोरी करतो अन् ती कशी अगदीं बेमालूम पोलिसाच्या तडाक्यांत न सांपडतां कशी करतो. हें समजत नाहीं.' रामू गळाठलेल्या स्वरांत बोलला.

' कायदेशीर व बेकायदेशीर. चोरी दोन प्रकारची असते.' दासूनं बोलण्यास आरंभ केला.

' कायदेशीर चोरी ! ' रामू उद्गारला.

' ए रामू, थांबशील का नाहीं. ' गोविंदानं त्याला दाबलं.

' हो, कायदेशीर चोरी,' दासू ठांसून म्हणाला. ' मालक वर्ग जी चोरी करतो ती कायदेशीर चोरी असते. आमच्या डोळ्यांदेखत आमच्या श्रमाचे पैसे तिजोरींत भरतो पण आम्हाला कांहीं बोलतां येत नाहीं व पोलिसहि त्याला पकडीत नाहीं. एकाद्या माणसानें तुमची वस्तु तुम्हाला नकळत लांबविली व त्याचें हें कृत्य उघडकीस आलें तर लगेच पोलिस त्याला पकडते व कोर्टापुढें उभा करून त्याला शिक्षाहि देण्यांत येते. दरवडेखोरांच्या टोळीनें संगमनेरच्या एका मारवाड्याच्या घरावर दरवडा घालून त्याची तिजोरी फोडली, व घरांतली इतर चीजवस्तहि लांबविली.

मारवाडी मध्यें आला तेव्हां त्याला त्यांनीं कापूनहि काढलें. पोलिसनें सहा महिन्यांनीं या गुन्ह्याचा तलास लावला. दरवडेखोरांना लहान मोठ्या मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या. चोरांनीं व दरवडेखोरांच्या टोळीनें हें जें कृत्य केलें तें बेकायदेशीर होतें. कारण दुसऱ्याची वस्तु मालकाला न कळत वा मालकावर जबरदस्ती करून लांबविणें या कृत्याला कायदा कधींच संमती देत नाहीं. अन् उलट मालकवर्ग रोजच्यारोज दिवसाढवळ्या आमच्या श्रमावर दरवडा घालतो त्याचा हा गुन्हा कायद्यांत सांपडत नाहीं. उलट या कृत्याला कायद्याची संमतीहि असते. मजुरांना कामावर ठेवून त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला दिला नाहीं तर ती चोरी होते असें कुठलाहि कायदा सांगत नाहीं. मजूर कामावर लागले. मिळाली तेवढी मजुरी त्यांनीं घेतली. पण या मजुरांनीं श्रम किती केले व त्याचा फायदा मालकानें किती घेतला याचा विचार कायदा करीत नाहीं. मालकांनीं दिली ती मजुरी कामगारांनीं स्वखुषीनें घेतली. मालकानें पुढें काय केलें, कामगारांना योग्य मजुरी दिली कीं नाहीं किंवा त्यांच्याकडून किती माल काढून घेतला, तो कसा विकला, याचा विचार कायदा काय म्हणून करील? मालकांच्या या चोरीच्या कृत्याला कामगारांची संमतीच होती, असेंच उलट कायदा म्हणेल. आपण आपले श्रम मालकाला खुशाल लुटूं दिले तर कायदा तरी काय करील व पोलिस तरी काय करील? मालक तुमच्या श्रमाची चोरी करतो असें वाटत असेल तर त्याच्या कारखान्यांत जाऊन श्रम करतां कशाला?'

'अस्सं अस्सं. मोठाच पेंच आहे म्हणायचा.' सदू मध्येंच म्हणाला. 'कामावर जावें तरी पंचाईत, न जावें तरी पंचाईत. जावें तर देईल ती मजूरी घ्यावी नाहींतर घरीं बसावें असंच कीं नाहीं.'

'होय अगदी असेंच. समजलं का रामू, गोविंदा, यालाच म्हणतात भांडवलशाही.'

'भांडवलशाही नष्ट करा असं त्या मे दिनाच्या सभेत कामगार ओरडत होते खरे. पण ती साम्राज्यशाही कुठली तिलाहि हाणून पाडा असाहि त्यांनीं घोष चालविला होता.'

'साम्राज्यशाही म्हणजे भांडवलशाहीची वडिल बहीण. ही बहीण इतकी चतुर व कजाग असते कीं आपल्या सर्व बहिणींना ती एकत्र आणते व देशोदेशीच्या मजूरांच्या श्रमांची चोरी करण्याकरतां त्यांच्यावर सत्ता गाजविते.' दासूनें उत्तर दिलें.

'हा तर दुसराच विषय निघाला.' सदूनें उच्चरिलें.

'दुसरा विषय कसला! मजूरांना लुटण्याकरतां जमा झालेली ही दरवडेखोरांची टोळी आहे. ही अगदीं एकोप्यानें जगांतल्या सर्वच कामगारांवर हल्ला करीत असते.'

'तें राहू दे रे बुवा. दासू, समज उद्यां आपण आमच्या मालकापाशीं जास्त मजूरी मागितली व ती दिल्याशिवाय आम्ही काम करीत नाहीं असं म्हटलं तर. अगोदर आपल्या पुरतं बोल मग जगाच्या गोष्टी.' सदूनें विचारलें.

'बेकार थोडे का आहेत. तुम्ही असें कांहीं म्हणालांत कीं आजची मजूरीच काय त्याच्यापेक्षांहि कमी मजूरी घेऊन काम करायला त्याला माणसें मिळतील. सदू-भाऊ, हा हट्ट एकट्या दुकट्या गिरणीच्या कामगारांनीं करून चालत नाहीं.'

'मग काय मुंबईतील समग्रा गिरणीकामगारांनीं असा हट्ट धरला तर.'

'तर मात्र गोष्ट निराळी.' दासू म्हणाला.

'मग तरी कायदा व पोलिस आपल्याला मदत करील ?'

'तें मात्र व्हायचें नाहीं. कामगारांना मदत करण्याऐवजीं गिरणीमालकांनाच कायदा व पोलिस मदत करील. असले कांहीं केलेंत कीं, तुम्हाला देशांतला कापडाचा धंदा बुडवायचा आहे, कापड विणायचें बंद करून लोकांचें तुम्ही नुकसान करीत आहां, लोकांना कापड वापरायला मिळायचें नाहीं, असले कांहीं आरोप तुमच्यावर ठेवतील. योग्य मजूरी दिली पाहिजे, श्रमाचा योग्य मोबदला दिला पाहिजे, असल्या गोष्टी ते ऐकायचे नाहींत.'

'मग पोलिस व कायदा केलाय कशाला ? गरीब मजुरांना जर तो मदत करणार नाहीं......'

'हेंच तर मी मघाशीं सांगणार होतों. तुला तो दुसरा विषय वाटला. आजचं सरकार म्हणजे भांडवलशाहीचं व साम्राज्यशाहीचं सरकार. कायदा त्यांनींच केला आहे. पोलिस त्यांचंच आहे. कायद्याच्या तोफेचं तोंड त्यांना हवं तेव्हां हवं तिकडे वळविता येतं.'

'मग काय......'

'कळलं कळलं रामू तूं काय म्हणणार तें. निराश व्हायचं कांहींच कारण नाहीं. भांडवलवाले व सरकार जसे एकोप्यानें वागतात तसेच आपणहि जर एकोप्यानं वागलों तर आपली कोणतीहि मागणी आपल्याला पुरी करून घेतां येईल.'

"भांडवलशाही व साम्राज्यशाही हाणून पाडतां येईल.' रामू ओरडला. कधीं न हसणारा दासू मोठ्यानें खदखदां हसला.

'किती अल्लड आहेस तूं रामू. तूं खरा कामगार आहेस.' असें म्हणून जवळ बसलेल्या रामूच्या बगलेंत हात घालून त्यानें त्याला जवळ ओढले व आपल्या छातीशीं लावलें.

'काय छान चांदणं पडलंय.' एकजण म्हणाला.

'किती उशीर आपण बोलत बसलों.' दुसरा एक दोस्त म्हणाला.

'खानावळीणबाई आपल्याला भाकरी देईल का?' तिसऱ्या एकानें भीति व्यक्त केली.

'नाहीं तर चहा भजीं आहेतच कीं, दासूला त्यांची आज मजा चाखवूं.' सदूनें धीर दिला.

बागेच्या फाटकाजवळ ही सर्व दोस्त मंडळी आली. ट्रॅम उभीच होती. सर्व तींत भराभर शिरले. लालबागच्या स्टँडवर उतरेपर्यंत ट्रॅम कंडक्टरला या मंडळीपाशीं तिकिट देण्याकरतां यायला वेळच झाला नाहीं.

# १५

प्रो. मधुपे भारत सेवक समाजातर्फे कामगार चळवळींत शिरले तरी त्यांच्या मागच्या 'प्रोफेसर' पदवीनें त्यांना सोडलें नव्हतें. ते कोणत्याहि कामगार यूनियनच्या सभांना हजर राहिले म्हणजे 'या प्रोफेसर' या उद्गारांनीं कामगार पुढारी त्यांचें स्वागत करीत असत. प्रो. मधुपे हे जातीचे साहित्यिक. ललित वाङ्मयाकडे त्यांचा विशेष ओढा. पण 'कलेकरितां कला' या भ्रामक समजुतीच्या मागें न लागतां व केवळ शब्दचातुर्यानें व लालित्यानें जनमनाला रंजवीत बसण्यापेक्षां जनमनाशीं तादात्म्य पावून, सामान्य जनतेच्या सुखदुःखांत प्रत्यक्ष मिसळून आपल्यांतील कर्तृत्वशक्तीचा उपयोग जनतेचा संसार अधिक सुखी करण्यासाठीं करतां आला तर अधिक बरें असें त्यांना वाटूं लागलें. तेव्हांपासून कॉलेजांतील प्रोफेसरीकडचें त्यांचें लक्ष उडालें व ललित वाङ्मय-लेखनाकडला त्यांचा ओढाहि कमी झाला. असा कांहीं जनसेवेचा मार्ग पत्करायचा तर प्रथम प्रोफेसरी सोडली पाहिजे. नागपूरच्या मॉरिस कॉलेजांत ते प्रोफेसर होते. त्यांची आमदनी चांगली होती. वक्तृत्व कलेनें व खेळाडू वृत्तीनें त्यांनीं विद्यार्थी वर्गात चांगलीच लोकप्रियता संपादन केली होती. त्यांच्या हातून बाहेर पडलेल्या गोष्टी कादंबऱ्यांनीं मध्यम वर्गाच्या तरुण पोरांना तर वेडच लावलें होतें. पण ही सर्व लोकप्रियता त्यांच्या मनाला समाधान देईनाशी झाली होती. यापेक्षां समाजाचें कांहीं तरी भरीव कार्य आपल्या हातून झालें पाहिजे असें त्यांना वाटे पण प्रोफेसरी सोडून देण्याचा निश्चय मात्र त्यांना बरेच दिवस पार पाडतां आला नाहीं. अशा डांवाडोल मनःस्थितींत

असतांना त्याची प्रिय पत्नी एकाएकीं आजारी झाली. तिचें हें सहावें गर्भारपण होतें. पूर्वींच्या पांची वेळां गर्भारपणांत तिला कधीं त्रास झाला नव्हता व तिच्या प्रसूती वेळाहि सुखानें पार पडल्या होत्या. पण या खेपेला कांहीं तरी बिघाड गर्भाशयांत उत्पन्न झाला. मूल तरी जिवंत राहील किंवा आई तरी जिवंत राहील असें डॉक्टरांनीं मत दिलें. मधुप्यांचें कोमल मन या डॉक्टरी निर्णयामुळें कळवळलें. त्यांच्या मनाचा निश्चय होईना. पत्नीला कांहीं विचारण्याची सोय नव्हती. आपला अभिप्राय व्यक्त करण्याच्या अवस्थेंत ती नव्हती. तेव्हां कोवळ्या अर्भकाच्या जीवनापेक्षां पांच मुलांच्या आईला जिवंत ठेवणें अधिक व्यवहार्य असा आजूबाजूच्या सर्व मंडळीचा सल्ला पडला. मधुप्यांनीं अत्यंत नाखुषीनें या गोष्टीला संमति दिली. हृदयांतील कोमल भावनांना त्यांनीं दडपून ठेवलें. आई गेली तर तिच्यामागें राहिलेल्या कच्च्याबच्च्यांचें कसें होईल याहि विचारानें त्यांच्या चित्ताला भ्रमिष्ट करून सोडलें होतें. शेवटीं आईला वांचविण्याचेंच ठरलें. योगायोग असा कीं डाक्टरांच्या हाताला कांहींच यश आलें नाहीं. बाळ व आई दोघांनाहि काळ घेऊन गेला.

प्रो. मधुप्यांनीं या प्रसंगानंतर नागपूर सोडलें तें कायमचेंच सोडलें. पुण्यांतील भारत सेवक समाजांत ते सामील झाले. या समाजांतील कामगार शाखेचें काम त्यांनीं अर्थातच पसंत केलें. प्रो. मधुपे इतिहासाचे व भाषेचे प्रोफेसर होते पण कामगार चळवळीचा अभ्यास करून त्याला अवश्य असलेल्या अर्थशास्त्रांत व आंकडेशास्त्रांतहि ते पारंगत झाले व कामगार चळवळीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याकरतां समाजानें त्याची मुंबईंत नेमणूक केली.

भारत सेवक समाजाच्या हातांत असलेल्या मुंबईतील कामगार यूनियनमधील सभासदांची संख्या पंधराशेंवर कधीं गेली नव्हती तरी या समाजांतील कामगार कार्यकर्त्यांचें सरकार दरबारीं व गिरणी मालकांच्या दप्तरांतहि चांगलें वजन होतें. हिंदुस्थानातर्फे कामगारांचा प्रतिनिधी कोठें पाठवायचा झाला तर या समाजांतील कामगार पुढाऱ्यांची निवड सरकार करीत होतें व देशांतील कायदेमंडळांतून कामगारांचे प्रतिनिधी म्हणून यांनाच सरकारतर्फे नेमण्यांत येत होतें. भारत सेवक समाजाचे पुढारी म्हणजे समतोल बुद्धीचे, विचारी, ही सरकारी व भांडवलदारी समजूत अगदीं चुकीची नव्हती. पण या समाजांतील कामगार पुढाऱ्यांच्या वजनाला व त्यांच्या विचारीपणाला कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंतच सरकार व भांडवलवाले किंमत देत असत. प्रो. मधुपे या समाजातर्फे कामगार चळवळींत पडल्यानंतर समाजाचें कामगार वर्गातील आसन अधिक बळकट व वजनदार झालें होतें तरी आपल्या या कर्तबगारीला कांहीं विशिष्ट उंचीपर्यंत डोकें वर काढण्याला वाव आहे, त्यापेक्षां

नी थोडी जास्त वाढली कीं बागेचा माळी करवंदीच्या कुंपणांतील डहाळ्यांची वर आलेलीं कोवळया कोंभाचीं टोकें जशीं आपल्या कात्रीनें छाटून टाकतो त्याप्रमाणें सरकारची व भांडवलवाल्यांची कात्री तिला कधींहि वर येऊं देणार नाहीं याची जाणीव या कामगार पुढाऱ्यांना पूर्णपणें होती. मुंबईत पगारवाढीकरतां कामगारांनीं चळवळ सुरू केली कीं हा कटु अनुभव भारतसेवक समाजांतील शांत डोक्याच्या पुढाऱ्यांनाहि येत असतो.

धान्याचे भाव कडाडले होते. जीवनोपयोगी सर्व जिनसांचे भाव वाढले होते. सरकारदरबारीं नमूद असलेल्या आंकड्यांनीं ही गोष्ट सिद्ध केली होती. अशा परिस्थितींत कामगारांच्या पगारांत वाढ करण्याची मागणी मुंबईच्या गिरणी कामगारांनी आपापल्या युनियनतर्फे केली यांत कांहींच वावगें नव्हतें. पण कामगारांच्या रास्त मागण्या लक्षांत घेऊन त्यांना मान्यता दिली तर ती भांडवलशाही कसली? प्रो. मधुप्यांसारख्या भारतसेवक समाजाच्या शांत डोक्याच्या कामगार पुढाऱ्यांनाहि ही गोष्ट पटली होती. त्यांनीं वर्तमानपत्रद्वारां, व वेळोवेळीं पत्रकें प्रसिद्ध करून कामगारांची मागणी किती रास्त आहे हें गिरणी मालकांना व त्यांच्या संघांना पटवून देण्याचा प्रयत्न केला होता. त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. महागाईच्या दिवसांत आपण मागितलेली पगार वाढीची मागणी मालकवर्ग मान्य करीत नाहीं. कामगारांतर्फे ही मागणी त्यांच्यापुढे मांडण्याकरता एक शिष्टमंडळहि पाठविण्याचें कामगारांनीं ठरविलें पण त्याची भेट घेण्याचेंहि मालक वर्गानें नाकारलें. अर्थात यापुढें कामगारांना संप करण्याशिवाय गत्यंतरच राहिलें नव्हतें. पगारवाढीची ही मागणी मुंबईतील सर्व गिरणीमजुरांची होती तेव्हां ती पुरी करून घेण्याकरतां सार्वत्रिक संप करण्याच्या वाटाघाटी मुंबईच्या गिरणभागांत सुरू झाल्या व सार्वत्रिक संप करण्याच्या कल्पनेला चोहोंकडून पाठिंबाहि मिळत चालला. संपाची तयारी करण्याकरतां चाळींचाळींतून कामगारांच्या सभा होऊ लागल्या. मुंबईतील सर्वात जुन्या व कामगारांत कित्येक वर्षापासून लोकप्रिय असलेल्या मुंबई गिरणी कामगार यूनियननें या कल्पनेला पाठिंबा दिला. सार्वत्रिक संपाच्या या प्रचार कार्यात दासूनें व दिग्विजय गिरणींतील त्याच्या दोस्तांनीं विशेषच भाग घेतला होता. रामू तर दासूचा या कामीं उजवा हात बनला होता. मुंबई गिरणीकामगार यूनियनच्या आफिसांत दासूबरोबर तो रोजच्या रोज जात असे व तेथें ठरविण्यांत आलेल्या प्रचार कार्यात व तें करण्याकरतां बाहेर पडणाऱ्या प्रचार पथकांत दासूबरोबर तोहि सामील होत असे.

परळमधील कामगार मैदान आज लाल बावट्यांनीं फुलून गेलें होतें. मुंबईतील दीड दोन लाख गिरणी कामगारांचा सार्वत्रिक संपास कितपत पाठिंबा आहे हे पाहण्याकरतां व सार्वत्रिक संपाचा निर्णय घेण्याकरतां कामगारांची सभा या मैदा-

नावर घेण्यांत आली होती. हजारो कामगार मैदानावर जमा झाले होते. सार्वत्रिक संपाबाबत अनुकूल प्रतिकूल सर्व प्रकारचीं भाषणें या सभेंत होतील तेव्हां सर्व कामगारांनीं तीं शांतपणें ऐकून घ्यावीं व शेवटी आपला जो काय निर्णय द्यावयाचा तो द्यावा, सभा शांतपणें होऊं द्यावी, अशा अर्थाचीं पत्रकें सर्वत्र वांटण्यांत आलीं होतीं व सभा होण्यापूर्वी बऱ्याच वेळां लाउड स्पीकरमधून या सूचना देण्यांत आल्या होत्या

सभेस रीतसर सुरुवात झाली. भांडवलवाल्यांच्या कांहीं गुंडांनीं थोडी गडबड करण्याचा प्रयत्न केला. प्लॅटफॉर्मवर कांहीं दगडहि आले पण लालबावट्याच्या सर्वत्र पसरून उभे राहिलेल्या स्वयंसेवकांनीं हे लोक नेमके पकडले व त्यांना बाहेर घालविण्यांत आलें. थोडासा गोंधळ झाला पण लगेच शांतता पसरली. प्रतिकूल भाषणेंहि सभेंत झालीं. प्रो. मधुपे यांनीं प्रथम थोडासा विरोध दर्शविला पण सभेंतला उत्साह पाहून त्यांनीं आपलें मत बदललें. या सभेंत विशेष गोष्ट घडली ती ही कीं दासूला या सभेंत बोलण्याला परवानगी देण्यांत आली. एवढ्या मोठ्या सभेंत बोलण्याचा त्याचा हा पहिला प्रसंग होता. तो एक साधा कामगार होता. कामगारांची बाजू त्यानें इतकी बिनतोड मांडली कीं खुद्द प्रो. मधुप्यांनादेखील या तरुण कामगाराच्या वक्तृत्वाबद्दल आश्चर्य वाटलें. त्याचा आवाज त्यांना ओळखीचा वाटला अन् केव्हां केव्हां तर दासूच्या रूपानें आपणच बोलत आहोंत असा त्यांना भास झाला. प्रो. मधुप्यांनंतर लगेच दासू उभा राहिला व बोलूं लागला. दासूचा आवाज, त्याचा वर्ण, त्याच्या चेहऱ्याची ठेवण, त्याचा अंगलट, त्याची हावभावाची लकब ही प्रो. मधुप्यांशीं इतकी सदृश होतीं कीं, दासू आपल्या मळक्या व कांहीं ठिकाणीं फाटलेल्या कामगाराच्या पोषाखांत नसता तर प्रो. मधुप्यांचा तो मुलगाच शोभला असता असें सभेंतील कित्येक कामगारांना वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. बोलूं लागल्यापासून थोड्याच क्षणांत त्यानें कामगारांचें मन आपल्याकडे वेधून घेतलें. मायक्रोफोनपासून योग्य अंतरावर उभा राहून जणूं त्यालाच तो आपलें भाषण सुनावीत होता व मधून मधून सभेकडे नजर फेकीत होता. या नजरेंत आत्मविश्वास होता, अन्यायाची चीड होती व आपल्यावर जुलूम करणाऱ्या वर्गाबद्दल वाटणारा द्वेष होता.

' आम्ही रोजंदारीचे गुलाम आहों. भांडवलशाहीनें आम्हाला असें बनविलें आहे. आम्ही गुलाम असलों तरी माणसें आहों. आम्हांला माणसासारखें राहायचें आहे. दहाबारा तास मरेमरेतों राबलें तरी पोटभर अन्न व अंगभर धड वस्त्रहि आम्हाला मिळत नाही. आम्हाला कोण कसें लुटतो याची जाणीव आम्हाला झाली आहे. या जालिम वर्गाला आम्ही आतां स्वस्थ बसूं देणार नाहीं. इंचाइंचाकरितां आम्ही झगडत राहूं. आम्हाला स्वतंत्र व्हायचें आहे. आमच्या श्रमाचें फल आम्ही कोणाला लुटूं देणार नाहीं. आमच्या श्रमावर आमचा हक्क आहे. आमच्या हक्कांच्या

संरक्षणाकरतां व स्वातंत्र्याकरतां, एक इंचभर जमीन काबीज करण्याकरतां आजचा हा लढा आम्ही सुरू केला आहे. माणुसकीनें जगण्याकरतां दोन घांस अन्न व वीतभर कपडा आम्ही मागत आहों. ही साधी मागणीसुद्धां भांडवलशाही मान्य करणार नाहीं. भांडवलशाहीच्या मानगुटीवर बसल्याखेरीज एक इंचभरहि मागें सरकण्यास ती तयार नसते. आजचें सरकार आमचें नाहीं. तें आमचें असतें तर आमची मागणी मान्य करण्यास त्यांनीं गिरणी मालकांना भाग पाडलें असतें. आजचा सार्वत्रिक संपाचा लढा सुरू झाल्याबरोबर उलट तें गिरणी मालकांचीच बाजू घेईल व आम्हांला चिरडून टाकण्याचा प्रयत्न करील. आमच्यांतील कांहीं लोकांना अटक करतील, त्यांना तुरुंगांत डांबतील, आमच्यावर बेदम लाठीमार होईल, गोळया झाडून आमच्यांतील कांहीं दोस्तांचे ते मुडदे पाडतील. पण असल्या दहशतीला आम्ही मीक घालणार नाहीं. सरकार व मालक एक झाले तर त्यांच्या-विरुद्ध आम्ही आमचीहि एकजुटीची फळी उभारूं. दोन घांस अन्नाकरतां आम्ही झगडा सुरू केला कीं, सरकार मालकशाहीच्या बाजूचें होतें. मग या लढ्याचें स्वरूप बदलतें. तो राजकीय लढा होतो. स्वातंत्र्याकरतां चाललेला तो लढा होतो. कामगार-स्वातंत्र्याच्या झगड्याला अशीच सुरवात होते. आणि या लहान लहान चकमकींतून अभेद्य एकजुटीनें पूर्ण स्वातंत्र्याकरतां शेवटपर्यंत लढत राहणारी कामगार संघटना तयार होते. एकजूट व संप हेंच आमचें निर्वाणीचें व तेजस्वी हत्यार आहे. फूट-पाड्यांचा गंज या हत्यारावर चढूं देऊं नका. फूटपाड्यांना हाणून पाडा, सार्वत्रिक संपाला पाठिंबा द्या.'

आपल्याचपैकीं एका तरुण कामगाराचें हें तेजस्वी भाषण ऐकून सभेंत जम-लेल्या हजारों कामगारांनीं त्याच्या शेवटच्या घोषणांना एकमुखानें साथ दिली.

ठरलेल्या तारखेस संपाला सुरवात झाली. बरोबर १०॥ वाजतां गिरण्यांतून कामगार बाहेर पडले. प्रत्येक गिरणींतून प्रथम स्त्री कामगार बाहेर पडल्या. अकरा वाजण्याच्या आंत सर्व गिरण्या ओस पडल्या. प्रत्येक गिरणींतले कामगार बाहेर पडल्याबरोबर मिरवणुकीच्या ओळींतून सामील झाले. भाकरी द्या, पगारवाढ करा या घोषणांनीं सारा गिरण विभाग दणाणून गेला. संपाचा हा पहिला दिवस होता. कोणत्याहि गिरणींतील कामगारांनीं संपांत सामील होण्याच्या बाबतींत काचकूच केलेली नव्हती. यामुळें गिरण्यांगिरण्यांपुढें जाऊन तेथील कामगार बाहेर संपावर आणायचें कारण पडलें नाहीं. सगळ्या मिरवणुकी शांतपणें कामगार मैदानावर येऊन थडकल्या. सर्वच गिरणी कामगार आपण होऊन संपावर आले. कोणाला कांहीं सांगावें लागलें नाहीं. मग जबरदस्ती कुठली ? पोलिस याच गोष्टीची वाट पाहात होते. पण त्यांना बोट शिरकायला आज सवडच सांपडली नाहीं. मिरवणुकींत दिग्विजय गिरणी पहिली

होती. तेथील कामगारांचा लोकप्रिय तरुण पुढारी दासू हातांत लालबावटा घेऊन सर्वांत पुढें चालला होता. त्यांनीं व त्याच्या दोस्तांनीं केलेल्या घोषणेला सर्व कामगार साथ देत होते. कामगार मैदानावर आल्यावर प्रथम कामगार गीतें म्हणण्यांत आलीं. आंतरराष्ट्रीय गीत सर्व कामगारांनीं एकमुखानें गाइलें. संपाच्या या पहिल्या दिवसांत बऱ्याच स्त्री कामगारहि बोलल्या. दासूचें भाषण अत्यंत परिणामकारक झालें. कामगारांचे कांहीं पुढारीहि बोलले. कामगारांचा प्रचंड उत्साह पाहून प्रो. मधुपे तर हर्षभरानें नाचत होते. दासूचें भाषण आज त्यांनींहि ऐकलें. प्रो. मधुपे यांनीं आज मात्र कोणतीच काचकूच न ठेवतां संपाला पूर्ण पाठिंबा दिला. सार्वत्रिक संपाच्या निर्णयाच्या सभेनंतर गिरणी मालकांची दोन तीनदां भेट त्यांनीं घेतली. मालक एक रेसभरहि हलण्यास तयार नाहींत असें त्यांना दिसून आलें. भारत सेवक समाजाला गिरणी मालक आपल्या दोस्ताच्या जागीं मानतात, त्यांतील कार्यकर्त्यांच्या सल्ल्याचा ते विचार करतात ही समजूत गिरणी मालक संघानें या संपाच्या वेळेस खोटी पाडली. प्रो. मधुप्यांना गिरणी मालकांचा संताप आला होता. त्यांच्या भाषणांत तो व्यक्त झाला. त्यांचें भाषण आज फारच कडक झालें. असलीं भाषणें करणारा भारत सेवक समाजांत टिकणें कठिण असेंहि कांहीं कामगार कार्यकर्त्यांना वाटलें. पण या भाषणामुळें प्रो. मधुपे दासूला आज फार आवडले. संप-निर्णयाच्या सभेनंतर प्रो. मधुपे यांनीं दासूचा तपास पुष्कळ केला. पण त्या दिवशीं त्याची भेट त्यांना घेतां आली नव्हती. या पोराला आपण कोठें तरी पाहिलें आहे असें दासू बोलत असतांना त्यांना वाटत होतें. या शंकेचें निरसन करून घेण्याकरतां दासूला भेटण्याची त्यांनीं खटपट केली पण ती फुकट गेली. त्यानंतर दासूची गांठ पडली ती संपाच्या पहिल्या दिवशींच्या सभेंत पडली. आज मात्र दासूची भेट घ्यायचीच असें त्यांनीं ठरविलें होतें आणि योग असा कीं, दासूहि प्रो. मधुप्यांना भेटण्यास आज उत्सुक झाला. प्रो. मधुपे यांच्या अस्खलित, माहितीपूर्ण गंभीर भाषणाचा दासूच्या मनावर परिणाम झाला होता. तेव्हां एकमेकांना भेटूं इच्छिणाऱ्या या दोन व्यक्ती अगदीं विनासायास एकत्र आल्या. दासूला वाटलें एवढ्या मोठ्या माणसाबरोबर आपण कसें बोलावें, आपण तर एक साधे कामगार. पण प्रो. मधुप्यांच्या जवळ आल्यावर त्याचा हा संकोच कमी झाला. कामगारांच्या चळवळींत शिरल्यावर मधुप्यांच्या ठिकाणचा मध्यम वर्गीय शिष्टपणा कमी झाला होता. ते आपलेपणानें कामगारांशीं बोलत, त्यांचीं सुखदुःखें समजून घेत. त्यांच्या ठिकाणीं दोष एवढाच कीं, मालकवर्गाशीं लढून आपला कार्यभाग साधायचा नाहीं, त्यांच्याशीं मिळतेंच घेतले पाहिजे, असें त्यांना वाटे. पण कामगारांच्या चळवळीचा त्यांना जसजसा अनुभव येऊं लागला, तसतशी मालकवर्गाशीं सहकार्य ठेवण्याची त्याची भाषा मागें पडत चालली. संपाच्या प्रसंगाने तर त्यांचा हा भ्रम अजीबातच नष्ट झाला.

प्रो. मधुप्यांनीं आजच्या भाषणांत कामकरी शेतकरी राज्याची कल्पना फारच सुंदर रंगविली होती. राबणाऱ्या वर्गाचें पूर्ण स्वातंत्र्य म्हणजे काय, त्याची गुलामी केव्हां नष्ट होते, हें त्यांनीं तर्कशुद्ध रीतीनें तसेंच कामगारांना समजेल अशा रीतीनें संपवाल्यांपुढें मांडली होती. प्राचीन काळीं युद्धांत पाडाव करून आणलेल्या माणसांना गुलाम बनवून त्यांच्याकडून शेती वगैरेचीं कामें करून घेण्यांत येत होतीं. त्या वेळच्या गुलामींत व आजच्या रोजंदारीच्या गुलामींत फारसा फरक नाही. त्या वेळीं जबरदस्तीनें माणसावर गुलामी लादलेली होती. आज सुद्धां भांडवलशाहीनें अशी कांहीं परिस्थिति निर्माण केली आहे कीं माणसाला रोजंदारी करतांना आपल्या शरीराचा विक्रय करावाच लागतो. फरकच सांगायचा तर ही रोजंदारीची गुलामी करण्याचें स्वातंत्र्य माणसाला मिळालें आहे. कोणत्याहि मालकाकडे जाण्याचें व कोणत्याहि कारखान्यांत काम करण्याचें स्वातंत्र्य त्याला मिळालें आहे. प्रो. मधुप्यांच्या या विचारसरणीनें दासूचें मन वेधून घेतलें होतें अन् संपाच्या या गडबडीच्या दिवसांतहि वेळांत वेळ काढून त्यांच्याबरोबर या बाबतींत कांहीं बोलण्याचें त्यानें ठरविलें होतें.

पण हें बोलणें निघण्यापूर्वीं प्रो. मधुप्यांनीं दासू आल्यावरोबर दुसराच विषय काढला.

'काय दासू नाही का तुमचं नांव ? तुम्हाला मी कुठं तरी पाहिलं आहे.' मधुप्यांनीं विचारलें.

आदरार्थी शब्दाच्या उपयोगानें दासू थोडा गांगरून गेला व असलें मोठ्या शब्दांनीं आपल्याशीं बोलूं नका व माझ्या अरे तुरे चा उपयोग करा अशी त्यानें मधुप्यांना विनंति केली.

'बरं बुवा तसंच. कितीतरी विचार मी करतों आहे. कुठं बरं मी तुम्हांला पाहिलं !'

'अहो पाहिलं असेल याच गिरण भागांत. चुकला फकीर मशिदींत त्याप्रमाणें चुकला कामगार गिरण भागांत !'

दासूच्या या विनोदाची मधुप्यांना मजा वाटली.

'नाहीं दासू, मुंबईला येण्यापूर्वीं तूं कुठं होतास ?'

'एका जंक्शनच्या स्टेशनावरच्या भागांत गंवड्याच्या हाताखालीं काम करीत होतों.'

'स्टेशनावर काम करीत होतास?'

'नाहीं. स्टेशनाजवळच्या गावांत.'

‘ नाहीं, नाहीं, त्यापूर्वी ? ’ डोकें खाजवून प्रो. मधुप्यांनीं विचारलें. हें सर्व विचारतांना ते दासूकडे अगदींच चमत्कारिकपणें पाहूं लागले होते.

‘ त्यापूर्वी ? एका बाईच्या हॉटेलांत. ’

‘ कुठं होतं हें हॉटेल ? ’

‘ साखरेच्या कारखान्याजवळ. ’

‘ छे, छे, तें कांहीं नाहीं. बरं या हॉटेलांत तुला कोणी आणलं ? ’

‘ ती राम-कहाणी नका विचारूं. ’ दासूचा चेहरा गोरामोरा झाला.

‘ कसली ती राम-कहाणी ? ’

‘ नका नका विचारूं. ’ दासूच्या तीव्र स्मरणशक्तीनें त्याचें अंतःकरण कळवळून सोडलें.

दासूकडून एक एक गोष्टी जशा बाहेर पडूं लागल्या तसतसे प्रो. मधुप्यांचें कौतुक वाढतच गेलें.

‘ नका. तें ऐकून तुम्हाला बरं वाटायचं नाहीं. माझ्यासारखं खडतर जीवन कुणीच अनुभवलं नाहीं. ’

‘ मग तर तूं मला सांगितलेच पाहिजेस तुझे मागचे अनुभव. ’

‘ अहो कसले आले अनुभव न् काय. निव्वळ यातना आहेत यातना. ’ अन् असल्या यातना ऐकून तुम्हाला काय फायदा ? जंक्शनच्या स्टेशनावर कितीतरी दिवस नुसत्याचहा चिवड्यावर काढले. थंडी कसली पडत होती. पांधरायला कांहीं नव्हतें. त्या पूर्वींच्या हॉटेलांत सुद्धां हीच तऱ्हा. उरलेसुरले पावाचे तुकडे खायचे, चोवीस तास मर-मर मरायचें अन् तिथंच एकाद्या बाकाच्या आधाराला पडून राहायचें. अन् याच्याहि मागें तुम्ही जायला सांगताय. ’ दासूनें अंगावर शहारे आणल्यासारखें केलें.

‘ मग हॉटेलांत येण्यापूर्वी तूं होतास तरी कुठं ? ’ मधुप्यांना दासूबद्दल कींव वाटली.

‘ होतो एका सावकाराच्या घरीं. ’

‘ सावकाराच्या घरीं ? कोणत्या गांवच्या सावकाराच्या घरीं ? ’

‘ सोनगांवच्या विसुभाऊ सावकाराच्या घरीं. ’

‘ काय म्हणतोस सोनगांव ? ’

‘ या गावांत काय एवढं विशेष असं काय आहे ? भिकारडं गांव अन् त्यांतला भिकारडा राक्षस सावकार. ’

‘ सोनगांव सोनगांव ! दासू तूं यापूर्वी कधीं मुंबईस आला होतास ? ’

‘ हो, हो, आलों होतों. माईबरोबर. ’ दासूला वाटलें आपण कांहींतरीच बोलण्याच्या भरांत सांगितलें. मधुप्यांना काय माहित माई.

'बस्स बस्स,' मधुप्यांनीं टाळी वाजवून आपल्या स्मरणशक्तीचें अभिनंदन केलें.

'आतां सांगतोंच मी सगळं. आठवतं का पहा. मुंबईहून एका बाईबरोबर तूं सोनगांवला चालला होतास. त्या बाईबरोबर एक लहानशी मुलगी होती. गाद्या, काळ्या गाद्या असलेल्या डब्यांत तुम्ही आलांत. आम्हीहि त्याच डब्यांत होतों. कां आठवतं का तुला हें सगळं?'

'मला आठवायचं राहूं दे. पण या सगळ्या गोष्टी इतक्या दिवसापूर्वींच्या. आगगाड्यांतून तुम्ही किती वेळां तरी प्रवास केला असेल, कितीतरी माणसं तुम्हाला गाड्यांच्या डब्यांतून भेटलीं असतील?'

'नाहीं नाहीं. मला तो प्रसंग सगळाचा सगळा आठवतो.'

'मग त्या डब्यांत माईसारखीच एक बाई होती. नाहीं का?"

'होय अगदीं खरें.' मधुप्यांचे डोळे भरून आले.

अन् आपण ही आठवण उगीचच करून दिली असें दासूला वाटलें.

'मग त्या डब्यांत भेटलेला दासू तोच तूं.' मधुप्यांनीं आजूबाजूला इकडे तिकडे पाहिलें. कोणी आसपास नाहींत असें पाहिल्यावर त्यांनीं दासूच्या खांद्यावर हात ठेवले. दोघांची नजरानजर झाली. आपलेंच प्रतिबिंब आपण दासूच्या डोळ्यांत पाहात आहों. नाहीं, नाहीं, दासूच्या रूपानें हे आपलें प्रतिबिंबच मूर्तपणें वावरत आहे असें प्रो. मधुप्यांना वाटलें. पण हा आत्मानुभव मधुप्यांना फार वेळ अनुभवतां आला नाहीं. दासूचा तपास करीत कांहीं कामगार हें दोघेजण यूनियनच्या ज्या एका बाजूच्या खोलींत बसले होते तेथें आले व ते दासूला बरोबर घेऊन गेले.

मुंबईहून परत जातांना वाटेंत कांहीं वेळ भेटलेल्या विसूभाऊ सावकाराच्या पत्नी सुभद्राबाई, त्यांच्या बरोबरचीं दोन मुलें, दासूसंबंधानें सुभद्राबाईनीं सांगितलेली माहिती, याची आठवण करीत प्रो. मधुपे या खोलींत किती तरी वेळ यानंतर बसले होते.

सार्वत्रिक संपाचा दुसरा दिवस शांतपणें पार पडला पण यापुढचे दिवस असेच शांतपणें पार पडणार नाहींत अशीं चिन्हें या दिवशींच दिसूं लागलीं. संप म्हटला कीं त्याच्या मागून पिकेटिंग आलेंच. वादळामागून पाऊस यावा, वीज चमकली कीं गडगडाट व्हावा, दुष्काळामागून साथी सुरु व्हाव्या, प्लेग सुरू झाला कीं उंदीर मारण्याची मोहीम काढण्यात यावी व इनॉक्युलेशनच्या व्यवस्थेच्या पाट्या लागाव्या, औषधामागून पथ्य सुरू व्हावें, असा संप व पिकेटिंग यांचा परस्पर निकट संबंध आहे. मालक वर्गानें दोन दिवस दम खाल्ला. या दोन दिवसांत त्यांच्या गुंडगिरीला कोठें वाव मिळाला नाहीं पण तिसऱ्या दिवसापासून मालकांच्या मोटारी गिरण भागांत फिरूं

लागल्या. मुंबईंत बेकारांना काय तोटा ! या ठिकठिकाणच्या बेकारांना रोजमजुरीचीं पाहिजे तीं आश्वासनें द्यावीं, त्यांना मोटारींत भरावें व आपापल्या गिरणींत नेऊन भरण्याचा प्रयत्न करावा. संप फोडण्याच्या या प्रयत्नाला मालक वर्गानें जारीनें सुरवात केली.

कामगार पुढाऱ्यांना या गोष्टीची कल्पना होतीच. संपफोडेगिरीचा प्रतिकार करण्याकरतां कामगार सेना तयार करण्यांत आली. या सेनेंत स्त्री कामगारांनीं फार उत्साहानें भाग घेतला होता. हातांत झाडू घेऊन कंबरेला पदर खोंचून गिरण्यांच्या फाटकासमोर उभ्या राहिलेल्या या कामगार स्त्रियांना डावलून जाण्याची कोणाची छाती होती ? शिवाय कामगार स्वयंसेवक या स्त्रियांच्या मदतीला होतेच.

पहिले दोन दिवस कामगारांच्या मिरवणुका व सभा शांतपणें पार पडलेल्या पाहूनहि शांततारक्षणाच्या निमित्ताखालीं मिरवणुकींवर व सभांवर बंदी करणारे हुकूम काढून सरकारचें पोलिस खातेंहि मालक वर्गाच्या मदतीला धांवून आलें. तिसऱ्या दिवशीं कामगारांच्या मिरवणुकांना ठिकठिकाणीं अडवण्यांत येऊं लागलें. मालकांच्या व पोलिसच्या गुंडानीं कामगारांना चिथावण्याकरतां त्यांच्यावर ठिकठिकाणीं दगडफेंक करण्यास सुरुवात केली. पण कामगारांनीं या दिवशीं हा सर्व अत्याचार सहन केला. पोलिस खात्यातर्फे जाहीर झालेले निर्बंध पाळून मिरवणुका घेतल्या व सभाहि पार पडल्या.

संपाचा चौथा दिवस. मालक वर्ग आज जणूं चेकाळल्यासारखाच झाला होता. निरनिराळ्या गिरण्यांतील वरचे अधिकारी मोटारींतून बसून कामगारांची भरती करण्याचा कसून प्रयत्न करूं लागले. प्रत्येक गिरणीच्या दारावर संपफोडे व संपवाले यांच्यांत चकमकी होऊं लागल्या. दिग्विजय गिरणीच्या दारावर या चकमकीला फारच गंभीर स्वरूप आलें. दासूच्या पुढारीपणाखालीं संपवाल्या स्त्री पुरुष स्वयंसेवकांनीं संपफोड्यांची डाळ मुळींच शिजूं दिली नाहीं. या ठिकाणीं संपवाल्यांनीं गिरणी फाटकाच्या बाजूला फर्लांग दीड फर्लांग पर्यंत अशी जोराची कतार लाविली होती व संपवाल्याची व इतर लोकांची या ठिकाणीं इतकी झिम्मड झाली कीं, पोलिसांनी या ठिकाणीं गर्दी हटविण्याकरतां आपलें नेहमीचें लाठीमाराचें हत्यार उपयोगांत आणलें. या लाठीमाराला कामगारांनीं मुळींच दाद दिली नाहीं. एवढा हा गंभीर प्रसंग पाहून गिरणीच्या मालकाला काय वाटलें कोणास ठाऊक. त्यानें आपल्या सर्व मोटारी परत फिरविल्या व त्याबरोबर अगदीं पंधरा मिनिटांत या भागांतील वातावरण शांत झालें.

दिग्विजय गिरणींतल्या कामगारांप्रमाणें याच दिवशीं इतरहि गिरण्यांतल्या कामगारांनीं मालकशाहीविरुद्ध असाच जय संपादन केला. त्यामुळें या दिवसाची दोन

प्रहरची कामगारांची मिरवणूक फारच थाटानें सुरू झाली. पोलिस अधिकाऱ्यांनीं आंखून दिलेल्या रस्त्यांनींच ही मिरवणूक कामगार मैदानाकडे जात होती. शेंकडों लालबावट्यांनीं व मागण्यांच्या पिवळ्या, काळ्या, हिरव्या पताकांनीं या मिरवणुकीला अपूर्व शोभा आली होती. पण कामगारांचा जोर मालकशाहीच्या व पोलिस अधिकाऱ्यांच्या पोटांत डांचूं लागला. अगदीं आयत्या वेळीं मशीदीचें निमित्त पुढें करून ठरलेला रस्ता एकाएकीं बदलण्याचा पोलिस अधिकाऱ्यांनीं हुकुम फर्मावला व हा हुकूम मिरवणुकींतील कामगारांना समजला न समजला इतक्यांत मिरवणूक पुढें जाऊं न देण्याकरतां कामगारांवर सर्रास लाठीमार सुरू झाला. आपल्यांतील शेंकडों कामगार साथीदार लाठीमाराला बळी पडत असलेले पाहून मिरवणुकींतील संपवाले कामगार अर्थात्‌च चवताळून गेले. पोलिसांच्या लाठीमाराचा प्रतिकार सोडावाटरच्या बाटल्यांनीं व दगडांनीं होऊं लागला. या दगडफेकीमुळें पोलिस फोर्स नरम येत चाललेला पाहून पोलिस अधिकाऱ्यांनीं गोळीबाराचा हुकूम सोडला. बंदुकांच्या फेरींवर फैरी कामगारांवर झडूं लागल्या. असल्या राक्षसी अत्याचारापुढें निःशस्त्र कामगार किती वेळ टिकाव धरणार ! पोलिसांच्या गोळीबाराला कामगार पटापट बळी पडूं लागले.

प्रो. मधुपे या मिरवणुकींत अव्वलपासून अखेरपर्यंत होते. मिरवणुकीला अडथळा करण्यांत आला. पोलिस अधिकाऱ्यांचा हुकूम कामगारांना कळण्यापूर्वींच पोलिसनें चढाईला सुरुवात केली ही गोष्ट त्यांनीं पोलिस सुपरिंटेंडंटची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन त्याला कळविली पण त्याकडे लक्ष देण्यांत आलें नाहीं. मिरवणुकीवर एकाएकीं चढविण्यांत आलेल्या हल्ल्यावरून मालकशाहीचे दोस्त असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांनीं कामगारांना चांगला धडा देण्याचेंच ठरविलें होतें हें तर उघडच होतें. दासू व त्याच्या दिग्विजय गिरणींतील कामगार स्वयंसेवक मिरवणुकीच्या आघाडीवर होते व मिरवणुक शिस्तीनें व शांततेनें पार पाडण्याबाबत आटोकाट प्रयत्न करीत होते. पण पोलीसचा हा हल्लाच इतका निर्दयपणाचा व क्रूरपणाचा होता कीं, त्याचा प्रतिकार करण्याशिवाय राहणें कामगारांना शक्य झालें नाहीं. मानवी स्वभावाला तें अनुसरून होतें. कामगारांनीं आपल्या निःशस्त्र स्थितींतहि रस्त्यांत हातीं लागलेल्या साधनांनीं पोलिसांना चांगलीच लढत दिली. आपल्या डोळ्यादेखत पोलिसच्या गोळीबाराला आपले दोस्त बळी पडत असतांना देखील त्यांनीं आपली लढत चालू ठेवली पण त्यांच्या हातीं असलेल्या साधनांपेक्षां अधिक प्रभावी शस्त्रास्त्रांपुढें त्यांचा अर्थात्‌च टिकाव लागला नाहीं. दासूनें या प्रसंगीं प्रथम दाखविलेला शांतपणा व त्यानंतर प्राप्त झालेल्या प्रतिकारप्रसंगीं दाखविलेलें शौर्य व धैर्य अवर्णनीय होतें. तो व त्याच्या पथकांतील कामगार स्वयंसेवक त्यांच्यातील अगदीं शेवटचा माणूस पडेपर्यंत पोलिसशीं लढत राहिले. अखेर या लढ्यांत पोलिसांचाच जय झाला.

कामगारांची मिरवणूक उधळली गेली. पोलिसांनीं लालबावट्याचा अपमान केला. मागण्यांच्या पताका फाडून टाकल्या. पण मालकशाहीनें सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीनें मिरवणूक उधळली तरी कामगारांनीं भाकरीकरतां सुरू केलेला संप मात्र उधळला गेला नाहीं. मालकशाहीला याचा प्रत्यय लवकरच आला.

मिरवणुकीची पांगापांग झाल्यावर पोलिसच्या अत्याचाराला बळी पडलेल्या जखमी कामगारांनीं मुंबईतील हॉस्पिटलें भरून गेलीं. जे. जे. हॉस्पिटलांत जागा न मिळाल्यामुळें के. ई. एम. हॉस्पिटलमध्येंहि जखमी कामगारांची सोय करण्यांत आली.

के. ई. एम्. च्या एका वार्डातील जखमी कामगारांपैकीं एकाची केस फारच चिंताजनक होती. या कामगाराच्या मानेंत, बरगडींत व उजव्या मांडींत गोळ्या शिरल्या होत्या. हॉस्पिटलमध्यें आल्यापासून हा रोगी बेशुद्धावस्थेंत होता. डॉक्टरांनीं व विद्यार्थ्यांनीं ही केस तपासली व अभ्यासालायक केस म्हणून तिची थोडीशी निराळी व्यवस्था करण्यांत आली होती. हॉस्पिटलमध्यें आल्यानंतर हा रोगी चार तासांनीं किंचित् शुद्धीवर आला. त्यानें पाणी मागितलें. एकदोन चमचेभ्पाणी त्याच्या पोटांत गेल्यानंतर त्यानें चांगले डोळे उघडले. ' माई !' ' माई !' तो दोनदां म्हणाला. त्याला पाणी पाजणाऱ्या नर्सनें ' माई येतील बरं का ! ' असें त्याला आश्वासन दिलें.

' माई येतील का हो ? '

' हो येतील तर. पण तुझं नांव काय ? ' नर्सनें विचारलें.

' माझं नांव, दासू. '

' तुझ्या बापाचं नांव ? '

' बापाचं नांव ! हां, हां, बापाचं नांव ! ' त्याचे ओंठ थरथर कापूं लागले.

' हो, हो, बापाचं नांव पांडू दळवी. '

' कोणत्या गिरणींत तूं काम करीत होतास ?' हा नर्सनें विचारलेला प्रश्न पुरा होण्यापूर्वीच या रोग्याला मूर्च्छा आली. तो बोलेनासा झाला. त्याच्या मेंदूला हा प्रश्नोत्तरांचा ताण सहन झाला नाहीं.

कामगारांना योग्य ती सवड व सूचना न देतां पोलिसनें त्यांच्या मिरवणुकीवर लाठीमाराचा व त्याबरोबरच गोळीबाराचा हल्ला चढविला हें पाहून प्रो. मधुपे संतापून गेले होते. पण या संतापाचा उपयोग काय ? सरकारनें आपल्याजवळच्या शक्तींचा पाशवी तऱ्हेनें उपयोग करण्याचें ठरविल्यावर कोणी किती त्याचा निषेध केला किंवा कोणी किती त्याच्यावर संतापलें तरी त्याची तें पर्वा करीत नाहीं. प्रो. मधुपे पोलिस सुपरिंटेंडंटला भेटले. त्यानें कांहींच दाद दिली नाहीं. तेव्हां ते परत मिरवणुकीकडे येऊं लागले तों सर्वच मिरवणूक उधळलेली त्यांना दिसली. कांहीं ठिकाणीं पोलिसांनीं लाठीमार करावा, तेथल्या लोकांनीं पांगावें, लाठी थांबली कीं पुन्हा एकत्र

यावें, असा प्रकार चालला होता पण तोहि फार वेळ टिकला नाहीं. कारण या ठिकाणींहि एका सार्जंटानें जवळच्या रिव्हॉल्व्हरचा उपयोग करून दोन तीन कामगार जाया केल्याबरोबर या झटापटीहि बंद झाल्या. त्यांतल्या त्यांत योगायोगच म्हणायचा कीं प्रो. मधुप्यांना लाठीचा तडाका बसला नाहीं व गोळीचा छराहि लागला नाहीं. मिरवणुकीची पांगापांग झालेली पाहिल्याबरोबर इस्पितळांतून रवाना केलेल्या जखमी कामगारांची व्यवस्था पाहण्याकरतां ते प्रथम जे. जे. हॉस्पिटलमध्यें गेले. हॉस्पिटलमध्यें जाण्यांत जखमी कामगारांची काय स्थिति आहे हें पाहण्याचा त्यांचा हेतू होताच पण त्यापेक्षांहि दासूसारखे जे कामगार त्यांच्या परिचयाचे झाले होते व जे या गडबडीनंतर कोठें दिसले नाहींत त्यांपैकीं कोणी जखमी होऊन हॉस्पिटलमध्यें आले आहेत कीं काय हेंहि पाहण्याकरितां ते हॉस्पिटलमध्यें आले होते. विशेषतः दासूसंबंधानें त्यांना फार काळजी वाटत होती कारण तो अगदीं आघाडीवर होता व आपली अभेद्य फळी उभारून तो धैर्यानें पोलिसच्या अत्याचाराला तोंड देत राहिला होता हें त्यांनीं पाहिलें होतें. सुपरिंटेंडंटकडे जाऊन आल्यावर मात्र दासू व त्याचे दोस्त त्यांना कोठें दिसले नाहींत. जे. जे. हॉस्पिटलच्या सगळ्या वार्डांतून ते फिरले. दासू त्यांना कोठें आढळला नाहीं. पोलिसच्या गोळीबारांतून दासू बचावलाहि असेल कदाचित्. त्यांना शंका आली. बचावला असेल तर कोठें तरी या भागांतच तो दिसायला पाहिजे होता. दासूला कांहीं तरी तडाका बसलाच असला पाहिजे कारण तो आघाडीवर राहून प्रत्यक्ष आगीशींच खेळत होता.

जे. जे. मधून ते के. ई. एम. हॉस्पिटलमध्यें आले. जखमी कामगारांनीं या हॉस्पिटलचे वॉर्डहि गच्च भरले होते. मिरवणुकीची पांगापांग होऊन व हॉस्पिटलामधून जखमी कामगारांना आणून चार पांच तास होऊन गेले होते. इतका वेळपर्यंत अविश्रांतपणें प्रो. मधुपे पायाला चक्र बांधल्याप्रमाणें फिरत होते. दासू कोठें दिसतो का पाहावें हाच एक नाद त्यांना लागला होता. के. ई. एम. हॉस्पिटलमधल्या जखमी कामगारांपैकीं ज्यांचीं नांवें समजलीं त्यांचे तक्ते प्रो. मधुपे यांना पहायला सांपडले. या हॉस्पिटलमध्ये जे. जे. पेक्षां बरेच अधिक जखमी कामगार आणलेले होते व त्यापैकीं पुष्कळच चिंताजनक स्थितींत होते. या कामगारांपैकीं कांहीं अगदीं मरणाच्या पंथाला लागले होते. आटोक्याबाहेरच्या केसेस म्हणून मृत्यूशीं झगडा करण्याकरतां या कामगारांना एकाकी सोडून देण्यांत आलें होतें. या कामगारांत दासू नाहीं हें पाहून प्रो. मधुप्यांना किंचित बरें वाटलें. ते थोडे पुढें सरकले तों एका कॉटभोवतीं दोन तीन डॉक्टर, कांहीं तरुण विद्यार्थी व नर्सेस जमा झालेल्या त्यांना दिसल्या. ते लगबगीनें जवळ गेले. एका नर्सनें त्यांना पुढें येण्याची मनाई केली. 'केस सीरियस आहे. तो तुमचा कोणी नातलग आहे का ?' नर्सनें मधुप्यांना पृच्छा केली.

‘ नांव काय या कामगाराचं ? ’ मधुप्यांनीं उलट विचारणा केली.

‘ दासू पांडू दळवी. ’

मधुपे जागच्या जागीं थबकले. क्षणभर आपल्या मनाशीं त्यांनीं झगडा केला.

‘ होय. माझा तो अगदीं जवळचा नातलग आहे. ’ ते म्हणाले.

‘ कोण व्हावा तो तुमचा ? ’

‘ मग सांगेन. त्याला अगोदर मला पाहूं द्या. ’ मधुपे लगबगीनें कॉटजवळ गेले.

‘ माई, माई ! तुम्ही माझ्या आई नाहीं ना ! मग कुठं आहे माझी आई ! ’

‘ सारखा त्यानं असा ध्यास घेतलाय. ’ नर्स म्हणाली. कॉटच्या आसपास उभ्या असलेल्या डॉक्टरांमध्यें व विद्यार्थ्यांमध्यें कुजबुज चालू होती.

‘ पेशंटच्या अंगांत शिरलेल्या दोन गोळ्या काढून टाकण्यांत आल्या आहेत. तिसरी गोळी मानेंत शिरली आहे. एक्स-रे घेऊन तिचा ठावठिकाणा लावायचा आहे. पण या गोळीनें त्याच्या मेंदूवर परिणाम झाला आहे. तो बहुतेक बेशुद्धच असतो. मधून मधून किंचित् शुद्धीवर आला म्हणजे तो असें कांहीं तरी बरळतो. ’ नर्सनें मधुप्यांना पेशंटच्या अवस्थेचें वर्णन करून सांगितलें.

इतक्यांत एका डॉक्टरचें लक्ष प्रो. मधुपे यांच्याकडे गेलें. मधुपे या डॉक्टरांच्या परिचयाचे दिसले.

‘ पशू आहेत हे पोलिस. ’ डॉक्टर मधुप्यांना उद्देशून इंग्रजींत म्हणाले. ‘ या केसकडेच पहा ना. दोन गोळ्या याच्या अंगातून काढल्या. बरगडींतली गोळी हार्टमध्ये गेली असती तर तेथल्या तेथेंच ठार झाला असता हा पोरगा. शिवाय गोळ्याहि साध्या नाहींत. डमडमच्या आहेत. ’

‘ एरवी शांततेच्या व सुव्यवस्थेच्या गप्पा मारणारे पोलिस अधिकारी संप झाला कीं मालकांबरोबर यांचींहि डोकीं कशीं भडकतात समजत नाहीं. ’ दुसरे डॉक्टर म्हणाले.

‘ अहो ते सगळे एकच आहेत. पण या पोराचें कसें काय ? ’ मधुप्यांनीं डॉक्टरांना विचारलें. त्यांच्या शब्दांत कळवळा ओतप्रोत भरला होता.

‘ तिसरी गोळी बरोबर लोकेट होऊन ती सक्सेसफुली काढतां आली अन् तोंपर्यंत पोराला त्याच्या आयुष्यांतल्या आठवणींनीं होणाऱ्या यातना थांबवितां आल्या तर पेशंट हातचा जायचा नाहीं. ’

‘ पेशंट आपल्या अगदीं जवळचा नातलग आहे असें या गृहस्थांनीं सांगितलें. ’ असा नर्सनें मध्येंच खुलासा केला.

‘ नातलग कसला ? मधुप्यांना सगळेच कामगार नातलगासारखे वाटतात. ’ एक डॉक्टर म्हणाले.

‘ ते कांहीं कां असेना ! या पोराला त्याची माई व आई दाखवितां आली तर त्याचा चित्तभ्रम थोडा तरी कमी होईल. ’ दुसरे डॉक्टर म्हणाले.

‘ याच्या घरचा पत्ता माहीत असेल तर तारेनें त्याच्या मंडळीला बोलवा. ’ तेथें असलेल्या विद्यार्थ्यांपैकीं एकानें सुचविलें.

‘ पहा तर मग तुम्हाला काहीं या बाबतींत करतां येत असेल तर. ’ सगळेच डॉक्टर एकदम म्हणाले व ‘ कुठं आहेत तुमच्या त्या हेड नर्स वत्सलाबाई ? ’ अशी विचारणा या डॉक्टरांपैकीं मुख्य डॉक्टरानें केली.

इतक्यांत वत्सलाबाईहि दाखल झाल्या. डॉक्टरांनीं वत्सलाबाईंना थोडें बाजूला नेऊन सर्व सूचना दिल्या.

डॉक्टरांनीं वत्सलाबाईंना बोलावण्याची सूचना दिली त्या वेळीं प्रो. मधुप्यांच्या मनांत कोणत्याच प्रकारची शंका येण्याचें काहींच कारण नव्हतें. असेल कोणी या नांवाची हेड नर्स असा विचार त्यांच्या मनांत आला. पण ही वत्सलाबाई पाहिल्या-बरोबर प्रो. मधुपे जागच्या जागीं थिजल्यासारखे उभे राहिले व वेड्यासारखे तिच्या-कडे पाहूं लागले.

हेड नर्सला योग्य त्या सूचना दिल्यानंतर डॉक्टरांनीं मधुप्यांना हटकलें व पेशंटच्या आईचा पत्ता माहीत असेल तर तपास करण्यास सांगून त्यांना आपल्याबरो-बरच ते बाहेर घेऊन गेले.

‘ पेशंटजवळ मला कांहीं वेळ राहूं देतां का ? ’ मधुप्यांनीं मुख्य डॉक्टरांना विनंति केली.

‘ छे, छे, नर्सेसचीं कामें नर्सेसना करूं द्या. येथें इतके जखमी कामगार आहेत कीं, त्यांच्याजवळ त्यांच्या नातलगांना राहूं दिलें तर हॉस्पिटलमध्यें तितकी जागा नाहीं व नातलगांना अशा वेळीं येथें राहूं देणेंहि योग्य नाहीं. यांत गैर असें कांहीं मी तुम्हाला सांगितलें नाहीं ना ? ’ क्षमान्वित स्वरांत मुख्य डॉक्टरांनीं मधुप्यांची समजूत काढली. मधुप्यांना त्या सर्वांच्या बरोबर वॉर्डमधून बाहेर पडावेंच लागलें. बाहेर पडण्यापूर्वीं लगबगीनें ते दासूजवळ गेले. त्याच्या चेहऱ्यावरून त्यांनीं हात फिरविला. हेड नर्स वत्सला जवळच उभी होती. दासूच्या चेहऱ्याकडे व वत्सलेच्या चेहऱ्याकडे त्यांनीं पाहिलें. वत्सलेची व त्यांची दृष्टि क्षणभर एक झाली. पण त्यांना तेथून या वेळीं जाणें भागच होतें.

‘ तुमचाच मुलगा आहे. जास्त काय सांगूं ? ’

‘ नको, त्यांना कांहींच सांगण्याची जरूरी नाहीं. वत्सलाबाई सर्वच रोग्यां-बरोबर अगदीं आपलेपणानें व प्रेमानें वागतात. तुम्ही मुळींच काळजी करूं नका. ’ मुख्य डॉक्टर इंग्रजींत म्हणाले.

‘ उद्यां तुम्हीं सकाळीं दहा वाजतां या. पेशंटजवळ तुम्हाला निश्चिंतपणें बसतां येईल.’ असेंहि ते मधुप्यांना आपल्याबरोबर बाहेर घेऊन जातांना म्हणाले.

दुसरे दिवशीं आपली ड्यूटी नसतांहि वत्सला दवाखान्यांत आली व दासूजवळ येऊन बसली. दासूच्या प्रकृतींत फारशी सुधारणा झालेली नव्हती. त्याची तळमळ चालू होती. त्याचा चित्तभ्रम कमी झाला होता. मधून मधून तो चांगला शुद्धीवर येऊं लागला होता पण डोक्यांत होणाऱ्या वेदनांमुळें तो हैराण झाला होता. डॉक्टर रोग्याला तपासून गेले. मेंदूची विकृति कमी झाली पण त्याबरोबरच दुसरीं जीं लक्षणें त्यांना दिसून आलीं त्यांवरून केस अधिकच सीरियस होत चालली असल्याचें त्यांना आढळून आलें पण आपलें मत कोणापाशीं त्यांनीं व्यक्त केलें नाहीं.

रात्रभर वत्सला दासूजवळ बसून होती. या इतक्या वेळच्या सान्निध्यांत आपला चुकलेला मुलगा हाच आहे अशी तिची खात्री झाली होती.

‘ माई भेटतील कां हो ? ’ दासूनें आपलें पालुपद वत्सलेला पाहिल्याबरोबर गाइलेंच.

‘ माई व रमाकाकू आतां थोड्या वेळांनीं येतील. स्वस्थ पडून रहा पाहूं. ’ वत्सलेनें दासूच्या अंगावर पांघरूण घातलें व लडिवाळपणानें त्याचे कपाळावर आलेले केस तिनें मागें सारले.

‘ माझं बाळ. ’ तिच्या तोंडून नकळत उद्गार बाहेर पडला.

‘ आई, माई आल्या म्हणजे आई कुठं आहे हें मी त्यांना विचारीन. ’ वत्सलेचें हृदय वात्सल्यप्रेमानें भरून आलें.

इतक्यांत प्रो. मधुपे दासूच्या कॉटकडे येत असतांना तिला दिसले. त्यांचा चेहरा सुकून गेला होता. दासूजवळ वत्सला एकटीच बसलेली पाहून त्यांना बरें वाटलें.

‘ वत्सले, मला क्षमा करशील का ? ’

‘ कसली क्षमा करूं ? क्षमेची वेळ निघून गेली. ’ क्रोध व कारुण्य दोन्हीचेंहि मिश्रण तिच्या आवाजांत झालें होतें.

दासूची हालत झपाट्यानें खालावत चालली आहे, त्याची नाडी सुटत चालली आहे, हें त्यांच्या लक्षात आले होतें. मधुपे ठेवलेल्या खुर्चीवर बसले.

‘ दोन सभ्य स्त्रिया तुमचा तपास करीत आहेत. ’ ड्यूटीवर असलेल्या ख्रिश्चन हेड नर्सनें वत्सलेला वर्दी दिली.

‘ या त्यांना आंत पाठवून. ’ वत्सलेच्या स्वरांत हताशपणा भरलेला होता.

सुभद्राबाई आपल्या बहिणीसह दासूच्या कॉटजवळ आल्या त्या वेळीं मधुपे आपल्या जागेवरून उठूं लागले.

‘ बसा. संकोच मानण्याचं कांहींच कारण नाहीं. ’ रमाबाईनीं शिष्टाचार पाळिला.

‘ दासू, दासू, काय रे तुझी ही दशा ! ’ सुभद्राबाईना दासूजवळ गेल्याबरोबर उमाळा आला.

‘ असं काय, धीर धरा, तो घाबरून जाईल. ’ वत्सलेनें त्यांना सूचना दिली.

आपल्या जवळ चाललेली गडबड दासूला जणूं प्रतीत झाली. त्यानें डोळे उघडले.

‘ कोण माई, आलांत ना, अन् आई ! ’

‘ ही पहा तुझी आई ! ’ असें म्हणून सुभद्राबाईनीं वत्सलेच्या पाठीवर आपला उजवा हात फिरवला.

‘ माई खरं का हें, ही माझी आई ? ’

‘ होय. खरं. हीच तुझी आई ! ’

‘ खरंच ही माझी आई ! मला कालच भेटली ही माझी आई ! ’

दासूच्या अंगांत कांहींच ताकद राहिली नव्हती. त्याच्या हातांतलीहि शक्ति नष्ट होत चालली होती.

‘ प्रोफेसर साहेब, तुम्ही कां उभे, ही माझी आई मला अखेर भेटली. आतां एकच इच्छा राहिली. आई, माझी आई, बाबा भेटतील मला या क्षणाला तरी ? ’

‘ हे तुझे बाबा !’ वत्सलेनें अगदीं निःसंकोचपणें मधुप्यांकडे बोट दाखविलें.

‘ या, जवळ या .आपल्या या बाळाला अखेरचे पहा. ’

खरोखरच तो दासूचा अखेरचा क्षण होता.

‘ आई ! बाबा ! ’ दासूच्या दोन्ही हातांत एका शक्तीचा संचार झाला. त्यानें दोघांचे हात धरून आपल्या छातीवर जुळवून ठेवले.

‘आई ! बाबा ! ’ दासूचा स्वर खोल जात चालला. ‘तुमचा हा मुलगा गुलाम म्हणून विकला गेला आणि आतां तो रोजंदारीचा गुलाम होऊन मरतो आहे. मला आतां विसरा. माझ्या जागीं आतां माझ्यासारख्याच रोजंदार गुलाम दोस्तांना समजा.’ दासूनें आळीपाळीनें आपल्या आईबापांकडे पाहिलें व अखेरचे डोळे मिटले.